सुभेकल्याण

अति प्राचीन कल्याण शहराचा ७००० वर्षांचा
अज्ञात गुप्त व लुप्त उज्वल इतिहास प्रकट
करणारी मराठी मनगटाची अभिमान गाथा

ग्रंथ परिगणन
सन-२०१५
ग्रंथ परिगणन
सन २००८-

ले. विवेकानंद गोडबोले बी.ए.टी.डी.

Scanned with Ca

जन्म दि. १७ सप्टेंबर १९२२

लेखक श्री. विवेकानंद गोडबोले बी. ए. टी. डी., हे कल्याणचे निदान १०/१२ पिढ्या सुमारे २५० वर्षे स्थाइक घराण्यांतील. ह्यांचे एक पूर्वज वेदमूर्ती महादेव भट गोडबोले हे कल्याण येथील किल्ले दुर्गाडीवर सन १७४९ मध्ये श्री दुर्गामाता मंदिराचा जीर्णोद्धार होऊन मंदिराचे पूजा-अर्चे साठी पेशव्यांकडून नेमले गेले. मूळ घराणे राजापूर ता. देवाचे गोठणे येथील. श्री. विवेकानंद गोडबोले हे पेशाने शिक्षक आहेत व कल्याण येथेच मॉडर्न व्ही. स्कूल ह्या नांवाने क्लासेस चालवतात. कल्याण येथील किल्ले दुर्गाडीवरील मंदिराबाबत हिंदू व मुसलमान ह्यामध्ये बरेच वर्षे चाललेल्या वादाच्या चौकशीचे कामी हिंदू समाजासाठी, स्वखर्चाने, बुद्धीकौशल्याने व विधी-चातुर्याने हिंदूंची बाजू प्रभावीपणे व बिनतोड पुराव्याने मांडून ते मंदिर ठरवून घेतले. कल्याण येथील फूटपाथ पार्लमेंटचे अध्यक्ष, इतिहास संशोधन मंडळाचे अध्यक्ष इतिहासाचे अभ्यासू, पट्टीचे वक्ते, व भाषाप्रभू आहेत. ह्या पुस्तकातील प्रत्येक प्रकरणावर एक एक स्वतंत्र ग्रंथ लिहीण्याचा त्यांचा मानस आहे.

Scanned with Car

प्रकाशन समारंभ

२०९५

प्रकाशन समारंभ त्रिशत शिवराज्याभिषेक महोत्सव समिती कल्याण तर्फे शिवशक ३०१, ४ एप्रिल १९७४ रोजी कल्याण नगरपालिका खुले नाटयगृह येथे रात्रौ १० वा. शिवशाहीर **श्री. बाबासाहेब पुरंदरे** यांचे अध्यक्षतेखाली श्रीमंत छत्रपतीमहाराजस्नुषा सकलसौभाग्यसंपन्न **अरुणाराजे भोसले**, सातारा यांचे शुभहस्ते झाला.

श्रीमंत छत्रपती महाराजस्नुषा सकलसौभाग्यसंपन्न अरुणाराजे भोसले, सातारा 'सुभेकल्याण' या ऐतिहासिक पुस्तकाचे प्रकाशन करीत असताना. मध्यभागी कल्याणचे नगराध्यक्ष श्री. ना. का. अहेर व डाव्या बाजूस लेखक श्री. विवेकानंद गोडबोले

सुभेकल्याण

विवेकानंद गोडबोले बी. ए. टी. डी.

इतिहास संशोधन मंडळ, कल्याण

Scanned with Ca

929-999 थ 74

विषयानुक्रम

(१) प्रास्ताविक (२) इतिहास संशोधन मंडळ कल्याण

१.	श्रीभगवान वीर परशुराम काळ	१
२.	रामायणकाळातील सुभे कल्याण	१४
३.	सातवाहनकाळातील अपूर्वाई	३४
४.	सातवाहनांचा उदयकाळ	४४
५.	सातवाहनकालीन कल्याणचे सांस्कृतिक जीवन	५४
६.	सुभे कल्याणचे दर्यावर्दी स्वामी शिलाहार	६२
७.	आम्हीही सुंदर झालो असतो	७९
८.	सुभे कल्याणचा स्वातंत्र्यसंग्राम	९७
९.	पुन: स्वराज्याकडे	११६
१०.	वसईचा धर्मसंग्राम	१३१
११.	कल्याणचे सुभेदार	१५०
१२.	सरसुभेदार व सेनाखासखेल रामाजी महादेव बिवलकर	१५८
१३.	सुभे कल्याणमधील सांस्कृतिक जीवन	१९३
१४.	कल्याणातील देवस्थाने	२१०
१५.	ऐतिहासिक स्थळविशेष	२३०
१६.	ऐतिहासिक बांधकामे व घराणी	२५२
१७.	कल्याणातील थोर समाजसेवक	२७५
१८.	सामाजिक संस्था	२९४

प्रकाशक : श्री. विवेकानंद गोडबोले, गोडबोले इतिहास संशोधन मंडळ, मॉडर्न व्ही. स्कूल, टिळक चौक, कल्याण.

मुद्रक : म. बा. जोशी, ज्ञानविलास प्रेस, पुणे २.

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

किंमत रु. २५–००		३ जून १९७४

Scanned with Ca

२४१५

माझे वडील

कै. गोविंद कृष्ण गोडबोले

यांच्या पूज्य स्मृतीस सादर समर्पण.

मराठी योजना
र. नं. ....

प्रास्ताविक

राष्ट्रांचे इतिहास लिहिले जातात. देशांचे इतिहास लिहिले जातात. देवांचे, धर्माचे, जातीचे व समाजांचेही इतिहास लिहिले जातात. परंतु जी गावे व नगरे यांनी समाज व राष्ट्र बनते त्यांचे इतिहास क्वचितच लिहिले जातात. राष्ट्रांच्या आणि राजवटींच्या इतिहासात जी मोठमोठी परिवर्तने व घटना घडलेल्या असतात त्यांचे स्थूलदर्शन त्या त्या इतिहासात घडते. परंतु मूलभूत धागे हे निरनिराळ्या ठिकाणांच्या घटना, व्यक्ती, प्रसंग, भौगोलिक परिस्थिती इत्यादि वैशिष्ठ्यांमध्ये गुंतलेले असतात. देशांचे, राष्ट्रांचे इतिहास, घटना व परिवर्तने या पायाभूत गोष्टींनी बलवान झालेले असतात. त्यामुळे मोठमोठ्या इतिहासांचा सूक्ष्म अभ्यास होण्यासाठी, ऐतिहासिक सत्ये उजेडात येण्यासाठी व त्यांना योग्य न्याय मिळण्यासाठी स्थानिक वैशिष्ठ्यांचे इतिहास हे फार महत्त्वाचे ठरतात; परंतु ते क्वचितच लिहिले जातात. त्यातलाच हा एक प्रयत्न.

गेली सात वर्षे सतत ज्या विषयाच्या चिंतनात, अभ्यासात व संशोधनात गेली, तो हा 'सुभे कल्याण' ग्रंथ हातावेगळा करताना मनाला अत्यंत आनंद होत आहे. कल्याण शहर ही माझी जन्मभूमी आहे, पूर्वजभूमी आहे, कर्मभूमी आहे. त्यामुळे या माझ्या मातृभूमीबद्दल मला अत्यंत आत्मीयता आहे आणि अभिमानही आहे; व कल्याणच्या प्राक् ऐतिहासिकत्वामुळे त्याबद्दलचा आदर व अभिमान अधिक वृद्धिगत झाला आहे.

४४८७३

अपरान्त-निर्माता चिरंजीव भगवान वीर परशुराम ह्या भूमीचा निर्माता आहे व पहिला प्राचीन राज्यकर्ता आहे. परमेश्वराच्या ह्या सहाव्या अवताराची ही कर्मभूमी आहे. परमेश्वराचा सातवा अवतार प्रभू रामचंद्राच्या पवित्र पदस्पर्शाने पावन झालेली ही पुण्यभूमी आहे. यक्ष धनवंत कुबेराची ही राज्यभूमी आहे. महाबलाढ्य रावणाची ही निवासभूमी आहे. महर्षी कण्व व विश्वामित्रपुत्री शकुंतला, महाकाव्य रामायणाचा जनक आद्यकवि महर्षी वाल्मिकी यांची आश्रमभूमी व समाधीभूमी आहे. परचक्रनिवारक शककर्त्या शालिवाहनांची ही आश्रयभूमी आहे. त्यांचे देवकुळही नाणे घाटात आहे. 'गाहा सत्तसई' या पहिल्या मऱ्हाठी काव्याचा वाल्मिकी सातवाहन राजा श्री. वत्सराज हाल याची ही निवासभूमी आहे. ह्याच पावन भूमीत नाथपंथी सत्पुरुष मच्छींद्रनाथ, किमयागार गोरक्षनाथ व कानिफनाथ यांनी समाधी घेतल्या आहेत. ज्ञानेश्वर-समकालीन यतिराज सहजानंद मुनी यांनीही त्याच पावन भूमीत कल्याण नगरात ज्ञानेश्वरांप्रमाणेच जिवंत समाधि घेतलेली आहे. उल्हास, काळू व भातसा यांच्या त्रिवेणी संगमावरील हे पावन तीर्थ आहे

Scanned with CamScanner

पांडवांनी देखील ह्या तीर्थक्षेत्राला भेट देऊन पावन केलेले आहे. दर्यावर्दी शिलाहार मराठी राजांची ही राज्य व कर्मभूमी आहे.

सुभेदाराच्या सून प्रकरणाने श्रीशिवछत्रपतींच्या नैतिक चारित्र्याची दीप्ती त्रिखंडात पसरवून अखंड विश्वाला 'धन्य तो मराठी राजा व धन्य ती मराठी भूमी सुभे कल्याण' असे धन्योद्‌गार काढायला लावणारी ही कल्याणकारी भूमी आहे. पाश्चात्यांना आणि मोंगलांना मराठी मनगटाच्या मर्दुमकीची प्रचीति आणून देणारी ही वीरभूमी आहे. शिवकालापासून वीर बाजीराव कालापर्यंत स्वराज्याची सेवा करून कल्याणला स्वातंत्र्यप्राप्ती करून देणारे सुभेदार रामचंद्र जोशी (चासकर), फिरंग्यांच्या निःपातासाठी आयुष्य वेचून वसईचे महाभारत घडवून आणणारे धर्मवीर सरदार अणजूरकर, इंग्रजांच्या भारतावरील आक्रमणाला पश्चिम किनाऱ्यावर रोखून धरण्यात यशस्वी झालेले पेशव्यांचे पहिले आरमारी सरदार, दर्यावर्दी सुभेदार, थोर राजकारणी व तलवारबहाद्दर, श्री. रामाजी महादेव बिवलकर, १७८० च्या स्वातंत्र्यलढ्यात कल्याणच्या स्वातंत्र्य-रक्षणाकरिता इंग्रजाबरोबरच्या लढाईत बाजीपंताच्या नेतृत्वाखाली लढताना धारातीर्थी हौतात्म्य पत्करणारे अंताजी नारायण ढवळे याच भूमीत होऊन गेले.

वेदमूर्ती महादेवभट गोडबोले, वेदमूर्ती वझे, वेदमूर्ती जोशी, मालगुंडकर, वेदोनारायण बोरगांवकर इत्यादि असंख्य वेदोनारायणांच्या निवासाने व वेदोघोषाने ही भूमी पावन झाली आहे. किल्ले दुर्गाडीवरील वरदायिनी, त्र्यैलोक्याचे रक्षण करणारी श्रीभवानी दुर्गामातेचे हे निवासस्थान आहे.

अगदी अलीकडच्या काळात भारत इतिहास संशोधन मंडळाच्या मुनिचतुष्टयापैकी तीन मुनी, श्री. साने, दिवेकर व कौस्तुभचिंतामणी, सरस्वतीचा कंठमणी, विद्वद् कुलशेखर महाभारताचार्य चिंतामणराव वैद्य हे कल्याणकर होते.

पहिली पाश्चात्य-विद्याविभूषित स्त्री डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी या तर प्रसिद्ध कल्याण सुभेदार (चासकर) जोशी घराण्यातल्या होत. या पावन भूमीत 'त्राटिका' नाटककर्ते श्री. वासुदेवराव केळकर, कवि माधवानुज, यासारखे साहित्यिक, कै. शंकरराव झुंजारराव, कै. रामभाऊ पटवर्धन, कै. गणपतराव फडके, कै. लखुनाना फडके, कै. बापूसाहेब फडके, कै. डॉ. मोडक, यासारखे थोर समाजसेवक होऊन गेले व विद्यमान डॉ. वि. वा. फडके, डॉ. ग. गं. रायकर व महाराष्ट्र विधानसभेचे लढाऊ माजी विरोधी पक्षनेते, पेशवेकालीन आरमारी सरदार आनंदराव धुळपांचे वंशज, समाजदर्यासारंग व राज्यसभेचे खासदार श्री. कृष्णराव धुळप ह्यासारख्या असंख्य नररत्नांना ह्या भूमीने जन्म दिला आहे.

अशा या पुण्यपावन कल्याण सुभ्याचा हा इतिहास आहे– कल्याण व त्याच्या परिसराचा इतिहास आहे. एकमेव कल्याण शहराचा नव्हे; कल्याण विभागाच्या

सीमा निरनिराळ्या राजवटीत वेळोवेळी बदलत आलेल्या आहेत. त्यामुळे सुभे कल्याण लिहिताना काही मर्यादा ठरवून घ्याव्या लागलेल्या आहेत. त्यामध्ये इगतपुरीपासून ते कल्याणपर्यंतचा भाग, ठाणे जिल्हा, साष्टीचा भाग एवढा समाविष्ट केला आहे. कल्याण विभागाला परशुरामकालापासून म्हणजे सुमारे ७००० वर्षांचा इतिहास आहे. अर्थातच हा इतिहास अतिशय सूक्ष्मपणे मिळणे अतिशय दुर्लभ आहे हे आपण जाणतोच. परंतु उपलब्ध असलेले ग्रंथ, वस्तू, वास्तू, परदेश प्रवासी यांच्या डायऱ्या, वृत्ते इत्यादींवरून आपणाला सांस्कृतिक इतिहास लिहावा लागतो. आर्य भारतात आले त्या काळचा केवळ ऋग्वेद उपलब्ध असताना देखील, कल्पना, प्रतिमाचित्रे इत्यादींवरुन आपण आर्यांचे धार्मिक, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक, बौद्धिक, वगैरे सर्व भागांचे तर्काने चित्रण करून आपण ज्ञान उपलब्ध करून घेतो. तसेच याही बाबतीत करणे शक्य आहे. यामुळे आपल्या पुराण पूर्वजांविषयी योग्य तो अभिमान व सांस्कृतिक वारशासंबंधी जाणीव उत्पन्न होईल, म्हणूनच परशुरामाने अपरान्त निर्माण केला; एवढ्या एकाच घटनेवरून उपलब्ध साहित्यावरून कल्याण सुभा व तत्कालीन परिस्थिती ह्यासंबंधी ज्ञान उपलब्ध करून ते संकलित करण्याचा हा प्रयत्न आहे. रामायण हे तर महाकाव्य आहे. परंतु ते संपूर्ण व्यवस्थित लावल्यावर अशी जाणीव होऊ लागली की पंचवटीपासून पुढील भाग ह्याच भागात घडला आहे. आतापर्यंत असलेल्या श्रद्धांना व समजुतींना थोडा धक्का बसू लागला; परंतु निरनिराळ्या व्यक्तींनी, थोर पुरुषांनी, संशोधकांनी लिहिलेले ग्रंथ वाचल्यानंतर असे आढळले की रामरावण युद्ध, त्यातील स्थळे इत्यादीबाबत विद्वानांत पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर मतभेद आहेत. डॉ. सांकलिया, रिसर्च डायरेक्टर डेक्कन रिसर्च इन्स्टिटयूट पुणे, म्हणतात, रावणाची लंका अमरकंटक पर्वतात आहे. इंदूरचे सरदार किबे यांनीही तसे मत एका ठिकाणी व्यक्त केले आहे. तर नडियादचे श्री. सी. एन्. मेहता म्हणतात, रावणाची लंका ऑस्ट्रेलियात आहे. बंगलोरचे न्यायाधीश परमशिव ऐय्यर म्हणतात, रामायणातील स्थाने ही जबलपूरच्या आसमंतातील प्रदेशांत आहेत. एक 'महाराष्ट्रीय' या गृहस्थांनी आपल्या श्रीरामायण-समालोचन ग्रंथात (द्वितीय खंड) हल्लीचे सीलोन बेट हीच लंका होय असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. लोकांचाही समज अनेक शतकांपासून सिंहलद्वीप म्हणजेच लंका असाच आहे. महाभारताचार्य चिंतामणराव वैद्य आपल्या 'एपिक इंडिया' ह्या ग्रंथात, जनस्थान म्हणजे रामाचे निवासस्थान गोदावरीच्या मुखाकडे म्हणजे भद्राचलंकडे आहे. (पान ३०८) परंतु आपल्याच Riddle of the Ramayana ह्या ग्रंथात जनस्थान नाशकाजवळ आहे असे स्पष्टपणे म्हणतात (पान १०९). भारताचार्यांनी अशी दोन ग्रंथात परस्परविरोधी विधाने करावी हे जरा चमत्कारिकच वाटते. म्हणजेच त्यांचा याबाबत निश्चित विचार झाला नसावा व तसे करण्यास इतर विस्तृत कामां-

Scanned with Car

मुळे शक्य झाले नसेल. परंतु या विद्वानांच्या मतामतांच्या गलबल्यात सामान्य माणूस रूढ समजुतीला चिकटून राहिला तर नवल नाही. त्यावरून एक गोष्ट निश्चित होते की विद्वानांना ह्या स्थानाबद्दल निश्चित शंका आहे व त्याचा पद्धशीरपणे विचार केला पाहिजे.

रामायणातील त्या विशिष्ट भागाचा म्हणजे पंचवटी निवास, सीताहरण इत्यादि भागापासून पुन्हा अभ्यास करता असे लक्षात येऊ लागले की लंका ही जवळपासच असली पाहिजे व त्या दृष्टीने रामायणातील रामाचा प्रवास, स्थळ-वर्णने, काळवर्णने, त्या काळची वाहतुकीची साधने इत्यादींचा विचार करून व ते सर्व पंचवटी ते साष्टी बेटापर्यंतच्या भागाशी तंतोतंत जुळते असे पाहून, साष्टी बेट हीच लंका असली पाहिजे असे वाटू लागले. त्याच वेळी योगायोगाने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात वाचन करीत असता 'साष्टी बेट हीच लंका' नावाचे एक छोटेसे चोपडे पहाण्यात आले. तेव्हा ते त्वरीत वाचून पाहिले व असे दिसले की आमचे मनातील विचार, त्याचे लेखक डॉ. प्र. शं. गुप्ते यांनी तंतोतंत मांडले असून त्यांनी ते १९५४ सालीच नाशिक व अंमळनेर येथील वाङ्मय मंडळापुढे वाचले होते. तेव्हा आम्ही त्यांचेशी पत्रव्यवहार करण्याचा प्रयत्न केला; परंतु ते कालवश झालेले आहेत असे समजले. अर्थात ह्या संशोधनाचा प्रथम मान त्यांचाच आहे हे ऋण आम्ही प्रांजळपणे कबूल करतो. त्यांचे छोटेखानी पुस्तकाचा आधार घेऊन व वाल्मिकी रामायण त्या दृष्टीने संपूर्ण वाचून आमचे मत अगदी पक्के झाले की साष्टी बेट हीच रामायणातील लंका होय व रामरावण युद्धप्रसंग या सुभे कल्याण-मध्येच घडलेला आहे. कै. डॉ. प्र. शं. गुप्ते यांचेच विचार आमचे मनात त्या संबंधी काहीही माहिती नसताना कसे उत्पन्न व्हावे ? व त्या विचारात असताना कै. डॉ. प्र. शं. गुप्ते यांचे पुस्तक अचानक कसे नजरेसमोर आले याचे आश्चर्य वाटते. अर्थात आम्हाला जरी कल्पना स्वतंत्रपणे सुचली असली तरी तिचे प्रथम श्रेय त्यांचेकडेच जाते किंवा त्यांनीच अदृश्य प्रेरणा देऊन आम्हांस विचार करा-वयास लावले असेही म्हणता येईल. काही असो, हा विषय आम्ही यात मांडून सुभे कल्याण ही रामायणाची पावनभूमी आहे हे मांडले आहे. याच विषयावर एक स्वतंत्र पुस्तक अधिक सूक्ष्म अभ्यासानंतर आम्ही एक दोन वर्षात प्रसिद्ध करणार आहोत.

त्यानंतरच्या काळाची फारशी माहिती उपलब्ध नाही. महाभारतकाळात या भूमीवर बिभीषणाचे राज्य होते, एवढाच उल्लेख महाभारतात सापडतो. अर्थात नंतरचा इतिहास म्हणजे गेल्या अडीच हजार वर्षांचा इतिहास होय. त्यामध्ये मौर्य कालातील फारशी माहिती व परिस्थिती उपलब्ध नाही. नंतरचा काळ म्हणजे सातवाहन काल होय. याबाबतही साधने फार दुर्मिळ आहेत.

परंतु मराठवाडा विद्यापीठाचे एक विद्वान इतिहास संशोधक डॉ. पंढरीनाथ रानडे यांनी एक छोटेसे पुस्तक ह्या सातवाहन कुळावर लिहिले आहे. त्याचा उपयोग आम्ही भरपूर करून घेतला आहे व त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. या राजांपैकी सुमारे १० राजांचे राज्य प्रतिकूल परिस्थितीत कल्याण भागात होते. हा निष्कर्ष आमचा स्वतःचा आहे व तो तर्कशुद्ध आहे व आज तरी प्रतिकूल पुरावा मिळण्यासारखा नाही. योगायोगाने या विचाराला पुष्टिदायक पुरावा मिळण्याची शक्यता अधिक आहे.

सातवाहनांच्या नंतर दर्यावर्दी शिलाहार राजवटीचा संबंधित इतिहास नोंदवला आहे. हे राजे याच भूमीत होते, याबद्दल कोणताही वाद नाही व तसे पुरावेही भरपूर उपलब्ध आहेत. तरी देखील या दीर्घकालीन इतिहास पुस्तकात या राजवटीबद्दल आवश्यक तेवढे नोंदवले आहे. शिलाहारानंतर बिंबराजे या भूमीत होऊन गेले; परंतु त्यांच्यासंबंधी ' महिकावतीची बखर ' वगैरे खेरीज फारशी माहिती उपलब्ध नाही. म्हणून त्यासंबंधी खास लिहिले नाही. नंतरच्याही मुसलमान काळासंबंधी सुभे कल्याणबाबत फारशी उल्लेखनीय माहिती नाही. यानंतर मात्र शिवाजी महाराजांनी कल्याण जिंकले व या कल्याण सुभ्याला परत स्वराज्य लाभले; तेथपासून पेशवाई अखेरपर्यंतचा काळ कर्तबगार व्यक्ति, घटना, इत्यादींनी भरलेला आहे. त्यांची सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. य. न. केळकर यांच्या ' वसईची मोहीम ' या ग्रंथाचा भरपूर उपयोग आम्ही केला आहे व त्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत. स्थानिक माहिती आम्ही स्वतः हिंडून पुष्कळ प्रमाणात मिळवली आहे. त्यामध्ये येथील हायस्कूलचे एक सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. चिं. वै. भिडे यांनी पूर्वी काही माहिती गोळा करून ठेवली होती, त्याचा त्यांनी आपणहून आम्हाला उपयोग करू दिला आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. याशिवाय येथील काही स्थानिक मंडळींनी आम्हाला फारच सहाय्य केले आहे. अनेकांचे सहकार्य अजूनही लाभत आहे. त्यांचा मी इतिहास संशोधक मंडळाचे वतीने कृतज्ञ आहे. त्या सर्वांची नावनिशिवार यादी येथे देणे शक्य नाही; आणि त्यातील कित्येकांना तसा उल्लेख आवडणारही नाही. तथापि या पुस्तकाचे कामी ज्यांचे अमोल सहाय्य झाले त्या आमचे इतिहास संशोधन मंडळाचे सदस्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्यांनी माझ्याकडून हे ईश्वरी कार्य करवून घेतले असेच म्हणावे लागेल. त्यातील विशेष म्हणजे मंडळाचे चिटणीस श्री. मुकुंद टुमकर, श्री. त्र्यं. र. दाणेकर गुरुजी व श्री. गोपीनाथ घुमरे या सदस्यांनी सातत्याने मला काम करावयास लावून हे एवढे अवघड कार्य पूर्ण करून घेतले. यांचे मदतीशिवाय हे कार्य पूर्ण होऊच शकले नसते. तेव्हा त्यांचे मजवर कायम ऋण आहे व ते पुढील कार्यातही वाढावे ही इच्छा.

Scanned with Car

कल्याणच्या पुण्यपावन सुभ्याचा एवढा प्रचंड इतिहास असताना, अजूनपर्यंत कोणीच याचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला नाही; म्हणून आम्ही या भगीरथ कार्याला उद्युक्त झालो. अशा तऱ्हेचा एखादा माहात्म्य-ग्रंथ लिहून कल्याणवासी व भारतीयांना कल्याण-माहात्म्याची प्रकर्षाने जाणीव व अभिमान उत्पन्न करावा व आपल्या मातृभूमीचे अंशत: तरी ऋण फेडावे म्हणून हा उद्योग आमच्या अल्प-मतीने व ताकदीने तयार केला आहे. आमचा हा प्रयत्न ईश्वरी इच्छेने प्रेरीत झालेला, परंतु मानवी परिश्रमांतून साकार होणारा हा एक व्यवहार आहे. द्रव्य, पांडित्य, राजाश्रय, अशा साधनांचा अभाव असताना केवळ लोकाश्रयावर व ईश-कृपेवर विसंबून हा प्रचंड उद्योग आम्ही हाती घेतला आहे. परंतु आमची भावना अशीच, की आम्ही यासाठी केवळ निमित्तमात्र आहोत. कल्याणातच दिवेकर, साने व महाभारताचार्य यांसारखे थोर विद्वान इतिहास संशोधक होऊन गेले. त्यांचेशी आमची तुलनाही होणे कठीण. परंतु त्यांचे पावलावर पाऊल ठेवून हा प्रचंड उद्योग आम्ही आरंभिला आहे. ज्या अतिमानवी शक्तींच्या मनात हे कार्य घडून यावे असे आहे, त्यांच्या हातातील साधन बनण्याचे भाग्य आम्हाला लाभलेले आहे इतकेच.

अर्थात हे कार्य म्हणजे काही सर्वस्वी परिपूर्ण ग्रंथ आहे असे नाही, याची आम्हास जाणीव आहे. यात जे जे उत्कृष्ट, चांगले ते ते सर्व श्रीभवानी दुर्गामातेचे आहे व जे जे हिणकस असेल ते ते आमचे आहे. म्हणून पूर्वसूरींना, महर्षींना शतकोटी विनम्र प्रणाम.

या पुस्तकाच्या कामी आम्हाला अनेक व्यक्तींनी बहुमोल मदत केली आहे. त्यांचा नामोल्लेख करणे अत्यंत जरूरीचे आहे. मौजे साकुर्ली गावचे सरपंच श्री. नारायणराव अधिकारी व त्यांचे बंधू व प्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते श्री. रामराव अधिकारी यांनी आम्हाला अंजन पर्वतावरील वाल्मिकी समाधीचे संशोधनाचे कामी बहुमोल सहाय्य केले. त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. हे अधिकारी तेथील इतिहासप्रसिद्ध देशमुख घराणे असून त्यांना मोंगल काळापासून सनदा मिळालेल्या आहेत. तसेच प्रसिद्ध वाल्मिकी समाधीचे संशोधक व सेवक कै. साधू निर्वाणदास यांनीही आम्हांला अत्यंत बहुमोल मदत व मार्गदर्शन केले. हे पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वीच ११ एप्रिलला त्यांचे महानिर्वाण झाले. त्यांचे ऋणही फिटण्यासारखे नाही.

या पुस्तकाचे मुखपृष्ठावरील चार रंगी 'सुभेदाराची सून व श्री शिव-छत्रपती' या प्रसंगाचे इतके सुंदर चित्र ठाणे येथील प्रख्यात चित्रकार श्री. एस. डी. भावसार यांनी केवळ मंडळावरील प्रेमामुळे आम्हाला थोडक्या वेळात व इतर

ठिकाणी घेत असलेल्या बिदागीच्या अवघ्या एक पंचमांश मोबदल्यात तयार करून दिले, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. तसेच चित्रकाराने काढलेले चित्र जसेच्या तसे छापणे हेही कौशल्य आहे. गिरगावातील सचिन आर्टचे श्री. कुळकर्णी यांनी ते मूळाबरहुकुम ऑफसेटमध्ये सुंदर छापून दिले, याबद्दल त्यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहोत. तसेच या पुस्तकात आलेली सर्व छायाचित्रे कल्याण येथील बसंत स्टुडिओने वेळोवेळी झटपट व सुंदर काढून दिली. त्यांचे आम्ही आभारी आहोत. तसेच या छायाचित्रांचे व रेखाचित्रांचे सुंदर ब्लॉक्स् आमचे मित्र श्री. त्र्यंबकराव फाटक यांनी बनवून आणून दिले याबद्दल आम्ही त्यांचेही अत्यंत आभारी आहोत.

वरील तांत्रिक गोष्टी जरी जमल्या तरी त्यांचा उत्कृष्ट वापर करूनच त्याची शोभा वाढते. या पुस्तकाची सुंदर छपाई हीच याची साक्ष आहे. पुस्तकाची छपाई पुण्याचे अप्पाबळवंत चौकातील, प्रसिद्ध ज्ञानविलास छापखान्याने केलेली आहे. सुबक छपाई, माफक मोबदला व वक्तशीरपणा हे या छापखान्याचे वैशिष्ठ्य आहे. मुद्रण व्यवसायात हे गुण फार दुर्मिळ आहेत. परंतु आमच्या सुदैवाने ' ज्ञानविलास ' प्रेसचे चालक श्री. म. बा. जोशी यांची गाठ पडली व या पुस्तकाच्या अंतिम सौंदर्याचे सारे श्रेय त्यांनाच देणे जरूर आहे असे आम्हाला वाटते. त्यांचे प्रेमाचे ऋण आम्हाला कधीही विसरता येणार नाही; तरीही त्यांचे शाब्दिक आभार मानतोच.

याशिवाय कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यावरील श्रीदुर्गाभवानी मंदिराला हिरव्या आक्रमणापासून बचावण्याच्या आमच्या प्रयत्नाला १९६८ च्या नवरात्र महोत्सवप्रसंगी शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी आम्ही नुसती विनंती करताच आपल्या शिवशक्तीची आमचे मनगटास जोड देऊन आम्हास यशस्वी केले; हेही ऋण व प्रेम आम्ही विसरू शकत नाही व ते असल्या धर्मकार्यात सतत वाढतेच राहो ही प्रार्थना. सध्या तर श्री दुर्गाभवानीचा नवरात्र महोत्सव शिवसेनाच नागरिकांचे मदतीने करीत असते व तो सतत करीत राहतील अशी आशा आहे.

समाजकार्य दर्यासारंग व राज्यसभेचे खासदार श्री. कृष्णराव धुळप, आमदार नकुल पाटील, आमदार श्री. भेगडे यांनी आम्हाला शुभचिंतनपर संदेश पाठवले व आपले कल्याण शहरावरील प्रेम व्यक्त केले, ह्याबद्दलही आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. श्री. बाळासाहेब फडके, श्री. रामचंद्र वैजनाथ भिडे, माजी मुख्याध्यापक न्यू हायस्कूल, कल्याण, श्री. गं. दि. धारपुरे, माजी सभासद कल्याण नगरपालिका, यांनी प्रत्यक्ष भेटून वेळोवेळी चौकशी करून प्रोत्साहन दिले व हे कार्य पूर्ण करण्यास हातभार लावला त्याबद्दल आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

Scanned with Ca

तसेच श्री. फणसे, दत्तात्रय स्टील वर्क्सचे प्रख्यात कारखानदार श्री. दत्तोपंत पिपळे (लोहार) व श्री. बंडोपंत सोमठाणकर यांनी आम्हाला संशोधन-काळांत पुष्कळच साहाय्य केले. त्यांचे ऋणही आम्हाला विसरता येण्यासारखे नाही. त्याच-प्रमाणे आमचे स्नेही व फूटपाथ पार्लमेंटचे आद्य जनक श्री. बाबा उर्फ प्र. न. बेटावदकर यांचे मार्गदर्शन व साहाय्य आम्हास कधीही विसरता येण्यासारखे नाही.

तसेच कल्याणचे वार्ताहर श्री. अरविंद केसकर व श्री. अण्णासाहेब बेटावद-कर यांनी कल्याण इतिहास संशोधन मंडळ व त्याचे कार्यास वेळोवेळी प्रसिद्धी देऊन मंडळास उपकृत करून ठेवले आहे.

गोरेगाव येथील मसुराश्रमाचे सत्पुरुष ब्रह्मचारी विश्वानाथजी ह्यांचे प्रेम व प्रोत्साहन तर सदैव आमचे पाठीशीच होते व कायम राहावे हीच प्रार्थना. समर्थांचे आभार मानायचे नसतात, तर कायम ऋणी राहायचे असते. आम्ही सदैव त्यांचे ऋणी आहोत.

ह्या पुस्तकाचे संशोधन करीत असताना आम्हाला पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळ, सरकारी पेशवे दप्तर पुणे, टाऊन हॉल मुंबई येथील सेंट्रल लायब्ररी, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर व गिरगाव शाखा, ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय व कल्याण येथील सार्वजनिक वाचनालय यांचे भरपूर सहाय्य झाले; त्याबद्दल आम्ही चालकांचे अत्यंत आभारी आहोत.

शेवटी कल्याण शहराच्या जनताजनार्दनाने आगाऊ मूल्य भरून आमचेवरील विश्वास व प्रेम व्यक्त केले. त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत.

सरते शेवटी किल्ले दुर्गाडीवरील वरदायिनी त्रैलोक्याचे रक्षण करणारी श्री दुर्गाभवानीने आम्हास प्रेरणा व सामर्थ्य देऊन हे कार्य करून घेतले, तिला शत-कोटी प्रणाम. जय हिंद, जय महाराष्ट्र !

वर्षप्रतिपदा शके १८९६
शिवशक ३००, २४ मार्च १९७४

आपला,
विवेकानंद गोडबोले

Krishnarao N. Dhulap,
M. A. LL. B.
(Member of Rajyasabha)

Phone 408.
'Darya Sarang'
Rambag, Kalyan.
Date 14-4-74.

मा. श्री. विवेकानंद गोडबोले,
बी. ए. टी. डी., कल्याण

महाशय,

आपण 'सुभे कल्याण' या ऐतिहासिक ग्रंथाची अतिशय परिश्रमपूर्वक अनेक ग्रंथ, शिल्पे, नाणी, शिलालेख, ताम्रपट, हजारो ऐतिहासिक व दुर्मिळ कागदपत्रे इत्यादींच्या आधारे निर्मिती करीत आहात हे समजले, तेव्हा आपल्या धाडसाचे व परिश्रम–सातत्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच वाटले. कल्याण सुभ्याला सात हजार वर्षापासूनचा इतिहास आहे हे आमच्यासारख्या शिक्षितांनाहि ठाऊक नाही. अतिप्राचीन इतिहासाच्या कालखंडाची माहिती उपलब्ध करणे हे एक तर खडतर काम आहे आणि शिवाय वाद-विवादापासून अलिप्त रहाण्याचा प्रयत्न केला तरी ते शक्य होईल असे वाटत नाही. म्हणून आपल्या संशोधनवृत्तीचे, जिद्दीचे व धाडसाचे पुनःपुनः कौतुक करावेसे वाटते.

आपण हाती घेतलेल्या कामात आपल्याला सुयश लाभावे व उत्तरोत्तर आपल्या हातून उत्तमोत्तम ग्रंथरचना व्हावी ही हार्दिक शुभेच्छा व्यक्त करून पुरे करतो.

आपला स्नेहांकित
कृ. ना. धुळप

नकुल पाटील
एम्. एल्. ए., कल्याण.

टेलीफोन नंबर ४७७
शास्त्रीनगर,
डोंबिवली (पश्चिम)
जि. ठाण, ४२१२०३,
दि. १९-५-१९७४.

प्रिय श्री. विवेकानंद गोडबोले,

आपला 'सुभे कल्याण' हा कल्याण शहराचा सात हजार वर्षांचा इतिहास कथन करणारा अमोल ग्रंथ पूर्ण होत आहे याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. कल्याण इतिहास संशोधन मंडळाच्या वर्धापनदिनी आपण दिलेल्या कल्पनेवरूनच आपल्या कर्तृत्वाची झेप लक्षात आली होती. सात हजार वर्षांचा इतिहास कल्याण शहराला आहे ही अनेकांना नवलकथाच वाटावी. आपली सिद्धहस्त लेखणी व काळाच्या उदरातील गूढ उकलण्याची जिज्ञासा, व्यासंग व महत्वाकांक्षा यामुळे तुमचा ग्रंथ मराठी भाषेच्या दरबारी मानाचे स्थान मिळवील यात शंका नाही.

आपल्या कार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा. ग्रंथास सुयश लाभो ही परमेश्वराचे चरणी प्रार्थना.

'सुभे कल्याण' प्रत्येक नागरिकाच्या अभिमानाचा मानबिंदू ठरो

आपला स्नेहांकित
नकुल पाटील
आमदार

* * *

कृष्णराव धों. भेगडे
बी. ए. (ऑ.)
सदस्य महाराष्ट्र विधानसभा

मु. पो. लोणावळा,
ता. मावळ, जि. पुणे,
दि. २४-५-१९७४.

श्री. विवेकानंद गोडबोले,

स. न. वि. वि. कल्याण शहराचा सुमारे ७००० वर्षांचा उज्ज्वल इतिहास प्रकट करणारी मराठी मनाची अभिमान-गाथा श्रीशिवछत्रपतींच्या ३०० व्या राज्याभिषेक-दिनी वाचकांच्या हाती देत आहात ही अतिशय आनंद देणारी व अभिमान वाटणारी गोष्ट आहे.

संत तुकोबारायांचे गाथेप्रमाणे या शिवरायांच्या गाथेचे केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील जनता पारायण करील अशी खात्री वाटते.

आपल्या उपक्रमाचे मन:पूर्वक स्वागत करून शुभेच्छा व्यक्त करतो.

आपला
कृ. धों. भेगडे

Scanned with Car

इतिहास संशोधन मंडळ, कल्याण

या मंडळाची स्थापना चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८९० दिनांक २९ मार्च १९६८ वार शुक्रवार रोजी सायंकाळी ७ वाजता मंडळाचे अध्यक्ष व प्रस्तुत पुस्तकाचे लेखक श्री. विवेकानंद गोडबोले यांनी आपले सहकारी श्री. मुकुंद टुमकर, श्री.दाणेकर गुरुजी,श्री.प्रभाकर मोडक व श्री.गोपिनाथ घुमरे ह्यांचे मदतीने केली. त्या वेळी किल्ले दुर्गाडीवरील वरदायिनी त्रैलोक्याचे रक्षण करणारी भवानी दुर्गामाता मंदिराबाबत वाद चालू होता. त्या वादाचे कामी निरनिराळे पुरावे गोळा करून संशोधन करून मंदिराचे बचावाकरिता प्रयत्न करावा असे ठरले. या निमित्ताने संशोधन करताना कल्याण शहराचाही इतिहास लिहावा असे ठरले. हे काम मंडळाचे अध्यक्ष श्री. विवेकानंद गोडबोले यांजवर संपूर्णपणे सोपवून त्यांस मंडळाचे सर्वाधिकार देण्यात आले व इतर सभासदांनी त्यांना सर्वतोपरी सहाय्य करावे असेही ठरले.

श्री. विवेकानंद गोडबोले यांनी तन–मन व धनानेही या कार्यास वाहून घेऊन कल्याण शहराचा ७००० वर्षांचा इतिहास पूर्ण केला आहे; तो वाचकांसमोर आहे.

पहिली तीन वर्षें संशोधनांत गेली. तसेच श्री दुर्गादेवी प्रकरणी काम करताना केव्हा गेली ते कळलेच नाही.

इतिहास संशोधन मंडळ, कल्याण.

इतिहास संशोधन मंडळाचे सभासद श्री. भिडे यांचे भाषण ऐकताना.



लेखक वर्धापन-दिनी भाषण करताना-

४४८७३



इतिहास संशोधन मंदिर वर्धापन दिन १९७२. चैत्र शुद्ध प्रतिपदा

Scanned with Ca

ते प्रकरण संपल्यावर श्री. विवेकानंद गोडबोले यांनी कल्याण शहराचे इतिहासाचे कामास सुरुवात केली. वेळोवेळी मंडळाचे सभासदास जमा केलेली माहिती ते सांगत असत. कित्येक ठिकाणी काही सभासदांना ते घेऊन जाऊन माहिती मिळवत असत.

दरवर्षी वर्षप्रतिपदेला मंडळाचा वर्धापनदिन साजरा होतो. चवथे वर्षापासून तो जाहीर रीतीने अध्यक्षांचे मॉडर्न व्ही. स्कूलमध्ये साजरा होऊ लागला.

४ थे वर्षी सन १९७१ मध्ये वर्धापनदिनाला डोंबिवलीचे श्री. सी. व्ही. भिडे हे अध्यक्ष होते.

५ वे वर्षी सन १९७२ मध्ये कल्याणातील एक श्रीमान नागरिक व इतिहास अभ्यासू श्री. बाळासाहेब फडके हे अध्यक्ष होते. त्यांनी मंडळाचे कार्याची स्तुती करून कार्यास आशीर्वाद दिले.

६ वे वर्षी सन १९७३ मध्ये कल्याण विभागातून विधानसभेवर नुकतेच निवडून आलेले तरुण आमदार श्री. नकुल पाटील हे अध्यक्ष होते. त्यांनी मंडळाचे कामाबद्दल संतोष व्यक्त करून प्रशंसोद्‌गार काढले.

७ वे वर्षी सन १९७४ मध्ये मंडळाला कल्याणातील एक वयोवृद्ध माजी मुख्याध्यापक श्री. रामचंद्र वैजनाथ भिडे हे अध्यक्ष मिळाले. त्या वेळेपर्यंत मंडळाचे प्रथम ऐतिहासिक पुष्प 'सुभे कल्याण' पूर्ण होऊन प्रकाशनाच्या मार्गावर होते. त्यासंबंधी लेखकाचे माहितीपूर्ण भाषण सुमारे १॥ तास ऐकल्यावर अध्यक्ष श्री. स. वै. भिडे यांनी पुढील प्रशंसोद्‌गार काढले, "श्री. विवेकानंद गोडबोले यांचे एवढे विद्वत्तापूर्ण भाषण ऐकून मी चकित झालो आहे. कल्याणमध्ये आतापर्यंत श्री. साने, श्री. दिवेकर, व भारताचार्य श्री. चितामणराव वैद्य हे थोर इतिहासकार होऊन गेले; परंतु त्यांनी कल्याण शहराचा इतिहास एवढा मोठा असतानाही लिहिला नाही. तो श्री. विवेकानंद गोडबोले ह्यांनी अत्यंत परिश्रमाने लिहिला आहे व आम्हाला आता त्यांचे नाव वरील तीन थोर इतिहासकारांच्या मालिकेत घ्यावे लागेल.

"श्री. गोडबोले यांनी ही जी कर्तबगारी दाखविली त्याबद्दल आम्हा कल्याणकराना अत्यंत अभिमान वाटतो. मी तर आताच त्या ग्रंथाची थोडीशी झलक व भाषाशैली ऐकून तृप्त झालो आहे व पूर्ण ग्रंथ केव्हा हाती पडतो व मी वाचतो असे मला झाले आहे. श्री. विवेकानंद गोडबोले व इतिहास संशोधन मंडळ यांना माझे शुभाशीर्वाद आहेत. त्यांनी असेच उत्तमोत्तम ग्रंथ निर्माण करावे अशी इच्छा व्यक्त करतो."

'सुभे कल्याण' ग्रंथाची सर्व आर्थिक जबाबदारी श्री. विवेकानंद गोडबोले यांनीच उचलली आहे व सर्व हक्कही त्यांचेच स्वाधीन आहेत. हा ग्रंथ मंडळाचे नावाखाली प्रकाशित करून त्यांनी मंडळाला मोठ्या पदाला नेले आहे; हा त्यांचा थोरपणा आहे. मंडळ त्यांचे उतराई कधीच होऊ शकत नाही.

लवकरच श्री. विवेकानंद गोडबोले हे थोरले चिमाजी अप्पासाहेब पेशवे यांचे जीवनावर एक कादंबरी, कल्याण सुभेदार श्री. रामाजी महादेव, वसाहत विस्तारक श्री. रामप्रभू व शिवछत्रपतींवरील श्री. शिवराज भूषण हे भूषण कवीचे मूळ काव्य व मराठी रूपांतर प्रसिद्ध करणार आहेत. त्यापैकी पहिली दोन लिहून तयार आहेत; पुढली चालू आहेत. मंडळाला ही गोष्ट भूषणास्पद आहे. मंडळातर्फे अध्यक्षांचे अभिनंदन.

(१) मुकुंद टुमकर (सेक्रेटरी). सभासद (२) त्र्यं. र. दाणेकर (३) सौ. लीला ढवळे. (४) सौ. रेखा पेंढारकर (५) डॉ. आनंद गोडबोले (६) श्री. प्रभाकर मोडक (७) श्रीराम चाफेकर (८) श्री. अरविंद केसकर (९) डॉ. जोग. (१०) श्री. पुराणिक (११) श्री. चिंतामणी देवळे. (१२) श्री. कनुभाई पंड्या. (१३) श्री. प्रभाकर भट (१४) श्री. गोपीनाथ घुमरे.

□ □ □



ऐतिहासिक कल्याण

० २०० ४०० ६००

प्रमाण - १ इंच = २०० फूट

१ कल्याण पूल
२ किल्ला
३ विठोबा मंदिर
४ गणपति मंदिर
५ दर्गा
६ सिद्धेश्वर मंदिर
७ तकिया
८ [illegible]
९ शाही बावडी
१० बालाजी मंदिर
११ त्रिविक्रम मंदिर (जुना कारखाना)
१२ राम मंदिर
१३ जुना सरकार वाडा
१४ पिंपळाचा पार
१५ पोस्तराम
१६ गंज
१७ सुभेदार वाडा
१८ सदर महाल
१९ दत्त मंदिर
२० देवीचे देऊळ
२१ भटाळे तळे
२२ पोलीस चौकी
२३ पोर्ट ऑफिस
२४ गावदेवी
२५ जुम्मा मशीद
२६ मोठ बंदर मशीद
२७ अग्यारी
२९ दिल्ली दरवाजा
३० अंधार दरवाजा

[illegible]

३१ राणी मंदिर दरवाजा
३२ गणेश दरवाजा
३३ पनवेल दरवाजा
३४ अंजुमन शाळा
३५ बंदर दरवाजा

: १ :

श्रीभगवान वीर परशुराम काल

कल्याण शहराच्या इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी आपणास इ. स. पूर्व-काळात सुमारे ४ ते ५ हजार वर्षे मागे जावे लागेल. आर्य भारतात आल्यावर वेदकाळात क्रमाक्रमाने ते दक्षिणेत उतरू लागले. त्यावेळी पश्चिम किनाऱ्यावरील ह्या सह्याद्रीच्या चिंचोळ्या अपरान्त कोकणपट्टीत घनदाट जंगले, आदिवासी, श्वापदे ह्याखेरीज फारशी वस्ती नव्हती. किंबहूना त्या वेळी आर्यच काय परंतु द्रविडांना देखील हा दुर्गम प्रदेश वस्तीस योग्य झालेला नव्हता व वस्ती करण्या-साठी तेवढ्या गरजेचा वाटेल असा उपयुक्तही नव्हता. ह्या अपरान्त भूमीची जर ही अवस्था, तर कल्याणनगर म्हणून अस्तित्वही असण्याची सुतराम् शक्यता नव्हती. परंतु जमदग्नी-पुत्र परशुराम ह्याने आपल्या बापाच्या वधाचा सूड घेण्यासाठी सर्व क्षत्रियांचा संहार करण्याची भीषण प्रतिज्ञा केली व त्यानुसार त्याने एकवीस वेळा क्षत्रिय संहार केला व शेवटी संपूर्ण पृथ्वी निःक्षत्रिय करणे अशक्य आहे, हे लक्षात घेऊन त्याने हा प्रचंड क्षत्रिय संहार थांबवला. परंतु ह्या जिंकलेल्या पृथ्वीचे करायचे काय हा त्याच्यापुढे प्रश्न होता. कारण तो स्वतः ब्राह्मण होता. त्यामुळे व राज्यकारभार करून वैभवाचा उपभोग घेणे हे त्याच्या ब्राह्मण वृत्तीत नव्हते. तो हाडाचा ब्राह्मण होता. कृतीने क्षत्रिय ठरला तरी वृत्तीने नव्हता. पृथ्वी निःक्षत्रिय करून तो पृथ्वीचा स्वामी झाला होता. म्हणून त्याने जिंकलेली पृथ्वी कश्यपाला दान केली. तेव्हा पुन्हा अशा तऱ्हेने मानव-संहार होऊ नये म्हणून कश्यपाने 'पश्चिमेला जाऊन नवा प्रदेश निर्माण कर व तेथे रहा' असा आदेश दिला.

त्यानुसार परशुराम सह्याद्री ओलांडून पश्चिमेकडे आला. तेव्हा हा प्रदेश घनदाट जंगले, अरण्ये, दऱ्या, खोरी व समुद्राचा आहे असे आढळले. हा प्रदेश साफ करून मानव वसाहत निर्माण करणारा अपरान्ताचा निर्माता म्हणून परशुरामाने ह्या प्रदेशाचे तीर्थक्षेत्र, पुण्यभूमी, आर्यभूमी, पवित्र भूमीत रूपांतर केले व आपली राजधानी शूर्पारक (हल्लीचे नाला सोपारा) हे पश्चिम समुद्रावरील बंदर या ठिकाणी स्थापन केली. घाटावरील कोणत्याही भागातून अपरान्त प्रदेशात उतरले तरी उल्हास व काळू नद्यांच्या संगमावरील व शूर्पारक बंदराला आतपर्यंत जोडणाऱ्या कल्याण ह्या पवित्र ठिकाणी उतरून मगच अपरान्तात जाता येते. त्या अर्थाने अपरान्ताचे प्रवेशद्वार, उल्हास व काळू व भातसा नद्यांच्या त्रिवेणी संगमावरील पुण्यपावन भूमी म्हणून अपरान्तनिर्मीतीचा पुण्यपावन कल्याणकारी आरंभ म्हणून परशुरामानेच ह्या भागाला, आरंभीच्या वसाहतीच्या भागाला, कल्याण हे नाव दिले असावे ह्यात शंका नाही. कल्याण ह्या शहराला कल्याण हे नाव कसे मिळाले, कोणी दिले व हे नगर कोणी वसविले ह्याबाबत आम्ही वर मांडलेल्या सुसंगत व तर्कशुद्ध विचाराखेरीच कोणीही अन्य पुरावा देत नाही. कल्याण शहर फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध एवढाच उल्लेख आढळतो. इ. स. पूर्व १००० ते आतापर्यंतच्या इतिहासाला आधारभूत समजलेले सर्व ग्रंथ, ग्रीक प्रवासी, चिनी प्रवासी, पाश्चात्य प्रवासी, अरबी प्रवासी ह्यांच्या सर्व वर्णनात शूर्पारक हे नाव जसे रामायणाचे कर्ते वाल्मिकीमुनीपासून सर्वांच्या उल्लेखी येते, तसेच कल्याण हेही येते. शूर्पारक, भृगुकछ (भडोच), कल्याण ही नावे त्यांच्या ग्रंथात आली आहेत. त्यांचा सविस्तर उल्लेख पुढे येईलच; परंतु कल्याण नगर म्हणून त्या काळापासून प्रसिद्ध असून आजतागायत ते नाव बदलण्याचा कोणत्याही एतद्देशीय अथवा परकी यावनी किंवा पाश्चात्य कोणत्याही राज्यकर्त्याने प्रयत्न केलेला नाही हेही विशेष नमूद करण्यासारखे आहे. एवढेच नव्हे तर चालुक्य राजांनी नवीन कल्याणी नगर हैदराबादजवळ वसवून मोठी कारकीर्द गाजवली पण चालुक्यांचे साम्राज्यही गेले आणि कल्याणी राजधानीही नामशेष झाली. आज कल्याणी राजधानी मोठ्या प्रयत्नाने शोधून फक्त दगडधोंड्याच्या अवशेषरूपानेच शिल्लक राहिली आहे; परंतु भगवान परशुरामाने अपरान्ताच्या निर्मितीच्या प्रयत्नातील आरंभीचे नगर म्हणून जे पवित्र ठिकाण म्हणून वसविले असले पाहिजे, तेच हे कल्याण शहर आजतागायत ७००० वर्षाच्या कालांतरातहि तसेच टिकून आहे. अनेक राज्यांचे चढउतार पाहून श्री प्रभू राम, भगवान कृष्ण, पांडव इ. सर्व थोर महात्म्यांच्या परमपवित्र पावन स्पर्शाने पुनीत होऊन आजही ते अभंग उभे आहे. एवढे अभंग असलेले प्राचीन स्थळ जगाच्या इतिहासात तरी सापडेल किंवा नाही ह्याबद्दल शंका आहे. म्हणून कल्याण खरोखर तीर्थक्षेत्रच मानले पाहिजे व ते तसे मानले जात असलेच पाहिजे. कारण शूर्पारक, निर्मळ ही तीर्थक्षेत्रे पंडुपुत्र, सहदेव व अर्जुन ह्यांनी केल्याचा स्पष्ट

Scanned with Ca

उल्लेख महाभारतात आढळतो व नंतर अपरान्तातील तीर्थयात्रा पूर्ण करून ते प्रभास क्षेत्राला गेले असे महाभारतात वर्णन आहे. अर्थात शूर्पारक व निर्मळ ह्यांच्या उल्लेखाबरोबर केवळ तीर्थयात्रा एवढाच शब्दप्रयोग करून व्यासांनी गुजराथमधील प्रभासक्षेत्राचे नाव घेतले. त्यावरून कल्याण, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, पंचवटी वगैरेंचा नावनिशीवार उल्लेख टाळला आहे व शूर्पारकपासून प्रभास एवढ्या भागातील तीर्थक्षेत्रांच्या पट्ट्याचा केवळ दोन टोकांच्या दोन नावांनी उल्लेख करून समावेश गृहीत धरला आहे. म्हणजे सहदेव-अर्जुन वगैरे पांडव ज्या ज्या तीर्थाला गेले त्या प्रत्येकाचे नाव घेतले नाही, तरी तीर्थयात्रा केली एवढ्या-वरून शूर्पारक, निर्मळ ह्या नावांचा जर उल्लेख आहे तर, कल्याणची ही पवित्र भूमीदेखील त्यामध्ये समाविष्ट आहेच ह्यात शंका नाही. त्याचप्रमाणे दोन नद्यांचा संगम जेथे होतो ती भूमी आपल्या आर्य परंपरेत नेहमी पवित्र मानली जाते. ह्या न्यायाने उल्हास व काळू नद्यांच्या संगमावरील कल्याण नगर पवित्र तीर्थक्षेत्र निश्चितच असले पाहिजे. एवढेच नव्हे तर त्या नगराचे नामाभिधान 'कल्याण' असे कल्याणकारी ठेवण्याची योजकता हेही त्याच्या तीर्थस्थान ह्या सदरास आपल्या कधीही न बदललेल्या पुरातनत्वाने जबरदस्त पुष्टी देते. ह्यावरून परशुरामाने अपरान्ताच्या निर्मितीचा प्रारंभ अशा पुण्यपावन भूमीवर प्रथम केला असावा ह्यात संशय नाही व ह्या आरंभीच्या परशुराम-निर्मित पवित्रपावन तीर्थ-क्षेत्राचे पुण्यशाली नाव कल्याण हेही भगवान परशुरामानेच ठेवले असले पाहिजे, ह्यातही शंका राहू नये. काही लोक, देशाचा राजा कल्याणमल्ल म्हणून होता असे कामसूत्रात सांगितले आहे, त्या मुसलमान राजाच्या नावाने ह्या नगराचे नाव कल्याण पडले असा तर्क व्यक्त करतात. परंतु ह्या विधानात काडीचे सत्य नाही व निव्वळ तर्कट आहे हे अगदी स्पष्ट दिसते. कारण एक तर एखाद्या राजाच्या नावाने जेव्हा नाव पडते तेव्हा त्याचे नाव पूर्ण निराळे असावयास पाहिजे. कल्याणमल्ल ह्याचा आधी इतिहासात फार उल्लेख नाही व तो मुसलमान आहे हे म्हणजे तो अगदीच सुमारे १००० वर्षातला असला पाहिजे व कल्याणचे नावचा उल्लेख इ. स. पूर्व ५०० किंवा रामायण, महाभारत, चिनी प्रवासी वगैरे मुसल-मान धर्मसंस्थापक महंमदाच्याही जन्माच्या आधीचे आहेत. अर्थात कल्याणमल्ल नावाच्या राजाच्या नावावरून कल्याण ह्या नगराला कल्याण हे नाव पडले नसून अपरान्ताचा निर्माता वीर भगवान परशुराम ह्याने त्रिवेणीसंगमावरील ह्या पवित्र भूमीत आर्यांची पहिली वसाहत करून अपरान्ताचे प्रवेशद्वार उल्हास, काळू व भातसा ह्या तिन्ही नद्यांच्या संगमावरील पवित्र तीर्थक्षेत्राची निर्मिती केली व म्हणून त्यानेच ह्याला कल्याण हे नाव दिले असले पाहिजे. म्हणून कल्याणचा निर्माता व नामाभिधान करणारा वीर भगवान परशुराम होय व हेच ते परशुराम क्षेत्राचे प्रारंभस्थान.

परशुरामाने अपरान्त का व कसा निर्माण केला ह्याचे रसाळ व मार्मिक वर्णन स्कंदपुराणात सह्याद्रीखंडात केलेले आहे, त्याप्रमाणे तेथील जातीजमातींचे व त्यांच्या आचारविचारांचेही वर्णन फार सुंदर केले आहे. ह्या खंडात एकूण ७००० श्लोक आहेत. स्कंद पुराणात एकूण ५० खंडे आहेत. त्यांत माहेश्वर, वैष्णव, ब्राह्म, काशी, अवन्ती, नागर, प्रभास व सह्याद्री याही खंडाचा समावेश आहे. स्कंद पुराणाची श्लोकसंख्या ८१००० असून उपपुराणाची श्लोकसंख्या एक लक्ष आहे. मुद्रणकला अस्तित्वात आल्यावर प्राचीन पुराणेतिहास ग्रंथांचे मुद्रण करता आले. परंतु सह्याद्रीखंडाची दखल कोणीच घेतली नाही. एवढेच नव्हे तर सह्याद्री खंडाची अखंड, संशोधित प्रत देखील मिळू शकली नाही. म्हणून एक ख्रिस्ती पंडीत डॉ. डार्सन द कुन्हा यांनी अनेक ठिकाणी विखुरलेल्या दुर्मिळ प्रति गोळा करून एक नवीन प्रत तयार केली. हे पुस्तक डॉ. कुन्हा यांनी १८७७ साली प्रसिद्ध केले. अर्थात १८०० शतकाच्या अगोदरही सह्याद्री खंड प्रसिद्ध होता.

त्या खंडात परशुरामाने सप्तकोंकणाची निर्मिती केली असे म्हटले आहे. नंतर ब्राह्मणांची वसाहत केली. त्यात भार्गव, नागर, चित्पावन, कऱ्हाडे, सारस्वत, हविक व नंबुद्री हेही ब्राह्मण होते. प्राचीन पुस्तकात महाराष्ट्राला उद्देशून मध्य प्रदेश असा शब्द वापरला आहे. परंतु सह्याद्री खंडात 'महाराष्ट्र' हा शब्द एकदा आला आहे. सह्याद्री खंडाचा काल सुमारे इ. स. ३४५ ते ३७० असा निश्चित करता येतो; कारण त्यात मयूरशर्मा नावाच्या राजाचा उल्लेख आहे व त्याचा राज्यकाल इ. स. ३४५ ते ३७० असा आहे. तेव्हा सह्याद्री खंडाची निर्मिती देखील अतिप्राचीन असून प्राचीन पुराणेतिहास ह्या दृष्टीने त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे व त्यात अपरान्ताचा निर्माता भगवान परशुराम ह्याचे कर्तृत्व वर्णन केलेले आहे. कल्याण नगर भगवान वीर परशुरामाने निर्माण केलेले आहे असे आम्ही वर सांगितलेच आहे. म्हणून प्राचीन पुण्यमय, कल्याणकारी कल्याणनगरीच्या आद्य जनकाचे जीवनावलोकन निःसंशय आवश्यक ठरते.

श्रीभगवान वीर परशुराम

कंकणवत् धृत गंगं कोंकणसिद्धाय दर्शितस्वांगम् ।
कंकणशोभि भुजंगं कोंकणनाथं नमामि साष्टांगम् ।।

भगवान वीर परशुराम म्हणजे भगवान विष्णूचा सहावा अवतार श्रीशंकराचा श्रेष्ठ भक्त. 'अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः' अशी ज्याची दिव्य मूर्ती, म्हणून ब्राह्म व क्षात्र ह्या दोन तेजांचा सुंदर संगम, सह्याद्रीच्या अपरान्त भागाचा–म्हणजे सप्तकोकणांचा निर्माता, स्वयंनिर्मित भूमीत स्वयंप्रेरीत जमातींचा

Scanned with Car

संस्थापक, दुर्बलांचा रक्षणकर्ता व क्षत्रिय अधमांचा संहारकर्ता, एवंगुणविशिष्ट पुराणप्रसिद्ध श्रीपरशुराम कल्याण नगराची व कोकणची अधिष्ठात्री मंगल देवता होय.

पवित्र नर्मदातीरावर भृगु ऋषीकुलोत्पन्न जमदग्नी ऋषींचा आश्रम होता. तेथे परशुरामाचा जन्म त्रेता व द्वापार युगांच्या संधिकालात वैशाख शुद्ध तृतीयेला झाला. भृगुऋषी, जमदग्नी इत्यादि ऋषींच्या निवासाने पश्चिमकिनाऱ्यावरील नर्मदेच्या मुखाजवळ दक्षिण बाजूला असलेले हल्लीचे भडोच शहर प्राचीन ग्रंथातून भृगुकच्छ या नावाने प्रसिद्ध होते व त्याचा उल्लेख पुढे अनेक चिनी, अरबी, ग्रीक वगैरे पाश्चात्य व परकीय प्रवाशांच्या इ. स. पूर्व वर्णनातून नेहमी आढळून येतो. तेव्हा पश्चिम किनाऱ्यावरील जमदग्नीच्या आश्रमात रेणुकामातेच्या पोटी भगवान वीर परशुराम जन्मला. ह्याबाबत एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याचे आजोबा ऋचिक ऋषि ह्यांनी विश्वामित्राच्या सत्यवती नामक बहीणीशी विवाह केला होता. हा ब्राह्मण-क्षत्रिय संयोग होय. तसेच भगवान वीर परशुराम ह्याची आई रेणुका ही देखील क्षत्रिय–कन्या होती. ह्यावरून अनुवंशशास्त्रान्वये परशुरामाचे वर्णन दिले आहे–'अग्रत: चतुरो वेदा: पृष्ठत: सशरं धनु:।' त्याचा बोध होईल. वीर परशुरामात ब्राह्म व क्षात्र ह्या दोन तेजांचा सुंदर संगम झालेला दिसतो, त्याची कारणपरंपरा दिसून येईल व चित्पावन ब्राह्मणासंबंधी जे इतर सर्व ब्राह्मणात वैशिष्ठ्य दिसते त्याचेही अंशत: स्पष्टीकरण व्हावे.

परशुरामाला रुमणवत, सुषेण, वसु व विश्वावसु असे चौघे भाऊ होते. परशुराम हा सर्वांत धाकटा व पराक्रमात सर्वात मोठा होता. तसेच परशुराम हा अत्यंत बुद्धिमान होता. उपनयनानंतर त्याने कश्यप ऋषींकडून मंत्रोपदेश घेतला व थोड्याच काळात तो विद्याप्रवीण झाला. त्याची धनुर्विद्येवर विशेष भक्ती होती. त्यानंतर त्याने गंधमादन पर्वतावर जाऊन शंकराची आराधना केली व त्यापासून सर्व प्रकारची अस्त्रे व परशु प्राप्त करून घेतला. ह्या परशूचे वैशिष्ठ्य म्हणजे ह्याची धार कधीही बोथट होत नसे. परशुराम कसा दिसत असे ह्याचे वर्णन वाल्मीकींनी रामायणात केले आहे.

'ददर्श भीमसंकाशं जटामंडलधारिणम्।
भार्गवं जामदग्नेयं राजा राजविमर्दनम्॥ १७॥
कैलासमिव दुर्धर्षं कालाग्निमिव दु:सहम्।
ज्वलंतमिव तेजोभिर्दुर्निरीक्ष्य पृथग्जनै:॥ १८॥
स्कंधे चाऽसज्य परशुं धनुर्विद्युद् गुणोपमम्।
प्रगृह्य शरमुग्रं च त्रिपुरघ्नं यथा शिवम्॥ १९॥

(बालकांड अ. ७४)

Scanned with Car

जटामंडलामुळे भव्य दिसणाऱ्या परशुरामाला पाहून दशरथ राजाला वाटले की जणू पंचमहाभूतांपैकी तेज हे तत्वच मूर्तिमंत समोर ठाकले आहे. राजाला तो कैलासाप्रमाणे दुर्धर्ष व कालाग्नीप्रमाणे दुःसह वाटला. त्याच्या अंगावर परशु होता व विजेच्या लोळासारखे धनुष्य होते. त्याच्या हातात तीक्ष्ण बाण होता व त्रिपुरांतक शिवासारखा तो दिसत होता.

परशुराम आज्ञाधारक होता. त्याचे उदाहरण म्हणून एक आख्यायिका आहे. एकदा त्याची आई रेणुका नदीवर पाणी आणण्यासाठी गेली होती. तेथे चित्ररथ गंधर्व आपल्या स्त्रियांसह क्रीडा करत होता. तेथे जलक्रीडा करणाऱ्या चित्ररथाला पाहून तिचे मन थोडेसे विचलित झाले. तिच्या मनाची अवस्था जमदग्नीला अंतर्ज्ञानाने समजली. जमदग्नि अत्यंत कोपिष्ठ होता. जमदग्नीने क्रोधान्ध होऊन आपल्या चारही मुलांना क्रमाने तिचा वध करण्याची आज्ञा केली. परंतु पहिल्या चारांपैकी एकानेही हात उचलला नाही. परशुराम मातृपितृभक्त होता. 'आज्ञा गुरुणाम् ह्यविचारणीया' या आदर्श तत्त्वाप्रमाणे त्याने आपला परशु उचलला. आईची रेणुकेची मान धडावेगळी केली. तेव्हा पित्याचा राग शांत झाला. पुत्राच्या आज्ञाधारकपणावर अत्यंत संतुष्ट होऊन त्याला वर माग म्हणून सांगितले. परशुराम जेवढा पितृभक्त होता व आज्ञाधारक होता, तेवढाच मातृभक्तही होता. वर माग म्हणताच त्याने आपली माता सजीव व्हावी असा वर मागितला आणि जमदग्नीने प्रसन्न होऊन रेणुकेला जिवंत केले.

जमदग्नीच्या काळी नर्मदेच्या उत्तरतीरावर हैहय कुलोत्पन्न कार्तवीर्य राजा राज्य करीत होता. त्याला सहस्र बाहु (साथीदार) होते. म्हणून त्याला सहस्रबाहु म्हणत असत. त्याला साम्राज्य सत्तेचा प्रचंड मद चढला होता. तो देवाब्राह्मणांना जुमानत नसे. एके दिवशी त्याने वसिष्ठांचा आश्रम नाहक जाळून टाकला. वसिष्ठाने त्याला शाप दिला की भार्गवराम तुझे सहस्र बाहु तोडून टाकील व तुझा वध करील. तेव्हा भार्गवाच्या सामर्थ्याचा अंदाज घेण्यासाठी कार्तवीर्य जमदग्नीच्या आश्रमात आला व त्याने जमदग्नीची सवत्स कामधेनु जबरदस्तीने पळवून नेली. त्यावेळी परशुराम आश्रमात नव्हता; तो परत आल्यावर त्याला कार्तवीर्याची हकीकत समजली. लगेच त्याने कार्तवीर्यवधाची प्रतिज्ञा केली. नर्मदेच्या तीरावर येऊन कार्तवीर्याला युद्धाचे आव्हान दिले व द्वंद्वयुद्धात त्याला ठार केले. कार्तवीर्याचे पुत्र परशुरामावर धावून आले; त्यांचाही त्याने समाचार घेतला. त्यांपैकी पाच पुत्र जीव घेऊन पळाले व हिमालयाच्या कुशीत जाऊन लपले.

विजय संपादून व कामधेनु घेऊन परशुराम आश्रमात आला, तेव्हा जमदग्नीने त्यास क्षात्रवधदोष घालविण्यासाठी बारा वर्षे तीर्थयात्रेस पाठविले. परशुराम तीर्थयात्रेस गेल्याची संधी साधून कार्तवीर्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी दैत्यांनी

Scanned with Car

भार्गवआश्रमावर छापा घातला. त्यावेळी जमदग्नी ध्यानस्थ होता. तशा स्थितीतच त्याचा वध करून आणि त्याचे शिर तोडून घेऊन दैत्य माहिष्मतीकडे निघून गेले. ह्या घोर प्रकाराचे वृत्त परशुरामाच्या कानावर गेले तेव्हा तो तीर्थयात्रा सोडून त्वरेने आश्रमाकडे आला. त्याला पाहताच रेणुकेने हंबरडा फोडला व पतीच्या कलेवरावरील एकवीस जखमा पुत्राला दाखवून एकवीस वेळा उर बडवून घेतला. त्याच क्षणी परशुरामाने घोर प्रतिज्ञा केली की ' ह्या क्रूर वधाबद्दल मी एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करीन. '

नंतर कावडीच्या एका पारडयात जमदग्नीचे प्रेत व दुसऱ्या पारडयात रेणुकामातेला बसवून तो कान्यकुब्ज आश्रमातून निघाला आणि अनेक तीर्थक्षेत्रे व अरण्ये ओलांडून सह्याद्रीवरील मल्लकी नामक दत्तक्षेत्रात आला. एवढयात आकाशवाणी झाली की ' तू येथेच पित्याचा अंत्यसंस्कार कर. ' मग परशुरामाने जमदग्नीच्या प्रेताला मंत्राग्नि दिला. रेणुका त्या प्रसंगी सती गेली (रेणुकामाहात्म्य). मल्लकी म्हणजे हैदराबाद राज्यातील माहूर क्षेत्र होय. हे स्थान सातमाळ श्रेणीच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. तेथे डोंगरावर दत्ताचे स्थान व रेणुकेचे मंदिर आहे. त्यात रेणुकेची मूर्ति नाही, फक्त मुखवटा आहे.

परशुराम हा मोठा शूर व दृढनिश्चयी होता. मातापित्यांची उत्तरक्रिया केल्यावर तो थेट कार्तवीर्याच्या प्रदेशात शिरला व त्याने सहस्रार्जुनाच्या सर्व पुत्रांना कंठस्नान घातले. त्यानंतर विविध देशात क्षत्रिय अधमांनी उठाव केला. परंतु प्रत्येक वेळी परशुरामाने त्यांचा विध्वंस केला. अंग, वंग, कलिंग, विदेह, काश्मीर, दरद, कुंती, शिबी, शुद्रक, ताम्रलिपी, वीतीहोत्र, त्रिगर्त, मार्तीकावर्त, मालव वगैरे देशांच्या उन्मत्त राजांचा संहार केला. त्याने शेवटचे युद्ध स्यमंतपंचकावर केले व क्षत्रिय रक्ताच्या डोहांत आपला परशु धुतला व शस्त्र खाली ठेवले. क्षत्रियांच्या रक्ताने त्याने आपल्या पितरांचे तर्पण केले. (महाभारत, अरण्यपर्व). क्षत्रिय विजयामुळे तो पृथ्वीचा (त्या वेळच्या) सत्ताधीश झाला. म्हणून त्याने तीनदा पृथ्वीप्रदक्षिणा करून अश्वमेध यज्ञ केला. यज्ञात कश्यप ऋषी अध्वर्यू होता. यज्ञाची वेदी सुवर्णाची होती. ती दहा वांव लांब (६० फूट सुमारे) व नऊ वाव रुंद (सुमारे ५४ फूट) होती. यज्ञाच्या अखेरीस दक्षिणा म्हणून परशुरामाने रणयज्ञात संपादिलेल्या समस्त पृथ्वीचे दानोदक कश्यपाच्या हातावर सोडले. त्यामुळे क्षणापूर्वीचा पृथ्वीपती एकदम निष्कांचन झाला. पण दान घेतलेल्या कश्यपास विवंचना पडली. कारण तो ऋषी होता. क्षत्रिय नाहीसे झाल्यामुळे दुष्टांचा शास्ता राहिला नाही. दुष्ट लोक उपद्रव करू लागले. पृथ्वी अनाथ झाली. क्षत्रिय होते ते प्रकट होण्यास परशुरामाच्या भीतीने घाबरू लागले. तेव्हा कश्यप परशुरामास म्हणाला की " यज्ञात तू दान दिल्यामुळे ही पृथ्वी माझी आहे; म्हणून तुला ह्या पृथ्वीवर राहण्याचा अधिकार नाही. "

कश्यपाची आज्ञा शिरसावंद्य मानून परशुराम आर्यावर्तातून निघून महेंद्रगिरीवर वास्तव्याला गेला. कश्यपाने जागोजागी क्षत्रिय कुळांची स्थापना करून मूळची त्यांची त्यांची राज्ये त्यांना त्यांना देऊन टाकली; म्हणून पृथ्वीस काश्यपी हे अभिधान प्राप्त झाले.

परशुराम-निर्मित प्रदेश

महेन्द्रगिरीवर राहात असता परशुरामाने समुद्र हटवून परशुराम क्षेत्र निर्माण केले. महेन्द्र पर्वत हल्लीच्या ओरीसा राज्यात आहे. पांडव वनवासाच्या काळात तीर्थयात्रा करीत महेन्द्र पर्वतावर गेले होते; तेथे त्यांनी परशुरामाची भेट घेऊन पूजा केली व परशुरामानेही पांडवांना प्रेमपूर्वक आग्रह करून महेन्द्र पर्वतावर एक रात्र ठेवून घेतले असा उल्लेख महाभारताच्या वनपर्वात आहे. (वन० ११७. १६-१८) त्याचप्रमाणे वनपर्व ११८–मध्ये श्लोक ८–१० मध्ये पांडव तीर्थयात्रा करीत असता समुद्रतीरावरील पवित्र ठिकाणे पाहात पाहात 'शूर्पारक' तीर्थाला येऊन पोहोचले. तेथील वनात त्यांनी महाधनुर्धर परशुरामाची वेदी पाहिली असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे शांतिपर्व अ. ४९, श्लोक ६६–६७ मध्ये परशुरामकृत अश्वमेध यज्ञाची हकीकत सांगताना शुर्पारक क्षेत्राचा स्पष्ट उल्लेख आला आहे तो असा. परशुरामाने २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केल्यावर अश्वमेध यज्ञाच्या शेवटी ती दक्षिणा म्हणून कश्यप ऋषींना त्याने दान म्हणून देऊन टाकली. त्यानंतर परशुरामाला पुन्हा क्षत्रियांचा संहार करता येऊ नये म्हणून कश्यप ऋषींनी त्याला आर्यावर्तातून बाहेर जाण्याची आज्ञा केली. ते परशुरामाला म्हणाले, "महामुने, तू दक्षिण समुद्राच्या तीरावर जा. या माझ्या राज्यात तू मुळीच राहता कामा नये." कश्यप ऋषींच्या आज्ञेप्रमाणे परशुरामाला देशाबाहेर जावे लागले. तेव्हा समुद्राने त्याच्यासाठी 'शूर्पारक' देश निर्माण केला. शुर्पारक म्हणजेच अपरान्त महीतल असेही त्या ठिकाणी स्पष्ट म्हटले आहे.

तत शूर्पारकं देशं सागरस्तस्य निर्ममे ।
सहसा जामदग्न्यस्य सोऽपरान्तमहीतलम् ॥ (शान्ति ४९:६७)

ह्या सर्व वर्णनावरून असे स्पष्ट दिसते की क्षत्रियांचा संहार केल्यानंतर हल्लीच्या ओरीसातील महेन्द्र पर्वतावर जाण्यापूर्वी परशुराम अपरान्त देशात शूर्पारक येथे रहात होता. समुद्र मागे हटवून शूर्पारकाची भूमी निर्माण केली असावी.

अपरान्त देश म्हणजे हल्लीचे उत्तर कोकण–हल्लीच्या ठाणे जिल्ह्याचा

Scanned with Car

भाग आणि शूर्पारक म्हणजे हल्लीच्या ठाणे जिल्ह्यातील वसईजवळचे नाला-सोपारा हे गाव. परशुराम महेन्द्र-पर्वतावर जाण्यापूर्वी शूर्पारक येथे राहत होता असे दिसते व महाभारत त्याला आधार देते. त्या काळी शूर्पारक किंवा हल्लीचे सोपारा म्हणजे अपरान्त देशाची राजधानी असावी.

पांडवांनी वनवासात असताना जी तीर्थयात्रा केली त्या तीर्थांची पुष्कळ नावे महाभारतात दिली आहेत; परंतु सर्व दिलेली नाहीत. नामनिर्देशाशिवाय सांगितली यावरून एखाद्या कल्याणसारख्या नगराचा उल्लेख म्हणजे अस्तित्वाचा अभाव असेच होत नाही. पश्चिमेकडील तीर्थावर शूर्पारक येथे आल्यावर पांडवांनी तेथील वनात पूर्वीच्या राजांनी यज्ञ केलेले पाहिले व किनाऱ्यापासून आत गेल्यावर (म्हणजेच वज्रेश्वरी, कल्याण, अंबरनाथ वगैरे ठिकाणी) तपस्वी ब्राह्मणांनी गजबजून गेलेली परशुरामाची वेदी पाहिली. वसु, आश्विनीकुमार, यम, सुर्य, कुबेर, इन्द्र, विष्णू, विभु, शंकर इत्यादींची सुंदर मंदिरे अवलोकन केली. नंतर पुन्हा शूर्पारक तीर्थावर आले व तेथून प्रभास (काठेवाडात) तीर्थावर गेले, असे महाभारतात वर्णन आहे.

पांडवांच्या तीर्थयात्रा वर्णनांत शूर्पारकाचे नाव असून त्यांनी तेथे यात्रा केली व आत सह्याद्रीकडे म्हणजे आंतरभागात जाऊन परशुरामाच्या वेदीचे दर्शन घेतले, असे वर्णन ज्याप्रमाणे आहे तसेच परशुरामाच्या त्यावेळच्या वस्तीचे ठिकाण महेंद्र पर्वतावर होते व तेथे वैतरणा नदी व वेदी होती असे वर्णन त्याच तीर्थयात्रेत आले आहे. परंतु परशुरामाचे अगोदरचे ठिकाण शूर्पारक तेथेही पूर्वेस डोंगरामध्ये वैतरणा नदी व परशुरामाची वेदी वज्रेश्वरीजवळ आहे व लोक दाखवतात. तेव्हा बैतरणी नदी, वेदी, दोन्ही दोन दोन आहेत. एक महेंद्र पर्वतावर व एक शूर्पारकाजवळ वज्रेश्वरी येथे. अर्थात पांडवांच्या या यात्रा-प्रवासात कल्याण, अंबरनाथ, वज्रेश्वरी, लोनाड वगैरे ठिकाणे असलीच पाहिजेत. कारण आणखी एक विशेष म्हणजे जी जी मंदिरे शूर्पारकजवळ पाहिली म्हटले आहे, त्यांत शंकराचे निर्मळ येथील व अंबरनाथ येथील मंदिर असावे. निर्मळचे मंदिर तर परशुरामकालीनच असले पाहिजे; कारण परशुराम स्वत: शंकराचा उपासक होता. तसेच अंबरनाथच्या देवालयाबद्दल एक आख्यायिका आजतागायत प्रसिद्ध आहे की ते पांडवांनी एका रात्रीत बांधले. आता ते बांधणारा राजा शिलाहार होता हे सप्रमाण सिद्ध झाले आहे; तरी मूळचे मंदिराचा जीर्णोद्धार असावा. मूळचे मंदिर परशुरामकालीनच असले पाहिजे व आख्यायिकेत पांडवांचा संबंध जोडला जातो, तो त्यांच्या यात्रेच्या हकीकतीमुळेच असला पाहिजे. तसेच गांधारी पलीकडील तरीच्या पलीकडे असलेल्या लोनाड ह्या अतिप्राचीन गावी ह्याच शिलाहारांनी एक लोणादित्याचे मंदिर बांधलेले आहे. ठाणे जिल्ह्याच्या सर्व परिसरात सूर्याचे हे एकमेव मंदिर आहे. शिलाहार राजांनी जरी अनेक मंदिरे

बांधली तरी सूर्यमंदिर एवढेच आहे. म्हणजे त्याचाहि जीर्णोद्धार त्यांनी केला व पांडवांच्या तीर्थयात्रेत उल्लेखलेले सूर्याचे मंदिर ते हे लोणादित्याचे मंदिर होय यात शंका नाही. त्या वेळच्या राजांनी केलेले यज्ञ पाहिले असेहि वर्णन आहे. त्या अर्थी शूर्पारक क्षेत्रातील भागात (ठाणे जिल्ह्यात) निदान दोन तरी राजे राज्य करीत असावेत. अपरान्तापर्यंतच आर्यवस्ती झालेली दिसत होती, तसेच अपरान्त हा प्रदेश अनेक ऋषी-मुनींच्या आश्रमांनी गजबजलेला होता व जंगलाचा प्रदेश होता. महाभारतातील द्रोणपर्वात एका हत्तीचे वर्णन अपरान्तात उत्पन्न झालेला व हस्तिशिक्षकांनी शिकविलेला असे झाले आहे; त्यावरून ठाणे जिल्ह्याच्या जंगलात हत्ती पुष्कळ असून त्यांची लढाईच्या कामात ख्याती असे. टॉलेमीने देखील इ. स. च्या पहिल्या शतकात कल्याण येथे सॉडेनीस (सातकर्णी) नावाचा राजा राज्य करीत होता व त्याजजवळ ५०० हत्ती होते असे वर्णन केले आहे. तसेच डोंबिवलीजवळ गजबांधण नावाचे डोंबिवली नगरपालिका हद्दीत अंतर्भूत केलेले गाव आहे. त्याचे नाव गजबांधण पडण्याचेही कारण हेच असावे की पूर्वी हल्लीच्या म्हैसूरप्रमाणे ह्या कल्याणच्या जंगलात हत्ती पकडून त्यांना शिकवून तयार करण्याचा उद्योग ह्या भागात चालत असला पाहिजे. तसेच सॉडेनीस (सातकर्णी) राजाचे ५०० हत्ती बांधण्याची ती जागा असावी. कल्याणजवळच्या अवघ्या ५ ते १० मैलाच्या परिसरातील वर उल्लेखिलेल्या गावात टिटवाळा क्षेत्राचा अंतर्भाव करणे जरूर आहे. टिटवाळा हे कण्व ऋषींच्या आश्रमाचे दुसरे ठिकाण आहे. शकुंतलेला दिवस गेल्यावर जेव्हा दुष्यंताकडे कण्वमुनीने तिला पाठविले तेव्हा दुष्यंताने तिचा अव्हेर केला. ही हकीकत घडल्यानंतर कण्वऋषींनी टिटवाळा येथे आश्रम स्थापून वास्तव्य केले. तेथेच शकुंतलेचे संगोपन केले व तिला गणपतीची उपासना करण्यास सांगितले. उपासनेसाठी कण्वऋषींनी शकुंतलेला जी मूर्ती दिली, तीच आज टिटवाळा येथील महागणपती मंदिरात आहे. (अशी आख्यायिका आहे.) शकुंतलेची उपासना फळाला आली व दुष्यंत शकुंतलेला घेऊन गेला. महाभारतात ही कथा आहे व पांडवांनी शूर्पारक येथून सह्याद्रीपर्यंत अंतर्भागात जाऊन तीर्थस्थळांना भेटी दिल्या. ह्यामध्ये लोनाड, वज्रेश्वरी, अंबरनाथ, टिटवाळा ह्या स्थळांना भेटी दिल्याच असल्या पाहिजेत, ह्यात संदेह नाही. अर्थात प्रत्यक्ष कल्याण नगराचे उघड नाव जरी त्यात आले नाही, तरी कल्याण नगराच्या पंचक्रोशीवरील ह्या स्थळांना भेटी दिल्या असल्याच पाहिजेत व प्रत्यक्ष कल्याणचाही अंतर्भाव असला पाहिजे. परंतु केवळ अनुल्लेख व काही हजार वर्षांच्या राजकीय उलाढाली कल्याणला फार झाल्यामुळे दुर्मिळ झालेला पुरावा एवढ्यावर कल्याणचे तीर्थमाहात्म्य व प्राचीनता नाकारता येणार नाही. एवढेच नव्हे तर कल्याणपासून जवळच्याच भागात ज्याने आपली वेदी व राजधानी स्थापन केली त्याचे राज्यात कल्याणचा अंतर्भाव होताच व जसा वीर परशुराम अपरान्ताचा, शूर्पारकाचा

निर्माता आहे, तसाच तो कोकणचा पहिला राजा आहे आणि कल्याण ही परशुराम-निर्मित भूमी आहे ह्यातही संशय नाही.

महेंद्रपर्वतावर राहात असण्यापूर्वी परशुरामाने समुद्र हटवून स्वतःचे परशुराम क्षेत्र निर्माण केले. सह्याद्रीच्या उत्तरटोकावर साल्हेरचा डोंगर आहे. तेथे एक मध्ययुगीन गड असून त्याच्या टोकावर परशुरामाचे मंदिर आहे. मंदिराच्या उत्तरेस शंभर हातांवर मनुष्याच्या पावलांच्या चौपट आकाराची पावले खोदलेली आहेत. बाण मारताना मनुष्य ज्या पवित्र्यात उभा राहतो त्या पवित्र्यात त्यांची योजना आहे. ह्या ठिकाणी उभे राहून परशुरामाने बाण मारला असे सांगतात. त्र्यंबकेश्वर येथील पर्वतावरून तसेच भीमाशंकराहून धनुष्यावर दोन दोन शर ठेवून परशुरामाने भयंकर पाशुपतास्त्र समुद्रावर सोडले; त्यामुळे सहा योजने लांब समुद्र शुष्क होऊन गेला व तेवढा भू-भाग मोकळा झाला. अशा तऱ्हेने भार्गवाने सात वेळा शरसंधान करून सात प्रदेश (सात त्रिकोण) निर्माण केले. त्रिकोणालाच पुढे कुकोण कोकण असे नाव प्राप्त झाले. ह्या पहिल्या उत्तर भागाला (ठाणे जिल्ह्यातील प्रदेशाला) अपरान्त असेच पूर्वीच्या ग्रंथातून म्हटले आहे. कोकण हे अपरान्ताचे प्राकृत नामाभिधान. कुकोण म्हणजे पृथ्वीचा कोन (परशुरामविजय) त्याचेच कोकण झाले.

परशुराम ही असामान्य शक्तीची अलौकिक व्यक्ती होऊन गेली. परशुरामाला विष्णुच्या अवतारात सहावे स्थान मिळाले आहे. त्याचा अंत कसा झाला हे पुराणे इतिहासात नमूद नाही; म्हणून त्यास चिरंजीव म्हणतात व सप्तचिरंजिवांत तो अग्रेसर मानला जातो. त्याने क्षत्रियांशी युद्धे केली असाच त्याने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली ह्याचा अर्थ घेतला पाहिजे. तो क्षत्रिय जातीचा वैरी नव्हता. कारण प्रतिज्ञा पूर्ण केल्यावरही त्याने भीष्म-कर्ण वगैरेसारख्या क्षत्रियांना ब्रह्मास्त्रासह विद्या शिकविली. क्षत्रियसंहारानंतर त्याने आपले लक्ष दलितोद्धारावर केंद्रित केले. अपरान्तातील अनार्य व त्यांचे स्थानिक पुरोहित ह्यांच्या आर्थिकरणाचा पायंडा परशुरामाने घातला. अपरान्त प्रदेश कृषियोग्य करून त्या ठिकाणी त्याने वसाहती स्थापल्या. थोडक्यात परशुरामाने दुर्जनांचा संहार करून संस्कृति-संवर्धनाचे कार्य केले. परशुरामाने मलबारमध्ये आपला शक चालू केला व पेरुमल राजाला गादीवर बसविले. ही वेळ तेथील घाटाच्या पूर्वेला एका शिळेवर पुढील शब्दांत कोरलेली आहे.

'भूमन्म्पोऽयं प्राप्यं १२११४०४ (स्थाली स्रवनदिन कटपयादि पद्धतीने अथवा २१६ इ. स.) या शतकाचे वर्ष सौर असून सिंह मासापासून प्रारंभ होतो. याचे संवत्सर एक हजार वर्षांचे असून सांप्रत चौथे चक्र चालू आहे. याला कोल्लम

शकही म्हणतात. (परशुरामचरित्र, श्री. श्री. म. माटे) परशुरामाच्या कालासंबंधी बरेच घोटाळे आहेत; कारण परशुराम रामपूर्वकालातही होता. रामकालातही उल्लेख आहे व महाभारतकालातही आहे; कारण महाभारतकालात त्याचे तीन शिष्य द्रोण, भीष्म, कर्ण हे प्रख्यात आहेत. तेव्हा एवढे त्याचे हजारो वर्षे अस्तित्वच मानले तर चिरंजीवत्वही मान्य करावयास पाहिजे. परंतु एवढे निश्चितपणे म्हणता येईल की ही व्यक्ती भृगुऋषींच्या कुळातली व भृगुऋषीचा पणतु आहे आणि भृगुऋषींनी ऋग्वेदात एक ऋचा लिहिलेली आहे. म्हणजे ऋग्वेदकालानंतर १५० वर्षांच्या जवळपास परशुरामाचा अवतार झाला. म्हणजे दाशरथी रामाच्या मागे काही शतके गेल्यावर परशुरामाचा काल लागेल; म्हणजे निदान पक्षी परशुरामाचा काल सुमारे सात हजार वर्षांपूर्वीचा किंवा इ. स. ५००० वर्षे असा असावा हे पटण्यासारखे आहे. भारतीय विद्याभवन संस्थेने भारतीयांच्या दृष्टिकोनातून भारताचा इतिहास प्रसिद्ध केला. त्याच्या प्रथम भागात डॉ. पुसाळकर यांनी Historical Traditions या सदरात प्रमुख व्यक्तींचे काळ दिले आहेत. ते खालीलप्रमाणे दिले आहेत.

	इ. स. पू. काल
ययाति (देवयानीचा पति-यदुवंशी)	३०००–२७५०
परशुराम	२५५०–२३५०
श्रीकृष्ण	१९५०–१४००
भारतीय युद्ध	१४००

तेव्हा परशुरामाचा कालनिर्णय स्थूल मानाने इ. स. पूर्व ३ ते ४ हजार वर्षे एवढा धरणेच योग्य ठरेल. अर्थात अपरान्त म्हणजेच शूर्पारक प्रदेश निर्मितीचा कालही इ. स. पूर्व सुमारे ३ ते ४००० वर्षेच धरावा लागेल व परशुराम क्षेत्राची ही भूमी अत्यंत पुण्यकारी, कल्याणकारी, परशुरामाने, प्रभु रामाने, पांडवांनी, ऋषीमुनींनी पावन केलेली भूमी, त्या वेळीच कल्याण नामाभिधान पावली ह्यात संशय नाही व परशुरामाच्या निवासाने पावन झालेले हे कल्याण परशुराम क्षेत्र पुढे नंतरच्या अंदाधुंदीच्या काळात ब्राह्मणांसह चिपळूणकडे सरकले. यामुळे हल्ली शूर्पारक येथे परशुराम क्षेत्र राहिले नाही. सोपारा हे वसईजवळ आहे म्हणजे वसईकडून इ. स. पूर्व ३०० च्या नंतर ब्राह्मणांची वस्ती क्रमाक्रमाने पुढे चिपळूणकडे सरकली. परंतु इ. स. १५० च्या सुमारास ठाणे व जवळच्या प्रदेशास आर्यप्रदेश असे पेरिप्लसच्या ग्रंथात म्हटले आहे. म्हणजे खरी गोष्ट अशी-सोपारा वसईकडील वस्ती क्रमाक्रमाने चिपळूणकडे सरकू लागली होती. नंतर मुसलमान व पोर्तुगीज लोकांच्या त्रासामुळे ह्या देशात ब्राह्मण वस्ती राहिली नाही. म्हणजे सुमारे इ. स. १४०० पासून मराठ्यांच्या अमलापर्यंत स. १७०० पर्यंत जवळजवळ ३०० वर्षांनंतर

Scanned with Car

मात्र मराठ्यांच्या अमलात दक्षिणेकडून परत शूर्पारक क्षेत्र, ठाणे, कल्याण भागात परत ब्राह्मण वस्ती आली. हे परावर्तन महत्वाचे आहे; परंतु चित्तपावन ब्राम्हण दक्षिणेकडे सरकून चिपळूण येथे परशुराम क्षेत्र निर्माण झाले.

इ. स. पूर्व सुमारे ३००० वर्षातील परशुरामानंतर जे छोटे छोटे क्षत्रिय राजे झाले त्यांचा इतिहास, नावे, कारकीर्द मिळणे साधना-अभावी दुष्प्राप्य आहे. परशुरामानंतर ह्या भागातील लोक दुःखी झाले. ह्या ठिकाणी परशुरामाने श्राद्धादि वैदिक कर्मासाठी चितपावन ब्राम्हणकुळे स्थापन करून त्यास १४ गोत्रे दिली होती. हे सर्व ब्राह्मण विशेष गौरवर्णी, सुंदर व सुनेत्र होते. ते परशुरामाच्या कृपाप्रसादाने सकलविद्यासंपन्न झाले. भारद्वाज, कौशिक, वत्स, कौण्डिण्य, कश्यप, वसिष्ठ, जमदग्नी, विश्वामित्र, गौतम, अत्रि या दहा ऋषींची श्राद्ध, यज्ञ व भोजन यासाठी मठग्राम (मठ), कुशस्थल, कर्दलीनगर (केळशी) येथे स्थापना करून परशुरामाने महादेव, महालक्ष्मी (मुंबई), म्हालसा, शांतादुर्गा (गोमांतक), नागेश (नागाव), सप्तकोटीश्वर (बाणकोट), इत्यादि देवता परशुरामाने आणल्या असे स्कंद पुराण, सह्याद्रि खंड, द्वितीय अध्यायात सांगितले आहे.

या विविध दशगोत्री ब्रह्मणांची एकूण ६६ कुळे होती. त्यांपैकी कौशिक, वत्स, कौंडिण्य ह्या तीन गोत्री १० कुळांची स्थापना कुशस्थळी व केळशी येथे केली. श्रेष्ठ व राजमान्य असे हे त्रिगोत्री ब्राम्हण दिसण्यात सुंदर व सदाचारी असून सर्व कार्यात निष्णात होते. परशुरामाने ह्याशिवाय अनेक देशांतील ब्राम्हणांना अग्रहार वगैरे देऊन सांगितले की जेव्हा तुमच्यावर आपत्ती येईल तेव्हा तेव्हा तुम्ही माझे स्मरण करा, असे सांगून परशुराम महेन्द्र पर्वतावर निघून गेला. परशुरामाने अग्रहार रुपाने दिलेल्या गावात सर्व ब्राम्हण सुखाने क्षेत्रवृत्ती (शेतीव्यवसाय) करुन राहू लागले. परशुराम गेल्यावर ह्या क्षेत्रातील लोक शापग्रस्त व दुःखी झाले, तर काही शूद्रप्राय झाले. ह्या प्रदेशावर नंतर सूर्यवंशी हेमांगदपुत्र मयूरवर्मा राजा राज्य करीत होता. नंतर त्याचा मुलगा शिखीवर्मा हा राज्य करु लागला. त्याने आदिक्षेत्राहून काही श्रेष्ठ ब्राम्हण आपल्या नगरात आणून त्यांना वस्ती करण्यास प्रोत्साहन दिले. याप्रमाणे शूर्पारक प्रदेश, गांवे, नगरे, देवालये व विविध पुष्पवृक्ष यांनी हा भूभाग संपन्न केला. ते ब्राम्हण त्याच्या गावचे ग्रामप्रमुख म्हणून काम पाहू लागले.

परशुरामाने ६६ कुळे आणून त्यांची वसाहत निर्माण केली; म्हणून ह्या भागाला साष्टी हे नाव पडले असावे. साष्टी, वसई, ठाणे जिल्हा हे परशुराम निर्मित आदिक्षेत्र अपरान्त कोकण होय; हे सुभे कल्याणमध्ये मोडते. म्हणून सुभे-कल्याणला ७००० वर्षांचा दीर्घकालीन इतिहास आहे हे मान्य करावे लागते.

□ □ □

Scanned with Car

: २ :

रामायण-कालातील सुभे कल्याण

परशुराम–कालानंतर रामायण कालापर्यंत कल्याण सुभ्याचा इतिहास फार तुटक मिळतो. विशेष म्हणजे हा भाग अत्यंत भरभराटलेला असावा एवढेच आपल्याला समजू शकते; कारण त्या वेळी हा भाग कुबेराचे साम्राज्य म्हणून प्रसिद्ध पावला होता. अर्थांत कुबेर म्हणजे संपत्तीचा राजाच अशी त्याबद्दल नेहमीच वर्णने निरनिराळ्या ग्रंथांतून आढळतात आणि संपत्ती ही व्यापार-आंतरराष्ट्रीय व्यापार ह्याखेरीज निर्माण होऊ शकत नाही. कुबेराला सर्व श्रीमान समजतात. म्हणजेच कुबेर काळात कल्याण-साष्टी हा भाग आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी प्रसिद्ध असलाच पाहिजे; तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे अर्थातच दर्यावर्दी व्यापार असला पाहिजे. कारण साष्टी-कल्याण हा भाग समुद्र किनारपट्टीला असून पूर्व बाजूला सह्याद्री व उत्तर बाजूला विंध्य-सातपुडा ह्या पर्वतांच्या रांगानी बंदीस्त चिंचोळा प्रदेश होता व आहे. अर्थात व्यापारासाठी जलमार्ग हेच महत्त्वाचे साधन ते उपयोगात आणीत असले पाहिजेत. म्हणजे कुबेर काळात साष्टी-कल्याण ह्या भागातून समुद्र-मार्गे भारताच्या पश्चिम किनाऱ्याशी तसेच वायव्येकडील तांबड्या समुद्रातून भूमध्य समुद्रापर्यंत त्यांचा संचार असला पाहिजे. काही हजार वर्षांनी म्हणजे इ. स. पूर्व सुमारे १००० वर्षे कल्याण बंदर तर आंतरराष्ट्रीय व्यापाराकरिता प्रसिद्धीस आलेच. म्हणजे त्या वेळी या बंदराची माहिती अरबांना, ग्रीकांना होण्याचे कारण पूर्वानुभव व एतद्देशीयांचा अगोदरच परिचय व ज्ञान झालेले असलेच पाहिजे. अर्थात कुबेर काळात भूमध्य समुद्रापर्यंत व्यापार होऊन प्रचंड संपत्ती कुबेराने भारतात आणली असली पाहिजे; त्याशिवाय त्याच्या श्रीमंतीची एवढी प्रचंड कीर्ती आर्यांनी गाइली नसावी. कुबेराच्या समृद्धी व तंत्रकुशलतेची साक्ष म्हणून एक हकीकत रामायणासारख्या ग्रंथातून उल्लेखिलेली आढळते. ती म्हणजे कुबेराजवळ पुष्पक विमान होते, ते पुढे रावणाने कुबेराला जिंकून त्याचे राज्य घेतले तेव्हा त्या जवळ आले व नंतर प्रभु रामांनी रावणाला जिंकून घेतल्यावर त्याच पुष्पक विमानातून ते अयोध्येला आले. कवी किंवा कोणालाही कोणत्याही कल्पना काहीतरी पूर्वानुभवाच्या आधारेच करता येतात. म्हणजे विमानविद्या निदान कुबेर-काळी निर्माण झाली असून त्याचीच कल्पना काहीतरी पाहिलेले असल्याशिवाय कवींनी केलेली नाही.

या विवेचनावरून कुबेर अत्यंत श्रीमंत असला पाहिजे, त्याचे राज्य अत्यंत समृद्ध असले पाहिजे, ते व्यापारी राज्य असले पाहिजे व हा संपत्तीचा पूर दूर देशांशी व्यापार करून त्याने मिळविला असला पाहिजे. इंद्रालाही या वैभवाचा लोभ वाटावा एवढे ते राज्य समृद्ध असले पाहिजे. कुबेर हा आंतरराष्ट्रीय दर्यावर्दी असला पाहिजे. तसेच त्याच्या राज्यातील तंत्रकुशलता पराकोटीची असली पाहिजे, एवढे तरी सामान्य निष्कर्ष या हकीकतीवरून काढावयास व मान्य होण्यास हरकत नसावी. फक्त आमचे याबाबत एकच गृहीत तत्त्व आहे. हे कुबेराचे राज्य म्हणजे दुसरा तिसरा कोणताही प्रदेश नसून कल्याण-साष्टी हा सुभाच आहे व हे सिद्ध करण्याचा यथावकाश प्रयत्न करूच.

कुबेराचे राज्य पुढे महाशक्तीशाली रावणाने जिंकून घेतले; तेव्हा कुबेराचे राज्य म्हणजेच रामायणात उल्लेखिलेली सोन्याची लंका. सर्व पौराणिक वाङ्मयातून रावणाचे राज्य म्हणजे लंका हे मांडण्यात आलेले आहे. हे राज्य रावणाने कुबेरापासून जिंकून घेतलेले होते हेही तत्कालीन पुराणे, महाभारत व रामायणकारांनीच लिहून ठेवलेले आहे. म्हणजेच कुबेरासारख्या श्रीमंत, पराक्रमी, दर्यावर्दी, तंत्रकुशल, सामर्थ्यशाली राजाचा पराभव रावणाने केला, त्या अर्थी रावण फार बलशाली असला पाहिजे व तेच राज्य जिंकण्याचे कारण समृद्धी याखेरीज अन्य काहीही असणे संभवनीय नाही. म्हणजेच रावणाची लंका सोन्याची होती अशी वर्णने आढळतात. ती खरी असली पाहिजेत. अर्थातच सोन्याची लंका हे लाक्षणिक अर्थाने घेऊन अत्यंत वैभवशाली, सुंदर, श्रीमंत राज्य असेच समजले पाहिजे. ज्या अर्थी ही वर्णने आढळतात त्या अर्थी रावणानेही आपली समृद्धी कायम राखली असली पाहिजे; तसेच रावणही उत्तम दर्यावर्दी असला पाहिजे.

रावणाने कुबेराचे राज्य घेतले; परंतु रावण कोण? तर ब्राह्मण-राक्षसी संबंधातून झालेला मुलगा; म्हणजेच विश्रव ऋषी व सुमाली या राक्षसाची मुलगी कैकयी यांचा मुलगा. रावण व त्याचे बंधू हे त्या दांपत्याचे पुत्र व मुलगी शूर्पणखा ही बहीण. (रामायण उत्तरकांड) त्या काळी ब्राह्मण व राक्षस यांमध्ये बेटी-व्यवहार ग्राह्य होता. हा विश्रव ऋषी नर्मदेच्या काठी विंध्याद्रीच्या पश्चिम खोऱ्यात राहात होता. त्या वनाचे नाव श्लेष्मांतक वन. (भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश, पान ३८४ व ६०८ ले. र. भ. गोडबोले) वाल्मिकी रामायण (उत्तर कांड १०) म्हणजे सुमाली हा रावणाचा आजा (आईकडून). सुमाली, माल्यवान, माली हे तिघे बंधू कुबेराच्या आधी लंकेचे म्हणजे हल्लीच्या साष्टी बेटाचे व भोवतालच्या प्रांताचे राजे होते. ते फार बलवत्तर झाले व लोकांना त्रास देऊ लागले तेव्हा विष्णूने त्यांचा पराभव करून त्यांना लंकेतून हुसकून लावले. त्यामध्ये माली मारला गेला व सुमाली माल्यवान हे बंधू सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून राहण्यास

गेले. या माल्यवान राक्षसाच्या निवासामुळे सह्याद्रीच्या उत्तर भागाला माल्यवान पर्वत हे नाव पडले असावे.

लंकेचे राज्य यक्षांना मिळाल्यावर कुबेराने चांगल्या रीतीने राज्य करून खूपच संपत्ती मिळवली होती व राक्षस व यक्ष ह्या शब्दाच्या व्युपत्तीवरूनही हे लोक मोठे दर्यावर्दी होते असे दिसून येते. (रिडल ऑफ दी रामायण पान, १८–९९, कै. चिं. वि. वैद्य) कुबेरांना संपत्ती मिळविण्याचा मार्ग म्हणजे व्यापार किंवा लुटालूट व ती कोठे तर नर्मदेच्या उत्तरेकडील भरभराटीस आलेला भारत देश. या भागावर या यक्ष-राक्षसांनी स्वाऱ्या केल्या असतील किंवा दुसरा मार्ग म्हणजे व्यापार. त्या काळी मिसर, असिरिया, खल्डीया, इराक व इतर त्या बाजूची राष्ट्रे अत्यंत भरभराटीस आलेली होती. तसेच सौविर (शूर्पारक) हा प्रांत हल्लीच्या सिंधूचा समुद्रकाठचा प्रदेश होता व तो किंग सालोमनच्या कारकीर्दीत अतिशय श्रीमंत म्हणून प्रसिद्ध होता. (एपिक इंडिआ, पान २८८, भारताचार्य वैद्य). या सर्व पश्चिमेकडील देशांबरोबर साष्टी (लंका) बेटावरील लोकांचा व्यापार चालणे शक्य होते.

वरील सर्व विवेचनावरून रावणाने लंका जिंकली ह्याचे कारण ते त्याच्या आज्याचे राज्य होते. त्याचे आजोळ हे सर्व दर्यावर्दी होते तसाच तोही दर्यावर्दी असला पाहिजे. रावणाला ब्राह्मणही म्हणतात व राक्षसही म्हणतात, ह्याचे कारण पिता ब्राह्मण होता व आई राक्षसी होती. त्यांच्या कुलनिर्देशावरून याचा उलगडा होईल व दोन्ही अर्थांनी ते खरे आहे हे पटेल. सह्याद्रीच्या उत्तर भागाला माल्यवान पर्वत नाव का पडले, तर माल्यवान सुमाली राक्षसांच्या निवासस्थानावरून; तसेच लंकेचे राज्य त्याचे होते म्हणजे लंका सह्याद्रीच्या बाजूला अपरान्तात जवळच असली पाहिजे. बोरीवलीनजीक (आरे मिल्क कॉलनी) साष्टी बेटातील काही डोंगराळ भागात अतिशय निबिड असे 'अशोकवन' आढळण्यात आले आहे. त्या भागात कित्येक शतकांत कोणीही मनुष्य फिरकलेला नाही, असा तो भाग आहे, असे सरकारी अधिकाऱ्यांना आढळून आलेले आहे (लोकसत्ता, मुंबई रविवार दि. ३०।५।१९५४) रामायणातीलच ते अशोक वन असावे व त्याचा शोध घेऊन संशोधन करणे जरूर आहे. असंख्य अज्ञात गोष्टी उजेडात येतील. अर्थात हे काम एकट्याच्या सामर्थ्याचे नव्हे. त्याला सरकारीच सहाय्य पाहिजे. परंतु कधी होईल तेव्हा ते खरे.

तसेच सीतेला पळविण्यासाठी रावणाने ज्या मारीच राक्षसाची मदत घेतली, तो सुंद नावाच्या राक्षसाचा मुलगा. त्याच्या आईचे नाव ताटका. ह्यांना मारीच व सुबाहू असे दोन मुलगे होते. हे कुटुंब विंध्य पर्वताच्या खालच्या भागात म्हणजे नासिक खानदेशच्या पश्चिम भागात अगस्ति ऋषींच्या आश्रमाजवळ राहात होते.

Scanned with Car

या सुंदाचा वध अगस्ती ऋषींनी केल्यावर ताटका राक्षसी आपल्या मुलांना घेऊन पूर्वेकडे विश्वामित्राच्या सिद्धाश्रमाजवळ राहावयास गेली होती. विश्वामित्राने राम-लक्ष्मणांना आणून ताटकेचा व सुबाहुचा वध केला, तेव्हा मारीच तेथून पळाला व रावणाच्या लंकेजवळ म्हणजे हल्लीच्या साष्टीबेटाजवळ सह्यपर्वत व समुद्र ह्यांच्या मधल्या प्रदेशात राहात होता. रावण त्याचा सल्ला घेण्यासाठी वारंवार त्याच्याकडे येत असे. हा मारीचाचा प्रदेश किंवा राज्य म्हणजेच आजचा कल्याणचा प्रदेश होय. तसेच रावणाची बहीण शूर्पणखा ही वसईजवळील परशुराम भूमीत राहात होती. तिच्याच नावावरून शूर्पारक हे नाव पडले असावे. अशी अनेक परंपरेने चालत आलेली नावे फार मोठा इतिहास सांगून जातात, हे पुढे आणखी काही गोष्टीवरून दाखवणार आहोतच. परंतू माल्यवान पर्वत, शूर्पारक, अशोकवन ही नांवे पुरेशी बोलकी आहेत.

तेव्हा साष्टी बेट हीच रावणाची लंका व शूर्पारक हे शूर्पणखेचे राज्य व कल्याण विभाग हे मारीच राक्षसाचे राज्य, ही आपली गृहीते बऱ्याच अंशांनी आपण सिद्ध करीत आहोत. आता ह्या काळातील प्रमूख व प्रख्यात इतिहास म्हणजे रामायण-कथा व राम-रावण युद्ध. तत्पूर्वी रावण या लंकेचा राजा. त्याचा संबंध कोणकोणाशी आला होता हे प्रथम पाहिले पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे हा महा-पराक्रमी दर्यावर्दी राजा होता व तो आपले बेट ओलांडून वारंवार येत असे. कारण त्याची आई व वडील, कैकसी व विश्रव ऋषी, हे नर्मदेच्या काठी विंध्या-द्रीच्या पश्चिम खोऱ्यात, किष्किंधा प्रदेशाच्या जवळ राहात होते. रावण, बिभीषण, कुंभकर्ण हे बंधू आपल्या आईला भेटण्यासाठी वारंवार येत जात असत. किष्किंधेचा देश, मतंग वनाच्या उत्तरेला, त्र्यंबकेश्वरपासून वर उत्तरेला, नासिक व खानदेश जिल्हा याच्या पश्चिम डोंगराळ भागात असला पाहिजे. किष्किंधेचा राजा वाली हा होता. त्याने दुंदुभीला ठार मारले होते व त्याचे प्रेत ह्या मतंग वनात फेकून दिले होते. त्यामुळे मतंग ऋषींचे व वालीचे वैमनस्य निर्माण झाले होते. अर्थात सुग्रीव हा त्याचा भाऊ. म्हणून त्यालाही मतंग ऋषींची भीती होती व आपला बंधू वाली याच्याशीही त्याचे सख्य नव्हते. म्हणून दोघांपासून सुरक्षिततेसाठी तो त्या दोघांच्या सीमेवर असलेल्या मलयगिरी व ऋष्यमूख शिखरावर वास्तव्य करून होता. म्हणजे दुंदुभी हा रावणपत्नी मंदोदरी हिचा भाऊ होता. मंदोदरी ही देखील अप्सरा–राक्षस संबंधातून झालेली मुलगी होय. कारण हेमा नावाच्या अप्सरेला मयासुराने पळवून आणली, तिच्यापासून त्याला दुंदुभी, मायावी हे मुलगे व मंदोदरी नावाची मुलगी झाली. तेव्हा मंदोदरी ही रावणाची पट्टराणी असल्यामुळे मयासूर हा त्याचा सासरा होय. दुंदुभीच्या वधाने वालीने मतंगऋषी, रावण हे शत्रू निर्माण केले. रावणाने वालीबरोबर एक दोन वेळा बाहुयुद्धे केली; परंतु वालीने त्याचा

पराभव केला. म्हणजे रावण हा फार मोठा अजिंक्य वीर होता, तसाच किंबहुना त्याहूनही जास्त वाली होता. म्हणूनच सुग्रीव त्याला भिऊन होता.

थोडक्यात रावण हा साष्टी बेटाचा व भोवतालच्या प्रदेशाचा राजा होता. हे राज्य त्याच्या मातुल वंशाचेच होते; परंतु मध्यंतरी विष्णूच्या मदतीने ते यक्षांना मिळाले होते, ते पुन्हा रावणाने जिंकून घेतले. रावण हा महाबलाढ्य राजा होता हे रामायणाने वर्णन केले आहे व रामरावण युद्धाने सिद्ध झाले आहे. रावण कसा होता याची काल्पनिक वर्णने सोडली तरी त्याच्या चारित्र्याबद्दल चांगलेच उद्‌गार काढावे लागतील. त्याच्या जीवनात एकच गोष्ट घडली, ती म्हणजे त्याने सीतेला पळवून नेले; परंतु हे घडण्याची कारणे कोणती ? सर्व युद्धांना कारणीभूत स्त्री झालेली आहे. सीतेच्या स्वयंवराला रावण हजर होता. रावणाचा सीतेकडून उपहास झाला. रावण धनुष्याला प्रत्यंचा लावताना पडला आणि सीता हसली. रावणाचा अहंकार दुखावला. तेव्हा सूडाची भावना निर्माण होणे ते एक कारण. तसेच राम-लक्ष्मण-सीता हे वनवासाला गेल्यावर पंचवटीत शेवटी येऊन राहिले; म्हणजे रावणाला जवळ आले. परंतु मध्ये एवढी वर्षे गेल्यावर त्याची सूडबुद्धी जागृत कशी झाली ? कारण मधल्या काळात रावणाने काहीच हालचाल केली नाही. ह्याचे कारण स्पष्टपणे वाल्मिकी रामायणात दिले आहे. शूर्पणखा ही रावणाची बहीण होती. हिने जेव्हा राम-लक्ष्मणांना पाहिले तेव्हा तिला मोह उत्पन्न झाला. तिने सुंदर रूप धारण केले व रामाला काममोहित करण्याचा प्रयत्न केला. रामाने तिची चेष्टा करण्यासाठी लक्ष्मणाकडे पाठवले. लक्ष्मणाने तिला रामाची आज्ञा आण असे सांगितले. तेव्हा रामाने तिच्या पाठीवर संदेश देऊन लक्ष्मणाला सांगितले की ही राक्षसी परंतु स्त्री आहे. म्हणून हिला न मारता फक्त नाक कापून विद्रूप करून सोडून दे. लक्ष्मणाने तिला विद्रूप केल्यामुळे ती चवताळली व आपला बंधू दशग्रीव रावण याच्याकडे गेली व त्याची निर्भत्सना करून त्याला भडकवले– ' सीतेसारखी स्त्री ही केवळ तुझीच राणी होणे योग्य आहे.' आपल्या बहीणीच्या शब्दांनी रावणाचा संताप व अहंकार प्रज्वलित झाला; व त्याने सीता-हरणाचे कार्य मारीच राक्षसाच्या मदतीने केले. मारीचाने त्याला दोन वेळा परावृत्त केले; परंतु शूर्पणकेच्या निर्भत्सनेने रावण चिडला व मारीचाला ठार मारण्याची धमकी देऊन सीताहरणास सहाय्य करणे त्याने भाग पाडले. परंतु ह्याच घटनेमुळे पुढील रामायण घडले.

रावणाचे सीताहरण हे कृत्य, रामाचे शत्रुत्व व राक्षस–मातेपोटी जन्म, ह्या कारणाने त्याचे केले गेलेले वर्णन, ह्यामुळे रावण हा जरी खलनायक ठरविला गेला असला तरी रामायणकारांनीच त्याचा गौरव प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करून ठेवला आहे, हे विसरता कामा नये. त्याच्या बलाढ्यतेचे वर्णन निश्चित गौरवास्पद आहे.

त्याच्या श्रीमंतीचे वर्णन प्रलोभनीय आहे; पण विशेष म्हणजे त्याच्या नीतीमत्तेचे केलेले दर्शन रावणाची थोरवी वाढवणारे आहे. रावणाची पत्नी मंदोदरी हिला पंच पतिव्रतांच्या मालिकेत सीतेच्या बरोबरीने स्थान आहे. तसेच रावण हा खरोखर स्त्री-लंपट असता तर सीता एक वर्षपर्यंत रावणाकडे सुरक्षित राहू शकलीच नसती; एवढेच नव्हे तर ती शुद्ध असल्याची ग्वाही सीतेने अग्निप्रवेश करून रामाला दिली. तसेच वीर हनुमानाने जेव्हा सीतेचा शोध केला तेव्हा परिचयासाठी रामाची मुद्रिका त्याला दाखवावी लागली. सीतेने रामाला 'युद्ध करून तू मला सोडवून ने' असा निरोप दिला; परंतु हनुमानाने मी आपल्या पाठीवर तुला घेऊन जातो असे सांगितले असता तिने ते लोकांत शोभून दिसणार नाही असे सांगून परत पाठवले. म्हणजे रावणावर एक प्रकारे तिने गाढ विश्वास प्रकट केल्यासारखे नाही काय ? हे रावणाला सीतेचे एक शिफारसपत्रच आहे. रावणाची नीतिमत्ता ह्यावरूनच प्रकट होते.

वरील विवेचन रावणाची स्तुती करण्याकरिता नव्हे, परंतु वाल्मिकीने देखील रावणाला योग्य न्याय दिलेला आहे हे दर्शविण्यासाठीच केले.

आता फक्त मुद्दा एवढाच की भौगोलिक स्थलविशेषाने सुभे कल्याण हीच भूमी म्हणजे लंका व तिचा परिसर हे सिद्ध करणे. यासाठी आधार म्हणजे तत्कालीन लेख व अवशेष, वाङ्मय, ताम्रपट, शिलालेख वगैरे. यापैकी महाभारत व वाल्मिकी रामायण या दोन महाकाव्यांखेरीज अन्य कोणतेही साधन उपलब्ध नाही. ह्या महाकाव्यांनीच आमचा प्राचीन इतिहास जिवंत ठेवला. तेव्हा त्याच ग्रंथांच्या आधारे स्थळविशेषांचा शोध घेऊन व त्यापैकी प्रत्यक्ष असलेल्या गोष्टींचे संधान तर्कशुद्धतेने लावून निश्चिती केली पाहिजे. या ग्रंथाबाबत देखील ते तत्कालीन किंवा समकालीन लेखकाने लिहिले आहेत हे निश्चयाने सांगता येणार नाही. विशेषतः वाल्मिकी रामायणाबाबत तर विद्वानात एकमत आहे की ते महाभारतानंतर लिहिले गेले व व त्यासंबंधी योग्य पुरावेही दाखल केले जातात. अर्थात वाल्मिकी रामायण हे रामकालानंतर लिहिले गेले असले, तरी ते एवढे तपशीलासह लिहिले गेले आहे की रामकालीन रामायण असावे व त्यावरूनच मागून कोणीतरी प्रतिभावंताने हे पुन्हा लिहून ठेवले. आज घटकेस प्रसिद्ध असलेल्या वाल्मिकी रामायणाखेरीज रावणाची लंका कोणती हे ठरविण्यास दुसरा कोणताही आधार नाही. तेव्हा रामायणातील रामाचा १४ वर्षे वनवास, रामाची चित्रकूट-जवळील अत्री आश्रमातील ११ वर्षे, रामाचे पंचवटीतील आगमन, सीताहरण व पुढील प्रसंग यांच्या वर्णनावरून ती वर्णने कोणत्या प्रदेशास लागू पडतात, व रामायणातील दिशा, नावे हीच लंका कोणती हे ठरविण्यास मार्गदर्शक ठरतील. म्हणून त्यांचाच आधार घेऊन व अभ्यास करून साष्टी बेट हीच लंका असे आमचे

मत झाले आहे. भौगोलिक वर्णन (रामायणातील) व रामचंद्राचा चित्रकूटपासून लंकेपर्यंतचा प्रवास ह्याचे वर्णनावरून लंका कोणती हे ठरविण्याचा हा प्रयत्न आहे.

रामायणातील लंका कोणती याबद्दल लहानथोर विद्वानांत प्रचंड मतभेद आहेत. म्हणून रामायणाच्या अभ्यासकांना हा विषय मोठा गूढ व आकर्षक होऊन बसला आहे. (१) नडीयाद येथील श्री. सी. एन. मेहता यांनी ऑस्ट्रेलिया म्हणजेच लंका हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. (२) इंदूरचे श्री. किबे यांनी मध्यप्रदेशातील अमरकंटक पर्वतावर लंका असावी असे मत प्रदर्शित केले आहे (३) तोच विचार डेक्कन रिसर्च इन्स्टिटयुटचे डॉ. सांकलीया यांनीही नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे (४) बंगलोरचे न्यायमूर्ति श्री. परमशिव अय्यर यांनी 'रामायण व लंका' ह्या पुस्तकात लंका वगैरे रामायणातील स्थाने जबलपूरच्या आसमंतातील प्रदेशांत आहेत, असे म्हटले आहे. (५) श्री. 'महाराष्ट्रीय' ह्या लेखकाने हल्लीचे सीलोन बेट हीच लंका होय हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. (६) श्री. भारताचार्य वैद्य यांनी सीलोन हीच लंका असावी असे गृहीत धरले आहे. रामायणातील लंका म्हणजेच साष्टी बेट कसे याचा विचार करताना रामचंद्राचा चित्रकूट-निवासापासून तो पुन्हा अयोध्येला परत येईपर्यंतचा काळ कशा रीतीने रामायणात विभागला आहे व त्यांच्या वेळोवेळीच्या निरनिराळ्या ठिकाणच्या हालचाली आणि प्रवास, ह्यांचे विवेचन मुद्देसूदपणे केले पाहिजे. ह्या काळात ज्या अनेक घडामोडी घडून आल्या त्या वाल्मिकीने वर्णन केल्याप्रमाणे बरोबर व प्रमाणशील बसल्यास वरील मुद्दा सिद्ध होईल व रामायण ही सत्यकथा आहे या गोष्टीलाही पुष्टि मिळेल.

लंका कोणती हे ठरविताना रामायणातील विधाने यांना पहिल्या प्रतीचे महत्व आहे. त्यानंतर लिहिलेली पुराणे, आख्याने, माहात्म्ये, संहिता, रामायणावर लिहिलेली नाटके, काव्ये, दंतकथा व लोकसमज ही गौण प्रतीची आहेत. मूळ विधानांना पुष्टी देणारी माहिती म्हणून त्यांचा उपयोग करण्यास हरकत नाही. स्थळविशेष या दृष्टीने प्रथम श्रीरामाचे निरनिराळ्या ठिकाणचे निवास व त्याचे प्रवासमार्ग ह्यांचा विचार प्रथम करावा लागेल.

घटना (१) १४ वर्षे वनवास स्वीकारल्यावर प्रभू श्रीराम हे चित्रकूट येथे जाऊन राहिले. (२) तेथे किती काळ निश्चित राहिले हे स्पष्टपणे रामायणात सांगितलेले नाही. (३) हल्ली प्रसिद्ध असलेले हे चित्रकूट व रामायणातील चित्रकूट एकच आहे. चित्रकूट यमुनेच्या दक्षिणेला दंडकारण्यात होते व ते गंगा-यमुनेच्या संगमापासून पश्चिमेला सहा कोसावर होते. म्हणून हल्लीचे चित्रकूट व ते एकच हे सर्वांना मान्य आहे. हल्लीचा चित्रकूट डोंगर व रामायणातील चित्रकूट डोंगर भिन्न

Scanned with Car

नाहीत. (४) चित्रकूट दंडकारण्याचा भाग होता; कारण रामाला १४ वर्षे दंडकारण्यात राहण्याची आज्ञा होती. (५) त्याप्रमाणे श्रीरामाचा विचार चित्रकूट येथे राहूनच वनवास पुरा करावयाचा होता. (६) परंतु त्या ठिकाणी मनाला बरे न वाटल्यामुळे अत्रिऋषींच्या आश्रमात जाण्याचे त्याने ठरविले. म्हणजे दंडकारण्यात यमुनेच्या दक्षिणेला कोणत्याही भागात त्यांना राहता आले असते• कारण ते दंडकारण्यच होते. म्हणजे अत्रिऋषींचा आश्रम यमुनेच्या दक्षिणेलाच असला पाहिजे.

श्रीरामचंद्र चित्रकूटाहून थेट दक्षिणेकडे गेले किंवा थोडे दक्षिण–पश्चिमेला (नैऋत्येला) बाजूला वळून विंध्यपर्वताच्या पायथ्याच्या पूर्व बाजूने खाली उतरले? (१) आमचे मते ते विंध्याच्या पायथ्याच्या पूर्व बाजूनेच दक्षिणेत उतरले, थेट दक्षिणेकडे नव्हे; कारण आर्यांचे भारतातील आगमन पश्चिम व वायव्य दिशेकडून झालेले होते. त्यामुळे तो भाग जास्त परिचित होता. (२) भृगुकुळांतील ऋषींचा आश्रम नर्मदेच्या मुखाशी रामाच्या काळाच्या पूर्वीपासूनचा होता. (भृगुकच्छ अथवा भडोच) दंडकारण्यातील कथेत भृगूचा व इक्ष्वाकू वंशातील राजाच्या गोष्टींचा संबंध आलेला आहे. भृगु ऋषी व त्यांचे अनुयायी विंध्याच्या पश्चिमेकडून खाली उतरले असले पाहिजेत. (३) विंध्याच्या बाजूबाजूने दोन्ही अंगांनी ऋषींचे आश्रम तुरळक तुरळक वसू लागले होते म्हणून प्रभू श्रीरामचंद्राने विंध्याचे पायथ्याचे पूर्व बाजूने अमरकंटक पर्वताचे बाजूने दक्षिणेत उतरणे परिचयाचे व सोईचे होते. (४) त्या काळी सातपुडा व विंध्य निराळे ओळखले जात नव्हते; तर सातपुडा हा विंध्याचाच भाग समजला जात असे. (५) विंध्य पर्वत ओलांडून (सातपुड्यासह) तापी गोदावरीच्या उत्तर खोऱ्यात अगस्ती ऋषींचा आश्रम होता. (६) रामायणकाळी आर्यांनी गंगायमुनेच्या दुआबात ज्याप्रमाणे वस्ती केली होती, त्याचप्रमाणे उत्तरेला गंगायमुनेच्या संगमापासून विश्वामित्राच्या सिद्धाश्रमापर्यंत पूर्वेलाही पसरली होती. विश्वामित्राच्या सिद्धाश्रमापलीकडे म्हणजे हल्लीच्या पाटणा, गया ह्या प्रांताच्या पलीकडे (बिहार), त्याचप्रमाणे गंगेच्या दक्षिणेकडे भयंकर घनदाट अरण्ये होती. (७) दक्षिणेच्या बाजूने राक्षसांकडून फारच उपद्रव होता, हे विश्वामित्राने रामाला नेऊन ताटकादी राक्षसांना मारले, ह्या कथेवरून प्रसिद्धच आहे. जवळच्या जनक राजाला न आणता श्रीरामाला आणले. याचे कारण रामाच्या शरसंधान-कौशल्याची कीर्ती त्याने ऐकली होती म्हणून दूर अयोध्येला जाऊन त्याने रामाला आणले व राक्षसांचा बंदोबस्त केला. (८) पूर्व भाग तर आर्यांना अगदीच अपरिचित होता व धोकादायक होता. रामाच्या वीस पिढ्या अगोदर होऊन गेलेल्या. भगीरथाने गंगेचे मुख (कलकत्ता) शोधून काढले होते तरी त्या बाजूकडे जाणे धोक्याचे व कठीण होते, हे सगर राजाच्या कथेवरून प्रसिद्ध आहे. त्याचे ६० हजार सैनिक यज्ञाच्या घोड्याचा शोध

Scanned with Ca

घेण्यास पूर्व बाजूला ते गेले कायम नष्ट झाले, परतच आले नाहीत. म्हणजे पूर्वेची गंगेच्या मुखाकडील बाजू रामायणकाळी अतिशय धोक्याची होती, हे त्या काळी सर्व आर्यांना माहीत होते. म्हणजे रामायणकाळी राक्षस विश्वामित्राला दाद देत नव्हते हे विश्वामित्र कथेवरून समजते. वसिष्ठाने म्लेंच्छांची व इतर परकीयांची मदत घेऊनच विश्वामित्राचा पराभव केला होता व त्याच्या सैन्याला पळवून लावले होते. (९) म्हणजे पश्चिम बाजूने राम दक्षिणेकडे उतरले, मध्य प्रदेशातून नव्हे व पूर्वेकडूनही नव्हे. कारण मध्य प्रदेशाच्या पूर्व व दक्षिण भागात ओरिसा वगैरेच्या बाजूला अजूनही घनदाट अरण्ये, आदीवासी लोकांची वस्ती व हिंस्र श्वापदांचा प्रदेश आहे (१०) यावरून हे सिद्ध होते की प्रभू राम विंध्याच्या पायथ्याकडेच वळले. वाल्मिकी रामायणात विंध्य पर्वताचा उल्लेख पुढे अनेक ठिकाणी आलेला आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. विंध्याच्या आसपासच्या भागात म्हणजे हल्लीच्या मध्यभारतात आर्यांची वस्ती पसरणे अगदी साहजिकच होते. एक तर हा भाग आर्यांना पंजाबमध्ये केलेल्या प्रथम वस्तीच्या जवळ होता म्हणून लवकर परिचित झाला असला पाहिजे व दुसरे म्हणजे विंध्यपर्वताच्या पूर्व व पश्चिम भागाला डोंगरातून यमुनेच्या मिळणाऱ्या दक्षिणोत्तर नद्याही पुष्कळ आहेत. चंबळा, सिंधू वगैरे नद्या या भागातून वाहतात. पूर्वीच्या काळी वस्ती व आश्रम नद्यांच्या काठानेच वसत असत असा पुराणवस्तू संशोधकांचा सिद्धांत आहे. अर्थात आर्यांची वस्ती पश्चिम दिशेला जास्त करून होत गेली. ऋषींचे आश्रम पश्चिम बाजूलाच निर्माण झाले. सामान्य जनांची वस्ती होऊ लागली. म्हणजे ज्याला जनस्थान म्हणत असत ते दक्षिण पश्चिम बाजूला विंध्याच्या आसपास होते हे निश्चित होय. काही संशोधकांचे मत जनस्थान पूर्वेला भद्राचलम्‌कडे होते. हे म्हणणे वस्तुस्थितीला व व्यवहाराला धरून नाही. मध्य प्रदेशाच्या पूर्व दक्षिण भागात व ओरीसा वगैरे प्रांताच्या बाजूला अजूनही घनदाट अरण्ये, आदीवासींची वस्ती व वन्य पशु पुष्कळ आहेत आणि लोकवस्तीही तितकी दाट नाही म्हणजे जनस्थान, विंध्याच्या पायथ्याकडे, आर्यांच्या परिचयाच्या नद्यांच्या भागातच होते व श्रीरामचंद्रही विंध्याच्या पायथ्याच्या भागाकडे वळले.

माहिष्मतीचा राजा कार्तवीर्य किंवा सहस्रार्जुन, ह्याचे राज्य हैहय या नावाने प्रसिद्ध होते व ते विंध्य प्रदेशाच्या आसपास नर्मदेच्या खोऱ्यात पसरले होते. याने भृगुकच्छ येथील नर्मदेच्या दक्षिण व पश्चिम बाजूला असलेला जमदग्नीने ऋषींचा आश्रम लुटून त्यांची कामधेनु जबरदस्तीने नेली होती. त्याचा परिणाम मोठ्या युद्धात होऊन कार्तवीर्य व सहस्रार्जुन हा परशुरामाकडून मारला गेला. भृगुकछ म्हणजे भडोच हे सर्वमान्य होय. याचा अर्थ अत्रिऋषींचा आश्रम, दैत्यांचे (कार्तवीर्य) राज्य, जमदग्नीचा व भृगुऋषींचा आश्रम ही सर्व जवळ जवळ असली पाहिजेत. म्हणजे विंध्याकडे आर्यांची वस्ती जास्त प्रमाणात पसरली होती

व परशुरामाने तर परांत व अपरांत हे भाग निर्माण करून हल्लीचे नालासोपारा हे वसईजवळचे ठिकाण आपली राजधानी केले होते. वज्रेश्वरी येथील उत्खननात त्यांची यज्ञवेदी तज्ञांना सापडलेली आहे पुराणवस्तुशास्त्र संशोधकांच्या मते पूर्वीच्या सर्व वसाहती नद्यांच्या काठाने झालेल्या आहेत. आर्य हे तर धार्मिक होतेच. म्हणून काळू, उल्हास व भातसा ह्या नद्यांचा त्रिवेणी संगम उर्फ कल्याण ही भूमी तीर्थक्षेत्र म्हणून परशुरामकाळी पावन झालीच असली पाहिजे व कल्याण क्षेत्राची निर्मिती परशुरामानेच केली असली पाहिजे, हे मागील प्रकरणात सांगितलेच आहे.

विंध्य पर्वत हा इशान्येकडून दक्षिणेस वळून पूर्व पश्चिम पसरला आहे. वाल्मीकीच्या काळी सातपुडा आणि विंध्य एकच समजले जात असत. सातपुड्याच्या दक्षिणेला गोदावरी नदीच्या उत्तरेला दोन योजनांवर अगस्तीऋषींचा आश्रम होता. विंध्य व सातपुडा यांच्या पश्चिमेकडील टोकांच्या पर्वत–शिखरात माल्यवान, प्रस्रवण किंवा सह्य ह्या पर्वताचे उत्तर टोक येऊन मिळालेले आहे. माल्यवान म्हणजेच प्रस्रवण किंवा सह्याद्री. माल्यवान पर्वत हे नाव सह्याद्रीच्या टोकाला का मिळाले ते अगोदरच्या भागात सांगितले आहेच. तसेच ह्या डोंगरात मोसमी वाऱ्यांचा खूप पाऊस पडतो व त्यामुळे मोठमोठे प्रवाह वाहतात म्हणून सह्याद्रीलाच प्रस्रवण म्हणतात. परंतु माल्यवान हे नाव फक्त विंध्याजवळ सह्य पर्वताच्या टोकालाच पडले आहे. हा भाग म्हणजे हल्लीच्या खानदेशाचा वायव्य भाग, पश्चिम भागाचे डोंगर व डांग भागातील डोंगर व नाशिक जिल्ह्यातील पश्चिमेकडील सह्याद्रीचा भाग ह्यांची सरमिसळ झालेला भाग.

श्रीरामचंद्र अत्रीऋषींच्या आश्रमात चित्रकुटाहून आले. नंतर सुतीक्ष्णाच्या आश्रमात व त्याच मालव (माळवा) प्रदेशात रामाने सुमारे १०।११ वर्षे घालविली आणि तेवढ्या काळात अनेक आश्रमात राहून त्या भागातील राक्षसांचा नाश करून त्याने तेथील आश्रम सुरक्षित केले. हा प्रदेश नर्मदेच्या खोऱ्यातला असल्यामुळे ती नदी त्याने अनेक वेळा ओलांडली असली पाहिजे व या नदीला त्या भागात अनेक ठिकाणी पायउतार असल्यामुळे रामायणात त्याचा उल्लेख वाल्मिकींनी केलेला नाही. परंतु उत्तरखंडात सर्ग श्लो. ३१–३६ सर्ग यामध्ये रावण आणि कार्तवीर्य यांच्या संघर्षाच्या गोष्टीत त्यांचा (पायउताराचा) उल्लेख केलेला आहे.

सातपुड्याच्या दक्षिणेला गोदावरी नदीच्या उत्तरेला अगस्तीऋषींचा आश्रम होता. अगस्तीऋषींनी विंध्यपर्वत ओलांडल्यावर ते उत्तरेला गेलेच नाहीत. श्रीरामचंद्र विंध्य ओलांडून अगस्तीऋषींच्या आश्रमाकडे जाताना लक्ष्मणाला मार्गात त्यांचे माहात्म्य सांगत होते. त्याही वेळी रामानी विंध्य पर्वताचा उल्लेख केला आहे. त्याअर्थी श्रीराम हे गोदावरीच्या पूर्वेकडील भागाला म्हणजे भद्राचलम् भागाला

Scanned with Car

किंवा आंध्र, हैद्राबाद बाजूला गेलेले नाहीत. ते विंध्य बाजूनेच दक्षिणेत उतरले हे निश्चित होते. अर्थात ऑस्ट्रेलिया ही रावणाची लंका असावी हे अनुमान खरे ठरत नाही व ते विधानच तर्कदुष्ट आहे. कारण ऑस्ट्रेलिया हे खंडच भारतापासून एवढे दूर आहे की कल्पनाशक्ती ताणून वस्तुस्थितीला सोडून सुद्धा ते पटणार नाही.

अगस्तीच्या व विंध्याचा उल्लेख प्रभू रामचंद्राच्या तोंडी घातला आहे, त्या अर्थी ते हिंदुस्थानच्या पश्चिम बाजूनेच खाली उतरले, पूर्वेच्या बाजूला गेलेच नाहीत, हेच कवीला सुचवायचे आहे. अगस्ती ऋषींच्या आश्रमातून निघताना त्यांनी रामाला सांगितलेल्या जनस्थानाकडे जाण्याच्या मार्गाच्या वर्णनात पुढील श्लोक महत्वाचा आहे.

तस्य स्थलमुपारुह्य पर्वतस्याविदूरतः ।
ख्यातः पंचवटीत्येव नित्यपुष्पितकाननः ॥ ३। १३। २२

'तुम्ही डोंगर ओलांडल्यानंतर (गोदावरी कांठचा) पंचवटी नावाने विख्यात असलेला व सदैव पुष्पांनी बहरलेला प्रदेश लागेल.' यातील डोंगर म्हणजे आशेवाडीचे डोंगर होत. पुढेहि रामायणात याचा उल्लेख आला आहे. खर नावाच्या राक्षसाबरोबर युद्ध करत असताना सीतेला सुरक्षिततेसाठी याच डोंगरात रामाने नेऊन ठेवले होते. हे डोंगर नासिकच्या उत्तरेला आठदहा मैलावर आहेत. पंचवटीत गोदावरीच्या उत्तरेला तीन मैलावर म्हसरुल या गावी पुष्करणी आहे. पंचवटीचे वर्णन रामाच्या तोंडचे आहे. ते असे 'लक्ष्मणा, हा प्रदेश सपाट असून येथून जवळच एका बाजूला कमलांनी भरलेले सरोवर दिसते (पुष्करणी).' दुसऱ्या बाजूला फार दूर नाही, फार जवळ नाही अशी गोदावरी नदी वाहात आहे (अरण्यकांड सर्ग १५) या जनस्थानात गोदावरी तीर्थवती आहे; म्हणजे तिला पायउतार आहेत. (अरण्यकांड ६४/३) तसेच रावणाने सीतेचे हरण केल्यावर आश्रमात सीता नाही असे पाहून रामाने लक्ष्मणाला सीतेचा शोध घेण्यासाठी गोदावरी नदीवर पाठविले. त्या वेळचा श्लोक असा–

नदीं गोदावरीं रम्यां जगाम लघुविक्रमः
तां लक्ष्मण, तीर्थवतीं विचित्वा राममब्रवीत् ॥

गोदावरी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. म्हणजे हिन्दुस्थानच्या पूर्व समुद्राला मिळते. अर्थात पूर्वेला मुखाजवळ पात्र अत्यंत खोल, विशाल व रुंद आहे. पाण्याला फार ओढ आहे. म्हणजे पायउतार पूर्व बाजूला असण्याची सुतराम् शक्यता नाही. अर्थात श्रीराम पूर्व बाजूला गेलेलेच नाहीत. म्हणजे रामचंद्राची पर्णकुटी गोदावरीच्या उगमाजवळ हल्ली मान्य असलेल्या पंचवटीतच होती, पूर्वेकडे नाही. हे जनस्थान भारताचार्य वैद्य आपल्या एपिक इंडिया या पुस्तकात म्हणतात, भद्राचलकडे होते. म्हणजे गोदावरीच्या पूर्व मुखाकडे पूर्व समुद्राजवळ होते (एपीक इंडिया

पान ३०८); परंतु स्वतःच्याच 'रिडल् ऑफ दी रामायण' या पुस्तकात जनस्थान नाशकाजवळ आहे असे भारताचार्यांनीच स्पष्ट म्हटले आहे. (पान १०९ रिडल् ऑफ दी रामायण). भारताचार्यांनी परस्परविरोधी विधाने स्वतःच्या दोन पुस्तकात केली आहेत हे आश्चर्य आहे.

जनस्थान हा प्रांत तापी व गोदावरी नद्यांच्या पश्चिम खोऱ्यातील भाग होय. याची पश्चिम बाजू प्रस्रवण उर्फ माल्यवान उर्फ सह्याद्रीपर्वत व समुद्र यांच्या मध्ये असली पाहिजे. कारण रावण समुद्र ओलांडून वारंवार त्याचा सल्ला घेण्यासाठी येत असे. म्हणजे मारीच राक्षसाचा प्रदेश म्हणजे कल्याण ते शहापूर-पर्यंतचा भाग असलाच पाहिजे.

मारीच राक्षसाच्या मदतीने रावणाने रामलक्ष्मणांना वनात हुकालावण्या देत दूर नेल्यावर सीतेचे अपहरण केले. राम–लक्ष्मण मारीच राक्षसाला मारून परत आल्यावर त्यांनी सीता नाहीशी झालेली पाहून तिचा शोध वने, पर्वत, नद्या, सरोवरे, अशा सर्व बाजूंनी केला. तथापी ती त्यांच्या दृष्टीस पडली नाही. म्हणजे मारीच राक्षसाला गोदावरीच्या उत्तरेला पंचवटीच्या आसपासच्या भागातच रामाने मारले; त्यामुळे मारीच व रावण कोणत्या भागातून आले ह्याचा निश्चित अंदाज लागला नाही; तसेच सीता रावणानेच नेली हे जटायू सांगेपर्यंत कळले नाही. म्हणजे सीतेचा शोध समुद्रबाजूला त्यांनी केलाच नव्हता. वर सांगितलेल्या स्थळांत (अ. कां, ६१ स. २०) वने, पर्वत, नद्या, सरोवरे एवढेच आहे, समुद्र नाही किंवा समुद्र-किनाऱ्याचा उल्लेख नाही, ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

आता सीताहरणानंतर रामाला सीतेचा शोध करताना मरणोन्मुख जटायू आढळला. जटायूकडून लंकेचा राजा रावण याने सीतेचे अपहरण केले ही गोष्ट समजली; परंतु लंका कोठे आहे हे त्यास माहीत नव्हते किंवा त्यांने सांगितले नाही. जटायूची व्यवस्था लावल्यावर सीतेचा शोध लावण्याकरिता राम काही वेळ जनस्थानाच्या पश्चिमेस जाऊन नंतर दक्षिणेकडे वळला. तेथे त्यांना क्रौंचारण्य लागले. ते अरण्य जनस्थानापासून तीन कोसावर (नैऋत्य दिशेकडे) होते. त्यातून पार पाडून ते पूर्वेस गेले. तेव्हा त्यांना आणखी एक निबिडवन लागले. म्हणजे ते आता जनस्थानाच्या दक्षिणेकडे आले. त्या वनातून बाहेर पडल्यावर त्यांना एक भयंकर दरी लागली. ती दरी ओलांडल्यावर त्यांना एक महावन लागले व त्या महावनात कवंध राक्षस भेटला. (अरण्यकांड सर्ग ६९) हे महावन जनस्थानाच्या दक्षिणेला ८–१० मैलावर होते असे रामायण सांगते. हा कंबधराक्षस मतंग वनाच्या पूर्व सीमेवर भेटला. कबंधाने त्यांना पंपासरोवर व ऋष्यमुख पर्वत पश्चिमेकडे आहे असे स्पष्टपणे सांगितले.

एषः राम शिवा पन्था एवैते पुष्पिता द्रुमाः ।
प्रतीची दिशमाश्रित्य प्रकाशन्ते मनोरमाः ॥

Scanned with Ca

अशा तऱ्हेने पश्चिम दिशेकडे गेल्यावर काही वने व डोंगर ओलांडल्यावर तुम्ही पंपासरोवरावर याल असे कबंध त्यांना सांगतो. तो श्लोक असा

> चक्रमन्त वरान् शैलान् शैलात् शैलं वनाद्वनम् ॥ १० ॥
> ततः पुष्करणीं वीर पम्पां नाम गमिष्यामः ॥११॥ (अ. कांड सर्ग ७३)

या श्लोकावरून अनेक विद्वानांची दिशाभूल झालेली आहे. त्यांचा असा समज झाला आहे की श्रीराम 'शैलात् शैलं वनात् वनं' म्हणजे फारच दूर चालून गेले. परंतु रावण मारीच राक्षसाला भेटायला जेव्हा अनेक वेळा येतो तेव्हा देखील मोघम माहिती वाल्मिकी कवीने दिलेली आहे. त्यामुळे अभ्यासकांची भयंकर दिशाभूल होऊन लंका म्हणजे सीलोन बेट अशी समजूत झालेली आहे किंवा लंकेच्या स्थानाबद्दल अनेक तर्ककुतर्क बांधले गेले आहेत. तसाच प्रकार 'शंभर योजने' या शब्दप्रयोगाने झाला आहे. रामाने मारलेल्या बाणाने मारीच राक्षस शंभर योजने दूर समुद्रात जाऊन पडला. कवीने श्रीरामाच्या सामर्थ्याचे वर्णन करताना अशी अतिशयोक्ती व अद्‌भुत रसांचा परिपोष अनेक ठिकाणी केला आहे. भरतखंड व लंका यातील अंतर किंवा प्रत्यक्ष लंकेची लांबी-रुंदी वगैरे वर्णन करताना देखील हा शब्दप्रयोग वाल्मिकी कवीने योजला आहे. याचा अर्थही एवढाच कीं फार दूर अंतर, सत्यार्थाने नव्हे, प्रत्यक्ष मोजमापाच्या गणिती भाषेने नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे. 'शैलात् शैलं वनात् वनं' हे कबंधासारख्या रानात राहणाऱ्या राक्षसाने (रानटी आदिवासी) रामाला अनेक योजने दूरवर जाण्याच्या उद्देशाने सांगितलेले नाही. हल्लीच्या काळात सुद्धा आपल्याला आसपासच्या प्रांताची कितीशी माहिती असते? मग कबंधासारख्या त्या काळातल्या व्यक्तीला दूरवरची माहिती म्हणजे, पार, दक्षिण प्रदेश (म्हणजे, सीलोन, म्हैसूर, केंरळ, वगैरे) वगैरे कितपत माहीत असतील याचा अंदाज करता येईल. मतंगवन व पंपासरोवर, कबंध वनाजवळचीच असल्यामुळे त्याला (कबंधाला) रामाला नक्की दिशा व स्थाने सांगता आली. म्हैसूर किंवा त्याही दक्षिणेकडील प्रदेश त्याला माहीत असण्याची शक्यता वाटत नाही व तर्काला पटणारी नाही. मलयगिरी व ऋष्यमुख शिखरे पंपासरोवराजवळ सह्याद्रीच्या किंवा प्रस्रवणाच्या पूर्वेकडील डोंगरात होती. मतंगवन व मतंगाश्रम त्याच भागात होती. मतंगवनाची सीमा जनस्थानाच्या नैऋत्येकडे येऊन जनस्थानाच्या दक्षिण सीमेला भिडली होती हे पुढील श्लोकावरून स्पष्ट होईल. क्रौंचारण्य ओलांडल्यावर—

> ततः पूर्वेण तौ गत्वा त्रिकोशं भ्रातरौ तथा।
> क्रौंचारण्यमतिक्रम्य मतंगाश्रममन्तरे ॥ ३ । ६९ ॥ ८॥

म्हणजे मतंगवन प्रस्रवण पर्वतापासून जनस्थानाच्या दक्षिणेपर्यंत पसरले होते

Scanned with Car

व किष्किधा देश मतंगऋषींच्या आश्रमाजवळ होता. किष्किधेचा राजा वाली याने दुंदुभीला (रावणाच्या बायकोचा भाऊ) मारून त्याच्या रक्तमासाने भरलेले प्रेत मत्तंगवतात फेकून दिले होते. त्या कृत्यामुळे वालीचे व मतंगऋषीचे वैमनस्य उत्पन्न झाले होते. मतंगाच्या वनात पाऊल टाकण्यास वाली फार भीत होता. सुग्रीव हा वालीचा भाऊ अर्थात त्यालाही त्यापासून भीती वाटत होती; तसेच आपला भाऊ वाली याच्याशीही त्याचे वैर होते. म्हणून तो त्यालाही भीत असे. म्हणून सुग्रीव मतंगवन व किष्किधा यांच्या सीमेवर असलेल्या मलयगिरी व ऋष्यमूख शिखरावर वास्तव्य करून होता. या मलयगिरी पर्वतानेच विद्वानांची दिशाभूल केली व त्या सर्वांनी म्हैसूरमध्ये असलेल्या मलयगिरी पर्वताशी त्याची सांगड घालून किष्किधा देश पार दक्षिणेकडे नेऊन टाकला. जर दक्षिणेकडील मलयगिरी असता तर वाल्मिकीसारख्या महाकवीने त्यावरील चंदन वृक्षांचा उल्लेख कधीच टाळला नसता. परंतु तसा उल्लेख रामायणात नाही. अर्थातच लंका म्हणजे सिंहलद्वीप करून टाकले. परंतु हा मलयगिरी (सुग्रीवाचे वास्तव्याचा) मतंगाजवळचा आहे. मतंगवन क्रौंचारण्याला लागून आहे. पंपा सरोवराजवळ आहे. सुग्रीव राहात असलेली गुहा याच भागात आहे. नाशिकपासून दक्षिणेला १२ मैलावर वाडिवरे हे गाव आहे, तेथून पश्चिमेला मोडाळे व कुशेगाव आहे. त्या गावाजवळच कळसुक्याचा डोंगर आहे. त्या वरच्या सुळक्यात एक मोठी गुहा आहे. त्यात पाण्याचा वाहता साठा आहे. हे पाणी डांग्या खोकल्यावर उत्तम औषध म्हणून आजूबाजूचे पुष्कळ लोक वापरतात. मोडाळे व कुशेगांव यांतील अंतर तीन मैल आहे. या दोन गावांच्या मध्ये शिरसाटे गाव आहे. शिरसाटे व कुशेगाव यामध्ये एक तळे आहे. तेथील लोक त्याला आजही पंपासरोवर म्हणतात.

या वस्तुस्थितीला धरून किष्किधा देश त्रिंबकपासून वर उत्तरेला नाशिक आणि खानदेश यांच्या पश्चिम डोंगराळ भागात असला पाहिजे. धरमपूर, डांग, सुरगणा, हा सर्व भाग त्यामध्ये मोडतो. आजही त्या ठिकाणी आदीवासींचीच जास्त वस्ती आहे. सुग्रीवाचे व रामाचे सख्य झाल्यावर ते सप्तर्षिबन ओलांडून किष्किधा नगरीत जातात व सुग्रीवाचा वालीबरोबरच्या पहिल्या बाहूयुद्धात पराभव झाल्यावर ते ऋष्यमुख पर्वतावर परत येतात. नंतर खलबत करून लगेच पुन्हा किष्किधेत जातात. यावरून ही नगरी ऋष्यमुख शिखरापासून फार दूरवर नसावी. सुग्रीव रामाला आपल्या पहिल्या भेटीत रावणाच्या निवासस्थानाची माहिती नाही म्हणून सांगतो.

न जाने निलयं तस्य सर्वथा पापरक्षसः।
सामर्थ्यं विक्रमं वापि दौश्कुले यस्य वा कुलम् ॥४।७।२

सुग्रीवाला रावणाचे ठिकाण माहित नसावे हे नक्कीच. कारण पुढे अंगदादि वीरांना ते ठिकाण शोधून काढण्याचा एवढा खटाटोप करण्याचे कारणच पडले

नसते. सुग्रीवाने केलेले भौगोलिक वर्णन प्रक्षिप्त व बरेच काल्पनिक आहे. यावरून एक निष्कर्ष असाही निघतो की वाली व रावण यांच्या बाहुयुद्धाची व त्यांत रावणाच्या पराभवाची कथाही काल्पनिकच असावी. वाली व सुग्रीव यांच्या बाहूयुद्धात सुग्रीवाचा पराभव होतो व तो ऋष्यमुख शिखरावर परत येतो व लगेच सुग्रीव व श्रीराम संगनमत करून वालीबरोबर पुन्हा युद्ध करण्यास निघतात. या द्वंद्वयुद्धात रामाने बाण मारून वालीचा वध केला. म्हणजे किष्किंधा व ऋष्यमुख फार दूर नव्हते हे सिद्ध होते. शिवाय वालीवधानंतर वर्षाकालात चातुर्मासात माल्यवान (प्रस्रवण) पर्वताच्या ईशान्यमुखी गुहेत राम-लक्ष्मण राहतात. तेथून किष्किंधा नगरी जवळच आहे. एवढी की तेथील मृदंगादि वाद्यांचा गजर त्यांना ऐकू येतो.

इतश्च नातिदूरे सा किष्किंधा चित्रकानना ।
सुग्रीवस्य पुरी रम्या भविष्यति नृपात्मज ॥ २६ ॥
गीतवाद्यादि निर्घोषः श्रूयते जयतां वर ।
नर्दतां वानराणां च मृदुंगडंबरैः सह ॥ २७ ॥

(किष्किंधा कांड स. २७ श्लोक २३।२७)

श्रीराम लक्ष्मणाला म्हणतात " किष्किंधा येथून फार लांब नाही. किष्किंधेतून हा मृदंगादि वाद्यांचा ध्वनि ऐकू येत आहे."

यावरून मतंगवन, ऋष्यमुख, माल्यवान पर्वत व किष्किंधा ही अगदी एकमेकाजवळ होती हे सिद्ध होते; तेव्हा मतंगवन व म्हैसूरच्या जवळच्या किष्किंधेतील मृदंगाचा आवाज मतंगवनाजवळील माल्यवान, ऋष्यमुख, मलयगिरीवर श्रीरामांना ऐकू आला असे गृहीत धरणे, म्हणजे ती अद्‌भुत कथाच समजावी लागेल. तेव्हा म्हैसूर व तेथील मलयगिरीचा वर उल्लेखिलेल्या मलयगिरीशी काडीमात्र संबंध नाही. ऋष्यमुख, किष्किधा, मतंगवन ही नावे काळाच्या ओघात गेली, तसेच मलयगिरी हेही प्रस्रवणातील एका पर्वताचे (कळसुबाईजवळच्या) नाव काळाच्या ओघांत गेले. ऋष्यमुख शिखराला जर जवळच्या कुशेगावचे नाव मिळून त्याचे कळसुबाई झाले तसे मलयगिरीचे झाले असले पाहिजे. म्हणूनच दक्षिणेतील मलयगिरीच्या वाऱ्याने उत्तर कोकणांतील लंका एकदम सीलोनमध्ये उडवली.

कालसंगतीप्रमाणे विचार करता जनस्थानात श्रीराम आले, त्यावेळी हेमंत ऋतु असला पाहिजे. कारण लक्ष्मणाच्या तोंडी ऋतुचे वर्णन वाल्मिकीने आश्रमाची सर्व व्यवस्था लावल्यावर घातले आहे. तेथे वास्तव्य केल्यावर खर, दूषण इत्यादि राक्षसांचा रामाने नाश केला. शूर्पणखेचे नाक-कान कापले; नतर शूर्पणखेने रावणाला जाऊन चेतविले, तेव्हा रावण मारीचाला घेऊन सीताहरण करण्यास आला. रामाने मारीचाला मारले एवढ्यात रावणाने सीताहरण केले. नंतर रामलक्ष्मण सीताशोधास

निघाले व मतंगऋषींच्या आश्रमात आले; तेव्हा वसंतऋतुला आरंभ झाला होता. म्हणजे या घडामोडींना सुमारे तीन महिन्याचा काळ लागला. जर लंका सिंहलद्वीपात मानली तर किष्किंधा म्हैसूरमध्ये येते. मतंगवन तिकडेच येईल किंवा मानावे लागेल. म्हणजे जनस्थानात आल्यापासून सर्व घडामोडी घडणे व अनेक निबीड अरण्ये आणि मोठमोठे पहाड व डोंगर एवढे मोठे अंतर ओलांडून जाणे याला एवढ्या तीन महिन्यांचा काल पुरणे शक्य नाही. म्हणजेच मतंगवन, किष्किंधा, वगैरे सर्व म्हैसुरच्या खाली किंवा मध्येदेखील असणेच शक्य नव्हे व म्हैसूरमधील मलयगिरी म्हणजे रामायणातील मलयगिरी नव्हेच. तसेच हल्लीचे सिंहलद्वीप म्हणजे लंका नव्हे. मतंगवन जनस्थानाला भिडलेले होते असे रामायणच सांगते; मग किष्किंधा म्हैसूरजवळील निलगिरी–मलयगिरी जवळ येणारच कशी ? हे वाचकांनीच ठरवावे. तेव्हा रावणाची लंका सीलोन नव्हे. श्रीराम वसंतऋतूत मतंगवनात आल्यावर ऋष्यमुख पर्वतावर सुग्रीवाची रामाशी मैत्री झाली व वालीचा वध ग्रीष्माच्या अंती झाला. (मे महिन्यापर्यंत किंवा पावसापूर्वी).

वालीवधानंतर वर्षाकाळात चातुर्मासात रामलक्ष्मण माल्यवान पर्वताच्या ईशान्यमुखी गुहेत राहतात. तेथून किष्किंधा नगरातील मृदंगघोष ऐकतात हे अगोदर वर्णन केलेलेच आहे. म्हणजे माल्यवान पर्वत किष्किंधा, मतंगवन, ऋष्यमुख (कळसूबाई) हे सर्व जवळजवळच आहेत. पावसाळा संपल्यानंतर आश्विन महिन्यानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे कार्तिक महिन्याच्या सुरवातीला अंगद, मारुति, वगैरे वानरवीर सीताशोधासाठी निघतात.

(किष्किंधाकांड सर्ग ५३ श्लोक ४।५) किष्किंधेहून अंगद व वानरवीर निघाले ते दक्षिणेचा प्रत्येक नद, नदी, पर्वतग्राम, नगर पहात चालले. या वर्णनात समुद्र किंवा समुद्रकाठचा उल्लेख नाही. म्हणजे किष्किंधेच्या दक्षिणेकडील सह्य पर्वतात व त्याच्या पूर्वेकडील भागात शोध करून त्यांना लंकेचा पत्ता लागला नाही. दक्षिणेकडे ते कुठपर्यंत गेले त्याचा रामायणात उल्लेख नाही; परंतु ती मर्यादा काळावरून ठरवता येईल. त्यांना एक महिन्यात शोध करून सुग्रीवाला शोधाअन्तीची हकीगत निवेदन करण्याची सक्त ताकीद होती. हे लोक पायीच निबीड अरण्यातून चालले होते. परंतु त्यांना रावणाचा पत्ता दक्षिणेकडे लागला नाही. तेव्हा ते विंध्य पर्वताच्या शाखा शोधून काढू लागले म्हणजे ते दक्षिणेला फार दूरवर गेले नाहीत.

जेव्हा मेरु सावर्णीची मुलगी स्वयंप्रभा हिने वानरांना विंध्याच्या भुयारातून बाहेर आणले, तेव्हा वसंत ऋतुला नुकतीच सुरवात झाली होती. अंगद मोठ्या दुःखाने म्हणतो, 'अरे, आम्ही आश्विन महिन्यानंतर थोड्याच दिवसांनी निघालो आणि एक महिन्याचा वायदा केला. आता तर वसंताची चिन्हे दिसत आहेत. भुयारात किती दिवस गेले याचे आपल्याला भान राहिलेले नाही.' (कि. कांड, सर्ग ५३ श्लोक ४।५।९) म्हणजे दक्षिणेकडून विंध्यपर्वताकडे येण्याच्या वेळेस त्यांना प्रवासाचा

अंदाज होता; परंतु विंध्याच्या अनेक शाखा शोधण्यात व खोल शेवटच्या दरीत शिरल्यावर त्यांना काळाचा अदमास ठेवता आलेला नाही. यावरून महत्वाची गोष्ट ठरते, की या नद्या व त्यातील अरण्ये अतिशय निबीड व प्रवासाला फारच अवघड असली पाहिजेत. कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन इतका पाच महिन्यांचा काळ मध्यंतरी गेला. मेरु सावर्णीची मुलगी स्वयंप्रभा हिने वानरांना भुयारातून वरती विंध्याच्या शिखरावर आणल्यावर डोळे उघडण्यास सांगितले व म्हणाली, 'हा पहा विंध्य पर्वत. या बाजूला प्रस्रवण (दक्षिणेला) आणि हा तुमच्यासमोर समुद्र दिसत आहे (पश्चिमेकडे)' ते वानर विंध्य पर्वताच्या टेकडीवर बसून पाहू लागले तो त्यांना उंच उंच लाटांनी गर्जना करणारा समुद्र दिसला.

स्वयंप्रभा ही हेमा अप्सरेची सखी होती. हेमा अप्सरेला मयासुराने पळवून आणली होती व तिच्यासह तो विंध्य पर्वताच्या या भागात राहात होता. मयासुराला हेमा अप्सरेपासून दुंदुभि व मायावी असे दोन मुलगे व मंदोदरी नावाची मुलगी झाली होती; हीच मंदोदरी रावणाची पट्टराणी होती. दुंदुभि व मायावी या दोन बंधुचे वालीबरोबर द्वंद्वयुद्ध होऊन वालीने त्या दोघांनाही ठार मारले होते. या सर्व घटनांचा अर्थ हाच की रावण, मयासुर आणि वाली यांची राज्ये व राहण्याची ठिकाणे जवळजवळ होती. मतंगऋषींचे वन, पंपासरोवर, माल्यवान पर्वतातील ऋष्यमुख आणि मलयगिरीची शिखरे व त्यांच्याच शेजारी किष्किधा प्रदेश व नगरी असली पाहिजे. हा प्रदेश म्हणजे नाशिक व खानदेश यांच्या पश्चिमभागातील दादरा-नगर हवेली, सुरगणा हा प्रदेश असावा. वानरवीर स्वयंप्रभेकडून विंध्याच्या टेकाडावर आणून सोडेपर्यंत पाच महिने गेलेले असतात. म्हणजे राम सुग्रीवस्थानात आल्यापासून वर्ष पूर्ण झालेले असते. विंध्य पर्वतावर जवळच संपाति हा वयोवृद्ध मनुष्य राहात असतो. त्याच्या मुलाने 'रावणाने सीतेला नेताना महेंद्र पर्वताच्या खिंडीत अडवले' असे तो संपातीला सांगत असतो. (कि. कां. सर्ग ५९ श्लोक ११।१२।१३) 'सागरासमीप संचार करणाऱ्या हजारो प्राण्यांचा मार्ग रोखण्याचा निश्चय करून मी एकटाच अधोमुख होऊन बसलो होतो.' ही त्याच्या तोंडची वाक्ये आहेत. यावरून महेंद्रपर्वत याच उत्तर कोकणांच्या अपरांत प्रांतात असला पाहिजे व त्याच मार्गाने शुर्पारकातून लंकेत जाण्याचा मार्ग असला पाहिजे. हल्ली सुद्धा नाशकाकडून उत्तर ठाणे प्रांतात जाण्याचा रस्ता धरमपूर मार्गाने आहे. त्रिंबककडून मोखाडयाला जाण्याला कठीण अशी पायवाट आहे; परंतु तो मार्ग नेहमीच्या वहिवाटीचा नाही असे तेथील लोक सांगतात.

संपातीने दिलेल्या माहितीनुसार वसंत ऋतुंत, हनुमान महेंद्र पर्वतावरूनच पोहून लंकेत गेला व अशोक वनात सीतेला भेटला. सीतेच्या बोलण्यावरून त्याला कळले की रावणाने सीतेला वश होण्यास बारा महिन्यांची मुदत दिली आहे व त्यातील आता दोनच महिने राहिले आहेत. या दोन महिन्यांत ती वश झाली नाही

तर तो तिला मारून तिचे काळीज खाऊन टाकणार होता. म्हणजे ग्रीष्म ऋतूत तिचा अंत होणार होता. राम-रावण युद्ध या दोन महिन्यांत होऊन राम सीतेला घेऊन परत अयोध्येला वर्षाकाळापूर्वी निघून गेला.

एकंदर जनस्थानात आल्यापासून अयोध्येला राम निघेपर्यंतचा काळ सुमारे १८ म.हिन्याचा आहे. शेवटचा दीड महिना किष्किंधेत सैन्याची जमवाजमव, लंकेवरची स्वारी, तेथील भयानक युद्ध, बिभीषणाचा राज्याभिषेक, वगैरे गोष्टीला लागला. हा सर्व काळाचा हिशेब जर जनस्थान, मतंगवन, किष्किंधा, महेंद्रपर्वत, लंका ही सर्व उत्तर कोकणात आहेत असे धरले तरच लागतो. लंका ही ऑस्ट्रेलिया, सिलोन, किंवा अमरकंटक पर्वत वगैरे ठिकाणी मानून कधीच लागणार नाही.

आर्यांनी भारतात कसा कसा विस्तार केला हेही पाहिले पाहिजे. आर्यांनी भारतात प्रवेश केल्यावर प्रथम पंजाबमध्ये वसाहत करून ते क्रमाक्रमाने पूर्व भागाकडे सरकत गेले व अयोध्या प्रांतापर्यंत विस्तार केला. बिहार, बंगाल ही म्लेंच्छ वस्ती होती. ओरिसांत निबीड अरण्ये होती. तेथे विस्ताराला सुरवात नुकतीच करीत होते. पश्चिमेकडे मात्र विस्तार होऊन ते पश्चिम किनाऱ्याने जंगले साफ करून दक्षिणेकडे सरकू लागले होते. अगस्ती, जमदग्नी, मतंग वगैरे ऋषीमुनींनी त्या बाजूला आश्रम स्थापले होते. नर्मदेपर्यंतच्या भागापर्यंत वसाहत झाली होती. रामायणकाळी त्या वेळच्वा भारताची मर्यादा नर्मदा नदी व विंध्याचे नैऋत्य दिशेच्या टोकापर्यंत होती. श्रीरामांनी नर्मदा ओलांडून गोदावरीपर्यंतचा भाग आपल्या पराक्रमाने निर्धास्त केला. त्यापूर्वी परशुरामाने त्या वेळच्या भरतखंडातील सर्व क्षत्रियांचा नायनाट करून व पृथ्वी जिंकून कश्यपाला दान करून टाकल्यावर कश्यपाने परशुरामाला अशी आज्ञा केली होती की त्याने भरतखंडात येऊ नये व परान्त प्रांतातच महेन्द्र पर्वतावर राहावे. संपातीच्या मुलाने पित्याला सांगितलेला, व स्वतः तेथे बसून राहिला होता, तेव्हा रावणाला सीता घेऊन जाताना आडवले, तोच महेंद्र पर्वत होय. म्हणजे तो विंध्यच्या शेवटच्या दक्षिण भागातीलच होय. याचा अर्थ त्या काळचा भरतखंड नर्मदेच्या उत्तरेपर्यंतचा होता. परशुरामाने महेन्द्र पर्वतावरून क्रमाक्रमाने पश्चिम किनाऱ्याला निर्माण केलेला परान्त व अपरान्त ह्या प्रांतातच होते. याच महेन्द्र पर्वतावरून पोहून मारुती साष्टी बेटास गेला व तेथे त्याला सीता अशोक वनात भेटली. रावणही येथून लंकेस गेला. यावरून गोदावरीच्या खालचा दक्षिणभाग व परान्त व अपरान्त देखील आर्यांच्या परिचयाचा नव्हता. भौगोलिक दृष्टया आर्य क्रमाक्रमाने आपल्या वसाहतीचा विस्तार दक्षिणेत करीत गेले असले पाहिजेत. एकदम विंध्य सोडून थेट सिलोनला विस्तारासाठी जाणे व ते देखील रामाच्या दक्षिणेतील फक्त १८ महिन्यांच्या वास्तव्यात, हे हास्यास्पद वाटते. म्हणजे सीलोन ही रावणाची लंका नव्हेच, ऑस्ट्रेलिया त्याहूनही नव्हे व डॉ. सांकलीया वगैरेंच्या मते असलेली विंध्यातील

अमर–कंटक ही तर नव्हेच नव्हे. रामायणातील सर्व नद्यांचा उल्लेख वर वर्णन केलेल्या प्रदेशातील आहे व त्या नद्या आजही त्याच नावाने ओळखल्या जातात. जर दक्षिणेकडे किष्किंधा असती व सिंहलद्वीप ही रावणाची लंका असती, तर रामाला दक्षिणेकडील नद्या ओलांडाव्या लागल्या असत्या व त्यांची नांवे वाल्मिकीने निश्चित सांगितली असती; परंतु दक्षिणेतील कावेरी, कृष्णा, घटप्रभा अशा कितीतरी नद्या असूनही एकीचाही उल्लेख रामायणात नाही, याचा अर्थ असा की श्रीराम दक्षिणेकडे कधीच गेले नव्हते. रामरावण युद्ध सीलोनमध्ये घडले नाही व मारुतीने कन्याकुमारी ते सिलोन सेतू बांधला नाही. त्या काळातील लोकांना दक्षिण प्रदेशच माहीत नव्हता. अर्थात साष्टी बेट हीच लंका असली पाहिजे या अनुमानाला दुजोरा मिळतो. अन्य बेट असण्याची शक्यताच नाही.

रामायणाच्या अगोदर लिहिलेला दुसरा महाकाव्य ग्रंथ म्हणजे महाभारत. महाभारत घडले रामायणकालानंतर, परंतु लिहिले गेले रामायणाअगोदर. महाभारतातील राजसूय यज्ञात सिंहल राजा हजर होता असे म्हटले आहे.

'द्राविडा: सिंहलाश्‍चैव राजा काश्मीरकस्तथा ।। 'महा.भा २।३७।१५ म्हणजे रामायणानंतर घडलेल्या महाभारतकाळात सिंहलद्वीप निरनिराळे आहे हेही माहीत झालेले होते. एवढेच नव्हे तर लंका व सिंहलद्वीप निरनिराळे आहे हेही माहीत होते. कारण राजसूय यज्ञाचे वेळी वाढण्याची कामे कोणकोणत्या अधिपतींनी केली त्यांची श्रीकृष्णाने नामावली दिली आहे.

'सिंहलान्, बर्बरान् म्लेंच्छान् ये च लंकानिवासिन: ।।' महाभा. २।४८।२३ म्हणजे महाभारतकाळी सिंहलद्वीप निरनिराळे व लंका निराळी आहे हे ज्ञान व्यासांना होते, हे निश्चित. 'ये' हा शब्द लंकानिवासीन्‌कडे लावून चालणार नाही; कारण पुढेच म्हणजे लंकानिवासिन: असे स्पष्ट आहे. अर्थात महाभारत-काळापर्यंत सिंहलद्वीप माहीत झाले असावे. परंतु लंका ही त्यावेळी स्वतंत्र अस्तित्वात होती, हेच महाभारत दाखवते व हे सिद्ध करते की सिलोन सिंहलद्वीप ही रावणाची लंका नव्हे. हे स्पष्ट ज्ञान इ. स. ५०० शतकापर्यंत भारतीय जनतेला होते. कारण पाचव्या शतकांतील वराहमिहिराने आपल्या बृहत्संहितेत लंका व सिंहल असे दोन निरनिराळे देश दक्षिणेत आहेत म्हणून सांगितलेले आहे.

अथ दक्षिणेन लंका कालाजिन सौरिकीर्णतालिकटा: ।
गिरि नगर, मत्स्य, दर्दर, मालिंदा भारुकच्छा: ।। १२ ।।

नंतरच्या आर्येत–

तुंबवन, कार्मणेयक, याम्योदधि तापसाश्रमा ऋषिका: ।।
कांची, मरुती पत्तन चार्यार्यक सिंहला ऋषभा: ।। १६ ।।

म्हणजे रामायणकाळी लंका माहीत होती; परंतु सिंहलद्वीप माहीत नव्हते. रामायणात दक्षिण समुद्र असा उल्लेख अनेक वेळा आलेला आहे. परंतु तो अरबी समुद्रच आहे. कारण सुर व असूर यांचे भांडण होऊन सुर वायव्य, पश्चिम दिशेकडून भरत खंडात शिरले ही गोष्ट जगत्मान्य आहे. म्हणजे आर्यांचा प्रवेश भरतखंडात झाला त्यावेळी समुद्र दक्षिणेला आहे असाच त्यांचा समज होता व सिंधू नदीचे काठाने दक्षिणेकडे गेल्यावर सौवर प्रांतात म्हणजे हल्लीच्या सिंध प्रांतात समुद्राच्याच बाजूला प्रथम दिसला व अर्थातच तो अरबीसमुद्र होय. हिंदुस्थानच्या दक्षिण टोकाजवळील हिंदी महासागर आहे. रामायणकालापर्यंत आर्यलोक गोदावरीच्या दक्षिणेला वस्ती करण्यास गेले नव्हते हे नक्की. परशुरामाने परान्त व अपरान्त निर्माण केला परंतु तो स्वतः नंतर पुन्हा महेंद्रपर्वतावर पश्चिम किनाऱ्यावरील परान्ताच्या टोकाला जाऊन राहिला. परंतु आर्य वसाहती झाल्या नव्हत्या. तूरळक आश्रम आले असतील किंवा काही व्यक्ती आल्या असल्यास मिश्रित होऊन गेल्या असतील. उदा. रावण स्वतःच आहे. त्याचा पिता विश्रवऋषी आहे व आई कैकसी राक्षसी आहे. म्हणजेच वसाहती मोठ्या झाल्या नव्हत्या. कृष्णा-कावेरी या दक्षिणेतील नद्यांचा उल्लेख रामायणात नाही. म्हणजेच दक्षिण दिशेच्या भौगोलीक भागाची माहिती त्यांना झालेलीच नव्हती. अर्थात दक्षिण समुद्र म्हणजे पश्चिम समुद्रच या नावाने त्यांना परिचित होता. तसेच रामेश्वर तीर्थाचा उल्लेख रामायणात किंवा महाभारतात कोठेच नाही. (भारताचार्य वैद्य, एपिक इंडिया पान ३००) तेव्हा ते रामाने बांधले हे निखालस खोटे आहे. रामचंद्राने समुद्रावरून जाण्यासाठी शंकराची आराधना केली; असेही रामायणात सांगितलेले नाही. फक्त तीन दिवस तृणावर पडून व्रत केले, एवढेच रामायण सांगते. (युद्धकांड-२१ सर्ग) अर्थात रामेश्वर हे रामाने निर्माण केलेले नव्हे, एवढेच नव्हे, श्रीरामचन्द्र येथपर्यंत आलेच नव्हते. रामेश्वर सीलोन बेटाचा शोध लागल्यावर शैवपंथी लोकांनी स्थापन केले असावे. सिंहलद्वीप उर्फ सिलोन भारतातील जनतेला केव्हा अवगत झाले हाही वादग्रस्त प्रश्न आहे. परंतु एवढे मात्र खरे की सीलोन माहित झाल्यावर रावणाची खरी लंका जे साष्टी बेट त्याचा लोकांना व विद्वानांना सुद्धा विसर पडला. दक्षिण समुद्रातील सीलोन ही लंका होऊन बसली.

◻ ◻ ◻

Scanned with Car

: ३ :

सातवाहनकालातील अपूर्वाई

(इ. स. पू. २२० ते इ. स. २४०)

भारताच्याच नव्हे तर जगाच्या राजकीय आणि सांस्कृतिक नकाशावर पहिल्या वहिल्याने महाराष्ट्राला आणि अपरान्तातील शूर्पारक व कल्याणला झळकविण्याची महान् कामगिरी सातवाहन ब्राह्मण राजघराण्याने बजाविली आणि सुमारे पाच शतके सातवाहनांच्या ध्वजाखाली गोळा झालेल्या मराठी माणसांनी भारताच्या इतिहासपटावर आपल्या व्यक्तित्वाचा ठसा उमटता ठेवला. आतापर्यंत जगाच्या इतिहासात सुमारे १००० वर्षेपर्यंत टिकलेल्या रोमन साम्राज्याखेरीज इतक्या प्रदीर्घ काळपर्यंत टिकलेले एकही सामग्रज्य नाही, आणि भारताच्या इतिहासात तर सातवाहन मराठी ब्राह्मणांचे साम्राज्यच इतक्या प्रदीर्घ काळपर्यंत राज्य करू शकले. एवढेच नव्हे तर जगाच्या इतिहासाने त्यांच्यावर कितीही अनुल्लेखाचा अन्याय केला तरी या राजघराण्याएवढी मोठी सुमारे चाळीस राजांची श्रेयनामावली इतिहासाला कधीही टाळता आली नाही व येणार नाही. त्याचप्रमाणे त्यांनी वैदिक कालापासून भारतातील सत्तेचा उत्तरेकडे असलेला केंद्रबिंदू आपल्या कर्तृत्वाने दक्षिणेकडे महाराष्ट्रात आणून त्याची स्थापना प्रतिष्ठान ऊर्फ पैठण येथे केली. ही देखील सातवाहन कुलाने केलेली कामगिरी अलौकीकच म्हटली पाहिजे व मराठी माणसाला, पर्यायाने महाराष्ट्राला, अत्यंत श्रेष्ठ पदाला पोहोचवले, याबद्दल महाराष्ट्राला सदैव अभिमान वाटला पाहिजे. परशुराम कोकणचा निर्माता असेल तर आज ज्ञात असलेल्या महाराष्ट्राचा निर्माता म्हणून सातवाहन कुलाचाच निर्देश करावा लागेल. मोगल काळांत परकीयांच्या गुलामगिरीतून महाराष्ट्राला मुक्त करणारे म्हणून आम्ही शिवछत्रपतींचा अभिमानाने गौरव करतो. परंतु त्याही आधी १८०० वर्षे इ. स. पूर्व काळापासून महाराष्ट्राला शक, यवन, ग्रीक इत्यादि परकीय राज्यकर्त्यांच्या आक्रमणापासून मुक्त करून सुमारे ५०० वर्षे प्रदीर्घ स्वातंत्र्य मिळवून देण्याची पहिली कामगिरी सातवाहन कुलाने केली आहे, त्याचाही आम्हाला जबरदस्त अभिमान वाटला पाहिजे. मराठी मनाची पहिली जडणघडण सातवाहन युगातच आकाराला आली. सातवाहन युग म्हणजे महाराष्ट्राच्या जीवनातील पहिली मंगल प्रभात. तेजाला अंकुर फुटून दाही दिशा धवल व्हाव्या त्याप्रमाणे गोदा, वैनगंगा आणि कृष्णा यांच्या काठी उमलू पाहणाऱ्या मराठी नवीन पुष्पाला तजेलता,

Scanned with Car

टवटवी, नव्हाळी प्राप्त झाली ती याच सातवाहन कालात. येथील युवक-युवतींच्या पदन्यासात मूळच्याच असलेल्या ठेक्याला विदग्ध संस्कारांची जोड मिळाली ती सातयुगांत. कोंडाणे लेण्यांतील नृत्यात रमलेल्या युगुलांचे शिल्प पहा, त्याचा प्रत्यय येईल. डोंगर खडकात रेखाचित्रे कोरण्याचा हव्यास दक्षिणापथाला जुनाच. पण त्या रेखांना घनता आणि आकार यांचा उठाव मिळाला, तो सातवाहन युगांत. भाजे, कोंडाणे, बेडसे, कार्ले, पितळखोरे, अजिंठा, जुन्नर आणि नाशिक येथील शिलागृहे पहा, याची खात्री पटेल. अशोकाच्या लोभस लेण्यांतील किरकोळ कमान, कोंडाणे भाजे, कार्ले, पितळखोरे आणि अजिंठा येथे येऊन डौलदार झाली. मेणावर किंवा सोन्यावरही होणार नाही एवढे नाजुक साजुक काम येथील शिल्पज्ञांनी घडवले ते याच सातवाहन युगात.

निसर्गातील ताल-सुरांना साद देणाऱ्या येथील मानवाच्या प्राचीन छंदाला काव्याचा दर्जा मिळाला याच सातवाहन युगात. गोदा व तापी यांच्या परिसरातील महारठी युवक-युवतींच्या प्रणयातील विविध अंकी छटा, त्यांची हसरी, दुखरी, सफल, विफल भावनोत्कटता, काव्याच्या उत्स्फूर्त ओळींनी प्रगट झाली तीही या सातवाहन युगातच. ' गाहा सत्तसई ' हे महाराष्ट्री भाषेतील महाराष्ट्राचे आदिकाव्य. या आदिकाव्याचे अंगभूत सामर्थ्य एवढे की संस्कृत पंडितांनीही काव्य प्रांतातील हा अद्भुत प्रतिभाविलास पाहून हृचा महाराष्ट्राच्या प्राकृत काव्याकडे कौतुकाने बोट दाखवावे.

हैहय, ऋथ, कौशिक, भोज, अंधक-वृष्णी, राष्ट्रीक व महाराष्ट्रीक या आर्य जमाती आणि भिल्ल, कातकरी, पुलींद व निषाध हे दख्खनचे ताम्र पाषाणयुगातील रहिवासी यांच्यात व नंतर शक, यवन, पहलव यांच्यासारखे परकीय, यात सामाजिक व सांस्कृतिक अभिसरणाची क्रिया घडून आली ती सातवाहन युगातच. या युगाचे कर्तृत्व काही वेगळेच ! इतिहासाला ज्ञात असलेल्या भारताचे सम्राटपण संपादन करणारा दख्खनचा पहिला राजवंश सातवाहनांचाच. पुराणकार आणि संस्कृत पंडित यांनी कितीही अनुल्लेखाने हा इतिहास मारण्याचा प्रयत्न केला असला तरी प्राचीन राजघराण्यांच्या वंशावळी देताना सर्वात जास्त ओळी सातवाहनांसाठीच त्यांना खर्च कराव्या लागल्या. पुराणात वर्णन आलेल्या राजघराण्यांपैकी ज्यांच्या संबंधी सर्वात जास्त मुद्रा, शिलालेख इत्यादि साधने उपलब्ध आहेत, ते सातवाहत घराणेच. पिढ्यामागून कित्येक पिढ्या, एकाहून एक अधिक कर्तृत्ववान राजपुरुष निर्माण करणारा इतिहासातील एकमेव राजवंश सातवाहनांचाच. राज्यकर्ते, राज्यविस्तार व राज्यकाल, या बाबतींत सातवाहनापेक्षा वरचढ ठरेल असा एकही राजवंश भारताच्या इतिहासात नाही.

महाराष्ट्राला आणि दक्षिणापथाला राजकीय दृष्ट्या संघटित करण्याचे कार्य सर्वप्रथम केले ते सातवाहन कुलानेच. परकीयांचे राजकीय उच्चाटन करून

Scanned with Ca

भारतीय जीवनाच्या व्यापक प्रवाहात सामावून घेण्याची कामगिरी प्रभावीपणाने केली ती फक्त सातवाहन कुलानेच. एकीकडे यज्ञसंस्कृती व चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करीत असता, धार्मिक सहिष्णुतेचा बाणा दाखवला तो सातवाहन राजांनीच. धेनुकाकट व यवनांची कार्ले लेण्यातील दाने या बाबत अजूनही साक्ष देत आहेत.

भारतातील केंद्रसत्ता प्रभावी असेतोपर्यंत तिच्याशी एकनिष्ठ राहावयाचे व ती कमकुवत होताच दख्खनचा व महाराष्ट्राचा कारभार स्वतंत्रपणे चालवायचा ही महाराष्ट्रीय राजकारणाची लकब पहिल्या प्रथम इतिहासाला दिसली ती सातवाहन युगात. महाराष्ट्राला इतिहासाच्या उंबरठ्यावर उभे केले ते सातवाहनकालीन पिढ्यांनी, आणि कल्याण बंदराला देखील हिंदुस्थानचे प्रवेशद्वार केले तेही सातवाहनांनीच. पाश्चात्य संपत्तीचा महापूर भारतामध्ये आणला तो कल्याणच्या प्रवेशदारातून आणि सबंध भारतातील मालाची निर्यातीची बाजारपेठ केली तीही सातवाहन कुलानेच. त्याअगोदर परशुराम, अगस्ती आणि गौतम या आर्यांनी या भागात प्रवेश केलेला होता. त्यांनी या ठिकाणी वसाहती केलेल्याच होत्या. त्यांचा मागोवा घेत भोज, राष्ट्रीक, महाराष्ट्रीक, अंधवृष्णी या आर्य जमातींनी वैनगंगा, गोदा, कृष्णा यांच्या काठी वसाहती केलेल्या होत्या; याचे अनेक उल्लेख पुराणात आहेत. ख्रिस्तपूर्व ६० व्या शतकापर्यंत दक्षिणापथात उतरलेल्या या जमातीचे जीवन स्थिर नव्हते. पशुपालन, मृगया आणि कंदमूलफलसंग्रह हीच या आर्य जमातींच्या उदरनिर्वाहाची साधने होती. ख्रि. पूर्व सहावे शतक उजाडले आणि मानवी कर्तृत्वाची नवी क्षितिजे फडकू लागली. लोखंड आले आणि दक्षिणा पथातील अरण्ये धडाधड् कोसळू लागली. त्या अरण्यातील काळ्या जमिनीत अन्नधान्याचे बी पडू लागले. नांगराला बैल जुंपला गेला. दख्खनच्या माणसाने आपल्या पायाला लागलेली भिंगरी भिरकावून दिली आणि गावे व नगरे वसू लागली. पैठण, कोल्हापूर, तेर, नेवासे, भोगवर्धन, सोपारा, कल्याण, नासिक, कऱ्हाड, वैजयंती, कौंडीण्यपूर, भोजकर ही मराठमोळी शहरे दख्खनच्या नकाशावर वैभवाने चमकू लागली. उत्तरापथातून दक्षिणापथात आवकजावक मोठ्या प्रमाणात सुरू झाली. दोन कारणासाठी.

पश्चिम किनाऱ्यावरील भडोच, कल्याण, सोपारा ही प्राचीन काळातील आंतरराष्ट्रीय बंदरे. प्राचीन भारताचा बावेरू व इजिप्त या देशांशी व पुढील काळात युरोपातील रोमन साम्राज्याशी जो व्यापार चालत होता तो या बंदरातून. उत्तर व पूर्व भारताला दक्षिणापथाचे आकर्षण असायचे ते यासाठीच. त्याचप्रमाणे सोने, हिरे आदि खनिज पदार्थांची उत्तर भारतात आयात व्हायची त्याच दक्षिणापथातून. सातवाहनपूर्व मौर्यांच्या काळात देखील जागतिक बाजारपेठांशी दळणवळण ठेवणारी बंदरे देशी व परदेशी व्यापारांनी गजबजू लागली होती. इ. स.

सातवाहनपूर्व कालापासून प्रसिद्ध वाहतुकीचा मार्ग नाणेघाट

पूर्व सहाव्या शतकात सोपाऱ्याहून बावेरू म्हणजे बॅबिलोन येथे होणाऱ्या सामुद्रिक व्यापाराचा उल्लेख बौद्ध वाङ्मयात आहे. अरब, कॉर्थेजिअन आणि इजिप्त देशांमधील यवन व्यापारी मौर्य काळातच समुद्रमार्गे भारताच्या पश्चिम-किनाऱ्यावरील बंदरातून (भडोच, सोपारा, कल्याण) भारताशी व्यापारी दळणवळण करू लागले होते. कल्याण, सोपारा, भडोच या बंदरांतून हे दळणवळण मुख्यतः इजिप्त आणि मध्यपूर्वेकडील सेल्युकिड साम्राज्याशी असायचे. इजिप्तशी व्यापार चालायचा तो अरबस्तानच्या किनाऱ्याने आणि मध्यपूर्वेशी इराणच्या आखातातून. पश्चिम भारतातून म्हणजेच कल्याण, सोपारा, भडोच या बंदरातून इजिप्तला जाणारा माल म्हटला म्हणजे हस्तिदंत, शंख, शिंपले, मोती, रंग, लोखंड आणि लाकूड होय. याशिवाय सुती व मलमली कापडांनी जागतिक बाजारपेठेत महत्वाचे स्थान प्राप्त केले होते. सातवाहन कालाच्या सुरवातीलाच तांबड्या समुद्रातील नौकानयन विद्येत एक महत्वाचा शोध लागला व त्यामुळे कल्याण–सोपारा–भडोच या पश्चिम भारताच्या बंदरांचा पाश्चात्य जगाशी चाललेल्या व्यापारी संबंधात क्रांतिकारक परिवर्तन घडून आले. इजिप्त देशातील ग्रीक तांडेलांनी तांबड्या समु-

द्रावून भारताकडे जाण्यासाठी मोसमी वाऱ्यांचा उपयोग शोधून काढला. आतापर्यंत इजिप्तमधील व्यापारी दक्षिण अरबस्थानच्या किनाऱ्या-किनाऱ्यांनी कल्याण, सोपारा, भडोच येथे येत. परंतु मोसमी वाऱ्यांच्या दिशेचा उपयोग नौकानयनाला होऊ लागताच या जहाजांचे समुद्रातून कापायचे अंतरही कमी झाले व किनाऱ्यावरील चाच्यांचे उपद्रवही कमी झाले. या शोधामुळे पश्चिम भारताच्या व विशेषत: कल्याण, सोपारा, भडोच या व इतर व्यापारी शहरांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर फार अनुकूल परिणाम झाले. इजिप्तमधील यवन व्यापाऱ्यांच्या वसाहती कल्याण, सोपारा, भडोच व इतर पश्चिम भारतातील प्रमुख शहरे या ठिकाणी निर्माण झाल्या व थोड्याच अवधीत भारतीय भाषा, धर्म आणि चालीरीति आत्मसात केल्या. धेनुकाकट येथील यवन व्यापाऱ्यांनी कार्ले लेण्यात बौद्ध संघाला दिलेली दाने हा याचा पुरावा आहे. धेनुकाकटाच्या यवनाने पितळखोरे येथील बौद्ध संघालाही दान दिलेले आहे.

कल्याण, सोपारा, भडोच या बंदरामधून दक्षिणापथात आलेल्या या यवन व्यापाऱ्यांना उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय सार्थवाहकांनी* आणि वाणिज्याने प्रतिसाद दिल्यामुळे परस्पर व्यापारी संबंध लवकर फलदायी व उपकारकच ठरले. त्यानंतर रोमन साम्राज्याशी मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरू झाल्यावर महाराष्ट्राच्या जीवनात समृद्धी व सुखसोयी यांची सृष्टी अवतरली. इ. स. पहिल्या शतकाआधी महाराष्ट्रात दळायचे जाते नव्हते. पाट्यावरवंट्यावर रात्रभर भिजत ठेवलेले धान्य वाटून त्याची जाडीभरडी भाकरी खात असावेत. आजही मद्रासी लोक याप्रमाणे काही पदार्थ बनवतात. परंतु रोमन संपर्कानंतर गोल फिरणारे जाते आले आणि सातवाहनकालीन गृहिणींचे जीवन अधिक सुखकर झाले. रोमन संपर्काच्या काळात नजरेत भरणाऱ्या गोष्टी भारतात आल्या. त्यापैकी रोमन खापरे ही उत्कृष्ट झिलई, वेली व फुले यांची नक्षी व आकर्षक रंगसंगती, उत्कृष्ट बनावट व आकारांचे नाविन्य याबाबत प्रशंसनीय आहेत. चंबू, तोटीचा खुजा, बारकी बोळकी, सुरई, कप, वाट्या, तांबड्या झिलाईने चकाकत असत. अम्फोरा हा मद्यकुंभ फार जड असून त्याचे बुडास एक टेंगूळ असे. हे मद्यकुंभ लोखंडी तिवईवर ठेवून जहाजातून भारतात आणीत. हे रांजण कडक मद्य भरून महाराष्ट्रातील सोपारा व कल्याण बंदरात येत व तेथून ठिकठिकाणी रवाना होत.

नुकतेच काही वर्षापूर्वी तांबड्या समुद्रात असे शेकडो मद्यकुंभ असलेले जहाजच्या जहाज समुद्राच्या तळाशी संशोधकांना सापडले. ते रोमहून निघाले होते. सातवाहन राजांच्या पैठण किंवा जुन्नर येथील व्यापाऱ्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी निघाले होते. परंतु वाटेत वादळात सापडून सागरतळाशी रुतून बसले असावे.

---

* लमाण

बौद्ध साहित्यातील जातक–कथा जरी बुद्धकालीन विषयी असल्या तरी त्या लिहिल्या गेल्या सातवाहन काळात आणि त्याही दक्षिण भारतात. तेव्हा या कथांमध्ये वर्णन केलेले सामाजिक जीवनाचे जे चित्र आहे ते सातवाहनकालीन आहे. या जातक–कथांमध्ये समुद्रावरील व त्याप्रमाणे अंतर्गत व्यापारासंबंधी पुष्कळ माहिती आहे. एका ठिकाणी वालुकामय प्रदेशातून जाणाऱ्या एका व्यापाऱ्याच्या तांड्याची तुलना समुद्रावरील प्रवाशांशी करण्यात आली आहे. दुसऱ्या एका ठिकाणी खगोलशास्त्रज्ञ थलनियामकाला, एका तांड्याचे नेतृत्व देण्यात आलेले आहे. यावरून तत्काली समुद्रप्रवासासाठी खगोलशास्त्राचे ज्ञान आवश्यक होते, हे कथाकाराला माहीत आहे. प्राचीनकाळी नौकानयन करणाऱ्या प्रवाश्यांना दिशांचे ज्ञान होण्याचे साधन म्हणजे ‘ दिशाकाक ’ (दिशा दर्शविणारा कावळा). जमीन दिसेनाशी झाली की या पक्ष्याच्या अनुरोधाने जहाज नेऊन किनाऱ्याला लावण्याचा तांडेल प्रयत्न करीत. भारताचा पश्चिम किनारा व्यापारासाठी अतिशय विख्यात होता. १८८२ साली सर जेम्स कॅम्बेल व पंडीत भगवानलालजी यांनी शूर्पारक येथे खोदून काढलेल्या स्तूपामध्ये अशोकाच्या ८० व्या अनुज्ञेचा भाग व गौतमीपुत्र शातकर्णी याचे नावाचे नाणे आढळले. म्हणजे तो स्तुप सातवाहनकाळात बांधला गेला असावा. बायबलातील ऑफीर (ophir) हे शहर म्हणजे शूर्पारकच होय हे इतिहासकारांनी मान्य केले आहे. ख्रिस्ती बायबलच्या जुन्या करारातील वर्णनावरून असे आढळून येते की थर्सीसचे आरमार सोन्याच्या ढाली, हस्तीदंती सिंहासन, मयूर सिंहासन आणि मसाले वगैरे वस्तू तीन वर्षातून एकदा, पश्चिमेकडील ऑफीर (शूर्परकर्पा–कल्याण) येथून आणीत व त्यायोगे सॉलोमन नृपतीचे दरबारास शोभा येत असे.

टॉलेमीने लिहिलेला ग्रंथ इ. स. १५० च्या सुमाराचा आहे. त्यात त्याने महाराष्ट्राला Ariake आर्यस्थान असे नाव दिले आहे. दक्षिण भागात पांड्य, चोल, केरळ वगैरे सर्व म्लेंच्छ लोक होते. फक्त महाराष्ट्र आर्य देश होता. टॉलेमीने त्यांचे तीन भाग केले आहेत. (१) कल्याण–सोपारा (२) समुद्रकिनाऱ्यावरील (३) घाटावरील. टोलेमीने लिहिल्या वेळी समुद्रकिनाऱ्यावरील कल्याण येथे साँडेनीस (सातकर्णी) राजा राज्य करित होता असे दिले आहे. समुद्रकिनाऱ्यावरील दुसरा भाग म्हणजे चाच्यांचा. कुलाबा, रत्नागिरी दक्षिण कोकण. तिसरा भाग घाटावरील व तेथील मुख्य नगरे म्हणजे पैठण व नगर.

इ. स. दुसऱ्या शतकाच्या अखेरीस म्हणजे इ. स. १७८ मध्ये गुजराथच्या क्षत्रपवंशीय राजाने (रुद्र दामाने) ‘आपण एका शातकर्णी सातवाहन राजाचा पराभव दोन वेळा केला ’ असा लेख आढळला आहे. यात तो म्हणतो ‘आपण सातकर्णीचा दोनदा पराभव केला; परंतु त्याच्याशी आपला जवळचा संबंध पडल्यामुळे

त्याला पदच्युत केला नाही. हा संबंध म्हणजे वाशिष्ठीपुत्र सातकर्णी याची राणी कर्दमकुलोत्पन्न महाक्षत्रप रुद्र याची मुलगी होती असा उल्लेख कान्हेरी लेण्यांतील एका संस्कृत शिलालेखात आहे. म्हणजे हा सासरे जावई संबंध आहे. म्हणून रुद्रदामाने त्याला पदच्युत केले नाही.

सातवाहनाच्या हलाखीचे पडसाद पेरीप्लुसच्या टाचणात सापडतात. ज्येष्ठ सद्नुगस (शूरगणी) च्या कारकीर्दीत कल्याण हे सुरक्षित व सुनियंत्रित बंदर होते. ३ऱ्या शतकाच्या आरंभी शातकर्णी (सातवाहन) राज्यांपैकी ज्येष्ठ शुरगणी राजाने कल्याण गाव मोठी व्यापाराची पेठ बनवून टाकली. परंतु नंतर शातकर्णी राजांचा अंमल कल्याण-शूर्पारक किनाऱ्यावरून नष्ट झाला व सांदानीज (संदनस) नावाच्या राजाकडे आला. पुराणात याला सुनंदन म्हटले आहे. त्याने परदेशाशी व्यापार बंद करून टाकला होता. कारण सुंदर सातकर्णी (सांदानीज) काळात या बंदराला अडथळे निर्माण झाले आहेत आणि माल उतरवण्यासाठी येथे आलेली ग्रीक जहाजे पहारेकऱ्यांच्या बंदोबस्तात भडोचकडे वळवली जातात. या उताऱ्यावरून जागतिक कीर्तीचे कल्याण बंदर, सुंदर सातकर्णीच्या काळात व्यापारासाठी असुरक्षित झाले होते व त्याचे कारण भृगुकच्छ येथील सत्ताधारी कल्याण बंदरात येणाऱ्या जहाजांना भडोचकडे बळजबरीने हाकलून नेत होते असे दिसते. नहपान क्षत्रपाच्या व त्याच्या उत्तराधिकाऱ्यांच्या काळात महाराष्ट्राचे स्वराज्य जरी नाहीसे झाले, तरी याच काळात पश्चिम भारताचा रोमन साम्राज्याशी मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू झाला होता. महाराष्ट्रातील नगरे व्यापारी हालचालींनी गजबजून गेली. महाराष्ट्रातील नागरी जीवनाला सुखासीनता, शृंगार आणि लालित्य प्राप्त झाले. पेरीप्लस-नांवाच्या पाश्चात्य प्रवाशाने लिहून ठेवले आहे कीं पश्चिम किनाऱ्यावरील नगरे, कल्याण, सोपारा व भृगुकच्छ ही सातवाहनराजांच्या राज्यातील प्रसिद्ध व्यापारी शहरे होती. रोमशी त्यांचा व्यापार अव्याहत चालू होता. तो याच बंदरातून. परदेशी आयातीमुळे व भारतीय मालाच्या निर्यातीमुळे ही बंदरे अत्यंत भरभराटलेली व श्रीमंत वस्ती असलेली व उद्योगधंद्याची शहरे होती. भोवतालचा आंतरभाग डोंगराळ व घनदाट अरण्यांनी गजबजलेला होता. तरी पैठण पर्यंतच्या कच्च्या रस्त्यांनी, मालाची प्रचंड वाहतूक, उंट-बैलांचे, खटारे व जनावरांचे तांडे या वाहतूक माध्यमात चालत असे. कल्याण तगरवरून सर्व प्रकारची मलमल, जाडे भरडे कापड पैठणकडे नेले जात असे. पेरीप्लस म्हणतो, मध्य दक्षिणेत जरी घनदाट अरण्ये व अडचणीचा डोंगर जंगल प्रदेश असला, तरी पूर्व–पश्चिम भागामध्ये फार मोठ्या प्रमाणावर लमाणांचे तांडे, म्हणजे सार्थवाहांच्या टोळयांच्या साहाय्याने दळणवळण चालू होते. Dr. D. K. Fleet म्हणतात, पूर्वीच्या ऐतिहासिक नकाशावरून पूर्वीचे वाहतुकीचे मार्गांचे अवशेष आजही दिसतात, व काही मार्ग आजही बऱ्या स्थितींत आहेत. घाट व कोकण यामधील दळणवळणाचे पुरावे नाशिकच्या दशपुरा, वैजयंतीच्या

धेनुकाह, सोपाऱ्याचे, कार्ले कल्याण, व भडोच यांचे, जुन्नर येथील व नाना घाटांतील शिलालेखावरून दिसून येतात. सातवाहन राजे व क्षत्रप नहपानाचा नातू वृषभदत्त हा देखील प्रवाशांच्या सुखसोयींकडे जातीने लक्ष देत असे. विश्रांतीगृहे, धर्मशाळा, विहीरी, स्नानगृहे इत्यादी सोई विनामुल्य केलेल्या होत्या. महाराष्ट्रांत निर्माण झालेली सर्व लेणी या वाहतूक मार्गाच्या अनुरोधानेच आहेत, हेही लक्षात येईल. सर्व आर्थिक व्यवहार वस्तुविनिमयाने होत असे व थोडचा प्रमाणात सुवर्णनाणी वापरीत असत. नहपानाने चांदी व तांब्याची नाणी पाडली होती. सातवाहनांनी सुवर्ण, तांबे, चांदी व शिसे अशी नाणी पाडली होती. आकार व वजन याबाबत ती साधारण ग्रीक नाण्यांसारखी होती. चांदीच्या नाण्याचे नाव काषार्पण असे होते. वृषभ दत्ताच्या एका शिलालेखात सुवर्णाचे नाणें काषार्पणाचे कोष्टक दिले आहे. १ सुवर्ण = ३५ काषार्पणाचे. ख्रिस्तांच्या Old Testment मध्ये असे उल्लेख आहेत की दखनभूमींतील सुवर्ण कल्याण बंदरातून भूमध्यसमुद्राकडील प्रदेशात पाठवले जात असे. रोमन लोकांनी रत्ने, सुवर्ण, मोती वगैरे सर्व मौल्यवान वस्तु कल्याण–सोपारा भरुकुछ बंदरातून व सिलोनमधून मिळविल्या होत्या. सुरवातीला इजिप्त अरबस्थानचे व्यापारी या माल वाहतुकीचे काम करीत. ते आपली स्वतःची जहाजे पाठवीत. परंतु पुढे रोमन लोकांनी इजिप्त जिंकल्यावर हिंदुस्थानशी प्रत्यक्ष संबंध जोडला. कल्याण, सोपारा, भडोच या बंदरात ते दारु, तांबे, कथील, तलमवस्त्रे, सर्व प्रकारचे हलके कापड, चकचकीत रंगाचे गर्डलस् बोरॅक्स (टाकणखार) गोड दालचिनी, तावदानी काच, अँटीमनी व सोने चांदीची नाणी यांची आयात होत असे. किनारपट्टीवरील राजांकरिता बहुमोल चांदीची भांडी, गाणारी मुले, राजाच्या जनानखान्याकरिता सुंदर मुली व स्त्रिया, उत्कृष्ट दारु, अत्यंत तलम वस्त्रे व उत्कृष्ट औषधी आणल्या जात असत.

निर्यात मालामध्ये भारतामध्ये होणाऱ्या सर्व प्रकारच्या सुती व रेशमी वस्त्रांचा समावेश असे. तसेच हस्तिदंत, इंद्रनीलमणी, पाचू, दालचिनी, सर्व प्रकारची रत्ने, मसाल्याचे जिन्नस वगैरे वस्तु निर्माण होत असत. प्लीनी हा प्रवासी म्हणतो, हिन्दी वस्तु युरोपीय बाजारपेठात शंभरपट (टक्के नव्हे) किंमतीला विकल्या जात. अशा तऱ्हेने अपरंपार प्रमाणात मसाल्याचे जिन्नस व वस्तू कल्याण व भडोच बंदरातून निर्यात होत असत. हिन्दुस्थानच्या आंतरभागात सापडलेल्या रोमन सुवर्ण नाण्यावरून हिन्दुस्थानचा रोमन साम्राज्याशी प्रचंड प्रमाणात व्यापार चालत असून, रोमन साम्राज्याच्या सुवर्णाचा ओघ कल्याण बंदरातून सातवाहन काळात महाराष्ट्रात वाहात होता. रोमन लोक व्यापारासाठी कल्याण येथे येत, तर भारतीय अतिपूर्वेकडे व्यापारी धर्मप्रचारक म्हणून ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा, आराकान भागात जात असत. जगातील संपत्तीचा ओघ भारतात आणण्याचे सातवाहनकालांतील जगप्रसिद्ध महाद्वार म्हणजे कल्याण. सातवाहनांच्या काळातील नाणेघाटांत टोल

Scanned with Car

नाके वसविलेले होते त्या ठिकाणी ते दगडी रांजण आजही दिसतात. त्यांना जकातीचे रांजण म्हणतात. प्राचीन काळी तेथून व्यापाऱ्यांचे तांडे द. हिंदुस्थानातून उत्तर हिन्दुस्थानात जात येत असत. कल्याण बंदरातून होणाऱ्या व्यापारासंबंधी बरीच माहिती पेरीप्लस, अलबेरूनि, अलइदिसी, मार्कोपोलो व इबन बहा यांच्या ग्रंथा वरून कळते. मार्कोपोलोने ३ ऱ्या शतकातील व्यापाराबद्दल लिहिले आहे, त्या वरून त्या काळी भारतात सोने, रुपे आणि तांबे येत असे. शिवाय घोडेही एकसारखे येत असत. कल्याण व भडोच या बंदरात येणाऱ्या प्रत्येक जहाजात इतर जिनसा-बरोबर घोडी असायचीच असे त्याने लिहिले आहे. राजाच्या तबेल्यात इराणी घोडे असत असे लिहिले आहे. पुढे जसजसे चालूक्य व राष्ट्रकुट साम्राज्ये वाढू लागली, तसतसे त्यांना घोडदळांची फार आवश्यकता वाटे व त्यासाठी इराणातून घोड्यांची रीघ लागलेली असे. त्यामुळे कल्याणला आज ज्याला घोडेखोत आळी म्हणतात त्या भागात घोड्यांचे बाजार व तबेले व्यापाऱ्यांनी केले होते; म्हणून त्या भागास ते नाव पडले व आजही ते नाव तसेच चालू राहिले आहे. ठाणे-कल्याण बंदरातून उत्तम चामडे व नीळ मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जात असे. म्हणजे त्या काळी या भागात नीळ उत्पन्न केली जात असे हे सिद्ध होते. नीळ हा खरा भारतीय वनस्पतीज रंग महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यांत निर्माण केला गेला हेही निःसंशय होय.

टॉलेमी, पेरिप्लस, वगैरेंच्या वर्णनावरून मात्र निश्चितपणे कळते की इ. स. पूर्व काळापासून पुढे इ. स. दोन तीन शतकांत कोंकण व किनाऱ्याकडे हे प्रांत व्यापारा-मुळे अत्यंत समृद्ध झाले होते. यामुळेच सातवाहनकाळी कान्हेरी, नाशिक, बेडसा, भाजे कार्ले, कोंडाणे, घारापुरी व कल्याण येथील लेणी अतिशय खर्च करून कोरविली गेली. ती सर्व तळघाट, नानाघाट, बोरघाट या व्यापारी रस्त्यावर आहेत हे सांगायला नकोच. राजे व व्यापारी लोक यांनी या कामी अतिशय द्रव्य ओतले असले पाहिजे हे तर दिसतेच; परंतु ही लेणी कोरून काढणारे स्थापत्य व शिल्पकलाकार आपआपल्या विद्येत अत्यंत निष्णात असले पाहिजेत व विशेष म्हणजे त्या शिल्पात घडविलेल्या मूर्तींच्या स्वरूपावरून ते सर्व कल्याण, ठाणे, नाशिक, जुन्नर याच भागांतले महाराष्ट्रीय कलाकार असले पाहिजेत. टबरी नांवाचा फारसी इतिहासकार इ. ६३८ ते ९२३ च्या सुमारास होऊन गेला. त्याने लिहिले आहे की हिन्दुस्तानचा व इराणचा व्यापार चालत असे व इराणच्या द्वितीय सुश्रुच्या कारकीर्दीत हिन्दुस्थानच्या पुलकेशी राजाने इराणच्या राजाकडे आपला दूत पाठविला होता. अजंठा व लोनाड येथील लेण्यांमध्ये एक चित्र आहे. त्यात इराणी पोशाखातील एक राजा व राणी दाखविली आहेत व दरबारांत पुलकेशीचे चित्र असून इराणी दूत आला त्यावेळचे असावे.

सारांश इ. स. पूर्व कालापासून कल्याण बंदर विशेष भरभराटीस आले. कल्याण दंडकारण्य प्रदेशात मोडते. त्या काळी भोवतालचा भाग दंडकारण्याने गजबजलेला असला तरी कल्याण शहर व्यापारामुळे अधिकच भरभराटलेले होते. देशातील सर्व रस्ते कल्याण बंदराकडेच जात होते व कल्याण परदेशी लोकांना भारतात शिरण्याचे प्रवेशद्वारच झाले होते. त्यामुळे कल्याण व आजूबाजूचा प्रदेश समृद्ध, गजबजलेला झालेला होता. आज मुंबईचे जेवढे माहात्म्य भारताला आहे तेवढेच किंवा त्याहूनही जास्त कल्याण बंदराचे माहात्म्य महाराष्ट्र व भारताला होते, यांत शंका नाही. महाराष्ट्रातील सर्व प्राचीन शिल्पे, मंदिरे, विहार, स्तूप, चैत्य, राजमार्ग, लेणी इत्यादींच्या सौंदर्याला कल्याणच्या कलाकारांनी, श्रीमंत व्यापाऱ्यांनी, धनसंपत्तीने, श्रमसंपत्तीने सजीव केले व साज चढविला यात शंका नाही. या सर्व शिल्पसौंदर्याची, पैठणच्या समृद्धीची, जननी कल्याण शहर आहे, असे म्हटले तर ते फारसे चूक ठरणार नाही. नाशिकच्या लेण्यातील नाजूक शिल्प, वेरुळच्या कैलास लेण्यांतील कलाकुसर, अजिंठ्यांच्या चित्रांचे कौशल्य व रेखीवपणा, नाशिक जुन्नर भाजे, बेडसे, पितळखोरे, कान्हेरी, कार्ले, कल्याण, लोनाड यांतील घनता व भव्यता यांना जगाच्या सर्व सुंदर वस्तूंत व कलेत तोड नाही. या सर्वांचे जनकत्व कल्याण शहराकडे आहे, हे फारच थोड्यांना माहित आहे. म्हणून कल्याण हे नाव या कल्याणकारी गावाला त्या काळातल्या कल्याणकारांनी सार्थ केले आहे. आपल्या कल्याणकारी कृतीने कल्याण ही कल्याणकारी भूमी झाल्यामुळे हे गांव परशुरामापासून आजपर्यंत भरभराटले. आपत्ती-बिपत्तीतून तरले; जगले; परत वाढत आहे. इतर सर्व प्राचीन शहरे नष्ट झाली; वैभवहीन झाली; परंतु कल्याण हे अभंगच राहिले. त्याचे नावही कुणी बदलू शकले नाही. ते तसेच कल्याण राहिले व पुढेही राहिल.

□ □ □

: ४ :

सातवाहनांचा उदयकाल

मौर्य सम्राट भिक्षुराज अशोकाच्या मागून मौर्य साम्राज्याची शकले झाली आणि उत्तर हिंदुस्थानात यवनांनी, कलिंगात चेदी घराण्यांनी व दक्षिणापथात सातवाहनांनी उचल खाऊन मौर्यसाम्राज्याचे लचके तोडायला सुरवात केली. दक्षिणापथात अशोकाच्या मृत्यूनंतर जे अराजक उद्‌भवले, त्यातून सिरीसातवाहन नावाच्या मावळ प्रांतातील मौर्यांच्या अधिकाऱ्याने स्वातंत्र्य घोषित केले. कल्याण, सोपारा, चौल.



राजा शिमुक सातवाहन

नाणेघाट, नाशिक, जुन्नर, पितळखोरे आणि अजिंठ्याचा घाट ही सर्व दक्षिणापथातील सार्थवाह मार्गावरील व्यापारी व मोक्याची ठाणी हाती येताच गोदेच्या काठची पैठणची लक्ष्मी युवक सातवाहनाच्या आधीन झाली.

भाजे येथील चैत्य हा महाराष्ट्रातील अगदी सुरवातीला कोरला गेला. त्या चैत्याच्या शेजारी एका विहारात दोन राजपुरुषांच्या शिल्पाकृती आहेत. एका शिल्पाकृतीत राजपुरुष चार घोड्यांच्या रथात उभा असून त्याच्या शेजारी दोन राण्या छत्रचामरांसहित खड्या आहेत. ही शिल्पाकृती दक्षिणापथातील महाराष्ट्राच्या साम्राज्याचा उद्गाता कर्ता पुरुष शिमुक सातवाहनाचीच आहे हे मान्य झाले आहे. मुरबाडजवळ जुन्नरला जाण्याचा जो नाणेघाट आहे, या घाटात सातवाहनांचे देवकुळ होते. हे दगडात कोरलेले आहे. त्यात सातवाहन राजघराण्यातील व त्यांच्या नातेवाइकांच्या शिल्पाकृती आहेत. त्या प्रतिमांच्या खाली त्या व्यक्तींची नावे आहेत. त्या खालील लेख नाहीसे झाले आहेत. त्या प्रतिमा शिमुक सातवाहन, देवी नामनिका व राजा सातकर्णी, कुमारभाय, कुमार सातवाहन, कुमार हुकुश्री आणि महारठी गणकबीर यांच्या होत्या असे समजते.

पुराणातून ज्याचा शिशुक किंवा शूद्रक असा उल्लेख आला आहे तोच शिमुक. त्याच्या मागून कृष्ण राज्यकर्ता झाला; परंतु नाणेघाटात त्याची प्रतिमा नाही याचे कारण शिमुकाचा पुत्र राजा सातकर्णी उत्तर हिंदुस्थानात लष्करी कामगिरीवर गेला असता याने गादी बळकावली. त्याचा नाशीकचा महामान्य श्रमण याने याच्या कारकीर्दीत नाशिक येथील एकोणीसावे लेणे खोदले, असा शिलालेख नाशिकला आहे. भावाच्या मुलाची सत्ता त्याच्या गैरहजेरीत बळकावण्याची अप्रतिष्ठा कृष्णाला चिकटलेली असल्यामुळेच त्याची प्रतिमा नाणेघाटात वेदश्री किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनी कोरलेली नसावी. त्याची प्रतिमा नाणेघाटातील सातवाहन देवकुळांत नाही एवढे खरे. सातवाहन राणी नायनिका हिचा शिलालेख नाणे घाटात आहे. तो प्राकृत भाषेत आहे व अत्यंत भग्नस्थितीत आहे.

शिलालेखातील राणी नायनिकेचे नाव नष्ट झाले आहे. परंतु हा लेख कोरणारी राणी पुतळ्यावर उल्लेखिलेली सातकर्णी राजाची पत्नी नायनिकाच होती हे आता सर्वमान्य झाले आहे. या लेखातील ४ थ्या ओळीवरून तिला वेदश्री व सक्षि असे दोन पुत्र होते असे दिसते. हा लेख कोरला तेव्हा नायनिकेचा पती दक्षिणापथपती सातकर्णी कालवश झाला होता व मुलगा वेदिश्री राज्य करू लागला होता. या लेखात नामनिकेचे धावते व्यक्तित्व दर्शन घडते. त्यात तिने आपल्या पुत्राचे वर्णन वीरस, सूरस, अप्रतिहत्, चकस, दाखिना पथ पतिनो असे केले आहे. स्वतःचे वर्णन तिने असे केले आहे. 'मासोपवासीनीय, गहता पसाथ, चरितब्रह्म चरिताय, दिखव्रतयज्ञसुडाय यत्रा हूता:' अर्थ—महिना महिना उपोषण करते आणि स्वतःच्या घरी तापसीप्रमाणे संन्यस्तवृत्ताने व ब्रह्मचर्याने राहते. दीक्षा, व्रते व यज्ञ करण्यात तर निपुण आहे. असे तिने अनेक यज्ञ केले. नायनिका स्वतःला समुद्रवलयांकित पृथ्वीवरील प्रथम वीर असलेल्या अंगिय कुळातील महारठीची बाला म्हणवून घेते. सातवाहन नृपती सातकर्णीने अंगीय कुळाशी वैवाहिक संबंध

Scanned with Car

जोडून आपल्या सत्तेला बळकटी आणली. तिचा पिता महारठी कळयाम याची नाणी हैद्राबाद, कर्नाटक व म्हैसूर या भागात सापडली आहेत.

ह्या लेखात नायनिकेने आरंभी प्रजापती, धर्म व इंद्र यांना वंदन केले असून नंतर संकर्षण, वासुदेव, चंद्रवंश व नंतर यम, वरुण, कुबेर, वासवान या लोकपालांना वंदन केले आहे. यदुवंशीय राष्ट्राला व यदुवंशीय जमातीची दैवते वासुदेव, संकर्षण आणि कुमार यांना वंदन केले आहे. तिने जी पुण्यकृत्ये गौरवून वर्णिली आहेत ती यज्ञकृत्ये आहेत; तसेच त्या यज्ञांत ब्राह्मणांना दिलेल्या गाई, हत्ती, घोडे, रथ, कार्षापण, सोन्याचांदीचे अलंकार इत्यादींचा सविस्तर उल्लेख आहे. पतीच्या निधनानंतर स्वत: राणीने ब्राह्मणांमार्फत केलेल्या यज्ञांची नावानिशी माहिती आहे व त्यात एक हजारापासून वीस हजारापर्यंत कार्षापण (सोन्याची नाणी), शंभरापासून दहा हजारापर्यंत गाई, शेकडो घोडे, हत्ती, गांवे, वस्त्रे इत्यादि दानांचा उल्लेख आहे. राजसूय व अश्वमेध यज्ञ राजकीय दृष्टया अर्थपूर्ण आहेत. विशिष्ट पुरुष आपला राजा आहे हे अभिषेक विधीने लोकांना कळावे व प्रजेची राजाला मान्यता आहे हे जगाला कळावे म्हणून राजसूय यज्ञ करतात व बलाढय शत्रूवरील विजयाचे प्रतीक म्हणून अश्वमेध करतात. श्री. सातकर्णीने अश्वमेध दोनदा केला आहे. ते म्हणजे, पुष्यमित्र शुंगाबरोबर सातकर्णीचे सैन्य वायव्य सरहद्दीवरील यवनांचा बंदोबस्त करण्यास गेले व कलिंगाधिपती खारवेलचा समाचार सातकर्णीने घेतला तेव्हा बद्दल आहेत. पहिला सातकर्णी व यवनराज मिनॅण्डर हे समकालीन होते. सातकर्णीने १८ वर्षे राज्य केले. याच्या नाण्यांवर ‘ रत्रो सिरी सातस ’ अशी अक्षरे असून हत्ती व नदी अशी चिन्हे आहेत. सातकर्णीनंतर वेदिश्री गादीवर आला. नंतर पूर्णोत्संग व नंतर सहावा सातवाहन राजा द्वितीय सातकर्णी हा गादीवर आला. याने ५६ वर्षे राज्य केले. त्याच्या नाण्यावर झेप घेणाऱ्या सिंहाचे चित्र आहे व काही नाण्यांवर सोंड उभारलेल्या हत्तीची आकृती आहे. याने माळवा प्रांत देखिल पूर्ण जिंकला. तसेच सांची येथील स्तुपाभोवती याने तोरणे उभारली. याने कालकाचार्यांच्या आमंत्रणावरून उज्जैन बळकावणाऱ्या शकाचे पारिपत्य केले. त्याच्या नाण्यांवर मालवगण विजय, व यौध्येय गण विजय असे लेख आढळतात. दुसऱ्या सातकर्णीनंतर लंबोदर व त्याच्या पाठोपाठ आपिलक असे गादीवर आले. आपिलकाची नाणी मध्यप्रदेशात सागरजवळ सापडली आहेत. आपिलकानंतर शकांच्या चढायामुळे सातवाहन सत्तेला उत्तर महाराष्ट्रात ग्रहण लागले. आपिलकामागून जवळजवळ १०० वर्षे सातवाहन सत्तेला राजकीय वनवासाचे दिवस काढावे लागले. सातवाहनाचे हे नष्टचर्य गौतमीपुत्र सातकर्णीने संपविले.

आपिलकानंतर ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकाच्या उत्तरार्धांत क्षहरात वंशीय मक आणि नहपान या शक क्षत्रपांनी माळवा व गुजरातमधून आणि उत्तर महा-

Scanned with Car

राष्ट्रातून सुद्धा सातवाहन सत्तेला हसकावून लावले. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे, कल्याण, सोपारा, चौल आणि प्राचीन सार्थवाह (लमाणवाहक) पथावरील मोक्याचे नाके असलेला नाणेघाट आणि त्याजवळील व्यापाराचे दुसरे केंद्र जुन्नर हे नगर हा सर्व भाग क्षहरात व सातवाहन स्पर्धेचे मुख्य क्षेत्र होते. या स्पर्धेचे पडसाद पेरिप्लस ऑफ इरिथेरीयन सी (तांबडचा समुद्राचा वाटाडचा) या ग्रीक खलाशाच्या वृत्तांत उमटलेले आहेत. त्यात तो लिहितो, की कल्याण या व्यापारी बंदर व शहरांत सातकर्णी राजा राज्य करतो. त्याचे जवळ ५०० हत्ती आहेत. कल्याण बंदरांत व्यापार फार मोठ्या प्रमाणात चालतो. त्या राजाने कल्याण शहराचा परदेशाशी व्यापार फार वाढवलेला आहे. कल्याण हे शहर फार मोठे व्यापारी व श्रीमंत शहर आहे. राजाने व्यापारासाठी मोठचा सुखसोई व संरक्षण केले आहे. हे शहर अत्यंत भरभराटलेले आहे. परंतु पुढे तोच लेखक लिहितो, नंतर हे शहर व्यापाराला फार धोकादायक झाले. कारण परदेशाहून येणारी जहाजे भरूकच्छ येथील चांचे व राज्यकर्ते यांजकडून जबरदस्तीने वळवून मागे नेली जातात. त्यामुळे हे बंदर व्यापाराला गैरसोईचे व धोक्याचे झाले आहे. तेथील व्यापार त्यामुळे कमी झाला आहे. या वर्णनावरून क्षत्रपानी नाणेघाटाचे मार्ग सर्व अडवून टाकले. जुन्नर-नासिक भागात क्षत्रप नहपानाचे राज्य निर्माण झाले होते. त्यामुळे सातवाहन राजे फक्त कल्याण, चौल वगैरे दक्षिण भागातच सत्तेवर होते. बाकी प्रदेश गेला तरी सातवाहनांनी कल्याण राजधानी करून आपला कारभार चालविला होता. काल कुंतल सातकर्णीपासून म्हणजे इ. स. पूर्व ४० ते इ. स. ४२ पर्यंतचा म्हणजे सुमारे शंभर वर्षाचा आहे. ज्या काळात कल्याण बंदराचा व्यापार बंद पडून कोंडी झाली ती हकीगत इ. स. ४२ च्या सुमाराची आहे. त्या वेळी सुंदर सातकर्णी राजा राज्य करीत होता. पेरिप्लसने लिहिलेली हकीगत हाच ऐतिहासिक दृष्टचा एवढचा जुन्या हकीगतीचा एकमेव पुरावा आहे, याला पुष्टीदायक पुरावा म्हणजे गाहासत्तसई, पुराणे वगैरे ग्रंथ. यात सुमारे १०० वर्षे सातवाहनांना वनवासाचा काळ आला हे लिहिले आहे; व त्यांची सत्ता मर्यादित झाली. परंतु कल्याण शहरात तो राज्य करीत होता, त्याच्या पदरी ५०० हत्ती होते. त्याच्या काळात व्यापार वाढला व नंतर सुंदर सातकर्णीच्या काळात कमी झाला वगैरे गोष्टी नावे घालून पेरिप्लसने दिलेल्या आहेत; म्हणून असे निश्चयाने म्हणता येते. त्या शंभर वर्षाच्या काळात कल्याण ही राजधानी होती व सातवाहन राज्यकर्ते होते. नाणेघाट बंद झाल्यावर आपल्या देव कुळाजवळील सागरी समृद्ध कल्याण शहरात व सह्याद्रीच्या अडचणीच्या प्रदेशात राजधानी आणून सातवाहनांनी सत्तेचे संरक्षण केले हे सयुक्तिक वाटते. तसेच समृद्ध शहरे व वाहतुकीचे मार्ग ही संघर्ष केंद्रे होती असे लिहिले आहे. त्या अर्थी कल्याण ही सातवाहनांची त्या काळची राजधानी होती. कल्याणजवळील खाडी किनाऱ्यावरील पाच मैला-

Scanned with Car

वरील डोंबिवलीजवळच्या गावाला गजबांधण म्हणत असत व आजही ते खेडे म्हणून आतापर्यंत ज्ञात आहे. सातवाहन काळानंतरच्या सर्व राजवटीत व विशेष करून सह्याद्रीच्या या डोंगर कुशीत हस्तीदल हे मैदानी युद्धाचे अंग बाळगणारा सामर्थ्यवान राजा झाल्याचा पुढील कोणत्याच इतिहासात उल्लेख नाही. उलट पुढे हस्तीदल ही संस्था युद्धशास्त्रातून नाहीशीच झाली आहे. तेव्हा सातवाहन राजांचे ते हस्ती बांधण्याचे ठिकाण होते यात शंका नाही व सातवाहन राज्यकर्ते कल्याण या समृद्ध शहरात राजधानी करुन जवळजवळ शंभर वर्षे तरी होते. पुढे गौतमी-पुत्र शातकर्णीने नहपानाचा पूर्ण नि:पात करून परत आपले साम्राज्य वाढवले व उत्तर हिंदुस्थानपर्यंत पसरवले व आपली पूर्वीची पैठण ही राजधानी वैभवाप्रत नेली. तेथपर्यंत मात्र सातवाहन सम्राटांची ही पडत्या काळातील कल्याण ही राजधानी सुमारे १०० वर्षे होती हे नि:संशय म्हणता येते.

अर्थातच समृद्ध, श्रीमंत, प्रचंड व्यापारी शहर व राजधानीच्या बंदोबस्ताच्या दृष्टीने कल्याण शहराला तटबंदी, खंदक वगैरे योजना या त्यांनीच केलेल्या होत्या यात शंका नाही.

या कालखंडांत १० राजे झाले. १३ वा सातवाहन मृगेंद्र सातकर्णी ते २४ वा गौतमीपुत्र सातकर्णी पर्यंत झाले. मधल्या काही राजांनीं परत पैठण राजधानी केली किंवा कसे ते निश्चित सांगता येत नाही; परंतु याच कालात कविवत्सल व गाहासत्तई चा कर्ता हाल नावाचा प्रसिद्ध राजा होऊन गेला व पहिल्या मराठी काव्याचा तो वाल्मिकी झाला. या कालखंडात कल्याण नगराचे वैभवाचे वर्णन स्वप्नवत वाटेल एवढे असले पाहिजे. सातवाहन राजांचे राजवाडे असले पाहिजेत. त्यांचे दरबार, त्यांचे अमात्य, सेनापती, सरदार, दरकदार यांचे टोलेजंग वाडे असलें पाहिजेत. आज त्यांचे अवशेष सुद्धा पाहण्यास मिळत नाहीत. कल्याण शहरा-जवळ अंबालिका नावाचा बुद्धांचा एक पंथीय विहार होता. पण कल्याण जवळ म्हणजे अंबरनाथ या ठिकाणी असला पाहिजे अशी लोकांची समजूत आहे ती चुकीची असावी; कारण तेथेही कोणतेच अवशेष, कोरीव काम वगैरे काहीं नाही व तसेच अंबरनाथ कल्याणजवळ, म्हणजे कल्याणलाच अशा अर्थाने म्हणण्याएवढे अंबरनाथ जवळ नाही. परंतु आधारवाडी रस्त्याला सतीचे मैदानापुढे एक सध्या सिल्क मिल एका टेकाडावर आहे. त्याच्या भोवती त्यांनी बगीचा केला आहे. परंतु त्या जागेत दगडी कोरीव कामाचे एखादे देऊळ, विहार किंवा राजवाडावजा स्थानाचे खांब असावेत. जमीनीवर आलेले दिसतात. त्यावरून त्या ठिकाणी विहार, स्तूप, किंवा मंदिर किंवा राजवाडा भूमीगत असावा असे अनुमान निघते व आमचे निरीक्षणाने तसे पक्के मत झाले आहे. परंतु ती जागा खाजगी मालकीची व आता त्यावर एक कारखाना झाल्यामुळे उत्खनन अशक्य आहे. आम्ही पुराणवस्तू

खात्याचे अधिकाऱ्यांचे कानांवर ही गोष्ट घालून शोध घेऊन सरकार उत्खनन करू शकेल काय अशी विचारणा केली होती; परंतु खाजगी जागेत व उद्योग निर्माण झाल्यावर तसे करता येत नाही असे उत्तर मिळाले; परंतु आमचे अंदाजाप्रमाणे तोच अंबालिका विहार असावा किंवा सातवाहनकालीन राजवाडा असावा. वर उल्लेखिलेले १३ ते २३ वा सातवाहन असे ११ राजे फारसे पराक्रमी निघाले नाहीत. १३ वा सातवाहन राजा कुंतल सातकर्णी याचा उल्लेख वात्सायनाच्या कामसूत्रांत आला आहे. त्यांत म्हटले आहे की सातवाहन कुंतल सातकर्णीने आपली मुख्यराणी मलयवती हिच्या कपाळावर प्रहार करून न कळत जीव घेतला. नंतरचा १८ वा सातवाहन हाल राजा गाहासतसई या प्राकृत ग्रंथाच्या संपादन कर्तृत्वाने भारताच्या वाङ्मयीन इतिहासात चिरंजीव झाला आहे. हा राजा अतिशय स्त्री-लंपट होता. दर चार दिवसांनी एकेका युवतीशी विवाह करून आपल्या अंतःपुरात शेकडो तरुणींची भरती केली होती. त्यामुळे राज्यात तरुणांना मुली मिळेनाशा झाल्या. तेव्हा एका ब्राह्मणाने देवीची करुणा भाकली. देवी ब्राह्मणाला प्रसन्न झाली व तिने स्वतः एका तरुणीचे रुप घेऊन एकांतात हाल राजाला गांठून भेडसावले, तेव्हापासून हाल राजाचा बायकांचा नाद सुटला (लीलाबाई, प्रस्तावना ले. डॉ. उपाध्ये) या हाल राजाच्या संस्कृतच्या अज्ञानाचा उपहास करणारी आणखी एक कथा प्रसिद्ध आहे. ह्याच्या अंतःपुरात पांचशे राण्या होत्या. त्यांत चंद्रलेखा ही पट्टराणी होती. राजा एके दिवशी देवीकृत नामक सरोवरांत चंद्रलेखा राणीबरोबर विहार करीत असता तो राणीवर पाणी उडवू लागला. तेव्हा तिने माझ्या अंगावर पाणी उडवू नकोस असे संस्कृतात सांगितले. ती म्हणाली "मोदकै ताडय माम्" ह्यामध्ये मा + उदकैः = मोदकैः हा संधि राजाला समजला नाही. त्याला वाटले राणी म्हणते मोदकांनी मला मार. तेव्हा त्याने पाकशाळेतून मोदक मागवले व तिला मारू लागला तेव्हा "असा कसा रे तू मूर्ख ? संस्कृत भाषेतील समासाचा साधा नियम तुला समजला नाही ?" म्हणून सर्वासमोर त्याचा उपहास केला. अपमानित झालेल्या त्याने देवीची आराधना केली तेव्हा हालाने "माझ्या राज्यातील प्रत्येक नागरिक कवि होवो" असा वर मागितला. देवी तथास्तु म्हणाली. हालाच्या पुढे कोटयावधी कविता आल्या. यांतून हालाने सातशे निवडक कविता घेऊन त्यांचा सुभाषित कोशांत संग्रह केला. हीच ती गाथा सप्तशती. या प्राकृत ग्रंथाची संस्कृत कवीनी देखिल मुक्त कंठाने स्तुती केली आहे. हालाच्या काळात शक नृपती नहपान याचे राज्य नाशिक, जुन्नर, पुणे, मावळ या भागात असून जुन्नर ही राजधानी होती हे आता मान्य झाले आहे. त्याचे शिलालेख नाणेघाट, जुन्नर, नासिक, कार्ले येथे कोरले आहेत. नाणे घाट, जुन्नर, नासिक वगैरे पैठण मार्गच बंद झाल्यामुळे हाल व त्यानंतरचे राजे हे कल्याणातच असावेत व या सर्व घटना कल्याणात घडल्या असण्याचा संभव वाटतो.

हे जर खरे असेल तर पहिल्या प्राकृत काव्याच्या गाथा सप्तशतीच्या ग्रंथाच्या जन्माचे भाग्य कल्याण शहराच्या नशिबी येते व कल्याण–महतीत एक फार मौलिक भर पडते असे म्हणावे लागते. या काळातील नहपान क्षत्रपाने येथील संस्कृतीशी एकरूप होऊन ब्राह्मणी संस्कृतीत तो मिसळून गेला होता हे त्याने केलेल्या सुधारणा, यज्ञ, दाने, धर्मशाळा, ब्राह्मणभोजने वगैरेवरून वाटते. नहपानामागून येणाऱ्या क्षत्रपांचा ५० वर्षे तरी उल्लेख नाही; तसेच हालानंतरचा राजा २१ वा सुंदर सातकर्णी ज्याचा उल्लेख पेरिप्लसने केला आहे, त्या काळा-पर्यंत कल्याणचा व्यापार नहपानाच्या भडोचवरून चालणाऱ्या चांचेगिरीने थंडावला होता. नंतर एकदम २४ व्या गौतमीपुत्र सातकर्णीने इ. ६० ते इ. स. ८० या काळात कल्याणहून मोठी धडक मारून नाशिक, जुन्नर, माळवा, उज्जैन वगैरे सर्व प्रांत ताब्यात घेतले व प्रतिष्ठान ऊर्फ पैठण परत आपली राजधानी केली. त्यानेच उत्तर हिंदुस्तानमध्ये देखिल पंजाबपर्यंत धडक मारून कुशाण राजा कडफिशस् याचा पराभव केला. ही कथा पंजाबात अतिशय लोकप्रिय असून अजूनही पंजाबी लोक सातवाहनाची पूजा करतात. ही घटना इ. स. ७८ मध्ये घडली तेव्हापासून त्याचा शक मानला जाऊ लागला. हाच तो हल्लीचा महाराष्ट्रांत मान्यता पावलेला शालीवाहन शक होय. गौतमीपुत्र सातकर्णी व नहपान क्षत्रप यांचा निर्णायक पहिला व शेवटचा सामना नाशिक–जुन्नर भागात झाला. नाशिक येथील एका लेखात सातवाहन सैन्याच्या गोवर्धन येथील शिबिराचा उल्लेख व विजयाचा उल्लेख आला आहे. यावरून गौतमीपुत्र सातकर्णी व शकांचा निर्णायक संग्राम नाशिकजवळ झाला हे निश्चित होते. अर्थात या सर्व तयारीसाठी कल्याण शहर त्याच्या पुढील सर्व दिग्विजयाचे आरंभस्थान हेड क्वार्टर होते असे म्हणावयास हरकत नाही. गौतमीपुत्र सातकर्णीने आपल्या बाहुबलाने सात वाहन साम्राज्याची प्रतिष्ठापना केली. नाशिक येथील लेणे त्याची आई महादेवी बलश्रीने कोरले. त्यातील लेखात आपला दिवंगत पुत्र गौतमी सातकर्णीचे वर्णन केले आहे. बलश्रीने आपल्या पुत्राला 'सर्वराज लोकमंडळ प्रतिगृहीत शासन' 'सर्व मंडळाभिवादित चरण' इत्यादी शब्दांनी गौरवले आहे. त्यावरून तत्कालीन राजकीय रंगभूमीवर सातकर्णीचे स्थान कोणत्या दर्जाचे होते हे लक्षांत येते. सात-कर्णीच्या राज्यविस्ताराचे वर्णन त्याच लेखात केलेले आहे. असीक, असक, मूलक सुरट, कुकुर, अपरान्त, अनुप, विदर्भ, आकरावती म्हणजे अनुक्रमे खानदेश, गोदातीरचा प्रदेश, पैठणजवळचा प्रदेश, काठेवाड, राजपुताना, कोकण, महेश्वराचा प्रदेश, विदर्भ, माळवा एवढ्या प्रदेशाचे आधिपत्य असून विंध्य, सातपुडा, अरवली, सह्याद्री, कान्हेरी, मलय, श्वेतगिरी, चकोर, इत्यादि पर्वतांचा स्वामी असे वर्णन बलश्रीने केले आहे.

त्याचे वर्णनही तिने फार सुंदर शब्दात केले आहे. एक शूर, एक धनुर्धर, एक

शालीवाहन राजा गौतमी सातकर्णी ह्यांचा विजयोत्सव

Scanned with Car

ब्राह्मण, राम-केशव-अर्जुन-भीमसेन तुल्यपराक्रमी, व तेजस्वी, क्षत्रियांचा अहंकार-दमन करणारा, शकयवन, पह्लव यांचे निर्दालन करणारा, महाराष्ट्रांतील घोडयांना तिन्ही समुद्रांचे पाणी पाजणारा, ब्राह्मण्याचा एकमेव आश्रयदाता या शब्दांत त्याच्या कर्तृत्वाचा तिने आढावा घेतला आहे. शिलालेखात या शब्दचित्राला देखील तोड नाही. पंजाबातील सातवाहन विजयाचा प्रसंग इ. स. ७८ च्या आसपास घडलेला असावा; म्हणून याच वर्षी कनिष्काने सुरू केलेल्या संवताचे कर्तृत्व पुढील काळात लोकांनी सातवाहनालाच दिले व तो शालीवाहन शक ठरला.

त्याच्यानंतर त्याचा वारसा वाशिष्ठीपुत्र पुलुमायीने चालविला. वाशिष्ठ गोत्री जीवसुता ही त्याची आई. नाशिक लेण्यांत हिचा लेख आहे. टॉलेमी या भूगोल कर्त्याने पैठणला राज्य करणाऱ्या पुलोमाईसचा उल्लेख केला आहे. नाशिक येथे चार, कार्ले येथे दोन, अमरावती येथे एक असे ७ शिलालेख मिळाले आहेत. त्यांत पुलुमाईला नवनगरस्वामी बेणाकरस्वामी असे म्हटलेले आहे. शहरात क्षत्रपांच्या लष्करी मोहिमामुळे सातवाहनांची प्राचीन राजधानी उध्वस्त झाली असावी. शकांचे आक्रमण महाराष्ट्रातून पिटाळून लावल्यानंतर सातवाहनांनी पैठण नगरीची पुनर्रचना केली असावी म्हणून व क्षत्रापांचा पराभव करण्यासाठी त्यांनी वेणा नदीच्या तीरावर वेणाकटक ही लष्करी राजधानी वसविली असावी म्हणून गौतमीपुत्र सातकर्णीने व वासिष्ठी पुलुमाईने नवनगरस्वामी ही बिरुदे घेतली असावी असे विद्वानांचे मत आहे. म्हणजे आम्ही वर केलेल्या तर्कांला याने अधिक दुजोरा मिळतो की १०० वर्षांच्या काळात कल्याण हीच त्यांची राजधानी होती व गौतमी-पुत्र सातकर्णीने कल्याणहूनच क्षत्रपांच्या निःपाताचे व उत्तर-दिग्विजयाचे प्रस्थान ठेवले. शककर्ता शालीवाहन गौतमीपुत्र सातकर्णी हा कल्याणचाच दिग्विजयी राजा आणि हाच तो कल्याणचा दिग्विजयी अज्ञात इतिहास. हेच कल्याणचे अज्ञात वैभव.

वाशिष्ठीपुत्र पुलुमाईच्या राज्याच्या १९ व्या वर्षी नाशीकचे लेणे गौतमी बलश्री महादेवाने कोरले, त्या वेळेपर्यंत गौतमीपुत्राने जिंकलेला सर्व भूभाग त्यांचे साम्राज्यात मोडत होता. पुढे वाशिष्ठीपुत्र पुलुमाईने आंध्रप्रांतावर स्वारी करून तो जिंकून घेतला. परंतु तो आंध्रात गुंतला असता नव्याने उदय पावलेल्या कुशाण सत्तेचा माळव्यातील क्षत्रप चष्टनने उज्जयिनी व आजूबाजूच्या प्रदेशातून सात-वाहनांचे उच्चाटन केले असावे. कारण टॉलेमीने याचा उल्लेख आपल्या भूगोलात केला आहे. सौराष्ट्र, गुजराथ, माळवा या भागात चष्टनाची नाणी मिळाली आहेत. त्यावरून चष्टनाने माळवा सातवाहनांच्या हातून हिसकावून घेतला असावा असे दिसते.

वाशिष्ठीपुत्र सातकर्णी याची राणी कर्दम कुलोत्पन्न महाक्षत्रप रुद्रदामन याची कन्या होती, असा उल्लेख कान्हेरी लेण्यातील एका संस्कृत शिलालेखांत आहे.

Scanned with Car

पुलुमाईने क्षत्रपांचा पराभव केला तेव्हा त्याने आपली मुलगी त्याच्या मुलाला दिली असावी असे विद्वानांचे मत आहे. अशा तऱ्हेने वाशिष्ठी पुत्र पुलुमाईच्या काळानंतर पुन्हा सातवाहन साम्राज्याला उतरती कळा लागली; कारण पुलुमाईचा मुलगा वाशिष्ठीपुत्र सातकर्णीचा पराभव रुद्रदामनने दोनदा केला, परंतु जवळचा संबंध पडल्यामुळे राज्य ताब्यात घेतले नाही. सातकर्णीच्या या क्षत्रपराणीचा दानलेख कान्हेरी येथे आहे. याचा काळ इ. ११३ ते १२७. याच कालखंडात आणखी दोन सातवाहन राजे झाले, परंतु ते पराक्रमी नव्हते.

नंतर १२७ ते १६५ या कालखंडात सातवाहन कुळांतील शेवटचा तेजस्वी नृपती गौतमीपुत्र यशश्री सातकर्णी पुढे आला. विख्यात बुद्धपंडित नागार्जुन हा याचा मित्र होता. नागार्जुनाला प्राप्त झालेली एक अद्वितीय मोत्यांची माळ त्याने सातवाहत नृपतीला दिली अशी कथा हर्षचरित्रांत आली आहे. बाणाने हर्षचरितात या सातवाहन नृपतीला त्रिसमुद्राधिपती म्हटले आहे. पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत सर्व दक्षिणापथ परत सातवाहन साम्राज्याखाली आले. यशश्री सातकर्णीची नाणी गुजराथ, सौराष्ट्र, अपरान्त, पैठण, आंध्र व विदर्भ या सर्व भागात सापडतात. गौतमीपुत्र यशश्री सातकर्णीचे ७, १६, २७ या वर्षाचे लेख अनुक्रमे नाशिक, कान्हेरी, चिन्नगंजम, येथे आहेत. चांदीच्या नाण्यांचा वापर करणारा हा ४ था सातवाहन राजा व जहाजाचे चिन्ह नाण्यावर छाणारा पण पहिलाच सातवाहन राजा. कान्हेरी येथील लेख व स्तूपांत सापडलेले त्याचे नाणे यावरून अपरान्त हा क्षत्रपांपासून त्याने जिंकून घेतला असे दिसते. त्याचप्रमाणे नाण्यावर जहाजाचे चिन्ह छापले, यावरून बंदराच्या भरभराटीकडे व दर्यावर्दी आरमारी भागाकडे जातीने लक्ष देणारा होता हेही दिसून येते. याच्या काळात सातवाहन राजलक्ष्मीला चांगले दिवस आले. परंतु पुढे दोनचार राजांच्या कारकीर्दीनंतर अवघ्या ५० वर्षात सातवाहनसत्ता महाराष्ट्रातून संपुष्टात आली. तरी महाराष्ट्र हे हिंदुस्थानच्या इतिहास नकाशावर उदयाला आणून अखंड ५०० वर्षे साम्राज्य गाजवून महाराष्ट्राला प्रचंड इतिहास निर्माण करणारा ब्राह्मण राज्यकर्ता वंश म्हणून महाराष्ट्राला याचे ऋण कधीही विसरता येणार नाही व कल्याणला तर नाहीच नाही.

◻ ◻ ◻

Scanned with Ca

: ५ :

सातवाहनकालीन कल्याणचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन

ख्रिस्तपूर्व ३ ऱ्या शतकांतील भरभराटलेली प्रसिद्ध शहरे म्हणजे कल्याण, सोपारा, पैठण, नगर, नेवासे, नाशिक, कोल्हापूर, जुन्नर, वैजयंती वगैरे होत. महाराष्ट्रांतील लेण्यांमधील शिलालेख व शिल्प, गाहासत्तसई, पेरिप्लस ऑफ एथेरियनसी, तांबड्या समुद्राचा वाटाड्या हा ग्रीक तांडेलाने लिहिलेला रोमन ग्रंथ, महाराष्ट्रातील व सोपारे येथील उत्खनने ह्या विविध साहित्यातून सातवाहनकालीन समाजाचे बहुरंगी व बहुढंगी दर्शन घडते. तेंच कल्याण शहराचेही असले पाहिजे यात शंका नाही.

नागरी जीवन

व्यापारामुळे कल्याण शहरामध्ये परदेशी ग्रीक, यवन, अरब, रोमन, शक, वगैरे असंख्य व्यापारी येऊन स्थाईक झाले होते, व भारतीय जीवनाच्या धार्मिक व सामाजिक जीवनाशी एकरूप होऊन येथील समाजांत मिसळून गेले होते. येथील स्थानिक व्यापारी देखील तसाच अत्यंत सधन होता. हे शहर त्यामुळे श्रीमंत व्यापाऱ्यांच्या टोलेजंग सुंदर प्रासादांनी गजबजलेले होते. रस्ते फरसबंद होते. किनारा व आंतर भागात मालांची प्रचंड गुदामे होती. बाजारपेठात निरनिराळ्या मालाचे विभाग होते. उत्तम जवाहिरे, सुवर्णकार, ह्यांच्या टोलेजंग पेढ्या, व्यापारी पेढ्या, शेठ, सावकार ह्यांची दुकाने, यांच्या उद्योगाप्रमाणे कापडबाजार, जवाहिरे बाजार, सराफ बाजार, कांच बाजार, वगैरे निरनिराळे विभाग होते. रस्ते, दुकाने देशोदेशीच्या गिऱ्हाइकांनी गजबजलेले असत. लमाणांचे प्रमुख मालाची नेआण करीत. गावाबाहेर लमाणांचे तांडे उतरण्यासाठी बागा असत. आज कल्याणात घोडेखोत आळी म्हणून एक भाग आहे. तो त्याच नावाचा अंश शिल्लक आहे. काळ्या तलावाच्या पुढे असलेली रामबाग ही आंब्यांची राई होती. पुढे मुरारशेठचा बाग म्हणून जो भाग आज मुरबाडरोडच्या बाजूला आहे त्या जागेवरील बाग या सर्व ठिकाणी लमाणांचे तांडे उतरण्याच्या सोई होत्या. आज असलेला काळा तलाव त्या काळापासून या सर्वांना पाण्याच्या सोईसाठी केलेला होता.

Scanned with Ca

सातवाहनकालीन एक मऱ्हाठी जोडपे – शिल्प, कार्ले

सातवाहन कालांत तटबंदीयुक्त असलेल्या शहरात कल्याण शहराची गणना होती; त्यामुळे शहर व पेठ असे त्याचे भाग पडले होते. तटबंदीच्या सर्व बाजूंनी कल्याणच्या खाडीचे पाणी फिरवून खोदलेला खंदक होता. हा खंदक सुमारे ३० फूट रुंद होता. त्यावरून पलीकडे जाण्यायेण्यासाठी तटबंदीच्या प्रत्येक दरवाजासमोर काढता घालता येण्यासारखे लोखंडी चक्रीयुक्त पूल होते. तटबंदीला एकूण ११ बुरुज होते व चार प्रमुख दरवाजे होते. त्यापैकी एक मुख्य म्हणजे टिळक चौक ते नवे पोस्ट बिल्डिंग या दरम्यान एक होता, तेच कल्याणचे महाद्वार. त्यालाच पुढील काळांत गणेश दरवाजा हे नांव मिळाले. दुसरा दरवाजा म्हणजे बोरगांवकरांचे घराजवळ गांधारीकडे जाणाऱ्या रस्त्यावर त्या बाजूला तोंड करून असलेला अंधार दरवाजा. तिसरा महत्त्वाचा दरवाजा म्हणजे दुर्गाडी किल्ल्याच्या पायथ्याशी दिल्ली-कडे तोंड करून असलेला दिल्ली दरवाजा. हे नांव तेव्हा होते किंवा नाही हे माहीत नाही, परंतु मोगल कालापासून हे नांव प्रसिद्ध आहे. चवथा दरवाजा म्हणजे बंदरा-वरून दूधनाक्याकडे येणाऱ्या रस्त्याच्या तोंडाजवळ आज जो नगारखाना दिसतो त्याचे किल्ल्याचे बाजूला बंदराचा उतार होता तेथे होता. तो बंदर दरवाजा होय.

तसे अन्सारी चौकातून बंदराकडे जाताना मराठी शाळेकडे जी गल्ली वळते त्या समोर एक दरवाजा होता; त्याचे नांव पनवेल दरवाजा होय. हीच नांवे परंपरेनें सातवाहन कालापासून टिकून आहेत असे दिसते. बाकीच्या राज्यकर्त्यांनी काही कमी-जास्त दरवाजे पाडले. उदा. रामाजी महादेव दरवाजा सध्या कासार हाटात असलेले श्री. पारिंगे यांचे घराचे जवळील जागेवर होता. सातवाहन कालापासून कल्याण हे तटबंदीयुक्त शहर असून त्या ठिकाणी काही राज्यकर्त्यांनी आपली राजधानी केलेली होती. त्यामुळे ही तटबंदी वेळोवेळी निरनिराळ्या राज्यकर्त्यांच्या काळांत दुरुस्त केली गेली. मातबरखान नांवाचा एक औरंगजेबाचा सरदार संभाजीच्या मृत्यूनंतर या ठिकाणी सुभेदार होता. तो सुमारे २० ते २५ वर्षे कारभार पाहात होता. परंतु त्याला सतत लढाया वगैरेत गुंतून पडावे लागले होते व त्याची आता पत्रे प्रसिद्ध झाली आहेत, त्यावरून तो सदा कर्जबाजारी होता असे दिसते व कल्याण शहराची एवढी प्रचंड तटबंदी त्याने बांधून काढली असे म्हटले जाते; पण ते खरे दिसत नाही. कारण एकतर तेवढा खर्च औरंगजेबाने मान्यही केला नसता व तसा उल्लेख नाही व तेवढे उत्पन्नही कल्याण प्रांती नव्हते. कारण सर्व प्रांताचा वसूल सैन्य व इतर प्रांताच्या सुख़सोई, दरबारी भरणा वगैरे गोष्टींना पुरून उरणारा नव्हता व एवढे प्रचंड काम करावयास बादशहाने मंजुरी दिल्याचा उल्लेख उपलब्ध नाही; व तेवढा वेळही त्याला नव्हता. तेव्हा दुरुस्ती केली इतपतच त्याचे श्रेय आहे व तशी दुरुस्ती तर पुढे शाहूनेही बंदर बाजूची भिंत बांधून केली आहे व त्याचा पुरावाही उपलब्ध आहे. म्हणजे कल्याण शहर हे अगोदरपासूनच तटबंदीयुक्त होते हेच अधिक सयुक्तिक आहे. सातवाहन काळांतच ते एवढे समृद्ध शहर होते व अत्यंत महत्वाचे बंदर होते व भोवतालचा प्रदेशही घनदाट अरण्यांनी गजबजलेला होता. म्हणून कल्याण शहराची तटबंदी त्याच काळात होणे आवश्यक होते व झालीही होती यांत संशय नाही. तटबंदीची उंची सुमारे १५ ते १८ फूट व जाडी सुमारे तळाशी २५ फूट व वर १२ फूट रुंद रस्ता चौफेर होता. आज पुण्यातील पेशव्यांच्या शनिवार वाड्याची जी तटबंदी दिसते त्याच स्वरूपाची ही तटबंदी होती असे म्हटले म्हणजे त्याच्या भव्यतेची खरी कल्पना येऊ शकेल. या तटबंदीपुढे ३० फूट रुंदीचा ३० ते ४० फूट खोल खंदक चौफेर होता. एवढा प्रचंड कोट असलेले व खंदकाने वेढलेले अपरांतातील हे एकमेव शहर होते. प्रत्येक दरवाजावर द्वाररक्षकांची शिबंदी होती. योग्य तपासणीखेरीज कोणालाही आत येण्यास मज्जाव असे. बुरुजावरून सशस्त्र पहारेकरी पहारा देत असत. प्रत्येक दरवाजावर एक नगारखाना असे व तेथे दर प्रहराला तास वाजवण्याची व्यवस्था असे. सकाळी सूर्योदयाला शहराची प्रवेशद्वारे उघडली जात. खंदकावरील पूल टाकून शहरांत रहदारी सुरू होत असे. सूर्यास्ताबरोबर खंदकावरचे पूल उचलले जात व महादरवाजे बंद होत. रहदारी बंद होत असे.

शहरांत फक्त श्रीमंत सुखवस्तु सावकार, व्यापारी इत्यादि लोकांची वस्ती असे. आतील बाजूस मंदिरांचे कळस उगवत्या सूर्याबरोबर चमकू लागत व गाभारे वेदोघोषांनी निनादू लागत असत. विशिष्ट भागात ब्राह्मण वस्ती होती. त्यांच्या वेदपाठशाळा होत्या व त्यांची सर्व सोय श्रेष्ठी व श्रीमंत व्यापारी करीत असत. ब्राह्मणांनी वेदाध्ययन करावे, धर्मचर्चा करावी, पुराणिक-हरदासांनी कथाकीर्तन रंगवून लोकशिक्षण करावे, विद्वान शास्त्री पंडितांनी ग्रंथरचना करावी, विद्येचा प्रसार करावा, लोकात शिक्षण व धर्म यांचा प्रसार करावा व नगर सामंत, राजे, श्रीमान व श्रेष्ठी यांनी त्यांची संभावना करावी, सोय करावी, अशी पद्धत असे. श्रीमंत सावकार व राजे वगैरे पालखी, रथ इत्यादि वाहनांचा उपयोग करीत.

घरांची बांधणी पक्की होती. घरांचे आकार काटकोनी असून प्रत्येक खोली १२ × १५ किंवा १२ × १३ या मापाची असे. भिंतीच्या विटा एकावर एक जोर येणार नाहीत अशा पद्धतीने ठेवलेल्या असत. शिवाय खालच्या विटा आडव्या तर वरच्या उभ्या या पद्धतीने उभारलेल्या असल्यामुळे बांधणी भक्कम असायची. विटा देखील २१ इंच लांब, ११ इंच रुंद, ३ इंच जाड अशा मोठ्या होत्या. जमिनीत पाया मजबूत दगडी घेऊन त्या चौकोनी दगडी पायावर सागाच्या खांबाची चौकट असावयाची व त्या सांगाड्यावर आडव्या लगी टाकून अनेक मजले करीत. सात मजल्याएवढ्या उंच हवेल्या बांधलेल्या होत्या. त्यावरील छपरे वासे टाकून विशिष्ट प्रकारची नळीची कौले ठेवीत असत. ही कौले चौकोनी आकाराची असून वरच्या भागास पन्हाळ्या–नळ्या केलेल्या असत. पावसाचे पाणी झटकन निघून जाता यावे अशी व्यवस्था असे. कौलांना वरच्या अंगास दोन छिद्रे असून ती खिळे ठोकून लाकडावर पक्की केलेली असत. कारण पावसाचे मान त्या काळी फार होते. अशी लोखंडी खिळ्यांनी ठोकलेली कौले नालासोपारा येथे सापडली आहेत.

सातवाहनकाळी कल्याण नगरामध्ये घरांतील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था उत्कृष्ट होती. सांडपाण्याची व्यवस्था हे उत्कृष्ट नगर रचनेचे अंग असते. त्यामुळे पैठण, नालासोपारा वगैरे सर्व ठिकाणी उत्खननात जी पद्धत आढळली तीच कल्याण येथे होती. कल्याण येथील उत्खननाचा उल्लेख आढळत नाही. याचे महत्वाचे कारण हे लक्षात घेतले पाहिजे की ज्या ज्या ठिकाणी उत्खनन झाले ती शहरे नष्ट झाली आहेत, म्हणून उत्खनन झाले; परंतु कल्याण कधीच नष्ट झाले नाही. ते वाढते आहे. भरभराटत आहे म्हणून उत्खननाला वाव मिळाला नाही व ज्यावेळी थोडी शक्यता होती त्यावेळी इतर ठिकाणची उखनने चालू होती. आता उत्खनन कल्याणचे बाबतीत शक्य नाही. म्हणून कल्याणसंबंधी सर्व गोष्टी बाकीच्या शहरांसारख्याच असाव्यात एवढ्या तर्काने प्रत्येक वेळी समजून घ्यावे लागेल. कल्याण शहरात कधी उत्खनन झाले असते तर कितीतरी अद्भूत

Scanned with Car

अलौकिक गोष्टी या शहराच्या इतिहासासंबंधी व वैभवासंबंधी सापडल्या असत्या. आज त्या सर्व कल्याणच्या भूगर्भात दडलेल्या आहेत. त्या तर्काने व संदर्भावरून जाणूनच त्याचे वैभवाचे तर्कचित्र मनःचक्षूसमोर उभे केले पाहिजे.

सांडपाण्यासाठी चौकोनी विटांनी किंवा बहिर्गोल विटांनी बांधून काढलेले कप असत. काही ठिकाणी हे कूप एकाला एक जोडलेले असत व शिवाय ते पाणी शहरात विटांनी बांधून काढलेल्या खोल गटाराला जोडलेले असे.

पाणी साठवण्यासाठी मातीचे व दगडी रांजण असत. लोक मांसाहारी व शाकाहारी दोन्ही प्रकारचे होते. गहू, हरबरा, तांदूळ हे धान्याचे प्रकार होते. ख्रिस्तपूर्व काळात पीठ दळण्याची जाती नसल्यामुळे रात्रभर भिजत ठेवलेले धान्य पाटचावर वाटून जाडीभरडी भाकरी लोक खात असावेत. परंतु श्रीमंत व्यापारी, धनिक वगैरे सुखवस्तू लोकांना रोमहून आलेल्या जात्यांचा उपयोग माहित होऊन त्यांच्या घरात जात्यावर दळलेल्या पीठाच्या भाकरी, गव्हाच्या पोळचा वगैरे वस्तू खाण्यात होत्या असे दिसते.

ठिकठिकाणच्या शिल्पाकृतीवरून केशभूषा, वेशभूषा कशी होती, अलंकार कोणचे वापरत असत याचा अंदाज येतो. उत्खननांत मिळालेला पुरावाही याला पुष्टीदायकच ठरतो. सोपारा, नाशिक, पैठण येथील उत्खननात भाजलेल्या मातीच्या मूर्ती, डोक्यातील, गळचातील, हातावरील, कमरेवरील आणि पायांवरील आभूषणे यांचे आकर्षक दर्शन घडवतात. डोक्यावरील विविध ढंगाच्या पगडचा, कपाळावरील बिंदी, भांगातून रुळणारी मोत्यांची माळ, कानात कर्णफुले, कुंडले, गळचांतील एकसरी, कमरेवरील मेखला, हातातील कंकणे, वलये, भुजांवरील बाजूबंद, पायांतील वलये व नूपरे ही आपादमस्तक भूषणे असावीत असे दिसते; व त्यांतच जनतेची रसिकताही प्रकट होते, सौंदर्यदृष्टी प्रतीत होते. याशिवाय शंखाची कर्णफुले, काचेच्या गोल चकत्या, शंखाच्या हरतऱ्हेच्या नक्षीदार बांगडचा, काजळ लावण्यासाठी हस्तीदंती सळया, दगडाचे, शंखाचे, काचेचे व मातीचे विविध प्रकारचे घडवलेले मणी, आणि अंग स्वच्छ करण्यासाठी मातीच्या वज्रचा या उत्खननांत विपुल प्रमाणात आढळतात. अर्थात सौंदर्य-प्रसाधनांच्या व अलंकारांच्या या वस्तु रसिकत्व प्रगट करतात. मनोरंजनासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तुही या उत्खननात सापडल्या आहेत. हस्तीदंती फासे आणि लहान मुलांसाठी केलेल्या मातीच्या बाहुल्या, बैल, हत्ती यासारखी खेळणी, खुळखुळणारी खेळणी, चाके, आणि भिंगऱ्या शेकडचांनी सापडल्या आहेत. उत्खननात चाकू, भाले, बाणांची टोके, खिळे इत्यादि वस्तू विपुल सापडल्या आहेत. त्यावरून लोखंडाचा पुष्कळच उपयोग होत होता असेही दिसते.

समाज–बव्हंशी व्यावसायिक श्रेणी किंवा वर्गात संघिटत होता. मालाकार, हालिक, धान्निक, लोहवाणिज, वसाकार, कोलिक, कुलरिक, दासक, सुवर्णकार, वाणिज

Scanned with Car

हिरणक, निगम, सेठि सार्थवाह, मणिकार, ह्या व्यावसायिक जातींमध्ये समाज विभागला गेला होता. याव्यतिरिक्त ब्राह्मण, शक, यवन, असेही समूह होते.

स्त्री-समाज–या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान होते. लेण्यांमधील दानपत्रांत पुरुषाच्या बरोबरीने स्त्रियांची दाने आहेत. नाशिक, आणि कुडे येथील चैत्यगृहे स्त्रियांच्या दानांतून खोदली गेलेली आहेत. कार्ले येथील चैत्यगृहालाही स्त्रियांची दाने आहेत. नाशिक येथील लेण्यात विष्णूदत्ता या शक स्त्रीने ३५०० कार्षापण एवढी रक्कम दान दिली आहे. कुटुंबात पतीबरोबर पत्नीलाही महत्वाचे स्थान होते. कान्हेरी आणि नाशिक येथील एका दान देणाऱ्याने धर्मादायाचे पुण्य स्वतःसाठी तर घेतले आहेच; पण कुटुंबातील आई, वडील, पत्नी, भाऊ, बहिण, पुत्र आणि कन्या यांच्यासाठीही राखून ठेवले आहे. महाभोजी, महारठिनी, भोजिकी, कुटुंबिनी, गहिनी, (वहिनी) वाणियिनी या संबोधनांनी त्या काळांतील स्त्री शिलालेखातून गौरविली गेली आहे. सातकर्णीची राणी नायनिका, गौतमीपुत्र सातकर्णीची आई महादेवी, राजर्षिवधू महाराज माता, महाराजपितामही गौतमीबलश्री वाशिष्ठीपुत्र पुळूमावीची आई वासिष्ठी जीवसुता, ही कर्तबगार स्त्री सातवाहन राजघराण्याला भूषविती झाली.

सामाजिक स्थिती–सातवाहन काळांत समाज हा बहुजिनसी, बहुजातीय, बहु-धर्मीय व बहुवर्गीय आहे. परंतु जातिनियम व धार्मिक वळण यामुळे श्रीमंत व गरीब यामधील संघर्षाला कुठेही तोंड फुटलेले नाही. धार्मिक जीवनांत स्पर्धा आहे. पण कटुता नाही. शिवस्कंद, शिवपालित वगैरे शिवोपासकांनी बौद्ध विहारांना दाने दिलेली आहेत. बौद्ध धर्म हा संघाधिष्ठित असल्यामुळे बहूजन समाजाला धर्माच्या चौकटीत स्थान नव्हते. बौद्ध भिक्षूनी आठ महिने आपले विचार, प्रवचने, व्याख्याने या द्वारे जनतेच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करावा, पावसाळचाचे चार महिने विहारांत एकांतवास पत्करावा अशी प्रथा असे. धर्माची दीक्षा घेऊन धर्मांतर घडवून आणून आपल्या अनुयायांची जात निर्माण करण्याचा प्रकार नव्हता. त्यामुळे लोक एकीकडे मातृदेवतांची, यक्षप्रतिमांची, वैदिक किंवा भागवत संप्रदायातील देवतांची पूजा करीत व एकीकडे बौद्ध लेण्यांतील चैत्यालाही वंदन करीत. जी गोष्ट बहुजन समाजाची तीच ब्राह्मणांची. कुडा येथील लेण्याला दान देणारा बौद्ध उपासक स्वतःला ब्राम्हण म्हणून घ्यायला विसरत नाही व आपली पत्नी ब्राम्हणी असल्याचे सांगायलाही विसरत नाही.

कान्हेरी लेण्यांतील गजसेन व गजमित हे व्यवसायाने वाणी आहेत; पण आपण 'खतिय' (क्षत्रिय) असल्याचे सांगतात. म्हणजे लोक वैदिक धर्म, जाती, वर्ण–व्यवस्था पाळीत. परंतु हे भेद फारसे मानले जात नसत व एकमेकाचे व्यवसाय खुशाल करीत; क्षत्रिय वाणिज्यही करीत हे वरील उदाहरणावरून दिसून येईलच.

Scanned with Car

परंतु ब्राह्मण हे देखिल बहुधा त्यावेळी राजे होते व क्षत्रिय वृत्तीचे पालन करीत. सातवाहन राजे ब्राह्मणच होते. परंतु आचरणाने मात्र क्षत्रिय व्हावे लागले व झाले होते. अशा तऱ्हेने समाजांत वर्ण होते, परंतु त्यांची सतत सरमिसळ होत असे.

एकत्र कुटुंबपद्धती हे त्या समाजाचे दुसरे वैशिष्टय होय. अनेक दानपत्रांतून सर्व कुटुंबाची नावे दिलेली आढळतात. त्यांचा वय, आदर, याप्रमाणे क्रम लावलेला आढळतो. स्त्रियांना आदराने वागवीत व बरोबरीचे स्थान असे. डॉ. गोपालाचारींच्या अंदाजाप्रमाणे जवळ जवळ १४५ शिलालेखातून स्त्रियांनी दाने दिलेली नमूद आहेत. म्हणजे स्त्रियांना सामाजिक अधिकार मोठा असे यांत शंका नाही. स्त्रियांची वेष-भूषा म्हणजे कमरेला एक दोन तीन वळशाचे वस्त्र गुंडाळलेले असून पुढे थोडा भाग लोंबता असे. छातीचे आच्छादनाची खास प्रथा नव्हती. फक्त कांचोळीवजा वस्त्र असे. पुरुषांचे वस्त्र तागाचे, व थोडा भाग खांद्यावरून टाकलेला असे. डोक्या-वर फेटेवजा वस्त्र बांधलेले असे. कानांतले अलंकार, बांगड्या, गळ्यांतले वगैरे पुरुष व स्त्रिया सारखेच वापरीत; परंतु स्त्रिया कोपरापर्यन्त बांगड्या वापरीत व दंडातही कड्यासारखे अलंकार असत. स्त्रिया पायांतही अलंकार घालीत.

आर्थिक क्षेत्रात शेती हा प्रत्येकाचा प्रमुख व्यवसाय होता; व सरकारी शेती देखील होत असे. त्यामुळे गाई, जमिनी, ही मोठी संपत्ती मानली जात असे; व दानही त्याचेच करीत असत, असे निरनिराळ्या दानपत्रांवरून दिसून येते. राजांची स्वतःची शेती असे. तसेच प्रजेकडून उत्पन्नाचा $\frac{1}{6}$ सरकारी वसूल म्हणून गोळा केला जात असे. मीठ उत्पादन फक्त राजाच्या मालकीचे असे. या व्यवसाया-खालोखाल निरनिराळे उद्योग व व्यापार यांना स्थान असे. परंतु कोणत्याही वर्णाचे, जातीचे लोक असोत, शेती करीतच असत. ब्राह्मणही शेतीच करीत. विविध प्रकारचे कारागिरांची नोंद शिलालेखांतून आढळते. नासिक जुन्नर शिलालेखात उल्लेख झालेले कुंभार, ओदयांत्रिक (हायड्रॉलिक, इंजिनिअर), तिलापिसक (तेली), धान्निक (धान्यव्यापारी), कोलिक (कोष्टी), वासकार (बुरुड), कासकार (कासार) धातूंची भांडी बनविणारे वगैरे नांवे आहेत. प्रत्येक व्यावसायिकाची एक संघटना असे व त्यांना श्रेणी म्हणत. त्यांचे राज्यात फार वजन असे. श्रेणीधर्म म्हणजे संघटनेचे नियम, यांना कायद्याचा पाठिंबा असे. त्यामुळे व्याव-सायिक व व्यापारी यांच्या हितसंबंधांचे रक्षण होत असे. या संघटनांचे प्रमुख वैशिष्ठ्य म्हणजे आर्थिक सहाय्य व बँकाप्रमाणे सवलती सोयी होत असत. या संघटना लोकांकडून ठेवी व दाने घेत व एका विशिष्ट पद्धतीने त्यांच्या उत्पन्नाचा विनियोग करीत. नाशिक येथील शिलालेखात एक उदा. आहे. गोवर्धन राष्ट्राच्या (नाशिकजवळील भाग) एका कोष्टी संघटनेने २००० कार्षापण महिना १ टक्का व्याजाने ठेव घेतली व दुसरी एक ठेव –।।।' मितीने १००० कार्षापण घेतली.

Scanned with Car

मोठ्या रकमेचे व्याजातून नाशिक येथील २० संन्याशांना कापड व पैसे प्रत्येकी १२ कार्षापण द्यावयाचे व लहान रकमेच्या व्याजातून त्यांना इतर खर्चासाठी द्यावे अशी अट ठेवीदाराने घातलेली आहे. या ठेवी कायम स्वरूपाच्या असत. जुन्नरच्या एका सामान्य शक भक्ताने दिलेल्या दानपत्रात दोन शेतांचे उत्पन्न कोणाचिका येथील एका संघटनेला करंजाची झाडे व निंबाची झाडे लावण्यासाठी दिले. या संघटनांना स्वतःच्या नांवे दान देण्याचा अधिकार असे. जुन्नर येथील शिलालेखात सात खोल्यांची गुहा व एक पाण्याचे कुंड धान्यव्यापाऱ्यांच्या सोयीसाठी, मुक्कामासाठी दान दिलेले आहे. यावरून संघटना दीर्घ काळ टिकणाऱ्या असल्या पाहिजेत व व्यवहार अत्यंत प्रामाणिक असला पाहिजे. त्या शिवाय लोक कायम स्वरूपाच्या ठेवी देत नसतील. या ठेवींचा उपयोग व्यापाऱ्यांना भांडवल म्हणून होत असे व व्यापारी साहसे करण्यास प्रोत्साहन मिळत असे. कल्याण शहर प्रसिद्ध व्यापारी शहर असल्यामुळे अनेक श्रीमंत व्यापारी, सराफ, सावकार, यांचा जणू हा गाव होता. यांनी व्यक्तिगत दिलेली दाने व्यापार व धर्म यासाठी प्रसिद्ध आहेत. (१) कान्हेरी लेणी (इ. स. १३३ ते १६२) या काळात लेणे नं. १/२ च्या लेखांत कल्याण प्रसिद्ध श्रीमंत सोनार स्वामिदत्त याने भिक्षू व व्यापारी यांचे साठी एक पाण्याचे टाके दिले. (२) लेणे नं. ३ मध्ये देखील कल्याण व सोपारे येथील व्यापाऱ्यांच्या दानाचा उल्लेख आला आहे. (३) लेणे ३०/४० कल्याणचा व्यापारी गोलनाक याचा पुत्र ऋषीपाल याने सफादू गांवी (सफाळे असावे) एका श्रेष्ठीसभेला दान दिले. त्याच्या उत्पन्नातून प्रत्येक भिक्षूला पावसाळ्यात एक वस्त्र, उन्हाळ्यात एक प्रतिक व जमल्यास मांडव द्यावा. (४) लेख २ रा यामध्ये माधवीपुत्र सेन राजाच्या कारकीर्दीच्या ८० व्या वर्षी कल्याणचा प्रसिद्ध व्यापारी वेणूनंदी याच्या मुलाने वरीलप्रमाणेच एक देणगी दिली आहे. (५) ले. ३१ वा मध्ये कल्याण प्रसिद्ध श्रेष्ठी सुलुसदेव याने एक चैत्य बांधून दिला असा उल्लेख आहे. (६) तसेच लेख ३३ मध्ये कल्याणचा श्रीमंत सोनार कुर्दार याचा पुत्र साधक याने बौद्ध भिक्षु व व्यापारी प्रवासी याजकरिता एक पाण्याचे टाके बांधून दिले असा उल्लेख आहे. अशा तऱ्हेने कल्याण, सोपारा इत्यादि ठिकाणच्या व्यापाऱ्यांच्या संपत्तीतूनच सार्थवाह मार्गावरील सर्व लेणी व विहार ही निर्माण झालेली आहेत हे दिसून येईल. त्यायोगे त्या काळच्या श्रीमंतांनी धर्म, समाज, प्रवासी, व्यापार, कला, व्यवसाय याकरिता आपल्या संपत्तीचा विनियोग करून कल्याण शहराचे नाव अजरामर करून ठेवले आहे. लोनाड येथील चैत्य, लेणी व विहार हे तर कल्याणच्याच श्रीमंत सावकार यांच्या संपत्तीतून निर्माण झाले आहेत व ती कल्याणकरांची चिरंतन स्मारकेच होत. परंतु आज ती सर्व उपेक्षित आहेत. पडझड होत आहे. लोनाड येथील लेणी अजंठाच्या बरोबरीची आहेत व त्यात राजदरबारचे जे दृश्य आहे ते अजंठ्यात असलेल्या चित्राची प्रतिकृती आहे.

◻ ◻ ◻

Scanned with Ca

: ६ :

सुभे कल्याणचे दर्यावर्दी स्वामी शिलाहार

घारापुरी येथील शिलाहारकालीन त्रिमूर्ती शिल्प

या शिलाहारांनी आपणास तगरपुराधीश्वर ही पदवी वंशपरंपरेने घेतली होती. त्यांचा सुवर्ण गरुडचिन्हांकित ध्वज होता. हे दक्षिण कोकणच्या शिलाहारांप्रमाणेच राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. त्यांचा आरंभ दक्षिण कोकणचे म्हणजे गोवे येथील कदंब शिलाहार ह्यांचे मागून सुमारे ६० वर्षांनी झाला व कोल्हापूर शिलाहार यांचे पूर्वी १२५ वर्षे अगोदर झाला. त्यांची स्थापना मौर्यांचे राज्य बुडवून राष्ट्रकूटांनी केली असावी. यांचा संस्थापक कपर्दी हा पराक्रमी पुरुष निघाला. त्याने बहुधा त्यावेळचा राष्ट्रकूट सम्राट **अमोघवर्ष** पहिला याच्या साम्राज्य विस्तारास मदत केल्यामुळे त्यास उत्तर कोकणचा मांडलिक नेमले असावे. त्या काळी उत्तर कोकणास कर्पादिका द्वीप किंवा कवडी द्वीप म्हणत असत. हे नाव कर्पादि याच्याच नावावरून पडले असावे. त्याच्या ताब्यात वसई, मुंबई, कुलाबा, जंजिरा व रत्नागिरी जिल्हयाचा उत्तर भाग होता. त्याच्या राज्यांत सुपारी, नारळ, आंबा यांचे उत्पन्न मोठे होते. कपर्दीचा पुत्र महासामंत पुल्लशक्ती याचा कान्हेरीच्या लेण्यात एक शिलालेख असून त्यात तो आपणास कोकणचा अधिपती म्हणवितो. पुल्लशक्तीचा मंत्री विष्णू याने कृष्णगिरी उर्फ कान्हेरी येथील बौद्ध भिक्षूंना लेण्याची डागडुजी, वस्त्रे व पुस्तके याकरिता देणगी दिली. पुल्लशक्तींची राजधानी पुरी–घारापुरी होती. पुल्लशक्ती व कपर्दी दुसरा यांच्या वेळचे दोन लेख एक इ. स. ८५३ चा व दुसरा ८७७ चा कान्हेरी लेण्यांत आहेत. त्यास लघुकपर्दी असेही नाव आढळते. तो लहानपणीच गादीवर आला असावा. त्यावेळी अमोघवर्ष हाच राष्ट्रकूट सम्राट होता. दुसऱ्या कपर्दी मागून त्याचा पुत्र वप्पुवन्न हा राजा झाला व त्यानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र झंझ हा मोठा शिवभक्त निघाला. खारेपाटण

Scanned with Ca

येथील शिलालेखात त्याने शंकराची १२ देवळे बांधल्याचे वर्णन आहे. याची पत्नी राष्ट्रकूट घराण्यातील होती. याची मुलगी लछियव्वा ही भिल्लम दुसरा यास दिली होती व झंझाचा भाऊ गोग्गीराज याची कन्या श्रीनाथीयलदेवी ही भिल्लमाची पट्टराणी होती. याचा अर्थ भिल्लमाने चुलत बहिणीशी लग्ने केली होती. झंझ इ. ९५० मध्ये मरण पावल्यावर त्याचा भाऊ गोग्गी याजकडे राज्याधिकार आला. गोग्गी हे गोविंद शब्दाचे लाडके रूपांतर आहे. गोग्गी उर्फ गोविंद हा भीष्म-द्रोणाप्रमाणे शूर असल्याचे व घराण्याची कीर्ती वाढविल्याचे एका ताम्रपटांत वर्णन केले आहे. याच्यानंतर वज्जड पहिला हा राजा झाला. याच्या कारकीर्दींत (इ. स. ९६० ९७५) राष्ट्रकूट साम्राज्य मोडून कल्याणच्या चालुक्य सामग्रज्याची स्थापना झाली होती. परंतु वज्जड व त्याचा पुत्र अपराजित यांनी राष्ट्रकूटांच्या विरुद्ध झालेल्या उठावात भाग घेतला नाही व चालुक्यांचे स्वामित्व स्वीकारण्याचे टाळले.

वज्जडानंतर राजा अपराजित याने इ. स. ९९७ मध्ये दिलेला ताम्रपट आढळला आहे. त्यात तो स्वतःला महासामंताधिपती व महामंडलेश्वर या पदव्या घेतो. तसेच त्याला मृगांक व बिरूपकाम अशाही पदव्या होत्या. परंतु चालुक्याचा मांडलिक म्हणवून घेता राष्ट्रकूट साम्राज्य मोडल्याबद्दल खेद व्यक्त करतो. यावरून बराच काळपर्यंत त्याने चालुक्य सत्तेपुढे मान झुकविण्याचे टाळले आहे. इ. स. १०९५ च्या खारेपाटण येथील ताम्रपटांत अपराजिताने गोप राजास मदत केली, ऐय्यदेव राजास पुन्हा राज्य मिळवून दिले व भिल्लम राजास अभय दिले. यावरून चालुक्याना न जुमानता स्वतः सम्राट होण्याचे कारस्थान असावे.

चालुक्य सम्राट दुसरा तैल इ. स. ९९७ मध्ये मरण पावला; तोपर्यंत तरी अपराजिताने चालुक्याचे अधिराज्य मान्य केले नव्हते. परंतु नंतर त्याचा पुत्र सत्याश्रय चालुक्य गादीवर आला. त्याच्यावर दक्षिण कोकणचा रट्टराज (कदंब) याची भक्ती होती व त्याचा मांडलिकही होता. चालुक्य सम्राट सत्याश्रयाने अपराजितावर शरण आणण्यासाठी स्वारी केली त्यांत अपराजिताचा पराभव झाला. रण्ण नावाच्या कानडी कवीने आपल्या ग्रंथात या स्वारीचे वर्णन केले आहे. तो लिहितो, "सत्याश्रयाने कोकणाधीश अपराजिताचा पराभव केला तेव्हा तो समुद्राकडील राजधानी पुरी येथे पळून गेला. एकीकडून खारा समुद्र व एकीकडून सत्याश्रयाचा सेनासमुद्र ह्यांच्या कचाटयांत सापडलेल्या अपराजिताची स्थिती दोन्ही टोकांनीं जळत असलेल्या काडीवरील किडयाप्रमाणे झाली." तेव्हा अपराजिताने २१ हत्तींची खंडणी देऊन त्याचे अधिराज्य कबूल केले. ही गोष्ट इ. स. १००५ च्या सुमारास घडली असावी ('शिलाहारांचा इतिहास' डॉ. आळतेकर) त्यावरून त्याचे काळी उत्तर शिलाहारांची राजधानी पुरी–घारापुरीच होती असे दिसते.

अपराजिताने भिवंडी तालुक्यातील भादणे हा गाव एका ब्राह्मणास दिल्याचा ताम्रपट इ. स. ९९७ मधील सापडला आहे. या दोन समयी अपराजितांचा मुक्काम

Scanned with Car



शिलाहारांनी लोनाड येथे बांधलेले लोणादित्याचे मंदिर

श्रीस्थानक उर्फ ठाणे येथे होता. स्थानक उर्फ ठाणे ही अपराजिताची दुसरी राजधानी होती. अपराजिताचे दोन ताम्रपट इ.सं. ९१५ मधील सापडले आहेत. (Important inscriptions from Baroda State Vol I 1943) त्यात ही पुरी हीच आपली राजधानी असल्याचे त्याने नमूद केले आहे. शिवाय त्यात त्याच्या राज्यविस्ताराचेही वर्णन आहे. त्यात म्हटले आहे की, त्याच्या राज्यात ठाणे, कुलाबा, कल्याण वगैरे प्रांत संपानभूमि (सजाण) पूणक देश (पुणे) चिपळूण विषय (चिपळूण) संगमेश्वर असून त्याचे राज्य उत्तरेस लाट देशापासून दक्षिणेस चंद्रपूरपर्यंत पसरले आहे. शिवाय कोकणास लागून देशावरचा मावळ वगैरे भागही त्याच्या राज्यात होता. सदर ताम्रपटाप्रमाणे त्याचे राज्य भिल्लमीय देशाला म्हणजे यादव देशाला भिडले होते. पूणक देश म्हणजे पुणे त्याच्या ताब्यात असल्यामुळे पुण्यातील पाताळेश्वराचे लेणे शिलाहारांनी जोगेश्वरी, मंडलेश्वर, घारापुरी येथील लेण्यांप्रमाणे खोदले असावे ह्या अनुमानास वरील ताम्रपटाने पुष्टी मिळते. अपराजिताचे आमण्णा, केशवाचार्य संगलय्या, हे **महामात्य** होते. सिंहपय्या हा परराष्ट्र मंत्री होता व झंझ हा संधिविग्रह करणारा मंत्री होता. सत्याश्रयाने केलेल्या पराभवानंतर अपराजित लवकरच मरण पावला.

अपराजिताला वज्जड व अरिकेसरी असे दोन पुत्र होते. पैकी वज्जड इ. स. १०१० ते १०१५ पर्यंत राज्य करून कालवश झाला. वज्जड मेल्यावर त्याचा पुत्र छित्तराज अल्पवयी असल्यामुळे त्याचा चुलता अरिकेसरी राज्यकारभार पाहात



लोनाड येथील शिलाहारकालीन लोणादित्य मंदिराचा शिलालेख

होता, व दानपत्रे देत होता. त्याने दक्षिण कोकणचा (राजापूरशिलाहार) काही भाग आपल्या राज्यास जोडला. छित्तराज सज्ञान झाल्यावर त्याने १०५० च्या सुमारास राज्यकारभार हाती घेतला. त्याने स्वतःस महासामंताधिपती व महामंडलेश्वर अशा पदव्या लावल्या. त्या तो चालुक्यांचा मांडलिक असल्याचे दर्शवितात. त्या वेळी त्याची राजधानी पुरी हीच होती. ताम्रपटात आपल्या राज्यांचे वर्णन 'पुरी-प्रमुख चतुर्दश सतिसमन्वितसमस्त कोकणभुवनम्' असे करतो. तिसरा भिल्लम यादव हा त्याचा समकालीन होता. छित्तराजाच्या ताम्रपटावरून त्याच्या ताब्यात शूर्पारक व चेमुली ही गावे होती असे दिसते. भांडुप येथील छित्तराजाच्या ताम्र-पटात ब्राह्मणांना दिलेले शेत नौरा गावांत साष्टी प्रांतात होते. त्याच्या मंत्री-मंडळात श्रीकरण या हुद्याचा मंत्री होता. छित्तराजास आपला राज्यकारभार फार संकटातून हाकावा लागला. त्यावेळी कल्याणचे चालुक्य व धारेचे परमार यांच्यात हाडवैर माजले होते, व सतत लढाया होत होत्या. त्यात कोणाची बाजू घ्यावी हे समजत नव्हते; परंतु चालुक्याचा मांडलिक असल्यामुळे त्याची बाजू घ्यावी लागली म्हणून परमार राजा भोज याचा रोष ओढवून घ्यावा लागला. त्या रागात भोजाने इ. स. १०१९ मध्ये उत्तर कोकणवर स्वारी करून त्यावर आपले वर्चस्व बसविले.

छित्तराजाने अंबरनाथचे प्रसिद्ध देवालय आपल्या कारकीर्दीत बांधले होते. छित्तराजानंतर त्याचा भाऊ मुंमुणी ऊर्फ मामवानी याने राज्य केले. त्याने इ. स.

१०४० ते १०७० पर्यंत राज्य केले. त्याचा एक लेख कल्याणपासून ६ मैलावर असलेल्या अंबरनाथ येथील छित्तराजाने बांधलेल्या देवळात सापडला आहे. त्या लेखात म्हटले आहे की जुन्या कच्च्या देवळाऐवजी दगडाचे देऊळ राजगुरुने बांधविले. (G. R. A. S. मुंबई ९ पान २१९) त्या देवळाजवळ आणखी एक शिलालेख सापडला आहे. त्यात एका स्थानिक अधिकाऱ्याने देवळाजवळ आणखी एक इमारत बांधली असे लिहिले आहे, (J.R.A.S. मुंबई १२ पान ३२९). हाही लेख त्याच मितीचा म्हणजे इ. स. १०६० चा आहे. या लेखाचे वाचन दोनवेळा झाले असून त्यासंबंधीचे विवेचन रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहे. (खंड ९ वा पृ. २१९ व खंड १२ वा पृ. ३२९) शिलालेख सध्या उत्तरेकडच्या प्रवेशद्वारापाशी आतल्या बाजूस बसविलेला आहे. हा लेख लोखंडी पट्टीच्या आत दडलेला असल्यामुळे पूर्ण दिसू शकत नाही. परंतु शिलालेखाच्या सुरवातीची व शेवटची ओळ खालीलप्रमाणे आहे.

(१) शक संवत ९८२ सावण शु. सत्रे समाधिगता शेष पंच महाशब्द महामंडले स्वराधिपते रिपुदैन्यदलन दामोदर ।

(२) सरणागत वज्रपंजरीत्यादि समस्त राजावली विराजमान महामंडलेश्वर श्री माम्बाणि राजदेव।

(३) आम्बनाथ देवकुला.........मेभगल समुद्धरित महामंडलेश्वर श्रीमच्छत्तराज देवस्य भवनम् संपादितम् ।

(देवकुला शब्दापुढची ९ अक्षरे अस्पष्ट झाली आहेत.)

मुम्मुणी राजाची कारकीर्द सुमारे ३० वर्षांची झाली. हा फार पराक्रमी होता. हे शिलाहार राजे दर्यावर्दी राजे होते. ते प्रचंड आरमार बाळगीत. दक्षिण शिलाहार (राजापूर) व उत्तर शिलाहार यामध्ये नेहमी तंटा चाले. मुम्मुणीचे आरमार दक्षिण शिलाहारांपेक्षा बलवान असे. या दोघांच्या भांडणाचा फायदा गोव्याचा कदंब राज्यकर्ता मुम्मुणीचा समकालीन राज्यकर्ता षष्ठीदेव याने घेतला. पूर्वी दक्षिण शिलाहारांचे सबंध कोकण उत्तर शिलाहारांनी जिंकले ते जिंकण्यासाठी कदंब राजा दुसरा षष्ठीदेव याने स्वारी केली. कदंबाचे आरमार मुम्मुणीच्या आरमारापेक्षा बलाढ्य होते. षष्ठीदेवाने चंद्रपुराहून निघून प्रथम नऊशे कोंकण घेतले व नंतर कवडी द्वीपही (साष्टी) काबीज केले. म्हणजे उत्तर कोकणही काबीज केले. परंतु कवडीद्वीप हा उत्तर शिलाहारांचा खास प्रदेश कायमचा जिंकून त्यांना देशोधडीस लावण्याचा निष्ठुरपणा षष्ठीदेवाने केला नाही. मुम्मुणी शरण येताच त्यास सहानुभूतीने वागविले. तेव्हा मुम्मुणी आपली कन्या षष्ठीदेवास देण्यास कबूल झाला. हा लग्नसमारंभ मुम्मुणीने आपली राजधानी ठाणे येथे थाटाने पार पाडला. त्याने

Scanned with Ca

षष्ठीदेवास ठाण्यास बोलावून आपल्या वाड्यात आणले व पाच लक्ष सुवर्णमुद्रा हुंडा म्हणून अर्पण केल्या व कन्या अर्पिली. परंतु षष्ठीदेवानंतर गादीवर आलेला त्याचा मुलगा पहिला जयकेशी हा गादीवर आला. त्याचे आरमार अत्यंत प्रबळ असून आसपासची बेटे व बंदरे यातील राजे व अधिकारी नमून असत. तो चालुक्य राजा सोमेश्वराचा मांडलिक होता. तो आपणास कोकणाधिपती म्हणून म्हणवू लागला, तेव्हा त्याचा सावत्र आजा ठाण्याचा शिलाहार मुम्मुणी याजबरोबर खटका उडाला. मुमुणी व त्याचे युद्ध झाले; त्यात त्याने मुम्मुणीला ठार मारले. मुम्मुणीचा पुतण्या नागार्जुनाचा पुत्र अनंतदेव किंवा अनंतपाल गादीवर बसला. त्याचा एक ताम्रपट सापडला आहे. सन १०९५ च्या त्या लेखात अनंतदेव शिलाहार याने इ स. १०५९ च्या सुमारास आपणावर फार मोठे संकट आल्याचे कबूल केले आहे. तसेच त्या संघर्षात 'पापराशीच्या (कदंब) रक्ताने विटाळलेली तलवार समुद्रात टाकली' असा उल्लेख आहे.याच ताम्रपटात स्वत:ला महासामंताधिपती, महामंडलेश्वराधिपती व पश्चिमसमुद्राधिपती म्हटले आहे. त्याच लेखात त्याने कोकण चौदाशे मधील स्थानक ऊर्फ ठाणे, नागपुरा ऊर्फ नागांव, शूर्पारक ऊर्फ सोपारे व चेमुली ऊर्फ चौल व कल्याण येथील बंदरात येणाऱ्या गाड्याना जकातीची माफी दिल्याचा मजकूर ताम्रपटात आहे. यावरून अनंतदेवाने कदंबाना पिटाळून लावले, चुलत्याच्या वधाचा सूड काढला व त्याच्या रक्ताने माखलेली तलवार पापी रक्ताने विटाळलेली आहे म्हणून समुद्रात टाकली असे तो म्हणतो. अनंतदेवाने परत आपले राज्य मिळवले व कदंबांचा सूड काढला हीच त्याची महत्वाची कामगिरी होय.

अनंतदेव मरण पावल्यावर त्याचा पुत्र अपरादित्य ऊर्फ अपरार्क पहिला (१११०–४०) गादीवर आला. त्याच्या कारकीर्दीत त्याने होयसळ व कदंब यांच्या संघर्षातील फायदा घेऊन कोल्हापूरच्या शिलाहार राजाच्या मदतीने कदंबच्या ताब्यांत गेलेला सर्व प्रदेश काबीज करून आपले आसन स्थिर केले. हा मुलुख गोव्याचा राजा जयकेशिन् दुसरा याने त्याजवर स्वारी करून जिंकून घेतला होता. या काळात अपरार्काची स्थिती फार कष्टप्रद झाली.त्याचे मंत्री शत्रूला मिळाले. बरेच सैन्य लढाईत मेले. खजिना रिता पडला. परंतु तरी त्याने सैन्याची जुळवाजुळव करून आपल्या बाहुबळाने ११२६ त जयकेशीचा पराभव करून कोकणातून त्यांना घालवून दिले. या अपरादित्याचा अनंत पै प्रभू हा गौडसारस्वत ब्राह्मण मुख्यप्रधान होता, असे सारस्वत ब्राह्मणांचा इतिहास या पुस्तकाचे कर्ते रा. न. सोहनी, गडहिंग्लज, यांनी म्हटले आहे व त्याला आधार R. A. S. J. मुंबई १२ अंक १४ पान ३३४. कदंबाचा पराभव केल्यावर अपरार्काने आपले आसन स्थिर करून निरनिराळ्या दरबारी आपले वकील पाठविले. काश्मीरात सापडलेल्या ग्रंथावरून (श्रीमंखाचे श्रीकंठ चरित्र) काश्मीर देशात झालेल्या पंडितसभेला त्याचा दरबारी पंडित तेजकंठ, वसईचा, पाठवला होता. हा राजा स्वतः व्युत्पन्नपंडित असून त्याने

स्वतः याज्ञवल्क्य स्मृतीवर टीका लिहिली आहे व ती विद्वत्‌मान्य आहे. अपरार्कांची टीका तेजकंठ पंडिताने काश्मीरात नेली व तेथे पंडित सभेत मान्य झाली. अद्यापही काश्मीरी पंडित अपरार्क टीकाच प्रमाण मानतात. अपरार्क हा शूर होता, पराक्रमी होता. तसाच पंडितही होता. सरस्वती व रणचंडी यांचा सुरेख संगम एकाच व्यक्तीत एकवटल्याचे अपरार्क हे दुर्मिळ उदाहरण आहे. हा विद्वान राजा इ. स. ११४० च्या सुमारास मरण पावला.

त्याच्या मागून त्याचा मुलगा हरपाळदेव गादीवर आला. त्याची तीन दानपत्रे सापडली आहेत. सन ११४९, ११५०, ११५३ ची आहेत. याने सुमारे १० वर्षे राज्य केले. जास्त माहिती याबद्दल मिळत नाही. त्याच्यानंतर त्याच्या महानंद भावाचा मुलगा मल्लिकार्जुन हा गादीवर आला. याच्या कारकीर्दीत कदंबांचे म्हैसूरजवळील होयसळांशी युद्ध चालू होते; त्यामुळे मल्लिकार्जुनाला दक्षिणेकडून भीती नव्हती. पण त्याच्या उत्तरेस असलेल्या गुजराथमध्ये चालुक्य वंशाचा कुमारपाल नामक पराक्रमी राजा राज्य करीत होता. त्याचे व मल्लिकार्जुनाचे काही क्षुल्लक कारणावरून बिनसले व दोघांत युद्ध जुंपले. या युद्धातील पहिल्या लढाईत मल्लिकार्जुनास विजय मिळाला व कुमारपालाचा सेनापती अंबड यास पळून जावे लागले. परंतु कुमारपाळाकडून त्यास अधिक मदत मिळाल्यावर अंबड लढाईस पुन्हा आला; व त्यात मल्लिकार्जुन मारला गेला. ही लढाई बलसाडजवळ झाली. शिलाहारांना काही काळ गुजराथेच्या कुमारपाळाचे मांडलिकत्व पत्करावे लागले.

मल्लिकार्जुनानंतर त्याचा पुत्र दुसरा अपरादित्य हा गादीवर आला. मुंबईजवळ परळ भागात त्याचा स. ११८७ मधील शिलालेख सापडला आहे. त्यात तो स्वतःस महाराजाधिराज व कोंकण–चक्रवर्ती म्हणवितो. यावरून गुजराथेच्या चालुक्यांचे अधिराज्य कोकणवर फार काळ टिकले नाही, असे दिसते. अपरादित्याने कुमारपालाचा पराभव केल्यावर वरील पदव्या घेतल्या असाव्यात. त्याने कोकणच्या बऱ्याच मोठ्या भागावर राज्य केले. त्याच्या कारकीर्दीनंतर १०० वर्षांनी येथे मार्कोपोलो नावाचा प्रवासी आला. त्या वेळीही कोकण स्वतंत्र होते.

अपरादित्यानंतर त्याचा पुत्र केशीराज (इ. स. ११९५ ते १२४०) यास गादी मिळाली. वसईजवळ त्याचे दोन शिलालेख इ. स. १२०३ १२३८ चे मिळाले आहेत. त्यावरून त्याने बरीच वर्षे म्हणजे जवळ जवळ ४५ वर्षे राज्य केले. परंतु विशेष घडामोडी काही घडल्याचे उपलब्ध नाही. केशीराज मरण पावल्यावर त्याचा पुत्र सोमेश्वर गादीवर आला. त्याची इ. स. १२४९ व १२६० ची दोन दानपत्रे सापडली आहेत. सोमेश्वरानंतर कोणाही शिलाहाराचा उल्लेख आढळत नाही. इ. स. १२७० च्या पुढील ठाण्याकडे जे शिलालेख मिळाले आहेत, त्यावरून देवगिरीचे यादव राजे तेव्हा तिकडे राज्य करीत असलेले दिसतात. यापैकी महादेव यादवाने कोकणच्या सोमेश्वराचा पराभव केला, तेव्हा तो जहाजात बसून पळून

जात असता त्याचे जहाज बुडून तोही बुडाला व महादेवाने त्याचे राज्य खालसा करून त्यावर आपले अधिकारी नेमले व शिलाहारांचे राज्य संपले.

शिलाहार (ठाण्याचे) उत्तर कोकणचे

हे क्षत्रीयवंशीय असून आपल्यास सूर्य किंवा चंद्रवशाचे म्हणवीत नसून ते आपली उत्पत्ती, जीमूतवाहन नावाच्या, प्रसिद्ध दंतकथांत नागास वाचविण्यासाठी आपले शरीर गरुडास अर्पण करणाऱ्या, पुराणातील देवयोनी विद्याधरापासून झाली असे आपल्या लेखात लिहितात. यावरून ते क्षत्रिय नसावेत असे वाटणे साहजिकच आहे. परंतु हे शिलाहार क्षत्रियच होते, इतकेच नव्हे तर क्षत्रिय मानलेही जात असत. कारण त्यांचे नाव छत्तीस राजकुलांच्या यादींत सर्वत्र दिलेले आढळते. ही क्षत्रिय कुलगणना बाराव्या शतकाच्या आरंभी कनोज सम्राट चंद्र किंवा गोविंद-चंद्राच्या अमलांत झाली असावी. तर विद्याधर वंश असेच दाखवतो की कर्णा-प्रमाणे किंवा शिबीप्रमाणे आपले मांस तोडून गरुडास खाऊ घालणे हे कठीण कर्म क्षत्रियच करू शकेल. कदाचित् शिलाहारांनी दक्षिणेंतील नागवंशीय लोकांस मदत केल्याचाही त्या कथेंत उल्लेख असावा.

हे शिलाहार आपण तगरपुराहून आलो असे नेहमी सांगतात. हे शहर टॉलेमीच्या मताप्रमाणे पैठणच्या पूर्वेस गोदातीरावर होते. सातवाहन काळात सार्थ-वाह मार्गावर अत्यंत भरभराटलेले असे व्यापारी पेठेचे शहर होते असे उल्लेख आहेत. भावे यांचे मताप्रमाणे गोरा कुंभाराचे गांव बार्शीजवळील तेरेढोके तेच तगरपूर असावे. म्हणजे मराठदेशाच्या ऐन मध्यावरून आलेले हे शिलाहार मराठा क्षत्रीयच दिसतात. ते नुसतेच तगरपुरास राहात असावेत असे नव्हे, तर सातवाहना-नंतर तगरपूरचे अधिपतीही असावेत; कारण ते स्वतःला तगरपुराधीश्वर अशी पदवी लावतात. राष्ट्रकट घराणे सम्राटपदी चढल्यावर त्यांनी आपल्या परिचयाच्या व विश्वासाच्या शिलाहार घराण्यास हात देऊन त्यास पश्चिम महाराष्ट्रात आपल्या तर्फे महामंडळेश्वर म्हणून नेमले असावे. दक्षिण कोकणचा शिलाहार राजा रट्टराज याने आपल्या खारेपाटण येथील ताम्रपटात आपला पूर्वज सणफुल हा राष्ट्रकुट राजा पहिला कृष्ण याचा लाडका होता असे म्हटले आहे; यावरूनही ते तगरपूराहुन आले या म्हणण्यास बळकटी येते.

शिलाहार हे संस्कृत नाव आहे.ते कसे पडले याविषयी एक आख्यायिका आहे. शिलाहारांचा पूर्वज जीमूतवाहन एके दिवशी फिरता फिरता त्यास एक हाडांचा मोठा ढीग दिसला व चौकशीवरून समजले की तो सापांच्या हाडांचा ढीग आहे. गरुड व साप यांच्या मधील कराराप्रमाणे साप आपणांपैकी रोज एकाला गरुडाकडे पाठवीत असत. टेकडीवरील नियोजित शिलेवर गरुड येऊन झडप घालन त्या

सापास खात असे व उरलेली हाडे तेथे फेकीत असे. जीमूतवाहन चौकशी करीत असता शंखचूड नांवाचा साप गरुडाच्या भक्ष्यस्थानी पडण्यासाठी आला. त्याच्या बरोबर त्याची आई त्यास निरोप देण्यासाठी आली होती. दोघेही मोठमोठ्याने रडत होती. जीमूतवाहनास दया येऊन तो शंखचूडासाठी मरण्यास तयार झाला. शंखचूड नको नको म्हणत असताही तो शिलेवर बसला व गरुडाने त्यास मटकविले. शंखचूडाने जीमूतवाहनाविषयी गरुडास खरी हकीकत सांगितली तेव्हा त्यास फार पश्चात्ताप झाला. इतक्यात तेथे शोध करीत जीमूतवाहनाचे आई-बाप व पत्नी आली. पत्नी मलयवती हिने पतीला उठवण्याची गौरीला प्रार्थना केली व गौरीने प्रसन्न होऊन अमृतवृष्टीने जीमूतवाहनास जिवंत केले.

दुसऱ्याचा जीव वाचविण्यासाठी ज्याने स्वतः वध्य शिलेवर बसून स्वतःस गरुडाचा आहार बनू दिले, त्याचे वंशज म्हणून ते स्वतःस शिलाहार म्हणवू लागले· म्हणूनच शिलाहार घराण्यांचे ध्वज गरुडचिन्हांकित असत. कोल्हापूर येथे प्रसिद्ध झालेल्या सिद्धान्तविजय ग्रंथात पान १०५ वर भोज शिलाहाराचा एक लेख सन ११९१ चा समग्र दिला आहे. त्यांत त्या राजाने स्वतःस क्षत्रिय–शिखाचूडामणी म्हटले आहे. तसेच ते मराठ्यांच्या ९६ कुळातील शेलार असून यादव वंशीय किंवा चंद्रवंशीय मानले गेले आहेत; यावरून ते निश्चितपणे क्षत्रियच होते.

हे आपल्याला महाक्षत्रिय म्हणवीत. कोल्हापूरचे शिलाहार हे महालक्ष्मीचे भक्त म्हणवीत, तर ठाण्याचे शिलाहार हे शिवभक्त होते आणि त्यांची कुलस्वामिनी पार्वती अथवा आर्या द्वैपायनी भागवतांत सांगितलेली होती (बेटातली देवी). ही देवी म्हणजे घारापुरी बेटातील एका लेण्यातील पार्वतीची मूर्ती असावी; म्हणूनच कदाचित् शिलाहार राजांनी प्रथम घारापुरी ही आपली राजधानी केली होती. नंतर राज्यविस्तार व कारभाराच्या सोईसाठी पुढे ठाणे ही राजधानी केली असावी. हे राजे शिवभक्त होते. यांच्या कुळांतील झंझाने १२ शंकराची देवळे बांधली असा उल्लेख येऊन गेलेलाच आहे. महामंडलेश्वर मुम्मुणीने,बापाने बांधलेले अंबरनाथाचे शिवमंदिर पुन्हा दगडी बांधून अत्यंत प्रेक्षणीय केले व आजही ते हेमाडपंती पद्धत व शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून अस्तित्वात आहे. घारापुरी येथील भव्य त्रिमूर्ती व लेणी वेरुळ येथील कैलास लेण्याची आठवण करून देतात. कल्याणजवळील लोणादित्याचे प्रेक्षणीय शिलामंदिर शिलाहारांनीच बांधले. ठाण्याचे प्रसिद्ध शिवमंदिराची स्थापना शिलाहारांनीच केली. त्या सर्वांची माहिती दिल्याशिवाय त्यांचे वैभव व सौंदर्य लक्षात येणार नाही.

घारापुरी :–एलिफंटा लेणी. मुंबईपासून दूर ठाणे व पनवेल या रुंद खाडींत ही लेणी असून त्यांत सुंदर खोदीव कोरीव काम व मूर्ती आहेत. मुख्य लेण्याच्या तोंडावर दोन मोठमोठ्या दगडांचे हत्ती कोरलेले होते. ते समुद्रातूनही दिसत म्हणून

Scanned with Car

पोर्तुगीझांनी ही लेणी प्रथम पाहिली व त्यास हत्तीलेणी असे पहिले नाव दिले. शिलाहारांचे हे राजधानीचे ठिकाण होते. या बेटांत बौद्धकालीन इमारतींचे अवशेष आहेत. पण येथील महत्वाच्या इमारती हिंदू आहेत. भगवानलाल इंद्रजी म्हणतात, 'यातील बांधण्याची तऱ्हा व सुंदर मूर्ती येलोरा येथील कोरीव कामाच्या वेळच्या दिसतात. राष्ट्रकूट राजा कृष्ण याने येलोरे येथील कैलास लेणे खोदून तयार केले. शिलाहार त्यांचे मांडलिक होते. म्हणून पुरी नगरच्या शेजारी ही लेणी खोदली असावीत.'

शिलाहारांचे अंबरनाथ येथील आम्रेश्वर शिवमंदिर

महाराष्ट्रातील मुंबईच्या परिसरात जी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत, त्यामध्ये सुभे कल्याणमधील अंबरनाथाच्या प्राचीन आम्रेश्वर शिवमंदिराचा उल्लेख करावा लागेल. अंबरनाथ स्टेशनच्या दक्षिण बाजूला शिवमंदिर रस्ता लागतो. सुमारे एक मैल अंतरावर हे प्राचीन शिवमंदिर एका खोलगट जागेत आहे. शिलाहार राजा छित्तराजाने हे प्रथम बांधले व नंतर त्याच्या मुलाने म्हणजे मुम्मुणी उर्फ ममवानीने त्याचा जीर्णोद्धार करून सध्याचे शिलामंदिर उभे केले असे तेथील लेखात म्हटले आहे. शिलाहार राजे हे शिवभक्त होते व त्यांनी पुष्कळ शिवमंदिरे बांधली; त्यांतले हे एक अतिसुंदर आहे. पुण्याचे पाताळेश्वर, जोगेश्वरी, मंडपेश्वर ही सर्व मंदिरे शिलाहारांनीच बांधली. लोनाडचे लोणादित्य मंदिर व बापगावजवळचे शिवमंदिर शिलाहाराचेच. पण या सर्व मंदिरांत अंबरनाथाचे मंदिर शिल्पशास्त्रदृष्टचा स्वतंत्र अतुलनीयच म्हटले पाहिजे. ४४८०३

हे स्थळ दाट जंगलातील किर्र झाडी-झुडपांच्या परिसरात निर्जन आणि कमालीच्या शांत वातावरणात एका झुळझुळ वाहणाऱ्या वढवाण (वालधुनी) काठावर आहे. हीच नदी पुढे वालधुनी या नावाने कल्याणच्या खाडीला जाऊन मिळते. निसर्गरम्य वातावरणात नदीच्या काठावर हे मंदिर एक हजार वर्षे काळाला तोंड देत ताठपणे उभे आहे. मंदिराच्या उत्तरेकडच्या प्रवेशद्वाराजवळ महामंडलेश्वर मुम्मुणी शिलाहाराचा एक लेख लोखंडी पट्टीत बसवलेला आहे. हा लेख रॉयल एशिएटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे. (खंड ९ वा पृष्ठ २१९ व खंड १२ वा पृ. ३२९) शिलालेखाची सुरवातीची व शेवटची ओळ पुढीलप्रमाणे आहे.

(१) शक संवत् ९८२ सावण शु ९ सुक्रे समाधिगता शेषपंच महाशब्द महामंडलेश्वराधिपते रिपुदैत्यदलन दामोदर ।

(२) शरणागत वज्रपंजरीत्यादि समस्त राजावली विराजमान महामंडलेश्वर श्री माम्वाणि राजदेव ।

(३) शेवटची ओळ...... ...आम्बनाक्ष, देवकुल...........मे भगल समुद्धरित महामंडलेश्वर श्रीमछत्तराज देवस्य भवनम् संपादितम् ।

शिलाहार राजा मामवानी याने बांधलेले अंबरनाथ येथील आम्रनाथाचे शिवमंदिर



आम्रनाथ मंदिर (अंबरनाथ) येथील एक खांब

Scanned with Car



अंबरनाथ येथील आम्रनाथाचे मंदिराचे बाहेरील नाजुक शिल्पकाम



शिलाहारांनी बांधलेले अंबरनाथ येथील आम्रनाथांचे शिव मंदिराचे
एक बाह्य दर्शन

वरील शिलालेखावरून छित्तराजाने हे मंदिर अगोदर बांधले होते व त्यानंतर शके ९८२ मध्ये (इ. स. १०६० मध्ये) मुम्मुणी राजाने याला आजचे भव्य स्वरूप दिले. 'समुद्धरित' असा उल्लेख या लेखात आढळतो. चुना किंवा रेती यांपैकी काहीही न वापरता दगडावर दगड रचून व ते एकमेकांत खिळवून बांधलेले हे भव्य पाषाण मंदिर भारतातील प्राचीन शिल्पकलेचे एक उत्कृष्ट प्रतीक आहे. मंदिराची रचना नागर शैलीची आहे. या देवालयातले चिरे, त्रिकोण, चौकोन, काटकोन, वर्तुळ व अर्धवर्तुळ इत्यादि आकारात घडवून ते एकमेकांत इतक्या कुशलतेने बसविलेले आहेत की त्यामुळे प्रत्येक अवयवाला दुसऱ्या अवयवाचा आधार मिळून वरचे छतही बिनधोक राहिले आहे. हे मंदिर हेमाडपंताच्या अगोदर बांधले असल्यामुळे याला हेमाडपंती म्हणता येणार नाही. पूर्वी या मंदिराला कळस होता; पण पुढे तो खाली पडला. सुप्रसिद्ध इंग्रज संशोधक बर्गेस याला या कळसाचे काही अवशेष सापडल्याचा उल्लेख आढळतो. (खंड ९ वा)

या मंदिराची लांबी सुमारे ६० फूट, रुंदी ५० फूट व उंची ६५ फूट आहे. प्रवेशद्वारे तीन असून मुख्य द्वार पश्चिमाभिमुखी आहे. या दरवाजाजवळ दगडाचे दोन नंदी आहेत. त्यापैकी एक प्राचीन काळातला व दुसरा नंतरच्या काळातला आहे. प्राचीन शिल्पकला व जुनी शिल्पकला यांचा तुलनात्मक अभ्यास करणारांना एकमेकांशेजारी असलेले हे दोन नंदी उपयुक्त ठरतील. प्राचीन नंदीच्या गळचात एक शिवलिंग दृष्टीस पडते. तसेच दोन्ही नंदींचा आकार, घडण व ढब वेगळी दिसते.

सभामंडप

प्रवेशद्वारापाशी आत शिरल्यावर सुमारे ३५ फूट लांबीरुंदीचा सभामंडप दृष्टीस पडतो. या सभामंडपात एकूण अठरा खांब होते; पण त्यापैकी सध्या चारच आढळतात. बाकीचे चौदा भिंतीत बुजवलेले आहेत. अर्थात हे भिंतीचे काम बरेच मागाहून झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. पण या भिंती नव्हत्या तेव्हा अठरा खांबांचा तो सभामंडप किती भव्य व मनोहर दिसत असला पाहिजे ! या सर्व खांबांवर वर-पासून खालपर्यंत सर्वत्र शिल्पकाम अगदी खच्चून भरलेले आहे. खांबांची तसू न् तसू जागा नकसून काढली आहे. पुराणातील काही प्रसंग शब्दमुक्त होऊन ते या ठिकाणी आकारबद्ध झाले आहेत. या सर्वावरती कोरीव छत आहे. सध्या सभा-मंडपाला काही ठिकाणी तडे गेले असल्याकारणाने पुराणवस्तु संशोधन खात्याने लोखंडी स्तंभांचे तीर दिले आहेत. छतावरील सर्व भाग आतून पोकळ असून त्यात अनेक लहानमोठ्या खोल्या आहेत. या वरच्या भागात जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. त्यापैकी एक मार्ग सभामंडपाच्या दक्षिण दरवाजाजवळ वरच्या बाजूस एक लहानसा झरोका आहे तोच. त्यातून एक मनुष्य सहज वर जाऊ शकेल. दुसरा

Scanned with Car

मार्ग मंदिराच्या बाहेरून उत्तरबाजूकडून वर चढून जाण्यासारखा आहे. स्थापत्य-शास्त्राच्या तत्त्वाप्रमाणे छताचा व गाभाऱ्याचा भाग आतून पोकळ ठेवला आहे. या सर्व खोल्यांत अंधार असल्यामुळे बॅटरी घेतल्याशिवाय तेथे जाणे इष्ट नाही.

गाभारा

सभामंडपाच्या पूर्व बाजूस गाभारा आहे. गाभाऱ्याचे दरवाज्यावर गणेश-पट्टीत योगी स्वरूपात असलेली शिवमूर्ती आहे. ही मूर्ती सकाळी १० ते ४ च्या दरम्यान दिसू शकते. इतर वेळी येथे अंधार असतो. सभामंडपापासून गाभाऱ्याचा तळ जमिनीखाली ७ फूट ९ इंच खोल आहे व आत उतरण्यासाठी बारा पायऱ्या आहेत. या पायऱ्यांच्या मधोमध हल्ली कठडा घातला असल्यामुळे त्याचे दोन भाग झाले आहेत. गाभारा सुमारे १३ फूट औरस चौरस आहे. आतमध्ये दोन शिव-लिंगे उत्तराभिमुखी आहेत. पैकी एक काळ्या पाषाणाचे असून ते स्वयंभू आहे व दुसरे गारगोटीचे आहे. पूर्वीच्या काळात स्वयंभू शिवलिंग तळघरात ठेवून वरच्या भागात दुसरे शिवलिंग ठेवण्याची प्रथा होती. कारण तसाच प्रसंग आला तर आतल्या शिवलिंगाला उपद्रव होऊ नये, यासाठी भुयार बंद करण्याची व्यवस्था असे. पूर्वीचे तळघर आता नाहीसे झाल्याने सबंध गाभारा आता एकच झाला आहे. पण तळघर निराळे अस्तित्वात असल्याच्या खुणा दहा फूट उंचीवर पाषाणाचे कोपरे पाहिल्यावर दिसून येतात. आग्नेय कोपऱ्यात ४ फूट उंचीवर सहा इंच व्यासाचा आरपार झरोका आहे व त्यातून बाहेरून आत पाणी सोडण्याची व्यवस्था केलेली आहे. एरव्ही तळघरात हवा येण्यासाठी या झरोक्याचा उपयोग होत असला पाहिजे. हा झरोका आठ फूट लांब असल्याने गाभाऱ्याची जाडीही तेवढीच आहे. परंतु तो आतून पोकळ आहे. गाभाऱ्याची उंची सुमारे ६५ फूट आहे. अलीकडे वरच्या बाजूला सार्वजनिक बांधकाम खात्याने पत्रे व जाड काचा बसविल्या आहेत.

मंदिराचे बाह्यांग

शंकराचे दर्शन घेऊन विनम्रभावाने त्याची प्रार्थना केल्यावर आपण बाहेर येतो. मंदिराचे दोन भाग आहेत. एक सभामंडप असलेला व दुसरा गाभारा असलेला. दोनही भागांची रचना वेगळी असली तरी दोनही ठिकाणी पंचकोन साधलेले आहेत. मंदिराला प्रदक्षिणा घालताना बाह्यांगावर चित्रविचित्र शिल्पाचे दर्शन घडते. हे शिल्पकाम बऱ्याच प्रमाणात झिजून गेलेले आहे. कारण मंदिराला वापरलेला दगड अग्निजन्य खडकाचा नसावा. एकूण मंदिर २२५ लहान हत्तींच्या आधारावर बांधलेले आहे असे दाखविणारी पट्टिका मंदिराच्या सर्वात खालच्या बाजूला सर्व बाजूनी आहे. या गजथरावर लहान शिल्पपट्ट असून त्यावरील भिंतीवर सुमारे सत्तर मूर्ती खोदलेल्या आहेत. या मूर्तींची रचना अशी आहे की पाहणाऱ्याच्या त्या

बरोबर नजरेत येतात; परंतु त्यास स्पर्श करता येत नाही. दोन्ही बाजूस मध्ये रथाची रचना आहे.

पश्चिमेच्या मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर पडल्यावर उत्तरेकडून प्रदक्षिणेला सुरवात करताना पहिल्याच कोनात सुमारे चार फूट उंचीवर गणपतीची उजव्या सोंडेची मूर्ती दृष्टीस पडते. पलिकडच्या एका कोनामध्ये एका उभ्या स्त्रीची आकृति कोरलेली असून तिने आपला उजवा हात तोंडाजवळ धरला आहे. त्यावरून तिला अचंबा वाटत असल्याचे दिसते. तिच्या डाव्या हाताला एक पुरुष उभा असून त्याने आपले तोंड दुसरीकडे फिरवले आहे, याचे त्या तरुणीला मोठे नवल वाटते. पलिकडे त्रिशूलधारी शिवमूर्ती असून त्याच्या पलीकडच्या कोनात दाढी वाढविलेला, हातात कमंडलू घेतलेला, लंगोटी नेसलेला एक उभा गोसावी दृष्टीस पडतो. हे काम फारच रेखीव व प्रमाणबद्ध आहे. या गोसाव्याच्या मागल्याच कोनात लक्ष्मीची मूर्ती असून तो गोसावी तिच्याकडे पाठ करून पुढच्याच कोनात असलेल्या विष्णूमूर्तीकडे जात असल्याचे दाखवले आहे. ऐहिक वैभवाकडे पाठ करून मोक्ष-मार्गाकडे जाणाऱ्या साधूचे हे रेखीव चित्र आहे.

उत्तरेकडचा दरवाजा ओलांडून पलीकडे गेल्यावर जमिनीसरशी एक लहानशी खोली असून त्यात शिवलिंग आहे. परंतु हे शिवलिंग मागाहून केलेले दिसते. आत-मध्ये एक काळा पाषाण आहे. हा पाषाण एखाद्या पर्वताची आकृती वाटते. जवळच पार्वतीची एक मूर्ती ठेवलेली आहे. त्यावरून हे पार्वतीचे निवासस्थान असावे. याच्यापलीकडे जमिनीत एक कुंड असून त्यात गाभाऱ्यातील पाणी आणून सोडलेले आहे व कुंडातील पाणी जमिनीखालून एक पाट काढून तो नदींत आणून सोडण्यात आला आहे. या कुंडाच्यावर त्रिमूर्ती शिवमूर्ती असून डाव्या मांडीवर पार्वती बसलेली आहे. वरच्या देवळीत नररुंडमाळा धारण करणारी महाकालीची मूर्ती आहे. कालीदेवीचे शरीर कृश असून तिची हाडे दिसतात. कृश स्तन लोंबत असून हातपाय अगदी वाळून गेलेले आहेत. गळ्यात नररुंड माला असून गळा व कंबर सर्पवेष्टित आहे. वरच्या उभ्या पट्टयात एका चंद्रकोरीत नटराजाची मूर्ती असून हीच मूर्ति प्रथम दर्शनी दिसते.

पुढच्या कोनात हातात हात घेतलेली त्रिशूलधारी शिवपार्वतीची उभी मूर्ती आहे. हा प्रसंग शिवपार्वती-विवाहाचा आहे. आग्नेय कोपऱ्यात एक उभा स्तंभ दिसतो. ब्रह्मदेव व विष्णू यांच्यामध्ये स्पर्धा चालू असता निर्णय देण्याचे काम शंकराकडे आले. 'माझ्या लिंगदेहाचा आदी व अंत जो शोधून काढील तो श्रेष्ठ' असे शंकरांनी सांगितल्यावर ब्रह्मदेव हंसावर आरूढ होऊन तो वर आकाशात उडाला व विष्णू वराहरूपाने पृथ्वी खणू लागला तरी त्यांना पिंडीचा पत्ता लागेना. स्तंभाच्या खाली विष्णू असून वर ब्रह्मदेव आहे. दक्षिण द्वाराला लागून असलेल्या

Scanned with Car

पूर्व बाजूच्या कोनामध्ये एक साधू जवळच असलेल्या एका तरुणीकडे जात आहे; परंतु त्याच्या पाठीमागच्या बाजूला एक स्त्री त्याच्याशी लगट करू पहात आहे. पण हा साधु महावस्ताद ! त्याने कानावर हात ठेवून जणू काय त्या स्त्रीचा संपर्कच आपल्याला नको असे दाखवीत आहे. दक्षिण द्वाराच्या प्राकाराला लागूनच एक गणपतीची मूर्ती असून तिला शेंदूर लावलेला आहे. या मूर्तीचे दर्शन घेऊन तिला फुले वाहण्याचा परिपाठ आहे.

आज बऱ्याचशा मूर्ती छिन्नविच्छिन्न स्थितीत आढळतात.काहींचे हात तोडलेले आहेत, तर काही विद्रुप केलेल्या आहेत. याशिवाय ऊन, वारा, पाऊस यामुळेही मूर्ती खराब झालेल्या आहेत; तथापि अवशिष्ट मूर्तीत चतुर्हस्त विष्णू, अष्टभुज कामदेव, महिषासुरमर्दिनी, त्रिमुख ब्रह्मदेव, चौरीधारी, दर्पणधारी, मिथुनशिल्पे, द्वारपाल तसेच शालभञ्जका, कच्छमुक्ता, लज्जावती वगैरे सुरसुंदरींच्या मूर्ती विशेष उल्लेखनीय असून सुस्थितीत आहेत. चतुर्हस्त विष्णूची मूर्ती मंदिराच्या डाव्या भिंतीवर असून ती अत्यंत मोहक आहे. तिच्या तीन हातांतील विविध वस्तू शंख, चक्र, गदा वगैरे स्पष्ट दिसतात व एक हस्त वरदहस्त आहे. तिचा नक्षी केलेला उंच मुकुट, गळ्यातील मौल्यवान अलंकार, तसेच यज्ञोपवित आणि शांत मुद्रा, नृत्य करणाऱ्या जवळच्या धुंद कामराजापेक्षा अधिक उठावदार वाटते. नृत्य करणाऱ्या कामराजाचा डावा पाय नृत्याच्या आविर्भावात वर उचललेला असून दुसरा गुडघ्यामध्ये वाकलेला आहे. त्याच्यामागे प्रभावळ आहे आणि मुकुटास मौल्यवान खडे आहेत व तो विष्णूच्या मूर्तीपेक्षा वेगळा आहे. त्याचे हात नृत्याच्या विशिष्ट तालात कोपरांत वाकलेले आहेत. त्याची मुद्रा हसतमुख व प्रसन्न आहे. त्याची कललेली आकृती त्याच्या एकूण नृत्याशी समरस झाली आहे. त्याच्या गळ्यांतील अलंकारही स्पष्ट दिसतात. महिषासुरमर्दिनीची मूर्ती वरील मूर्ती-एवढीच सुमारे ३॥ फूट उंचीची असून तिचा नेहमीचा आविर्भाव, उग्र मुद्रा आणि महिष यांचे स्पष्ट चित्रण दिसते.

गणपती, कार्तिकेय, मोहिनी वगैरे उपदेवतांच्या, तसेच द्वारपालांच्या मूर्ती आकर्षक व बांधेसूद आहेत.तथापि आम्रेश्वराचे हे मंदिर सुरसुंदरींच्या विविधमूर्तींनी अधिक नटलेले आहे. चौरीधारी दर्पणधारी शालभञ्जीका, कच्छमुक्ता, लज्जावती, नृत्यांगना यांच्या मूर्ती आकर्षक, बांधेसूद, लयबद्ध व यौवनोत्फुल्ल आहेत.चौरीधारी मूर्ती मुख्यत्वे द्वारशाखात आढळतात. काही मंदिरांच्या भिंतीवरही आहेत. ही मूर्ती उभी असून तिचा उजवा पाय डाव्या पायावर आडवा आधारलेला आहे. उजव्या हातात चौरी असून तिने चौरी मारण्याच्या आविर्भावात डोक्यावर धरलेली आहे. डावा हात कमरेवर असून तिचा कलाकुसरयुक्त कमरपट्टा स्पष्ट दिसतो. तसेच तिचे उत्तरीय, गळ्यातील अलंकार, बाहू व कर्णभूषणे, कंकणे व नूपुर स्पष्ट दिसतात. दर्पणधारी स्त्रीची मूर्ती चौरीधारीइतकी आकर्षक नाही; परंतु हे प्राचीन

'मोटिक' पुढे चालू असलेले येथे दिसते. तिच्या डाव्या हातात आरसा असून त्यामध्ये ती आपले मुख पाहात आहे. उजवा हात डोक्यावर शेंदूर घालण्यासाठी केसांच्या भांगात घातलेला आहे. तिचा कमरपट्टा, गळ्यातील अलंकार, बाहू व कर्णभूषणे स्पष्ट दिसतात.

शालभञ्जिका ही पूर्वापार चालत आलेली कलेतील कल्पना येथे अधिक प्रगत झालेली आहे. या वृक्षदेवतेच्या मूळ कल्पनेत गतिमानता आली असून ती अधिक विलासमय दाखवलेली आहे.शालभञ्जिकेच्या अनेक प्रतिमा दोन्ही बाजूंच्या भिंतीवर आढळतात. तिचे अलंकार, वस्त्र मूर्तीत स्पष्ट दिसते. तिची भावदर्शक मुद्रा अधिक उत्कट झालेली वाटते. येथील लज्जावतीची मूर्ती म्हणजे शिल्पज्ञाचे खास कौशल्य होय. या मूर्तीची मोडतोड झाली असली तरी विद्यमान असणाऱ्या मूर्तीवरून तिच्या लज्जायुक्त भावाची कल्पना येते. तिचा डावा हात कोपरामध्ये तुटला असला तरी त्याची बोटे डाव्या गालावर ठेवली आहेत व उजवा हात कमरेखाली धरला आहे. कमरपट्टा व गळ्यांतील अलंकार व कर्णभूषणे स्पष्ट दिसतात.

मंदिराच्या बाह्यांगावर सुमारे पांच फूट उंचीवर मंदिराभोवती एक लहानशी पट्टिका असून स्त्री-पुरुष जोडप्यांच्या प्रणयी चेष्टा मध्यभागी मांडी घालून बसलेल्या मूर्तीच्या दोन्ही बाजूंना दाखवणारी अनेक चित्रे आहेत. हे स्त्री-पुरुष नाना तऱ्हेची शृंगारिक मैथुनासने करताना दाखविले आहेत. यापैकी बहुतेक मूर्ती पुसट झाल्याने बारकाईने पाहिल्यास त्याचे अश्लील हावभाव लक्षात येतात. मंदिराच्या पवित्र शिल्पकामात अशा तऱ्हेच्या मिथुनमूर्ती कोरण्याचा हेतु काय असावा ? परमेश्वराच्या दर्शनास जाताना माणसाला मोह घालणारे असे प्रसंग वारंवार येतात व ते टाळून गेले तरच देवदर्शन घडेल हे सूचित करण्याचा तर त्या वेळच्या कलावंतांचा हेतू नसेल ?

आज मंदिराचा शिखरासह बराच भाग पडला आहे. पुराणवस्तू खाते त्याच्या सुरक्षिततेसाठी म्हणावे तेवढे लक्ष पुरवीत नाही. परंतु भक्तांनी गेल्या आठ-दहा वर्षांत या देवळाच्या देखभालीस सुरुवात केली आहे. चौकीदार कशीबशी मंदिराची देखभाल करतो आणि पडलेल्या मूर्ति वा अवशेष देवळासमोरच्या एका लांब सोप्यात ठेवतो. तेथे असे अनेक प्रकारचे अवशेष आहेत. पण त्यात प्रामुख्याने पडलेल्या स्तंभाचेच अवशेष जास्त आहेत. त्यातील एक चौरीधारी व दुर्गादेवीची प्रतिमा छान आहे. दर शिवरात्रीस येथे मोठी यात्रा भरते व असंख्य भाविक जमतात.

□ □ □

Scanned with Car

: ७ :

आम्हीही सुंदर झालो असतो

शिलाहारांच्या अस्तानंतर श्रीशिवछत्रपतींनी स्वराज्याचा उद्योग सुरू केला त्यासाठी पैसा गोळा करण्याचा उद्योग सुरू करून कल्याण प्रांत काबीज करीपर्यंत कल्याण सुभ्यावर बिंबराजाचा मांडलिक मित्र अहिरराव यादव यानें काही काळ राज्य केले. त्यानंतर मुसलमानांनी हा प्रांत जिंकला. त्यांच्या ताब्यात हा प्रांत होता. इ. १३९६-९७ या कालाचा एक शिलालेख कल्याण सुभ्यातील डोंबिवली या गावी उपलब्ध झाला आहे. हा लेख कोरलेली शिला डोंबिवली गांवच्या दक्षिणेस श्रीमती शांताबाई काळू दागूजी ह्यांच्या वाडीत रस्त्याच्या एका बाजूला टेकवून ठेवलेली आढळते. ही शिला वाऱ्यापावसानें फारच खराब झाली आहे व त्यामुळे मजकूर बराच अस्पष्ट झालेला आहे. लेखाच्या एकंदर तेरा ओळी असून लेखाच्या अग्रभागी सूर्य-चंद्र व लेख संपल्यावर गद्धे गाळीचे चित्र काढलेले आहे. ही चिन्हे यादव व शिलाहार घराण्याच्या शिलालेखातून वारंवार येत असल्यामुळे विशेष नव्हेत. त्याचा अर्थ एवढाच की लेखात लिहिलेले शासन यावच्चंद्र-दिवाकरौ टिको व जो या शासनाचा भंग करील त्यास गाढवावरून दिलेली शिवी आहे. या लेखाचा काल अगदी पहिल्याच ओळीत, 'ओम् (चिन्हाने दाखविलेले) श्रीः सकु १३१८ ईजरत ७९९ (अद्ये) धातृ संवत्सरे' असा दिला आहे. दुसऱ्या ओळीत महाराजाधिराज श्री आलु नाकु (म्हणजे अलनायक–अल्ला) राज्य करीत असल्याचा उल्लेख आहे. तिसऱ्या ओळीत ठाणे विभागावर त्याचा अधिकारी (तं निरोपितं–म्हणजे नियुक्त केलेला) सर्व व्यापारी (सर्व गोष्टीवर सत्ता चालवणारा) आकरणिक कोमल प्रा े. तसेच आंवल प्रा े. (म्हणजे कोमल प्रभू व आंवल प्रभू) असल्याचे सांगितले आहे. यानंतरच्या ४ थ्या ओळीत दुसऱ्या काही अधिकाऱ्यांची नावे आली आहेत. पण ती नीट वाचता येत नाहीत. पांचव्या ओळीत 'इत्येवं वर्तमाने (म्हणजे हे लोक शासन करीत असताना) त्यानी 'शासनपत्र

लिख्यते तथा ' असे सांगून लेखाच्या विषयास सुरुवात केली आहे. सहाव्या ओळीत प्रारंभी 'कामराचिए दत मण आठ धावामध्ये' असे शब्द असून सातव्या ओळीत ' डोंबिवली ग्रामुस्थित शासना कर ऐ अवसरी ' असे वाचता येते. आठव्या ओळीतील पहिला भाग नीट लागत नाही. पण त्याच ओळीत शेवटी ' गामि दत्त: ' असे शब्द आहेत. नवव्या व दहाव्या ओळींत "स्वदत्ता परदत्ता वा यो हरेत वसुंधरा षष्ठीं वर्षसहस्राणि विष्टायां जायते कृमि:।। " असा भूमि हरण करणाऱ्यास शाप दिला आहे. अकराव्या व बाराव्या ओळीत दान देणाऱ्या राज्यांतील तसेच अन्य वंशातील राजांनी हे दान चालवावे या अर्थी एक श्लोक आला आहे.

ह्या लेखावरून शके १३१८ मध्ये आलुनाक् हा ठाणे विभागावर राज्य करीत असता त्याच्या हाताखाली सर्वाधिकारी (व्यापारी) कोमलप्रभू व आंवल प्रभू हे होते. त्यांचे राज्य डोंबिवलीस स्थिर झाल्यावर तेथील जमीन व धान्य दान केले हे दिसून येते. ह्या कालासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. आळुनाकू राजा म्हणजे अल्ला. हा मुसलमान राजा कोण होता, हे ठरविणे कठीण आहे. परंतु त्या लेखाचा हिजरी सन ७९९, तो राजा अभारतीय होता व मुसलमान होता हे सिद्ध करतो. (ले. डॉ. मोरेश्वर गं. दीक्षित, डोंबिवली शहराचा इतिहास.)

या लेखावरून ठाणे विभागावर आलुनाकु हा मुसलमान राजा काही काळ राज्य करीत होता. त्यानंतर हा भाग अहमदनगरच्या निजामशाहीत गेला. त्याही कालासंबंधी कल्याणबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. मुसलमानी लोक आधी-पासूनच येथे होते; त्यांत राज्यकर्ते झाल्यामुळे जो बदल झाला असेल तेवढाच.बाकी महत्वाच्या घटना किंवा अन्य इतिहास उपलब्ध नाही. कल्याणचे माहात्म्यही फारसे राहिले नव्हते. फक्त एकच नैसर्गिक माहात्म्य म्हणजे घाटावरून कोंकणांत शिरण्याचे प्रवेशद्वार. त्याचप्रमाणे मुसलमानी राज्यकर्त्यांच्या धार्मिक वेडामुळे व विध्वंसक प्रवृत्तीमुळे सर्व हिंदुस्थानात जे घडले ते तेथेही घडले असण्याचा संभव. कारण सातवाहन व शिलाहार काळांतील भरभराटीचे, कलेचे वैभव व अवशेषही आज उपलब्ध नाहीत. सातवाहनांच्या नाणेघाटांतील देवकुलांतील राजांच्या प्रतिमासुद्धा नष्ट झाल्या आहेत. कित्येक सुंदर मूर्ती फोडून विद्रुप झाल्या आहेत. अर्थात् कल्याणचे वैभवाला त्या काळापासूनच ओहोटी लागली.

परंतु निजामशाहीतही कल्याण फार काळ राहू शकले नाही. कारण शिवाजीच्या उदयाच्या वेळेसच निजामशाही नष्ट होऊन विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात गेले होते.

आदिलशाहीत पुन्हा एकदा राजकीय दृष्टया कल्याण शहर मोक्याचे तट-बंदीचे शहर म्हणून महत्त्व पावले व कल्याण हा राजकीय सुभा म्हणून सुभ्याचे

Scanned with Car

ठाणे झाले. अर्थात या ठिकाणी आदिलशाही सुभेदार, लष्कर, कचेऱ्या वगैरेमुळे कल्याण शहर परत महत्त्व पावले, भरभराटले. अर्थात मुसलमान वस्ती वाढली. सरदार, दरकदार, लष्कर, मशिदी इत्यादी जणू मुसलमानमय बनून गेले आणि याच काळात शिवछत्रपतींच्या नव्या राज्यस्थापनेच्या उद्योगाचे दृष्टीने शिवछत्रपतींनाही हे महत्त्वाचे वाटले व त्यांचे लक्ष एका प्रसंगाने कल्याण सुभ्याकडे वेधले गेले.

शिवाजी महाराजांनी मावळात स्वतंत्र राज्य स्थापन केले ही गोष्ट विजापूरच्या आदिलशहास झोंबली. कारण विजापूरला एक नवा प्रतिस्पर्धी निर्माण झाला व तो देखील संपूर्ण हिंदुस्थानात मुसलमानी राज्ये असताना एक हिंदू प्रतिस्पर्धी निर्माण झाला. तेव्हा दूरदृष्टीच्या राज्यकर्त्याच्या दृष्टीकोनातून हा परका नापाक व राज्याचा प्रतिस्पर्धी प्रथम नष्ट करणे हे कर्तव्य होते. म्हणून शिवाजीच्या नियंत्रणासाठी अफझलखान नावाच्या बलाढ्य व कडव्या सरदारास वाईच्या प्रांतावर कारभारी सुभेदार म्हणून नेमले. खान चार पाच वर्षे तेथे होता; परंतु त्याच्या हातून शिवाजीचा बंदोबस्त झाला नाही. मात्र तेवढ्या अवधींत खानाने मावळ प्रदेशाची व तेथील प्रमुख देशमुख–देशपांडे यांची माहिती मिळवून मोरे, खोपडे असे कित्येक देशमुख द्रव्याने व वतनाने वश करून घेतले. त्यामुळे शिवाजी महाराजांची त्यांच्यावर इतराजी होऊन त्यांना ते राष्ट्रद्रोही, धर्मद्रोही समजू लागले.

शिवाजीमहाराजांनी त्याच वेळी आपली दृष्टी कोंकणातील विजापुरी उत्पन्नाचा प्रमुख सुभा कल्याण प्रांत याकडे वळवली. स्वराज्याच्या कामाकरिता सैन्यभरती, पोशाख, पोषण, युद्धकार्य इत्यादीकरिता प्रचंड पैशाची जरूरी होती. म्हणून शिवाजी महाराजांनी मुसलमानी राज्यातून लूट मारून पैसा जमा करण्याचे धोरण ठेवले. कल्याणही त्या काळात विजापूर राज्यातला समृद्ध सुभा मानला जात असे व दरवर्षी कल्याण सुभेदार कल्याण सुभ्याचे उत्पन्नाचा खजिना खटारे, गाढवे, खेचरे, गाड्या भरभरून बंदोबस्ताने विजापूरला पाठवीत असे.

महाराजांना द्रव्याची जरुरी होतीच; तेव्हा या गोष्टीची बित्तंबातमी आपल्या गुप्तहेरांकडून काढून जय्यत तयारीनिशी खजिना लुटून आणण्याची कामगिरी आबाजी सोनदेव या आपल्या निष्ठावंत व विश्वासू सेवकावर सोपविली. आबाजी सोनदेवास खजिना निघाल्याची बातमी लागली खजिना घाटातून वर आला व पुरंदरजवळ अडचणीच्या जागेत आबाजी सोनदेव आपल्या मावळे, घोडेस्वार वगैरे लढाऊ टोळीसह सरसावून बसला. त्या खजिन्याच्या मार्गावर लक्ष ठेवणारे हेर वेळोवेळी आबाजीला खजिना कुठपर्यंत आला, मुक्काम कुठे आहे, जनावरे किती,

सैनिक किती, पेटघा किती वगैरे माहिती देत होते; आणि विजापूरच्या खजिन्याचे अधिकारी निर्धास्तपणे मार्ग आक्रमीत होते. खजिन्याबरोबर अधिकाऱ्याचा मेणाही होता. पुरंदर गडाजवळ आडवाटेवरून तो रात्रीच्या वेळी निघणार ही बातमी हेरांनी आणली आणि छापा घालण्यासाठी आबाजीने आपली माणसे योग्य ठिकाणी सर्व बाजूनी एकदम घेरतील अशा तऱ्हेने पेरून ठेवली. रात्र होऊ लागली आणि दुरून मशालींचा उजेड दिसू लागला. निरीक्षकांनी इशारत दिली व सर्वजण हुशारीने तयारीत राहिले. मशाली जवळ येऊ लागल्या व खजिन्याच्या पेटघा, सैनिक, घामाने निथळणारे भोई, उंट, खटारे, खेचर वगैरे दिसू लागली व योग्य ती जागा येताच आबाजी सोनदेव व त्याच्या मावळचांनी एकदम तुटून त्यांच्यावर हल्ला केला. खजिना पहारेकरी, अधिकारी गाफील होते; त्यामुळे थोडचाच वेळात आबाजी सोनदेवाने त्यांना घायाळ करून खजिना ताब्यात घेतला व सर्व गाडघा, खटारे, पेटघा, उंट वगैरे राजगडाकडे वळविले. विजापुरी सैनिक जखमी झाले, काही भेदरले, काही पळून गेले; अधिकारी मारला गेला आणि खजिना राजगडच्या स्वराज्याच्या कोषागारात जमा झाला. हीच ती कल्याणच्या खजिन्याची हकीगत. ती कल्याण येथे घडलीच नाही. कल्याणसुभ्यातल्या घाटातही घडली नाही. घडली पुरंदराजवळ आणि विशेष म्हणजे या खजिन्याच्या लुटीच्या वेळी सुभेदाराची सून सापडली व ती लूट आबाजी सोनदेवाने महाराजांना अर्पण केली हे या प्रसंगी तरी खरे नव्हे. फक्त एवढेच खरे की खजिना कल्याण सुभ्याचा होता; कल्याण सुभ्यातून विजापुरी सत्तेने मराठी मुलुखातून जमा केलेला होता. परंतु हीच घटना कल्याणचे भाग्य उजळण्यास कारणीभूत झाली म्हणून या घटनेचे कल्याणच्या इतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्व आहे.

शिवाजी महाराजांनी आतापर्यंत केलेले उद्योग तारुण्य पंचविशीतले होते. परंतु ती उलटल्यावर म्हणजे वयाच्या २५-२६ व्या वर्षापासून त्यांनी आपल्या कार्यक्रमाची काही पद्धतशीर योजना आखली व त्यानुसार त्यांनी कार्याला सुरुवात केली. आता गरुडाला पंख फुटले होते. कल्याण खजिना लुटला त्याआधी शिवाजी महाराजांनी औरंगजेबाशी डावपेच खेळायला सुरवात केली होती. १६५३ मध्ये औरंगजेब दक्षिणचा सुभेदार झाला होता. तो दख्खनमधील शाहचांचा कट्टर शत्रू होता. तेव्हा शिवाजी महाराजांचा वाढता पराक्रमही तो पहात होता. तसेच महाराजांचा उपयोगही करून घेण्याचा विचार करीत होता. इतक्यात दहा वर्षे बिछान्यावर खितपत पडलेला विजापूर बादशहा महंमद अदिलशहा ४ नोव्हेंबर १६५६ला मरण पावला. हे ऐकून ओरंगजेबाने ते राज्य घेण्याची तयारी चालविली. महंमद आदिलशहाच्या आजारामुळे विजापुरात बजबजपुरी माजली होती व स्वार्थी कारस्थानामुळे दूरच्या मुलुखाकडे आदिलशाहीचे दुर्लक्ष झाले होते. याचाच फायदा घेऊन शिवाजी महाराजांनी घाटमाथ्यावरील जावळी घेतली. कोकणातील काही

मुलुख व किल्ले हाताखाली घेतले. औरंगजेब शिवाजी महाराजांच्या या हालचालींकडे बारकाईने लक्ष देऊन होता. विजापूर दरबारात दुही माजवून स्वतः फायदा घेण्याच्या विचारात होता. एकदा आदिलशाही व कुतुबशाही नष्ट केली म्हणजे त्यांच्या मदतीच्या अभावी मराठ्यांचे हे रोपटे केव्हाच करपून जाईल असा माफक अंदाज त्याने बांधला होता. म्हणून चार-पाच महिने वेढा घालून प्रथम बेदरचा मजबूत किल्ला व तीन महिन्यांनी कल्याणीचा किल्ला हे दोन विजापुरी किल्ले औरंगजेबाने घेतले. तेव्हा विजापूरकरांनी मोंगलांना खंडणी म्हणून किल्ले व मुलुख देण्याचे कबूल केले. त्या कराराने दिल्लीकरांना १ कोट रु. खंडणी, बेदर व कल्याणी व **पारिंडा** हे किल्ले व निजामशाही कोंकणातील किल्ले (कल्याणसह) बांगी परगणा द्यावा असे ठरले होते.

याच सुमारास शिवाजी महाराजांनी, औरंगजेब व विजापूरकर ह्यांच्या युद्धांत आपल्याकडे लक्ष द्यायला त्यांना फुरसत नाही हे पाहून औरंगजेब कोकण पट्टीकडे फार लक्ष देणार नाही हेही विचारात घेऊन, निजामशाही, कोकणचा भाग, व खालचा दाभोळ बंदर वगैरे आदिलशाही भाग आपल्या ताब्यात घेऊन या दोहोंबद्दल बोलणे करण्यासाठी शिवाजी महाराजांनी आपला वकील सोनाजी विश्वनाथ डबीर यास औरंगजेबाकडे पाठवले. औरंगजेबाने याबद्दल निश्चित फर्मान न देता फक्त गोड भाषेत पत्र लिहून शिवाजीमहाराजांना आपल्या गाड्याला जुंपण्यासाठी प्रत्यक्ष भेटीला बोलावले. या टाळाटाळीचा महाराजांना राग आला. त्यांनी सात-आठ वर्षापूर्वी मागितलेली देशमुखी स्वपराक्रमाने पदरात पाडून घेण्याचे ठरविले व आपली ओळख पटवून देण्याचा धाडसी डाव टाकला. औरंगजेबाच्या टाळाटाळीला प्रत्युत्तर म्हणून मोंगली मुलुखातील जुन्नर शहर आठ दिवसांत मारले. २०० घोडे, तीन लक्ष होन, कापड व जडजवाहीर हस्तगत करून स्वराज्याच्या खजिन्यात जमा केले व औरंगजेबाला लक्ष देण्यास फुरसत नाही असे पाहून परत दोन महिन्यांनी अहमदनगर मारून लुटून नेले व औरंगजेबाची पहिली कुरापत काढली. परंतु जास्त ताणण्याच्या मन:स्थितीत औरंगजेब नव्हता. कारण त्याचा पिता शहाजहान आजारी झाला होता. म्हणून बादशाहीसाठी भावांची कारस्थाने हाणून पाडण्याकडे त्याचे लक्ष लागले. त्याने विजापूरकरांबरोबरचा तह रद्द करून मुलूख त्यांचेकडेच राहू दिला. खंडणीत देखील ३० लाख रु. सूट दिली व शिवाजीवर लक्ष ठेवा व त्याला तुमच्या राज्याबाहेर घालवून द्या असा विजापूरकरांना सल्ला देऊन औरंगजेब घाईने दिल्लीस निघून गेला.

महाराजांनी ही सर्व परिस्थिती चित्त्याच्या नजरेने हेरली. महंमद आदिलशहा मेलेला, विजापूरदरबारात अंदाधुंदी, कल्याण प्रांत औरंगजेबाला देऊन टाकलेला, औरंगजेब उत्तरेत निघून गेलेला. महाराजांना रान मोकळे मिळाले. धूर्त

Scanned with Car

व चाणाक्ष महाराजांनी याचा फायदा न घेतला तरच नवल. त्यांनी सरळ कल्याण-वर स्वारी केली.

त्यापूर्वी महाराजांनी निझामशाही कोकण काबीज केले होते. रघुनाथ बल्लाळ अत्रे यांनी दंडाराजपुरी काबीज केले होते (१४ ऑगस्ट १६५७) आणि दंडाराजपुरीचा शिद्दी महाराजांना कायम बुडवून टाकायचा होता. पोर्तुगीझांच्या अत्याचाराच्या बातम्या येत होत्या. सक्तीचे धर्मांतर, हिंदूंचा छळ या बातम्यांनी महाराजांचे मन पेटून उठले होते. पण सिद्दी बुडविणे किंवा पोर्तुगीझांना शह देणे म्हणजे प्रबल आरमाराची गरज होती. रघुनाथपंताना जंजिरा काबीज करणे जमले नाही; पण शिद्दीला जरब मात्र बसवली.

महाराजांनी विजापूरकरांच्या दरबारातील गोंधळ व औरंगजेबाचे दिल्लीस प्रयाण या संधीचा फायदा घेण्याचा विचार केला. महाराज एक दिवस स्वतः गुप्त वेषाने काही निवडक माणसे घेऊन कल्याणच्या बाजूस कोकणात खाली उतरले आणि कल्याण भिवंडीची जातीनिशी टेहळणी करून परत देशावर आले. त्यावेळी नुकताच दसरा होऊन गेला होता. (६ ऑक्टोबर १६५७ नंतर) कल्याणच्या पवित्र भूमीवर महाराजांचा पवित्र पदस्पर्श गुप्त रूपाने प्रथमच झाला. महाराज परत आले. आपल्या बरोबरच्या सहकाऱ्यांना आदेश दिला. दादाजी बापूजी रांझेकरांना फर्माविले. 'कल्याण कबजा करा,' सखो कृष्ण लोहकऱ्यांना म्हटले 'भिवंडी जिंका.' आबाजी सोनदेव व नेताजी पालकरांना सांगितले, 'तुम्ही मोहिमेचे नेतृत्व करा.'

आबाजी सोनदेव महाराजांचे एकनिष्ठ सेवक, विश्वासू व कर्तबगार योद्धे आणि नेताजी तर प्रतिशिवाजीच असा तलवारबहाद्दर आपल्या मावळे वीरांसह निघाले कल्याणकडे. महाराजांनी योग्य सूचना दिल्याच होत्या. ताबडतोब सेना कल्याणजवळच्या घनदाट जंगलात येऊन थडकल्या आणि आबाजींनी सैन्याचे तीन भाग केले. एक भाग नेऊन बसवला भूई डोंगरीच्या टेकाडाआड, पनवेल दरवाजा-समोर; दुसऱ्या भागाने हल्ला करावयाचा गणेश दरवाजावर. तिसऱ्या भागाने वाडेघर-अंकारवाडीकडून धडक मारायची दिल्ली दरवाजावर व बालेकिल्ल्यावर. नेताजीने तिसरा विभाग दिल्लीदरवाजाचा आपणाकडे घेतला. गणेश दरवाजाचे विभागावर आबाजी सोनदेव स्वतः राहिले आणि दादाजी रांझेकरांना सांगितले पनवेल दरवाजावर धडक मारा. वेढ्याची अशी रचना करून आबाजी सोनदेवाने मोहिमेला सुरुवात केली.

त्यावेळी कल्याणचा विजापुरी सरदार सुभेदार होता मुल्ला अहमद. तो स्वतः विजापूर दरबारीच अडकलेला होता. परंतु त्याचा मुलगा मात्र कल्याणला हजर होता. कल्याण शहर त्या वेळीही तटबंदीयुक्त होते. भोवती खंदक होता.

Scanned with Car

कल्याण शहराचे तटबंदीतील एकमेव शिल्लक असलेले प्रवेशद्वार

किल्ला शहर होते. पूर्वीच्या प्राचीन राज्यकर्त्यांपासून हे शहर खंदक वेष्टित व तटबंदी युक्त होते. वायव्य कोपऱ्यात खाडी किनाऱ्यावर एका उंचवटयावर बालेकिल्ला होता. तटाला ४ प्रमुख दरवाजे व ७ इतर दरवाजे होते. त्यापैकी एक दरवाजा व एक बुरूज आजही राममारुती मागे असलेल्या तटाच्या पडक्या भिंतीत आढळून येतो. तटाची एकूण लांबी सुमारे १ मैल ३५९ यार्ड व २ फूट एवढी होती. तटाची जाडी सुमारे ४ फूट व उंची सुमारे पाण्यापासून २० ते २५ फूट होती. तटाला एकूण ११ बुरुज होते. त्यापैकी हल्लीच्या पोस्टाजवळ मालसे यांचे घरापाशी एक वळणावर, गणेशदरवाजाचे दोन बाजूस दोन, दूध नाक्याचे वळणावर एक, पनवेल दरवाजाचे दोन बाजू दोन, दिल्लीदरवाजाजवळ दोन, अंधार दरवाजाजवळ दोन व राममारुती मंदिराजवळच्या कोटात असलेला १ बुरुज असे ११ बुरुज होते. बुरुजाजवळून व कोटाभोवती वरच्या बाजूने सुमारे ८ फूट रुंदीचा रस्ता होता. तटाभोवती सर्वत्र खंदक असून तो ३३ फूट रुंद व २० फूट खोल होता. या खंदकापलीकडे जाण्यासाठी काढते घालते असे पूल होते. गॅझेटिअर म्हणतो, हा तट शहाजहानच्या काळात कल्याणचा अधिकारी नबाब महाबतखान म्हणून होता त्याने बांधावयास सुरुवात केली व औरंगजेबाच्या काळी १६९४ मध्ये पूर्ण झाला. परंतु यास फारसा पुरावा मिळत नाही.

Scanned with Ca

एवढ्या बंदोबस्तात असलेले हे सुभ्याचे ठाणे आबाजी सोनदेवास घेणे एवढे सोपे नव्हते. म्हणूनच त्याला अशी व्यूह रचना करावी लागली. सुभेदार मुल्ला अहमंद जरी नव्हता तरी त्याचा मुलगा होता, व किल्ल्याचे रक्षणाकरिता किल्लेदार होता, उदयभान रजपूत सरदार. हाच तो उदयभान किल्लेदार ज्याने पुढे तानाजी-बरोबर सिंहगडावर झुंज दिली व दिल्लीश्वरांकरिता आपल्या प्राणांची आहुती देऊन व महाराजांचा सिंह मारून कोंडाणा किल्ला लढवला. अशा अतिशूर लढवय्या रजपूत सरदाशी गाठ होती, म्हणून आबाजी सोनेदेवाला अशी व्यूह रचना करावी लागली.

किल्ल्यावर नेताजीने प्रथम दिल्ली दरवाजाकडून हल्ला केला. तेव्हा शत्रू त्या दिशेने आला आहे या समजुतीने किल्लेदाराने आपले सैन्यबळ तिकडे एकवटले व किल्ल्यावरून व तटावरून तोफांचा भडीमार करू लागला. बाणांचा परस्परावर वर्षाव होऊ लागला. याच सुमारास नेताजीच्या एका विभागानें अंधार दरवाजा-वर धडक मारून आत प्रवेश मिळवला; प्रथम दरवाजा उघडून आबाजी सोनदेवास आत घेतले; थोडा प्रतिकार झाला व त्यात बेसावध मुसलमान मारले गेले. रात्रीची वेळ असल्यामुळे आरडाओरड व पळापळ ह्यांचा सुमार राहिला नाही. प्रचंड घबराट उडाली व त्याच वेळी रांझेकर आपल्या स्वारीनिशी पनवेल दरवाजाने घुसला आणि कापाकापी सुरू झाली. पिंपळाचे पाराजवळ सुभेदाराचा वाडा होता. (हल्लीचा सरकारवाडा). त्याच्या भोवती आबाजी सोनदेव व रांझेकर यांनी लगट करून चौकीपहारे बसवले. उदयभान किल्लेदार नेताजीशी सामना देण्यात गुंतला होता. मराठा सैन्याने अंधार दरवाजाकडून लगट करून उदयभानाचे सैन्यास कापून काढले. उदयभानाजवळ सैन्य बेताचे असल्यामुळे त्याचा नाइलाज झाला आणि कल्याण काबीज झाले. आबाजी सोनदेवाने समस्त कल्याण धुऊन काढले, प्रचंड लूट गोळा केली; तसेच सुभेदाराचा मुलगा, त्याचे कुटुंब वगैरे सर्व शत्रू कैद केले; त्याच दिवशी सखो कृष्ण लोहकऱ्यांनी भिवंडी काबीज केली आणि महा-राजांना खबर पोहोचली, ' कल्याण भिवंडी कबज झाले. ' कल्याण सुभ्याने पुन्हा एकदा स्वातंत्र्यसूर्याचे दर्शन घेतले. तो दिवस होता २४ ऑक्टोबर १६५७.

महाराजांना अत्यंत आनंद झाला, आणि स्वत: जातिनिशी निघाले आपल्या वीरांचे कौतुक करायला, त्यांची मर्दुमकी पाहायला, पाठ थोपटायला ! महाराज त्वरेने कल्याणला आले. पूर्वी येऊन गेले होते गुप्त वेषात, (३ ऑक्टोबर १६५७) चोरून, आणि आज प्रवेश करते झाले त्याचे मालक म्हणून, विजयी वीराच्या उल्हासाने, उघडपणे, जाहीरपणे लवाजम्यासह. कारण कल्याण प्रांत स्वराज्यात सामील झाला होता. महाराजांच्या दीर्घ महत्त्वाकांक्षेचे, आरमारी बळाच्या आरंभाचे पहिले पाऊल म्हणजे संरक्षित किनारपट्टीची भूमी मिळाली. महाराजांच्या

नजरेसमोर होता, जुलमी सिद्दी, बलात्कारी फिरंगी गोवेकर. त्यांच्या पाडावाकरता आरमाराची जरूर होती. त्या योजनेचा मूलभूत आधार व कोकणचे प्रवेशद्वार, महाराजांचे ताब्यात आले होते. आबाजी सोनदेव, नेताजी पालकर, दादा रांझेकर महाराजांच्या स्वागताची तयारी करीत होते. संपूर्ण गडावर मुसलमान सैनिकांचे डगल्याऐवजी मराठमोळ्या सैनिकांच्या पगड्या दिसत होत्या. कल्याण शहर शृंगारले होते. गुढ्या, तोरणे उभारली होती. संपूर्ण शहराचे पातशाही स्वरूप पालटून अस्सल मराठेशाही दिव्यरूप झाले होते. आजूबाजूच्या प्रदेशातील हिंदु शेतकरी, प्रजाजन शहरात जमा झाले होते. रस्ते खच्चून भरले होते आणि उत्कंठेने महाराजांची वाट पहात होते.

घोड्यांच्या टापांचे आवाज आले, **हेजीब** आले आणि मागून महाराजही आले. गणेश दरवाजापाशी महाराज उतरले, आणि आबाजी सोनदेव, नेताजी पालकर, रांझेकर इत्यादि वीरांना कडकडून मिठ्या मारल्या व म्हणाले, 'शाबास!' प्रजाजनांना आनंद झाला. त्यांचा मराठी राजा त्यांना पाहायला मिळाला. त्यांनी आरोळी दिली, 'शिवाजी महाराज की जय,' आणि तो आवाज दशदिशांत उठला, अंतराळ भेदून गेला आणि दिल्लीला औरंगजेबाच्या उरात धडकी भरली. विजापूरची बडी बेगम किंचाळत उठली, शिद्दी जोहर हादरला आणि फिरंगी पोर्तुगीझ गारेगार झाला. त्यांची घबराट उडाली, कारण त्यांच्या पापांचे घडे पूर्ण भरण्याचे दिवस आले. या भीतीने कल्याण कबज झाले ही खबर त्यांना पोहोचली होती. ४४८०३

आबाजी सोनदेवांनी महाराजांची बारादरीत उतरण्याची व्यवस्था केली होती. तेथे घेऊन गेले. महाराजांनी विश्रांती घेतली व आबाजी सोनदेव, नेताजी पालकर, दादा रांझेकरांच्या तोंडून विजयाची हकीगत ऐकली आणि संतोष पावले. दुसरे दिवशी बारादरींत दरबार भरवला आणि आबाजी सोनदेव, नेताजी, दादा रांझेकर व इतर प्रत्येकाचे जाहीर कौतुक केले. आबाजी सोनदेव म्हणाले, "महाराज, या शहराच्या लढाईत मिळालेली लूट आणून हजर करतो." महाराजांनी अनुज्ञा दिली. आबाजी सोनदेवाने लुटीचे ढीगच्या ढीग आणून महाराजांपुढे रचले. त्यात काय नव्हते? सुंदर रेशमी, मखमली कापडांचे ढीग होते, जवाहिरांच्या पेट्या होत्या, लक्षावधी सुवर्ण नाणी होती, सर्व काही होते. महाराज संतुष्ट झाले. महाराजांनी सर्व वीरांचा योग्य पारितोषके व पोशाख देऊन सन्मान केला. तेवढ्यात आबाजी म्हणाले, "महाराज, काही कैदीही पकडले आहेत." महाराजांनी हजर करा म्हणून सांगितले. एक एक कैदी हजर केला. महाराजांनी त्यांना न्यायला सांगितले. नंतर पुढे आणला प्रमुख कैदी सुभेदाराची सून. महाराज गोषा समोर पाहून चमकले. आबाजींनी तिला बुरखा दूर करायला सांगितले. सर्वांच्या नजरा राजाकडे आणि त्या सुनेकडे लागल्या होत्या. सर्व दरबारात शांतता होती. सुनेने आपल्या मुखावरील ओढणी दूर केली आणि तिच्या नजरेतून दोन अश्रुबिंदू ओघळले.

Scanned with Ca

सारा दरबार थक्क होऊन पहात होता. केवढे हे अलौकिक लावण्य! सौंदर्याच्या सर्व वस्तू, पूर्णिमेचा चंद्र, सोनचाफ्याचा वर्ण, गुलबाक्षीची लाली, गुलाबाची कोमलता, सौंदर्याच्या सर्व सूचक गुणांचा परिपाक म्हणजे ती लावण्यवती. परमेश्वराने सर्व सुंदर वस्तू निर्माण करून कसलेल्या हाताने केलेली कलाकृती म्हणजे कल्याणच्या सुभेदाराची सून.

ती अप्रतिम सजीव कलाकृती पाहून महाराज चकित झाले. सारी सदर पापणी न हालवता पाहात राहिली.

"ओहोहो, केवढी ही रूपदौलत ! या दौलतीच्या लोभाने परमेश्वरालाही मोह पडून हिची प्राप्ती होण्यासाठी मनुष्य होण्याची इच्छा व्हावी." सुभेदाराची सून थरकली; तिच्या डोळ्यांतून अश्रूंची माळ पाझरू लागली. महाराज किंचित हसले आणि म्हणाले "आबाजी, कुणाघरची ही बाई?"

"कल्याणच्या सुभेदाराची सून" आबाजी उत्तरले.

"धन्य तिचे माहेर आणि धन्य तिचे सासर ! अशी अलौकिक कन्या पोटी यायला सात जन्मीचे पुण्य लागते आणि हिचा पती व्हायला तेवढेच, आणि अशी बहीण लाभायलाही तेवढेच भाग्य लागते."

"आबाजी," आबाजी थरकले. महाराजांचा सूर बदलला होता.

"आबाजी, आमच्या मासाहेब जर एवढ्या सुंदर असल्या तर आम्हीही एवढेच सुंदर झालो असतो, नाही ?"

आबाजी थक्क झाले, दरबार थक्क झाला !

"आबाजी, ज्यास यश पाहिजे त्याने उच्छिष्ट स्त्रीचा अंगीकार करू नये. परस्त्री अभिलाषाने महाबळी रावणादिक देखील लयास गेले. द्रौपदीची नुसती निरी ओढली तर अठरा अक्षौहणी लोकांचे बलिदान झाले. राजास सर्व प्रजा अपत्याचे जागी. स्त्रिया करणे शक्ती पाहून शतावधि कराव्या असा राजधर्म आहे. आबाजी, हिला बांगडी चोळी, वस्त्रालंकार आणवा. हे स्वराज्य स्त्रियांच्या अब्रू-रक्षणाकरिता आहे."

पंत वस्त्रालंकारांनी भरलेले ताट हुजऱ्याहाती घेऊन आले आणि महाराजां-पुढे धरले. महाराजांनी ताटास हात लावला आणि पंतांनी ते ताट त्या युवतीपुढे केले.

"बाई, घ्या ही भावाघरची चोळीबांगडी. तुम्हांला तकलीफ झाली. तुमच्या पडद्याची इज्जत दुखावली. आता तुम्ही बेफिकीर असा. हे तुमचे माहेर आहे." महाराज म्हणाले,

तिने ताट स्वीकारले, तिला अत्यानंद झाला; ती स्तिमित झाली, थक्क झाली! असल्या उदात्त अंतःकरणाचा तिच्या धर्मीयांत तिला अनुभव नव्हता. तिला

अनुभव फक्त एकच होता अब्रूची लूट. परंतु हे विपरीत होते. अनुभवाविरुद्ध होते. तिला महाराजांच्या या दिव्यत्वाच्या प्रचीतीने बेभानता आली आणि सारी कृतज्ञता एकवटून ती म्हणाली, "सुबहानअल्ला भाईजान ! आप मुझ कनीजके दामने अस्मतका इतना एहसलाम फर्माएंगे और नाचीजको अपने दिलमें हकीकी बहेनकी जगह अता फर्माएँगे ऐसी उम्मीद न थी ? आपका दिल कितना पुरअखलाक और मजबूत हैं, के हुस्नकी फसूँकरी उसपर जराभी असर अंदाज न हो सकी। आप हमारे दुष्मन होते हुए भी आपने अपने हाथोंसे अखलाकका दामन छूटने न दिया, ये बात आपके आला खानदानकी आईनादार है ! आपकी नेक चलनी और बा अखलाख जिंदगी आपके नामको हयाते जावेदानी बख्शेगी ! और आपका नाम सफहे रहो हजार बरस। मेरे मोहासिन ! खुदा हाफिज !"

महाराजांनी स्मित केले. महाराजांचे वर्तन पाहून सारी सभा थक्क झाली होती. नायब सुभेदार व इतरांस वस्त्रे देऊन मुक्त केले व सुनेला बंदोबस्ताने तिच्या सासऱ्याकडे विजापुरास पोचवण्याची व्यवस्था करण्यास सांगितले. दरबार बरखास्त झाला. सर्व गेले, आणि आबाजी सोनदेवाने महाराजांचे पाय धरले.

महाराज हसून म्हणाले, "आबाजी, तुमच्यावर रागावलो नाही." आबाजी म्हणाले, "महाराज, चूक झाली" "पण माझी झाली नाही. मी तुमची योग्यता ओळखली आहे. आजपासून कल्याणच्या सुभेदारीचे काम तुम्हांला पाहावे लागेल" महाराज म्हणाले आणि त्याचवेळी सारे विश्व महाराजांच्या दिव्यत्वाच्या प्रचीतीने थक्क होऊन गेले होते. हा प्रसंग चिटणीसांच्या बखरीत वर्णन केलेला आहे. ही चिटणीशी बखर चिटणीसांनी १८१० मध्ये साताऱ्याच्या महाराजांचे आज्ञेवरून लिहिली. ही लिहिताना भोसले राजघराण्यातील कागदपत्रे, नोंदी वगैरेच्या अस्सल कागदपत्राद्वारे लिहिली असा निर्वाळा प्रतापसिंह महाराजांनी दिला आहे. त्यामुळे लेखक केवळ समकालीन नाही. शिवकालानंतर १५० वर्षांनी लिहिली आहे व बखर आहे एवढ्यावरूनच कित्येकजण हा प्रसंग घडलाच नाही असे समजतात. कारण त्यावेळच्या समकालीन कागदपत्रांत अस्सल आधार नाही. बरे समकालीन शिवदिग्विजय बखर सुप्रसिद्ध खंडोबल्लाळ चिटणीसांनी लिहिली आहे असे प्रकाशकांनी म्हटले आहे. त्यात हे प्रकरण आहे. फक्त तपशिलात थोडासा फरक आहे. ते म्हणतात, आबाजी सोनदेवाने काझीची सून पैसे देऊन विकत घेतली होती, ती महाराजांना अर्पण केली. अर्थात ही गोष्ट अविश्वसनीय आहे. शिवाजी महाराजांच्या आपल्या सैनिकांना अत्यंत कडक आज्ञा होत्या. तेव्हा आबाजी सोनदेव अशी एखादी स्त्री विकत घेऊन अर्पण करतील, व तसेच बरोबरीचे नेताजीसारखे सहाय्यकर्ते ह्याला साथ देतील ही गोष्ट सुतराम् शक्य कोटीतील नाही. तसेच कोणताही काझी आपली सून किंवा कन्या पैसा घेऊन आबाजी सोनदेवाला देईल हेही शक्य वाटत

Scanned with Car

पैसा शिवाजीचे हस्तक उधळणे ही नाही. तसेच असल्या कामासाठी स्वराज्याचा शक्यता नाही. तेव्हा ' शिवदिग्विजय ', खंडोबल्लाळ चिटणीसांनीं लिहिली सांगणारे प्रकाशक ती प्रत कोठून मिळाली ते सांगत नाहीत. तेव्हा तो ग्रंथच संशयास्पद आहे. तसा मल्हारराव चिटणीसांचा नाही. तेही बाळाजी आवजी चिटणीसांचेच वंशज होते. तरी त्यांनी तो ग्रंथ सातान्याचे तत्कालीन महाराज प्रतापसिंह ह्यांचे आज्ञे-वरून " कारकीर्दी वडिलार्जित होत्या, दिनचर्या व पराक्रम कथाही होत्या. त्याच्या आश्रये करून लेहून निवेदन केले " असे म्हटले आहे. म्हणजे वंशपरंपरागत चिटणीस लिखित सप्तप्रकरणात्मक शिवचरित्र हे जास्त विश्वसनीय मानले पाहिजे.

परमानंदाच्या काव्यात नाही म्हणून ते खोटे म्हणताना देखील परमानंद तरी कितपत खरा मानता येईल ? केवळ तो समकालीन होता; महाराजांनीच त्याला काव्य लिहावयास परवानगी दिली म्हणून ? असेच जर मानावयाचे तर त्यांत जे देवत्व व अद्भुतता वर्णन केली आहे ती तरी खरी मानायची काय ? असे असेल तर महाराजांचे मनुष्यत्वच संपले. कारण एकदा अवतार म्हटल्यानंतर त्याला काहीच अशक्य नाही आणि अवतारच मानायचा असेल तर मग ही कथाही अद्भुत खरीच मानावयास पाहिजे. काही असले तरी महाराजांच्या नीतिमत्तेची दिगंत कीर्ती पोहोचवणारी कथा अजब वाटत असली तरी असले प्रसंग त्या काळी अनेक आले असतील; म्हणून परमानंदाला त्याचे महत्त्व वाटले नसेल असे म्हटले तरी बिघडणार नाही. बखर हा कोणत्याही घटनेचा दुय्यम पुरावा म्हणून कदाचित जर ही गोष्ट खरी मानावयाची नसेल, तर अशा अनेक गोष्टी हेच नामवंत इति-हासकार बखरीच्या आधारे सांगतात. मग त्याही गोष्टी खोटया का म्हणावयाच्या नाहीत ? समकालीन एवढेच विशेषण अस्सलची बरोबरी करू शकते काय ? सम-कालीन फिरंग्यांनी अस्सल कागदपत्रांत महाराजांच्याबद्दल वाटेल ते लिहिले आहे; म्हणजे ते खरे मानून चालणार नाही. तेव्हा काही तरी खुसपट काढून आपले वैशिष्टच प्रकट करण्यासाठी व संशोधक म्हणून धक्का देण्यासाठी तर काही आधुनिक संशोधकांनी असा प्रयत्न केला नाही ना ? अशी शंका येते. कारण सध्याचे युग इतिहासाची मोडतोड करण्याचे आहे. त्यात काही तरी शंका उपस्थित करणे हेच काही व्यासंगाचे लक्षण नव्हे. शिवाजी महाराजांच्या चारित्र्याबद्दल अनेक पाश्चा-त्यांनी लिहून ठेवलेले मान्य आहे. प्रत्यक्ष शत्रूच्या, मुसलमान इतिहासकारांनी लिहून ठेवलेले आहे; तेही मान्य आहे, सर्व मान्य आहे, महाराज नीतिमान होते, देव, धर्म, ब्राह्मण, स्त्री हे महाराजांचे मानबिंदू होते हेही मान्य करणे भाग आहे. मग सुभेदाराच्या सुनेचे प्रकरण खोटे होते हे सिद्ध करण्याचा दिव्य अट्टाहास करणे हे कशाचे द्योतक आहे ते इतिहासकारच जाणोत. परंतु सरदेसाई, यदुनाथ सरकार, श्री. भावे, वगैरे थोर इतिहासकारही जर ही शंका उपस्थित करीत नाहीत, उलट म्हणतात, " महाराजांनी कल्याण भिवंडी हा प्रदेश १६५७ च्या सुमारास जिंकून

घेतला त्या वेळीच कल्याणच्या मुसलमान स्त्रीची कथा घडली असली पाहिजे आणि चिटणीसांसारख्या साधनसंपन्न बखरकाराने ती दिली असल्यामुळे विश्वसनीय समजण्यास हरकत नाही. " (भावे–शिवराज्य व शिवकाळ पृ. ९२)

एक गोष्ट नक्की की सुभेदाराच्या सुनेच्या प्रकरणाने महाराजांच्या नीतिमत्तेच्या दिव्यत्वाची सर्व विश्वाला खात्री झाली. त्याचप्रमाणे ज्या कल्याण शहरात तो प्रसंग घडला त्या कल्याण शहराच्याही कीर्तीत एक मानाचे पान रोवले. सुभे कल्याण अजरामर झाले. जोपर्यंत महाराजांचे नावाचा डंका गाजत राहील, तोपर्यंत कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचे प्रकरणही गाजत राहील आणि कल्याणचे नावही गाजत राहील. महाराज–सुभेदाराची सून–आणि सुभे कल्याण या त्रिमूर्तींची कीर्ती यावच्चंद्रदिवाकरौ कोणी कितीही मलीन करण्याचा प्रयत्न केला तरी कलंकित होणार नाही. धन्य ते महाराज, धन्य ती सुभेदाराची सून, धन्य तो सुभे कल्याण, आणि धन्य तो आबाजी सोनदेव ज्याने हा प्रसंग घडवून आणला!

त्यानंतर महाराज कल्याणच्या खाडीवर आले. समुद्र नाचत होता. महाराजांनी आबाजी सोनदेवास आज्ञा केली, बालेकिल्ला बांधून काढा. हाच तो कल्याणचा प्रसिद्ध किल्ले दुर्गाडी. आबाजी सोनदेवाने त्वरित माणसे कामास लावली आणि पाया खणताना महाराजांना द्रव्याचा ठेवा मिळाला. महाराजांच्या कार्याला जणू देवी भवानीने साथ दिली. महाराजांनी किल्ल्याचे नाव ठेवले किल्ले दुर्गाडी आणि प्रत्येक किल्ल्यावर ज्याप्रमाणे महाराजांनी देवीची स्थापना केली तशीच येथेही केली असलीच पाहिजे. पुढेही दुर्गादेवीचे मंदिराचा जीर्णोद्धार पेशव्यांनी केलेला आहे. अर्थात तेच हे वरदायिनी त्र्यैलोक्याचे रक्षण करणाऱ्या श्री दुर्गाभवानीचे मंदिर. आजच्या संशयात्म्यांच्या समाधानासाठी महाराजांनी प्रत्यक्ष लिहून ठेवले नसेल कदाचित्; पण दुर्गाडी हे नाव दिले हे लिहिले आहे. देवीचे नाव ज्या किल्ल्याला दिले तेथे आपल्या परंपरेने श्री दुर्गाभवानीचे मंदिर बांधले की नाही ही शंका व्यक्त करणे म्हणजे महाराज हिंदू होते की नव्हते अशीच शंका व्यक्त करण्यासारखे आहे.

महाराजांना कल्याणभूमी मिळाल्यामुळे सिद्दी, इंग्रज, विशेषेकरून पोर्तुगीज यांना जरब बसवून नाहीसे करण्यासाठी आरमार उभे करायला जागा मिळाली; महत्त्वाकांक्षा व ध्येयसिद्धीसाठी सुरक्षित भूमी मिळाली. महाराजांनी त्वरित आपले आरमार सिद्ध करण्याचा हुकूम दिला. काम सुरू झाले आणि महाराज कोकणच्या स्वारीवर निघेपर्यंत महाराजांचे आरमार सिद्ध झाले. खाडीत लढाऊ तोफा उभ्या झाल्या. उल्हास व काळू संगमतीर्थावर निर्माण झाल्या म्हणून त्यांना नाव दिले संगमिसी. स्वराज्याचे पहिले आरमार सागरावर तरंगू लागले. महाराजांनी पहिला सरखेल म्हणजे सागराध्यक्ष नेमले दर्यासारंगास. शिवाय इब्राहीमखान, दौलतखान,

Scanned with Car

व मायनाक भंडारी हे अत्यंत शूर, धाडसी, निष्ठावंत, अधिकारी आरमारात सामील केले.

महाराजांनी तेथून तडक जातीनिशी माहुलीच्या किल्ल्याच्या रोखाने चाल केली. हा किल्ला असनगाव रेल्वेस्टेशनजवळ आहे. याच माहुली गडावर शहाजीराजांनी निझामशाहीसाठी अखेरची झुंज मोंगलांशी एकतीस वर्षापूर्वी दिली होती. येथेच कदाचित् महाराजांचा जन्म झाला असता; परंतु विधिघटना निराळी होती. ते माहात्म्य शिवनेरीला मिळायचे होते. परंतु अभिमन्यु ज्याप्रमाणे मातेच्या उदरात चक्रव्यूह-भेदन शिकला, त्याप्रमाणे या ठिकाणी महाराज स्वराज्य-स्थापनेचा महामंत्र मातेच्या उदरात शिकले. तो गड महाराजांनी जातीने येऊन जिंकला आणि स्वराज्यात सामील केला. सुभे कल्याण निर्वेध केले. (८ जानेवारी १६५८) आणि महाराज राजगडावर परत गेले.

महाराज लगेच कोकणच्या स्वारीवर निघाले आणि कल्याणच्या 'संगमिसी' आरमाराने आपला पराक्रम दाखवला. भगव्या झेंड्याचा धाक शिद्दीला बसला. पोर्तुगीज फिरंग्यांना बसला आणि त्यांनी गडबडून पोर्तुगालच्या बादशहाला कळविले, शिवाजीने आरमार सिद्ध केले. धोका उत्पन्न झाला. महाराजांनी अचूक हेरले की ज्याचे आरमार बलवत्तर त्याची सत्ता समुद्रावर, त्याची सत्ता कोकणावर आणि त्या सिद्धतेचा मान मिळाला कल्याणला–धन्य ते सुभे कल्याण. शिवाजी महाराजांनी कल्याण बंदरी प्रथम सागरी सत्तेचा पाया घातला. त्या विषयी कृष्णाजी अनंत सभासदाने पुढील उद्गार काढले आहेत–

"कित्येक पाणियातील डोंगर बांधून दर्यामध्ये गड वसविले. पाणियातील केवळ जंजिरे असे करून गड, जहाजे मिळवून दर्यास पालाण राजियांनी घातले. यास राजीयांनी जहाजे पाणियातली सजविली गुराबा, तरांडी, तारवे, गलबते, शिबाडे पगार अशी नाना जातीची जहाजे करून दर्यासारंग म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाक म्हणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून दोनशे जहाजे एक सुभा असे आरमार सजले. त्यास व सिद्दीचे जहाजास युद्ध होऊन शिद्दीची जहाजे पाडाव केली. युद्ध बहोत झाले. दर्यात तरांडे फिरकेना असे झाले. त्यावर हमेशा युद्ध करीत चालले. मग चोरून मारून हबशी सामान नेत होता. राजियांची जहाजे जागाजाग, बंदरे, शहरे, मोंगलाई व फिरंगी वलंदेज, इंग्रज, किलाताब ऐशा सत्तावीस पातशाहचा पाणियात आहेत. त्यांची शहरे बेदनूर. सौंदे, श्रीरंगपट्टण, ऐशी दर्याकिनारे नाना शहरे मारून पोट भरीत चालले. जागा जागा युद्ध करीत मालेमत्ता मेळवून, आपले पोट भरून राजियांस रसद, द्रव्ये, जिन्नस आणून देऊ लागले. ये रीतीने सातशे जहाजे पाण्यातील जाली. समुद्रामध्येही एक लष्कर जाले."

शिवाजी महाराजांच्या आरमारातील जहाजांच्या संख्येविषयी पुढील माहिती मिळते. आरमारात २०० जहाजांचा एक सुभा अशी ७०० जहाजे होती. म्हणजे

३॥ सुभे होते. चिटणीस बखरीत ही संख्या सुमारे ४०० ते ५०० दिली आहे. चित्रगुप्ताने आपल्या बखरीत महाराजांच्या आरमाराची पुढील यादी दिली आहे.

मराठ्यांच्या आरमारातील गलबते

गुराबा (मोठी)	३०
गुराबा (लहान)	५०
गलबते	१००
तारवे	६०
महागिऱ्या	१५०
होड्या	१६०
जय	१५
पाल	२५
मचवे	५०
एकूण	६४०

महाराजांनी सागरी सत्ता स्थापन केल्याबरोबर धूर्त इंग्रज, शिवाजी काय चीज आहे हे समजून चुकले. जेम्स डग्लसने महाराजांविषयी काढलेले उद्‌गार सूचक आहेत. तो म्हणतो, " शिवाजी जन्माने खलाशी नव्हता ही ईश्वराची कृपाच होय. तो जर खलाशी असता तर जशी त्याने भूमी पादाक्रांत केली त्याचप्रमाणे समुद्रावरही आपला अंमल चढविला असता. तो खलाशी नसतानाही सागरावर त्याने आपले वर्चस्व स्थापन केलेच. त्याला सागरी जीवनाची एवढी आवड होती की त्याने बाण-कोटच्या खाडीवरील महाड या ठिकाणी आपले वास्तव्य केले. असे म्हणतात की सिंधुदुर्गाच्या तटबंदीच्या कामात स्वतः हातभार लावला."

हिंदुस्थानात मोगल सम्राट झाले किंवा विजापूरकरांच्या अमलाखाली पश्चिम किनारा होता, तरी त्या शहांना सागरी सत्ता निर्माण करण्याची बुद्धी सुचली नाही. परंतु शिवाजी महाराजांना–एका नव्याने निर्माण झालेल्या सत्ता-सम्राटाला ही कल्पना सुचावी यातच शिवाजी महाराजांची दूरदृष्टि, अचूक अंदाज इत्यादि गुण दिसून येतात. या गुणांच्या जोरावरच महाराजांना या मोंगली वावटळीला उलथवून हिंदवी स्वराज्य स्थापणे शक्य झाले.

कल्याण बंदराची आरमारी–प्रमुख केंद्र आणि कारखाना यासाठी निवड करण्यातही त्यांनी फार दूरदर्शी धोरण वापरले. ठाणे, उरण, वसई या सागराला अगदी उघड्या जागा आहेत. त्या ठिकाणी महाराजांनी हा प्रयत्न केला असता तर कदाचित् सिद्दी किंवा पोर्तुगीजांनी ते कार्य यशस्वी होऊ दिलेही नसते. त्याचप्रमाणे गनिमी युद्धाच्या नीतीला सोइस्कर जसा सह्याद्री, तसे सागरी युद्धाला तोच काबा

साधण्यासाठी अगदी आतील भागातील सुरक्षित बंदर म्हणजे कल्याण हेच होय, हे महाराजांनी हेरले. या बंदरातून तीन चार आडमार्गाला पळून जाता येते. यास्तव व आपल्या आरमारनिर्मितीच्या जागेची गुप्तता राहावी व सामर्थ्याचा खरा अंदाज शत्रूला कधीही येऊ नये, यासाठी कल्याण खाडी पसंत केली. कारण गांधारीच्या बाजूची खाडी अरुंद व झटकन ओलांडली तर उत्तरेकडचा घाटाचा मार्ग मोकळा राहतो. पनवेल बाजूचा मार्ग चोळा वगैरे बाजूने मिळतो; तसेच ठाणे खाडीतून मुंबई व वसई दोन्ही भागाकडे जाता येते. म्हणजेच ज्याप्रमाणे कल्याण शहरापासून उत्तर, दक्षिण व पूर्व बाजूला जायला घाट आहेत म्हणून ते घाटाचे प्रवेशद्वार, तसेच सागरावरील सर्व दिशांना जाण्यास सोईस्कर अशी खाडी, म्हणजे उल्हास व काळूचा संगम कल्याण खाडी. तेव्हा सागरी व भूमी या दृष्टीने कल्याण हे अतिशय मोक्याचे व सुरक्षित बंदर आहे हे महाराजांनी ओळखले व कल्याण हेच सागरी सत्तेचे प्रमुख केंद्र ठरविले. महाराजांनी यात किती सूचकता व दूरदृष्टी दाखवली होती हे दिसून येते आणि म्हणूनच पूर्व किनाऱ्यावर ब्रिटिशांना जेवढी लवकर सत्ता स्थापन करता आली तेवढ्या लवकर पश्चिम किनाऱ्यावर करता आली नाही, यातले मर्म हेच आहे.

‘ संगमिरी किंवा संगामिसी ’

महाराजांनी कल्याण बंदरात निर्माण केलेल्या युद्धनौकांना ‘ संगमिरी ’ किंवा ‘ संगामिसी ’ असे नाव दिल्याचे नेहमी वाचनात येते. कल्याणचे एक जाणते इतिहास अभ्यासू व ज्यांनी कल्याण शहराची प्राथमिक ऐतिहासिक माहिती प्रथम गोळा करण्याचा पूर्वी प्रयत्न केला होता, त्यांनी याचा अर्थ काय हे जाणून घेण्याच्या दृष्टीने बऱ्याच इतिहासकारांना प्रत्यक्ष भेटून किंवा पत्राद्वारे विचारले होते. परंतु कोणीही या शब्दाचा अर्थ किंवा व्युत्पत्ती सांगू शकले नाही. ख्यातनाम इतिहासकार श्री. सरदेसाई यांनी त्यांना लिहिलेले उत्तर आमच्याजवळ आहे, त्यात त्यानी सांगितले आहे की, यासंबंधी मला काहीही निश्चित सांगता येणार नाही. परंतु आपण सरकारांचे पुस्तक वाचावे, कदाचित् त्यात खुलासा सापडेल. त्यानंतर आम्हीही या महाराजांनी ठेवलेल्या किंवा नव्यानेच निर्माण केलेल्या नावासंबंधी शोध सुरू केला. परंतु कोठेही त्याचा खुलासा आढळत नाही. श्री. डॉ. रामदास यांनी महाराजांच्या सागरी सत्तेसंबंधी एक प्रबंध लिहिला असून डॉक्टरेट मिळवली आहे; तो प्रबंधही चाळून पाहिला. सर्व माहिती आहे; परंतु या शब्दाचा खुलासा सापडला नाही. नंतर विचाराअंती आम्हालाच शेवटी एक कल्पना सुचली व ती तर्कदृष्ट्या महाराजांच्या एकूण व्यवहाराशी सुसंगत वाटते म्हणून बरोबर असेल असे वाटते. महाराजांनी आपल्या राज्यात जे जे गड बांधले, मिळवले त्यांची त्यांनी नावेही बदलली व ती सामान्यतः त्या गावावरून किंवा काही विशेष

Scanned with Car

प्रसंगावरून नामकरण केले. उदा. रायरीचा त्यांनी रायगड केला. सिंधुदुर्ग हे सागरी किल्ल्याला उचित नाव दिले. कोंडाणा किल्ला घेताना महाराजांचा उजवा हात, सिंह गेला म्हणून त्याला सिंहगड नाव ठेवले. तसेच उल्हास-काळू या नद्यांच्या संगमावर महाराजांच्या युद्धनौकांची बांधणी होऊन आरमार सिद्ध झाले म्हणून त्यांनी आपल्या युद्धनौकांना संगमीसी हे नाव ठेवले असावे असा आमचा युक्तिवाद आहे व महाराजांच्या एकूण योजकतेशी, नावे बदलण्याच्या भूमिकेशी फत्तेमारी, महागिरी या नावाशी साधर्म्यसूचक असे संगमिसी हे नाव महाराजांनी आपल्या सुरुवातीच्या युद्धनौकांना ठेवले असावे हा आमचा युक्तिवाद सुसंगत वाटतो. महाराजांनी ठेवलेले हे सुसंगत नाव मात्र पुढे टिकले नाही ही गोष्ट निराळी व जुन्याच पद्धतीची रूढ नावे चालू राहिली. अर्थात महाराजांना ते नवे नाव रूढ करायला पुढे फार अवसरही मिळाला नाही व पुढील काळात आरमाराची जी हेळसांड झाली, त्यामुळे या नावाच्या माहात्म्याकडे दुर्लक्ष झाले व ते नाव नष्ट झाले. परंतु आमच्या मते संगमिसी या नावामागे हीच उपपत्ती असावी असे वाटते.

कल्याण बंदरात युद्धोपयोगी जी जहाजे महाराजांनी बांधली त्यांची संख्या पोर्तुगीजांच्या डोळ्यांत सलण्याइतकी वाढली. या संबंधात पोर्तुगीझ व्हाइसरॉयने पोर्तुगालच्या राजाला १६ ऑगस्ट १६५९ च्या पत्रात कळविले–

" A son Xagi (शहाजी), rebel Captain of King Idalase (आदिलशहा) has made himself master of the land near Bessein and Cheul. He is powerful and obliges us to have great care as he has made some ships of war at Galiana (कल्याण) Biundy (भिवंडी) and Panvel (पनवेल) ports in the districts of Bessein. We have ordered the captain not to allow them to put out in the sea and to impede their exit."

पत्राचा आशय असा की, शिवाजीने कल्याण, भिवंडी कबज करून कल्याण, भिवंडी, पनवेल येथे लढाऊ जहाजांच्या बांधणीस सुरुवात केली आहे. आम्ही आमच्या कॅप्टनला हुकुम दिला आहे की ती, जहाजे पाण्यात येऊन देऊ नयेत व आल्यास त्यांना प्रतिबंध करावा.

प्रजेच्या हिताच्या दृष्टीने महाराजांनी ही आरमारी छावणी प्रतिवर्षी एकाच बंदरी करू नये अशी आज्ञा दिली. कारण त्यामुळे त्या मुलखास उपसर्ग होतो. आरमाराची माणसे पुष्कळदा अविंध आणि उन्मत्त असतात. एखादे वेळी बोलाचालीमुळे कचकलागत होऊन लोक जायबंदी होतील किंवा परस्पर संकेतस्थळे होऊन फितुरी होऊ शकेल, हे बरे नव्हे. तरी आरमाराची छावणी प्रतिवर्षी नूतन

बंदरी करणे. ज्या बंदरास किल्ला आहे व किल्ल्याचे दहशतीने, गनीम खाडीत शिरो न शके अथवा आडखाडी, ऐसे खाडीत आरमाराची छावणी करावी.

महाराजांची प्रजेविषयीची कळकळ, तसेच दक्षता दिसून येते. अर्थात कल्याणची खाडी ही आडखाडी म्हणून आरमारी गुप्त छावणी व गलबत कारखाना या दृष्टीने निश्चित केली. आरमार स्थापनेसाठी महाराजांनी किती विचारपूर्वक योजना केली होती हे दिसून येते.

¤ ¤ ¤

Scanned with Cam

: ८ :

सुभे कल्याणचा स्वातंत्र्यसंग्राम

छत्रपती शिवाजीमहाराज औरंगजेबाच्या कैदेतून आगऱ्याहून सुटून आल्यापासून औरंगजेब अतिशय चवताळला होता; त्याचप्रमाणे महाराजही स्वतंत्र राज्यस्थापनेच्या ज्वलंत ईर्षेने पेटून उठले होते आणि स्वराज्यांत परत येताक्षणीच आपले गेलेले राज्य परत मिळविण्याचा सपाटा त्यांनी लावला होता. त्यांनी दक्षिणेत मोगल सम्राट, विजापूरचा सुलतान व कुतुबशाही यांच्या देखत त्यांच्याच राज्याचा मुलूख बळकावून मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले आणि १६७४ साली स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. त्यामुळे औरंगजेब भयंकर चवताळला व त्याने महाराजाविरुद्ध लढण्यासाठी शहाजादा मुअज्जम, महाबतखान, बहादूरखान, दिलेरखान या सरदारांना पाठवून त्यांच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यांत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला परंतु शिवाजी महाराज १६८० साली निधन पावले आणि मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा पहिला भाग संपला.

मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाचा दुसरा भाग छत्रपती संभाजीमहाराजांच्या कारकीर्दीत सुरू झाला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूमुळे मराठी राज्य नष्ट करण्याचा आपला हेतू तडीस जाईल अशी औरंगजेबास आशा वाटली. शिवाजी महाराजांच्या अलौकिक पराक्रमामुळे स्वतः दक्षिणेत उतरलो व जर आपला शिवाजीने पराभव केला तर फार नामुष्की होईल या भीतीने त्याने स्वतः दक्षिणेत उतरण्याचे धाडस केले नाही; परंतु काफरांचे राज्य नष्ट करण्याची महत्त्वाकांक्षा धरून औरंगजेब सर्व मोंगली साम्राज्य–सामर्थ्यानिशी दक्षिणेत उतरला आणि मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाचा दुसरा भाग छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत सुरू झाला. शिवाजी महाराजांना जेवढ्या प्रचंड संकटाला कधीही तोंड द्यावे लागले नव्हते एवढ्या प्रचंड संकटाला संभाजी महाराजांना वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी तोंड द्यावे लागले आणि तो सिंहाचा छावा आपल्या मर्दुमकीने व अचाट पराक्रमाने आणि हौतात्म्याने अवघ्या नऊ वर्षांच्या कारकीर्दीने स्वातंत्र्यनभोमंडळात अढळ पदी जाऊन बसला.

छत्रपती संभाजी महाराज गादीवर बसून आपल्या विरुद्धच्या कटाचे वादळ शान्त करतात न करतात तोच दि. ५-९-१६८१ मध्ये औरंगजेब महाराष्ट्रांत उतरण्यासाठी अजमेरहून प्रचंड रणसाहित्यानिशी निघाला. औरंगजेबाबरोबर त्याचे मुलगे शहाजादा मुअज्जाम (शहाआलम) व शहाजादा कामबक्ष, शहजादा मुईजुद्दीन

व शहाजादा बेदारबवन हा नातू याशिवाय असदखान, जुल्फिकारखान, शहाबुद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन, फिरोजजंग, महंमद अमीन, बख्शी रुहुल्लाखान, हसन अलीखा रणमस्तखान पन्नी, दाऊदखान, बहादूरखान, मातबरखान मोहंमद मुरादखान, तरबियतखान, रावदलपत बुंदेला, लुत्फुल्लाखान, इत्यादि अनेक सरदार त्याच्याबरोबर होते. तसेच त्याचे सैन्यबळही मराठ्यांच्या मानाने अफाट होते. त्याच्या सैन्यात जवळ जवळ ४ लाख घोडेस्वार व ४ लाख पायदळ असावे. शिवाय बाकीचा सरंजाम वेगळाच.

स्वतः दक्षिणेत उतरण्याअगोदर खानजहान बहादूर कोकलताश ह्याला दक्षिणचा सुभेदार नेमून मराठ्यांविरुद्धच्या मोहिमेला आरंभ केला होता.

औरंगजेबाने मराठ्यांच्या राज्यावर सर्व बाजूंनी एक वटून आक्रमण केले. ज्या वेळी नाशिक-जुन्नर भागात त्याने मोहीम चालू केली त्याच वेळी तळकोकणांतही केली. ७-११-१६८१ ला हसनअलीखानाला १४००० घोडदळ देऊन मोहिमेवर रवाना केले. त्याचा मुलगा हुसेन अलीखान याला बढती देऊन पाठविण्यांत आले होते. हे दोघेही १६८२ च्या जानेवारींत तळकोकणांत पोहोचले. तळकोकणातील मोहिमेतील चकमकीनंतर तो कल्याण-भिवंडींवर चालून गेला. जेधे शकावलीप्रमाणे माघमासी म्हणजे जानेवारी १६८२ मध्ये हसनअलीखान कल्याण–भिवंडी जाळून फिरोन गेला. तळकोकणात शिरताना त्याच्याजवळ १४ हजार घोडेस्वार होते; परंतु कल्याण भिवंडीला येताना सैन्यात २० हजार पायदळ व १५ हजार घोडेस्वार होते कल्याण येथे पोहोचेपर्यंत हसन अलीखानाने संभाजीच्या मुलुखात जाळपोळ करून कल्याण येथे तळ दिला. वाटेत त्याने पोर्तुगीजांच्या होड्या जाळल्या. एवढ्यात कल्याण किल्यातील शिबंदीला मदतीसाठीं घाटातून स्वतः संभाजी महाराज सैन्यानिशी धावून आले व दोन्ही सैन्यांची लढाई झाली. परंतु मराठ्यांनी लढाईनंतर आपल्या ताकदीचा अंदाज घेऊन थोडी माघार घेतली व नबाबाची सरशी झाली असे मुंबईकरांनी सुरतेला लिहिलेल्या पत्रांत म्हटले आहे व पुढे असेही म्हटले आहे. की, याबाबतींत नीट सत्यता समजली नाही. हसनअलीखानाजवळ कल्याण-भिवंडीकडे जाताना पुरेसा दाणागोटा व दारूचा साठा नव्हता. म्हणून त्याने सिद्धीमहंमद याला पत्र लिहून दि. ३-२-१६८२ रोजी इंग्रज वखारवाल्याकडे धाडले. हसनअली खान कल्याण येथे राहणार असता तर त्याच्या मागण्या इंग्रजाना पुऱ्या कराव्या लागल्या असत्या; व संभाजीराजे ह्याना सुगावा लागू न देता इंग्रजांना हसनअली खानास दाणागोटा द्यावयाचा होता; परंतु हा दाणागोटा मिळण्यापूर्वीच हसनअली खानास माघार जावे लागले. कारण बादशाही लष्कराची व संभाजीच्या लष्कराची अलमालच्या नजीक लढाई झाली त्यात अलमगीर बादशहाकडील हसनअलीखान जखमी झाला. बरेच लोक जखमी झाले; पुष्कळ मेले. संभाजीच्या सैन्याची फत्ते झाली अशी माहिती बुसातिन-उरू–सलातीन मध्ये दिली आहे.

कल्याण-भिवंडीची ही हालचाल आलमगीराला फार महागात पडली असे दिसते. कल्याण शहर, किल्ला तर मिळाला नाहीच, पण अनेक चांगली माणसे त्याला गमवावी लागली. या मोहिमेचें वर्णन भीमसेनसक्सेनाने दिले आहे की "कोकण भागातील गनिमांचा मोड करण्यासाठी हुसेनअलीखान कल्याण भिवंडीकडे रवाना झाला. या मोहिमेत अनेक युद्ध-प्रसंग झाले. यामध्ये राव दलपत हा त्याच्याबरोबर होता. त्याने उत्कृष्ट कामगिरी केली. जाधवराव दखनी (शिंदखेडचा जाधव) मारला गेला. त्याचा नातू जगदेवराय याला मन्सब आणि नगारे नौबतीचा मानही देण्यांत आला. जाधवरावाचा मुलगा लहान होता. त्याला बापाची जहागीर आणि मन्सब देण्यांत आली, या मोहिमेत राव कर्ण याचा मुलगा पद्मसिंग हजारी शौर्याने लढत असता मरण पावला.'

अखबारात-इ-दरबार इ-मुअल्ला, यामध्ये याच लढाईची हकीकत जरा तपशीलवार आहे. त्यात म्हटले आहे, फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात हसन अलीखान आणि लोदीखान तळकोकण सोडून या प्रदेशात घुसले. या घुसणाऱ्या डाव्या बाजूच्या तुकडीवर मराठ्यांनी हल्ला न करता, राजा महासिंग कदोरिया व जादुराव दखनी (जाधवराव) असलेल्या उजव्या बाजूवर मराठ्यांनी हल्ला केला. लोदीखानाचा मुलगा मेहमूद डाव्या बाजूच्या तुकडीत होता. तो उजव्या बाजूच्या तुकडीला मदत करण्यासाठी गेला. झालेल्या चकमकीत दोन्ही पक्षाचे लोक जखमी झाले. जाधवराव राजा महासिंग बहादुरिया, दलपत शुभकरण बुंदेला आणि मेहमूद हे मोगल सैन्यातील अधिकारी जखमी झाले. राणाजी व रावजी हे जखमी होऊन पडले असता मराठ्यांनी त्यांना उचलून नेले.

म्हणजे कल्याणवरील या स्वारीत मुघल सैन्याने दोन फळचा निर्माण करून कल्याण, भिवंडीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा संभाजी महाराज त्वरेने सैन्यानिशी येऊन मोठ्या कौशल्याने मोघलांना लोळण घ्यावयास लावले. या युद्धात मुघल सैन्यात हसन अलीखान, प्रमुख मोहीम चालक सरदार, त्याचा मुलगा हुसेन अलीखान, दुसरा मुलगा मेहमूद, लोदीखान नावाचा सरदार व राजामहासिंग कदोरिया, जाधवराव दखनी, राजा महासिंग बहादुरिया, दलपत शुभकरण बुंदेला राणाजी व रावजी व राव कर्णाचा मुलगा पद्मसिंग इत्यादि हिंदु माणसे होती. संभाजी राजांनी या तुकडीवर हल्ला करण्यातही काही विशेष आढळते. कारण यात लोदीखान व हसन अली सरदार बहुतेक जखमी झाले. त्यापैकी जाधवराव दखनी, पद्मसिंग हजारी मारले गेले. राणाजी व रावजी यांना जखमी करून मराठ्यांनी उचलून नेले. अर्थात त्यांचे पुढे काय झाले असेल सांगता येत नाही. म्हणजे संभाजी राजांनी या हिंदु मंडळींना स्वराज्यावर घाला घालून शत्रूला मदत करण्याचे प्रायश्चित्त देण्यासाठीच या तुकडीवर हल्ला केला असावा असे वाटते

व त्यात मोघलांना जबरदस्त मार देऊन पळवून लावले. हसनअली सरदार फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात नासिकला पोहोचला म्हणजे हा सर्व १५ दिवसांचा युद्धप्रसंग झाला.

परंतु एवढ्याने युद्ध संपलेले नव्हते. फक्त नांदी झाली होती. जवळजवळ साठ हजार सैन्यानिशी कल्याणवर हल्ला करूनही मोघलांना पळून जावे लागले. यातच संभाजीराजे यांचे युद्धकौशल्य दिसते; त्याचप्रमाणे कल्याणकिल्ला शहराचे महत्त्व दोन्ही राज्यकर्त्यांना किती वाटत होते हेही दिसून येते. झालेल्या युद्धात एवढ्या प्रचंड सामग्रीनिशी मोगलांना सपाटून मार खावा लागला तेव्हा औरंगजेब जास्त चिडीने अधिक सामर्थ्यानिशी कल्याणवर पुन्हा हल्ला करील हे अपेक्षितच होते. संभाजीराजांचे राज्य समूळ नष्ट करण्याच्या ईर्षेने आलेला औरंगजेब कल्याण-सुभा जिंकून घेण्याचा प्रयत्न सोडणार नाही हे ठरल्यासारखेच होते. अर्थात मराठे त्या तयारीत होतेच. संभाजी राजांनी बाहेरून कल्याणच्या रक्षणासाठी युद्ध केले तरी त्यांना अनेक आघाड्यांवर तोंड द्यायचे होते, त्यामुळे स्वतः कायम इथे राहणे शक्य नव्हते, त्याचप्रमाणे येथील स्थानिक मराठी फौज व कल्याणचा यावेळचा सुभेदार व कारकून शंकराजी मुरार हेही किल्ला निकराने व निष्ठेने लढवून मोघलांना तोंड देत होते. संभाजी राजांच्या मृत्यूपर्यंत कल्याणसुभा मोघलांना मिळू न देण्याचा त्यांनी जो आटोकाट प्रयत्न केला त्याबद्दल ते खरोखरच कौतुकास पात्र आहेत. त्यांनी कोणत्याही लालचीला बळी न पडता केवळ मराठी स्वातंत्र्य व स्वराज्यावरील निष्ठा एवढ्याच जिद्दीने कल्याण सुभा लढविला हे त्यांना अत्यंत भूषणावह आहे व त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

तेव्हा पहिले आक्रमण ही पुढील युद्धाची नांदीच ठरली आणि एप्रिल महिन्यात हसन अलीखानाला १९ हजार फौजेची सरदारी देऊन औरंगजेबाने पुन्हा रवाना केले. या सैन्याला दाणागोटा मिळावा आणि समुद्रमार्गेही या आघाडीवर हल्ला करावा म्हणून मेच्या अखेरीस मीर मुहम्मद मोमिन याला ६ हजारांची फौज देऊन जहाजातून सुरतमार्गे रवाना केले होते. अर्थात हसन अलीखान व मराठे यांचे कल्याण आघाडीवर युद्ध चालूच राहिले व मराठेही आपल्या गनिमी काव्याने हसनअलीखानाला हैराण करीत राहिले. हसनअलीखानही कल्याणसुभ्यात ठिकठिकाणी जाळपोळ लुटालुट करीत राहिला; परंतु निश्चित असे त्याला एकही ठाणे घेता आले नाही. मराठ्यांनी त्याला कधी स्वस्थता लाभूच दिली नाही. एखादे ठाणे घेऊन तो पुढे सरकला की मराठे परत त्या ठाण्यावर हल्ला करून ताब्यांत घेत आणि त्याचे प्रयत्न विफल करीत. त्यामुळे हसनअलीखानाच्या सैन्याची खराबी होत राहिली. मराठ्यांनी समोरासमोर निर्णायक सामना फारसा दिलाच

Scanned with Car

नाही. त्यामुळे आक्टोबरपर्यंत त्याला काही करता आले नाही. तसेच येथील पावसाळी हवेमुळेही जास्त प्रगती कोणाचीही होऊ शकली नाही. दिवाळीनंतर नव्हेंबरमध्ये औरंगजेबाने रणमस्तखान या प्रसिद्ध अनुभवी सरदाराला मोठ्या सैन्यानिशी कल्याण ताब्यात घेण्यास पाठविले व हा वेढा रामशेजच्या वेढ्याप्रमाणे निकराने चालू झाला. हा गड घेण्यासाठी व बाकीचा प्रदेश व तेथील गड घेण्यासाठी औरंगजेबाने आपले अनेक अनुभवी सेनापती ससैन्य एका पाठोपाठ एक रवाना केले; परंतु संभाजीराजांच्या एकनिष्ठ सरदारांनी त्या सरदारांना परतवून लावले. कल्याण-भिवंडीपासून ५ मैलावर असलेल्या मेहेंदळी गावात मराठ्यांच्या दोन हजार स्वारांनी मुघल ठाण्यांची लुटालूट केल्याची बातमी समजल्यावरून मुकर्रबखान २० नव्हेंबरला जादासामान व बुणग्यांना घेऊन मराठ्यांना तंबी देण्यासाठी धावला. मुकर्रबखान व मराठे यांच्यात मेहेंदळी गांवाच्या पलीकडे ३० कोसांवर असलेल्या उरण खेड्याजवळ लढाई झाली. दोन्हीकडील सैनिक मेले काही जखमी झाले. त्यानंतर मुकर्रबखानाने मौजे मेहेंदळी येथे डेरा उभा केला.

रणमस्तखान कल्याणला येऊन बसला असताना बहादूरखान कोकणात उतरला. म्हणून मराठ्यांची ७ हजार स्वार व आठ हजार प्यादी यांची पंधरा-हजारांची तुकडी कल्याणजवळ गेली. ही बातमी कळताच बहादुरखानही तेथे येऊन पोहोचला. त्याने जवळच एक गढी तयार करून ठाणे मजबूत केले. २८ नव्हेंबर रोजी बहादुरखान व मराठे यांत मोठी लढाई झाली. नंतर मराठ्यांनी नेहमीप्रमाणे पळून जाण्याचा आव आणला, आणि बहादुरखानाला अंगावर घेऊन दूर ओढून नेले व अचानक फिरून उलटून तुटून पडले. बहादुरखानाला मराठ्यांच्या या पद्धतीच्या युद्धाची माहिती नव्हती; त्यामुळे तो व त्याचे सैन्य गांगरले. त्यामुळे बरीच कत्तल होऊन बहादुरखानाला माघारी परतावे लागले.

रणमस्तखानाने कल्याण प्रांती फार उपद्रव केल्याचे समजल्यावरून रणमस्त-खानाबरोबर मुकाबला करण्यासाठी स्वतः संभाजी राजे रायगडावरून निघून फौजे-सुद्धा कल्याणास गेले. डिसेंबरच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात राजांनी रणमस्त-खानाच्या सैन्यावर दोनतीन वेळा हल्ले केले. ते बहादूरखानाने परतवून लावले. मराठ्यांनी पुन्हा एकदा रात्रीचा हल्ला केला. बहादुरखानाने कल्याणचा किल्ला दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला. तटाच्या भिंतीचे दुरुस्ती-काम अपुरे होते. म्हणून पहाऱ्यासाठी २००० सैनिक नेमले. हे कळताच संभाजीराजांनी सरदार तुकोजी बरोबर मोठे सैन्य पाठवले. तेथे या सैन्याने कल्याणपासून आठ मैलावर असलेल्या गावी मुक्काम केला. तेथे मोर्चे लावले; खंदक खणले. ही बातमी कळताच बहादूर-खानाने याकुतखान, रुमीखान, दाउदखान यांच्या तीन तुकड्या तयार करून

Scanned with Cam

मराठ्यांना तंबी देण्यासाठी रवाना केले. महाराजांनी स्वत: रणमस्तखानावर झुंज देऊन त्याची रसदबंदी केली. कित्येक मारून जेर केले तेव्हा सिद्दी याकूतखान जंजिऱ्याहून कुमकेस गेले. दाणागोटा घेऊन आले. त्यांनी जहाजातून उतरून मध्ये मोर्चे देऊन रणमस्तखानास रसद पोचविली.

बहादुरखानाने आणलेल्या तीनही तुकड्यांवर मराठी सैन्याने हल्ले केले. या चकमकीत बंदुका व धनुष्यबाणांचा उपयोग करण्यात आला. तीन तुकड्यांच्या कोंडीत मराठा सैन्य सापडल्यामुळे मराठा सैन्याने निकराची झुंज दिली. मोगलांवर ते तुटून पडले. परंतु निभाव न लागल्यामुळे मराठे डोंगरात निघून गेले. या लढाईत सरदार तुकोजी ठार झाले व बरेच साथीदार मारले गेले. मोघल सैन्याने मराठ्यांचा १० मैल पाठलाग केला. मराठ्यांच्या नेहमीच्या रीतीने त्यानी पुन्हा उलटून परत निकराची झुंज दिल्ली. प्रचंड मारामारी झाली. तुकोजी सरदार ठार झाला होताच; परंतु सेनापती हंबीरराव मोहिते जखमी झाले. रूपाजी भोसले केसोपंत, निळोपंत पेशवे व स्वत: संभाजी राजे यांनी या लढाईत भाग घेतला होता, असे चिटणीस, बुसातिन् उस् सलातीन यानी लिहिले आहे.

एवढ्यानेच हे कल्याणचे युद्ध संपले नाही; ते चालूच राहिले. रणमस्तखान व बहादुरखान हे कल्याण-भिवंडीला वेढा घालून बसले होते, ठाण मांडून बसले होते. याच सुमारास बहादुरखानाच्या मदतीस यशवंतराव या मराठा मोगलअधिकाऱ्याला त्याच्याजवळ असलेल्या प्याद्यांसह जाण्याचा हुकुम रुहुल्लाखानाने दिला होता. रणमस्तखानाची रसद संभाजी राजांनी तोडली होती. तेव्हा रणमस्तखानास दाणागोटयाची रसद शिद्दी याकुतखान जंजिऱ्याहून जलमार्गाने पुरवू लागला. तो आणण्यास ठाणे बंदरातून जाण्याची परवानगी पोर्तुगीझांनी मोगल सैन्याला दिली होती. ह्यामुळे संभाजीराजे व पोर्तुगीज यांचे संबंध बिघडले. तेव्हा कल्याण-भिवंडीकडे जाणाऱ्या याकुतखान सिद्दीच्या तारवास प्रतिकार करण्यासाठी संभाजीराजे यांनी पारसिक (मुंब्र्याजवळ) एक किल्ला बांधायला सुरवात केली. हा किल्ला पाण्यापासून सुमारे २५ फूट उंचीच्या, चोहो बाजूकडून सारख्याच तुटलेल्या खडकावर बांधू लागले. किल्ल्यात जाण्याचा दरवाजा खाडीच्या बाजूस असून वर जाण्यासाठी खडक फोडून पायऱ्या केल्या व १२ फुटापासून २० फुटापर्यंत तटबंदी बांधली. नदीच्या अंगा मेढे कोट बांधला व त्यात ६ तोफा ठेवण्याची व्यवस्था केली. बाकीच्या तटातून बंदुका मारण्यासाठी फक्त भोके ठेवली.

मराठे मोगल यांच्या संघर्षात मोगलांचाच जय होईल अशी पोर्तुगीजांची अपेक्षा व इच्छा होती. म्हणजे संपूर्ण कोकणवर नंतर आपल्याला सत्ता प्रस्थापित करता येईल ही अपेक्षा ठेवून मोघलांना खूष करण्यासाठी व संभाजीराजांच्या रसद

तोडण्याचे कामास प्रतिबंध व्हावा म्हणून पोर्तुगीझांनी हल्ला करून पारसिक किल्ला ताब्यात घेतला व मोंगलांना पत्र लिहून कळवले की आमचा ओढा तुमचेकडे असल्यामुळे संभाजीच्या मदत देण्याच्या विनंतीला मान न देता आम्ही उलट त्याचा पारसिकचा नवा किल्ला घेऊन त्याला अडथळा उत्पन्न केला आहे. आम्ही केलेल्या या सहाय्याबद्दल जो कोकणचा प्रदेश तुम्ही जिंकून घ्याल तो आम्हाला बहाल करावा व आपल्याला मदत करण्यासाठी ६ गलबते बांधून दिली आहेत त्याचा खर्च द्यावा. मोघल आरमारास पोर्तुगीजांनीं कल्याण खाडीत येऊ दिल्यामुळे विशेषेकरून पारकिसचा किल्ला घेतल्यामुळे संभाजीराजे पोर्तुगीझावर भयंकर चिडले व त्यांना जरब बसवण्यासाठी संभाजीराजांनी स्वत: १००० घोडदळ व फक्त २०० पायदळ घेऊन पोर्तुगीझांच्या ताब्यातील तारापूरवर हल्ला केला आणि ते शहर जाळले. शिवाय दमणपासून वसईपर्यंत असलेल्या डहाणू, आसेरी, सैनाना, आणि इतर काही गावांवर हल्ले करून काही लुटली काही जाळली, होडचा हस्तगत केल्या; काही होडचा जाळून टाकल्या; काही पडाव पकडून आणले व दोन पोर्तुगीझ पाद्री कैदही केले. तेव्हा पोर्तुगीझांनी देखील संभाजीराजांचे वेंगुर्ल्याचे काही पडाव धरून नेले. गोवे दरबारातील मराठ्याचा वकील गंभीररावास कैद केले. तेव्हा संभाजीने त्यांचे दोन गड काबीज केले. कोणते हे समजत नाही.

ही हकिगत मुंबईकर इंग्रजांनी लंडनला ८-१-१६८३ च्या पत्राने कळविली. त्यात पुढे असेही म्हटले आहे की तेथे तोफखाना ठेवून सुरतेहून बहादूरखानाकडे जाणाऱ्या जहाजांना अडविण्याचा त्याचा विचार होता. म्हणून वहादूरखानाने तिकडे फौज पाठवून किल्ले घेतले व एक पाडून टाकला. तरीही राजांनी त्याला दाणागोटा मिळणे अशक्य करून टाकले.

फेब्रुवारी महिन्यांत संभाजीराजे किंवा त्यांच्या सरदाराने ४००० घोडदळ व पायदळ घेऊन मोघलांच्या वाटा अडवल्या. ही बातमी समजताच रुहूल्लाखानाने पदमसिंह यास धाडून त्याला डावी बाजू व इतर अधिकाऱ्यांनी उजवी बाजू संभाळण्यास सांगितले. १९-२-१६८३ ला दोन्ही सैन्यात लढाई झाली. या चकमकींत मराठ्यांकडील ४०० सैनिक मेले. काही जखमी झाले. बहादुरखानाचे लष्कराने मराठ्यांचा सहा मैल पाठलाग केला. यामध्ये पोर्तुगीझ सैनिकांनी मोंगलांना मदत केली होती.

औरंगजेब जसजसे आपले एकएक अधिकारी कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर रवाना करीत होता, त्याचप्रमाणे संभाजी राजेही कल्याणला आपल्या लढाऊ व शूर सेनापतींबरोबर कुमक धाडीत होते. फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवडचात राजांनी सरसेनापती हंबीरराव मोहिते व इतर तीन मोठे सरदार याजबरोबर २०००० घोडदळ १०००० हजार पायदळ कल्याण-भिवंडी आघाडीवर

पाठवले. ते पूर्ण तयारी निशी गेले होते. त्यांच्या सैन्यात हत्यारे, भाले, छत्र्या, तंबू इत्यादि सामान होते. मुघल सैन्यात प्रमुख सरदार व अधिकारी भगवंतसिंह, त्यांचे वडील माकूजी, रामसिंह, हरिसिंह. रघुनाथसिंह, काबुलीसिंह हे होते. तर मोघलांच्या वतीने बहादुरखान व पदमसिंह हे उजवी आघाडी सांभाळीत होते.

२७-२-१६८३ रोजी दोन्हीकडील सैन्यांत फार मोठ्या चकमकी उडाल्या. हंबीरराव व पदमसिंग ह्यांची झुंज लागून दोघेही शौर्याने लढले. परत झालेल्या चकमकीत हंबीररावाला जखम झाल्यामुळे व त्याच्याबरोबरचे तीन अधिकारी ठार झाले होते.म्हणून हंबीरराव माघारी फिरला. या लढ्यांत मोघल अधिकारीही जखमी झाले. आणि काही मेले. पदमसिंगाला ३५ जखमा झाल्या तेव्हा ती गोष्ट ऐकून रत्नराठोडचा मुलगा, रामसिंह हा आजारी असूनही चिलखत घालून मराठ्यांशी मुकाबला करण्यासाठी निघाला. परंतु आजारात दांडगाई केल्यामुळे तो मरण पावला. आणखी इतर २५ सरदार जखमी झाले. मुघलांचा हरिसिंह मैदानात पडला असता मराठ्यांनी त्याला उचलून नेले. अशा तऱ्हेने मोठी फौज धाडूनही मुघलांना कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर प्रगती करता आली नाही.

मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सलाबत खानास हुकुम झाला. की त्याने कल्याण भिवंडी जवळ असलेल्या फर्दापूर या ठाण्यास जाऊन सावध रहावे. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बहादुरखानाच्या मदतीस रुहुल्लाखान जाऊन मिळाला. आतापर्यंतच्या हालचालीवरून असे दिसते कीं, भिवंडीचा गड पडलेला असावा. तो दुरुस्त करून बहादुरखानास पावसाळ्यात राहता येईल की नाही असे महंमद अफझल ह्याला विचारण्यात आले होते. महंमद अफझलने कळविले होते की येथे पावसाळी हवेत घोडे मरतात. परंतु येथून अलीकडे १२ कोसावर माहोळी नांवाच्या ठिकाणी राहता येईल. कारण वाटेत कोठेही राहण्यास पठार नाही. मोघल सैन्याची अशी तयारी चालू असता संभाजी राजे ह्यांच्या सैन्याने जहाजामार्गे मोगलांकडे जाणारी अन्नधान्याची रसद लुटली होती. पठारामार्गे रसद पोहोचण्यास बरीच अडचण निर्माण केली होती. रुहुल्लाखान १५-३-१६८३ रोजी बहादुरखानास मिळाला. तेव्हा बहादुरखानाने रुहुल्लाखानास कल्याण-भिवंडी येथील किल्ल्यात उतरण्यास सांगितले. किल्ला लहान असून रुहुल्लाखानाजवळ जमाव मोठा होता. म्हणून तो बाहेरच डेरा टाकून राहिला. दुसरे दिवशी त्याने बहादुरखानास निरोप दिला की एके ठिकाणी बसून राहणे योग्य नाही. गस्त घालण्यासाठी स्वारी केली पाहिजे. बादशाही फर्मान आल्यामुळे रुहुल्लाखानाने मराठ्यांची फौज दिसताच तिच्यावर हल्ला केला. दोन्हीकडील सैनिक मेले. रुहुल्लाखानाच्या मराठ्यांविरुद्ध टिकाव लागणे कठीण होते.

Scanned with Car

कारण त्याला दक्षिणी लोकांच्या लढण्याची पद्धत माहीत नव्हती. त्याने सरदारकीच्या कामात ढिलाई न करता त्या परिस्थितींतही तो २४ मैल पुढे गेला. त्याने बहादुरखानास आपल्या फौजेबरोबर आणून फौजेला शत्रूची माहिती करून दिली. मराठ्यांनी खोडी काढून त्यांत पद्मसिंग व इतर लोक मेले. रुहुल्लाखानाला दक्षिणी लोकांच्या लढाईची माहिती नसतानासुद्धा तो धडाडीने पुढे गेला ह्याबद्दल शहाआलमकडे (औरंगजेबाच्या मोठ्या मुलाकडे) फार कौतुक करण्यात आले. कारण तो औरंगजेबाच्या मावस बहीणीचा मुलगा होता.

एप्रिल महिन्यात रुहुल्लाखानाचा मुलगा सैफुल्लाखान यालाही कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर धाडले होते. मुघल सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी संभाजी राजे ह्यांनी रूपाजी भोसले व मानाजी मोरे यांना धाडले होते. हंबीरराव जखमी होऊन माघारी आला होता. म्हणून कल्याण-भिवंडीपासून १४ मैलावर रूपाजी भोसले व मानाजी मोरे ह्यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे सैन्य एकत्र जमून शत्रूच्या सैन्याची खोडी काढण्याच्या विचारात होते. हे कळताच एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात सैफुल्लाखान तेथे पोहोचला, दोन्ही सैन्यात लढाई झाली. सैफुल्लाखानाने दोन तीन गावे जाळली. छत्र्या, हत्यारे, टाकून मराठे जंगलात लपले. झालेल्या चकमकीत रूपाजी भोसले व मानाजी मोरे मेले सैफुल्लाखानाने पीरगुलामकडे कळविले; परंतु ते खरे नव्हते. कारण रुपाजी भोसले संभाजी राजांच्या मृत्यूपर्यंत जिवंत होता व मानाजी मोरे दि. २९-१०-८४ रोजी अन्य कारणासाठी संभाजी राजांच्या कैदेत होता.

ही चकमक टिटवाळजवळ झाली. त्यात पद्मसिंह रजपूत व कित्येक लोक ठार झाले. रणमस्तखान व रूपाजी भोसले यांच्या सैन्यात ही लढाई झाली. ८-४-१६८३रोजी रुहुल्लाखानास बादशहाचे बोलावणे आले म्हणून तो बादशहाच्या भेटीस गेला. सैफुलाखान कल्याण–भिवंडीला जाऊन नाशिक येथे रवाना झाला.

रणमस्तखान, हसनअलीखान, बहादुरखान, रुहुल्लाखान, सैफुल्लाखान, पद्म-सिंह व इतर मोठे मातबर सरदार कल्याणवर धाडूनही औरंगजेबाला कल्याण—भिवंडी भाग जिंकता आला नाही. शेवटी १६८३ च्या एप्रिल महिन्यात औरंग-जेबाने आपले सैन्य काढून घेतले व कल्याण–भिवंडी १६८९ पर्यंत स्वतंत्र राहिले.

१६८३ ते १६८९ पर्यंत जरी हा प्रांत संभाजीराजांच्या ताब्यात राहिला व कोठेही मोठे आक्रमण होऊन युद्ध झाले नाही तरी युद्ध परिस्थितीच कायम होती. मोघलसैनिक येऊन लुटालूट करीतच होते. या प्रांतातील हातनोली, वडगांव असडोनी या गावचा प्रयागजी दिनकरराव हा मुघलांचा बंदोबस्त करीत होता. मुघलांनी स्वाऱ्या करून गांवे मारून नेली; त्यामुळे येथील रहिवासी गावे सोडून गेले होते.

Scanned with Ca

गनिमाला मारण्यासाठी लोकांना इनाम जमिनी वतने हवी होती. रयतेला धीर-भरवसा देण्यासाठी आणि शत्रूचा बंदोबस्त करण्यासाठी प्रयागजी दिनकररावाने वतने, इनामे मागितली होती. आणि औरंगजेबाच्या विरुद्ध जनता लढा देण्यास त्यांना उद्युक्त करण्यासाठी संभाजी राजे यानी वतने, इनामे दिली होती. कल्याण-प्रांतातील मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी संभाजी राजे यांच्या मुख्य प्रधानाने नीळकंठ मोरेश्वराने दि. ९-११-१६८८ रोजी प्रयागजी दिनकरला कल्याण प्रांतातील हातनोळी, वडगांव या गावचे वतन दिले होते.

म्हणजे या १६८३ ते १६८९ या काळात सतत होणाऱ्या हल्ल्यांना जनता व कल्याणचा सुभेदार, शंकराजी नारायण यांनी यशस्वी तोंड दिले. इथल्या जनते-नेच लढा दिल्यामुळे मोघलांना येथे जरासुद्धा पाय रोवता आला नाही. राजाला जनतेची एवढी साथ मिळून देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण केल्याचे दुर्मिळ उदाहरण महाराष्ट्राने विशेष म्हणजे कल्याणने घालून दिले. हाच कित्ता सर्व महाराष्ट्रभर चालू राहिल्यामुळे संभाजीराजांच्या मृत्यूनंतर पुढील १८ वर्षे महाराष्ट्रातील जनतेने औरंगजेबाच्या सम्राटी सामर्थ्याला जे निर्णायकी व निर्धाराने प्रत्युत्तर दिले आणि मुघली साम्राज्य व औरंगजेब या दोघांचेही थडगे महाराष्ट्रात बांधले. जन-शक्तीच्या उत्स्फूर्त स्वातंत्र्यप्रेमाचा पहिला प्रारंभ कल्याण सुभ्यात झाला. पुढे हा सुभा जरी मोंघलानी जिंकला.व ३० वर्षे ताब्यात टेवला तरी ती जनशक्तीची लाट ओसरली नाही; तर अन्यप्रांतात अधिक तीव्रतेने पसरली.

या युद्धात मराठे व मोंघल याकडील बहुतेक नामवंत सरदार व लढवय्यांनी भाग घेतला. कित्येक जखमी झाले, कित्येक मेले. परंतु स्वराज्यासाठी, कल्याण सुभ्याच्या रक्षणासाठी ज्यांनी देह ठेवला ते म्हणजे सरदार तुकोजी (पालकर) व त्यांचे बडे साथीदार होत.

मराठे-पोर्तुगीझ संबंध त्यांनी याकूतखानास दाणागोटा नेऊ देण्याची परवा-नगी दिल्यामुळे बिघडले होते. त्याना वचक म्हणून संभाजीराजांनी पारसिक येथे किल्ला बांधला. तो पोर्तुगीझांनी हल्ला करून घेतला. त्यामुळे संभाजी महाराज चिडले व त्यांनी उघडपणे पोर्तुगीझांना सांगितले की आम्ही आता डिचोलीला जाणार व त्याप्रमाणे त्यांनी चढाई करून तारापूरवर हल्ला केला, शहर जाळले; शिवाय दमणपासून वसईपर्यंत असलेल्या डहाणू आसेरीस, सैवाना आणि इतर काही गावांवर हल्ले केले. काही गावे लुटली. काही जाळली. होडचा-पडाव हस्तगत केले व दोन पाद्री पकडले. तेव्हा वेंगुर्ल्याचा मराठी वकील गंधारराव यास पोर्तुगीझांनी अटक केली. तेव्हा संभाजीराजांनी चेऊलला वेढा देण्यासाठी एका अधिकाऱ्यास धाडले. पोर्तुगीझ-मराठे संबंध पार बिघडले. या प्रसंगाची हकीकत दोतोर लुईस गोन्सल्व्हिस कोल याने मे १६८४ सुरवातीस गोव्याच्या गव्हर्नरास कळवली.

त्यात तो लिहितो. 'शत्रूने चेऊळचा वेढा उठवला आहे. पण वसईच्या प्रदेशात खूप नुकसानी केली. शत्रूने अशोरी गड ताब्यात घेतला आहे........असेरीच्या किल्लेदारास मराठ्यांनी कैद केले आहे. तारापुरात पळालेल्या सैनिकांना कैदेत टाकले आहे. पुरुष, स्त्रिया व मुले यापैकी पुष्कळांचे हात, पाय, कान, नाक शत्रूने छाटले आहेत. व लोक भयभीत झाले आहेत."

याही वर्णनापेक्षा भयानक प्रकार पुढे घडला. गोव्याच्या स्वारीत. संभाजीने साष्टीवर हल्ला केला त्या वेळी. तेथे लुटालुट, कत्तल तर केलीच. परंतु चर्चमध्ये असलेल्या २०० स्त्रियांवर मराठा सैनिकांनी फार मोठे बलात्कार केले; त्यांना नग्न करून पाच-सहा सैनिकांनी एकाएका स्त्रीवर बलात्कार केला. तेव्हा त्यांना नग्न अवस्थेत सोडून दिले. त्यांना लज्जारक्षणाकरिता पाण्यात जाऊन बसावे लागले. मराठ्यांनी हे जे भयानक प्रकार गोव्यात केले त्याला अतिशय महत्वाची कारणे होती; पहिली गोष्ट म्हणचे गोवेकरांनी हिंदुधर्मीयांवर अत्यंत जुलूम केला होता व असलेच प्रकार केले होते. कल्याणवरील मुघल आक्रमणाच्या प्रसंगी याकूबखानाला मदत देऊन दाणागोटा मुघलांना मिळू दिला व संभाजी राजांनी पारसिकचा किल्ला बांधला होता, तो जिंकून ताब्यात ठेवला व सर्वात महत्वाचे कारण म्हणजे गोव्याच्या गव्हर्नरने (कदाचित औरंगजेबाच्या सांगण्यावरून असेल) गोकुळ अष्टमीचे दिवशी भतग्रामांतील नारवे येथे नदीत स्नान करण्यासाठी येणार असलेल्या संभाजीराजाना अचानक छापा घालून पकडण्याचा विचार केला. ही बातमी संभाजी राजांना हेरांमार्फत समजली. तेव्हा त्यांनी तो बेत रहित केला; परंतु त्याचा सूड वरीलप्रमाणे उगवला. एवढेच नव्हे तर मराठ्यांनी या विरजईस दोनदा पाठलाग करून भाल्याने ठार करण्याचा प्रयत्न केला; परंतु थोडी जखम होऊन तो बचावला.

गोकुळ अष्टमीच्या बेताच्या सूडाचा पहिला आरंभ पारसिक किल्ल्याजवळच्या अणजूर गावावर हल्ला करून मराठ्यांनी दि. १२-९-१६८३ ला केला. या हल्ल्यात मराठे मोठ्या चपळाईने लढले, प्रथम मराठ्यांच्या एका लहानशा तुकडीने अणजूरला जाऊन कापणीला आलेली शेते उद्ध्वस्त केली. हे कळताच पारसिक गडावरील पोर्तुगीज अधिकाऱ्याने मराठ्यांना हाकलून देण्यासाठी २५ माणसे पाठवली. ही माणसे तेथे पोहोचताच मराठ्यांनी पळण्याचा आव आणला. पोर्तुगीज सैनिक मराठ्यांच्या मागे धावत सुटले. त्यांना अंगावर घेत घेत मराठे पोर्तुगीजांना कल्पना नसलेल्या जागी दडून बसले. मराठ्यांनी बांधलेल्या खडकाजवळ पोर्तुगीज पोचताच लपून बसलेल्या लोकांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्यामुळे पोर्तुगीझ घाबरले, त्यांनी पळ काढला. तेव्हा मराठे जातीनेच चपळ असल्यामुळे त्यांनी त्यांचा

पाठलाग करून कापून काढले. नंतरच तेथून मराठे पळाले. कल्याण सुभ्यातच संभाजीराजांनी व मराठा सैनिकांनी पोर्तुगीझांच्या सूडाचा आरंभ केला व अगोदर वर्णन केल्याप्रमाणे साष्टी मध्ये प्रकार करून पोर्तुगीझांना मराठ्यांची भयानक दहशत बसविली. पोर्तुगीझांना समूळ उखडून काढण्याचाच त्यांचा विचार होता. परंतु औरंगजेबाचे प्रचंड संकट स्वराज्यावर अन्य ठिकाणी असल्यामुळे संभाजी राजांना आपला मोर्चा मागे वळवावा लागला.

मोघल सैनिकांनी देखील जे जे प्रकार धर्म व प्रजेच्या बाबतीत हिंदूवर केले होते, त्याचे सव्याज उट्टे संभाजी राजांनी कल्याणवरील संघर्षातही काढले. बलात्कार वगैरे तपशिलाचा जरी फारसा उल्लेख नसला तरी मातबरखानाची पत्रे व इतर फारसी साहित्य यामध्ये कल्याणमधील प्रकार वर्णन केलेले आढळतात.

" नर्कवासी संभाजी याने धर्मद्वेषामुळे तळकोकणचे मद्रसे आणि मशिदी उध्वस्त केल्या आहेत. दोन जुम्मा मशिदी व एक मद्रसाही दुरुस्त केला आहे; पण **इतर मशिदी व मद्रसे नामशेष झाले आहेत. तेव्हा काळजीपूर्वक रक्कम खर्चून पवित्र इमारती दुरुस्त कराव्यात. म्हणजे बादशहांच्या सहाय्याने ठिकठिकाणी मशिदी व मद्रसे** (धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळा) चालू होतील.

.............मराठ्यांच्या धामधुमीच्या काळात हा भाग पूर्णपणे उजाड **झाला. काफराने** (संभाजीने) सगळ्या मशिदी पाडून टाकल्या. मुसलमान विद्वान, **धर्मशास्त्रज्ञ** परागंदा झाले होते ते परत आले आहेत. कल्याण इस्लामाबाद (भिवंडी) पनवेल, आणि शेणोली या ठिकाणी मुसलमान वस्ती बरीच आहे. येथे मशिदी आणि मद्रसे असणे योग्य आहे. आपण बादशहांना कळवून हे कार्य होईल असे करावे.

कोथळागडावरील संग्राम (१६८४):– औरंगजेबाने कल्याण-भिवंडी येथील सैन्य काढून घेतले तरी उत्तर कोकणातील आक्रमक हालचाली १६८४ मध्ये परत सुरू केल्या. कोथळागड ठाणे जिल्ह्यात, शहापूर तालुक्यात, शहापूरच्या ईशान्येस १०-१२ मैलावर आहे. कोथळागडाच्या वेढ्यासंबंधी माहिती मराठी इंग्रजी कागदपत्रांत मिळत नाही. ओरंगजेबाच्या बातमीपत्रांतून या वेढ्यासंबंधी तपशीलवार माहिती उपलब्ध झाली आहे.

औरंगजेबाने १२–११–१६८४ च्या सुमारास अब्दुलकादर (मरूळीसखानाचा जावई) व अलिबिदारकानी, हैदरचा पुतण्या यांना संभाजीच्या ताब्यातील किल्ले घेण्यासाठी धाडले. यापूर्वीच काझी हैदरने औरंगजेबाला लिहून कळवले होते की कोथळागड फार महत्त्वाचा असून तो जो कोणी ताब्यात ठेवील त्याचा ताबा तळकोकणावर राहील. अब्दुलकादर या गडाच्या जवळपास गेला. त्याने तेथे राहणाऱ्या

लोकांना नोकर म्हणून ठेवून घेतले. कोथळागड येथे मराठ्यांच्या हत्यारांचा साठा असे. याच किल्यातून ते लढण्यासाठी हत्यारे नेत असत. हे कळताच अब्दुलकादर व त्याचे ३०० बंदुकधारी दि. ८-११-८४ रोजी कोथळागडच्या पायथ्याशी पोहोचले. मराठ्यांनी या लोकांना मागे हटवले. तरी देखील काही लोक किल्ल्याच्या मगरकोट दरवाजाजवळ पोहोचले. दरवाजा उघडा म्हणून त्यांनी आरडाओरडा केला. किल्यावरील सैनिकांना वाटले की आपलीच माणसे हत्यारे नेण्यासाठी आली आहेत. किल्यातील सैनिकांनी दार उघडताच मुघल सैनिक आत घुसले. किल्ल्यात मराठ्यांची फौजही होती. मराठे मुघल यांच्यात लढाई झाली. तेवढ्यात अब्दुलकादरही गडावर चढला. पुन्हा मुकाबला झाला. अब्दुलकादरच्या मदतीसाठी माणकोजी पांढरे (मोघल-मराठा) गेला. झालेल्या चकमकीत मोघलांना यश आले.

दि. ९-११-८४ रोजी म्हणजे दुसऱ्याच दिवशी मराठ्यांनी अचानकपणे किल्ल्याला घेरले. धगुष्यवाणांची फार मोठी लढाई झाली. यामुळे अब्दुलकादरची स्थिती फार कठीण झाली. कादर गडावर गेल्यापासून त्याच्या मदतीला कोणीही गेले नव्हते. म्हणून त्याने बादशहाला लिहिले की माझ्या मदतीसाठी कोणी आले नाही तर मी जगेन असे नाही. मराठ्यांनी किल्ला वेढला. बाणांची व बंदुकांची लढाई झाली. किल्ल्यातील दारुगोळा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. गडावर जाणारी सामग्री मराठ्यांनी लुटली असल्यामुळे किल्ल्यावरील मोघलांना दारूगोळा दाणागोटा मिळेना. १९-२० तारखेच्या सुमारास जुन्नरचा किल्लेदार अब्दुलअजीजखान याने आपला मुलगा अब्दुलखान याला सैन्यासह अब्दुलकादरच्या मदतीसाठी पाठवले. अब्दुलखान तेथे पोहोचला तेव्हा मराठ्यांचा सरदार नारोजी त्रिंबक याने मुघली सैन्याची वाट अडवली. अब्दुलखानाने हल्ला केला. तलवार, खंजिरांनी हातघाईची लढाई झाली. झालेल्या लढाईत नारोजी पकडला गेला. मराठ्यांनी किल्ल्याचे खोरे रोखून धरल्यामुळे करोराचा ठाणेदार अब्दुल कादिरखान, शिकारपूरचा ठाणेदार माणकोजी करणे, निमोणीचा ठाणेदार रअद अंदाजखान तेथे पोहोचले. मराठे व मोगल यांच्यात चकमकी होऊन नारोजी त्रिंबक व इतर सरदार धारातीर्थी पडले व कोथळागड दि. १६-११-१६८४ रोजी मुघलांच्या हाती आला. इहतमामखानाने नारोजीचे डोके रस्त्यावर टांगले. किल्ला जिंकून घेतला म्हणून किल्ल्याची सोन्याची किल्ली औरंगजेबाकडे पाठवण्यात आली. जेधे शकावळीत कोथळागड मोंगलांनी ७-११-१६८४ रोजी घेतला अशी तारीख दिली आहे. (कार्तिक शु. ११ शके १६०६) मोघलांनी विजयोत्सव साजरा केला. किल्याला मिफ्ताउलफतह असे नांव दिले. अब्दुलखानाने किल्ल्यात प्रथम प्रवेश केला, व गड जिंकला म्हणून त्याला १०,००० रु. बक्षिस देण्यात आले.

औरंगजेबाचा आपल्या अधिकाऱ्यांवर विश्वास नसे. १६८१ पासून मराठ्यांच्या बरोबरच्या लढ्यात त्याला फारसे यश मिळालेले नव्हते. म्हणून हा गड घेतल्याचे

कळल्यावर हा गड मुळातच आहे की नाही याची खात्री करून घेण्यासाठी आतीश-खानाला पाठवले. त्याने कळवले की काजी हैदरने सांगितल्याप्रमाणे खरोखरच कोथळागड किल्ला ताब्यात आल्यामुळे तळ कोकणच बादशाही अमलाखाली आल्यासारखे आहे. औरंगजेबाने खात्री करून घेण्यासाठी त्याचा नकाशाही मागवला होता. नंतरच त्याने ४० दगड फोडणारे लोक गडाच्या दुरुस्तीसाठी पाठवले. हा गडही घेण्यात फितुरीच झाली होती असे दिसून येते. कारण गोविंदराव व इतर मावळयांनी मन्सबीच्या आशेने कोथळगड घेण्यास मदत केल्यामुळे त्यांना २५०० होन बक्षिस म्हणून देण्यात आले होते. ज्या मावळयांनी किल्ल्यात प्रथम प्रवेश केला. त्यांनाही सोन्याचे कडे व चांदीचे कडे बादशहांनी दिले.

असेच अनेक फितुरीचे प्रकार घडले आणि संभाजी राजांचे अभेद्य किल्ले मोघलांनी घेतले. हा फितुरीचा घातक लोभी रोग फार मोठ्या प्रमाणात मराठ्यांना लागलेला इतिहासात दिसून येतो. त्याच्या परिणामाने आपण स्वराज्याचा व एकनिष्ठ बांधवांचा नाश करतो हेही ते विसरतात.

एकीकडे अशा तऱ्हेची फितुरी झालेली दिसत असली तरी दुसरीकडे ध्येय-निष्ठ मराठ्यांनी कोथळागड परत घेण्याचा प्रयत्न चालूच ठेवलेला दिसतो. १६८४ च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीस मराठ्यांनी गडाकडे जाणाऱ्या मोघल सैन्याला अडवले. तसेच पायदळाच्या एका तुकडीने किल्ल्यात प्रवेश मिळविला. किल्लेदार सय्यद अबदुल करीमखानाबरोबर बाण व बंदुकीची चकमक उडाली, अब्दुलखानाला यापूर्वीच गडावर मदत पोहोचविण्यास सांगितले होते. मराठ्यांनी त्याला अडविले असल्यामुळे तो तेथे वेळेवर पोहोचू शकला नाही. यानंतर मऱ्हा-मतखान हा कोथळागडाकडे मदत घेऊन निघाला. त्याला ७००० मराठ्यांच्या तुकडीने अडविले. त्यांच्याशी सामना झाला. परंतु त्यात मराठ्यांना यश येऊ शकले नाही. मऱ्हामतखान दि. २४-१२-१६८४ रोजी कोथळागडावर पोहोचला. मुघ-लांनी किल्ला घेतल्यावर मराठी फौजेतील ४०० पायदळ मावळयांचा जमादार राजजी हा चाकरीच्या आशेने गडाच्या नव्या मोघल किल्लेदाराकडे गेला. अशा गोष्टी घडत असल्या तरी काही सैनिकांनी किल्ला परत घेण्याचे प्रयत्न सोडले नाहीत. ७०० पायदळाच्या तुकडीने हत्यारे व दोर घेऊन किल्ल्यात शिरण्याचा प्रयत्न केला. दि. १९-४-८५ रोजी दोरीच्या शिडीने २०० लोक किल्ल्यात शिरले. त्यांची अब्दुल कादरशी चकमक झाली. पण याही प्रयत्नांत मराठ्यांना यश आले नाही. दोन्हीकडील माणसे जखमी झाली. पकडलेली माणसे व शिड्या बादशहाकडे पाठवण्यात आल्या. मोघलांनी कोथळागड जरी जिंकला तरी मराठ्यांनी तो परत घेण्याचे चिवट प्रयत्न केले परंतु त्यात त्याना यश लाभले नाही.

Scanned with Car

कोथळागड सारख्या दारुगोळा, शस्त्रात्रे वगैरेचा साठा असलेल्या, तळकोकण ताब्यात ठेवणाऱ्या सुभे कल्याणमधील महत्वाच्या गडाला मराठ्यांना मुकावे लागले. मुख्य कारण फितुरी व दुसरे म्हणजे मराठ्यांना अनेक आघाड्यांवर लढावे लागत असल्यामुळे कुमकही कमी पडली असावी. संभाजीराजे व त्यांचे ध्येयनिष्ठ सेवक मुघली आक्रमणाविरुद्ध स्वराज्याच्या रक्षणासाठी किती चिवटपणे व जिद्दीने लढत होते हेच या वेढ्यावरून दिसून येईल. मोघलांना या भागात यश आले ते फितुरीनेच. अन्यथा मराठी शिपाई असा पराभव स्वीकारणाराच नव्हे.

१९-४-१६८५ ला कोथळागडाचा पाडाव झाल्यावर मात्र पुढे मोगलांची प्रगती झाली नाही. माहुलीचा जबरदस्त किल्ला द्वारकोजी नावाच्या मराठा सरदाराच्या ताब्यात होता. सुभेकल्याणमधील कल्याण किल्ला व दुर्गाडी शंकराजी मुरारच्या ताब्यात होता. संभाजीराजे मुघल यांचे इतरत्र लढे चालू होते. मातबर खानाला वेळोवेळी औरंगजेबाने तळकोकण व सुभेकल्याण काबीज करणयचा हुकूम दिला होता; परंतु तो नाशिकच्या खाली येऊ शकला नाही. जेमतेम पट्टयाचा किल्ला तो घेऊ शकला व त्यातच तो गुंतून पडला होता. त्यामुळे ११-३-१६८९ पर्यंत कल्याण भागात फारशी घडामोड झाली नाही.

१६-३-१६८९ ला संभाजी महाराजांचा औरंगजेबाने क्रूरपणे वध केला. त्याच दिवशी मातबरखान नाशिक ठाण्यातून बाहेर पडून कल्याण-भिवंडीकडे निघाला. मातबरखान एप्रिलमध्ये बादशहाला लिहितो, 'आपण मीरहसनच्या मार्फत फर्मान पाठवून आज्ञा केली होती की कोकणात उतरून माउली घ्यावी, आणि कल्याण भिवंडी प्रांतात ठाणी बसवावी. व बंदीबस्त करावा. त्याप्रमाणे मी ११ मार्च १६८९ ला गुल्शनाबाद (नासिक) हून निघालो. माझे दूत मी भोवतालच्या प्रदेशातील ठाणेदाराकडे पाठवले होते. परंतु ठाणेदार व मन्सबदार हे आपल्या सैन्यानिशी लवकर न आल्यामुळे नासिकजवळच काही दिवस मुक्काम केला. ३ एप्रिलला मी पुढे निघून खोस्ती (घोडी) घाटावर पोहोचलो. तेथे रजब महिन्याच्या पाच तारखेस (१५ एप्रिल) गुर्जदार हे ठाणेदारांना घेऊन आले. तेथून मी १७ एप्रिल १६८९ रजब महिन्याच्या सात तारखेस तरोड्याला आलो. तेथून माहुलीचा किल्ला सात कोसांवर व कल्याण-भिवंडी तीन कोसांवर आहे. येथून मी मजल दरमजल करीत पुढे जात आहे. लवकरच कल्याणला पोहोचून मी शत्रूचा मोड करण्याचा प्रयत्न करीत. कल्याण प्रांत उध्वस्त झाला आहे. तेथे पाणी व चारा यांचा तुटवडा आहे. ही हकीकत मी आपणास पूर्वीच कळवली आहे. ती आपल्यापर्यंत पोहोचली असेल. अद्याप तोफखान्याची सामुग्री आली नाही. दारूगोळा, बंदूकची गोलंदाज, बाणदार, जंगल तोडणारे, पाणी पुरवणारे, बेलदार इत्यादींची रवानगी झाली नाही. या प्रांतात ठाणे बसविणे आणि लहान गढ्या बांधणे इत्यादिसाठी वरील सामग्री आवश्यक आहे. लवकर पाठवण्याची कृपा व्हावी, म्हणजे

Scanned with Car

वेळेवर कामी येईल. धान्य वगैरे रसद पाठवण्याविषयी सुरतेच्या अधिकाऱ्यांना हुकूम व्हावा. हा प्रांत वैराण झाला आहे. तेथे धान्य मुळीच पिकत नाही.

मातबरखानाने पुढील पत्रात असे लिहिले की " मी घोटी येथे माहुलीजवळ आलो हे मागील पत्रात कळवले होतेच. दुसरे दिवशी मी पुढे निघालो. माझे हेरांनी खबर आणली की सुमारे १००० मराठे सैनिक माहुली किल्ल्यातून निघाले आहेत आणि घाटातील मोक्याच्या जागा अडविल्या आहेत. ही बातमी मिळताच मी बक्षी रजी अहमद बेग, जव्हारचा जमीनदार विक्रम श्रीपत व इतर अधिकारी रवाना केले. मी माझे घोडेस्वार, सैनिक व बंदूकधारी शत्रूला शिक्षा करण्याकरिता पाठवले. तीन गढयाजवळ लढाई झाली. बंदुका व बाणांची शत्रु सैनिक रणमैदानातून पळून गेले. आमच्या लोकांनी चांगली कामगिरी बजावली. (दोन्हीकडील) पुष्कळसे सैनिक मारले गेले व जखमी झाले. हाजी अहमद बेग बक्षीने आपल्या हाताने तिघांना यमसदनास पाठवले. त्याला स्वतःला बाणांच्या दोन जखमा झाल्या. तो चांगला शिपाई आहे. पट्टयाच्या लढाईत त्याने चांगला पराक्रम केला आहे. मी त्याला त्र्यंबकला ठेवा, व त्याची मनसब १०० सैनिक व ५० स्वारांनी वाढवावी. असे सुचविले होते..........२७ एप्रील १६८१ (१७ रजब) मी कल्याणच्या परिसरात पोहोचलो. मी दुर्गाडी किल्याला वेढा घातला आहे. मी किल्ला (संपूर्ण शहर व दुर्गाडी) जिंकेन अशी आशा आहे. दुसरे किल्ले देखील लवकरच जिंकेन--

मातबरखानाच्या पुढील पत्रात प्रबळगड वगैरे जिंकण्याच्या अगोदर थोडे दिवस म्हणजे १७ जुलैच्या थोडे अगोदर कल्याण व दुर्गाडी व इतर किल्ले जिंकून घेतल्याचे त्याने कळविले आहे. म्हणजे साधारणतः कल्याण-दुर्गाडी जिंकायला त्याला दोन महिने लागले असावेत. दोन महिने पर्यंत कल्याण व दुर्गाडी किल्ला लढविला गेला परंतु त्याचे तपशीलवार वर्णन मिळत नाही.

किल्लेमाहुली : हा गड ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यात वायव्येला ४ मैलावर माहुली नावाच्या डोंगरावर बांधलेला आहे. त्याची उंची २८१५ फूट असून रस्ता पूर्वेकडून माचीवरून जातो. १६६१ साली हा गड शिवाजीमहाराजांनी मोघलांकडून जिंकून घेतला. पुढे जयसिंहाबरोबर झालेल्या तहात तो मुघलांकडे गेला. पुन्हा मोरोपंत पिंगळे पेशवे यांनी १६७० साली जिंकून स्वराज्यांत आणला. संभाजी राजांच्या कारकीर्दीत तो १६८८ पर्यंत मराठयांच्या ताब्यात होता. १६८७-८८ च्या सुमारास मातबरखान फौजदार म्हणून काम करताना त्याला बादशहाचे फर्मान मिळाले. त्यावर त्याने बादशहाला १६८८ मध्ये एक अर्ज पाठवला त्यात म्हटले आहे "कोकणात उतरून माहुली आणि इतर किल्ले घेण्याची शर्थ करीन—

दि. २१-८-१६८८ रोजी माहुलीचा मराठ्यांचा किल्लेदार द्वारकोजी, अब्दुल कादरला भेटला व म्हणाला की, "साल्हेरचा किल्लेदार असोजीप्रमाणे मला मन्सब दिली तर मी किल्ला खाली करीन आणि ४०००० रु. रोख, १० घोडे, खिलअत इनाम व राहण्यासाठी जुन्नरजवळची दोन गावे इनाम दिली तर मी स्वतः दरबारात हजेरी देण्यासाठी येईन." बादशहाने ही गोष्ट मान्य करून किल्लेदारास दरबारात बोलावून इनाम देण्याचे कबूल केले.

औरंगजेब १६८९ साली काढलेल्या फर्मानात म्हणतो 'माहुलीचा किल्लेदार आणि इतर यांना मन्सबी आणि बक्षिसे द्यावीत अशा अर्थाची अर्जी आमच्या नजरे खालून गेली. तुमची विनंती मान्य करण्यात येत आहे. तुमच्याकडे अडीच हजार अश्रफ्या पाठवण्यात येत आहेत. घोडे आणि वस्त्रे अतिवृष्टीमुळे पाठवणे शक्य होत नाही. किल्लेदारांसाठी पाठवलेल्या वस्तू त्यांच्याकडे पाठवून किल्ले लवकर ताब्यात आणावे. माहुलीच्या किल्ल्यावर किल्लेदारखान ह्याची नेमणूक करण्यात आली असून तो लवकरच तेथे पोहोचेल.इतर किल्ल्यावरील नेमणुका किल्लेदारखान त्याच्या लोकामधून तोच करील. तुमच्या विनंतीप्रमाणे द्वारकोजीच्या नावे फर्मान पाठवण्यात येत आहे.

84863

माहुलीचा किल्लेदार द्वारकोजीचे मन वळवण्यासाठी मातबरखानाने नरसु महाडिक ह्याला मध्यस्थी नेमले. व किल्लेदार द्वारकोजी व किल्यातील इतर इसम यांची मने बादशहाची ताबेदारी पत्करण्यास वळवली. त्यांना बक्षिसे, मन्सबी मिळण्याची आमिषें दाखवून मने वळवली व त्यांनी ती मान्य केली. त्याप्रमाणे ऐवज हाती पडल्यावर किल्ला ताब्यात दिला. अशा तऱ्हेने मातबरखानाने रक्ताचा एक थेंबही न सांडता माहुलीचा किल्ला मिळवला व संपूर्ण कल्याण सुभा असनगांवपासून वसईपर्यंत, ठाण्यापर्यंत, पेण-पनवेल-मुरबाड त्याच्या ताब्यात आला.

पहिला मोगल सुभेदार–मातबरखान

मातबरखान हा औरंगजेबाने दक्षिणेत विश्वासाने आणलेल्या प्रमुख सरदारापैकी एक होता. तो उत्साहि व विश्वासू होता. त्याच्या सर्व कर्तबगारीची सुरुवात ह्याच दक्षिण मोहिमेत नाशिकजवळ झाली व त्याने १६८१ ते १६८९ पर्यंतच्या ८।९ वर्षाच्या काळात स्वराज्यातील सुमारे ५० किल्ले ताब्यात घेऊन संपूर्ण कल्याण सुभ्यावर मोंगली अंमल बसविला. त्याच्या कर्तबगारीवर वेळोवेळी खूष होऊन औरंगजेबाने त्याला बक्षिसे दिली व त्याच्या मन्सबदारीत वाढ केली व शेवटी कल्याण प्रांतावर सुभेदार नेमून टाकले.

मातबरखान कल्याण किल्ल्यात स्थाईक झाल्यावर त्याने जरा स्वास्थ्य व ऐष आरामाकडे थोडे लक्ष दिले. पहिली गोष्ट सतत युद्धामुळे हा भाग जवळ जवळ

Scanned with Car

ओसाड झाला होता. तेव्हा प्रजेला आश्वासन देऊन बोलावून आणून परत वस्ती करायला लावले; उजाड गावे पुन्हा वसविली. शेतीविषयक सवलती देऊन उत्पन्न निर्मितीला साथ दिली. नंतर त्याच काळात त्याने मुसलमानी पंडित विद्वान पळून गेले होते, त्यांना आणले व मुसलमानी धर्मचर्चा व शिक्षणासाठी मद्रसे कल्याण व भिवंडी येथे स्थापन केले. लोकांच्या (मुसलमानांच्या) धार्मिक शिक्षणाची सोय केली. त्याचप्रमाणे संभाजीच्या राजवटींत व युद्धात मशिदी व मद्रसे हीं मराठ्यांनी पाडून जाळून टाकली होती. एका पत्रात तो औरंगजेबाला लिहितो, " सय्यद कुतबुद्दिन सज्जादानशीन यानीं पुढीलप्रमाणे अर्ज केला आहे. ' नर्कवासी संभाजीने धर्मद्वेषामुळे तळकोकणातील मद्रसे व मशिदी उध्वस्त केल्या आहेत; मी (कुतुबुद्दिन) दोन जुम्मा मशीदी व एक मद्रसा दुरुस्त केला आहे. इतर मद्रसे व मशीद नादुरुस्त आहेत. इकडील पाऊस तर सर्वांना माहितच आहे. एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याला हुकुम व्हावा कीं काळजीपुर्वक रक्कम खर्चून पवित्र इमारती दुरुस्त कराव्या. म्हणजे बादशहांच्या मदतीने ठिकठिकाणी मशिदी व मद्रसे धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळा चालू होतील. "………. तरी बादशहांनी हे काम सय्यद कुतुबुद्दिनच्या देखरेखीखाली करून घ्यावे. मनुष्य विद्वान व साधूवृत्तीचा आहे. तो व्यवस्थितपणें व काटकसरीने कार्य पार पाडील.

मातबरखान जरी येथे राहिला तरी मराठ्यांनी त्याला फारसे स्वास्थ्य लाभू दिले नाही. पोर्तुगीझांनी मराठ्यांना मदत केली. व त्यांनी या मुलुखावर हल्ले चालू केले. १६९१ मध्ये मातबरखान लिहितो " पोर्तुगीझांनी मराठ्यांच्या कबिल्यांना आपल्या इलाख्यात आश्रय दिला. पोर्तुगीझ व मराठे एक झाले आणि त्यांनी बसकतगड (वतनगड) वर मोठा आघात केला. आमच्या खेड्यातील शेतकरी पोर्तुगीझ इलाख्यात जाऊन राहिले; त्यामुळे कल्याणचे ठाणे सुदृढ राहण्याचे चिन्ह दिसेना. १६९२ मध्ये त्यांनी कर्नाळ्यावर हल्ला केला व किल्ला घेतला. (पनवेल जवळ)………..मराठ्यांनी पट्टा किल्ला घेतला." ठाण्याच्या पोर्तुगीझ सुभेदारानें शामजी मोर देवकर या मराठा सरदाराला सैन्यानिशी खांदेरीहून बोलावून घेतले व ठाणे येथे आश्रय दिला. त्यांनी ठरविले कीं एक होऊन माहुलीच्या किल्ल्यावर आणि भिवंडी गावावर हल्ला करावा. ही बातमी मातबरखानास कळताच योग्य वेळी बंदोबस्त करावा म्हणून त्यानें त्यांच्यावर मोघल सैन्य पाठवले. तेव्हा पोर्तुगीझ व मराठे ह्यांच्या बरोबर त्याचा संग्राम झाला. पोर्तुगीझ मुलखात सैन्य पाठविल्याबद्दल याकूतखान सिद्दीने त्याला जाब विचारला. तेव्हा ही वस्तुस्थिती कळविली. पोर्तुगीझ व मोघल ह्यांचा तह झाला असता मातबरखानाने पोर्तुगीझ मुलखात आक्रमण केल्याचा जाब न्यायाधीश सियादखान ह्यानेही विचारला. त्याला त्यांनी वस्तुस्थिती समजावून सांगणारे पत्र धाडले व आक्रमण मागे घेण्यात आले आहे असे कळविले. मराठ्यांचा सरदार धनाजी जाधव हा कल्याण भिवंडी-

Scanned with Car

कडे आक्रमण करण्याच्या तयारीत होता. तेव्हा मातबरखानाने फौज पाठवली. अशा अर्थाचे पत्र गाजिउद्दीन फिरोज जंगला पाठवले. मातबरखानाला कल्यांण येथे नायब सुभेदार नेमून मराठ्यांच्या मागोमाग, वेरुळ, कन्नड, खंडाळा, खानदेश, नाशिक, इत्यादि अनंत ठिकाणी मुकाबला करण्यासाठी धावावे लागले. त्याला मराठ्यांनी १७०० च्या शेवटपर्यंत या भागात शांतता मिळू दिली नाही. सतत दगदग, पळापळ, वगैरे करावी लागली. खर्चासाठी औरंगजेबाकडे त्याने वारंवार पैशाच्या याचना केल्या आहेत. औरंगजेबाने कधीही मागितलेल्या रकमेच्या $\frac{1}{8}$ पेक्षा जास्त रक्कम पाठविली नाही. अनेक वेळी मातबर लिहितो, ‘मी कर्जबाजारी झालो आहे. मला लाखो रुपयांचे कर्ज आहे. बादशहानी रक्कम पाठवावी.’ औरंगजेबाची तो एवढया नम्रतेने प्रार्थना करतो व प्रत्येक हालचालीचा रिपोर्ट पाठवतो, कीं मातबरखान म्हणजे निव्वळ कळीचे बाहुले वाटते व सर्व सूत्रचालक औरंगजेबच होय. यावरून औरंगजेबाचा आपल्या कोणत्याहि सरदारावर काडीचा विश्वास नसावा. किंवा हे सरदार मनापासून काम करीत नसावेत; म्हणून त्याने सर्व सूत्रे औरंगाबादेहून चालविली. मातबरखानाने ३५ वर्षे जी कारकीर्द मृत्यूपर्यंत घालविली त्यात मोठा लष्करी विजय कोठेच मिळविल्याची नोंद नाही व स्वत: कोठेही मोहिमेचे नेतृत्व करून लढल्याचे, पराक्रमाचे वृत नाही. तो देखील औरंगजेबाप्रमाणे सूत्रचालकासारखाच वागत होता असे दिसते.

□ □ □

: ९ :

पुनः स्वराज्याकडे

पेशवाईतील कल्याणचे पहिले सुभेदार चासकर जोशी (१७१९ ते १७२८)

पेशवा बाळाजी विश्वनाथाचा दिवाण रामचंद्र महादेव जोशी याने मातबरखानाकडून २२ सप्टेंबर १७१९ साली कल्याण प्रांत जिंकून मराठी राज्यास जोडला व आपण स्वतः या ठिकाणी वाडा बांधून कल्याण प्रांताचा कारभार पाहू लागला. संभाजीच्या मृत्यूनंतर सन १६८९ साली औरंगजेबाचा सरदार मातबरखान याने कल्याणचा दुर्गाडी किल्ला जिंकून कल्याण प्रांतावर मोगलांची अधिसत्ता निर्माण केली होती. ती तब्बल ३० वर्षांनी सुभेदार रामचंद्र महादेव जोशी याने २२ सप्टेंबर १७१९ साली त्याचा पराभव करून मोंगली सत्ता नष्ट करून ३० वर्षें मोंगली अंमलाखाली पिचत असलेल्या कल्याण नगराला व प्रांताला स्वराज्याचे शिवदर्शन घडवले. कल्याणनगर व प्रांताचा मुक्तिदाता, पेशवाईतील कल्याणचा पहिला सुभेदार रामचंद्र महादेव जोशी (चासकर) होय. म्हणून रामचंद्र महादेव जोशी यांची कामगिरी कल्याणच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावी लागेल. कारण त्याने कल्याणच्या स्वातंत्र्यरक्षणाकरिता व उर्जितावस्थेकरिता आपले तन, मन, धन सर्वस्व अर्पण करून त्याच कार्यी त्याने देह ठेवला व त्याचा परिणाम म्हणजे पुढे ब्रिटिश सत्ता येऊन वसईच्या तहाने ब्रिटिशांच्या ताब्यात हिंदुस्थान जाईपर्यंत मराठ्यांची सत्ता कल्याण प्रांतावर टिकून राहिली. अखंड हिंदुस्थान ब्रिटिशांच्या ताब्यात जाईपर्यंत म्हणजे सुमारे १०० वर्षे कल्याणवरील स्वातंत्र्यसूर्य कधीही मावळला नाही. या सर्वांचे श्रेय रणधुरंधर श्रीमान् सुभेदार रामचंद्र महादेव जोशी या चासकर जोशी घराण्यातील वीर पुरुषासच द्यावयास पाहिजे. या घराण्याचे वैशिष्ट्य असे की शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या काळापासून या घराण्यातील पुरुषांनी महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला.

१७२० साली बाजीराव पेशवे गादीवर आले. तेव्हापासून साष्टीचे वसईचे कारस्थान खरेखुरे शिजू लागले. त्याआधी थोडेच दिवस म्हणजे २२ सप्टेंबर १७१९ मध्ये बाजीराव साहेबांचा मेहुणा (पत्नीचा भाऊ) याने कल्याण–भिवंडी प्रांत जिंकून तेथे छत्रपतींचा अंमल बसविला व कल्याणचा सुभा स्थापला. पेशव्यांच्या

Scanned with Cam

शकावलीमध्ये (राजवाडे खंड २) अशी नोंद आहे- 'छ १९ जिलकाद (२२ सप्टेंबर १७१९) रामचंद्र महादेव चासकर (जोशी) यांणी प्रांत कल्याणचा मुलुख हस्तगत केल्याचे पत्र आले. अशरीन मया व अलफ" रामचंद्र महादेव जोशी चासकर हा कल्याणचा सुभेदार म्हणून काम पाहू लागला.

हे चासकर जोशी राजारामाचे कारकीर्दीपासून राजकारणात होते. राजारामाने राजधानी बदलून जेव्हा महाराष्ट्र सोडून कर्नाटकात जिंजीस वास्तव्य केले त्या वेळी जिंजीस वेढा पडला असता कृष्णराव चासकर जोशी यांचे तीन मुलगे नारो कृष्ण,महादेव कृष्ण व गोविंद कृष्ण हे राजारामाचे फार उपयोगी पडले. त्यामुळे राजारामाने अत्यंत प्रसन्न होऊन मौजे खवळी, ता. पाली प्रांत हा गाव इनाम दिला. या इनामाचे नूतनीकरणाची सनद राजवाडे खंड २० मध्ये प्रसिद्ध झाली आहे. ती पुढीलप्रमाणे–

लेखांक १९७ श्री १६४४ भाद्रपद शु. १३
(१७२२ ऑगष्ट) सोमवार

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध त्रयोदसी सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभूछत्रपती स्वामी याणी देशमूख व देशपांडे ता. पाल यासी आज्ञा केली ऐसी जे. राजश्री महादजी कृष्ण व गोविंद कृष्ण उपनाम जोशी गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन हे स्वामीचे पुरातन सेवक. तीर्थरूप राजश्री कृष्णराव जोशी यांनी कैलासवासी स्वामीपासून (छत्रपती शिवाजीमहाराज) बहुत निष्ठेने सेवा केली, व तीर्थस्वरूप राजश्री संभाजी राजे काका यांची सेवा केली व त्या उपरी तीर्थरुप राजश्री (राजाराम महाराज) कैलासवासी स्वामी जंजीस असता ताम्रांचे संकट प्राप्त झाले ते समयी माहादजी कृष्ण हे संताजी घोरपडे व जाधवरायांसमवेत (धनाजी जाधव)फौजा घेऊन गेले. ते समयी विशेषाकारे सेवा केली. याकरिता यावरी राजश्री कैलासवासी स्वामी कृपाळू होऊन (राजाराम) चंजाचे मुक्कामी यासी मौजे खवळी ता. पाली प्रांत मजकूर हा गांव कुलबाब कुळवानू खेरीज हकदार व इनामदार करून जल तरु पाषाण निधिक्षेपसहित हालीपटी व पेस्तरपटी देखील इनाम अजरामऱ्हामत देऊनु सनदा दिल्हया. त्यावरि मशारनिल्हेनी व त्याचे पुत्र राजश्री बाळाजी महादेव यानी राजश्री शिवाजीराजे दाजी यांची सेवा केली. त्यावरून त्यांनीहि मौजे मजकूर यासि इनाम चालवावयाची आज्ञा करून पत्रे दिली. त्याप्रमाणे गांव यास इनाम चालतच आहे. ऐशास, महादजी कृष्ण व गोविंद कृष्ण व बाळाजी महादेव व रामचन्द्र महादेव व कृष्णाजी महादेव हे स्वामीचे एकनिष्ठ सेवक.यामध्ये बाळाजी महादेव यानी वाडवडिलांपासून स्वामीची सेवा एकनिष्ठेने केली व हाली करीत आहेत. यांचे चालविणे

स्वामीस अगत्य. याकरिता तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामींनी मौजे खवली हा गाव चंदीचे मुक्कामी महादजी कृष्ण यास इनाम वंशपरंपरेने दिल्याप्रमाणे स्वामींनीही चालवावयाची आज्ञा केली असे. तरि यास मौजे मा । र पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे. या पत्राची प्रति लेहून घेऊन अस्सल भोगवटी यास याज जवळ परतोन देणे. निदेश समक्ष.

श्रीशंभू छत्रपति हर्षनिदान रघुनाथ सुत तिमाजी पंडित पंतप्रधान	श्रीआई आदिपुरुष श्रीराजा शंभू छत्रपति स्वामी कृपानिधी तस्य कृष्णाजी परशराम प्रतिनिधि	मर्यादेयं विराजते
गोल शिक्का	**गोल शिक्का**	**षट्कोनी शिक्का**

ह्या सनदेतील मजकुरावरून हे स्पष्ट होते की चासकर जोशी घराण छत्रपती शिवाजीमहाराज ह्यांच्या वेळेपासून स्वराज्यस्थापनेच्या उद्योगात सहभागी असलेले कल्याणमधील एकमेव घराणे आहे. एवढेच नव्हे तर छत्रपती संभाजी महाराज व राजाराम महाराज यांचीही त्यांनी वेळोवेळी स्वराज्याच्या संकटकाळी जिवावर उदार होऊन सेवा केली आहे; व नंतर महादेव कृष्ण हे ताराबाईच्या पक्षात असताना छत्रपती शाहूचा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट ह्यांचेही घराणे आपल्या सेवेत घेऊन नंतर छत्रपती शाहूकडे त्याची वर्णी लावून दिली आहे. पेशवे घराण्याला उर्जितावस्था आणून देण्यास महादेव कृष्ण चासकर हेच कारणीभूत झाले. महादेवाचे थोरले भाऊ नारो कृष्ण वारले. दुसरा भाऊ गोविंदराव हा खानदेशात रोजगारास गेला. महादजीपंतास दोन बायका होत्या. थोरली भवानीबाई हिला बाळाजी, रामचंद्र व काशीबाई अशी अपत्ये झाली. दुसरी पत्नी शिवबाई हिला कृष्णराव नावाचा मुलगा झाला. महादजीपंतांना काशीबाईखेरीज आणखी दोन मुली झाल्या. त्या त्याने गोळे व मनोहर घराण्यात दिल्या. महादजीपंताचे कोल्हापूर दरबारात फार वजन होते व कान्होजी आंग्रे सेनासरखेल ह्याजशी फार स्नेह होता. तोही कोल्हापूर छत्रपती पक्षात होता. महादजीने थोरला मुलगा बाळाजी ह्यास कोल्हापुरास म्हणजे पन्हाळ्यास ताराबाईजवळ ठेवले. दुसरा मुलगा रामचंद्र महादेव हाच कल्याण जिंकून झालेला कल्याणचा पहिला सुभेदार. यानेच मातबर खानाशी झुंजून कल्याण प्रांत जिंकला. महादजीपंत पन्हाळ्यास बाळाजी जवळ असे. परंतु काही दिवसांनी ताराबाईने महादजीपंत व बाळाजीपंत

हया पितापुत्रांत भांडण लावून दिले. म्हणून बाळाजीपंतास तेथेच कोल्हापूर दरबारात ठेवून महादजीपंत कल्याणप्रांती कुडकर्लीस येऊन वसई व मुंबईकरांशी तारवाचा उदीम करू लागले. पन्हाळयास असलेल्या बाळाजीनेच ताराबाईच्या कारकीर्दीत बाळाजी विश्वनाथास रांगण्याच्या मुक्कामी प्रथम नोकरी लावून दिली. शिवाय शेकडा पंचोत्रा व्याजाने अडचणीच्या प्रसंगी बाळाजी महादेवाने बाळाजी विश्वनाथास त्या सुमारास कर्ज देऊनही नड भागविली होती. नंतर काही दिवसांनी बाळाजी विश्वनाथाने, महादजी कृष्णास आपला मुलगा बाजीरावाकरिता, मुलीची मागणी केली. तिचे नाव काशीबाई. कमालीचा आग्रह केला तेव्हाच महादजीपंत कबूल झाला व लग्न झाले. (शाहू महाराजांनी मध्यस्ती केली असे म्हणतात). हया लग्नासाठी त्या काळी महादजी कृष्णाने २५००० रु. व बाळाजी विश्वनाथाने ५००० रु. खर्च केले. हयावरून बाळाजी विश्वनाथाची परिस्थिती चासकर जोशी मंडळींपेक्षा पुष्कळच कनिष्ठ होती असे दिसते. पुढे काही वर्षांनी बाळाजी विश्वनाथाला पेशवे पद मिळाले. त्यावेळी सुद्धा कान्होजी आंग्रे मंडळीना शाहूकडे वळविण्यात महादजी कृष्णाचे सहाय्य बाळाजी विश्वनाथास झाले होते. आंग्र्याने लोहगड, विसापूर, प्रबळगड, कल्याण प्रांत जिंकून लोहगडावर बहिरोपंत पिंगळे हया पेशव्याला कैदेत ठेवले होते. तेव्हा कोणीही कान्होजीवर चाल करून जाण्यास तयार होईना ; शेवटी शाहूने बाळाजी विश्वनाथवर ही कामगिरी सोपविली. त्याने युद्धा ऐवजी युक्ती व महादेव कृष्णाजी चासकर व्याही हयांचे सहाय्याने कान्होजीस शाहूकडे वळवून बहिरोपंतास सोडवून आणले व गड ताब्यात घेतले. तेव्हा खूष होऊन शाहूने बाळाजी विश्वनाथास पेशवे पद दिले. म्हणजे पेशवे पद मिळवण्यासही महादजी कृष्णाचेच सहाय्य झाले. कान्होजी व बाळाजी विश्वनाथ हयांचा बंधुभाव झाला तो नकली नव्हता, खरा होता. बाजीराव व चिमाजी अप्पा हयांनी कान्होजीस 'कान्होजी काका' म्हणून कितीतरी लिहिलेली पत्रे आता उपलब्ध आहेत. बाळाजी विश्वनाथ पेशवा झाल्यावर त्याचे कारकीर्दीत महादजीपंत व रामचंद्रपंत हेच त्याची दिवाणगिरी पहात होते. खानदेश, बागलाण, जुन्नर व कल्याण हे सुभे त्यांच्याकडे होते. १७२६ साली बाजीरावाने कर्नाटकची मोहीम केली त्यात कर्ज झाले, त्याची फेड करण्याकरिता प्रथम रामचंद्र महादेवानेच लाख दोन लाख रुपये दिले; मागाहून मल्हार दादाजी बर्वे, बापूजी श्रीपत चित्राव, त्रिंबकराव पेठ्याचा बाप विसाजी कृष्ण पेठे याजकडून पैसा घेतला. मोरो बल्लाळ चासकर अभिमानाने लिहितो, "केवळ कन्या काशीबाई देऊन दौलत मेळविली नाही." बाजीरावाच्या कारकीर्दीच्या सुरवातीलाही महादजीपंत सासरा एक दिवाण होता. पुढे शाहू महाराज नको नको म्हणत असता महादजीपंत काशीयात्रेस निघाला. "जाताना कल्याणहून रामचंद्रपंत महादेव येऊन कारभार करील. तो अति धीर गंभीर. सर्व ओझे चालवील" असे सांगून गेले. महादजीपंत काशीयात्रेस

निषण्याच्या आधी दोन तीन वर्षें त्याचा भाऊ गोविंद कृष्ण खानदेशात रोजगारास गेला होता. तोही त्याच सुमारास वारला.

साताऱ्याहून निरोप घेऊन महादजीपंत निघाला तो लोहगडास आला व तेथील घरची व्यवस्था लावून जलदीने कडे-माणिकपुरास गेला. तेथे त्याची दुसरी बायको शिऊबाई आपला मुलगा कृष्णराव याला घेऊन त्याला मिळाली. त्यांना तेथे (कडेमाणिकपुरास) मोंगलानी अटक केली. तेव्हा खंड भरून सुटका करवून घेऊन ते सारे काशीस गेले. पण तेथे तीसच दिवसांनी महादजीपंत मरण पावला. मग शिऊबाई कृष्णरावास घेऊन परत कल्याणास रामचंद्र महादेवाकडे आली. रामचंद्रपंताने वडिलांच्या मृत्यूची बातमी कोल्हापूर दरबारी असलेले आपले थोरले बंधू श्रीबाळाजीस कळविली, तेव्हा तो वडिलांची क्रिया करण्यासाठी त्रिस्थळीस निघाला. परंतु जाण्यापूर्वी कल्याणास रामचंद्रपंतास भेटून गेला. त्या वेळी रामचंद्रपंत फार आजारी पडला होता. " शरीर अशक्त, घडीचा भरवंसा नाही. " म्हणून त्याने बाळाजीपंतास एक मुलगा दत्तक मागितला, पण एक फारच लहान व दुसऱ्यास कोल्हापूरकर निरोप देत नाहीत असे सांगितले. बाळाजीपंतास दोन बायका होत्या. त्यापैकी थोरली बायको कोल्हापुरास मुलाजवळ ठेवली होती. निराश होऊन रामचंद्र महादेवाने आपल्या भावांना आपली सारी दौलत समजावून सांगितली. ५ लाख सावत्र माता शिऊबाईजवळ, २० लाख कल्याण प्रांतात, शिवाय घोडी वगैरे अवांतर व स्थावर घरेदारे, शेतीवाडी वगैरे. बाळाजीपंत काशीस गेल्यावर मागे रामचंद्र महादेव फारच आजारी झाला. म्हणून बाळाजी त्रिस्थळी यात्रेहून तातडीने परत आला. वाटेत कोल्हापूरकर संभाजी, औरंगाबाद येथे निझामाजवळ गेला होता. त्याची भेट घेऊन कल्याणास जातो तो १५ दिवसापूर्वीच रामचंद्रपंत वारला होता. मरणसमयी सावत्र भाऊ व आई, कृष्णराव व शिऊबाई हे जवळ होते. वीस लक्ष रुपये कृष्णरावाने घेतले. शिऊबाईचे काहीं चालले नाही. तेव्हा पांच लक्ष रुपयाचे वित्त शिऊबाईजवळ लोहगडी होते तेवढे मात्र शिऊबाई आटोपून राहिलो. रामचंद्र महादेवानंतर कल्याणचा सुभा अर्थातच कृष्णराव महादेवासच झाला. पण कृष्णरावाने अमोरभोईचा भुईकोट किल्ला बांधला व.........करावे हा उद्योग आरंभ केला, तेव्हा चिमाजी अप्पांनी अवकृपा करून कल्याणच्या सुभ्यावरून त्यास दूर करून तो वासुदेव जोशाचे भावास, नारायण जोशास सांगितला व आदार (अमोर भोई) चा किल्ला खणून टाकला. त्यावर कृष्णराव सातारेस जाऊन जिवबा चिटणीस यांना ५० हजार रुपये देऊ करून व मोठी थोरली नजर छत्रपतींस देण्याचे आमिष दाखवून सुभा परत मिळवण्याची त्याने खटपट केली. तेव्हा शाहूमहाराजांनी कृष्णाजीरावास चिमाजीअप्पाचे हवाली केले.

रामचंद्रपंतांनी कल्याण जिंकून सुभा स्वतंत्र केला तेव्हा मराठ्यांचा प्रत्यक्ष अंमल बसल्यामुळे पोर्तुगीझ जुलमाला त्रासून गेलेले जे हिंदू होते, त्यांना आशा

Scanned with Car

उत्पन्न झाली. अशा हिंदूपैकी अणजूरकरांचे घराणे विशेष प्रख्यात असून वसईच्या कारस्थानात त्यांचा संभाजीच्या कारकीर्दीपासून हात होता. अणजूरकर हे पाठारे क्षत्रिय. यांना राजे हा बहुमानवाचक किताब पूर्वी होता. अणजूरकर मंडळींना कल्याणास पेशव्यांचा अंमल बसल्यामुळे एक तऱ्हेने फायद्याचे झाले. गंगाजी नाईक प्रभृती अणजूरकर बंधूनी दूरवर विचार करून आपले पूर्वीचे मनसुबे बदलून कल्याणास रामचंद्र महादेवास एकांती जाऊन भेटला व तेथे काही दिवस राहून फिरंगाण सोडविण्याविषयी रामचंद्र महादेवास गळ घातली. एकंदर हकीगत व गंगाजी प्रभृति त्या प्रांताच्या माहितगार लोकांचे सहाय्य मिळण्याचा संभव पाहून रामचंद्रपंताच्या मनात तो मनसुबा भरला; व त्याने पेशव्याकडून नक्की काम करवून देण्याचे आश्वासन दिले व गंगाजीच्या म्हणण्याप्रमाणे हेर, बातमी काढणारे वगैरेंची खरोखरच तरतूद आहे काय हे तपासण्याच्या उद्योगास लागला, व समक्ष खातरी करून घेतली. खात्री पटल्यावर त्याने अणजूरकर मंडळींना आपल्याकडेच ठेवून घेतले. रामचंद्रपंताने गंगाजी नाईकास आश्वासन दिले की कार्यभाग संपताच तुमची पूर्वापार वतने आहेत ती तुम्हाकडे चालवू. तुमचे जे जे साहाय्यक असतील त्यांचीहि वतने, शिलोत्रे, वाड्या, फजिने पुरातन असतील ते चालवू किंवा तुम्ही शिफारस कराल त्यास नवीन करून देऊ.

एवढे ठरल्यावर गंगाजी नाईक आपले सहाय्यक, कार्यकर्ते वगैरेंना मालाड, कळवे, वसई, भाईंदर येथे भेटून पुन्हा एकदा मदतीचे आश्वासन पक्के करून आपल्या सर्व कुटुंब-कबिल्यासह कल्याणास राहण्यास गेला. १७२२ मध्ये झालेले त्यांचे स्थलांतर पोर्तुगीझांना कळल्यावाचून राहिले नाही. या स्थलांतराला देखील थोडा इतिहास घडला आहे. गंगाजी नाईकांनी रामचंद्रपंतांचे सल्लामसलतीने काही लोक घेऊन साष्टीबेटात मसेळ म्हणून फिरंग्यांचे एक ठाणे होते ते काबीज करण्याचा मनसुबा केला! परंतु ही मसलत रामचंद्रपंतांच्या पदरचाच प्रभू कोल्हेरकर नावाचा नोकर होता, त्याने फितुरी करून फिरंग्यास कळविली. अर्थात ते सावध झाले व त्यांनी साष्टींत शिरलेल्या मराठ्यांस कोंडून टाकण्याचे ठरविले. त्यांनी पन्नास गोरे फिरंगी मरोळच्या भरतीस पाठविले व घोडबंदरापासून ठाण्यापर्यंत खाडींत तारवांचा वेढा बसविला. पाच दिवसपर्यंत मराठ्यांचे लोक कोंडले गेले. ह्याच संधीस पेशव्यांचा सरदार पिलाजी जाधव ह्याने फिरंग्यांच्या सायवान, मनोर, तारापूर, दमण या प्रांतावर स्वारी केली. तेव्हा या लढाईच्या दंगलीत अणजूरकरांचे साहाय्यकारी नामाजी देसाई, बेंडजी देसाई, बापूजी ठाकूर, हरबाजी हिंदुराव व जिवाजी भालेराव इत्यादि लोकांनी अनेक हिकमती करून मोठ्या शर्थीने रात्री चोरीने तारवे नेऊन अणजुरकर मंडळीना कसे तरी बाहेर काढले.

Scanned with Car

या प्रकरणानंतर पोर्तुगीजांनी फितुरीच्या आरोपावरून साष्टीतील व अण-जूरातील शेकडो लोक व गंगाजी नाईकाचे सर्व सगेसोयरेदेधारे टिपून काढून बंदीत घातले. पुढे त्यापैकी काही लाच देऊन, काही खंडणी देऊन, तर काही गणेश प्रभू, गंगाजी प्रभू, हरजी ठाकूर, जिवाजी भालेराव, हरबाजी हिंदूराव हे काही युक्ती योजून तुरुंगातून पळून गेले. त्यामुळे फिरंग्यांचा राग अनावर झाला व त्यांनीं रूपाजी भालेराव, त्याचे दोन भाऊ नारोजी व तानकोजी यांना गोव्यास नेऊन तेथे 'अंगी तेलाची कापसाची डगली घालून' त्यांना जिवंत जाळले.

या प्रसंगानंतर रामचंद्रपंताने गंगाजी नाईकास कल्याणहून पुण्यास बाजीराव साहेबाच्या भेटीस पाठवून दिले. तेथे बाजीरावसाहेबांनी फिरंगाणच्या मनसुब्यांची लक्षपूर्वक पाहणी करून अणजूरकरांना मोहीम करण्याचे आश्वासन दिले. त्याच वर्षी १७२२ च्या पावसाळ्यानंतर स्वारी करण्याचे मुक्रर झाले. पण वेळ आली नव्हती. कारण बाजीरावसाहेबांना दुसऱ्याच एका मोठ्या मनसुब्याने व्यग्र केले व फिरंगाणची स्वारी लांबली. तरी त्यांनी रामचंद्र महादेव, पिलाजी जाधव, अशा आपल्या सरदाराकरवी फिरंगणात लहान सहान स्वाऱ्या चालूच ठेवल्या.

१५ नव्हेंबर १७२३ मध्ये अचानक ४ हजार स्वार घेऊन पिलाजी जाधव फिरंगाणात शिरला. त्याच्या धाकाने सायवानचे फिरंगी ते ठाणे सोडून दोन-तीन कोस मागे गोखरव्यापर्यंत हटले. पण तेही ठाणे मराठ्यांनी जिंकले व गावात शिरून जाळपोळ आणि लुटालूट केली. पुढे डिसेंबरमध्ये फिरंग्यांनी मराठ्यांशी बोलणे लावून १६-१२ रोजी फिरंगी अधिकाऱ्यांनी कल्याणचा मराठी सुभेदार रामचंद्र महादेव जोशी यास लिहिले, "नुकताच काही दिवसापूर्वी तुमच्या आमच्या सरकारात जो तह ठरला त्याप्रमाणे अतःपर उभयता वागू."

हा तह झाला तरी मराठ्यांनी पोर्तुगीझांच्या मुलुखात तोंड टाकण्यास कमी केले नाही. १७२६ साली फिरून एकदा साष्टी-वसई प्रकरणाचा मनसुबा ठरत होता. कारण बाजीरावसाहेब ह्यांची स्वारी जुन्नरपर्यंत आली होती. तेव्हा गंगाजी नाईक वगैरे पुन्हा त्यांना भेटले व मोहीम करण्याचे ठरले. संताजी धायभोर, रामचंद्र महादेव चासकर-जोशी सुभेदार, शंकराजी केशव फडके सरदार, महादजी कृष्ण प्रभू सरदार, यांची पेशव्यांनी ह्या मनसुब्यावर नेमणूक केली. गंगाजी नाईक व हेर बातमीदारांचे मदतीने मोहिमेचा नकाशा पक्का करावा असे ठरले. परंतु अजूनही वेळ आली नव्हती. कारण कर्नाटकचे राजकारण निकराला आले व पिलाजी जाधवरावांनी बाजीरावसाहेबांना वसई मोहीम एवढ्यात हाती घेऊ नये असा सल्ला दिला. म्हणून दसऱ्यास बाजीरावसाहेब कर्नाटकचे स्वारीस निघून गेले; व पुढे पावसाळ्यानंतर निजामाचे प्रकरण उद्भवले व पालखेडची मोहीम निघाली. निझामाचा पराभव होऊन मुंगी शेवगांवचा तह झाला, आणि बाजीरावसाहेब वऱ्हाड, माळवा, बुंदेलखंड इकडे फिरत राहिले. आप्पासाहेबही माळव्याकडेच होते.

त्या वेळी वसईचा अॅडमिनिस्ट्रेटर अंद्रे-रिबेरो कुतिन्हो याने गोव्याच्या व्हाईसरॉयला लिहिले, "आजकाल आपले सर्वात मोठे दुष्मन असतील तर ते मराठेच होत. सबंध आशिया खंडात त्यांच्या एवढे प्रबळ व महत्वाकांक्षी राष्ट्र दुसरे नाही."

१७२८ साली रामचंद्र महादेव चासकर जोशी हा कल्याणचा सुभेदार मृयू पावला. म्हणून कल्याणच्या सुभ्यावर त्याचा भाऊ कृष्णराव चासकर-जोशी यांची नेमणुक झाली. कृष्णरावने रामचंद्रपंतांचे दोन विश्वासू कारकून विठ्ठल-पंत व चिमणाजीपंत यांच्या सहाय्याने कारभार करण्यास सुरवात केली. लवकरच त्याने रामनगरवर स्वारी केली. ती आटोपून तो परत येत असता त्यानें फिरंग्यांच्या दमण प्रांतातील नारगोळ वगैरे एकदोन गांवे लुटली. नंतर पाऊस आल्यामुळे घाटावर गेला. कृष्णरावाने आगळीक केल्यामुळे त्याचा बदला घेण्यास फिरंगी टपलेले होतेच. त्यांनी त्याची गैरहजेरी व पाऊसकाळ पाहून आषाढ महिन्यात गलबतातून येऊन कल्याणावर अचानक हल्ला केला.

दुर्गाडीवरील समरप्रसंग



असा होता किल्ले दुर्गाडीचा दिल्लीदरवाजा

रामचंद्रपंत जोशी (चासकर) सुभेदाराच्या मृत्युनंतर त्याचा बंधू कृष्णराव व रामचंद्रपंतांचे दोन विश्वासू कारभारी विठ्ठलपंत व चिमणाजीपंत ह्यांनी

Scanned with Ca

कारभार चालविला होता. कृष्णरावास अजून सुभेदाराची वस्त्रे मिळाली नव्हती. त्याने १७२८ मध्ये रामनगरवर स्वारी करून परत येताना पोर्तुगीजांची दमणमधील नारगोळ वगैरे गावे लुटली व पावसाळा आल्यामुळे घाटावर पुण्यास गेला. पोर्तुगीझ याचा बदला घेण्याची संधी पहातच होते. तो घाटावर गेल्याचे पाहून व पावसाळा असताना त्याने आगष्ट १७२८ मध्ये गलबतांतून येऊन कल्याणवर हल्ला केला. दुर्गाडी किल्ल्यावर गलबतातून हल्ला करून किल्ला जिंकण्यासाठी लढू लागले. त्या वेळी दुर्गाडी किल्ल्यावर सरदार शंकराजी केशव फडके, महादजी कृष्ण प्रभू, शिवजी नाईक व नारायणजी नाईक अणजूरकर होते. पोर्तुगीझांनी ४ हल्ले केले. शंकराजीपंताने बरीच शर्थ केली. सैनिकांना प्रोत्साहन येण्यासाठी त्याने आपल्या कानांतील सोन्याच्या बिकबाळचा, वगैरे सैनिकांस दिल्या. रामचंद्रपंत सुभेदाराची विधवा किल्ल्यावर होती. तिनेही सैनिकांना खर्चासाठी आपल्या वाकी, गोठ, तोडे, पाटल्या वगैरे दागिने तोडून सैनिकांत वाटले. तेव्हा फिरंग्यांची बरकंदाजांनी योग्य निशाणबाजी करून बरीच माणसे टिपली. फिरंग्यांची पळापळ झाली व ते कल्याणबंदरावरील चावडीवर जमा झाले. तुफान युद्ध झाले. तेव्हा दुर्गाडीवरील तोफा फुटल्या. त्याच वेळी गंगाजी नाईक अणजूरकर लोनाडहून व बाबाजी अडठराव वसंत शेलोली (बदलापूर) हून मदतीस आले. अडठराव व गंगाजी नाईक गणेश दरवाज्याकडून कल्याण किल्ल्याच्या कोटावर चढले व एका बुरुजावरील तोफ ओढत ओढत दुर्गाडीवर नेली. तोफ हाती येताच शंकराजी केशव फडक्याने फिरंग्यावर कुलपी गोळचांचा भडीमार केला. फिरंगी लोक भराभर नावेवर चढून पळून गेले. अशा तऱ्हेने कल्याण मुक्कामी भर पावसाळचाचे वेळी प्रमुख सुभेदार व फारसे सैन्य नसताना फिरंग्यांनी केलेला अचानक हल्ला, फडके अणजूरकर वगैरे मंडळीनी यशस्वी रीतीने परतावून लावला. ह्या कामी रामचंद्रपंत सुभेदाराच्या विधवा सुनेनेही कर्तव्यनिष्ठा व स्वार्थत्याग दाखवून आपले नाव कल्ल्याणच्या इतिहासात अमर केले. कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यावरील फिरंग्यांचा आक्रमणाचा प्रयत्न म्हणजे वसईच्या धर्मसंग्रामाची नांदी व फिरंग्याच्या वसईच्या किल्ल्याची मृत्युघंटा ठरली. कारण येथून वसईच्या राजकारणाला वेग आला व बरोबर १० वर्षे सतत झुंज देऊन १७३९ मध्ये वसईमधून फिरंगी मराठचांनी पार उखडून काढला. फिरंग्यांचे कल्याणच्या दुर्गाडीवरील आक्रमण म्हणजे वसईच्या धर्मसंग्रामाची नांदीच होती व येथून पुढे वसईच्या धर्मसंग्रामाच्या हालचाली जोरात सुरू झाल्या.

फिरंग्याला परतवून लावले खरे; परंतु सुभेदाराचे कारकून चिमणाजीपंत व विठ्ठलपंत यांनी फिरंग्याबरोबर सलोख्याचे धोरण ठेवले. कृष्णरावाने फिरंग्यांशी कारकुनांमार्फत तात्पुता तह केला असे ‘वसईची मोहीम’कर्ते य. न. केळकर म्हणतात. परंतु हा तह असतानाच बाजीरावसाहेबांचे उजवे हात सरदार पिलाजी

जाधव यांनी दमणकडे स्वाऱ्या घातल्या असाव्या. कारण २७-४-१७२९ रोजी कृष्णरावाने पेशव्यांकडे तक्रार करून कळवले की "दमणच्या भागात पिलाजी जाधव व खंडोजी माणकर यांनी स्वाऱ्या घालू नयेत अशी त्यांना ताकीद द्या. वसईचे जे मोठे कारस्थान शिजविण्याचा हळूहळू उद्योग सुरू आहे, त्याला यामुळे धक्का बसेल." २८ फेब्रुवारी १७३० च्या एका पत्रात फिरंग्यांचा व्हाईसरॉय आपल्या उत्तरेकडील सेनापतीस कळवितो "आपण कल्याणच्या सुभेदाराशेजारी आहात याची मला जाणीव आहे व त्याप्रमाणे काळजी घेत आहे. परंतु मला खात्री आहे की कल्याणचा सुभेदार दगलबाजी करणार नाही." कृष्णराव सुभेदार रामचंद्रपंतांच्या मृत्यूनंतर घाटावर गेले, ते स्वतः कांब्याच्या लढाईनंतर १७३० नंतर सुभेदारीची वस्त्रे घेऊन आले. इकडे सर्व कारभार कारभाऱ्यांचे हातात असल्यामुळे त्याच सुमाराला फिरंग्यांनी पुन्हा कल्याणची मागणी केली. त्यामुळे पिलाजीरावास पाठवणे बाजीरावसाहेबांस भाग पडले.

१७३० च्या मे महिन्यात मराठे वसईच्या प्रांतात शिरले. मुख्य सेनापती पिलाजी जाधव असून अणजूरकर व कावळे सहाय्यास होते. भिवंडीजवळ कांबे खाडीवर फिरंग्यांचा कोट होता. त्याला मराठ्यांनी वेढा घातला. पिलाजी जाधव विठ्ठलपंत व चिमाजीपंत कल्याणहून आले व त्यांनी कोटास मोर्चे दिले. एक दिवस कोटातील लोकांना मदत करण्यासाठी फिरंग्यांची दोन गलबते कांबे खाडीत आली. ती जाधवराव व गंगाजी नाईक यांनी खाडीत उडचा घालून पकडली. त्यावर पुष्कळ सामान, दारुगोळा, व १२ तोफा सापडल्या. मग त्याच तोफा लागू करून, मराठ्यांनी कोट फोडला. तेव्हा शत्रू शरण आला. मराठ्यांनी आठ फिरंगी, १६०० शिपाई व एक हजार रयत कैद केली. ही लढाई १७३० च्या जून महिन्यात झाली.

डॅनव्हर्सच्या इतिहासात थोडी निराळीच तपशीलवार हकीगत दिली आहे. तो म्हणतो, "मराठ्यांनी मचवे काबीज करून तोफा किल्यावर डागल्या. तेव्हा किल्लेदाराने तहाचे निशाण लावले. किल्लेदार काही राऊत बरोबर घेऊन सल्याचे बोलणे करण्यासाठी मराठ्यांच्या तळावर आला. पण मराठ्यांनी त्यास गिरफदार करून कोटाखाली उभा केला व कोट खाली करून द्या म्हणून सांगितले. अर्थातच नाइलाजाने किल्लेकरी कबूल झाले; पण त्यांनी एकच अट घातली ती अशी, 'आम्हांस हत्यार सुद्धा पार करून द्यावे.' मराठ्यांनी कबूल करून त्याप्रमाणे ते बाहेर पडत असता त्यांना सगळ्यांना कैद करून कल्याणास पाठवून दिले. अशा तऱ्हेने मराठ्यांनी कोटही घेतला व त्यातील शिपायांच्या ८ कंपन्याही कैद केल्या. कांब्याच्या शेजारी आणखी एक चौकी किंवा बुरुज होता; त्यातील शत्रूने मात्र मराठ्यांना दाद दिली नाही. त्यांनी तो बुरुज लढविला. पण तेथल्या दारुच्या कोठारात ठिणगी पडून तोही कोट कोसळला. तेथे मराठ्यांना १०

Scanned with Car

तोफा सापडल्या. त्या घेऊन त्यांनी डोंगरातले मार्ग रोखून धरले. कांब्याची हकीगत कळताच वसईहून मदतीकरिता ३०० लोकांची टोळी आली. परंतु ती एक दिवस अवघड ठिकाणी जंगलात हत्यारे वगैरे उतरून न्याहारीच्या तयारीत असता मराठ्यांच्या टोळीने अचानक येऊन सपाटा मारला व बहुतेकांना कंठस्नान घातले.

कांबे जिंकल्यावर मराठ्यांनी साष्टीत उतरण्याची व ते काबीज करण्याची मसलत केली. मायाजी राउत व नामाजी देशमूख यांनी गुप्तपणे साष्टीतील तयार करून ठेवलेल्या उताराच्या कोळ्यांना गुप्तपणे पाठवून तयारी करविण्यात आली. प्रथम मराठी फौजा बावा मलंगच्या डोंगराजवळ भाळ म्हणून गाव आहे तेथे जमल्या. त्याच मुक्कामी कृष्णराव सुभेदारही येऊन मिळाला. तेथून एक टोळी खिडकाळीवर पाठविली. पण पुढे कृष्णराव सुभेदार व अणजूरकर यात भांडण झाले. अणजूरकर पिलाजी जाधवाच्या हुकमाप्रमाणे बिनीस निशाण घेऊन चालले होते. कृष्णरावाने जबरदस्तीने त्यांना मागे आणून आपल्याजवळ ठेवले. त्यामुळे गोंधळ होऊन संकेता-प्रमाणे सैन्याच्या हालचाली झाल्या नाहीत. अणजूरकरांचे लोक व अंताजी काव-ळ्याचे लोक कळव्याच्या जवळील खडकावर जाऊन ठाण्याजवळ थांबले. परंतु पाठ-पुराव्यासाठी येणारी फौज येत नाही असे पाहिल्यावर कळव्याच्या दक्षिणेस दिघे नावाचे गाव आहे तेथे गेले. कारण पिलाजी जाधवराव व कृष्णराव तेथेच मुक्कामास गेल्याचे समजले. अखेर ठाण्याची मसलत जमत नाही तर निदान आल्या-सारखे कळव्याची माडी तरी जिंकावी असे जाधवराव म्हणाला. ही माडी व तिच्या नजीकचा बुरुज एका झेपेत जिंकण्यासारखा होता. मग तसेच ठरून कळव्याच्या दक्षिणेस इटावे गाव आहे, तिकडून गंगाजी नाईक कळव्यात शिरले. पाठोपाठ सुभानजी हरपाळही गेला. इतके होईतो उजाडले. मग मराठ्यांनी सारे कळवे लुटन फस्त केले. नंतर मराठे परत खिडकाळीवर आले व तेथे ४ दिवस तळ देऊन राहिले व नंतर भिवडोंगरी (भुई डोंगरी कल्याण) येथे आले व तेथून सतत स्वाऱ्या पाठवून त्यांनी शत्रूची मांडवी, जिवधन, टकमक, तांदुळवाडी, कामणदुर्ग इत्यादि ठिकाणे जिंकली व नंतर २७ फेब्रुवारी १७३१ मध्ये मनोरही जिंकले.

(९ मार्च ३१) मार्च महिन्यात उत्तर फिरंगाणच्या अधिकाऱ्याने गोव्यास लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो, "मराठ्यांनी आपल्या मुलुखातून काढता पाय घेतलेला नसला तरी त्यांची चढाई थांबलेली आहे. उलटपक्षी आम्ही मात्र त्यांच्या मुलुखात जाळपोळ करण्याचा क्रम चालू ठेवला आहे. लढाईच्या दंग्यामुळे मराठ्यांच्या व्यापार उदीमाला मोठाच धक्का बसून त्यांची नुकसानी झाली आहे. आम्ही त्यांची शेकडो बायका-पोरे पकडली आहेत व त्यांना आम्ही लवकरच बाट-वणार आहोत.........पेशव्यांचे मोंगलांशी वैमनस्य आहे. पण मोंगल मराठ्या-इतकाच विश्वासघातकी आहे. कदाचित तो पेशव्यासही सामील व्हायचा. आंग्रयाशी

आपला बिघाड झाला आहे. शिद्दीही बिघडला आहे. बाजीराव पेशवा म्हणजे शिवाजीचा वंशज प्रतिशिवाजीच आहे."

२७ मार्च १७३१ ला फिरंग्यांनी मराठ्यांच्या जीवधनगडास वेढा देऊन तो जिंकून घेतला. दोन तोफा, दोनशे वीस गोरे, तीनशे शिपाई व अठरा घोडेस्वार घेऊन त्याने डोंगर वेढला. त्याने तोफांचा मारा करून शिवाय सर्व डोंगर पेटवून दिला. किल्ल्यावर १०० एक मराठे होते ते नाइलाज होऊन २७ तारखेस रात्री एका बिकट वाटेने उतरून निघून गेले.

एप्रिल महिन्यात फिरंग्यांनी वरळी (?) गावच्या जत्रेच्या वेळी हल्ला केला; तसेच भिवंडीवरही अचानक हल्ला केला व ते ठाणे मारले. पुढे पेशव्यांचा निजामाशी बिघाड झाला; यामुळे त्यांना फिरंग्यांशी तह करावा असे वाटू लागले. फिरंग्यांनी निजामास भर देऊन कल्याण प्रांतावर चढाई करण्याची सल्ला दिली तेव्हा जलदी करून पेशव्यांनी अप्पाजी पंत कारकूनामार्फत फिरंग्याशी बोलणे लावले. बोलणे चालू असताच आक्टोबरमध्ये साष्टीचा अधिकारी फॅन्सीस द मेल याने पनवेल जाळून बेचिराख केले. (२ आक्टोबर १७३१) त्यांच्या हल्ल्याची बातमी फुटली होती; म्हणून लोक भिऊन पळून गेले होते. फिरंग्यांनी गावातील घरेदारे टिपून जाळून टाकली. पनवेलजवळचे जमकामते हा गावही त्याच वेळी जाळला.

नव्हेंबर १७३१ मध्ये स्वतः बाजीरावसाहेबांनी गोवेकर व्हाईसरॉय यास पत्र लिहून तह घडवून आणण्याविषयी लिहिले. ३० जानेवारी १९३२ रोजी मुंबई गव्हर्नर रॉबर्ट कोवन यांच्या मार्फत मराठे व फिरंगी यांचा तह झाला. हा तह पेशव्यांना मनातून मान्य नव्हता, असे बाजीरावसाहेबांच्या पत्रावरून दिसून येते. (१७-३-३२). ते म्हणतात, "तुम्ही मकार ग्रामाची चिठ्ठी आली तीच पाठविली त्यावरून वर्तमान कळले. फिरंग्यांशी सल्ल्याचे नक्की झाले नाही व होईल असा भरंवसाही नाही. म्हणून हवेलागे (हेर) राखून ठेवले पाहिजेत. कारण मोहिमा कराव्या लागणारच. तरी त्यांना ग्रामधाम सर्व द्यावे म्हणून कृष्णरावाने लिहीले होते. आता त्यांना (कृष्णरावास) फिरून भेटीस बोलावले आहे. ते भेटल्यावर गावही करून देऊ." त्याच्या भेटीनंतर थोड्याच दिवसांत कृष्णरावाचा अंमल दूर केला व कल्याणची सुभेदारी वासुदेव जोशी (मुरुडकर) या पोक्त व धोरणी मुत्सद्याच्या हावाली केली. कृष्णराव जोशीचा अंमल काढून घेण्यासारखा फार मोठा अपराध त्याने कोणता केला हे मागे एकदा येऊन गेलेच आहे. त्याची बुद्धी बहुधा फिरली. त्याने एक स्वतंत्र गढी बांधली व वर्तणूकही प्रामाणिक राजनिष्ठ राहिली नसावी; फिरंग्यांशी जो तह केला, तो तर बाजीरावसाहेबांच्या राजकीय धोरणाविरुद्ध व परवानगीवाचून केला असावा. नाहीतर बाजीरावसाहेबांचा हा मेहुणा आप्त असताना सुभेदारीवरून तात्काळ दूर करण्यासारखे काही कारण

नव्हते. परंतु नंतरही त्याने आपला बाजीरावसाहेबांना कमी लेखण्याचा गुण दाखवलाच. त्याने सातारचे छत्रपती शाहू महाराज यांचे दोन कारकुनांना ५०००० रु. नजर देऊन व छत्रपतींना फार मोठी नजर देण्याचे आमिष दाखवून सुभेदारी छत्रपतींकडून मिळवण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम म्हणजे शाहू छत्रपतींनी त्यास पकडून बाजीरावसाहेबांचे बंधू व कारभारी चिमाजी अप्पा यांचे स्वाधीन पारिपत्यासाठी केला. त्यांनी त्याचे व्यक्तिगत पारिपत्य काय केले ते समजण्यास मार्ग नाही; परंतु राजकीय सन्यास दिला हे नक्की. त्याने स्वतंत्रपणे बांधलेली गढी चिडून खणून काढली, सुभेदारी काढून घेतली व त्यास चास गावी नेऊन स्वस्थ बसविले. केवळ आप्त म्हणून व त्याचे वडील म्हणजे बाजीरावसाहेबांचे सासरे यांची शिवाजी महाराजांचे वेळेपासूनची सेवा या सर्वांचा विचार होऊन फक्त प्राणदान दिले; व इतरेजनांनाही शाहू महाराजांनी दाखवून दिले की बाजीरावसाहेब व शाहू महाराज निराळे नाहीत. त्यांना कोणी विकत घेण्याचा प्रयत्न करूं नये; व तसेच बेइमान कितीही जवळचा असला तरी त्याचा मुलाहिजा ठेवला जाणार नाही; त्यामुळे वसई व फिरंग्यांचे राजकारण नासत होते ते मार्गास लागले.

कृष्णराव चासकर जोशी यांची कारकीर्द अवधी दोन वर्षांची १७३० ते १७३२.वास्तविक याचाच सावत्र भाऊ रामचंद्रपंत जोशी चासकर याने संभाजीच्या मृत्यूनंतर कल्याण मोंगलाचे ताब्यात १६८९ साली गेल्यापासून सुमारे ३० वर्षे मोगली अंमलात पिचत पडलेल्या कल्याण सुभ्याला १७१९ मध्ये स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. वडिलांनी व आजोबांनी शिवाजी महाराजांपासून पेशवा बाळाजी विश्वनाथपर्यंत स्वराज्याची एक प्रमुख सरदार म्हणून सेवा केलेली होती. थोरला भाऊ कोल्हापूरकराकडे प्रमुख सरदार; अशा खानदानी व स्वराज्यातील प्रमुख सरदार घराण्यातील पेशवे बाजीरावसाहेबांचे सावत्र मेहुण्याने केवळ अतीघमेंडीने बाजीरावसाहेबांसारख्या प्रतिशिवाजी आप्ताला न जुमानता स्वतंत्र कारभार करण्यास प्रवृत्त व्हावे, हे खरोखरच आश्चर्यजनक आहे. त्यामुळे त्यांनी स्वतःचे व आपल्या घराण्याचे कायमचे नुकसान केले. ज्या हातांनी आम्हाला रामचंद्रपंताचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावे असे लिहावेसे वाटले त्याच हातांनी बेइमानीबद्दल कृष्णरावांची सुभेदारी, बाजीरावसाहेबांनी काढून घेतली व त्यास चास मुक्कामी स्वस्थ बसविले हे लिहावे लागावे हा दैवदुर्विलास आहे. असो.

पेशवाईतील तिसरा सुभेदार झाला वासुदेव जोशी (मुरुडकर) एक पोक्त व अनुभवी मुत्सद्दी. याचेच कारकीर्दीत वसईचे राजकारण रंगले व वसईचा धर्म-संग्राम घडून फिरंग्यांचा नायनाट झाला. फिरंगाण मोडले. चिमाजीआप्पा व अण-जूरकर–कावळे मंडळी धर्मवीर ठरली. मराठ्यांचा दरारा त्रिखंडात बसला; पूर्व

किनाऱ्यावर जरी युरोपीयन लोकांनी पाय रोवले तरी पश्चिम किनारा मात्र आणखी शंभर वर्षे परकीयांपासून व इंग्रजापासूनही सुरक्षित राहिला. मराठी सामर्थ्याची भारतातील सर्व सत्तांना दहशत बसली. नवे नवे सरदार उदयास आले. बेलापूरचे किल्लेदार नारायण जोशी मुरुडकर, कल्याणचे पुढील काळातील पेशवाई अखेरपर्यंतचे सुभेदाराचे मूळ पुरुष रामाजी महादेव बिवलकर, शंकराजी केशव फडके वसईचे सुभेदार, धर्मवीर गंगाजी नाईक अणजूरकर, अंताजीपंत कावळे आणि असंख्य माणसे स्वराज्याच्या कामात सामील झाली व उदयास आली.

१७३३ च्या जानेवारीत अंताजीपंत रघुनाथ कावळे यांनी साष्टीची मोहीम हाती घेण्याविषयी पेशव्याकडे लकडा लावला. त्यास पेशव्यांनी १३-२-१७३३मध्ये उत्तर दिले की "तुम्ही म्हणता ते कार्य करणे आवश्यक आहेच. परंतु जागाजागा जमाव गुंतून पडला आहे. तो मोकळा करून आणावयास फाल्गुनी पौर्णिमेची संधी अनुकूल नाही. याकरिता अमावास्येस (४-३-१७३३) कार्यभाग निश्चितरूप करावा. जमाव फौज करीत असो. तुम्ही वासुदेव जोशी यांचे निदर्शनास सर्व वाट तिटा, हवे लागे आणून द्यावे. अतःपर कार्य कर्तव्यच. दुसरा विचार नाही."

परंतु लवकरच शिद्यावरील मोहीम उद्‌भवली. तिने पेशव्यांची संपूर्ण तीन वर्षे खाल्ली. १७३४ मध्ये गोवेकरांनी साष्टींतील सर्व लोक एकदम बाटवावे, असा जाहीरनामा काढला. तेव्हा कित्येक गंगाजी नाईकास सांगण्यास कल्याणास गेले. मग गंगाजी नाईक, नारायण जोशी (वासुदेव जोशी यांचा भाऊ) याज जवळ जाऊन बाजीरावाचे नावे दटाऊन कागद लिहिला व फिरंगीयास पाठविला. नंतर बाजीरावाचे पत्र आले म्हणून फिरंग्याने तो बेत पुढे ढकलला. फिरंग्याची १०० वर्षे भरली होती. तथापि काळ आला होता पण वेळ आली नव्हती. कारण बाजीरावसाहेब स्वतःच कोकणात उतरले. त्यांनी कुलाबा, राजमाची, खांदेरी फत्ते केली. संभाजी व मानाजी आंग्रे यांच्यात सौरस्य घडवून आणले. म्हणून फिरंग्याची लुडबुड साहजिकच बंद झाली; व त्यामुळेच कदाचित् साष्टी उडविण्याचा बेत स्थगित झाला असावा.

साष्टीच्या कारस्थानाला असे हिसके वारंवार बसल्यामुळे अणजूरकर व अंताजी रघुनाथ कष्टी झाले. त्यात अंताजी रघुनाथने एक भलतेच राजकारण केले; ते वासुदेव जोशाने उघडकीस आणले तेव्हा चिमाजी आप्पासाहेबांनी अंताजीपंतास वासुदेव जोशीजवळ कल्याणास राहण्यास पाठवले. १७३५ च्या सप्टेंबरमध्ये पेशव्यांनी शंकराजीपंत वगैरे लोकांकडून कोळवणातला माहुलीचा बिकट किल्ला जिंकला. किल्ला फिरंगाण व देश याच्या मध्यावर नाव्याच्या जागी होता, तो वसईच्या मोहिमेच्या पुढील धोरणाकरिताच पेशव्यांनी जिंकून घेतला. किल्ला

Scanned with Car

ज्यांनी घेऊन दिला त्यांना " बाळाजी गोविंद यास हे राज्यातील पुरातन सेवक सेवा कष्ट मेहनत करून केली. या करिता कृपाळू होऊन येणे प्रो (१) मौजे खातिवली ता. राहुरी प्रो। भिवंडी हा गाव निमे इनाम दिला. (२) किल्ले मजकुराची सबनिशी सांगितली आहे. वंशपरंपरेने वेतन सालिना रु॥ ३०० (३) या खेरीज तैनाता, अफतगीर १ व पोरगा १..... राजमंडळ रोजकीर्द दि. ९-११-१७३५ याचप्रमाणे प्रो। खंड पाटील बिन कृष्णाजी पाटील, झुंजारराव, जानजी बिन जोगाजी कराळा, वगैरे लोकांनाहि इनामे बक्षिसे नमूद आहेत.

□ □ □

: १० :

वसईचा धर्मसंग्राम

अखेर हो ना करिता पुढील साली १७३७ च्या चैत्र महिन्यात वसईची मोहीम करावयाचा मूहूर्त ठरला. मग आप्पासाहेबांनी बापूजी श्रीपत, वासुदेव जोशी-मुरुड-कर, मोरशेट करंजे, शंकराजीपंत फडके, रामचंद्र हरि पटवर्धन, चिमणाजी भिवराव, मोराजी बनकर, कर्णाजी शिंदे, खंडोजी माणकर, उमाजी बलकवडे व राजपुरीकर मोकाशे यांना जमवून मोहिमेचा नकाशा नक्की करावा व शंकराजी केशवास साहित्य करावयास सांगितले. गंगाजी नाईकाने कल्याणास येऊन जरीमरीचे पटां-गणामध्ये (स्टेशनजवळ नारायण पेठेत) गोंधळ घालण्याच्या मिषाने नामाजी देशमुख, भिकाजी हैबतराव, माळजी जीत, हिराजी ठाकूर, मुऱ्हारजी ठाकूर, बापूजी गोरेगावकर, जसवंत दहिसरकर, लक्ष्मणजी राऊत कळवेकर, यैसा कोळी, गणेशजी व रघूजी वसईकर, लखम चौधरी व खंडोजी लोंढे वगैरे झाडून सारे कार्यसंबंधी भेदाचे लोक बोलावून त्यांना कामे वाटून दिली. गोंधळ समाप्त झाला. मग सर्वास

श्री भवानी जरीमरी मंदिर, कल्याण.
वसईच्या मोहिमेचे वेळी माणसे जमविण्यासाठी सरदार अणजूरकरांनी येथे गोंधळ घातला.

गंगाजी नाईकाने बाजिराव बेळोसे व उदाजी पाटील कल्याण पहावयास आले असता त्यांची खातरजमा करून धाडले. गंगाजी नाईक स्वतः पुण्यास घाटावर गेले व मसलतीस षष्ठी उपरान्त सप्तमी नेमिली. १७३७ च्या चैत्र महिन्याची सप्तमी ठरविली. पुण्याहून येणाऱ्या सरदारांची कामे वगैरे ठरवून गंगाजी नाईक परत आले. हे १७३७ च्या फेब्रुवारी महिन्यात घडले असे दिसते.

चिमाजी आप्पासाहेबांनीं पूर्वी ठरल्याप्रमाणे चिमणाजी भिवराव, रामचंद्र हरी, कृष्णाजी केशव वगैरे सरदारांना साष्टी–वसईकडे अगोदर रवाना केले. ते स्वतः १६ दिवसानंतर गुढी पाडवा करून दुसऱ्या दिवशी प्रस्थानास गेले व तेथून गुरुवारी रात्री त्यांनी फिरंग्यांकडे कूच केले.

मराठ्यांनी आपल्या फौजेच्या दोन मुख्य टोळ्या केल्या होत्या. एक शंकराजी फडके ह्याचे नेतृत्वाखाली व दुसरी खंडोजी माणकराच्या हाताखाली. एकाच वेळी साष्टी व वसई ह्या दोन्ही ठाण्यांवर हल्ले करण्याचा नकाशा ठरला होता. ठाण्यास जाणाऱ्या सैन्याची बिनी (आघाडी) खंडोजी माणकर व होनाजी बलकवडे यांना दिली होती व वसईस जाणाऱ्या फौजेची बिनी शंकराजी केशव फडके व आणजूरकर ह्याजकडे होती. साष्टीवर जाणाऱ्या फौजेने राजमाची-खाली दब्यास बसावे व वसईस जाणाऱ्या फौजेने माहुली किल्ल्याचे रानात दब्यास बसावे असे ठरले होते. त्याप्रमाणे गंगाजी नाईक यांनी आपले दोघे भाऊ व त्याबरोबर फकिर महंमद जमातदार, धाकनाक परवारी व शिवाय १५० लोक व कोळी देऊन राजमाचीहून बावा मलंगचे वाडीस (कल्याणजवळ) रवाना केले व स्वतः आपली टोळी घेऊन तो घोटवडच्याखाली कोशिंबडच्यावर गेला. बाबा मलंगचे वाडीवर जी आघाडीची टोळी गेली तीत रामचंद्र हरी पटवर्धन, रामाजी महादेव बिवलकर व खंडोजी माणकर वगैरे लोक होते. त्यांच्याच पाठोपाठ थोड्या मजलीवर होनाजी बलकवडे काही फौज घेऊन प्रबळ येथे बसला. आघाडीची रामचंद्र हरीची टोळी बाबा मलंगहून साष्टीच्या पल्ल्याजवळ २६ मार्च १७३७ रोजी मुक्कामास गेली. (ठाणेजवळ केळवा येथे).

स्वतः चिमाजी अप्पासाहेब हे बदलापूर येथे येऊन मुक्काम करून होते. ठाण्याजवळ आलेल्या फौजेने कळव्याजवळ एक जेरोनिमो नावाचा पाणबुरुज होता, त्यावर शिड्या लावून शंभर लोक चढले. शत्रूला दारू पाजून गाफील केलेले होते. तेव्हा थोडी मारामार होऊन बुरुज सर झाला. परंतु या गोंधळात बुरुजावरील एक कप्तान व सहा शिपाई मराठ्यांकडून मारले गेले. नंतर तोफा डागून आवाज केला व बाहेर दब्यास बसलेल्या फौजेस इशारा केला. तेव्हा ४०० मराठ्यांची एक तुकडी त्यांना येऊन मिळाली. पाणबुरुजाचा बंदोबस्त करून मुरारजी नाईक फौज घेऊन माजिवड्यावर गेला व रामचंद्र हरि पटवर्धन, खंडोजी माणकर, रामाजी महादेव बिवलकर वगैरे सरदार दुसरी फौज घेऊन घोणसाळियावर गेले.

Scanned with Car

मराठ्यांनी जरी गुप्त मसलत केली होती तरी मराठ्यांच्या हालचालींची बातमी फुटली होती. परंतु ठाण्याचा अधिकारी बतेलोने प्रतिकाराची काहीही खबरदारी घेतली नाही. वास्तविक हा व्हाइसरॉयचा जवळचा नातेवाईक व अनुभवी सेनापती होता. परंतु मराठ्यांनी त्याला बेमालूम थापा मारून असे भासविले की तुमचा आमचा तह आहे. आम्ही तो मोडणार नाही. तुम्ही निर्धास्त रहा. सैन्य तुमच्यावर आणण्याकरिता जमविले नाही. यामुळेच बतेलो निर्धास्त राहिला. नाही तर त्याच्या या वर्तणुकीचा समाधानकारक खुलासा होत नाही.

पाणबुरुज काबीज केल्यावर मराठ्यांनी दोन तोफा डागून आवाज केले. त्यामुळे दुहेरी परिणाम घडला. एक म्हणजे ठाण्याचा सेनापती बतेलो काही तरी भानगड झाली. हे समजून हादरून गेला. दुसरे म्हणजे बदलापुरास आप्पासाहेबांना हे आवाज संकेताच्या जयदुंदुभि होत असे वाटून ते आनंदित झाले व ताबडतोब जिनबंदी करून गणनाक परवारी नावाचा ठाण्याचा माहितगार पुढे घालून रातोरात दिवट्या लावून निघाले.

लुई बतेलोने आवाज ऐकून सार्जंट मेजरच्या हाताखाली शिपायांची एक तुकडी पाणबुरुजाकडे कळव्याजवळ पाठवली. परंतु मराठ्यांनी ती सर्वच्या सर्व पकडून कैद केली. एकही माणूस जाऊ दिला नाही. नंतर शहाजणे वाजवीत ठाण्याच्या कोटाभोवती भुतासारखे त्या घोर रात्री उत्पात करीत फिरू लागले. किल्ल्याच्या शेजारचा एक फिरंगी मठही पेटवून दिला. हा प्रकार दि. २६ मार्च १७३७ रोजी घडला. एवढे होईतो सकाळपर्यंत आप्पासाहेब आपल्या फौजेनिशी कळव्यास येऊन पोहोचले. तोच लक्ष्मण राऊत सामोरा येऊन त्याने बुरुज फत्ते झाल्याची व आपले लोक साष्टीत शिरल्याची आनंदाची वार्ता सांगितली. तेव्हा आप्पासाहेबांनी स्वतः पायउतारा होऊन (घोड्यावरून खाली उतरून) स्वतःचे हाताने चिखलात पेंढा वगैरे घालू लागले व लोकांना हुरूप आणून सारी फौज लगट करून त्यांनी खाडीपलीकडे उतरवली व ते साष्टींत शिरले. (राम व वानरसेनेने सेतू पार केला.)

सेनापतीने–बतेलोने–पाहिले की साऱ्या साष्टीत मराठे शिरले आहेत व त्यांनी कोटास वेढा दिला आहे. माऱ्याच्या सगळ्या जागा रोखून धरल्या आहेत. साष्टीत शिरण्याचे सर्व मार्ग बंद केले आहेत. हा वेळपर्यंत ठाण्याच्या रयतेत हाहाःकार उडाला होता. बतेलोने आपले अधिकाऱ्यांबरोबर विचारविनिमय केला कीं आपल्यास मदत येण्याचे मार्ग बंद आहेत; परंतु मराठ्यांना मात्र वाटेल तेवढी मोठी फौज आणणे शक्य आहे. तसेच किल्लला अपुरा राहिलेला आहे म्हणून तोही लढवून फायदा नाही. तेव्हा तूर्त वसईस आसन्यास जावे, म्हणून २७ मार्च १७३७ रोजी बतेलोने दुपारी २ वाजता आपल्या शिपायांच्या सहा कंपन्या व ठाण्यातले पुष्कळ कुटुंब कबिले गलबतात घातले व तो उरणकडे निघून गेला. जाताना रेईस

बुरुजावरील लोकांना बुरुज लढविण्यास सांगितले. पण तो जाताच मराठ्यांच्या धाकाखाली बुरुजकरी त्याच रात्री गलबतात बसून पळून मुंबईस गेले. तोफाच काय परंतु निशाणेही सांभाळून नेण्याचे भान त्यास राहिले नाही. किल्ल्यात २८ तोफा, बुरुजावर १० तोफा, दुसऱ्या दिवशी २५ तोफा मदतीसाठी आल्या त्या मिळून ६३ तोफा मराठ्यांना मिळाल्या. तसेच मोठी लूटही मिळाली. अशा तऱ्हेने रक्ताचा एक थेंबही न सांडता ठाणे किल्ला व शहर मराठ्यांच्या ताब्यात पडले व वसईच्या मोहिमेचा श्रीमन्महा मोठ्या विजयाने पार पाडला.

दि. २९ मार्च १७३७ ला अप्पासाहेबांनी वसईभोवतालच्या प्रदेशात फौजा रवाना केल्या व ठाण्याच्या कोटाचे अपुरे राहिलेले बांधकाम पुरे करावयास सुरवात केली. किल्ल्याशेजारी सेंट मेरीचे एक देऊळ व सेंट ऑगस्टीनचा एक मठ होता. ते सर्व उध्वस्त करून किल्ल्याचे बांधकामास लावले. कोटाच्या आसपास इमारती, गढ्या, माड्या जमीनदोस्त करून चौफेर चांगले लांबवर मैदान करून सोडले व भोवतालचा तमाम प्रदेश किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्यात आणून सोडला. कल्याण-जवळचा पहिला पाणबुरुज मराठ्यांनी जिंकून मराठे आत घुसले. त्या बुरुजाचे नाव 'फत्तेबुरुज' असे ठेवले. या सर्व हल्ल्यात कामकाज केलेल्यांचा गौरव करून बक्षिसे देऊन खूष केले. तुकनाक परवारी नावाचा नामांकित शिपाई होता; त्याने रात्री साष्टीत शिरण्याचे वेळी खस्त केली म्हणून त्याला १६२॥ रु.चे एक सोन्याचे कडे बक्षिस दिले, अशी नोंद रोजकीर्दीत सापडते.

वसईकडील हालहवाल

पूर्वी सांगितल्याप्रमाणे वसईकडे जाणारी फौज माहूलीच्या किल्ल्याखाली रानात दब्यास बसली होती. २४ मार्च १७३७ रोजी गुरुवारी रात्री ती टोळी रानातून बाहेर निघाली व घोटवडच्याच्या अरण्यात आली. शुक्रवारी रात्री पुढच्या पल्ल्यास निघाले व पहाटे तुंगारच्या अरण्यात येऊन राहिले. नंतर रात्री शनिवारी दोन टोळ्या करून निघाले. एका टोळीत खुद्द शंकराजी केशव फडके व दुसऱ्या टोळीत बाळाजी केशव फडके व खंडोबा असे खासे लोक होते. रात्री प्रहर १० घटकांस ते राजावळीच्या ताऱ्याजवळ आले. तेथून खाडीस भरतीचे पाणी भरले नाही तोच तारा उतरून वसई बेटात शिरणे शक्य आहे असा विचार होता; परंतु मराठ्यांच्या चढाईची बातमी कळल्यामुळे फिरंग्याने चौक्या पहारे बसविलेले आढळले. तेव्हा गुप्तपणे आत शिरणे शक्य दिसत नाही असे पाहून शंकराजीपंताने अणजूरकराकडून एक गलबत जरूरीकरता तयार ठेवले होते, त्यात मोराजी शिंदे बाजीराव बेळोसें असे खासे शेदीडशे माणूस बसवून डाव्या बाजूस कोसभर नेऊन पलीकडील किनाऱ्यावर उतरविले. तेथून ते लपत छपत राजावळीचे चौकीदार

मारण्यासाठी येऊ लागले; पण ते तेथे येईपर्यंत चंद्र मावळला. खाडीत पाणी येऊन तारा बुडाला. चौकीवर त्यांनी काळोखातच मारामारी केली. त्या दंगलीतील शिपायांच्या बंदुकांच्या आवाजाने गोखरवे व दुसऱ्या मेटावरील लोक सावध झाले. तेव्हा कसेही करून आताच फौज खाडीपलीकडे नेलेली बरी असा विचार होऊन पोहून जाण्याचा निश्चय झाला. शंकराजीपंताने शेर शेर वजनाचे सोन्याचे कडे बक्षिस लावून १५० लोकांकडून खाडीत उडचा मारविल्या. त्यात कित्येकांच्या तलवारी गेल्या, कित्येकांची पांघरुणें बुडाली. तरी २५० माणसे पलीकडे पोहोचली. तेवढ्यात एक होडके मिळून त्यास बक्षिसाचे आमिष दाखवून दहा माणसांच्या फेऱ्या करवल्या व कष्टाने १५० माणूस आणखी पलीकडे पाठवले. त्यातच काही-जणांनी गावातून लाकडे आणून त्याचा तराफा कसाबसा बांधला व कष्टाने १००-२०० माणसे पलीकडे घालवली. परंतु कापाकापी होऊन व कष्ट करूनही शिडचा लावण्याचा बेत फसला. फक्त ३० चौकीदार माणसे मारली. नंतर दादरावर मारामारी करून चौकी उधळून लावून दादर मोकळा केला. संकेताप्रमाणे घोडे-स्वारांची फौज घेऊन चिमणाजी भिवराव व बरवाजी ताकपीर गोखरव्यास येऊन पोहोचले. दादर मोकळा असल्यामुळे काही अडथळा न होता दादरावरून वसईत शिरले (२७ मार्च १७३७ रविवार) व पापडी, माणीकपूर या गावात प्रवेश केला. तेथे थोडी न्याहारी वगैरे उरकुन शत्रूस आगराबाहेर येऊ दिले. शत्रू मैदानात येताच घोडदळ घालून तुडवावयास सुरवात केली, तेव्हा थोडी मारामारी होऊन कप्तान व त्याचे लोक किल्ल्यात पळून गेले. त्याच हुरपेसरशी मराठ्यांनी पुढे जाऊन बहादूरपुऱ्यानजीक पहिला मोर्चा घातला.

त्याच दिवशी शंकराजीपंताने राहिलेल्या फौजेच्या दोन टोळचा करून सोपाऱ्यावर चाल केली. त्यास ३ बुरुज होते. थोडचा वेळातच फिरंगी बुरूज सोडून पळून गेले. तेंथे १३ तोफा मिळाल्या. मराठ्यांच्या आवईने सोपारे तमाम ओस होऊन गेले.

आगाशी

सोपाऱ्याहून मराठी फौजा अर्नाळचास गेल्या. परंतु ते स्थळ सोपे नव्हते. कारण एक तर अस्सल जंजीरासारखे. गलबताचा सरंजाम नव्हता व तोफाहि नव्हत्या; म्हणून मराठे आगाशीस गेले. तेथील माडीवर बरवाजी आपले स्वार घेऊन चालून गेला. तेव्हा शत्रूने गोळे टाकले; परंतु त्यांनी मराठ्यांची हाय खाऊन ते तारवांत जाऊन बसले. माडी नजीक दोन तारवे होती, ती मराठ्यांनी काबीज केली व चौक्या बसवून बरवाजी बहादूरपुऱ्यास गेला व तेथील मोर्चा उठवून बहा-दुरपुरा पाठीशी घेऊन एक माडी होती तिचे आसऱ्याने मोर्चा घातला. मोर्चा

बसवीत असता शत्रूने कोटावरून तोफांचा सारखा मार धरला. त्यांत मराठ्यांचे दोन ठार झाले. एकाचा हात उडाला व दुसरा उडूनच गेला. तरी मराठे तेथेच मुंडी देऊन बसले. (२८ मार्च १७३८) तीन दिवसात म्हणजे ३१ तारखेपर्यंत मराठ्यांनी एकूण तीन मोर्चे घातले. शत्रूहि आग ओकू लागला. या ठिकाणी मराठ्यांचा अंदाज फसला. या वेढ्यात त्यांना मनुष्यबळ, व सरंजामाच्या अडचणी उभ्या राहिल्या; तसेच शत्रूला धारावीकडून मदत मिळत होती म्हणून शंकराजीपंताने आहे त्या साधनात भागवून जवळपासची ठाणी हाती आली तर पहावी असा बेत केला.

अर्नाळा काबीज–अर्नाळ्याचा किल्ला एक जंजिरा आहे. अर्नाळा काबीज करणे आवश्यक होते; कारण अर्नाळा हाती आला तर सर्व खाडी ताब्यात राहण्यासारखी होती व शत्रूच्या सागरी हालचालींना पायबंद घालता आला असता. म्हणून मराठ्यांनी अर्नाळा काबीज करण्याचा बेत केला. गंगाजी नाईकाने रयतेत सूत्र चालवून फोडाफोड करून ठेवली. बोळींजचा गवराजी पाटील म्हणेल त्या अटी शंकराजीपंताने मान्य करून त्याज जवळून गलबतांचा सरंजाम करून घेतला. नंतर शंकराजी पंताने अणजूरकर, बाजीराव बेलोसे वगैरे लोकांबरोबर ४०० सैनिकांची टोळी अर्नाळ्याच्या लागावर पाठविली. बोळींजहून गलबते येण्यास जरा विलंब लागला. परंतु शंकराजी पंताने घाई करून रात्रीच गलबतांत लोक भरून खाडीतून अर्नाळ्यास लागला; व तत्काळ झडप घालून अर्नाळा काबीज केला. दि. २८-३-१७३७ शंकराजीपंताने बाजीराव बेळोसे यास ४०० लोकांसह तेथे ठेवून तो पापडीच्या तळास परत आला. थोडेच दिवसांत तेथे चिंतामण शिवदेव व ३।४ शे माणूस आणखी ठेवले. नवीन मेढा घालून पंचवीस तीस गलबते व महागिऱ्या सेवेत घेऊन ४०।५० दर्यावर्दी चाकर तयार केले व कोट पक्का करण्याचे उद्योगास लागला.

वेसाव्यावर हल्ला–किल्ला लहानसाच परंतु मढ बेटाजवळ ही साष्टीतील एक नाक्याची जागा म्हणून हे ठाणे जिंकल्याखेरीज साष्टीला बळकटी नाही; म्हणून ही कामगिरी अप्पासाहेबांनी होनाजी बलकवडयाकडे दिली. त्याने २९ मार्चला हल्ला केला; पण शत्रूने तो मारून काढला. मराठ्यांचे ४०।५० लोक जखमी झाले व काही मेले. ७ मे रोजी मराठ्यांनी वेसाव्यावर निकराचा एल्गार केला. सकाळी ७ ला मराठे चालून गेले. मोठ्या शौर्याने शिडया लावून वर चढले. परंतु शत्रूने निकराने प्रतिकार केला. बंदुका–तोफांनी आग ओतून मराठ्यांना भाजून काढले. फार लोक मेले व मराठ्यांना फिरुन माघार घ्यावी लागली. दोनदा मोड झाला तरी २० जूनला मराठे २००० लोकांनिशी पुन्हा तुटून पडले हातघाईची लढाई मध्यरात्रीपर्यंत चालली. परंतु मराठ्यांना दैव अनुकूल नव्हते.

Scanned with Ca

वांद्रयाचा वेढा–२९–३० मार्च रोजी मराठ्यांनी वेसाव्याप्रमाणे वांद्र्यास शिड्या लावण्याचा प्रयत्न केला; परंतु फिरंग्यांनी तो मारून काढला. या प्रयत्नांत मराठ्यांचे फार लोक जखमी झाले व मेले. एलगार फसल्यावर मराठे वांद्र्यास वेढा घालून बसले. ४ तारखेपर्यंत मराठ्यांचे मोर्चे तयार होत होते आणि शत्रु तोफेचे गोळे टाकीतच होता. मराठ्यांनी बराच प्रयत्न केला; पण शत्रूला फिरंगी व इंग्रजांची मदत आल्यामुळे मराठे वेढा उठवून परत फिरले. (२५ मे १७३७). परंतु चिडून आसपासची फिरंग्यांची चर्चेस उध्वस्त करून टाकली.

बेलापूरचा वेढा :–ह्या वेढा वासुदेव जोशाचा थोरला भाऊ नारायण जोशी याने ३१ मार्चलाच बसविला होता. १ एप्रिलला ३०० धारकऱ्यांच्या टोळीने हल्ला केला. त्यांनी मारामार खूप केली; परंतु किल्ला हाती आला नाही. परंतु शत्रू सावध झाला. तेव्हा शत्रूला कुमक येण्यापूर्वीच जोरदार प्रयत्न करावा असे ठरून ३ एप्रिलला हल्ला ठरला; पण झाला की नाही याची नोंद सापडत नाही. परंतु ७ एप्रिलला गलबतातून शत्रूला मदत आली, तेव्हा नारायण जोशाने मार धरला, तेव्हा कोटाजवळ १००।१२५ शिपाई उतरले व कोटातूनही ५० शिपाई बाहेर आले. निकराची झुंज झाली. शत्रूची ४।५ माणसे व एक कर्णेकरी ठार झाला. मराठ्यांची ४।५ माणसे जायबंदी झाली. या अवधींत फिरंग्यांची कोटातील बायकामुले गलबतांत बसली व निघून गेली. दुसरे दिवशी शत्रूने कोटाबाहेर पडून हल्ला केला. मराठ्यांनी फिरंग्यांचे पाणी तोडले होते. म्हणून त्यांना बाहेर यावे लागले. मराठ्यांनी सुरुंग लावून कोटच उडवून लावायचे ठरवले व उद्योग सुरु केला. फिरून एक दिवस मोठे झुंज झाले. सुरुंग कोटाजवळ येत आहे असे पाहून नाइलाजाने २६ एप्रिलला किल्लेदाराने तहाचे बोलणे केले. नारायण जोशाने हे बोलणे कालहरणाचे जाणून साफ नाकारले. २८ तारखेस किल्लेकरी कबिल्यासह किल्ला खाली करून गलबतांत बसून निघून गेला व नारायण जोशाने मराठ्यांचे जरीपटका निशाण किल्ल्यावर लावले.

(जोगेश्वरी) जिवधन काबीज :– शंकराजीपंताने बहादुरपुऱ्याजवळ मोर्चा बसविला होता. वसईभोवतालची शत्रूची निरनिराळी ठाणी कबजात आणून वसई सगळीकडून आवळीत आणण्याची योजना चालविली होती. शंकराजीपंताने थोडी फौज देऊन बरवाजी ताकपिरास जिवधनचा किल्ला काबीज करण्यास पाठवले. जिवधन किल्ला डोंगरी असून वसईपासून उत्तरेस १०।१२ मैलावर होता. किल्ल्यात पूर्वापार पांडव-कृत्यासारखी लेणी वगैरे असून जीवधन देवीचे जागृत स्थान असल्याची ख्याती होती. ही टेकडी नावऱ्याची असल्यामुळे फिरंग्यांनी कोट बांधून व शिबंदी ठेवून ते ठाणे बळकावले होते. बरवाजीने रातोरात जाऊन हल्ला केला व किल्ला फत्ते केला. शत्रूचे २०।२५ माणूस मेले, १०।१२ कडेलोट झाले व ४०।५० पळून गेले.

मांडवी काबीज : मांडवी ठाणे तुंगार टेकड्यांच्या उतरणीजवळ वसईजवळ सुमारे १५ मैलावर आहे. ३ एप्रिल तारखेस बरवाजीने मांडवीस वेढा दिला. ११ एप्रिलला केशव सजणानी नावाचा भिवंडीचा ठाणेदार होता; त्याने एक नवीन गोलंदाज बरवाजीकडे पाठवून दिला. १५ तारखेपर्यंत मराठ्यांनी मार चालू ठेवला. त्या माऱ्यामुळे मांडवी जेर झाली व तहाचे बोलणे लावले. मराठ्यांनी सर्व फिरंग्यांना गलबतात बसवून जाऊ देणे कबूल केले. परंतु ते जाऊ लागले तेव्हा शंकराजीपंताची एक टोळी आली. तिने त्यांच्यावर हल्ला केला, तेव्हा फिरंग्यांनी बंदूका उचलून बार केले. त्यात शंकराजी पंताचे दोन लोक ठार झाले. परंतु फिरंगी गलबतातून निघून गेले. मांडवी काबीज झाली.

टकमक काबीज–माहीमच्या नैऋत्येस १५ मैलावर असलेले हे ठिकाण पंताजी मोरेश्वराने हल्ला करून काबीज केले.

सायवान काबीज–हे मांडवीजवळचे ठाणे फार बळकट होते. २१ एप्रिलला मराठ्यांनी वेढा दिला व १३ दिवसात ते जिंकले. हे बळकट ठिकाण सुलभ रीतीने काबीज होण्याचे कारण म्हणजे एक भेद्या फिरंगीच सामील झाला होता. त्याच्या स्त्रीवर जुलुम झाला होता. त्याचा सूड घेण्यासाठी तो जाऊन मूर बनला व मराठ्यांच्या नोकरीत शिरून त्यानेच माहितगारीने मराठ्यांच्या हालचाली करविल्या.

सांताक्रूझ काबीज:–हे ठाणे बांद्र्यांच्या उत्तरेस २।४ मैलावर आहे. ते बळकट असून तेथे तोफा व दोन शिपाई कंपन्या होत्या. विठ्ठलपंताने या ठाण्यावर हल्ला करून दोन दिवसात ते घेतले. दि. ३० एप्रिल १७३७.

मनोर काबीज–तांदुळवाडी जिंकल्यावर दुसरे दिवशी बरवाजी ताकपीर, आवजी कवडे वगैरेंनी मनोरला ६ मे १७३७ ला वेढा दिला. १९ तारखेस किल्ल्याने कौल घेतला. परंतु २९ गलबते व ६ शिबाडे एवढी माणसांची व दारुगोळ्याची कुमक आली. तेव्हा मराठ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. फार मोठी झटापट झाली. दोन्हीकडली बरीच माणसे जखमी झाली. शेवटी फिरंग्यांचा कप्तान पळून जात असता मराठ्यांनी त्यांना अतोनात त्रास दिला. हे ठाणे २३ मे १७३७ ला ताब्यात आले. नंतर लगेच मराठ्यांनी धारावीस वेढा घालून ठाणे बसविले; परंतु फिरंग्यांनी मोठ्या जमावाने धारावीवर हल्ला करून मराठ्यांना दूर हुसकून दिले. मराठ्यांनी जोराचा प्रतिकार केला; पण काही चालले नाही. मराठ्यांकडील ४०।५० माणसे ठार झाली व काही जखमी झाली. या लढाईत अणजूरकर मंडळीपैकी पुष्कळ लोक मेले वा जखमी झाले.

वसईवर पहिला हल्ला, ३० मे १७३७–पावसाळा जवळ असताना दोन्ही पक्ष हल्ले थांबवतात व छावण्या घालून राहतात. परंतु प्रतिपक्षाला चकित करून स्थळ

घेण्याची ही संधी असते. मराठ्यांनी याच मसलतीचा उपयोग करून पाहिला. ३० मे ला मराठ्यांनी एकदम वसईच्या तटाला शिड्या लावल्या; व वर चढण्याचा प्रयत्न केला. परंतु फिरंग्यांनी हल्ला यशस्वी रीतीने परतवला. त्यात मराठ्यांचे पुष्कळ लोक मेले व ३० जखमी सापडले. फिरंग्यांना ३२ शिड्या मिळाल्या.

वसईवर दुसरा हल्ला, २८ जून १७३७–पहिला हल्ला फसल्यावर शंकराजी पंत,गंगाजी नाईक, मोराजी शिंदे वगैरे लोकांनी भर आषाढाच्या मुसळधार पावसात ४००० मराठ्यांसह चालून जाऊन तटास शिड्या लावल्या. परंतु शिड्या चिखलात रुतल्या. चांगल्या लागेनात. शत्रू सावध होऊन त्याने वरून आगीचा प्रचंड मारा करून मराठ्यांना पळवून लावले. अर्धा तासच ही धुमाळी झाली; पण मराठ्यांचे फार नुकसान झाले. गुणाजीराव शिंदे, खंडोजी बागराव, दादाजी नाईक भंडारी व पुष्कळ नामांकित लोक मेले. फिरंग्यांना ३३ मुडदे सापडले. मराठ्यांनी किती वाहून नेले माहीत नाही. परंतु फारच माणसे निदान ५०।६० तरी मेली असावीत. पोर्तुगीझांचा एकही दगावला नाही असे पोर्तुगीझ इतिहासकार म्हणतात.

यानंतर पावसाळ्यामुळे मराठ्यांची हालचाल थांबली व बहुतेक फौज छावणी करून राहिली. अप्पासाहेबही पुण्यास १ जुलै रोजी परत गेले.

वसईवरील तिसरा हल्ला ४।९।१७३७

आप्पासाहेब परत गेले तरी वसई ताब्यात आली तर पावसाळ्यांतच येईल असे येथील मराठ्यांना वाटत होते. मग त्यापायी आणखी माणसे दुखावली तरी हरकत नाही असा विचार करून एकदा सोक्षमोक्ष करण्याच्या इराद्याने पेशव्यांना ह्याही विचार पटून त्यांनी आपला ठेवणीतला सरदार बाजी भिवराव टाकोटाक वसईस पाठवून दिला. ४ सप्टेंबर १७३७ रात्रौ किल्ल्यास शिड्या लावल्या. अंधार पडल्यावर ३००० सैनिक तटाजवळ आले. मागील दोन हल्ल्यांचा मराठ्यांना अनुभव होता. वरून हल्ला सुरू झाला की लोक घाबरतील. परंतु जीव तरी देऊ किंवा किल्ला तरी घेऊ या निश्चयाने लोक आणले होते. तेव्हा वरील ३००० लोकांपाठीमागे आणखी ३००० लोकांचे कडे घेऊन बाजी भिवराव उभा राहिला व हल्ल्यातून कोणी पळून जाऊ लागला तर त्याला कापून काढा असा हुकुम दिला. वाटल्यास त्याने हल्ल्यात जाऊन मरावे पण परत फिरता नये अशी ताकीद दिली होती. शिड्या लागताच फिरंग्यांनी तोफा, बंदुका, हातगोळे यांचा एवढा जबर मारा केला की मराठ्यांची माणसे पटापट मरू लागली. खुद्द बाजी भिवरावाला जखम झाली. मराठ्यांची ५००।६०० माणसे मेली व तेवढीच जखमी झाली. शत्रूची १५ एक माणसे मेली. मात्र शत्रूचा खासा पेद्रू दमेल हा जखमी झाला. मराठ्यांना एवढी माणसे खर्चूनही विजय मिळाला नाही.

माहीमचा वेढा (१७३७ आक्टो.)–पावसाळा संपताच शंकराजीपंताने माहीम व केळवे यास वेढा दिला. १ तारखेस नव्हेंबरला रामचंद्र अप्पा पटवर्धन सर्व तरतुदीनिशी पेशव्यांनी रवाना केला. रामचंद्रपंताच्या जमावात १५४ अरब कल्याणचे व इतर मिळून ३२५० माणसे होती. 'महादजीपंत केशव यांनी जातीने हत्यारास मिळाले व खस्त केली' या दिवशी (१७ नव्हेंबर) ७१८ जखमी झाले व दोन ठार झाले. फिरंग्यांचे ५ लोक ठार झाले. मराठ्यांनी अधिक कुमक आणवून मोर्चा पक्का केला. १२ डिसेंबरला पुन्हा चकमक झाली. २४ तारखेस प्रचंड लढाई झाली. शत्रू सामोरा आला. शिवाय वरून तोफा आग ओकीत होत्या. रामचंद्रपंत स्वतः कापाकापी करीत होते. एवढ्यात त्यास छातीचे वर चाटून एक गोळी गेली. या झुंजीत खुद्द महादजी केशव, वाघोजीराव खानविलकर, राजबाराव बुरुडकर, चिंतो शिवदेव, जनार्दन हरि व गणेश हरि वगैरे नामांकित लोक कोंडले जाऊन कामास आले. मराठ्यांची अशी दाणादाण झाली तेव्हा ते शेजारच्या शिरगाव लष्करात गेले. या लढाईत अशी परिस्थिती होण्याचे कारण कल्याणहून आणिलेल्या १५४ अरबांनी बेइमानी केली, असे शंकराजीपंताने पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

शिरगावचा वेढा– हा वेढा मराठ्यांनी दीर्घकाल चालविला. फार मोठी शिकस्त केली; परंतु शत्रूस ऐन वेळी कुमक आल्यामुळे यशस्वी झाला नाही. तेव्हा माहीम व शिरगावचे वेढे उठवून गेले. अखेरीस वेढा दिला. परंतु तोही यशस्वी झाला नाही. या सर्व विजयामुळे फिरंगी मात्र शिरजोर झाला व मराठे निराश झाले. एवढा हाहाःकार झाला असता अप्पासाहेब खाली येऊ शकले नाहीत; कारण ते खानदेशच्या स्वारींत गुंतून पडले होते. वासुदेव जोश्याने दि. २४-१२-१७३७ ला पत्रे लिहिली, 'लोकांनी धर सोडला, दशहत खाल्ली. कोणी तरी मातबर सरदार पाठवून द्यावा.' तेव्हा चिमाजी अप्पांनी प्रथम चिमणाजी भिवराव रेटरेकर यास फौज घेऊन पाठवले. तेव्हा अप्पासाहेबही निजामाचे प्रकरण मिटल्यावर १० फेब्रुवारीस कोकणकडे जलदीने निघाले. अप्पासाहेब स्वतः आल्यामुळे मराठी सरदारास धीर आला. अप्पासाहेब स्वतःच वसईस एकदम चालून जाणार होते; परंतु इतर सरदारांनी त्यांना ठाणे येथून सूत्रे हलवण्यास सांगितले. अप्पासाहेब आले आणि मराठ्यांनी आपले नशिब फिरवले. त्यांना हुरूप येऊन पुन्हा मराठ्यांनी विजयावर विजय मिळवण्यास सुरवात केली. प्रथम कामणदुर्ग घेतला. अर्नाळा मजबूत केला. वसई–साष्टीचा पूर्ण बंदोबस्त करून पावसाळा आल्यामुळे अप्पासाहेब परत पुण्यास आले. २९ मे १७३८. मात्र जाताना सर्व लोकांची समाधाने केली व पुण्यास गेल्यावरही शंकराजीपंत व गंगाजी नाईक वगैरे सरदार मंडळींना समाधानाची पत्रे लिहिली.

Scanned with Car

चिमाजी अप्पा यांची प्रकृति बिघडली होती. म्हणून आप्पासाहेबांना शंकराजीपंत व पिलाजी जाधव यांनी कोकणात पावसाळचांत राहू नका असे सांगितले व आग्रह केला; म्हणूनच आप्पासाहेब पुण्यास आले. तेथे ते ऑगस्ट अखेर-पर्यंत आजारीच होते. पुण्याच्या मुक्कामात असता “दोघे बंधू (बाजीरावसाहेब व चिमाजी आप्पा) फिरंगी यांची निशा एकदाच करावी. सालदरसाल शिबंदीचा खर्च फार पडतो. याकरिता सारीच फौज नेऊन फिरंगी खणून काढावा” अशी मसलत ठरली. तसेच वसईचे पंख दोन–एक गोवे व दुसरा दमण प्रांत. तिकडेही स्वाऱ्या पाठवून फिरंगी नष्ट करावा असे ठरले.

पावसाळचांत:–मराठे पूर्वी मनोरचे ठाणे पाडून टाकून पळून गेले होते. तेच ठाणे त्यांनी १७३८ च्या पावसाळचांत फिरून बांधावयास सुरुवात केली. त्यावर कॅप्टन परेरा याने येऊन हल्ला केला; त्यात तीस मराठे मेले. पण शत्रूचा खासा परेरा ठार झाला. या लढाईत फिरंग्यांना थोडी लूट व दोन घोडी मिळाली.

ठाण्यावर हल्ला–नव्हेंबर २५ ला पेद्रू डिमेलोने व्हाईसरायच्या हुकमाप्रमाणे ठाण्यावर हल्ला केला. त्याने गलबतांतूनच ठाण्याच्या कोटावर मार धरला. परंतु ठाण्याचा बंदोबस्त आप्पासाहेबांनी फार उत्तम केला होता. पेद्रूने ओहोटीच्या वेळी लोक किनाऱ्यावर उतरवण्याचा प्रयत्न केला. परंतु मराठ्यांनी धावून येऊन, गळा पडून, परिणाम जाणून मारामार केली व शत्रूला पिटून परत गलबतात घातले. २६ तारखेस गलबतातूनच गोळागोळी केली. दुसरे दिवशी पेद्रू डिमेलो मचव्यात बसून किल्ल्याच्या आसपास लागभाग पहात फिरत असता किल्यातून एक तोफेचा गोळा येऊन पेद्रूच्या अंगावर पडला व तो ठार झाला. विशेष म्हणजे त्याच्या बरोबरच्या इतर अधिकाऱ्यांना काही झाले नाही. हा एकटाच ठार झाला हा योगायोग. अशा तऱ्हेने फिरंग्यांच्या एका बहाद्दर सेनापतीचा अंत झाला.

दवण प्रांत–डहाणू जिंकले–नव्हेंबरमध्ये शंकराजीपंत फडके दवणात शिरले. बरोबर ८ हजार पायदळ व १० हजार घोडेस्वार घेऊन गेले. प्रत्येक ठिकाणी लुटालूट, जाळपोळ करून खत्तलवाडा नंतर उंबरगाव, नारगोळ व डहाणू ही ठाणी जिंकली व आगाशीस आला व नंतर त्याला अप्पासाहेबांनी माहीम घेण्यास पाठवले.

माहीमची आहुती–स्वत: अप्पासाहेब २३ डिसेंबर १७३८ ला मोठी थोरली फौज घेऊन फिरंगणात निघाले. त्यांनी घाटाखाली सायवान मुक्कामाहून शंकराजी पंतास निरोप पाठवला, माहीमास येतो. ३० डिसेंबरला माहीमच्या कसब्यात गाव मोडून शिरले व आपल्या सैन्याची छावणी ठोकली. बरोबर पिलाजी जाधव हे खासा सरदार होते. बरोबर १६००० घोडेस्वार, २४००० पायदळ, २० हजार पेंढारी, बेलदार, बाजारबुणगे, चाळीस हत्ती, दोन हजार उंट एवढा सरंजाम

होता. मराठ्यांनी कोटाभोवतालचा प्रदेश तोडून साफ करून बातेऱ्या लावल्या. ५ वेळा एलगार केला. परंतु शत्रू कडेकोट बंदोबस्तात होता. तेव्हा मराठ्यांनी बातेऱ्यावर तोफा चढवून कोटावर मार धरला. पांच बातेऱ्यात पंचवीस तोफा होत्या. एक तर फारच मोठी दिवाल तोड तोफ होती. तिने तटबंदी फुटू लागली. परंतु शत्रू ताबडतोब दुरुस्ती करी. तेव्हा मराठ्यांनी सुरुंग लावायचा ठरवले. सारा तटच उडवून साराच दिल्ली दरवाजा करावयाचे ठरवले. शिवाय किनाऱ्या-कडूनही शत्रूला मदत पोहोचू नये म्हणून मराठ्यांनी गलबतांचा काफिला उभा केला होता व बंदर रोखून धरले होते. मराठ्यांच्या तोफाच्या धडाक्याने मराठ्यांना शत्रू घाबरला. ठाणे न लढविता सोडून निघून गेला. या वेळी मराठी सैन्याने फिरंग्यांच्या सर्व वस्तू लुटून घेतल्या. एक वस्तू देखील जाऊ दिली नाही. नंतर केळवे व शिरगाव काबीज केले व तारापुरास वेढा दिला.

तारापुरचा वेढा– मराठ्यांनी किल्ल्यास वेढा देताक्षणीच बातेऱ्या बांधून काढल्या व तोफांचा भडीमार सुरू केला. परंतु फिरंगी रातोरात कोट बांधून काढी; तेव्हा सातव्या दिवशी सुरुंगाची योजना करून बुरुज उडवून द्यावयाचे ठरवले. या मोहीमेत बाजी भिवराव, रामचंद्र हरि, गुतेकर, बाळोजी चंद्रराव, मल्हारराव होळकर, राणोजी भोसले, गोविंद हरि पटवर्धन, बांडे, यशवंतराव पवार, तुकोजी पवार, व राणोजी शिंदे वगैरे खास लोक होते.

२४ तारखेस तोफांना बत्त्या दिल्या. आप्पासाहेब खाडीत एक माडी होती तेथे पहाटेसच जाऊन बसले. सोबत मल्हारराव होळकर यांचे पायास काही झाले होते म्हणून ते बसले. तसेच सुरुंगांनाही बत्त्या दिल्या. एकामागून एक सुरुंगाच्या धडाक्याने कोट फुटू लागला. हुजरातीच्या सुरुंगाने कोटास खिंडार पडले. फार मोठे भगदाड झाले. दुसरी लहान लहान खिंडारे पडली. ताबडतोब मराठे घुसण्याची गर्दी करू लागले. तेव्हा वरील फिरंग्यांनी गोळ्यांनी टिपायला सुरवात केली. तेव्हा मराठ्यांनी गर्दी करून मारामारीची शर्थ केली. मराठे काऊन चेऊन तुटून पडले. आप्पासाहेबांनी ही सर्व रणधुमाळी स्वत: पाहिली. ते अभिमानाने लिहितात–

"आमच्या लोकांच्या मर्दुमकीची सीमा नाही. मराठ्यांची फत्ते झाली. शत्रूची एकूण एक माणसे कैद केली. चार हजार लोक कैद झाले. पाचशे घोडे मिळाले. या लढाईत किल्लेदार लुईस व्हेलेझो लढता लढता मरण पावला. सर्व अधिकारी व त्यांचे कबिले पकडले."

चिमाजी अप्पांचे स्त्री-दाक्षिण्य–आप्पासाहेबांनी सर्व स्त्रियांना त्यांच्या इतमाताप्रमाणे व दर्जाप्रमाणे वागवून त्यांना यत्किंचितही उपसर्ग पोचू नये असा कडक हुकूम काढला. किल्लेदाराच्या बायकोचे आपल्या नवऱ्यावर फार प्रेम होते. तिने नवऱ्याचे प्रेत त्याच्या इतमामाप्रमाणे पुरण्याची परवानगी मिळावी म्हणून

श्रीमंत चिमाजी अप्पासाहेब पेशवे

काकुळतीने अर्ज केला. तो आप्पासाहेबांनी उदारपणाने मान्य केला. या दिलदार वृत्तीबद्दल पोर्तुगीझ इतिहासकारांनी आप्पासाहेबांना धन्यवाद दिले आहेत.

या हल्ल्यात मराठ्यांकडील बाजीराव पेशव्यांचा अत्यंत विश्वासू व इरेचा सरदार बाजी भिवराव रेटरेकर याचा मृत्यू झाला. लढत असता गोळी लागून त्याला वीर मरण आले. बाजी भिवराव व त्याचा भाऊ हे बाजीराव साहेबांचे भावासारखे बालमित्र होते. त्यामुळे बाजी भिवरावाच्या मृत्यूमुळे 'गड आला पण सिंह गेला' अशी अप्पासाहेबांची स्थिती झाली. त्यांनी बाजीरावसाहेबांस लिहिले "तारापूर घेतले. फत्ते जाहली; परंतु बाजी भिवराव यास गोळी लागली. ठार झाले!" त्यांनी बाजी भिवरावाच्या आईस लिहिले, "आमचा भाऊ गेला. मीच तुमचा आता बाजीराव. मजवर दृष्टी द्यावी."

अशेरी काबीज–तारापूरनंतर ३ फेब्रुवारी १७३८ ला अप्पासाहेबांनी बंदुकीची गोळी न चालविता घेतले असे शकावलीत लिहिले आहे. (पेशवे दप्तर भाग २२) "माघ शु ७ सह ८ (४-२-१७३९) रविवारी खबर आली की अप्पा साहेबांनी अशेर किल्ला फिरंगीयांचा घेतला. किल्लेदाराची माणसे तारापुरात सापडली होती. त्यामुळे त्यांनी किल्ला दिला असे" तेव्हा तारापुरच्या वेढ्यांतील सरदारांच्या कबिल्यांना अशेरीस नेऊन त्यांचेकरवी फोडाफोड करवून किल्ला गोळी न वाजविता हस्तगत करून घेतला असे दिसते.

वज्रयोगिनीचा कौल–नंतर आप्पासाहेबांच्या १० दिवसांच्या हालचालीची नोंद नाही; परंतु साष्टीच्या बखरकारांनी लिहिले आहे की अप्पासाहेब वज्रेश्वरीस गेले व तेथे देवीला नवस केला व खुद्द येऊन वसईवर मोर्चे लावले. या मधल्या काळात रामजी महादेव बिवलकर व खंडोजी माणकराने वेसावे काबीज केले. १०।११ फेब्रुवारी १७३९.

धारावी काबीज–वेसाव्यानंतर तुंबाजीपंत व रामजी महादेव बिवलकरांनी

Scanned with Car

धारावीस वेढा दिला. तुंबाजीने जमिनीवरून व रामाजी महादेवाने पाण्यातून गाय मुखाकडून मोर्चा लावला. रोज गोळाबारी चालू होती. शेवटी ६ मार्च १७३९ ला धारावी काबीज केली.

गोव्याचा ग्रास--आप्पासाहेबांनी एकाच वेळी उत्तरेस दमण व दक्षिणेस गोवे दोन्हीकडून फिरंग्याला आवळण्याची योजना केली होती. त्याप्रमाणे दमण भागातील महत्वाची ठाणी घेतली व दक्षिणेकडे कोल्हापूरकर व सावंतवाडीकर यांना सामील करून घेतले होते. त्यांचेकडून गोव्यावर स्वारी करून यशस्वी करवली. मराठ्यांनी फिरंग्यांना अत्यंत क्रूरपणाने दहशत गोव्यात बसवली. कारण मराठ्यांचे माहीमचे हल्ल्यात सापडलेले कैदी किल्लेदाराने गुरासारखे कापून काढले होते. म्हणून मराठ्यांनी त्याचा पुरा बदला गोव्यात घेतला. त्यांनी फिरंगी कैद्यांची काही मुंडकी व कापलेली नाके मुद्दाम राचोळला टांगली. गोव्याचे व्हाईसरायने यासंबंधी तक्रार करताच " धर्मयुद्धाचे नियम आम्हास शिकवण्याचा तुम्हास अधिकार नाही. ही क्रूरता तुम्हीच आम्हास शिकविली आहे " असे उत्तर पाठवले. तेव्हा गोव्याचे व्हाइसरॉयने तहाचे बोलणे लावले. कारण साष्टी गेली, बारदेश गेले, दमण गेले; फक्त गोवे राहिले. फिरंग्यास आपले मरण दिसू लागले. मराठ्यांनी तहास अनुकुलता दाखवली व वसई खाली करून मागितली. व्हाइसरॉयने कबूल केले; वसईचे किल्लेदार मार्तिन सिलवेरास वसई खाली करून निघून जा म्हणून हुकूम केला. परंतु त्या बहाद्दराने तो हुकुम नाकारला व कळविले " आम्ही सेवाचोर झालो नाही. मी वेढ्यात मरणार हे उघड दिसते; पण मी तसाच मरू इच्छितो. मी जिवंतपणे हे ठाणे मराठ्यांना कधीही देणार नाही. " व्हाईसरायने तह केला. मराठ्यांना ७ लाख रु.रोख आणखी बऱ्याच गोष्टी द्याव्यात, वसई ताब्यात द्यावी, वगैरे. परंतु वसई जिंकणे भाग होते.

वसईची पूर्णाहुती

आप्पासाहेब आले ते फिरंगाण समूळ उखळून काढण्यासाठीच. याकरिता दमण, वसई, गोवे या तिन्ही मुलखात एकाच वेळी फौजा पाठवून त्यांनी धुमाकूळ सुरू केला होता. सध्या मराठ्यांच्या फौजा फिरंगणात जातील तेथे जयश्री हात जोडून उभी होती. ठाण्यामागून ठाणी हिसकावून मराठे शेर झाले होते आणि चढत्या तेजाने आणि वाढत्या उत्साहाने त्यांची युद्धे रंगू लागली होती. एकीकडे दमण प्रांत जाळून पोळून बेचिराख झाला. दुसरीकडे साष्टी बारदेश जिंकून झाला. अशा तऱ्हेने फिरंग्यांचे दोन्ही पंख तोडून आता खुद्द वसई प्रांतात आप्पासाहेबानी उद्योग चालविला होता. फिरंगाणात उतरल्यापासूनच त्यांनी माहीम जिंकले, तारापूर काबीज केले, अशेरी हिसकावून घेतली. अशा क्रमाने आठदहा मातबर

ठाणी होती, ती जिंकून ते आता वसईचा सोक्षमोक्ष करण्यास सहा फेब्रुवारी सतराशे एकोणचाळीसला (६-२-१७३९) आप्पासाहेब आपली सारी फौज घेऊन जातीनिशी वसईचे सत्त्व पाहण्यास येऊन बसले.

या अपरंपार सेनासंभारात पेशव्यांची ठेवणीतली सारी वीर-रत्ने एकत्र झाल्यासारखी दिसत होती. मातबर लोकांत पिलाजी जाधव, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, राणोजी शितोळे, गणपतराव मेहेंदळे, रामचंद्र हरी पटवर्धन, बापूजी भिवराव, कंठाजी बांडे, विभूतराव सतकर, शंकराजीपंत फडके, कर्णाजी शिंदे, खंडो चिमणाजी, रायाजी शंकर, आप्पाजीराव व गणोजीराव खानविलकर, रुद्राजी शिंदे, विठोजी कदम, जीवाजिराव विचारे, सुभानजी नाईक, गंगाजी नाईक व त्याचे भाऊ, गणेशजी नाईक, नामाजी देसाई, भानजी देसाई, गंगाजी देसाई, बबनजी प्रभू, वगैरे नामांकित लोक होते.

६ फेब्रुवारीला आप्पासाहेब वसईस येताच दुपारी तीन वाजल्यापासून कामास सुरवात केली. पहिले काम मोर्चे देणे. बहादूरपूरच्या मेढयातून पुढे येऊन कोटावरील बंदुकीच्या टप्प्यात मोर्चे घालावयाचे काम सुरू केले. तेथे प्रथम निशाणे रोवली. तेव्हां फिरंग्यांनी तोफा सुरू करून आग ओकू लागले. मराठ्यांवर मार धरला. तेव्हा लोक जखमी होऊ लागले तरी न डगमगता, भराभर सामान तयार करून आगीच्या खाईत जळत राहून ते काम इतक्या निश्चयाने, शिस्तीने आणि जलद चालविले की ते पाहून शत्रूने देखील आश्चर्याने तोंडात बोटेच घातली. फिरंग्यांचा वरिष्ठ अधिकारी हा सर्व प्रकार तटावर उभा राहून पहात होता. शत्रूचे आश्चर्य वाढायचेच होते; कारण मराठ्यांनी दुपारी तीन वाजल्यापासून हजारो माणसे लावून मोर्चेबंदीच्या कामास सुरवात केली, ती दुसरे दिवशी मोर्चे बांधून झाल्यावर थांबले. रात्रभर अंधारात दिवाही न लावता त्यांनी मोर्चाचे काम केले; त्यामुळे दिव्याची खूण नसल्यामुळे शत्रूला तोफाही डागता आल्या नाहीत.

वसईस हे मोर्चे बसले ते सर्व उत्तरेच्या बाजूने; बाकी तिन्ही बाजूस दर्या. तेव्हा मराठ्यांनी अडतीस तोफा चालू करून कोटावर मार धरला. तेव्हा फिरंग्यांनीही तटावर लांब पल्ल्याच्या ११० तोफा चढवून जाबास जाब देऊ लागले. मराठ्यांच्या तोफांचा मारा किल्ल्याच्या भिंतींना असलेल्या आधाराच्या लादण्यावर होता. त्यामुळे खूप पडझड होई. परंतु किल्लेदार ताबडतोब दुरुस्ती करून टाकी. म्हणून मराठ्यांनी धमधमे बांधून त्यावरून कोटात मार करावयाचे ठरवले. खालून तोफांनी भिंतीवर व धमधम्यावरून जेजालदारांनी मारा सुरू केला म्हणजे त्यांच्या आश्रयाने शत्रूचे लक्ष दोन ठिकाणी वेधून, सुरुंगाचे काम करता येईल. प्रथम दोन धमधमे बांधण्यात आले, ते जवळजवळ तटाएवढे उंच होते. नंतर लगेच तीन धमधमे एक २०० हातावर, दुसरा १०० हातावर, तिसरा ६० हातावर,

चौथा ३० हातावर व पाचवा कोटाजवळ. त्यावर करोल, बरकंदाज व जेजाल, बारदार बसवून मार धरला. हे उभे करताना शत्रूने आग ओकून फार माणसे ठार केली व जखमी केली. परंतु सारी आग पिऊन हिंमत न सोडता साहस केले.

शत्रू आग ओकीतच होता; पण वसईच्या बंदरातूनही मोर्चावर गोळे टाकीत होता. त्यावर उपाय करावा म्हणून आप्पासाहेबांनी ९ मार्चला हुकूम दिला की धारावीच्या किनाऱ्यावर येऊन शत्रूच्या आरमारावर गोळे टाकावे. वसईच्या बंदरात शत्रूची गलबते आहेत ती फोडून टाका. परंतु हे फारसे जमले नसावे; कारण धारावीजवळून गोळा गलबतावर पोहोचत नव्हता.

नादिरशहाचे अरिष्ट : एवढ्यात उत्तरेत नादिरशहा मोठ्या फौजेनिशी येऊन उतरला तेव्हा बाजीरावसाहेबांची मन:स्थिती पेचात सापडल्यासारखी झाली. मोठी फौज वसईकडे गुंतून पडलेली आणि नादीरशहास तोंड देण्यास जाणे तर जरूर अशा कात्रीत ते सापडले. तेव्हां त्यांनी आप्पासाहेबांस वसईचा कार्यभाग लवकर उरका असे पत्र लिहिले. अप्पासाहेबांनी उत्तरेकडील फौज करून घ्या व वसई संपवून येतोच, असे कळविले व दररोज वर्तमान मिळवण्यासाठी डाक बसविली. आप्पासाहेबांस ह्यामुळे मोठी अडचण उपस्थित झाली होती. तरी काही फौज मोकळी होताच त्यांनी ती साष्टी-वसईतून काढून बाजीरावसाहेबांकडे पाठविली व धारावी सर झाल्यावर त्यांनी गोविंद हरीची रवानगी बाजीरावसाहेबांकडे करून दिली.

सुरुंगाची आतषबाजी :– मार्च महिन्यात मराठ्यांनी सुरुंग तयार करण्याचे काम चालू केले. पण हे अत्यंत कठीण होते. जिकडे तिकडे वाळूची जमीन. दोन हांत खणले तर पाणी लागत होते. जमीन रेताड असल्यामुळे सुरुंग कोटास लागणे कठीण होते. परंतु तट पाडून भगदाड करून किल्ल्यात शिरणे कठीण होते. तेव्हा सुरुंगाशिवाय उपाय नाहीं असे पाहून मराठ्यांनी सुरुंगाचेच काम चालविले. "सुरुंग खंडोन दोन बाजूंनी खांबावर तक्तपोशी, त्यावर दोन अडीच हात रेती, गरनाळेसही फुटेना असे करून १२-१४ सुरुंग चालविले. मराठ्यांचे सुरुंग चालू झाल्यावर मात्र शत्रूने मारा करून ते मोडण्याचा चंग बांधला. सुरुंग कोटाजवळ जात तो फिरंगी वरून उफराट्या तोफा डागून सुरुंगावर गोळे मारू लागला. वरून लाकडे, चंद्रस् गंधक टाकू लागला, तापलेले पाणी टाकू लागला. प्रत्येक सुरुंग पाच वेळा मोडला. परंतु मराठ्यांनी ते पुरे केलेच. दोन्हीकडून तोफांची आतषबाजी चालूच होती. त्यात एप्रिलच्या सुरवातीस फिरंग्यांचा सेनापती मार्तिब सिरवेल एप्रिल ४ तारखेला तटावर पाहणी करीत असता मराठ्यांचा गोळा लागून ठार झाला. ह्यानेच आपल्या व्हाइसरॉयला जबाब दिला होता, 'मी लढून मरेन; पण किल्ला खाली करून देणार नाही.' आता तो युद्धात मेला.

शेवटी एप्रिल अखेर मराठ्यांचे सुरुंग किल्ल्यास पोहोचले. राणोजी शिंदे यांनी पाच सुरुंग एका बुरुजास लावले. ' यशवंतराव पवार यांनी व राणोजी शिंदे यांनी दोन लहान सुरुंग एका बुरुजास लावले. त्याच्या उजव्या बाजूस मल्हारराव होळकर यानेही आपले दोन सुरुंग पोहोचविले. असे सर्व सुरुंग झाल्यावर १० सुरुंग एकदम उडवून झाले म्हणजे हल्ल्यास उठावयाचे ठरले. धडाका उडताच एकदम सापडेल तेथून घुसून एलगार करावयाचा व जागा फत्ते करावयाची असे ठरले. (१ मे १७३९) नगाऱ्याच्या इषाऱ्याबरोबर सुरुंग उडवायचे.

दुपारी ३ च्या सुमारास एकाएकी धडाका होऊन रमेदीचा बुरुज उडाला. सुरुंगास बत्त्या दिल्या. काही सुरुंग उडाले, काही उडत होते, काही उडावयाचे होते. तोच लोकांनी उतावळी करून कोटावर चालून गेले तो त्याच बाजूचे सुरुंग उडाले. त्यामुळे मराठेच जाया झाले; काही ठार झाले. दुसऱ्या बाजूला तीच परिस्थिति झाली. हे होण्याचे कारण काही सुरुंगांना सर्दी झाली होती; म्हणून त्यांना उडावयास विलंब लागला. परंतु किल्ल्याला मोठे भगदाड पडले. एकदम वीस माणसे शिरण्याएवढे भगदाड पडले. धरणाच्या पाण्याच्या लोंढ्याप्रमाणे मराठे निकराने आत शिरू लागले. शत्रू जय्यत तयार होता. त्याने आगीचा मार एवढा केला की पुसता सोय नाही. जणू काही आगीचा पाऊस पाडला.

सॅबॅशिअम बुरुजावरील सुरुंग उडाले तेव्हा मोठे खिंडार पडले. लोक घाई करून घुसू लागले तेव्हा दुसरे सुरुंग उडाले आणि माणसेच घारीसारखी उडून कित्येक मेले. कित्येक दडपले गेले. कित्येकांच्या चिंधड्या झाल्या. सकाळी ६ पासून दुपारी ३ पर्यंत मराठ्यांनी १७ एलगार केले. परंतु फिरंग्यांनी ते निपटून काढले. संध्याकाळ झाली. लोक नाउमेद होउन परत फिरले.

परंतु आप्पासाहेबांना त्वेष आला होता. त्यांनी अधिक तयारी केली. लोकांना बक्षिसे दिली. त्यावेळी हल्ला करणारास जाणाऱ्यांना म्हणतील ते कबूल केले. मेच्या २ ऱ्या तारखेस गुरुवारी सुरुंगात दारुचे बुदले ओतले. बत्ती ओतली व लोकांस अप्पासाहेबांनी ताकीद केली की पडेल तो पडेल; राहील त्याने निशाण कोटावर चढवावे. सुरुंगाला बत्ती दिली. तो उत्तम उडाला. निम्मा बुरूज ढासळला. मराठ्यांनी निर्वाण करून निशाणे नेली. तेव्हा तेथे घनचक्कर झाली त्याला सीमा नाही. मराठे फिरंगी यांची सरमिसळ होऊन हातघाईची लढाई झाली; प्रथम शत्रूने चांगला प्रतिकार केला. पण मराठे झुंडीने आत येऊ लागले तेव्हा मात्र शत्रूची नुसती कत्तल झाली. बहुतेक फिरंग्यांना कंठस्नान घडले. १३० लहान मोठे अधिकारी ठार झाले. मराठ्यांची हानिही तशीच जबरदस्त होती. दत्ताजी भांडवलकर, कर्जेकर, हेसु आठाव, पुणेकर, सखो गणेश सरनाईक, दुर्जनसिंग राजे मांडवीकर यांचा कारभारी जसोजी, बाजीरावसाहेबांचा जमातदार कुंवरसिंग, आणजूरकरांपैकी मुरारजी नाईक, वगैरे नामांकित लोक ठार झाले.

Scanned with Ca

त्या रात्री किल्लेकऱ्यांनी बसून विचार केला की यापुढे किल्ला राखणे अशक्य आहे. बुरुज ढासळले आहेत, तट कोसळले आहेत. कुमक येण्याची आशा नाही. असा विचार करून कौल घेण्याचे ठरले. ४ तारखेस उजाडता मराठ्यांची हालचाल दिसू लागली. हल्ल्याचे लोक धावून येऊ लागले. तोच सॅबॅशिअमच्या खिडारात तहाचे पांढरे निशाण फिरंग्यांनी उभे केलेले पाहून ते चकित झाले. अर्थात हल्ला व लढाई तहकूब झाली. फिरंग्यांनी आपला एक माणूस मराठ्यांच्या तळात अप्पासाहेबांकडे पाठवून "तहाचे बोलणे करावयास येतो, परवाना द्या." म्हणून सांगितले. मग तसा रीतसर परवाना मिळून पेद्रो बार्रात नावाचा फिरंगी सरदार तहाची बोलणी करण्यास आला. तहात इतर ११ अटी होत्या. ७ दिवसांत फिरंग्यांनी ठाणे खाली करून द्यावे ही प्रमुख अट होती. त्या मान्य होऊन आप्पासाहेबांनी किल्ला ताब्यात घेतला. बुरुजावर वीस वीस शिपाई ठेवले व सॅबॅशिअम भगदाडातून फिरंगी लोक निशाणे सोडून बँड वाजवीत बाहेर पडले व गलबतात बसून रवाना झाले.

अशा तऱ्हेने सतत १८ वर्षे चालू असलेला अणजूरकर, कावळे, फडके, रामचंद्र पंत व वासुदेव जोशी वगैरे कल्याणच्या मंडळींचा फिरंगाण नष्ट करण्याचा प्रयत्न शेवटी ४ मे १७३९ रोजी पूर्ण सफल झाला. कल्याण सुभ्यात, कल्याणच्या मंडळींच्या प्रयत्नाने हे युद्ध झाले म्हणून सुभे कल्याणच्या इतिहासात या प्रसंगाचे स्थान फार मोठे म्हणावे लागेल. या युद्धात मराठ्यांच्या सामर्थ्याची, एकजुटीची, चिकाटीची, शौर्याची, पराक्रमाची समर्थं प्रचीती येऊन मराठ्यांच्या सामर्थ्याची पताका दिगंतात फडकावली गेली. एवढेच नव्हे तर फिरंगाण उखडले गेल्यामुळे जवळच्याच इंग्रजांना एवढा धसका बसला कीं त्यांचे भारतावरील व महाराष्ट्रावरील आक्रमण १७५ वर्षे पुढे ढकलले गेले व महाराष्ट्र व मराठी साम्राज्य स्वतंत्र राहिले.

या युद्धात पुढे वसईचे सुभेदार झालेले शंकराजी फडके हे प्रमुख सरदार, कल्याण सुभ्याचे सुभेदार झालेले रामजी महादेव बिवलकर हे उदयास आले. साष्टी, वसई, कल्याण ही तीन ठिकाणे त्रिखंडात गाजली. एवढे प्रचंड विजयी युद्ध पूर्वी कधी या भागातच नव्हे तर मराठ्यांच्या इतिहासातही झाले नाही. पेशव्यांच्या ठेवणीतल्या सर्व वीर नर-रत्नांचे पदस्पर्श, पुण्य निवास आणि भीमपराक्रमाने ही सुभेकल्याणची भूमी पावन झाली. मुंबईच्या भुलेश्वराला आप्पासाहेबांना मुकुट घातला. वसईच्या कोटात मराठ्यांचा भगवा झेंडा चढल्यावर आप्पासाहेबांनी प्रथमच हिंदू देवतेची स्थापना केली. माणकोजी पाथरवटाकडून मारुतीची स्थापना २७ जुलै १७३९ मधे आप्पासाहेबांनी विधिपूर्वक केली.

वज्रेश्वरीच्या वज्रयोगिनीस तुझे देऊळ बांधीन म्हणून नवस केला होता. तोहि काही भाग फेडला; परंतु उरलेला भाग पुढे नानासाहेब पेशव्याने पूर्ण केला. कल्याणच्या किल्ले दुर्गाडीवरील त्रैलोक्याचे रक्षण करणाऱ्या, भवानी दुर्गादेवीसही जीर्णोद्धार

करीन असे म्हणाले असावे. कारण लगेच १७४४ मध्ये कल्याणचे दुर्गादेवीचे मंदिराचा जीर्णोद्धार करून नवे मंदिर बांधल्याची नोंद पेशवे दप्तरात सापडते. तसेच त्या ठिकाणी (लेखकाचे पूर्वज) वेदमूर्ति महादेवभट गोडबोले वास्तव्य कसबे कल्याण यांची श्री दुर्गाभवानी किल्ले दुर्गाडी, कोट कल्याण येथे पूजाअर्चा करण्यासाठी कायम नेमणूक करून उत्पन्न कोठी कल्याणमधून नेमून दिले. त्या वेळेपासून आजतागायत तेथे नवरात्र उत्सव व इतर यथास्थित चालू आहेत.

या मोहिमेत मराठ्यांच्या मनात समुद्रावरील सर्व सत्ता बुडवून ती सत्ता एकट्याच्या हाती घ्यावयाची होती. त्यामुळेच प्रथम बाजीरावसाहेबांनी शिद्दी बुडविला. नंतर आंग्र्यांना आहारी आणले. मग फिरंगी पालथा घातला. त्यानंतर इंग्रजांचाच नंबर लागत होता व तशी त्या काळी सार्वत्रिक समजूतही होती. या संबंधी पोर्तुगीझांच्या व मुंबईकरांच्या तात्कालीन लेखात आधार सापडतो. बाजीरावसाहेब व चिमाजी अप्पा हे खरोखरच आठ दहा वर्षे अधिक जगले असते तर कदाचित् इंग्रजांचीहि फिरंग्यासारखीच अवस्था होऊन काही निराळाच इतिहास निर्माण झाला असता. परंतु ' भवितव्यता बलीयसी ' हेच खरे.

□ □ □

Scanned with Ca

: ११ :

वासुदेव जोशी (मुरुडकर) कल्याणचे सुभेदार

वासुदेव जोशी मुरुडकर ही व्यक्ती पहिल्या तीन पेशव्यांच्या राजकारणात वावरणारी एक महत्त्वाची व्यक्ती होती. पेशवे कुटुंबाशी त्यांचा निकटचा ऋणानुबंध होता. कृष्णराव चासकर जोशी ह्यांजकडून कल्याणचा सुभा काढून घेतल्यानंतर बाजीरावसाहेबांनी या सुभ्याची सुभेदारी वासुदेव जोशी मुरुडकर या पोक्त व अनुभवी मुत्सद्द्याकडे दिली, हा उल्लेख अगोदर येऊन गेलाच आहे. पेशव्यांच्या हर एक राजकारणात तो मुत्सद्द्याप्रमाणे मानला जात असे. मागील प्रकरणात वसईच्या मोहिमेतील त्याची कामगिरी येऊन गेलेलीच आहे. वसईची मोहीम आटोपल्यानंतर म्हणजे इ. स. १७४० ते १७५१ पर्यंत सुमारे ११ वर्षे कल्याणची सुभेदारी ह्याच व्यक्तीकडे होती. या कालखंडात कल्याण सुभ्यात विशेष घडामोडी झाल्या नाहीत. पुष्कळ प्रमाणात राजकीय हालचाली येथे शांत होत्या. पेशवे सरकारचे उत्तरेकडील राजकारण रंगत होते. परंतु कल्याण विभाग त्या वेळी या बाजूला मोठा शत्रू न राहिल्यामुळे शांत होता. अर्थात या काळात कल्याण शहराची गेल्या धामधुमीच्या काळात झालेली झीज भरून काढणे वगैरे गोष्टी होत होत्या.

वसईच्या मोहिमेनंतर वासुदेव जोशी ह्यांना कल्याणकडे व सुभ्याकडे स्वस्थतेने लक्ष देता आले. कल्याण शहरात तोफांचे गोळे बनविण्याचा कारखाना होता, तो याच काळातला असावा. वज्रेश्वरीला लोखंड निघत असे ते गाळून पेशवे सरकार खरेदी करीत असत. कल्याणच्या सुभेदारांना वेळोवेळी तोफगोळे पाठवा वगैरे पत्रव्यवहार पेशव्यांनी केलेला आहे. तसेच पेशव्यांनी वज्रेश्वरी येथे लोखंड खरेदी केल्याचीही नोंद सापडते. कल्याण शहरात भाताचा व्यापार फार जोरात होता व आजतागायत होता. पेशवे सरकार कल्याणहून तांदूळ खरेदी करून ठिकठिकाणी नेत असत, हे पेशव्यांच्या प्रसिद्ध झालेल्या रोजनिशीमध्ये नोंदलेले अनेक वेळा सापडते. या वहातूक व्यवहारावर अनेक ब्राह्मण कुटुंबे नियंत्रण करीत असत हेही त्यातील नावावरून दिसून येते; तीच कुटुंबे पुढे कल्याण येथे स्थायिक झाली.

Scanned with Ca

किल्ले दुर्गाडीवरील गाजलेले श्री भवानी दुर्गामाता मंदिर, कल्याण.

या काळात जर कोणती महत्वाची गोष्ट घडली असेल तर ती म्हणजे कल्याणचे त्यावेळचे सुभेदार श्री. वासुदेव जोशी मुरुडकर यांनी कल्याणच्या दुर्गाडी किल्यावर असलेल्या कृष्णस्वरूप वरदायिनी त्र्यैलोक्याचे रक्षण करणारी भवानी देवी दुर्गामातेच्या मंदिराचा जीर्णोद्धार करून नवे मंदिर बांधले. त्या प्रसंगी सुमारे १०० वेदमूर्ती ब्राह्मणांना निरनिराळ्या ठिकाणी दाने दिली व कल्याण येथे वस्ती करून असलेले श्री वेदमूर्ती महादेवभट गोडबोले (प्रस्तुत लेखकाचे पूर्वज) ह्यांची किल्ले दुर्गाडीची दुर्गामाता-पूजा व नैवेद्य वगैरेसाठीं नेमणूक केली व साल दरसाल कल्याण कोठीपैकी २ खंडी १॥। ≡॥ मण भात व रोख रु. २०|– असे उत्पन्न इनाम नेमून दिले. (राजमंडळ, रुमाल क्र. १०८६ पत्र क्रमांक १०४०).

क्रमांक १०४०. राजमंडळ रुमाल क्रमांक १०८६

एक बेर्जी

सु॥ तीस ॥ ११२०

" झडती तिसा अर्बिन मया अलफ (सन १७४९) स्वारी राजश्री सदाशिव चिमणाजी प्रांत कल्याण भिवंडी खर्च हुजूर स्वारीखेरीज मुशाहिरा इनामती धर्मादाय ब्राह्मण वेदमूर्ती राजश्री महादेवभट गोडबोले वास्तव्य कसबे कल्याण नेमणूक किल्ले दुर्गाडी श्री दुर्गामाता व नैवेद्यास साल दरसाल."

ऐन वक्त इतलाख
आदा नक्त
रु. २०१-

ऐन जिन्नस कोठी कल्याण
पैकी भात मोठे चोथे
पावणे चौसरी
खंडी २ खंडी
मण १||| ≡||

Poona Daftar
13/32457



कल्याण येथील किल्ले दुर्गाडीवरील श्रीभवानी दुर्गामाता मंदिराचे पूजाअर्चेसाठी कल्याणचे तत्काळी वेदमूर्ती महादेवभट गोडबोले यांची पेशवे सरकारांनी नेमणूक केली, त्याची सनद. प्रस्तुत लेखक हे त्यांचे वंशज आहेत.

या इतिहासप्रसिद्ध किल्ले दुर्गाडीवरील श्री दुर्गामाता मंदिराबाबत हिंदू व मुसलमान समाजात त्याच्या वहिवाटीबाबत गेली काही वर्षे वाद चालू होता. किल्ले दुर्गाडीवरील हिंदु समाजाचे परंपरागत एकमेव श्रद्धास्थान श्री दुर्गामाता मंदिर ही मशीद असून मुसलमान समाजाचे वहिवाटीस आहे, असा मुसलमान समाजाचा दावा होता. तर शिवकालापूर्वीपासून हिंदु समाजाचे ते श्री दुर्गामाता मंदिर आहे व आजपर्यंत हिंदू समाजाचीच तेथे वहिवाट आहे असे हिंदू समाजाचे म्हणणे होते. याबाबत विधानसभेत प्रश्नोत्तरे होऊन महाराष्ट्र सरकारने १९७० मध्ये ठाणे जिल्हाधिकारी यांना ह्याबाबत चौकशी करण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे १९७० च्या फेब्रुवारीमध्ये संबंधित वादग्रस्त वास्तूसंबंधी जनतेकडून पुरावे व निवेदने मागविली. नंतर चौकशीस प्रारंभ होऊन व पूर्ण दोन वर्षे चौकशी चालून शुक्रवार २६ मे १९७२ रोजी त्याची सांगता झाली.

या चौकशीत किल्ले दुर्गाडीवरील कृष्णस्वरूप वरदायिनी, त्रैलोक्याचे रक्षण करणारी भवानीदेवी दुर्गामाता मंदिराचे व्यवस्थेसाठी पेशवे सरकारने इ. स. १७४९ मध्ये नेमलेले व्यवस्थापक कै. वेदमूर्ती महादेवभट गोडबोले यांचे वहिवाटदार वंशज श्री. विवेकानंद गोडबोले, अध्यक्ष, इतिहास संशोधन मंडळ कल्याण, अध्यक्ष फूटपाथ पार्लमेंट कल्याण, (स्वत: लेखक) यांनी १९६८ पासून संशोधन करून पेशवे दप्तर, शाहू दप्तर, भारत इतिहास संशोधन मंडळ, सरकारी दप्तरे, सरकारी कचेऱ्या, येथील हजारो कागद तपासून अपार श्रम व द्रव्यझीज सोसून, महाराष्ट्रभर प्रवास करून विविध ऐतिहासिक पुरावे, कागदपत्रे, नकाशे, फोटो जमा करून हिंदू समाजातर्फे जिल्हाधिकारी ठाणे यांजकडे आपले निवेदन व पुरावे हजर केले. त्यासंबंधी निरनिराळ्या वर्तमानपत्रातून वेळोवेळी बातमीपत्रे छापून आली. या चौकशीचे कामात श्री. विवेकानंद गोडबोले यांनी स्वत: विरुद्ध पक्षातील प्रमुखाग्रणी मुसलमान साक्षीदारांची दीर्घ काळ कसून उलट तपासणी करून मुसलमान समाजाने सादर केलेल्या पुराव्यातील व निवेदनातील फोलपणा त्यांचेच मुखातून वदविला व चौकशी अखेरपर्यंत सातत्याने झीज सोसून परिश्रमपूर्वक व अभ्यासपूर्वक काम चालविले. तथाकथित नामवंत म्हणविणारे व पक्षबाज पणती वकिलांपेक्षा उत्कृष्ट व मुद्देसूद व तर्कशुद्ध युक्तिवाद करून विरोधी पक्षाचा पुरावा संशयास्पद, बनावट व खोटा आहे हे पटवून दिले.

किल्ले दुर्गाडीवरील कृष्णस्वरूप वरदायिनी भवानीदेवी दुर्गामातेचे मंदिराच्या जीर्णोद्धाराकरिता खर्ची पडलेल्या रकमेच्या काही कागदांपैकी दोन कागद येथे देत आहे.

Scanned with Car

क्रमांक १२९३ राजमंडळ

रुमाल नं. १०८५
सुमा. सबा.

" स्वारी राजश्री सदाशिव चिमणाजी प्रांत कल्याण भिवंडी किल्ले दुर्गाडी खर्च सुभे मजकूर ऐन खेरीज मुशाहिरा मजूरीखर्च मजुरी बेलदार साल ऐन नक्त रु.१४८= कसबे कल्याण किल्ले दुर्गाडी दुर्गामाता मंदिर दुरुस्ती. बेलदार लावून नीट करविले. "

दुसऱ्या कागदात बांधकामासंबंधी खर्च पडलेल्या
एका रकमेचा तपशील आहे.

राजमंडळ

पत्रक्रमांक १३०९

एक बेर्जी सु. म. स. ब.

" स्वारी राजश्री सदाशिव चिमणाजी प्रांत कल्याण भिवंडी खर्च एकबेर्जी सुभे मजकूर ऐन खेरीज मुशाहिरा. नवे मंदिर सरकारी लागवड खर्च दुर्गाडी दुर्गामाता मंदिर दुरुस्तीकरिता किल्ले दुर्गाडी खरेदी फाटी विटा भाजावयास

गुजारत कान को. ।

कल्याण रु. ६ "

या कागदात बुरुज व मंदिर दुरुस्तीकरिता चुना व
विटा खरेदीची नोंद आहे.

पत्र क्र. १३०८

रु. नं. १०८५
एक बेर्जी सुम. सबा.

" स्वारी राजश्री सदाशिव चिमणाजी प्रांत मजकूर कल्याण भिवंडी खर्च एक बेर्जी ऐन खर्च एक बेर्जी सुभे मजकूर खेरीज मुशाहिरा किल्ले दुर्गाडी दुर्गामाता मंदिर सरकारी लागवड खर्च बुरुज व मंदिर. खरेदी चुना छ ६ माहे जिल्काद महंमद जी पाटील घोडबंदरकर. चुना खंडी सु. ।।। २२८।। दरखंडी रु. ।।। =

किरकोळ खर्च २।. ॥

१॥ - ॥ ॥ वाणी गंजबाजार

।. तंबाखू वजन पक्के १९

॥ सुतळी वजन पक्के १॥।

१ हिरडे वजन पक्के १

-॥ नवसागर पैंसाभार १

= पितळ पैसा भार =

१॥-॥

॥ ☰ कलेकरीन वगैरे

" खरेदी विटा गु. ॥ रोख कासीमजी सु. ।।। ३००००
हज़ारी किंमत १।।। प्रमाणे रु. ५२॥

पुढील पत्रात किल्ले दुर्गाडीवरील मंदिराची वास्तुशांती केली त्याबद्दल खर्ची पडलेल्या रकमेचा तपशील दिला आहे.

पान ११२९ राजमंडळ रुमाल नं. १०८६

" स्वारी राजश्री चिमणाजी प्रांत कल्याण भिवंडी खर्च एक बेर्जी सुभे मजकूर खेरीज मुशाहिरा नवे मंदिर कृष्णस्वरूप वरदायिनी त्रैलोक्याचे रक्षण करणारी भवानी देवी दुर्गामातेचे मंदिराची वास्तुशांती किल्ले दुर्गाडी कसबे कल्याण कोठी पैकी ऐन नक्त सोन्याच्या दक्षिणा व किरकोळ

रु. ४९ ।।।- तपशील

४ ।= प्रति सोन्याच्या प्रतिमा मासे ३॥ जो रु ३

६= किरकोळ खुर्दा खर्च

४ रु. पूजा, देवीस पंचामृत

१।।।= भोजन दक्षिणा

.।- किरकोळ

६☰

३३= धर्मादाय दक्षिणा समस्त ब्राह्मण यास

३१॥= कित्ता

१॥ कित्ता स्वयंपाकी बाई व ब्राह्मण

३= हरिकथा देणे गोसावी पारनेरकर

४९ ॥-

पुढील पत्रात किल्ले दुर्गाडीवरील श्रीदुर्गामाता मंदिरात ब्राह्मण व आगंतुक आला गेला यास, नवरात्र–दसरा प्रसंगीचा खर्च वगैरे दिले आहे.

राजमंडळ

रुमाल नं १०८५

एक बेर्जी सु. म. सबा

क्रमांक १२९९

" स्वारी राजश्री सदाशिव चिमणाजी प्रांत कल्याण भिवंडी खर्च एक बेर्जी स्वारी मजकूर ऐन खर्च किल्ले दुर्गाडी दुर्गामाता मंदिर भोजनखर्च व इतर खर्च ब्राह्मण व आगंतुक गृहस्थ आल्यागेल्यास वगैरे दरसाल खर्च.

ऐन नक्त २०० रु.

ऐन जिन्नस गल्ला कैली

	पा । चौसेरी खंडी	इगचा सेरी कैली
तांदुळ बारीक	४।।। ☰	४।। १।।=
भरडे गहू	८=।।।	= ८= ।।= ।।।
	४।। ☰ ।।।	

गु ।। तांबोळी कोठी कल्याण खर्च
पान नागवेलीची आकार
३५०० नवरात्र दसरा एकूण किं. रु. १।

पुढील पत्रात किल्ले दुर्गाडीवरील जत्रेसाठी खरेदी केलेल्या सामानाची नोंद आहे.

क. १२९१

राजमंडळ

रुमाल नं. १०८५

" स्वारी राजश्री सदाशिव चिमणाजी प्रांत कल्याण भिवंडी एक बेर्जी किल्ले दुर्गाडी श्री दुर्गामाता जमाखर्च. जत्रेस सामान पाठविले त्याची किंमत.

रु ९।।।

गु. ।। वाणी कोकणी बाजार
८= चंदन ८८।
.।।।. मिरच्या

.।।= हळद ८८=।।
.। = खोबरे ८८=
७।।– नारळ केळी

९।।। रु.

किल्ले दुर्गाडीवरील श्री दुर्गामाता मंदिराच्या वास्तुशांतिसाठीं आलेल्या किराणा खर्चाची नोंद पुढील पत्रात आहे.

" क्रमांक ११३० राजमंडळ रुमाल नं. १०८६

एकबेर्जी सु॥ समान

" स्वारी राजश्री सदाशिव चिमणाजी प्रांत कल्याण भिवंडी खर्च एकबेर्जी सुभे मजकूर ऐन खेरीज खुद्द मुशाहिरा भवानी मातेचे मंदिराची वास्तुशांती किल्ले दुर्गाडी कसबे कल्याण कोठी कल्याण पैकी खर्च दुर्गामाता वास्तुशांती ऐन जिन्नसी गल्ला कैली मापे कैली खंडी

पावणे चौशेरी मापे कैली खंडी

८८= भात चौथे

८८१ तांदुळ भरडे

८॥=॥ तांदुळ मोठे सडीक

८=॥१॥ तांदुळ बारीक

८।१ डाळ तुरीची

८।॥१॥ डाळ हरबरे

८।१ डाळ उडीद

वजनी वजन पक्के

८।॥।॥ तूप १॥

८॥=। गूळ

८।·५ तेल

८१।॥=

८८। उडीद

८८= मूग

।. ८१।॥=

८८१॥ तीळ भादवे

८८१ तीळ कासवेल

·।· ।· १॥=

◻ ◻ ◻

Scanned with Ca

: १२ :

सरसुभेदार व सेनाखासकेल रामाजी महादेव बिवलकर

१७३९ ते १७७२

शागीर्दाचा सर सुभेदार–आरमारी सरखेल

वासुदेव जोशी मुरुडकर यांच्या मृत्युच्या अगोदर एक दोन वर्षे कल्याण प्रांताची सरसुभेदारी श्री. रामाजी महादेव बिवलकर यास मिळाली. रामाजी महादेव बिवलकर हा वसईच्या धर्मसंग्रामात पुढे आला. त्याने सागरी लढ्यात फार बहुमोल कामगिरी बजावली. पेशव्यांच्या जवळ सागरी युद्धात तरबेज असा कोणीही खास सरदार नव्हता. रामाजी महादेव बिवलकराने ते प्राविण्य मिळवले व आपला प्रभाव पाडला. पेशवे यांना आपल्या विश्वासात खास माणूस सागरी युद्धप्रवीण व मुत्सद्दी व पराक्रमी असा माणूस पेशव्यांची आरमारी बाजू बळकट करणारा असा पाहिजेच होता; आंगरे ह्यांचा भरवसा नव्हता. ते पेशव्यांच्या पूर्णपणे अंकित नव्हते. त्यामुळे इंग्रज, पोर्तुगीझ, सिद्दी सात यांच्याबरोबर संग्राम करू शकेल व वेळप्रसंगी त्यांचा पराभव करू शकेल असा आरमारी लढवय्या व मुत्सद्दी पेशव्यांना पाहिजे होता. तो पेशव्यांचा आश्रित शागीर्द रामाजी महादेव बिवलकर ह्यात मिळाला. रामाजी महादेव शागीर्दापासून सरसुभेदार, आरमारी सरखेल या हुद्द्यापर्यंत स्वतःच्या पराक्रमाने, पाताळयंत्री हुशारीने चढला; यासंबंधी कांही माहिती त्याचे वंशज कै. बापूसाहेब सुभेदार यांजकडून मिळवली होती, ती सांगणे महत्वाचे ठरेल; कारण या पूर्वपीठिकेवरून रामाजी महादेव बिवलकरांचे श्रेष्ठत्व नजरेत भरणार आहे.

पेशवे पुण्यास येऊन राज्यकर्ते झाल्याबरोबर कोकणातील कित्येक घराणी देशावर पुण्यास येऊन राजकीय क्षेत्रात प्रभाव पाडती झाली. पेशवे पुण्यास येण्या-पूर्वी राजकीय क्षेत्रांत कोकणस्थ ब्राह्मण कधीहि इतिहासात आढळत नाहीत. चारदोन उदाहरणे निघतीलही. कारण बाळाजी विश्वनाथ भट पेशवे यांना पुढे आणण्यास, कोल्हापूर दरबारचे व शिवकालापासून प्रसिद्ध असलेले सरदार व सावकार श्री. महादेव कृष्ण जोशी चासकर, हेच कारणीभूत झाले. त्याचप्रमाणे राजाराम काळात हुकमतपन्हा हा किताब मिळवलेल्या दोन व्यक्ति होत्या. त्यांतील एक पंताजी शिवदेव सोमण ही व्यक्ति होती. पंताजी शिवदेव सोमण यांना

राजाराम कालांत हुकमतपन्हा (म्हणजे प्रतिराजे) हा किताब मिळाला; कारण बेबंदशाहीच्या काळात संताजी–धनाजी वगैरे व्यक्तींच्या मदतीने कामगिरी बजावणारे पंताजी शिवदेव होत. स्वराज्याचे रक्षणकर्ते म्हणून त्यांना हा किताब व कल्याण सुभा मोकासा मिळाला होता. पुढे त्यासंबंधी स्वतंत्र हकीगत येईलच. थोडक्यात या दोन नावांखेरीज कोकणस्थ ब्राह्मण मंडळी राजकारणात आली नव्हती व घाटावरही आली नव्हती. परंतु पेशवे पुण्यास राज्यकर्ते झाल्यावर मात्र थोडीथोडी त्यांच्या आश्रयाला येऊन उदयास येऊ लागली व पुढे तर अनेक सरदार, योद्धे, मुत्सद्दी, उदयास आले व त्यांनी छत्रपतींच्या राज्याचा विस्तार व रक्षण केले.

बाजीरावसाहेब पेशवे असताना व महादेव कृष्ण जोशी व त्यांचे पुत्र रामचंद्र महादेव जोशी कल्याणचा कारभार पहात असता रामाजी महादेव बिवलकर यांची आई गरिबीमुळे कोकणातून पुण्यास येऊन राहिली व बरोबर आपली दोन मुले रामाजी महादेव व बाळाजी महादेव यांना घेऊन आली. पेशव्यांच्या वाड्यात काही कामधंदा या बाईने मागितला, तेव्हा तिला वाड्यामध्ये घोड्यांचे पागेत हरभरे भरडण्याचे काम मिळाले. दिवसभर घोड्यांकरिता हरभरे भरडावे व वाड्यातून जे जेवण वाढून येईल त्यावर उदरनिर्वाह करावा, असा दिनक्रम चालू झाला. मुले लहान होती. परंतु थोड्याच काळात ती मुले मोठी होऊन आईला मदत करू लागली. रामाजी महादेव (त्या वेळचा राम्या) हा जरा सशक्त होता. एकदा बाजीरावसाहेब स्वतः जातीने आपल्या घोड्यांची पाहणी करण्याकरिता पागेत आले. तेव्हा राम्या हा सशक्त मुलगा त्यांचे नजरेस पडला. हिऱ्याची पारख जवाहिऱ्याच करू शकतो. बाजीरावसाहेबांनी या चलाख मुलाची चौकशी केली व नंतर त्यांनी विचारले, "तू आमचे काय काम करशील ?" तेव्हा चलाख व धीट राम्याने उत्तर दिले, "आपण सांगाल ते काम करीन." बाजीरावसाहेब या धीट उत्तराने खूष झाले. त्यांना या मुलामध्ये काही धाडसी गुणांचा वास आला. त्यांनी खूष होऊन या कुटुंबाची वाड्यात जेवणाची व्यवस्था केली; व खासे मंडळींची धोतरे धुण्याचे काम राम्यास दिले. धोतरे पेशवे सरकारची; तेव्हा ती अत्यंत स्वच्छ निघाली पाहिजेत म्हणून रामाजी ती नदीवर धुण्यास घेऊन जाऊ लागला. असे काही दिवस गेले असता एक दिवस रामाजी नदीवर धोतरे धुवून वाळवीत बसला असता एका सत्पुरुषाची गाठ पडली. त्यांनी त्याला विचारले, "बाळ, कसली चिंता करतोस ?" तेव्हा रामाजीने चमकून सांगितले, "आयुष्य धोतरे धुण्यातच जाणार काय याचा विचार करतो." सत्पुरुषाला दया आली. त्यांनी त्याचे हस्तसामुद्रिक पाहिले व सांगितले, "रोज शिवलिंग तयार करून त्याची पूजा करीत जा व विसर्जन करीत जा." दररोज शिवलिंग कसे करावे, पूजा कशी करावी हेही सांगितले. त्याप्रमाणे रामाजी रोज

Scanned with Car

नदीवर कपडे धुतल्यावर शिवलिंग करू लागला व पूजा करून ध्यानमग्न होऊ लागला. त्याची शिवभक्ति वाढतच गेली.

एक दिवस धोतरे धुवून शिवपूजा करून तो ध्यानमग्न झाला व धोतरे घेऊन पेशवे वाड्यावर घेऊन येण्याचे विसरला. त्याचप्रमाणे धोतरे घेऊन जाताना पेशव्यांच्या देवांना फुले नेण्याचे काम होते, तेही विसरला. राम्या फुले घेऊन आला नाही म्हणून शोधाशोध सुरु झाली; शेवटी स्वत: बाजीरावसाहेब कुतुहलाने नदीवर उपस्थित झाले. पहातात तो राम्या शंकराच्या ध्यानात मग्न आहे. रामाजीची शंकरावरील भक्ति पाहून ते प्रसन्न झाले व त्यांनी न रागावता त्याची लिंगपूजेची व्यवस्था वाड्यातच करून दिली. अशा तऱ्हेने एक दोन वर्षे निघून गेली; या काळात अर्थातच त्याने आपल्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग केला. पेशव्यांचे वाड्यात व सरदार-शिलेदार यांच्या लष्करी वातावरणाचा फायदा करून घेऊन त्या वेळी लोकप्रिय असलेले लष्करी शिक्षण प्राप्त करून घेतले. उत्कृष्ट घोड्यावर बसणे, तरवार फिरवणे, भालाफेक, निशाणबाजी या बाबतीत त्याने तयारी केली.

बाजीरावसाहेबांच्या बारीक नजरेतून तो सुटला नाही. कारण रघुनाथ बाजीराव, सदाशिवराव भाऊ, बाळाजी बाजीराव वगैरे पेशवे–पुत्रांच्या संगतीत हा वाड्यावर होता. त्यामुळे तो त्यांचा सवंगडी बनला. त्यांच्या बरोबरच त्याला लष्करी शिक्षण मिळाले. त्यामुळे बाजीरावसाहेबांना त्याच्या प्रगतीची व धाडसी-पणाची माहिती वेळोवेळी मुलांकडून मिळत होती. एवढ्यात वसईची मोहीम निघाली (१७३७). बाजीरावसाहेबांनी रामजी महादेवाच्या कर्तृत्वास वाव मिळाला तर पहावे म्हणून त्याची रवानगी वसईच्या मोहीमेवरील फौजेत केली. रामाजी महादेवानेही मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग केला.

राजकीय कामगिरीस सुरवात

रामाजी महादेवाने २६ मार्च १७३७ रोजी ठाणे शहरावर मराठ्यांनी जो प्रचंड हल्ला चढविला त्यात फार मोठी कामगिरी बजावली. मार्च १७३७ मध्ये फिरंगाणाची मसलत पक्की करून व काही सरदार चिमणाजी भिवराव, रामचंद्र हरी, कृष्णाजी केशव वगैरे सरदारांना अगोदरच साष्टी-वसईकडे रवाना केले होते व स्वत: गुढी पाडवा करून दुसरे दिवशी गुरुवारी रात्री फिरंगाणाकडे कूच केले. त्यांनी आपल्या फौजेचे जे दोन भाग केले होते, त्यात वसईकडे जाणारी टोळी होती. त्यात शंकराजी केशव फडके, गंगाजी नाईक होते व ठाण्याकडे जाणाऱ्या टोळीत धाकनाक परवारी, गंगाजी नाइकाचे दोघे भाऊ रामचंद्र हरी पटवर्धन, रामाजी महादेव बिवलकर व खंडोजी माणकर हे होते. रामाजी महादेव खंडोजी माणकर ही टोळी राजमाचीहून निघून प्रथम बाबा मलंगचे वाडीस येऊन

पोहोचली व २६ मार्च रोजी साष्टीच्या पल्ल्याजवळ मुक्कामास गेली. रामाजी महादेवाची लष्करी कारकीर्द सुरू झाली व त्याने या प्रथम हल्ल्यातच आपले कसब दाखवून उपयुक्तता पटवून दिली. या टोळीने कळव्याजवळ जेरोनिमो नावाचा पाणबुरुज होता, तो शिडचा लावून रातोरात जिंकून घेतला. त्यात बुरुजावरील कप्तान ठार झाला. नंतर पाणबुरुजाचा बंदोबस्त करून मुरारजी नाईक फौज घेऊन माजिवडयावर गेला व रामचंद्र नाईक, रामाजी महादेव, खंडोजी माणकर वगैरे सरदार दुसरी फौज घेऊन घोणसाळियावर गेले. ठाण्याचा किल्लेदार मराठ्यांच्या थापेबाजीमुळे गाफील होता. तरी मराठ्यांनी पाणबुरूज जिंकून घेतल्यावर तोफांचे दोन आवाज केले होते; त्यामुळे तो जरा सावध झाला. तर इकडे बदलापुरास मुक्कामास असलेल्या चिमाजी अप्पासाहेबास विजयाचा इशारा मिळाला आप्पासाहेब ताबडतोब येऊन कळव्यास पोहोचले व त्यांनी खाडीपलीकडे सैन्य उतरवले. तर माजीवडे व घोणसाळीकडून मुरारजी नाईक व रामाजी महादेव बिवलकर व खंडोजी माणकर ठाण्यात शिरले. ठाण्याच्या कोटाभोवती शहाजणे वाजवीत मराठे भुतासारखे उत्पात करीत फिरू लागले. त्या वेळी शेजारचा एक फिरंग्यांचा मठही पेटवून दिला. रामाजी महादेव बिवलकराने प्रथम संधीसच ठाणे जिंकताना बहुमोल कामगिरी बजावली व त्याचे आसन बळकट झाले. बाजीरावसाहेबांची पारख अचूक ठरली.

कामगिरी दुसरी : धारावीची लढाई–१२ जुलै १७३७. २८ जून १७३७ चा मराठ्यांचा वसईवरील हल्ला फसला. मराठ्यांची फार माणसे कामास आली. तेव्हा धारावीवरून मराठ्यांना पोर्तुगीझ कप्तान कडदिनाने हुसकावून लावले होते, तरी धारावी बेट मोक्याचे असल्यामुळे ते घेण्याचा मराठ्यांचा निश्चय होता. म्हणून मराठे तसेच मुंडी देऊन जरा बाजूस सरून बसले. शत्रूच्या ठाण्यास शह देण्यासाठी धारावीजवळ एक ठाणे बांधून काढावे असे मराठ्यांनी ठरवले. ही बातमी कडदिनाला कळली, तेव्हा मराठ्यांची डोंगरी व बायनेल खाडीतून जा-ये करण्यासाठी फिरंग्यांनी मुर्ध्यावर तोफा चढवून खाडी रोखून धरली. तरी मराठ्यांची हालचाल दिसेना. म्हणून कारव्हालो नावाच्या सरदारास मुद्दाम ६ तोफा व पुष्कळशी शिबंदी घेऊन पाठविले व मुर्ध्याचे ठाणे बळकट करण्यास सांगितले. ते त्याने १२ जुलै रोजी पूर्ण केले. परंतु पूर्वी एकदा बायनेलात शिरून त्याने मराठ्यांचा पराभव केला होता, तसाच या वेळी करू या घमेंडीने तो तोफा व सामान शिपाई घेऊन पुढे मराठ्यांच्या प्रदेशात खाडी ओलांडून आला. हे पाहून रामाजी महादेवाने त्याला बराच आत येऊ दिला व तो टप्प्यात येताच आपल्या घोडदळानिशी त्यावर जाऊन कोसळले व शत्रूला तुडवून त्याचा अतिशय नाश केला. या हल्ल्यात शत्रूचे सर्व पायदळ विस्कळीत होऊन सैरावैरा धावू लागले व परत गलबतात बसण्यासाठी खाडीकिनारी जाऊ लागले, तो रामाजी महादेवाने शत्रू जेव्हा खोलवर

आला तेव्हाच एक टोळी पाठीमागून किनाऱ्यावर पाठवून शत्रूसैन्याभोवती पुरता फास आवळला होता. खाडी-किनाऱ्यावर गलबतात बसण्यासाठी जेव्हा ते जाऊ लागले तो तेथील मराठ्यांनी त्यांच्यावर हल्ला करून पुष्कळ लोक कापून काढले. जे पळाले व गलबतात बसले त्यांचेवर त्यांच्याच येथे टाकलेल्या तोफा चालवून जहाजातच मारले. त्यात कॅप्टन परेरा द साकेरा नावाचा शत्रूचा फार मोठा माणूस ठार झाला. शत्रूचे जवळजवळ ५०० माणूस ठार झाले व कित्येक जखमी झाले. मराठ्यांनी त्यांच्या सहाही तोफा ताब्यात घेतल्या. कित्येक फिरंगी जहाजात बुडविले. नंतर त्यांनी डोंगरी, बायनेल व मुर्धे ही शत्रूची ठाणी जाळून पोळून उध्वस्त करून टाकली. वसईच्या पहिल्या हल्ल्यात झालेली मराठ्यांची हानी फिरंग्यांची पुष्कळ माणसे मारून रामाजी महादेवाने पुरा सूड उगवला व फिरंग्यांना मराठ्यांची दहशत बसविली. या युद्धात रामाजी महादेवाने शत्रूसैन्य आत घेऊन व त्याला चातुर्याने वेढून टाकण्याचे जे रणचातुर्य दाखवले, ते खरोखर अलौकिक होय. नव्याने कामगिरीवर निघालेल्या रामाजी महादेवाने थोर सेनापतीचे चातुर्य दाखवून आपले रणपांडित्य सिद्ध केले.

धारावी येथील कामगिरी–मराठ्यांनी धारावी जिंकल्यावर ते ठाणे बांधून काढून त्याचा पक्का बंदोबस्त करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे त्यांनी मेढचास व इमारतीस काम लावले. काम चालू असता ते मोडून टाकावे म्हणून फिरंग्यांनी दोन चार छापे घालण्याचा प्रयत्न केला. पण तेथे ठाण मांडून बसलेल्या रामाजी महादेव बिवलकराने त्यांना यथेच्छ चोपून पिटाळून लावले. रामाजी महादेवाच्या मदतीस खंडोजी माणकराचेही दोनअडीच हजार माणूस देण्यात आले होते. काम चालू असता खंडोजी माणकरही जरूरीप्रमाणे तेथे जाऊन येऊन असे. ८ डिसेंबरच्या पत्रात कल्याणचा सुभेदार वासुदेव जोशी याने धारावीकडील हालहवाल अप्पासाहेब पेशवे याना कळविली होती. ती अशी: "धारावीचे वर्तमान तरी रा. रामाजी महादेव तेथे बसले आहेत, त्याजवरी गनीम एक-दोन वेळा गेला. त्याची यांची झटापट होऊन गनीम माघारा फिरावून लावला. प्रस्तुत मेढचाचे काम चाळीस लावले आहे. पुढे इमारतीचेही होईल. सारांश जागा काइम जाहला."

वेसावे येथील कामगिरी– "७ फेब्रुवारी १७३९ रोजी वेसावे ठाणे फत्ते केले" अशी पेशवे शकावलीत नोंद आहे. त्याची हकीगत अशी– जानेवारी १८, १७३९ च्या सुमारास खंडोजी माणकर, नारोजी कडू व खंडोपंत यांनी चार फौजा नेऊन वेसाव्यावर हल्ला करण्याचे ठरविले. ते त्या वेळी घोडबंदरास होते. तेथून त्यांनी वेसाव्यास जाण्याचे योजले व ठाण्यास रामाजी महादेवास पत्र पाठवून ताबडतोब चार तोफा, सरंजाम व लोक घेऊन घोडबंदरास येण्यास सांगितले. या वेळी ठाण्याचे कोटाचे काम सुरू होते. तेव्हा रामाजी महादेवाने ठाण्याच्या

कोटाचा बंदोबस्त केला.आत काही लोक व बाहेर काही चेंदणीकडे, काही फत्ते बुरुजाकडे असे ठेवून पक्का बंदोबस्त करून गलबतावर तोफा घालून १९ तारखेस जानेवारी १७३९ ला निघाला. तोफा २२ तारखेस वेसाव्यास पोहोचणार होत्या. पण त्याच्या आधीच २० तारखेस खंडोजी माणकर वेसाव्यास थडकला होता. ३१ जानेवारीस शिवाजी बाबाजीने चिमाजीअप्पासाहेबास पत्र लिहिले– " किल्ल्यास तिहीकडून मोर्चे दिले होते. मोर्चे जेजालांच्या गोळीच्या टप्प्यापर्यंत गेले होते. पूर्वेकडे विहीर होती तेथे हर सावंत व शिवाजी बाबाजीचे लोक यांचा मोर्चा होता." उत्तरेकडे रामाजी महादेवाचा मोर्चा बसविला व उत्तर व पश्चिम ह्यांच्या मध्ये म्हणजे वायव्येला खंडोजी माणकराचा मोर्चा होता. मोर्चातून दोन तोफा चालू करून ३१ तारखेपर्यंत मराठ्यांनी वेसाव्याची वरील माडी ढासळून टाकली. शत्रूनेही जोराचा प्रतिकार चालविला. येथील किल्लेदार फ्रॅन्सिस दमेला इकारका नावाचा सरदार होता. त्याने स्वत: जखमांनी जेर असताही किल्ला लढविण्याची शिकस्त केली. परंतु रामाजी महादेवाच्या तोफांपुढे त्याचा निभाव लागेना. तेवढ्यात ६ तारखेस व्हाईसरॉयचा तिथून हुकुम आला, तेव्हाच त्याने ते ठाणे मराठ्यांच्या हवाली केले. १८।२० दिवस वेढा देऊन मराठ्यांनी ते ठाणे काबीज केले.

धारावी काबीज:– धारावीचे काम खंडोजी माणकर, तुंबाजीपंत व रामाजी महादेव बिवलकर ह्यांजकडे सोपविले होते. धारावीवर एका बाजूने खंडोजी मानकराने मोर्चा घातला होता. मुर्ध्याच्या खाडीवर तुंबाजी पंताने आपला मोर्चा घातला. २६ फेब्रुवारी १७३९ ला गनीम किल्ल्याबाहेर येऊन चालून आला. चकमक होऊन ७।८ लोक पडले; परंतु तुंबाजी पंताने शत्रू मागे हटवून खाडीत घातला. शत्रू रोज मेढ्यावर येऊन हल्ला करू लागला.

तुंबाजीपंताप्रमाणे रामाजी महादेवाकडेही धारावीचा एक मोर्चा बसविण्याचे काम होते. प्रथम त्याने गायमुखाचे समोर खाडीकाठी वाळू मैदानावरच मोर्चा घालावयाचा विचार केला. मोर्चा उभा करण्यासाठी कणगे उभे करून भारे नेऊन टाकले. इतक्यात कोटातून शत्रूने बंदुका-तोफांची अतोनात मारगिरी केली. तेव्हा रामाजी महादेवाचे ५।७ लोक जखमी झाले व दोन चांगले बारदार ठार पडले. तरीही रातोरात मेहनत करून त्यांनी कणगे भरले; मेढा सुद्धा तयार केला व मोर्चा बळकट केला. दुसरे दिवशी फिरंगी चालून आला. तेव्हाही त्याला माघारी घातला. फिरून तिसरे दिवशी फिरंगी अधिक जमाव घेऊन चालून आला, तेव्हा त्यांची यांची जुंपली. शत्रूचे १०।२० ठार झाले व १०।२० जखमी झाले. शत्रूचा पुरता मोड केला. शत्रू पळून गेला.

२७ फेबुवारी १७३९ ला अपासाहेबांनी रामाजीपंतास हुकूम केला की खंडोजी माणकराच्या सल्ल्याप्रमाणे गायमुखावर मोर्चा घालून आरमारावर मार

धरणे. त्याप्रमाणे गायमुखाजवळ तुबाजीपंत व आंग्रे यांचा मोर्चा–रामाजी पंताचे मोर्चासंमुख बसविला होता. त्याच्या पुढे रामाजी महादेवाने आपले पाच जेजाल बारदार व करोल व २०० शिपाई नेऊन बसविले व तेथून मार धरला. मोर्चावर कोटातून व गलबतातून मार होऊ लागला. तेव्हा नारोजी कडू व खंडू गोमाजी ह्यांनी काठाकाठाने आपला मोर्चा पुढे नेला. गलबते, कोट व पाणबुरुजावरून तिहेरी मार होऊ लागला तेव्हा बुरुजाजवळ ३०० हातावर मोर्चा नेऊन अवघ्या ७५ हातावर रामाजीपंताने आपले करोल नेऊन बसविले; व आप्पासाहिबांकडून खंडोजी माणकरास सांगवून उजवीकडून तोफांचा मार धरविण्यास सांगून गलबते मागे हटविली. अशा सतत माराने ६ मार्च रोजी धारावी फत्ते झाली. या लढयात तुकोजी पवाराने फार चांगली कामगिरी बजावली असे खंडोजी माणकराने एका पत्रात म्हटले आहे. कोटात ८ तोफा, एक फुटकी तोफ, गर्नाळा तोफा दोन व काही दारुगोळा मराठ्यांना मिळाला. ठाण्याचा मुख्याधिकारी कॅप्टन अॅलेक्झांड्र मार्टिन सॅन्टॉक्स ठार झाला. विशेष गोष्ट म्हणजे शत्रूचा प्रत्येक माणूस जखमी झालेला होता. २५।४।१७३९ ला शत्रू शरण आला, असे पिसुर्लेकर पोर्तुगीज कागदपत्रावरून म्हणतात. परंतु मार्च ६ लाच धारावी फत्ते झाली होती. या लढयातही रामाजी महादेवाने फार मोठा पराक्रम केला व आपली मर्दुमकी दाखवून तो सरदार पदावर चढला. पुढे त्याच्यावर स्वतंत्र मोहिमा सोपविण्यात आल्या. बाजीरावसाहेब त्याच्यावर खूष झाले. त्यांना एक तरणाबांड विश्वासू लढवय्या सरदार स्वराज्याचे कामी मिळाला.

१७३९ मध्ये वसईचा धर्मसंग्राम संपला. या युद्धात रामाजी महादेवाने फारच चांगली कामगिरी बजावली. पेशव्यांनी खंडोजी माणकर या सरदारास वसईची सुभेदारी दिली व काही कालानंतर त्यास रत्नागिरी प्रांताची सुभेदारी दिली. खंडोजी माणकर हा अनुभवी जुना सरदार होता. परंतु रामाजी महादेव बिवलकर नवीन जवान साष्टीतील पराक्रमाने उदयास येत होता.तो पेशवे घराण्यात वाढलेला होता. बाजीरावसाहेब पेशव्यांनी त्याला निवडून स्वराज्याचे कामी लावले होते. आपल्या मुलांबरोबर वाड्यावर शिकवून तयार केला होता. शागीर्दाचा सरदार घडवला होता.त्यामुळे बाजीरावसाहेब व चिमाजीअप्पासाहेब यांच्या तालमीत तयार झालेला हा जवान अनुभवाने जरा कमीच असल्यामुळे अधिक अनुभव मिळेपर्यंत स्वतंत्र जबाबदारी टाकणे कठीण होते; म्हणून कल्याणचे सुभेदार श्री वासुदेव जोशी मुरुडकर या धोरणी पोक्त मुत्सद्द्याचे हाताखाली त्याला या भागात कामगिरी दिली होती. १७४० ते १७४४ मध्ये रामाजी महादेवाची स्वतंत्र कामगिरीची नोंद नसली तरी पश्चिम किनाऱ्यावरील आंग्रे व पेशवे यांचे कलह व समझोता वगैरे राजकारणात जबाबदारीने रामाजी महादेव लक्ष घालीत होता.

१२ जानेवारी १७४४ चे रामाजी महादेवाचे मुंबईकरांना पत्र असे– "मानाजी आंग्रे यांनी आमच्या काही मच्छीमार होड्या माहीम खाडीत धरल्या हे तुमचेकडून कळले; म्हणून मी आमचा चिटणीस बापूजी शंकर आणि धोंडी केशव वैद्य यास विशेष माहिती मिळवण्यासाठी तुमचेकडे रवाना केले आहेत. त्याने (मानाजीने) आमच्या होड्या धरल्या व दुसऱ्या कित्येक नुकसानीच्या गोष्टी केल्या. आम्ही त्याचे काहीच नुकसान केले नाही. असे प्रकार फार तर १।२ वेळा आम्ही उपेक्षू; परंतु त्याचे वर्तन असेच चालू राहिले तर त्याला शिक्षा करण्याचाही आमचा विचार आहे. उद्या मी मरोळ व वांद्रा येथे जाणार आहे. तरी आंग्र्यांसंबंधे जी माहिती मिळेल ती कळवावी."

२१ जानेवारी १७४४ मध्ये रामाजी महादेवाने इंग्रजांना मानाजीच्या अतिक्रमणाबद्दल विशेष तक्रारी केल्या आहेत. कारण इंग्रज हे मानाजी व पेशवे यांमध्ये मध्यस्ती करून सलोखा करण्याचा प्रयत्न करीत होते. रामाजी लिहितो, "मानाजी व आम्ही (मराठे-पेशवे) यांच्यातला बेबनाव दूर करण्यासाठी तुम्ही मध्यस्थ म्हणून खटपट करायला तयार आहात हे कळले. मागे असेच त्याच्या व आमच्यामध्ये वितुष्ट आले. त्या वेळी मी मानाजीच्या चौल–रेवदंडा किल्ल्यावर चढाई करून जाणार होतो, तेव्हा तुम्ही इंग्रज वकील मजकडे पाठवला आणि सलोखा घडवून आणला.

"परंतु अलीकडे मानाजीने रांजणखार येथे एक नवीन गढी बांधली आहे; ती आमच्या करंजे बंदरालगतच आली आहे; हे त्याने करावयास नको होते. अधिक काय लिहू ? तो चौल येथे आमच्याशी खटखट करतो. ही त्याची आमच्याशी वागण्याची तऱ्हा आणि म्हणून आम्ही त्याचा प्रतिकार करण्याचे ठरविले आहे. तरीसुद्धा तुम्ही मध्यस्थ म्हणून जी खटपट करीत आहात त्यात सल्ला मसलतीसाठी मी आमचा एक लायक प्रतिनिधी तुमचेकडे रवाना करितो."

वरील पत्रावरून रामाजी महादेवावर पेशव्यांनी पश्चिम किनाऱ्यावरील सुरक्षिततेची व पेशव्यांच्या आरमाराची जबाबदारी टाकलेली होती व तो मोठ्या हिकमतीने पार पाडीत होता असेही दिसते. वसईच्या पोर्तुगीझ-मराठे युद्धात त्याने वयाच्या सुमारे २१।२२ व्या वर्षी कामगिरी बजावून पेशव्यांचा विश्वास संपादन केला असला पाहिजे. तशात बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे त्याचे एके काळचे सवंगडी-आता पेशवे झाले होते; त्यामुळे नानासाहेबांचे सवंगडी व एक कर्तबगार तरुण म्हणून नानासाहेबांना आपली मूळ भूमी म्हणून पश्चिम किनारा संपूर्ण आपल्या ताब्यात व सुरक्षित हवा होता. पश्चिम किनाऱ्यावरील आंग्रे यांचे आरमार होते; परंतु आंग्रे पेशव्यांना जुमानीत नसत; म्हणूनही आपला विश्वासू माणूस त्या ठिकाणी नानासाहेबांना पाहिजे होता, तो त्यांना रामाजी महादेव या

मध्ये आढळला. म्हणून त्यांनी रामाजी महादेवाला कल्याणचा तत्कालीन सुभेदार व मुत्सद्दी श्री. वासुदेव जोशी याचे हाताखाली दिले. वरील पत्रावरून हेही दिसून येईल की वासुदेव जोशी जरी सुभेदार होता तरी रामाजी महादेवच कर्तबगारीने व अधिकाराने पश्चिम किनाऱ्यावरील हालचाली नियंत्रित करीत होता.

१७४८ मध्ये वासुदेव जोशी (मुरुडकर) सुभेदार प्रांत कल्याण भिवंडी यांनी मानाजी आंग्रे याच्याविरुद्ध चौथे तक्रारपत्र पेशवे यांना लिहिले आहे. ते म्हणतात, "सन १७४८ बंदर नागोठणे येथे पूर्वापार सावकार येतात त्यास पूर्वी खुटवा अथवा गैर उपसर्ग कुलाबकरांकडून (मानाजी आंग्रे) लागत नव्हता. हाली स्वराज्य जालिया तागाईत रेवसेस खुटवा दर खंडी चवल प्रमाणे घेत असता चवलाचा पावला, पावलाचा अर्धा व अर्ध्याचा रुपाया.........त्यामुळे सावकार दहशत घेतात. फडावर राशी, रेवसचे धास्तीमुळे नेम नाही. अंगारकास (आंग्रे यास) ताकीद पत्र पाठवावे. फडाच्या राशी पडल्यामुळे रुपया येत नाही. बंदरहि पडले."

या तक्रारपत्रावरून पेशवे व मानाजी यांमध्ये पुष्कळ खटके या नाही त्या निमित्त होत गेले; परंतु दोन्ही पक्षांनी उग्र रूप धारण केले नाही.

सन १७५१ मध्ये रामाजी महादेवाला एक सनद मिळाली आहे; त्यावरून त्यावेळी तो नामजाद (मामलेदार) झालेला दिसतो. "तुंगार्तन तर्फ आंग्रे याजकडे होता तेव्हा ब्राह्मणापासून दर बिघा १९ मण ते घेत असत. सरकारात हा तर्फ आल्यावर ब्राह्मण रयतेने तक्रार केली की कल्याण शिरस्तेप्रमाणे घेणे. त्याप्रमाणे दरबिघा ५८ =। घ्यावयाचा करार करून रामाजी महादेव नामजाद प्रांत साष्टी यास सनद "(नानासाहेब रोजनिशी पान २१४)

मानाजी आंग्रे व पेशवे याजमध्ये सलोखा झाला; परंतु मानाजी आंग्रे व रामाजी महादेव यामध्ये वितुष्ट असलेच पाहिजे; कारण मानाजी आंग्रे पश्चिम किनाऱ्यावर सत्ताधीश असता पेशव्यांतर्फे त्यांच्या सत्तेला लगाम घालून पेशव्यांचे स्वामित्व प्रस्थापित करणारा रामाजी महादेव आंग्रयांचा शत्रू झाला. पुढील एका पत्रात मानाजी १०डिसेंबर१७५२ रोजी बाळाजी पंडित प्रधान यास लिहितो, "आपले विश्वासवचनावरी सर्व खेद परिमार्जनात आणोन आहो आणि मोंगलांचे शहरा करिता आपली स्वारी जहाली. यामुळे इकडील मामलेविषयी स्वहितास उचित ते म्हणजे अस्मत्भागी शत्रूवर्ग प्रसिद्धपणात आहेत. त्यात फिरंगीयावरी खासाच आर मारावरी चढोन स्वारी केली. युक्ति योजोन, प्रतिमल राहोन अंगावरी ओढो दर्यातच ओढोन घ्यावा. तडीच सोडोन आमचे मुकाबलेस येईल. तडीस लागला तरी तरांडी तडीस जाणे नाही. लहान तरांडियावरी येताच आमचे आरमाराची खुष्कीकडून नेहरबाजी ऐसा एकदाच एलगार करावा तो रामाजी महादेव पराक्रम

विश्वासघातकी निर्माण आहेत. त्यांनी वजरटोकी शिडचा लावल्या. लघुकर्म आचरले; याप्रमाणे मामलेदाराचे आचरण आणि आपले तो आश्वासन तेव्हा काय करावे ?" (पत्रे यादी लेख ११३)

रामाजी महादेव हा पेशव्यांचे वतीने ज्यांच्यावर कारवाई करीत होता त्यांचे वतीने विश्वासघातकी ठरावा, हे रामाजीच्या कामगिरीचे प्रशस्तिपत्रक आहे. हे कबूल करावयास पाहिजे. मुंबईकर इंग्रजांनी देखील रामाजी महादेवाबद्दल असेच उद्‌गार काढले आहेत आपल्या सेनापतीस लिहिताना इंग्रज गव्हर्नर लिहितो. "रामाजी महादेव हा विश्वासघातकी पाताळयंत्री माणूस आहे." तुळाजी आंग्रे यांचे विरुद्ध कामगिरी केली म्हणून त्याला आंग्र्यांचा मुख्य शत्रू म्हणून एका पक्षपाती इतिहास-लेखकाने वर्णन करताना म्हणतात, " या मोहीमेचे पेशव्यांचे मुख्य आरमारी सरदार रामाजी महादेव ही व्यक्ती मुख्य होती. या व्यक्तीची खरी कल्पना माझ्याने करवत नाही. तत्कालीन सेनानायकांमध्ये रामाजी महादेव हा अत्यंत बलवान व दर्यावरील लढचात वाकब्गार सेनापती होता. पण दिलेली वचने मोडणारा असे वर्णन या मोहिमेत दिसून आले."

यावरून रामाजी महादेव हा तत्कालीन सेनापतींमध्ये अत्यंत कर्तबगार सेनापती, मुख्य आरमारी सरदार व सरसुभेदार होता ही प्रशस्ती त्याच्या शत्रूनेही दिलेली आहे. विश्वासघातकी व शब्द मोडणारा हे शत्रूने काढलेले उद्‌गार त्याच्या राजनीतीची व धूर्तपणाची साक्ष देतात. आंग्रे व पेशवे ह्यांचे संबंध सतत बिघडत होते व शेवटी पेशव्यांना मराठी राज्याच्या अखंडतेकरिता शिरजोर, मध्यवर्ती सत्ता न जुमानणारे, स्वराज्याचेच लचके तोडणारे, मराठी सत्तेला तुच्छ लेखणारे आंग्रे हे ब्रिटिश, इंग्रज, शिद्दी व पोर्तुगीज ह्याप्रमाणेच स्वकीय शत्रू झाले. म्हणून पेशव्यांना मोहीम काढावीच लागली व त्या मोहिमेचे नेतृत्व दर्यावर्दी सेनापती सुभेदार रामाजी महादेव बिवलकर यांजकडे दिले.

तुळाजी आंग्रे याजवर मोहीम काढण्यास जी कारणे घडली ती प्रामुख्याने अशी- गेलेला मुलुख परत मिळावा अशी पोर्तुगीझांची खटपट पुन्हा चालू झाली. तो प्रयत्न हाणून पाडण्यासाठी पेशव्यांनी वाडीकर सावंतामार्फत पोर्तुगीझांवर आक्रमण चालविले. तेव्हा तुळाजीने पोर्तुगीझांशी सख्य करून सावंतांचा मुलुख मारला. शाहू मरण पावल्यावर पेशव्यांना शह देण्याकरिता ताराबाईने पोर्तुगीझांस पेशव्यांचा पाडाव केल्यास तुम्हास वसई देऊ म्हणून कळविले. सलाबत-जंग, बुसी, डुप्ले वगैरे फ्रेंचांकडेही ताराबाईने कारस्थान लावले. पेशव्यांनी सर्वांचा क्रमाने बंदोबस्त करून मग स्वराज्यद्रोही तुळाजी आंग्र्यावर हत्यार धरले. तुळाजीने पेशव्यांशी ज्याची गोडी त्या सर्वांना उपद्रव देण्यास सुरवात केली. प्रतिनिधी,

अमात्य, सावंत इत्यादींवर नाहक बळजोरी केली. विशाळगडचा किल्लेदार लिहितो, "आंग्र्याने मर्यादा सोडून मुलखाचा उच्छेद केला." पेशव्यांचे वकील तुळाजीकडे आपली बाकी मागण्यास गेले असता बसूल तर दिला नाहीच, पण त्यांची नाके कापली असे इंग्रज इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. पेशवे-छत्रपती हे स्वराज्याचे धनी व आंग्रे हे त्यांचे नोकर हे नाते तुळाजीने कधीच मानले नाही. रत्नागिरी किल्ला अमात्यांचा असता आंग्र्याने हल्ला करून घेतला, तो पेशव्यांनी परत मागितला व त्याचा सुवर्णदुर्गही स्वराज्यात सामील करा म्हणून मागणी केली. तेव्हा तुळाजीने उत्तर दिले 'सुईच्या अग्राइतकीही मृत्तिका देणार नाही.' तुळाजी अत्यंत हेकट, ताठर व मोडेन पण वाकणार नाही या प्रवृत्तीचा; त्यामुळे पेशव्यांना त्याच्यावर मोहीम सुरू करणे भाग पडले. पेशव्यांनी स्वराज्याला विरोध करणारांना नमवून स्वराज्यसेवेत लावले, परंतु तुळाजीबाबत पेशव्यांचा नाइलाज झाला व पेशव्यांनी रामाजी महादेवाकडे ही कामगिरी सोपवून तुळाजी आंग्रे याजवर मोहीम चालू केली. शिवाजीमहाराज असते तर त्यांनीही चंद्रराव मोरे-प्रमाणे स्वकीय शत्रूंचा नाशच केला असता.

रामाजी महादेवाने लगेच आपले फितूर व भेदी सुवर्णदुर्गात व विजयदुर्गात सोडले. तुळाजी आंग्रेचे आरमार फार बलवान; त्यामुळे एकटचा पेशव्यांच्या आरमाराला तो दाद देणार नाही हे ओळखून पेशव्यांच्या संमतीने रामाजी महादेवाने इंग्रजांशी आरमारी मदतीचे बोलणे लावले. इंग्रजांशी बोलणे लावण्यात आणखी एक हेतू असा की इंग्रजांना तहात गुंतवले तर निदानपक्षी ते आंग्रे यांना पेशव्यांच्या विरुद्ध मदत करणार नाहीत. रामाजीपंताने तुळाजीचा भाऊ मानाजी आंग्रे यासही या कटात सामील करून घेतले. रेवदंडा येथील रामेश्वराचे देवळात उभयतांच्या आणाशपथा झाल्या. तुळाजी विरुद्ध इंग्रजांशी कारस्थान रचले जात असल्याचे रामाजीने त्यास सांगितले. तुळाजीचा सुवर्णदुर्ग किल्ला काबीज करण्यास मानाजी अनुकुल झाला. पुढील युद्धात मात्र मानाजीने भाग घेतला नाही.

तुळाजी आंग्रे याजविरुद्ध इंग्रजांशी देखील रामाजीने मदतीचा तह करून घेतला. इंग्रजांना तुळाजीने एवढा त्रास दिला होता की इंग्रज तर तुळाजीच्या नाशाची वाट पहात होते. परंतु त्यांच्या एकटचाच्याने निभावण्यासारखी ही गोष्ट नव्हती. तेव्हा रामाजी व इंग्रज यामध्ये मदतीचा तह होऊन पेशव्यांची त्याला मान्यता मिळून पेशवे व इंग्रज यांमध्ये तहावर शिक्कामोर्तब झाले. पेशव्यांनी १७५५ च्या या तहाप्रमाणे १७५५ च्या अखेरीस मोहीमेस अनुज्ञा दिली. रामाजी महादेवाच्या मदतीकरता कृष्णाजी महादेव चासकर, कल्याणचा एक वेळचा सुभेदार, शंकराजी केशव फडके यांना कामगिऱ्या दिल्या. शिवाय वाडीकर सावंत,

Scanned with Car

कोल्हापूरकर संभाजी, अमात्य, प्रतिनिधी, यांनीही जरूर ते सहाय्य करावे अशा सूचना दिल्या. जावजी गौळी व खंडोजी माणकर हे पेशव्यांचे सरदार कोकणात होतेच. बाजीरावपुत्र समशेर बहाद्दर व दिनकर महादेव हे सरदार मुद्दाम रामाजीपंताचे मदतीसाठी पाठवून दिले.

८ फेब्रुवारी १७५५ च्या पत्रात पेशवा नानासाहेबाने बुशिअर यास लिहिले, "आपलेकडून शिवाजी रणछोड यांनी येऊन हकीगत कळविली ती समजली. त्यास आमची कबुली आहे. आपणा उभयतांचा स्नेह इतक्या दिवसांचा आहे तेव्हा आपली सल्ला योग्य वाटते. आमच्या तर्फे बोलणे करण्यास रामाजीपंत यांस पूर्ण अधिकार देऊन पाठविले आहे. ते लवकरच जाऊन दाखल होतील. आपण आपले आरमार तयारीत ठेऊन मद्रासचे आरमारही मदतीस बोलवावे अशी विनंती आहे."

या पत्राप्रमाणे रामाजीपंताने इंग्रज गव्हर्नरास भेटल्यावर पेशव्यास कळविले. नंतर पेशव्यानें पुन्हा इंग्रजास ११ फेब्रुवारी १७५५ ला लिहिले, "आपले सविस्तर पत्र पोहोचले व रामाजीपंतांनी आपणास भेटून घडलेली हकीगत निवेदन केली. तुमच्या सरकारची आमच्याशी स्नेह राखण्याची इच्छा पाहून संतोष होतो. आम्ही रामाजीपंतास आपणाकडे पाठविले आहे. ते स्वारीसंबंधी आपणाशी वाटाघाटी करतील. तरी पुढील तजवीज अविलंबे करावी."

१० मार्च १७५५ रोजी इंग्रज गव्हर्नर व कौन्सिल यांनी नानासाहेब पेशवे यांच्या पत्राचा विचार करून रामाजीपंताबरोबर पुढील उद्योगाची वाटाघाट करण्याचा ठराव केला. रामाजीपंताने निकड लावली होती की प्रथम तुळाजीचे मुख्य ठिकाण विजयदुर्ग काबीज करावे. परंतु पावसाळा नजीक आल्याने विजयदुर्गाची स्वारी अगोदर हाती घेऊ नये. प्रथम सुवर्णदुर्ग किल्ल्यास इंग्रजांनी समुद्रातून वेढा घालावा आणि मराठ्यांनी जमीनीवरून हल्ला करावा असे ठरून त्याप्रमाणे इंग्रजांनी आरमार रवाना केले. त्यांचे जोडीला मराठ्यांचेही आरमार देण्यात आले. मराठ्यांचा आरमार-प्रमुख म्हणून नानापंत होता.

खुष्कीच्या मार्गाने मराठ्यांची फौज समशेर बहाद्दर व दिनकरपंत यांच्या हाताखाली देवरूख येथे मुक्कामास आली. तेथून ते सुवर्णदुर्गावर येत होते. रामाजी महादेव तुळाजीवर चाल करून साष्टीस गेले. तो सुरतेहून हबशी चार हजार आला. त्याने मानाजीच्या किल्ल्यास वेढा घातला. त्याचे व हबशांचे युद्ध झाले. तेव्हा मानाजीचे सहाय्यास रामाजी महादेव इंग्रजांना घेऊन गेले. युद्धात हबशाचे १॥ हजार माणूस ठार झाले. एकदोन मातबर सरदार पडले. हबशाचा मोड करून उंदेरीत घातले व सारे आरमार व इंग्रज विजयदुर्गावर जाणार. (२० मार्च १७५५)

२२ मार्च १७५५ ला पाच वाजता आरमार मुंबई बंदरातून बाहेर पडले. राजापूरजवळ आंगऱ्यांची अठरा जहाजे दिसली. त्यांचा पाठलाग केला तेव्हा ती पळून गेली. नंतर दोन दिवसांनी पेशव्यांचे आरमार चौल बंदरातून बाहेर येऊन इंग्रजास मिळाले. त्यात ७ तारवे, एक बातेला आणि ६० गलबते होती. चार दिवसांनी आंग्र्यांची जहाजे सुवर्णदुर्गास पोहोचल्याचे कळले. तेव्हा पेशव्यांची जहाजे घेऊन आंगऱ्यावर हल्ला करण्याचा बेत इंग्रजांनी केला तेव्हा रामाजी महादेवाने त्यास विरोध केला. कारण नुकसान फक्त पेशव्यांच्याच आरमाराचे झाले असते. म्हणून दोन्ही आरमारांची फाटाफूट होता कामा नये असा आग्रह रामाजी महादेवाने धरला व इंग्रजांचे मतलबी कारस्थान हाणून पाडले. २९ तारखेला दोन्ही (इंग्रज व पेशवे) आरमारे यांचा व आंगरे यांचे आरमारांचा सामना झाला. तोफांची सरबत्ती झाली. आंगरे आरमार पळू लागले, त्याचा ३ वाजेपर्यंत पाठलाग केला. मागे रामाजीने आपल्या आरमारासह सुवर्णदुर्गाजवळ थांबून काही लोक व एक तोफ किनाऱ्यावर उतरवून मारगिरी चालू केली होती. इंग्रज आरमार परत आल्यावर २ एप्रिलला सुवर्णदुर्गावर तोफखाना चालू केला. रात्री वादळ झाल्यामुळे बंदराबाहेर इंग्रज आले तेव्हा रामाजीने बातमी दिली की किल्लेदार व आठ माणसे ठार झाली असून किल्ल्यात फारसे माणूस नाही. तेव्हा रामाजीने आपली फौज जमिनीवर उतरवली व किल्ल्यावर हल्ला केला. दोन्ही-कडून मारा झाल्याने किल्ला जेरीस आला व रामाजीपंताच्या हस्तगत झाला. ही गोष्ट बहुधा इंग्रजास आवडली नसावी. कारण त्यांना त्यात काही लूट मिळाली नाही. रामाजीने हा धूर्तपणा जो दाखवला त्याचा वचपा इंग्रजांनी विजयदुर्गा-वरील हल्ल्यात काढला. " रामाजीपंत हा दयार्द्र अंतःकरणाने लोकांची विचारपूस करीत आहे. " असे इंग्रज कप्तानाने लिहीले आहे. त्याच पत्रात रामाजीपंताबद्दल अनुदार उद्गार काढले आहेत व आपण एकट्यानेच हा किल्ला जिंकला असे लिहिले आहे. परंतु हेही कबूल केले आहे की किल्ल्यातील लोक तहाचा बावटा घेऊन रामाजीपंताकडे आले व किल्ला मराठ्यांचे ताब्यात आला.

१७ एप्रिलमध्ये रामाजीपंताने इंग्रज प्रेसिडेंटास पत्र लिहून कळविले " आपल्या मदतीने आम्ही सुवर्णदुर्ग व दुसरे सहा किल्ले घेतले व रसाळगडावर मोहीम करणार होतो; परंतु पेशवे याजकडून हुकुम आला की अंजनवेल व दाभोळच्या हद्दीतले किल्ले प्रथम घ्यावे. दामोदरपंत व समशेरबहादुर हे आता आमचे मदतीस आले आहेत. तरी पुन्हा मदत पाठविण्यास आपण अवमान करणार नाही."

सुवर्णदुर्गाच्या लढाईसंबंधाने रामाजी महादेवाने पेशव्यास कळविले, " गोवे कनकदुर्ग, व फत्तेगड असे तीन भाग सुवर्णदुर्गाचे पोटात आहेत. आंजर्ल्याचे बंदरी

Scanned with Car

गोडीबावीवर येऊन मोर्चेबंदीस लोक बसविले, तो गोव्यातील दोन अडीचशे माणूस हर्णेचे पेठेस अग्न लावून युद्धास आले; त्यास मारून बाहेर लावले. खुष्कीचा मार व इंग्रजांच्या मन्वरांचा मार व गुराबांचा (पेशवे आरमार) ऐसा चहुकडून लगट केला. सुवर्णदुर्गातील कोठी व दारुखान्यास आग लागून निम्मा किल्ला जळाला. तेव्हा आपलेकडील दोघे भले मनुष्य पाठवले. बोलोन गेले त्याप्रमाणे बाहेरचे तीन किल्ले फत्ते जाले. सुवर्णदुर्गातही निशाण चढले.

"१६ एप्रिल १७५५ चे वर्तमान. रामाजी महादेवांनी आंग्र्यांचे चारी किल्ले घेतले. भेदाने काम झाले. आंगऱ्यांचे सारे लोक भेदरले आहेत. सुवर्णदुर्ग घेताच बाणकोट, पालगड, रसाळगड, याजवर निशाणे गेली. आठ दिवसात आठ किल्ले घेतले. आंग्र्यांचा विनाशकाल आला. कोणी किल्ला झुंजत नाही. विजयदुर्ग घेतला म्हणजे आंग्र्यांचे राज्य बुडाले. श्रीमंतांचा पुण्यप्रताप थोर आहे."

१७५५ चे आरंभी समशेर बहाद्दर व दिनकर महादेव यांची रवानगी पुण्याहून कोकणचे मोहिमेवर झाली. ते येऊन पोहोचेपर्यंत सुवर्णदुर्गाचा कार्यभाग पुरा झाला होता. तेव्हा त्यांनी आंबेघाटाने उतरून रत्नागिरी किल्ल्यास वेढा घातला. पण पर्जन्य आल्याने किल्ला लागोलाग हाती आला नाही. पेशव्याने इंग्रजास मुद्दाम लिहिले की समशेर बहाद्दरांनी रत्नागिरीस वेढा घातला आहे; तरी त्या कामावर आपले आरमार पाठवावे. परंतु पर्जन्यकाळ समीप आला आहे या सबबीवर त्यांनी आपले आरमार बाहेर काढले नाही. रामाजीपंतांनी नाही नाही त्या विनंत्या केल्या. पण इंग्रजांनी त्या मानल्या नाहीत. रामाजीची नाउमेद झाली. काम लांबणीवर पडले.

आंगऱ्याने अंजनवेल व गोवळकोट ही दोन स्थळे सिद्द्याच्या ताब्यातून मिळवून शाहूमहाराजांकडून शाबासकी मिळवली होती. परंतु ती स्वराज्यात सामील न करता तो बळकावून बसला होता. ती त्याजकडून काढण्याकरिता रामाजीपंताने सुवर्णदुर्ग घेतल्याबरोबर अंजनवेल व रत्नागिरीवर फौजा पाठवल्या. त्या कामी इंग्रज कराराप्रमाणे साहाय्यास आले नाहीत. १७५५ अखेर अंजनवेलीस मोर्चे बसविले. पुढे महिपतराव कवडे व हरि दामोदर आले. त्यानी चौबुर्जी घेऊन किल्ला जेर केला. आंगऱ्यांचा सरदार मोत्याजीराव विचारे यानी झुंजीची शर्थ केली. १४ जानेवारी १७५६ ला निशाण लावून किल्ला हस्तगत केला. त्याच वेळी गोवळकोटावर फौज गेली होती. तिनें तोही किल्ला हस्तगत केला. रत्नागिरीवर समशेर बहाद्दर ठासून बसला होता. त्याच्या मदतीस माहुलीचा किल्लेदार मोराजी शिंदे व खंडोजी माणकरही आले. पर्जन्य संपल्यावर हल्ला करुन रत्नागिरीचा उंच किल्ला १८ फेब्रुवारी सन १७५६ या दिवशी घेतला. त्याचबरोबर आंग्र्यांची दुसरीही कित्येक स्थळे पेशव्यांचे हाती आली.

विजयदुर्गाचा पाडाव

वरील स्थळे हस्तगत झाल्याचे जावजी बाबागोळी याने पेशव्यास कळविले. त्यास पेशव्यांनी उत्तर दिले, "वरील स्थळे हस्तगत झाल्यावर मुख्य स्थळास लागावयाचा सिद्धांत केलाच असेल. [राजश्री रामाजी महादेव आरमारासुद्धा आले असतीलच. त्यानंतर मनसुबा काय केला वगैरे कळविणेस रामजी महादेवास लिहिले आहेच. त्यांच्या विचारेकरून मनसुबा करून मुख्य स्थळ हस्तगत होऊन स्वामीसेवा घडे ते गोष्ट सत्वर करणे."

रामाजी महादेवाने केलेली मसलत रामाजी तर्फे पेशव्यांना पाठवलेल्या पत्रात आहे. त्यात म्हटले आहे–

"येथे आलियावरी प्रथम रामाजी महादेव, नारो त्रिंबक, रावोजी आंग्रे, रुद्राजी धुळप, बकाजी चंदरराव, आण्णाजी बेलासे, मोराजी शिंदे, कृष्णाजी महादेव वगैरे लहानथोर सरदार यांचे बिन्हाडी जाऊन स्वामींचे आज्ञेप्रमाणे मजकूर सांगितला. लहान थोर सर्व सरदार रामाजी महादेव याचे बिन्हाडी बोलावून आणून हल्ला करावयाची मसलत पक्की सर्वांनी केली आणि धारकरी माणूस एकवीसशे निवडून त्यांची हजेरी मी घेतली. आरमारी महागिऱ्या होडचा ऐशा दारुगोळी देखिल वाटली. चौहो जागा चौघांनी नेमून घेतल्या. एक वेळचा महादेव करून हल्ला करावा याप्रमाणे करार केला, आणि सर्व बिन्हाडास गेले. मग जोशी आणून दिवस नेमला. फाल्गुन वद्य तृतीयेस हल्ला होणार. स्वामींचे प्रतापेकरून सर्वांस यश यावे ऐसे आहे. वरकड नारोपंत म्हणत होते काशाचे राजकारण करतो आणि येतो. त्यास जंजिरातील माणूस मागेच कुमकेस गेले. त्यामुळे राजकारण राहिले. आता हल्ला करून कासा घ्यावा. कासा आला म्हणजे जंजिरे यास किमपीही नाही." वरील सर्व मसलत ठरली त्या वेळी तुळाजी आंग्रे थोडासा घमेंडीत राहिला. मुंबईकर एकदम चालून येतील अशी त्याची अटकळ नसून इंग्लंडातून नवीन आरमार आले याची वार्ता त्यास नव्हती. आज दोन वर्षे वाटाघाटी चालल्या तशाच पुढे चालतील, दोघा सत्ताधीशाना सुवर्णदुर्ग घेण्याचे केवढे प्रयास पडले, त्याप्रमाणे आपण असेच त्यास झुंजवीत काळ काढू आणि गोवेकराची मदत आणवून मग इंग्रजांशी सामना करू, अशी त्याची समजूत होती. ता. ५ नव्हेंबरला तुळाजीचा पोर्तुगीझाशी तह झाला आणि त्यांचे पाचशे सैनिक त्याच्या मदतीस विजयदुर्गावर आले. ही बातमी पेशव्यास येताच त्याने त्याजबद्दल गोव्यास चौकशी केली.

रुद्राजी धुळप म्हणून तुळाजीचा इतबारी सरदार होता. त्यास त्याने पेशव्यांच्या फौजेशी जमिनीवर सामना करण्यास पाठविले. ता. ११ डिसेंबर रोजी धुळपाचा व पेशव्यांच्या फौजेचा संग्राम खारेपाटणवर झाला. "रुद्राजी धुळप आरमार, दारू-गोळा, बाण, सरंजाम सुद्धा आले. त्यापूर्वी जावजी गौळी व आनंदराव बर्गे यांनी

मोर्चे लावले होते. रुद्राजींनी प्रातःकाळीच उतरून पेशव्यांचे लष्करावर चाल केली. कृष्णाजी महादेव टेकडीच्या माथ्यावर होते. त्यांच्याने दम धरवेना; मग आम्ही घोडी घालून करोलांनी मार दिला. रुद्राजी धुळप, दुलबाजी माने व फिरंग्यांचा सरदार अशा मर्द माणसास गोळीच्या जखमा झाल्या. पाच सात फिरंगी ठार झाले. रुद्राजीचा मोड होऊन हस्तगत झाले. तुळाजीवर इभ्रत बसली. (पे. द. २४।१०५, १३१, १३७, १३९, १४२-१४४)

क्लाइव्ह व वॉटसन् नुकतेच युरोपातून मद्रासेत व तेथून आरमारासह मुंबईस आले. त्यास विजयदुर्गावर पाठवण्याचे ठरवून ता. ६ फेब्रुवारी स. १७५६ रोजी प्रेसिडेंटाने हुकुम दिला—

"तुळाजी आंगरे सापडल्यास त्यास मुंबईस आणावे. पेशव्यांचे हाती देऊ नये. जिवंत अगर मृत कसाहि आणावे. तुळाजी विश्वासघातकी. पहिल्या प्रतीचा लबाड आहे. तुम्हास लाच देऊ करील; परंतु विश्वास ठेवू नये. विजयदुर्ग काबीज केल्यावर पेशव्यांचे स्वाधीन करू नये. तुळाजीस पेशव्यांचे स्वाधीन करू नये; कारण त्याचा सबंध काटा काढून टाकावा हे आपणास श्रेयस्कर आहे. पेशव्याचे हाती दिल्यास ते त्यास पुन्हा मोकळा सोडतील व तो परत आपणास त्रास देऊ लागेल."

१७५५ चा पावसाळा संपताच म्हणजे आरमारी युद्ध चालू होण्याचे अगोदर पासून पेशव्यांची फौज खंडोजी माणकराचे हाताखाली आंगऱ्यांचे मुलखात शिरून उत्तरेकडून दक्षिणेकडे रामाजीपंताच्या सल्ल्याने प्रदेश काबीज करीत चालली. डिसेंबर व जानेवारी महिन्यात विजयदुर्गशिवाय बाकीचा सर्व प्रदेश पेशव्यांचे हाती आला. दरम्यान विजयदुर्गावर आरमार पाठविण्यासंबंधी रामाजी महादेवाने इंग्रजाकडे टोचणी लावली. विजयदुर्ग दुर्भेद्य असल्याने पुष्कळ काळ संग्राम चालेल असा संभव वाटून नव्हेंबरातच इंग्रज चालून आले पाहिजे होते. त्यांना विलंब लागल्याने हे बेइमानी असे रामाजीपंतास वाटले.

७ फेब्रुवारी रोजी इंग्रजांनी मुंबई सोडली. विजयदुर्गाजवळ येताच वॅटसनचा एक विश्वासू मदतनीस एक लहानसे गलबत घेऊन बंदराची टेहेळणी करून निघून गेला. पाण्याचा अंदाज व बंदराची रचना ह्याचा अंदाज मिळताच त्याने आपले आरमार बंदरात आणले.

इंग्रजांची जहाजे विजयदुर्गावर येताच त्यांच्या साहाय्यास रामाजी महादेवाने आपले आरमार आणले. मराठी फौज पूर्वेच्या बाजूस जमिनीवर ठाण मांडून बसलीच होती. त्यामुळे विजयदुर्ग पाण्यातून व जमिनीकडून संपूर्ण वेढला गेला. तीन महिने इंग्रजांची सामसूम असल्यामुळे एवढे मोठे संयुक्त आरमार आपल्यावर येईल याची तुळाजीस कल्पना नव्हती. एकदम सर्व बाजूंनी हल्ला आल्याने त्याचा धीर

Scanned with Ca

सुटला. बायकोच्या बंधूस किल्ल्याचे रखवालीस ठेवून त्याने रामाजीपंताच्या भेटीस त्याच्या छावणीकडे धाव घेतली. एवढे दिवस शाहू, पेशवे ह्यांना न जुमानणारा व रामाजीपंतास कस्पटाप्रमाणे लेखणारा तुळाजी रामाजीपंताच्या दारी दाती तृण घेऊन आला. रामाजीपंताने त्याला पूर्ण शरण आणण्यासाठी तीन दिवस ताणून धरले. त्याच्या विनवण्याकडे त्याने तीन दिवस लक्षच दिले नाही. चौथ्या दिवशी इंग्रज व मराठे संयुक्त आरमार येताच त्या आरमाराने तोफांचा मारा किल्ल्यावर सुरू केला. तुळाजीनेहि तितक्याच निकराने इंग्रजांच्या जहाजावर मारगिरी चालविली.

दिनांक १२ फेब्रुवारीस तुळाजीची व रामाजीपंताची तहाची बोलणी चालू असल्याचे इंग्रजास समजले, तेव्हा याबाबत तुळाजीस संधी द्यावयाची नाही असे इंग्रजांनी ठरविले व किल्ला स्वाधीन करून देण्याविषयी त्यास निरोप पाठविला. ठरलेल्या वेळात उत्तर न आल्यामुळे इंग्रजांनी तोफाचा मारा सुरू केला. तहाच्या बोलण्याचा शेवट झाला नसताना इंग्रजांनी तुळाजीवर हल्ला केला, हे रामाजी महादेवास आवडले नाही. त्याने थोडा फार प्रतिकार करावयाचा प्रयत्न केला. परंतु जमले नाही. कारण स्वतःचेहि आरमार समुद्रात होते व इंग्रज हे मदतीस मित्र म्हणून आले होते. त्यांच्याशी युद्ध करणे पेशव्यांच्या संमतीवाचून शक्य नव्हते. रामाजी महादेव इंग्रजांच्या ह्या लबाडीमुळे व बेमुर्वतखोरपणामुळे अडचणीत सापडला.

इंग्रजांनी ही गोष्ट जाणून बुजुन केली होती. त्यांना त्यांचा शत्रू तुळाजी आंग्रे नष्ट करावयाचा होता व किल्ला बळकवावयाचा होता. इंग्रजांनी तोफांचा भडिमार चालविला तेव्हा त्यातील एक गोळा तुळाजीचे एक जहाज ' रेस्टोरेशन ' नावाचे होते त्यावर पडला (हे तुळाजीने इंग्रजाचेच पळविले होते). त्यात सर्व दारुगोळा होता, त्याने पेट घेतला व आंग्र्यांचे सर्व आरमार एकत्र असल्यामुळे पेट घेऊन जळून खाक झाले. तेव्हा इंग्रज मराठचांची छावणी व लष्कर ह्यामध्ये जमिनीवर उतरला. किल्ल्यातून शरणागतीचे पांढरे निशाण दाखवण्यात आले' नंतर ते किल्ल्यात जाऊन प्रथम सर्व द्रव्यसंचय ताब्यात घेतला. किल्ल्यावर पांढरे निशाण लागलेले पाहताच मराठी लष्कर छावणीतून किल्ल्याकडे गेले. त्याजपुढे इंग्रजांचा अधिकारी कॅ. फोर्ब्ज हाती नागवी तलवार घेऊन आडवा आला व म्हणाला, ' खबरदार पुढे याल तर या तलवारीने डोचकेच छाटीन. ' मराठचांनी कप्तानावर तलवार न धरता ते परत छावणीत गेले.

इंग्रजांना तुळाजी न सापडता तो रामाजी महादेवाच्या स्वाधीन झाला. रामाजी महादेवाने निरोप पाठवून सांगितले, तुळाजी तहासाठी येत आहे. तेव्हा प्रथम स्वतः गुराबे, गलबते घेऊन रामाजो महादेव इंग्रजांच्या तरांडचावर गेला

तेव्हा इंग्रज आरमार-प्रमुख क्लाईव्ह व वॉटसन यांनी या प्रसंगी त्यांना दुरुत्तरे केली. तुमचा तह प्रेसिडेंटशी झालेला आहे. आम्ही तुम्हाला ओळखीत नाही व छद्मीपणाने रामाजी महादेवाला विचारले, आम्ही तुम्हाला कैद केले आहे; तुम्ही काय करणार आहात? ही भेट एकांतात होती. रामाजी महादेवाने इंग्रजांना पूर्ण ओळखले होते; तो स्वतःही धूर्त होता. त्याने ताबडतोब आपल्या हातातील काठीत गुप्ती होती ती उपसली व वॉटसन–क्लाइव्ह ह्यांपैकी एकाच्या छाताडावर टेकवली व खुणेचा इशारा केला व म्हणाला, "मी या गुप्तीने तुम्हाला आता ठार करणार आहे. तुम्ही काय करणार आहात?" एवढ्यात गुप्त वेषाने (मोळी विकण्याच्या मिषाने) अगोदरच इंग्रज जहाजावर चढून आलेले मराठा सैनिक तलवारी घेऊन आत आले. त्यांना पाहून रामाजीने सांगितले, माझे सैनिक मला तर घेऊन जातीलच; पण तुमचे आता प्राण कोण वाचविणार? वॅटसन व क्लाइव्ह एकदम शरण आले व म्हणाले, "तसा आमचा हेतू नव्हता. आम्ही नुसती मस्करी केली." तेव्हा रामाजीने त्यांना पुन्हा बजावले, "किल्ला ताब्यात मुकाट्याने द्या. नाहीतर परिणाम बरा होणार नाही." एवढे बजावून रामाजी महादेव आपल्या गलबतातून परत किनाऱ्यावर आला. पुढेही इंग्रजांनी लवकर किल्ला ताब्यात दिला नाही. तेव्हा रामाजी महादेवाने पेशव्यांकडून इंग्रज प्रेसिडेंटास दमाचे पत्र लिहवून किल्ला द्यावयास लावला. किल्ला इंग्रजाने लवकर मुकाट्याने द्यावा म्हणून रामाजी महादेवाने १ लक्ष रुपये लाचही देऊ केली होती. तेव्हा त्याने काही मुलुख व तुळाजीस ताब्यात मागितले. अर्थातच रामाजीने तुळाजीस तर ताब्यात दिले नाहीच; परंतु किल्लाही खाली करून द्यावयास लावला. या अपमानाचा बदला रामाजी महादेवाने पुढे इंग्रज वकिलाला धडा शिकवून घेतला.

पेशव्यांची सत्ता संपूर्ण हिंदुस्तानभर पसरू लागलेली दिसताच इंग्रजांनी आपले धोरण बदलून पेशव्यांशी सलोखा करण्यासाठी आपला वकील पुणे दरबारी पाठविला. २४ ऑगस्ट १७५९ रोजी सकाळी वकील प्राइस मुंबईहून निघाला. दि. २९ ऑगस्टला त्याने कल्याण सोडले व दि. ४ सप्टेंबर १७५९ रोजी पुणे येथे संगमावर पोहोचला व लगेच पेशव्यांस खबर पाठविली. रामाजीपंताचा सेक्रेटरी बाबाजी चिटणीस हा सदाशिवराव भाऊकडून भेटीस आला. कारण पेशव्यास सुतक होते व ते बाहेर पडत नव्हते. दि. ६ सप्टेंबर रोजी रामाजी पंताचा नातलग हरिपंत भेटीस आला. दि. १० सप्टेंबरला पेशवे सुतकातून मोकळे होऊन बाहेर पडले. दि. १२ सप्टेंबरला इंग्रज वकील प्राइस त्यांचे भेटीस गेला. त्या दिवशी फारसे बोलणे झाले नाही. दि. १७ सप्टेंबर १७५९ रोजी पर्वतीवर पेशव्यांची भेट झाली, तरी पेशवे फारसे बोलले नाहीत. तेव्हा चौकशी करता त्यास समजले की इंग्रजांनी विजयदुर्गबाबत जी वागणूक केली त्यामुळे व रामाजी महादेवाने जंजिऱ्याच्या शिद्दीवर जी मोहीम चालविली त्या वेळी मदत न करता उलट

हबशासच मदत केल्यामुळे पेशवे फार रागावले आहेत. तेव्हा इंग्रज वकील दि. १९ सप्टेंबर रोजी गोविंद शिवराम ह्यांचे भेटीस गेला. त्या भेटीत गोविंद शिवरामने सांगितले "तुम्ही सुरत सोडून या व जंजिरा जिंकण्यास मदत करा." तेव्हा इंग्रज वकिलाने या गोष्टी इंग्रजास कबूल नाहीत असे सांगितले. तेव्हा गोविंद शिवरामानेही सांगितले की "हे दोन मुद्दे कबूल न केल्यास तुमचा आमचा बेबनाव झाल्याशिवाय राहणार नाही." इंग्रज वकिलाने पेशव्यांचे भेटीसंबंधी विचारले तेव्हा गोविंद शिवरामाने उत्तर दिले, याबाबत तुम्ही रामाजी महादेवास पत्र लिहा. दि. २० रोजी इंग्रज वकिलाने रामाजी महादेवास पत्र लिहिले. दि. २४ ला पेशव्यांनी इंग्रज वकिलास भेटीस बोलावले. दरबारात इकडच्या तिकडच्या गोष्टी होऊन पेशव्यांनी तहाबाबत गोविंद शिवराम व रामाजी महादेव याजबरोबर बोलणी करावी, त्यांचेबरोबर होणारी बोलणी हीच कायम समजा असे सांगितले. रामाजी महादेव व गोविंद शिवराम यांनी वरचेच दोन मुद्दे धरून हे मान्य नसतील तर आल्या पावली माघारी जा असे स्पष्ट सांगितले.

ज्या रामाजी महादेवाचा पाणउतारा करण्याचा प्रयत्न इंग्रजांनी प्रथमपासून चालविला होता, त्यानाच पेशव्यामार्फत आपल्या पायाशी यायला लावले व एक प्रकारे अपमानाचा सूड घेतला. तसेच रामाजी महादेवाचे पेशव्यांवर केवढे वजन आहे हेही इंग्रजांचे नजरेस आले.

१७५७ नंतर रामाजी महादेव संपूर्ण सुभेदार झाला व त्याजकडे कल्याण, कुलाबा, मावळपर्यंत व नाशिकपर्यंत आणि खाली रत्नागिरीपर्यंतचा प्रदेश होता. पेशव्यांचा आरमारप्रमुख म्हणूनही तोच काम पहात होता व आपल्या हयातीपर्यंत इंग्रज, पोर्तुगीझ, जंजिऱ्याचा सिद्दी यांच्यावर त्याने कडक दबाव ठेवून काहीही गडबड करू दिली नाही. या काळात पानिपतचे युद्ध झाले. मराठ्यांचा फार मोठा पराभव झाला. परंतु कोकण किनारा १७७२ पर्यन्त संपूर्ण सुरक्षित ठेवण्याची कामगिरी रामाजी महादेवाने बजावली.

रामाजी महादेव हा कोकणचा सरसुभेदार असल्यामुळे त्याचा एका ठिकाणी सदैव मुक्काम नसे. शिवाय पेशवे दरबाराशी सतत संबंध ठेवावा लागत असल्यामुळे काही काळ पुण्यास व बाकीचा काळ तो ठाणे येथे वाडा बांधून तेथून कारभार करू लागला होता. ठाणे येथे आज जी जिल्हाकोर्टाची नवी इमारत आहे ती रामाजी महादेवाचे मूळ वाड्याचे पाठीमागील शिवारात आहे व त्या अगोदर पुढे असलेल्या रामाजी महादेवाचे जुन्या वाड्यात कोर्ट भरत असे. तो वाडा संपूर्णपणे पेशवे वाड्याच्या धर्तीवर बांधलेला आहे. त्यानंतर त्याने उत्तर काळात कल्याण येथे एक नवा वाडा बांधला.

रामाजी महादेवाने कल्याणच्या वाड्याची मुहूर्तमेढ शके १६८८ च्या फाल्गुन महिन्यात रोवली. कार्तिकात पाया खणण्यास आरंभ केला व शके १६९१ मध्ये



कल्याण सुभेदार रामाजी महादेव बिवलकर यांचा कल्याण येथील नवा वाडा.

(सन १७६९) पूर्ण झाला. कारण रामाजी महादेवाचे जमाखर्चाच्या वह्यांत या सर्व घटनांची नोंद असून शके १६९१ मध्ये "२५ रु. बक्षिस खर्च, तीन वर्षे नेहमी वाड्याच्या कामावर चाकरी करतात त्यास रुप्याची कडी दिली" अशी नोंद आहे. हा वाडा बांधल्यानंतर ते कल्याणास राहण्यास आले असावेत. रामाजी महादेव फार काळ या वाड्याचा उपभोग घेऊ शकले नाहीत. कारण शके १६९४ मध्ये म्हणजे सन १७७२ मध्ये श्रावण महिन्यात पुणे मुक्कामी वारले. त्यांची पत्नीही पुढे तीनच वर्षांनी निवर्तली (शके १६९७ च्या आश्विन महिन्यात म्हणजे सन १७७५ मध्ये). हिच्या उत्तर कार्यास १५९८॥= खर्च केला अशी त्यांच्या जमाखर्चाच्या वहीत नोंद आहे. खुद्द रामाजी महादेवांच्या वर्षश्राद्धास रु. २०७७८= खर्च झाले अशीही नोंद आहे. रामाजी महादेवाने पेशव्यांच्या तीन पिढ्या चाकरी केली. पहिले बाजीरावसाहेबांनी त्याला शागीर्दातून काढून कामगिरीला पाठवले.

चिमाजीअप्पासाहेबांबरोबर वसईच्या युद्धात चमकला. नंतर नानासाहेब पेशव्यांची त्याने आपल्या कर्तबगारीने उत्तम मर्जी संभाळून तो प्याद्याचा फर्जी झाला. पेशव्यांचा कोकणप्रांतावरील दर्यावर्दी सुभेदार म्हणून लौकिक मिळवला. पेशव्यांनी इंग्रज पोर्तुगीझ वगैरे लोकांबरोबरचे व्यवहार रामाजी महादेवाचे हस्ते केले. रामाजी महादेवाने हयात असेपर्यंत पश्चिम किनारा निर्वेध सांभाळला. कोणत्याही परकी शत्रूला शिरजोर होऊ दिले नाही; म्हणूनच इंग्रज बंगालमध्ये, मद्रासमध्ये लवकर घुसले; परंतु पश्चिम किनाऱ्यावर शंभर वर्षे त्यांची डाळ शिजली नाही. याचे श्रेय जेवढे पेशव्यांना आहे तेवढेच रामाजी महादेवालाही दिले पाहिजे. इंग्रज जेवढे धूर्त होते त्याच्या सवाई धूर्त रामाजी महादेव होता, हे इंग्रजांनी देखील कबूल केलेले आहे. रामाजीची फसवणूक इंग्रजांनी तुळाजी आंग्रे प्रकरणात एकदाच केली. परंतु रामाजीने त्यांना वेळोवेळी सवाई धडा शिकवून आपल्या अपमानाचे यथास्थित उट्टे काढून घेतले. रामाजी महादेवाने पश्चिम किनारा पूर्णपणे सांभाळल्यामुळे पेशव्यांना उत्तरेकडे पराक्रम करावयास अवसर मिळाला, निजामाचा बंदोबस्त करता आला व पानिपतवर जरी प्रचंड पराभव झाला तरी पेशवाईचा व शिवशाहीचा मूलभूत पाया कोकणप्रांत तो रामाजी महादेवाने अभेद्य राखला, हीच त्याची बहुमोल कामगिरी व कर्तृत्व होय. नानासाहेब पेशव्यांचे कारकीर्दीनंतर त्याने थोरले माधवरावांची कारकीर्दही पाहिली व त्याही काळात थोरले माधवरावांना आपली कामगिरी चोख बजावून कर्तृत्व दाखवले. नंतर नारायणराव पेशवे झाले तेव्हाच रामाजी महादेव मृत्यू पावला. रामाजी महादेवाने पेशव्यांचे अंतर्गत भांडणात कधीही कोणाची बाजू घेतल्याचा आधार सापडत नाही. पेशवाईची पुढील दुर्दशा पाहायला तो जगला नाही. रामाजी महादेवाने अत्यंत स्वामीनिष्ठेने चाकरी बजावली व ३० वर्षे अखंड सुभेदारी कल्याण प्रांतावर व संपूर्ण पश्चिम किनाऱ्यावर चालवली. राम्या शागीर्दाचा रामशास्त्री पहिले माधवराव पेशव्यांच्या काळात झाला. परंतु राम्या शागीर्दाचा रामाजी महादेव सुभेदार कोकण प्रांत होण्याचा पहिला बहुमान रामाजी महादेवाने नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीतच पटकाविला. पेशवाईचा, महाराष्ट्राचा व भारताचाही ह्या अखेरचा आरमारी सुभेदार होय. अखंड तीस वर्षे कोकणावर पेशव्यातर्फे सत्ता चालविणारा अखेरचा सेनाखासखेल होय. कल्याणकरांना या व्यक्तीचा चिरंतन अभिमान वाटला पाहिजे. इतिहासाने या व्यक्तीची आजवर उपेक्षा केली आहे. परंतु प्रत्येक कोकणप्रांतीयाला अभिमान वाटावा अशीच याची कारकीर्द आहे. आपल्या अखेरीपर्यंत त्याने इंग्रजांना या भागात प्रवेश करू दिला नाही. परंतु ह्याच्या मृत्यूनंतर अवघ्या आठच वर्षांनी इंग्रजांनी ठाणे–कल्याण काबीज करून रामाजी महादेवाच्या कल्याणच्या नव्या वाड्यात तळ ठोकला.

रामाजी महादेवाकडे सुवर्णदुर्ग, करनाळा, नेरळ, कल्याण व साष्टी एवढ्या

Scanned with Ca

प्रांतांची मामलत अथवा सुभेदारी होती. रामाजीला सालीना रोख वेतन १५०० रु. असून पालखीकरिता निराळे २५० रु. असत. पुण्यास नव्या पुलानजीक शनिवार वाड्याजवळ रामाजी महादेवाचा एक वाडा होता. रामाजी महादेवाचा कारभाराचा वाडा ठाणे मुक्कामी होता व नंतर कल्याण मुक्कामी नवा वाडा बांधला. हा वाडा आतापर्यंत (१९४५ पर्यंत) रामाजी महादेवाचे वंशजाकडेच होता. तेथे जी. ई. इन्स्टिटयूट हायस्कूल ही शाळा भरते. या संस्थेनेच हा वाडा आता खरेदी करून बरेच फेरफार केले आहेत. या वाड्याच्या जागेवर अगोदर तोफच्यांची घरे होती (सुमारे ७ घरे). तोफच्यांचे कारभारी पाटील व तुपे नावाचे होते. त्यांचेकडून वरील घरे घेऊन तेथे ही इमारत बांधली. त्याचे बाजूलाच त्यांचे कारभारी सदाशिव राम दामले ह्यांनी वाडा बांधला. या वाड्यासमोर घोड्याची पागा असून त्या जागी आज त्याच जुनाट चाळवजा इमारतीत मारवाड्यांची दुकाने आहेत. त्याच्या मागे मोठे मैदान होते ते कवायतीचे व घोडे सैन्य सज्ज करण्याचे मैदान म्हणून ओळखले जात असे. महालक्ष्मी (देवीचे देऊळ) रस्त्यावर मैदानाचे बाजूला सुभेदारांचे आप्त श्री. नवलाखे बाळ ह्यांचे घर होते. आज ते सबनीस व केळकर या दोन मालकांत दुभागून आहे. मधल्या मैदानात श्री. भिडे ह्यांची दोन घरे, परांजपे ह्यांचे घर, मोडक वकील ह्यांचे घर, पुढील गांधी चौकापर्यंतची घरे, देवीचे देवळासमोरील माणिकशेठ गुजर ह्यांचे घर-चाळ वगैरे घरे आहेत. गांधी चौकातील काळेवाडा फक्त पेशवेकालीन (रामाजी महादेवकालीन) आहे. कासारहाट गल्ली ही खंदकात असून भिडे गल्ली ही किल्ल्याचे कोटाचे आत आहे. कासार आळीतील श्री. हजारे ह्यांचे आज जेथे घर आहे, तेथे रामाजी महादेवाने किल्ल्यात शिरण्यासाठी व आपले घराचे समोरील मैदानात प्रवेशासाठी रामाजी महादेव दरवाजा पाडला होता. इंग्रजांचे सैन्य १७८० साली टिळक चौकातील गणेश दरवाजा व रामाजी महादेव दरवाजानेच आत घुसले व श्री. बाळांचे घराचे मागील मैदानात तळ ठोकला.

रामाजी महादेवाकडे सुवर्णदुर्ग, करनाळा, नेरळ, कल्याण व साष्टी इतक्या सुभ्यांची मामलत अथवा सुभेदारी होती. प्रत्येक सुभ्यावर त्याने एक स्वतंत्र कारभारी नेमला होता. साष्टीकरिता सदाशिव राम दामले, कल्याणकरिता धोंडो बल्लाळ वैद्य ही नावे उपलब्ध आहेत. रामाजी महादेवाचे वेतन प्रत्येक सुभ्याकरिता निराळे असावे असे दिसते. कारण त्याचे जमाखर्चाचे वहीत साष्टी सुभ्याचा हिशेब सन १७७३ चा आहे. त्यात पुढीलप्रमाणे रुपये खर्ची पडले आहेत.

४६६० ८।। हिशेब साष्टी मा। सदाशिवराव दामले.

१५०० रु. खुदवंतन नेमणूक दरसाल
२५०० रु. सरंजाम पालखी. एक सालाआड सरकारातून नेमणूक.
४६२।। = रु. मुकासा गाव मुंजीवली
२२५० रु. शिलेदार नेमणूक राऊत १५ दर १५० प्रमाणे.
६० रु. कारकुनीची असामी नि। सरपाटील
१३७।। रु. फरास दिवट्या व कामाठी

४६६० ८=

सदाशिव राम दामले हा साष्टी-ठाणे येथील कारभार पहात असे. त्यास २०० रु. सालीना पगार होता. त्याने रामाजी महादेवाचे कल्याण येथील घराजवळ घर बांधले. हल्ली तो वाडा बाळशेठ गवळी (अनंत हलवाई) यांचे मालकीचा आहे.'

रामाजी महादेव बिवलकर सुभेदार प्रांत कल्याण भिवंडी, साष्टी ह्यांना बाळाजी बाजीरावाकडून शके १६८१ मध्ये (१७५९ मध्ये) चिरनेर हा गाव इनाम मिळाला. याशिवाय आंग्रे यांजकडून अष्टागरात वाड्या इनाम मिळाल्या होत्या. तसेच वेळोवेळीच्या कामगिरीबद्दल नांदिवडे,दिविल, उसाटणे, भोम हे गांव इनाम मिळाले होते. तसेच वांगणीचा मोकासा व मुंजिवली जि. ठाणे येथील वडगांवची खोती मिळाली होती.

कल्याणास तोफेचे गोळे बनविण्याचा कारखाना यांनी काढला होता. त्यासाठी लागणारे लोखंड वज्रेश्वरी येथून काढीत असत. वज्रेश्वरी येथे लोखंड निघत असे. पेशवे वज्रेश्वरीस गेले असता त्यांनी तेथे लोखंड खरेदी केलेले आहे. कल्याणच्या तोफगोळ्यांचे कारखान्यावर जगन्नाथ नागेश हा अधिकारी होता. लवळू रायभान, काळू किसन, अमरसिंग ही तोफच्यांची नावे रामाजी महादेवाच्या जमाखर्चाच्या वहीत आलेली आहेत. रामाजी महादेवाचा हल्लीचा जो सुभेदार वाडा आहे त्या जागेवर तोफच्यांची सात घरे होती. ती घरे खरेदी करून त्यांना दुसरी जागा देऊन, त्या घरांचे जागेवर हा नवा कल्याणचा वाडा बांधलेला आहे.

रामाजी महादेवाने १०८ शंकराची देवळे बांधली असे सांगतात. परंतु बरीच देवळे बांधल्याचे पुराव्यावरून दिसते. त्यावरून बहुधा खरे असावे. मढ येथील प्रसिद्ध गणपती मंदिर यांनीच बांधले. या देवाची स्थापना शके १६९४ चैत्र शु. ५ मध्ये झाली. स्थापनेस १५८ रु. १५ आणे खर्च आला. तुपगांवचे धान्येश्वराचे मंदिर, कल्याणचे रामेश्वरमंदिर, ओंकारेश्वराचे मंदिर (पुणे) यांनीच

बांधले. कल्याणचे रामेश्वराचे मंदिराचा मुहूर्त खांब चैत्र शु. १ शके १६९२ मध्ये उभा केला. ठाणे येथील कौपिनेश्वराचे देवालयाचा जीर्णोद्धार करून आजचे भव्य स्वरूप त्यांनीच दिले. रामाजी महादेवाने गोशते दाने दिली. लक्ष भोजने कित्येक घातली; गुळसुंदे (ता. पनवेल) येथील सिद्धेश्वरावर यांचा दरमहा महारुद्र होत असे. रामाजी महादेव सुभेदार हे जेवढे पराक्रमी व धार्मिक होते तेवढेच रसिक-रंगेलही असावेत असे त्यांच्या जमाखर्चांवरून दिसते.त्या काळी अंगवस्त्र ठेवण्याची श्रीमान व सरदारांची प्रथा होती, त्याप्रमाणे रामाजी महादेवालाही अंगवस्त्रे होती असे दिसते. एका ठिकाणी जमाखर्चात अंगवस्त्रास रक्कम खर्ची पडली आहे. तसेच मैनाबाई नावाचे अंगवस्त्रासाठी अनेक ठिकाणी खरेदीची नोंद आहे. त्याचप्रमाणे अधिक अंगवस्त्र मिळविण्यासाठी काहीं ठिकाणी रुपये नाजुक कामासाठी या नावाखाली रकमा खर्ची पडल्या आहेत. उदा. ३०० रु. नाजुक काम फाल्गुन शु, १४ शके १६९३ देणे मिरजाअल्ली खंबायतीचे कामाचे ऐवजी. १००० रु. शके १६८७ (१७६५) जमा पेशजी विठ्ठल भास्कर यासी सुवर्णदुर्गाचे मुक्कामी नाजुक कामाकरिता दिले, ते काम झाले नाही रु. ॥ मा / निल्हेपासून घेतले. ७५ रु. वल्लभराम व नारो विश्वनाथ व अस्करबेग छ २९ रोज फाल्गुन व॥।३० (शके १६९३) सन १७७१ नाजुक काम गुजराथ प्रांते रा॥ केले. त्यास देवविले. बा ॥ पत्र सुभेदार परभारे वनमाळी थोबनदास प्रो॥। देवविले रु. ३०० अनामत मा / निल्हेचे पेढीवर होते ते. रु. २२५ बाकी खाजगी प्रो। देवविले सबब खर्च. तसेच मोघम खर्च २४४॥ रु. नाजुक काम तपशील. ४॥ रु. अर्जुन्या भंडारी, ५ रु. रामजी ७॥ रु. खंडोजी साळोंखे, ३ रु. शरीफअल्ली, १२५ रु. महागिरी २ मा। धाकू तांडेल कोळी, १०० रु. रफरी, शके १६९७ सन १७७५.

रामाजी महादेवाचे कारकीर्दीत एकूण रसद ३॥ ते ४ लाख रु. पर्यंत पुणे येथे पाठवली जात असावी. त्यातील केवळ कल्याण मामलतीची १००००० रु. असावी. कारण १००००० रु. कल्याण मामलतीचे रसद भरण्यास कल्याणहून बरोबर राणोजी ना । खास दरबार व सदाशिव गोपाळ सबनीस दि ॥ नन्हेखान भरीत बैल कल्याणकर तोफची याचे सु॥ २५. दर बैलास ४००० रु. प्रो। शके १६९१ भाद्रपद शु. १४. रसद बैलावर भरून बरोबर सबनीस, सैनिक, खास दरबारची माणसे वगैरे घेऊन पाठवीत असत.

विकटगड, बहिरवगड, मलंगगड, सीदगड, रसाळगड, कायलगड, गोरखगड करनाळा, रतनगड, यशवंतगड व अर्जुनगड, हे किल्ले ताब्यांत होते. त्यांपैकी बहुतेक किल्ल्यांवर सरकारी खजिना ठेवलेला असे. ठिकठिकाणचे देशमुखांनी त्या त्या किल्ल्यावरील अधिकाऱ्याकडे वसुलाचा भरणा करावयाचा असे. उदा. २००० रु. किले विकटगड–किले मजकुरी ठेविले होते. रु. १६००० प्रो / बापू जोशी याणीं पुणे याचे रवानगीस आणले. १४००० रु. बाकी राहिले ते.

कल्याण सरकारचे कारकून सदाशिव चिमणाजी म्हणून होते. त्यांची नेमणूक वार्षिक १०० रु. सखाराम जोशी कारकून–एक सालाचे वेतन रु. ७५. बाळाजी महादेव साठे २०० रु. एक साली वेतन. गुमास्तागिरी चौधरी प्रांत करनाळा. हासन समान ता/ साल मजकूर २०० पैकी आंग्रे ह्याजकडे सरंजामास निमे मुलुख गेला त्याजकडून यावयाचे रु. १०० बाकी सरकार अम्मल प्र/ दरसाल १०० रु. प्रो/ जगन्नाथ नागेश हा तोफगोळयांच्या कारखान्यावर कारकून होता. श्री. बळवंतराव भिकाजी कल्याण प्रांताचे सरचिटणीस होते. लक्ष्मण प्रल्हाद कल्याणच्या सरकारवाडयावरील कारकून होते. तसेच गोपाळ नारायण हशमनीस कल्याण येथे होते.

रामाजी महादेव बिवलकर हे शके १६९४ (सन १७७२) मध्ये श्रावण महिन्यात पुणे मुक्कामी वारले. पुढे त्यांची पत्नीही शके १६९७ मध्ये आश्विन महिन्यात वारली. हिच्या उत्तर कार्यास १५९८॥ = रु. खर्ची पडलेले आहेत व खुद्द रामाजी महादेवाचे वर्षश्राद्धास २०७७८ = खर्ची पडले आहेत. सुभेदारांचे वार्षिक उत्पन्न १५०० रु. होते. अर्थात निरनिराळया वर्षी निरनिराळी रक्कम दाखवली आहे. त्यावरून ते उत्पन्न–वेतन गावाच्या महसुलावर ठरवलेले असावे. रामाजी महादेवाला पालखीचा मान होता. त्याबद्दल त्यास २५० रु. निराळे वेतन होते. रामाजी महादेवाचे दिवाणजी श्री. सदाशिवराव दामले म्हणून होते. ते ठाण्याचा कारभार पहात. त्यास वार्षिक २०० रु. वेतन असे. कल्याणास बिवलकरांनी वाडा बांधल्यावर त्याचे शेजारीच सदाशिव राम दामले ह्यांनी वाडा बांधला. हल्ली तो अनंतशेठ गवळी ह्यांचे मालकीचा आहे. सुभेदारांचे कल्याणचे कारभारी श्री. धोंडो बल्लाळ वैद्य नावाचे होते.

रामाजी महादेवानंतर त्यांचा मुलगा आनंदराव राम ऊर्फ रावजी ह्यास सुभेदारी मिळाली. हा शके १७०५ च्या मार्गशीर्षात म्हणजे सन १७८३ साली निवर्तला. आनंदरावास वडील जिवंत असतानाच पालखीचा मान मिळाला होता. ८५ रु. जमा सरंजाम पालखी सरकारातून खर्च लिहून घेतला. ते जमा (शके १६९० श्रावण) शके १६९४ मधील एका हिशेबावरून सुभेदारांचे एकूण उत्पन्न ४६६०८ = होते असे दिसते. ४६६०८ = हिशेब साष्टी मा/ सदाशिव राम दामले. तपशील १५०० रु. खुदवेतन दरसाल २५०० रु. पालखी सरंजाम एक सालाआड सरकारातून नेमणूक. ४६२॥ = मुकासा गाव मौजे मुंजिवली. २२५० रु. शिलेदार नेमणूक राऊत १५ आसामी १५० रु. प्रमाणे ६० रु. कारकुनीची आसामी नि॥ सरपाटील. १३७॥ रु. फरास दिवटया व कामाठी.

शके १७०२ मे महिन्याचे सुमारास इंग्रजांनी कल्याण सुभा घेतला. त्याचे पारिपत्यास पेशवे सरकारच्या फौजा आल्या. या फौजांची कल्याण सीमेवर लढाई

होऊन फार लुटालूट झाली. प्रांतात पळापळ, जाळपोळ झाली. वसाहती उठून गेल्या. कल्याण सुभेदारांची पळापळ झाली. त्या समयी सुभेदारांनी ऐवज गवतात घालून किल्ले विकट गडास पाठविला. तेथून तो गवतासहित पुण्यास नेला; व मोजदाद करून ठेवला (१७०३). ह्यासाठी सुभेदारांचे वह्यांत ११९॥ रु. पुणे खाते ना/ कृष्णाजी विश्वनाथ ह्याचे नावे खर्ची पडला आहे. **गवत, ऐवज** माल पळणीकरिता वाईस जाण्याचे भाडे १४४॥ रु. झाला; तसेच १३। = मजुरी खर्च इंग्रजांचे गडबडीत कुळंबिणी पळवावयासी व वोझी वगैरे वस्तवानी न्यावयासी असे खर्च आहेत.

मौजे उसाटणे ता. तळोजे कारभाराचा रुमाल इंग्रजांनी कल्याण घेतले त्या वेळी कल्याणास राहिला; म्हणून सालगुदस्ताप्रमाणे ६८५८–। इनामी उत्पन्न जमा धरले.

आनंदराव सुभेदार असताना कल्याणला इंग्रज व मराठे ह्यांच्यात लढाई झाली व कल्याण इंग्रजांच्या ताब्यात गेले. त्याबाबत हकीगत अशी की, ब्रिटिशांनी मुंबई बेटावर प्रथम आपले पाय मजबूत रोवले. नंतर त्यांनी मराठी साम्राज्याकडे आपली आक्रमक नजर टाकायला सुरुवात केली. ह्या वेळेपर्यंत मराठेशाहींत अनेक स्थित्यंतरे घडली होती. नानासाहेब पेशव्यांचा अत्यंत धूर्त, पराक्रमी, आरमारी सरदार कल्याणचा सुभेदार रामाजी महादेव बिवलकर मृत्यू पावला होता. नानासाहेबही मृत्यू पावला होता. मराठी राज्याला पानिपतचा प्रचंड धक्का बसला होता. माधवराव पेशव्याने काहीं काल आपला करडा अंमल गाजवून शत्रूंना जेर करून मराठ्यांचा दबदबा परत निर्माण केला होता. परंतु गृहकलह सुरू झालेला होता. राघोबाने ब्रिटिशांना सहानुभूती दाखवली होती. नारायणरावाचा खून होऊन राघोबा गादीवर आला होता. तेवढ्यात बारभाईनी कारस्थान करून नारायणरावाच्या लहान अल्पवयी मुलाला पेशवाईची वस्त्रे आणून पेशवा केला होता. राघोबाचे उच्चाटन केले होते. राघोबाची व इंग्रजांची मुलाखत झालेली होती आणि त्यामुळे मराठी राज्यात प्रवेश करून मुलुख बळकवण्यास अनुकूल परिस्थिती झाली होती. त्यांना पूर्ण उत्तर देऊ शकेल असा समर्थ सुभेदार रामाजी महादेव बिवलकर मृत्यू पावला होता. म्हणून इंग्रजांनी आपले हातपाय पसरावयास सुरवात केली.

१७७९ मध्ये ब्रिटिशांनी सालशेत (साष्टी बेट) वर हल्ला केला आणि क्रमाक्रमाने चेंबूर, कुर्ला बोरिवली, मुलुंड, ठाणे, बेलापूर, कळवा हस्तगत केली. आनंदराम बिवलकर जरी सुभेदार होता, तरी त्यावेळी तो पुणे मुक्कामी होता- या ठाण्यांच्या रक्षणासाठी खास व्यवस्था नव्हती. त्यामुळे ब्रिटिशांनी क्रमाने हात-पाय पसरण्यास सुरुवात केली. तेव्हा सवाई माधवराव पेशवे होते; व कारभार

Scanned with Car

बारभाईचा होता. म्हणून नाना फडणीसाने कल्याणच्या रक्षणाकरिता व ब्रिटिशांना प्रतिबंध करण्यासाठी फौज पाठवली. एप्रिल १७८० मध्ये ब्रिटिशांनी पारसिक मुंब्रा घेतले व कल्याणवर चाल केली. त्यावेळी कल्याणजवळ मराठ्यांनी ब्रिटिशांना जोराची टक्कर दिली. अनेक माणसे मृत्युमुखी पडली. खुद्द कल्याण शहर, किल्ला घेण्यासाठी ब्रिटिशांनी शिकस्त केली. हे युद्ध हल्लीची रामबाग–मुरारशेठ बाग– या भागात झाले. परंतु मराठ्यांना ब्रिटिशांनी रेटत आणून शहराला वेढा दिला. जनरल कॅम्बेल ह्याने प्रथम कल्याणवर हल्ला केला. या सैन्याचा प्रमुख जनरल हार्टले होता. मराठ्यांनी केलेला प्रतिकार एवढा प्रखर होता की ब्रिटिशांना थोडी माघार घ्यावी लागली; व हार्टलेच्या मदतीला बेंगाल सैन्याचा प्रमुख ज. गोडार्ड ह्यास बोलावून घ्यावे लागले. या संयुक्त फौजांनी हल्ला केला तेव्हा कल्याण शहर पडले. (History of the Bombay Army, P.P.92-97–कॅम्बेल) रामबाग, मुरारबाग मैदानात मराठ्यांचे अनेक वीर कामास आले. ब्रिटिशांच्या तोफांपुढे मराठ्यांचे चालले नाही. मराठे सरदारांकडील एक वीर श्री. अंताजी नारायण ढवळे हे तोफेचा गोळा लागून ठार झाले. इतर अनेक वीर जखमी झाले. ब्रिटिशांना किल्ल्या-वरील तोफांना तोंड द्यावे लागे, तसे मराठे पाठीमागून पुन्हा पुन्हा हल्ला करीत, त्यालाही तोंड द्यावे लागे. शेवटी ब्रिटिशांनी निकराचा हल्ला करून टिळकचौकाचे ठिकाणी पूर्वी गणेश दरवाजा होता, तेथील दरवाजे उघडून विजयाने शहरात घुसले. ब्रिटिश सैन्याचा अधिपती जनरल गोडार्ड होता. ब्रिटिश शहरांत घुसले तो दिवस होता १२ मे १७८० (फॉरेस्ट सिलेक्शन्स, सरकारी कागदपत्रे, मुंबई सचिवालय, मराठा सिरीज, व्हाल्युम एक, भाग २ रा पान ४१४)

१२ मे १७८० रोजी कल्याणचा स्वातंत्र्यसूर्य पुन्हा एकदा मावळला. ब्रिटिशांचा हल्ला आला त्या वेळी सुभेदारासह लोकांची पळापळ कशी होत असे याचे विदारक चित्र सुभेदाराच्या जमाखर्चाच्या वह्यांतून पहावयास मिळते; व त्यावरून मराठ्यांची संरक्षणाची व्यवस्था किती दुबळी झाली होती हेही दिसते. संभाजीच्या काळी कल्याणच्या रक्षणाकरिता प्रत्यक्ष संभाजी महाराज धावून येत होते. परंतु औरंगजेबाचे प्रचंड सैन्य महाराष्ट्रात सर्व बाजूने धुमाकूळ घालीत होते तरीही संभाजी महाराजांनी सतत ९ वर्षे त्या आक्रमणाला यशस्वी व सर्वंकष तोंड दिले. आपल्या हयातीत तरी कल्याण मोंगलांचे हाती जाऊ दिले नाही. रामाजी महादेवानंतर केंद्रसत्ता पेशवाई अंतर्गत दुहीमुळे व पानपतच्या अपयशामुळे दुबळी झाली होती, हे चित्र कल्याण ब्रिटिशांनी जिंकून घेतले या घटनेने सिद्ध होते. संभाजीच्या काळात प्रजेला ज्या स्थितीला तोंड द्यावे लागले त्याच स्थितीला १७८० मध्येही तोंड द्यावे लागले. गावेच्या गावे ओस पडली. लोक जंगलात पळून गेले. नाना फडणिसाने जरी प्रतिकाराकरिता सैन्य पाठवले तरी ते कल्याणचे रक्षण करू शकले नाहीत. मलंगगडाचेही रक्षण करू शकले नाहीत. ब्रिटिशांनी

Scanned with Car

मलंगगडाच्या युद्धातही मराठ्यांना पराभूत केले व पळवून लावले; आणि मलंगगड (हाजीमलंग) ब्रिटिशांनी ताब्यात घेतला.

ब्रिटिशांनी आपले सैन्य शहराबाहेर काळ्या मशिदीजवळ ठेवले. परंतु काही सैन्य सरकार–वाड्यात राहिले. काही किल्ले दुर्गाडीवर राहिले. ब्रिटिश गव्हर्नरने कल्याणला खोपोली मुक्कामी असलेला जॉर्ज हॉर्सले यास कल्याणचा रेसिडेंट नेमून प्रजेला अभय देणे, वसाहती करावयास लावणे, वसूल ठरवून देणे वगैरे कामगिरी त्वरित पुरी करावयास सांगितली. बंदरावर जकात वसूल करावयास सांगितले. मराठ्यांच्या महसुलाच्या पद्धतीने कर लावण्यासाठी निरनिराळे कागदपत्र चाळण्यात आले, तेव्हा एका बनियाकडे त्यांना एका कागदावर साधारण रूपरेखा लिहिलेला १७६८ सालचा महसुलाचा कागद मिळाला.त्यावरून त्या वेळची कल्याण सुभ्याची हद्द, गांवे,वसूल, बंदर जकात वगैरेची कल्पना येईल. त्या वेळच्या कल्याण सुभ्यात २७ परगणे व ७४२ खेड्यांचा समावेश होता. शिवाय कल्याण व भिवंडी ही दोन महत्त्वाची शहरे होती.

कल्याण प्रांतातील परगण्याच्या महसुलाचा तपशील:– (१) अंबरनाथ–१४००० रु. (२) सोनावळे–३७००० रु. (३) राहूर–१२००० रु. (४) कांडव–६००० रु. (५) कोळंब– ७००० रु. (६) दुगाड– १३००० रु. (७) बारावे–१२००० रु. (८) वासुंद्री–१०००० रु. (९) कारोळा–कुरवाडा–२०००० रु. (१०) गोरठ–४०००० रु. (११) कोहज–२४००० रु. (१२) तळोजे–२१०००रु. (१३) वारेडी–१८००० रु. (१४) बोरटी–१४००० रु. (१५) वनखुल–१२००० रु. (१६) मुरबाड–१२००० रु. (१७) शेरे–९०००रु. (१८)अल्याणी–४००० रु. (१९) पेण–५०००० रु. (२०) साकुर्ली–१०००० रु. (२१) जुड्डा-शिरोली–५००० रु. (२२) कोहज–२००० रु. (२३) कोन–२०००० रु. (२४) नसरापूर–२००० रु. (२५)पावुलबारे–१२००० रु. (२६)वाडापेटा–१०००० रु. (२७)आनाशी–१५०००रु.(२८) कल्याण शहर–५०००रु. (२९) भिवंडी शहर–२००० रु. = एकूण ४५४००० रु. याशिवाय कल्याण, भिवंडी, वज्राबाई, पनवेल, पेण या ठिकाणी मराठ्यांनी बंदर-जकात नाकी बसवली होती तसेच प्रत्येक घाटात पायथ्याशी जकात नाकी व चौक्या बसवल्या होत्या. त्या सर्वांपासून २५०००० रु. उत्पन्न मराठ्यांना मिळत असे. महसूल व जकात मिळून मराठ्यांचे त्या कालीन उत्पन्न ७०४००० रु. होते.

जी. हॉर्सलेच्या हुकमावरून थॉमस शॉटबोल्टला कल्याणचा ताबा घेण्यास सांगण्यात आले. दि. ९ मे १७८१. शॉटबोल्ट हा कॅम्बेलच्या मदतीला आलेल्या बंगाल-सैन्याचा अधिकारी होता. जखमी सैनिकांना मुंबईस पाठवून देण्याचा हुकुम करण्यात आला. या हुकमाप्रमाणे बंगाली सैन्य कर्नल ब्राऊनच्या नेतत्वाखाली

कल्याणजवळ येऊन शहराच्या तटबंदीच्या छायेत मुक्काम केला. बंगाली सैन्याचा सर्व प्रमुख जनरल गोडार्ड म्हणून होता. त्याने मुंबईच्या गव्हर्नरला विनंती केली की पावसाळा सुरू होण्यापूर्वी दारूगोळ्याचा साठा व बंदुकीची दारू तयार करण्यासाठी पावसाळ्यापूर्वी एखादी सुरक्षित जागा किल्ल्यामध्ये द्यावी असा रेसिडेंटला हुकूम करावा, किंवा किल्ल्याबाहेर काळी मशिदीजवळ योग्य ती निवाऱ्याची जागा करून द्यावी. त्यावर रेसिडेंट हॉर्सलेने मुंबईच्या गव्हर्नरास कळवले की, दुर्गाडी किल्ल्यावरील जागा बंगाली सैन्याच्या ताब्यात देण्यासारखी नाही. शिवाय तेथूनच तोफा वगैरे उडवल्या जात असल्यामुळे दारूगोळा कारखान्याला व साठ्याला सुरक्षित व सोईची नाही. शिवाय बंगाली सैन्याला त्या साठ्याशी संपर्क ठेवावयास शहरामधूनच तेथे जावे लागेल, दुसरा मार्ग नाही; कारण किल्ल्याची रचनाच तशी आहे, म्हणून ते जमण्यासारखे नाही. तेव्हा एक तर सर्व शहर व दुर्गाडी दोन्हीही बंगाली सैन्याच्या ताब्यात ठेवणे कमी खर्चाचे व सोईचे होईल; परंतु निवळ दुर्गाडी किल्ला त्यांच्या ताब्यात ठेवणे सोईचे नाही. तेव्हा दुर्गाडी किल्ला ही जागा दारूगोळा वगैरे कारखान्यासाठी शहराला धोका न पोहोचता सोईची असली तरी जर आपणास दोन निराळी सैन्ये येथे एकाच वेळी ठेवणे जरूर आहे, तर या दोन्ही सैन्यांचे कार्यक्षेत्र एकमेकांत गुंतू देता कामा नये. कारण त्यामुळे गैरसमज व कटकटी वाढतील म्हणून काळी मशीद ही जागा दारूगोळा व कारखान्यासाठी सोईस्कर आहे. कारण एक तर ती इमारत शहराबाहेर एकाकी आहे व सभोवती मोठी थोरली बाग आहे, ज्यामध्ये आवश्यक त्या शेडस्, कोठारे वगैरे उभारता येतील व सैन्याला त्याच्या कॅम्पपासून त्याच्याशी संपर्क ठेवणे सुलभ जाईल.

त्या वेळी शहराची परिस्थिती कशी झाली होती ह्याचेही चित्र रेसिडेंटने रंगवले आहे; ते पाहणे मनोरंजक ठरेल. मराठ्यांच्या ताब्यातून हे शहर व भोवतालचा प्रदेश गेल्यामुळे मराठे वारंवार हल्ले करीत होते. त्यामुळे गावेच्या गावे उठून गेली होती. नानकर गावातील एका पाटलाला मराठ्यांनी पळवून नेले. खेडी ओस पडली आहेत. लागवड होण्याची शक्यता नाही व तसेच काही महसूलही गोळा करता येण्यासारखा नाही असे रेसिडेंटने गव्हर्नरला कळवले आहे. व्यापारी, शेतकरी, कलावंत, किरकोळ वस्तूंचे कारीगर यांना प्रोत्साहन देऊन वसवणे चालू आहे; तसेच भोवतालच्या गावांना मराठ्यांपासून संरक्षण देण्याचाही हुकूम देण्यात आला होता. जव्हारची राणी कल्याणला काही काळ राहिली होती. तिचे नाव अबाई राणी. तिने कल्याण प्रांतात मराठ्यांच्या वेळी धुमाकूळ घातला होता म्हणून रामाजी महादेवाने तिला पकडून वसईच्या किल्ल्यात तुरुंगात ठेवले होते. तेथे ती बंदिवासात बरेच वर्षे होती. इंग्रजांनी कल्याण घेतल्यावर काही कोळी शिपायांनी तिला किल्ल्यातून सोडवले. वज्राबाई मुक्कामी कर्नल हार्टलेच्या समोर हजर केले. त्याने तिच्या रक्षणाची व्यवस्था करून थोडा सरंजाम दिला. मराठ्यांविरुद्ध तिच्यामार्फत

Scanned with Car

जव्हारच्या राजाचा पुढे मागे उपयोग व्हावा हा त्यामागे हेतू होता. हे हॉर्संलेने आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे (८ जून १७८१). त्याप्रमाणे जव्हारच्या राजाने आपली सेवा ब्रिटिशांकडे रुजू केली.

गांजा, भांग वगैरे सरकारी जमिनीत उत्पन्न काढण्याचे मक्ते कंपनी सरकारने दिले. तसेच वडौली–गंधार, सोनावळे तरीचा मक्ता लिलावाने १२ रु.२ आणे ६ पै महिना प्रमाणे महंमद पुन्ना यास दिला. तसेच कोन कल्याण तरीचा मक्ता (होडीवाहतूक) महंमद पन्ना यास महिना ५१ रु. ठरावाने दिला. तसेच ठाण्याच्या खाडीवरील होडी वाहतुकीचा मक्ता गोविंद सदाशिव यास महिना ११७ रु. प्रमाणे दिला. पुढील गावांनी ब्रिटिशांकडे मराठी सैन्याच्या हल्ल्यापासून संरक्षणाची हमी मागितली व ती मान्य करण्यात आली.

गांवे– (१) अंबरनाथ. (२) वाडेघर (कल्याणजवळील) (३) वावेघर (खडवलीजवळ) (४) सापाड, (५) चिंचेर (भोइसरजवळ, पालघर तालुका) (६) कोसले (वासिंदजवळ) (७) अंभण (पालघरजवळ) (८) सोनावळे (बदलापूरजवळ) (९) शिरावली (१०) रांजनोली (कल्याण–भिवंडी) (११) पिंपळघर (मुरबाड) (१२) डोंगरनाव (मुरबाड ता.) (१३) लोनाड (कल्याण–भिवंडी) (१४) चिंचवली (खडवलीजवळ) (डोंबिवलीजवळ) (वांगणीजवळ) (१५) वरप (कल्याण) (१६) दखिवली (वाडा ता.)

या सर्व गावांना संरक्षण मागणीप्रमाणे देण्यात आले. १८८०३

पुनःश्च कल्याण खजिना

ही कल्याण खजिन्याची हकीगत शिवकाळातील नाही, तर ब्रिटिशांनी कल्याणचा कबजा प्रथम १७८० मध्ये केला तेव्हाची आहे. ही हकीगत इतिहासकालीन लोकांच्या द्रव्य साठवण्याच्या पद्धतीवर, तसेच लोकांच्या मनोवृत्तीवर फार मोठा प्रकाश टाकते. पूर्वजांनी पराक्रमाने संपत्ती मिळवून अडचणीकरिता साठवून ठेवावी; नंतरच्या पिढ्यांनी नवीन पराक्रम न करता त्या संपत्तीवर डोळा ठेवून लुटण्याचा प्रयत्न करावा किंवा उधळावी या मनुष्यस्वभावाच्या झालेल्या बदलाची द्योतक आहे.

हकीगत अशी की, रामाजी महादेव बिवलकर हे कल्याण प्रांताचे सुभेदार असताना त्यांनी अखंड ३० वर्षे या सुभ्यावर अधिकार गाजवला व अतिशय पराक्रमही केला. इंग्रजांना पश्चिमेकडून मराठी राज्यात पाय पसरू न देण्याची बहुमोल कामगिरी मराठ्यांच्या या सुभेदाराने केली. त्यामुळे इंग्रजांचा प्रवेश या भागात सर्वांत शेवट झाला. रामाजी महादेवाच्या मृत्यूनंतर आठच वर्षांनी ब्रिटिशांनी कल्याण जिंकले; कारण येथील कर्त्या पुरुषांनी योग्य तो दरारा व बंदोबस्त ठेवला

नसावा. त्यामुळे मराठ्यांना पुण्याहून सैन्य पाठवून या भागाचे रक्षण करणे जड गेले.

रामाजी महादेवाने अडचणीच्या प्रसंगी उपयोगी पडावे म्हणून काही द्रव्य कल्याण येथील सरकार वाड्यात पुरून ठेवले होते. १७८० मध्ये ब्रिटिशांनी कल्याण घेतले तेव्हा रामाजी महादेवाचा मुलगा आनंदराव हा सुभेदार होता.टक्कर देऊ न शकल्यामुळे तो पुण्यास पळून गेला. रामाजी महादेवाला एक बाळाजी महादेव हा भाऊ होता. त्याची मुले आबाजी व गोविंदराव हे ठाण्यास राहात होते. मेजर हॉपकिन्स ह्याने आपला तळ रामाजी महादेवाचे सरकार वाड्यात ठेवला होता. हल्ली हा वाडा पाडून टाकण्यात आला आहे; व तेथे पाण्याची टाकी आहे. कल्याणचा सरकार वाडा म्हणून ती जागा प्रसिद्ध आहे; सुभेदारवाडा म्हणून ओळखली जाणारी वास्तू ही त्याची नवीन राहण्याची वास्तू होती व सरकार वाडा ही कारभार कचेरी होती. ही कचेरी (सरकारवाडा) मातबरखाने बांधलेली असावी; किंवा रामचंद्र महादेवाने, चासकर सुभेदाराने बांधलेली असावी; या सुभेदारांच्या सरकारी कचेऱ्या येथेच होत्या व कारभार येथूनच होत असे; कारण चासकर जोशी ह्यांचाही वाडा त्याचे बाजूलाच आजही अस्तित्वात आहे; व तोही बाळाजी विश्वनाथ-पूर्वकालीन आहे.

आनंदराव सुभेदार पुण्यास पळून गेल्यावर मेजर हॉपकिन्सकडे आबाजी बल्लाळ व गोविंदराव बल्लाळ ह्यांनी अर्ज केला की तेथे ते आनंदराव सुभेदारा-जवळ दीर्घ काळ राहात होते; व त्यांचे चुलत्याने (रामाजी महादेवाने) सुभेदार असताना काही द्रव्य पुरून ठेवले होते, ते अस्तित्वात आहे काय हे पाहण्यासाठी व असल्यास मिळण्यासाठी महादजीपंत व गोपाळशेठ शंकरदास ह्यांस पाठविले. त्या दोघांनी मेजर हॉपकिन्सला ते भूमिगत द्रव्य आहे का ते पाहणे व असल्यास मिळणे-साठी विनंती केली. तेव्हा मेजर हॉपकिन्सनने प्रथम ती नाकारली परंतु त्या द्रव्या-पैकीं तिसरा हिस्सा त्यास देऊ केल्यास परवानगी देऊ असे सांगितले. तेव्हा आबाजी व गोविंदरावाची संमती आणण्यासाठी ते ठाण्यास गेले.आबाजी-गोविंदराव हे प्रथम कबूल होईनात. शेवटी ४ था हिस्सा द्यावयास कबूल झाले. हॉपकिन्सही कबूल झाला व त्यांना ते द्रव्य काढून घेण्यास परवानगी दिली.त्याप्रमाणे त्यांनी मेजर हॉपकिन्सने आपला चौथा हिस्सा काढून घेतल्यावर बाकी हिस्सा नेला, मेजर हॉपकिन्सला या व्यवहारात २४००० रु. मिळाले. बाकी रक्कम प्रथम त्यांनी विश्वनाथ नारायणजी, कल्याण येथे ठेवले. त्यापैकीं विश्वनाथ नारायणजीच्या खटपटीबद्दल त्यास कबूल केल्याप्रमाणे ७७२५ रु. दिले. बाकी रक्कम घरी नेली. तेव्हा महादजीपंत व गोपाळ-शेठ ह्यांनी आपल्या कामगिरीबद्दल कबूल केलेली रक्कम मागितली. तेव्हा आबा बल्लाळने एक पैहि देणार नाही म्हणून सांगितले. महादजी व गोपाळशेठ ह्यांनी

Scanned with Car

विश्वनाथ नारायणजीकडे तक्रार केली तेव्हा त्याने आबाला ठाण्याहून बोलावणे पाठवले व त्यांना कबूल केल्याप्रमाणे व्यवहार पुरा करण्यास सांगितले. तेव्हा त्याने ठाणे मुक्कामी व्यवहार पुरा करू म्हणून आश्वासन दिले. त्याप्रमाणे त्याने गोपाळशेठला ५००० रु. दिले व महादजीला मात्र ४२०० रु. दिले. तेव्हा महादजीपंत रागावला; त्याने गव्हर्नरकडे या प्रकरणाची वाच्यता करू म्हणून धमकी दिली; परंतु आबाजीने दाद दिली नाही. तेव्हा महादजीपंताने मुंबई गव्हर्नरकडे ह्यासंबंधी तक्रार केली. त्याचा परिणाम म्हणजे हपापाचा माल गपापा झाला. मुंबई गव्हर्नरने ताबडतोब चौकशी कमिशन बसवून रेसिडेंटला पत्र लिहिले की सरकार वाडा हा ब्रिटिशांच्या ताब्यातील वास्तू आहे सबब त्याचे भूमिगत द्रव्य ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे मालकीचे आहे. तेव्हा सर्वांकडून सर्व पैसा वसूल करावा. मेजर हॉपकिन्सला राजीनामा देण्यास भाग पाडावे. त्याप्रमाणे त्याने राजीनामा देऊन तो इंग्लंडला निघून गेला. विश्वनाथ नारायणजी, आबाजी व गोविंदराव बल्लाळ बिवलकर ह्यांजकडून हॉपकिन्सप्रमाणेच सर्व पैसा वसूल केला व प्रेसिडेंटचे वचनाप्रमाणे ज्याने ह्या प्रकरणाचा शोध लावून दिला, त्यास १०००० रु. बक्षीस देण्यात आले. त्या चौकशी कमिशनने असाही शेरा दिला कीं, आबाजी व गोविंदराव बल्लाळ या पुतण्यांचा त्या द्रव्यावर कोणताही हक्क नव्हता. कारण रामाजी महादेवाचा मुलगा आनंदराव सुभेदार पुण्यास पेशवे दरबारी होता. त्याचे नकळत ही फसवणूक करून द्रव्यावर डल्ला मारण्याचा प्रयत्न झाला. याप्रमाणे बहुधा महादजीलाच ते १०००० रु. चे बक्षीस मिळाले असावे. या भूमिगत कल्याण खजिन्यात किती द्रव्य सापडले त्याचा तपशील दिलेला आहे. तो असा :

एकूण ७९६ तोळे सुवर्णनाणी १४ रु. तोळा प्रमाणे. ११९४४ रु.

	रु. आ. पै.
३९८६ तोळे ११½ मासे निव्वळ सुवर्ण १४ रु. तोळाप्रमाणे	६०१२९-३-१
४६० तोळे सोने १४. रु. तोळाप्रमाणे	६४४४-३-०
चांदीचे रुपये.	१५९४७-२-०
	९३६६६-१-१

कल्याणच्या सरकारवाड्यात मिळालेला खजिना शेवटी ब्रिटिशांचे मालकीचा झाला. (मिसलेनिअस् सिरीज, इंडिया ऑफिस रेकॉर्ड)

आनंदराव रामाजी सुभेदार हा १७८३ मध्ये मार्गशीर्ष शु॥६ सोमवार रोजी मरण पावला. तेरा दिवस पर्यंत १४२९ रु. खर्ची पडले आहेत. मार्गशीष महिन्यात हा आजारी झाला तेव्हा धार्मिक उपचार अनेक केले. त्यापैकी विशेष

म्हणजे १२ रु. खासे ह्यास समाधान नाही स ॥ नमस्कार घालविले १२००० एकूण (१ रु.१००० प्रमाणे) २९॥ ≡ ॥ म्हैसदान.

ह्याच्या वर्षश्राद्धास फक्त ५६६८=॥ खर्च पडले आहेत. ह्याचे कारकीर्दीत विशेष महत्त्वाच्या गोष्टी घडलेल्या नाहीत. रामाजी महादेव हयात असतानाच हा कारभार बघू लागला होता व त्यास स्वतंत्र पालखीचा मान मिळाला होता. परंतु विशेष समरप्रसंग घडलेला नाही. ब्रिटिशांनी कल्याणवर हल्ला केला तेव्हा ह्यास चीजवस्तू व दप्तर घेऊन पळून जावे लागले व कल्याण ब्रिटिशांनी ताब्यात घेतले; परंतु १७८३ च्या सुमारास बिटिश व मराठे ह्यांच्यात झालेल्या तहाने ब्रिटिशांनी कल्याणवरील ताबा सोडला; व परत ते मराठी राज्यात सामील झाले. परंतु ब्रिटिश कारभाराचा पहिला अनुभव कल्याणवासीयांनी घेतला हे ध्यानात ठेवले पाहिजे. याचे काळात विशेष शौर्याचे प्रसंग न आल्यामुळे एक प्रकारची विलासी वृत्ती आलेली दिसते. अनेक नाजुक कामाचे रुपये खर्ची पडलेले दिसतात. या सुभेदारांना पोटी संतान नसल्यामुळे त्यांचे पत्नीने सिन्नरचे बाळाजी आपदेव सोमण यांचा मुलगा शके १७०७ (सन १७८५) चैत्रमध्यें दत्तक घेतला. त्यावेळी श्री.सोमण ह्यास २४०० रु. रोख कर्ज वारावयासि देऊन शिवाय १०० रु.चे वर्षासन "मशारनिल्हे वर्तमान आहेत तोपर्यंत दरसाल द्यावयाचा करार" केला. दत्तविधानातच चैत्र व॥ २ बुधवार रोजी दत्तकाचा व्रतबंध केला. रु. ६२८ ॥ ·॥ खर्च झाले. याला सुभेदारी मिळवण्यासाठी बराच खर्च करावा लागला. ह्याचे नाव रामराव अनंत (आनंदराव) असे ठेवले होते. सुभेदारीसाठी ५००० रु. नजर व दरबार खर्च

२०००० रु. श्रीमंत राजश्री पंतप्रधान-नजर छ १३ रजब
सरकारात नजर करार केली. हप्तेबंदीने

५०००	रु. वैशाख
१००००	रु. ज्येष्ठ
५०००	रु. श्रावण
२००००	रु. प्रमाणे.
६०५०	रु. दरबार खर्च
४०००	रु. नानाफडणीस
२०००	रु. नारोपंत परचुरे
५०	रु. लक्ष्मणपंत देशमुख

हे हप्ते वेळेवर पोहोचले नाहीत म्हणून १५ रु. तश्रीफा खर्च नजरेचा ऐवज सरकारात द्यावयाचा तो मुदतीप्रमाणे पावला नाही म्हणून निसबतीचे कारकुनास दिले, असा खर्च हिशोबाचे वहीत दाखवला आहे. सन १७८५ मध्ये याचे दत्तक-विधान झाले त्यावेळी याचे वय ९ वर्षांचे होते. जमाखर्चाचे वहीत आरंभीच याची जन्मतिथी वगैरे दर्शवणारी एक कविता लिहिलेली आहे.

"सोळाशे नवल्यावरून नव पहा वद्यांतही
षष्ठी सौम्यहि वासरे वसुघटी सूर्योदयानंतरी
ते काळी शुभयोग ऐंद्र दुसऱ्या त्याहो धनिष्ठा पाहा
आद्याग्री जणु रामराव करिजे जाशील दुष्टास हा."

म्हणजे ह्याचा जन्म चैत्र वद्य षष्ठी शके १६९९ मध्ये (सन१७७६)झालेला आहे. हा लहान असलेमुळेच बहुधा कल्याण येथील अंबरनाथचे मामलेदार श्री. गोविंदराव कार्लेकर यांचेकडे सुभेदारी पेशवे सरकारनी दिली असावी. शके १७०८ (सन १७८६) मध्ये ज्येष्ठ महिन्यात ५२ रु.'। '॥.जमा त्याचा तपशील येणेप्रमाणे- "दौलतराव कदम याजकडे कर्ज येणे. त्यात मौजे आभे ता. अंबरनाथ येथील वसूल गोविंदराव कार्लेकर सुभेदार, ता. कल्याण यांणी घेतला" अशी नोंद आहे. या कार्लेकर सुभेदारांचा वाडा पाराजवळील सरकारवाड्याचे मागील बाजूस जुन्या दूध नाक्याजवळ आहे. सध्या तो बदलापूरचे आपटे यांनी घेतला असून आपटे वाडा या नावाने ओळखला जातो.

रामराव अनंत बिवलकर ह्याची बहीण कल्याणचे नवलाखे बाळ यांचेकडे दिलेली होती. कारण २ रु. बाळाकडे लाकडी खेळ श्रावणपाटी न्यावयासी घेतला. कातारी पो। सरंजाम सु॥ असा उल्लेख शके १७११ (१७८९)च्या श्रावण महिन्यात खर्ची पडला आहे. रामराव अनंताला कार्लेकरांकडून पुनः सुभेदारी बिवलकरांकडे घेण्यासाठी बराच दरबार खर्च व नजर करावी असा जो उल्लेख आला आहे त्याचे कारण समजू शकेल. हा दत्तक पुत्र शके १७१८ (सन १७९६) साली मरण पावला.

ह्याचे नंतर सुभेदारी त्याचा मुलगा आनंदराव राम ह्याजकडे आली. परंतु ही फार टिकली नसावी. याची परिस्थिती त्या काळी खालावत गेली. इ.स. १८११ पूर्वी (शके१७३३) च्या जमाखर्चावरून या वर्षी त्याचेकडे सुभेदारी नव्हती असे दिसते. स्थिती कंगाल झाली होती. जमेच्या बाजूस १५ रु. सुद्धा नाहीत. कर्ज काढण्याचे प्रसंग वारंवार येऊ लागले होते. उदा. १५ रु. विरुबाई कानिटकरीण सरकारची बाकी द्यावयास घेतले. व्याज दर १ प्रो तसेच '।= सीधे खर्च (शिधा) चिकण-घरचे शिलकेकरिता बाबाजी दफ्तरदार यांनी शिपाई बसविला नाव बहिणाजी सिंहगडकर रोज ३ त्यासाठी. पुढील साली सुद्धा हीच स्थिती दिसून येते. उदा. २० रु.

मौजे चिकणघर ता. अंबरनाथ गावास तसर सरकारातून लाविले होते ते दूर केले. स॥ एकसाली द्यावयाचा करार केला होता ते देणे.इ. १८११ साली कार्लेकर परत सुभेदार झाले. त्यावेळी गोविंदरावांचा मुलगा नारायणराव हा सुभेदार झाला. याने कल्याणचे रामजी संस्थानचा तपोनिधी अयोध्यादास बैरागी पुजारी यास दिलेली एक अदलाबदलीची सनद आहे ती पुढीलप्रमाणे.

श्री गजानन

॥ अजम जमीदार कसबे कल्याण यासी नारो गोविंद सुभेदार प्रांत कल्याण-भिवंडी सु । इहिदे अशर मयातैन व अलफ. तपोनिधी अयोध्यादास बैरागी पुजारी नि.। श्री रामजी संस्थान कसबे मजकूर याणी सुभा येऊन समजाविले की श्रीचे पूजा-नैवेद्यास व नंदादीपास पेशजी वामनजी हरी यांचे कारकीर्दीत कल्याण मजकूर येथील सेत दर्यागर्भपैकी जमीन बिघे सात दिल्ही आहे. ते आजपर्यंत कष्ट मेहनत करून लागवड करितो. परंतु सेत दर्यागर्भ पाण्याचे नेटामुळे पूर येऊन लागवड करावी ते धुपोन जाते यास्तव सालोसाल सेत लागवडीस येत नाही. त्यास स्वामी कृपाळू होऊन त्याचे ऐवजी दुसरे शेत नेमून दिल्हे. यास कष्ट मेहनत करून लागवडीस आणता येईल. याजवरून हे शेत सरकारात घेऊन त्या सेताचे ऐवजी कसब मजकूर येथील खरीप शेत पडिक जमिन नेमून दिल्ही. ते खरीप जमीन ७ बिघे व माळजमीन ५ बिघे मिळोन बिघे १२ ते बळवंतराव दादाजी बाळ व आबाजी काशिनाथ अभ्यंकर यांजकडे होती ते सालगुदस्त पासून मशारनिल्हे ह्यांनी स्व संतोषे सरकारात सोडचिठ्ठी लिहून दिली आहे. त्याप्रमाणे या जमिनीचे धाऱ्याची तोषीस न करणे म्हणून अलाहिदा सनद कमाविसदार कसबे मजकूर यांचे नावे दिली आहे; त्याप्रमाणे श्रीकडे चालविणे. छ ११ माहे जमादिलावर मोर्तब खुद (सन १८११).

ही सनद श्री नारो गोविंद कार्लेकर हे कल्याणचे शेवटचे सुभेदार असल्याचे स्पष्ट दाखवते. म्हणजे बिवलकर घराण्याकडून कल्याणची सुभेदारी गेलेली होती. पेशवाई खालसा झाली आणि सर्व सुभेदार संपले.

□ □ □

: १३ :

सुभे कल्याणमधील सांस्कृतिक जीवन

(सन १७१९ ते १८५७ पर्यंत)

राज्यकारभाराचे सोयीसाठी राज्याचे जे मोठे भाग पाडलेले असत त्यास सुभा म्हणत. सुभा म्हणजे साधारणतः चारपाच तालुके एवढा भाग होतो. परंतु जिल्ह्या-एवढा मात्र नव्हे. त्यास प्रांत म्हणण्याचीही वहिवाट होती. कल्याण सुभ्यासाठी निरनिराळी नावे योजलेली आढळतात. तसेच त्यातील भाग वेळोवेळी कमीजास्त केलेलेही आढळतात. सुरुवातीचेपासून प्रांत कल्याण–भिवंडी असा शब्दप्रयोग नेहमी आढळतो. या प्रांताधिकाऱ्यास सुभेदार म्हणत. सुभेदार म्हणजे शब्दार्थाने मामलेदार. कारण तो आपल्या ताब्यातील मामलत संभाळीत असतो. मामले-दाराप्रमाणेच त्यास न्यायाचे, शासनाचे, वसुलीचे, संरक्षणाचे सर्व अधिकार असत. परंतु हल्लीच्या मामलेदाराच्या दर्जापेक्षा त्यास उच्च प्रतीचा मान असे व अधिकारही असे. हल्ली कलेक्टरला जेवढा अधिकार, मान आहे तेवढा किंवा त्याहूनही जास्त अधिकार सुभेदारास असे. सुभेदाराचे वर सरसुभेदार असे. कल्याणचे सुभेदार रामाजी महादेव बिवलकर होते. दुसरे बाजीरावाचे कारकीर्दीत सरसुभेदार नेमणूक झाली. त्रिंबक विनायक हे नेमले गेले. परंतु सरसुभेदार फक्त वसुलीबाबतच असावे असे दिसते. कारण कारभार व रक्षण वगैरे दृष्टीने सुभेदारच जबाबदार असे. कल्याण सुभेदाराचे ताब्यात फार मोठा प्रदेश होता. इगतपुरीपासून कल्याणपर्यंत, तसेच कुलाब्याचा काही भाग, कर्जतपासून कल्याण-पर्यंत साष्टीबेट, सुवर्णदुर्ग वगैरे सागरी भाग. परंतु वसईचा सुभेदार निराळा होता. सुभ्याच्या खालोखाल विभाग परगणा. परगणा म्हणजे तालुका. परंतु सरकार म्हणजे प्रांत. कित्येक वेळी कल्याण सरकार असाही शब्दप्रयोग आढळतो. तर्फ, महाल, कसबे, हे समानार्थी म्हणूनच बहुधा वापरीत. परंतु बहुधा मौजे, तर्फ व प्रांत अशी चढत्या क्रमाने उल्लेख लिहिण्याची प्रथा होती. उदा. मौजे उसाटणे, तर्फ तळोजे, प्रांत कल्याण तसेच कसबे बदलापूर, तर्फ चोण, तालुके राजमाची प्रांत कल्याण–भिवंडी. सुभेदारास मामलेदाराप्रमाणे कमाविसदार असाही शब्दप्रयोग केलेला आढळतो. गावाचा मुख्य अधिकारी मोकदम असे. तरफेच्या अधिकाऱ्याला हवालदार म्हणत.

पगार–मोठ्या अंमलदारांचे पगार वर्षावर असत. कामगारांचे पगार महिन्या-वर किंवा रोजावर ठरवीत. तथापि काही लोकांचे पगार दीडमाही ठरवीत.

दीडमाही पगाराची कल्पना कशी निर्माण झाली याचा उलगडा होत नाही. ह्या-शिवाय पगाराची रक्कम दुमाही देखील ठरलेली आढळते. (पे. रो. ५·२६) सणाच्या दिवशी पगार वाटण्याची चाल होती. कारण दीपावली, अक्षय्य तृतीया, नागपंचमीच्या वाटण्याचे निर्देश आढळतात. सरकारी अधिकाऱ्यांचे पगार पुढील-प्रमाणे असत. सुभेदार=१५०० रु. वार्षिक. (२) फडणीस=३५० रु. वार्षिक (३) पोतनीस=वार्षिक ३१२ रु. सबनीस=वार्षिक ३०० रु.(४) गुमास्ता=वार्षिक २०० रु. (५) कारकून=वार्षिक १०० रु. (६) कारकून नं. २=वार्षिक ७५ रु. कल्याण सुभ्याचे अधिकारी पुढीलप्रमाणे होते. कल्याणचे कारभारी=श्री धोंडो बल्लाळ वैद्य. साष्टीचे कारभारी=सदाशिव राम दामले. नेरळचे=गणेश कृष्ण पाटणकर. सबनीस=सदाशिव गोपाळ सबनीस. कल्याण-कारकून=सदाशिव चिमणाजी. कारकून नं.२-सखाराम जोशी, बाळाजी महादेव साठे, गुमास्ते-व चौधरी चिटणीस=श्री गणोबा. इतर मजुरांचे पगार-प्यादा=वार्षिक ५० रु. तोफेवरील कासार=मासिक ३० रु.स्वार=मासिक १५ रु. बारगीर=मासिक ६ रु. सारवान = मासिक ४ रु / ३ रु. सामान्य चाकर मासिक ४ रु. पखाली=मासिक ३॥ रु. मोतद्दार मासिक ३ रु./ २ रु. बाहेर स्वारीत जावे लागल्यास मुक्कामाच्या पगारावर भत्ता अधिक देत असत.

कारकुनी—ज्या व्यक्तीचे सरकारी काम करावयाचे असेल तो माणूस कार-कुनाला पैसा देत असे त्याला कारकुनी म्हणत. तेव्हा खोटया कामाकरिता लाच देणे असा मात्र याचा अर्थ नाही. परंतु आपल्या विरुद्ध जाऊन खोटे काम करू नये याबद्दल लोक पैसा देत असत. मराठी राज्यात कारकुनी राजरोस देण्यात येत असे. सनदापत्रे लिहिणे या कामी सनद लिहिणारा, शिक्का मारणारा, चोपदार, वगैरे-संबंधी इसमास सनद मिळविणारा सढळ हाताने पैसा देत असे. यामुळे मुजुमदा-राला चांगलीच मिळकत असे. बाकीच्या दप्तरी कामाकरिता कोणी कोणाला पैसा देण्याचा संभव नसतोच. कल्याण सुभेदारांना सुद्धा इनामपत्र करून घेताना फडणीस, चिटणीस, चोपदार यांना चिरीमिरी द्यावी लागली आहे. अर्थात त्या ठिकाणी दरबार खर्च म्हटले आहे. परंतु दरबार खर्च म्हणजे कारकुनीच. काही वेळा सरकारकडूनच कारकुनी बांधून मिळे; त्याला वर्षासन म्हणत. अर्थात कारकुनी ही हिशेबी दाखवावी लागे. नारो निळकंठ हुजूर मुजुमदार ह्यास कल्याण नेरळ कडून ७०० रु. दरसाल मिळत. कारकुनी सालोसाल मिळत असे. त्यामुळे कारकुनी हा सरकारी करच झालेला होता. हल्ली ज्याप्रमाणे स्टँप लावावा लागतो तितकीच ही कारकुनी सक्तीची व कायदेशीर असे. परंतु कित्येक वेळा लाच देण्यालासुद्धा दरबार खर्च म्हणत असत. उदा. कल्याणच्या सुभेदारांनी करनाळघाची आसामी दूर झाली होती ती परत मिळवण्यासाठी सदाशिव भट दिवाणजीस १०० रु. दिले. अर्थात ही गोष्ट कंपनी सरकार झाल्यानंतरची सन १८२२ मधील आहे. प्रत्यक्ष

श्रीमंत पेशवे सरकारला पैसे द्यावे लागले म्हणजे त्याला नजर म्हणत असत; व त्याकरिता दरबारी लोकांना दिलेल्या पैशाला दरबारखर्च म्हणत. कल्याण सुभेदार रामराव अनंत यास सुभेदारी मिळवण्यासाठी २०००० रु. पेशवे सरकारस द्यावे लागले, त्यास नजर म्हटले आहे. नाना फडणीस ४००० रु. नारोपंत परचुरे २००० रु. लक्ष्मणपंत देशमुख ५० रु. येणे प्र। दिलेली रक्कम दरबार खर्च म्हटले आहे. तेव्हा कारकुनी, नजर, दरबारखर्च, वर्षासन हे एकाच अर्थाचे कार्यपरत्वे शब्द होत.

सरकारी उत्पन्नः– राज्य सरकारला कर बसवण्याच्या गोष्टी आज आहेत त्याच पूर्वी होत्या व पूर्वी होत्या त्याच आजही आहेत. मनुष्याचा प्रत्येक व्यवहार व हालचाल ही कराचा विषय होऊ शकतात. कोणतेही सरकार प्रजेच्या कोणत्याही व्यवहाराला व हालचालीला मोकळे सोडीत नाही. म्हणूनच सरकार प्रत्येक पावली जाणवत असते. उत्पन्नाच्या प्रमुख गोष्टी जमीनसारा, जकात व उद्योगधंद्यावरील कर हेच असत. जकात मालाच्या ने-आणीवर बसवीत. परंतु त्याबद्दल सरकार रस्ते करून देत असे असे नाही. फक्त घाटाच्या वगैरे दुरुस्त्या करीत. जकातीतून कोणताही माल सुटत नसे. मुंबईहून सुरण वाईस नेला त्यालाही जकात अर्धा आणा पडलेली आहे. मनुष्याची विक्रीही चाले व त्यावरही जकात असे. शिवाय निरनिराळ्या पट्ट्या आकारीत असत. उदा. कबारपट्टी, भालेपट्टी, दारूपट्टी, नजरपट्टी, कर्जपट्टी, मोरीपट्टी, नहरपट्टी, पालखीपट्टी, सरपट्टी वगैरे. परंतु कांही पट्ट्या मनोरंजक आहेत. उदा. भिकारपट्टी, संतोषपट्टी, इनामपट्टी, लग्नपट्टी वगैरे. दहा वर्षाच्या अंतराने जमा करावयाच्या पट्टीला दहकपट्टी म्हणत. आणेपट्टी ही कल्याणचे सुभेदारांचे जमाखर्चांत आली आहे, ८= चिकणघरची बाग दि॥ म्हात्रा याजकडे आणेपट्टी येणे त्याचे व्याज.

वसुली:– वसुलीसाठी निरनिराळे अधिकारी नेमलेले असत. कमाविसदार, मामलेदार, सुभेदार हे मुलकी अंमलदार गावाचा, तालुक्याचा अगर सुभ्याचा वसूल करीत. जकात अधिकारी स्वतंत्र असत व त्यांचे प्रांतही अलग पाडलेले असत. उत्पन्नाचा अंदाज आगाऊ करून रक्कम निश्चित केली जाई; ती देण्याची जबाबदारी अंमलदार स्वीकारीत असे व त्या रकमेची खते सरकारला लिहून देत असे. अधिकाऱ्यांनी सरकारला द्यावयाच्या रकमेला रसद म्हणत. ही रक्कम आगाऊ किंवा हप्त्याहप्त्याने देत. रसदेची रक्कम सरकार वराता काढून वसूल करी. वरात म्हणजे एक प्रकारची हुंडीच होय. ह्या हुंड्या वटविणारे सावकार सरकारला हुंड्याचे पैसे रोख देऊन अंमलदाराकडून ऐवज वसूल करीत. हल्ली बँका तेच करतात. रसद रक्कम रोखीने बैलावर किंवा अन्य तऱ्हेने पाठविली जाई. कल्याण सुभेदारांनी मामलतीचे रसदीचे एक लाख रु. २५ बैलांवर पाठवले आहेत

त्याची नोंद आहे. रसदेचे रुपये पाठविण्याचे भाडे सरकार सोशीत असे. काही वेळा रसदीची हुंडी पुण्याच्या पेढीवर पाठवीत. कल्याण सुभेदारांनी पुण्याचे वनमाळी थोबनदास ह्याचे पेढीवर २५००० रु. ची हुंडी नेरळचे रसदेच्या भरणीयासाठी पाठवली. शके १६९५ ज्येष्ठ (सन १७७३). सरकारच्या वराता व जनतेच्या हुंड्या ह्यांचा व्यवहार जोरात सुरू होता. ह्याचे कारण सुरक्षितता व पैशाची युद्धाकरिता गरज. हुंड्या जासुदाबरोबर पाठवीत. पैसे ताबडतोब पाहिजे असले म्हणजे हुंड्या पुण्याच्या सावकारी पेढ्यांवर विकीत असत. हुंडीत रक्कम देण्याची मुदत लिहिलेली असे. " मार्गशीर्ष वद्य पंचमीपासून एकतिसा दिसांची मुदत." काशीसारख्या दूरदूरच्या ठिकाणी सुद्धा महिना दीड महिन्यात पैसा मिळे व तोही निश्चित दिवशी.

चलन:– सध्या नाणे पाडण्याचा अधिकार फक्त सरकारचा असतो; परंतु मराठेशाहीत नाणे पाडण्याचा अधिकार लोकांना दिलेला होता. सरकारला हे काम आपल्या हाती ठेवण्याची आवश्यकता वाटली नाही.नाइलाजाने काही नियंत्रण घालावे लागले ते निराळे; पण तेवढेच. त्यामुळे देशात असंख्य चलने प्रचारात होती. उदा. रहिमतपुरी, चांदवड, चिंचवड, हुकेरी, गंजीकोट, इटाव, बडोदी, बेलापुरी, वसई चाळ, मिटे चाळ, कल्याण चाळ (मिठे) अवमगिरी, मल्हारशाही, सरकार चलनी (तुऱ्याचे) पुणे चलनी वगैरे जवळजवळ बहात्तर-पंचाहत्तर चलनें चालू होती. मिठे चलन म्हणजे चांगले चलन. पोते चाळ म्हणजे सरकार तिजोरीत स्वीकारला जाईल ते. पेशवे सरकारने नाण्यांतील धातूचे प्रमाण निश्चित ठरवले होते. त्याप्रमाणे जे असेल ते पोते चाळ. छापी म्हणजे छापलेले नाणे. गंजीकोट हे सुवर्णनाणे ऊर्फ मोहोर होती. पेशव्यांनी टांकसाळी नवीन सुरू केल्या होत्या. कल्याणला टांकसाळ होती. नासिकच्या रुपयाला जरीपटका म्हणत. निशाणी जरीपटका हा रुपया हरिपंत फडके ह्यांनी सुरू केला. फरसी रु.चे वजन १७५ ग्रेन असून त्यात शुद्ध धातू १६४·५ ग्रेन होता. या रुपयावर परशु (कुऱ्हाड) हा ठसा असल्यामुळे त्यास फरशी रुपाया म्हणत. हा पोतेचालीचा रुपया होता. म्हणजे सरकारमान्य–स्वीकार्य. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी नाणी चालत. त्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाताना नाणी बदलून घ्यावी लागत. त्याबद्दल बट्टा द्यावा लागे. बट्टा म्हणजे किंमतीतील फरक काढून टाकणे (हुंडणावळ). परंतु जुने झिजलेले रुपये मोडून नवीन पाडून मिळत त्याबद्दलच्या मोबदल्यालाही बट्टाच म्हणत. या सर्व कारणानी नाण्यांच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार मोठा चाले. जरूर त्या छापाचे नाणे बाजारात विकत मिळत असे. होन ३। रुपयास मिळत असे. मोहोरांची नावे अशी: पंचमेळ, औरंगाबादी, गंजीकोट, वज्रजोगणी (वज्रेश्वरी), लातुरी, आजमेरी, आमदाबादी, हालीशिक्का, महमदशाही, शेटशाही, दिल्ली शिक्का. ह्याशिवाय,

Scanned with Car

होन व पुतळी ही मोहरेपेक्षा लहान नाणी होती. या सर्व नाण्यांत धातूच्या शुद्धतेला महत्त्व असे. शिक्क्याचा विचार करीत नसत.

सावकारी– कर्ज देण्याघेण्याचा व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर चालत असे. सरकार व त्यांचे सरदार, दरकदार ह्यांना नेहमी कर्जे काढावी लागत. त्यामुळे सबंध देशात सावकारी पेढ्यांचे जाळच निर्माण झाले होते. ब्राम्हण सावकारही पुष्कळ होते. लाखो रुपये एकरकमी कर्ज देत असत. रक्कम फारच मोठी असल्यास तीन चार सावकार मिळून कर्ज देत. हातावर कर्जाऊ रक्कम देत (हातउसने); परंतु बहुधा खते लिहूनच कर्ज देण्याचा प्रघात असे. कर्जरोखे व गहाणखाते हीच मुख्य असत. कर्ज फेडण्याची मुदत नमूद केलेली असे. हातावरील कर्जाला थोड्या महिन्यांची मुदत असे. मुदतीत कर्ज न फेडल्यास गहाण वस्तू डुबत असे. स्थावर मिळकतीप्रमाणे वतनांचे अधिकारही गहाण ठेवीत असत. सामान्य वस्तूत सोने, तलवार, घोड्यांच्या पागा, कापड वगैरे गहाण वस्तू असत. सोने गहाण ठेवल्यास आठ आणे मितीने पैसे मिळत. इतर वेळी १ रु., १। रु., १॥ रु. पासून २॥ रु. पर्यंत मासिक व्याजानें पैसे मिळत. किरकोळ रकमांना व्याजाबद्दल धान्याचा स्वीकार करीत असत. कर्जफेडीच्या वेळी थोडी सूटही देत. प्रामाणिकपणा फार मोठ्या प्रमाणावर होता म्हणूनच व्यवहार चालत. कारण कर्ज वसूल करण्यासाठी कोर्टे नव्हती. वसुलीचा उपाय सावकारालाच करावा लागे. हा उपाय म्हणजे धरणे बसणे. सावकार कर्ज मागण्यास कुळाकडे मनुष्य पाठवी; तो त्याच्या ओटीवर चोवीस तास उपाशी बसे. त्या काळी आपल्या दारी कोणी उपाशी असल्याने त्यांनाही उपास घडे. आपणास उपोषण घडते व आपल्यामुळे दुसरा उपवासाने तळमळतो ह्याचा परिणाम आपणाला भोगावा लागेल ह्या भीतीने कूळ हर प्रयत्न करून काहीतरी वसूल देत असे. कुळाने चटकन पैसे द्यावे ह्याकरिता परजातीचा माणूस धरणे धरावयास पाठवीत. ऋणकोस उपोषण पाडणे याला क्षेत्र करणे म्हणत.

वाहतूक व्यवस्था:– वाहतुकीसाठी वाहन फारशी नव्हती. ओझी वगैरे वाहून नेण्यास बहुतांशी बैलांचा किंवा उंटांचा उपयोग करीत. प्रवासी वाहतूक बहुधा पायीच होत असे. घोडे व डोल्या यांचाही उपयोग करीत असत. बैलगाड्या फारशा प्रचारात नव्हत्या. पुणे ते कुंभकोणम् भाडे २० रु. पडे. गुळसुंदे ते पुणे डोली व घोडी मिळून ११। रु. भाडे पडलेले आहे. चालण्याच्या कामांत माणसे जणू घोड्याशी स्पर्धा करीत. पुणे ते सातारा ७० मैल आहे. हा प्रवास लोक एका दिवसात चालून जात. नैवाशाहून दोन दिवसांत जासूद चालत पुण्यास आले. म्हणून १॥ रु. इनाम दिलेले आहे. डाकेवर घोड्यापेक्षा पायी जासूदाची योजना करीत. लांबच्या प्रवासात पालखीबरोबर निदान आठ माणसे असत. त्यांची मजुरी-भोई रोज आठ आणे पडे. परिस्थितीमुळे गुण उत्पन्न होतात. त्या वेळी

ते किती कष्टाची कामे व जलद करीत असत हे वाचले म्हणजे मन थक्क होऊन जाते. आज आम्हास पाऊण मैल अंतर चालणे जिवावर येते.

टपाल व्यवस्था–पेशव्यांच्या फौजा हिंदुस्थानभर फिरत असल्यामुळे इकडून तिकडे बातमी पोहोचण्याची व्यवस्था करणे भाग पडले होते. त्यामुळे ठिकठिकाणी लोक ठेवून पत्रे पाठवण्याची योजना अमलात आली होती. बातम्या आणण्यापोहोचवण्याचे कामी मुद्दाम माणसे ठेवीत, त्यास डाक ठेवणे म्हणत. कोकणात बातम्या आणण्यासाठी मचवे ठेवलेले असत. त्यास बातमीचे मचवे म्हणत. अमुक दिवशी मचवे पोहोचले पाहिजेत किंवा जासूदाने रोज एवढे चाललेच पाहिजे असे बंधन असे. खाजगी खुशालीची पत्रे पाठवण्याची अडचण लोकांना भासत नसे. यात्रेला निघाल्यावर मात्र खुशाली कळवणे जरूरीचे वाटे. त्यासाठी आठवले यांनी काशी ते पुणे डाक स्थापन केली होती. सरकारी व सावकारी अशा दोन डाका निर्माण झाल्या होत्या. कल्याण ते काशी, कल्याण ते मुंबई, पुणे ते नाशिकत्र्यंबक, ग्वाल्हेर ते सातारा इत्यादी डाका उल्लेखित आहेत. पत्रे तोलून वजनावर दर पडे. चार आणे तोळा हा दर असे. सावकारी डाकेत जासूद इतरांचीही पत्रे घेत. हाशील पत्र स्वीकारणाराने द्यावयाचे असे. पत्राचा मालक मिळाला नाही व पत्र परत आले तर डबल हाशील द्यावे लागे.

गुन्हेगारी व न्याय–चोरी, मारामारी, खून, शिवीगाळ, व्यभिचार, बेअब्रू करणे, अतिक्रमण, मनुष्य पळवून नेणे, नोकरीचा करार मोडणे, मुक्या जनावरास इजा करणे, बलुत्याची कामे न करणे, गाव सोडून जाणे, सरकारी कायदे मोडणे, गाय नांगराला धरणे, वजनमापात फसवणे, दुसरे गावची सोयरीक करणे, ह्या प्रकारचे गुन्हे होतेच; परंतु खोटी भुते घालणे किंवा भुते घालण्याचा खोटा आरोप करणे हेही गुन्हे मानले जात. काही गुन्हे प्रासंगिक स्वरूपाचे असत. उदा. इंग्रजांकडे चाकरी करणे हा गुन्हा समजून पारिपत्य करण्यात येई. त्याचप्रमाणे कराराच्या बाहेर काम करणे हे गुन्ह्यात गणले जाई. चहाडी करणे हाही गुन्हाच होता. गुन्ह्यांबद्दल शिक्षा दंडाची असे. खुनालादेखील दंड करण्यात येई. १ रु. पासून ४०० रु. पर्यंत दंड झालेला आहे. ज्याचे नुकसान झाले असेल त्याला दंडापैकी रक्कम देण्याची वहिवाट होती. राजद्रोहाच्या गुन्ह्याला तुरुंगाची शिक्षा होती; परंतु अन्य कारणासाठीही तुरुंगाची शिक्षा असे. तुरुंगातून गुन्हेगारास सोडावयाचे असल्यास जामीन घेऊन सोडीत. अवश्य तेथे गोताच्या संमतीने अपराधाची चौकशी करीत. चोरी करणाराचा पत्ता न लागल्यास सर्व गावाला नुकसान सोसावे लागे. भिल्लांचे उपद्रव मोडण्याची जबाबदारी जमीनदाराची असे. म्हणजे जमीनदार हे वतनी पोलीस अधिकारी होते. व्यभिचाराबद्दल स्त्री-पुरुष दोघांनाही दंड होत असे. आरोप शाबीत झाला नाही तर खोटा आरोप करणारास शिक्षा होई.

Scanned with Car

लहानसहान दुराचरणही खपत नसे. मुलाने आईजवळ गैरसनदी कटकट केली; यामुळे त्याला आठ आणे दंड केला आहे. हा मुलगा मांग जातीचा होता. कोणाला न कळत इजा झाल्यास पैसे देऊन त्याची समजूत करीत. एका बारगीराच्या घोड्याचा एका कुणबिणीस धक्का लागला आणि ती पडली. सबब तिला रुपया देण्यात आला. शिंदळकी केल्याबद्दल एका बाईला १५० रु दंड केला आहे. दंडाला मसाला, खंड, गुन्हेगारी हे तीन शब्द वापरीत. न्यायासनासमोर फक्त पैसा व वतन याबद्दलचे दावे असत. सरकारच्या परवानगीवाचून कोणालाही दत्तक घेता येत नसे. कोणी बिनवारस मयत झाल्यास त्याची मिळकत सरकारकडे जात असे. दिवाणी व फौजदारी दावे चालवण्याचा अधिकार जमीनदाराना असे. कज्जा हरणाराकडून सरकार कर घेई त्यास दरकी म्हणत.

दानधर्म– पेशवाईचा काल म्हणजे दंगेधोपे, लढाया, युद्धे, दानधर्म, हव्यकव्य ह्यांच्या दंगलीचा काल असे वर्णन करता येईल. दोन्हीही दंगलीच. एकीचे स्वरूप राजकीय, तर दुसरीचे धार्मिक एवढाच फरक. त्यामुळे कर्तबगार, शूर, मुत्सद्दी लढवय्ये यांना जसे चांगले दिवस आले होते, तसेच भिक्षुक, शास्त्री, पंडित यांच्या लाभांत सर्व उच्च ग्रह आले होते असे म्हणता येईल. अन्नसंतर्पणे, दाने, व्रतवैकल्ये, प्रायश्चित्त वगैरे प्रकार सर्रास चालू होते. द्रव्याला स्पर्श सुद्धा न करणाऱ्या संन्याशासमोर देखील द्रव्याच्या राशी पडत. कित्येक स्वामी तर सावकारीही करीत-स्वामीप्रमाणेच अग्निहोत्र्यांचाही परामर्ष घेण्यात येत असे. एका अग्निहोत्र्याला ३२० रु. देण्यात आले. राज्यकर्त्यापासून सर्वांचा कल्याण मंदिरे बांधण्याकडेही कल असे. पेशवे बहुतेक विजयानंतर देऊळ बांधीत. विजयाकरिता नवस बोलत व ते फेडत असत. पेशवाईच्या काळात असंख्य मंदिरे नवी झाली किंवा त्यांचा जीर्णोद्धार झाला. सामान्य माणसे सुद्धा मंदिरे बांधीत. मंदिर बांधणे किंवा जीर्णोद्धार करणे फार पुण्यप्रद मानीत. कल्याण सुभ्यात या काळात असंख्य मंदिरे बांधली गेली, जीर्णोद्धार केला गेला. रामाजी महादेव सुभेदार बिवलकर ह्यांनी १०८ शिवमंदिरे बांधली. शिवाय असंख्य देवळांचा जीर्णोद्धार केला. कल्याण शहरातील मंदिरे देखील येथील सुखवस्तू ग्रामस्थांनी बांधली. समाज हा कायदा, शासन यापेक्षा परमेश्वराला जास्त भितो हे मानसशास्त्रीय तत्त्व राज्यकर्त्यांना माहीत होते. ते स्वतः तसे ईश्वरी सत्तेला भिऊन नमून वागत म्हणून जनताही एवढ्या अडचणीच्या असुरक्षित काळातही धार्मिक नियमांना भिऊन वागत असे. परंतु आजच्या बेछूट काळात जनता शासनासही भीत नाही व ईश्वरालाही भीत नाही. त्यामुळे लोकशाहीच्या व स्वातंत्र्याच्या काळात समाज व शासन नियंत्रण लुळे पडलेले दिसून येते. पेशवाई-काळात सामान्य जनता त्यामुळे समाज व न्यायापुढे फार नमून वागे.

तुलादान–साधारण ऐपतदार गृहस्थ तुलादान करणे आपले कर्तव्य समजत असे. तुलादान करणे म्हणजे आपल्या वजनाएवढे द्रव्य दान करणे. तुलादानाने

स्वर्ग प्राप्त होऊन पुनः जन्म घेतल्यावर राजेपद प्राप्त होते अशी समजूत होती. ह्यामध्ये एक महत्वाची गोष्ट म्हणजे यात मोठेपणा व संपत्तीचे प्रदर्शन हा जेवढा भाग, तेवढाच भाग संपत्तीच्या विभाजनाचा आहे हेही विसरून चालणार नाही व तेही खुषीचे विभाजन आहे व समाजासाठी आहे. जुलमाचे सरकारी विभाजन नही. त्यामुळे असंतोष, लबाडी हा प्रकार आढळणार नाही. तुलादानातून कधी कधी देवालये बांधली जातात.

तोडगे–आजार घालविण्याकरिता वैद्याचे औषध जसे करीत तसेच तोडगे करीत व दानधर्मही करीत. ह्या सर्वात तोडगे हा प्रकार अडाणीपणाचा व हीन संस्कृतिदर्शक आहे. परंतु हे प्रकार आजच्या अणुयुगातही भारतात केले जातात. परंतु दानधर्माचे चांगले प्रकार मात्र टाळले जातात. शिशाची यंत्रे आजारी मुलाच्या गळचात बांधली म्हणजे रोगपरिहार होतो, अशी समजूत होती. ह्याखेरीज दारू, मास, कोंबडी अंगावरून ओवाळून टाकणे वगैरे प्रकारही केले जात. कल्याण सुभेदार बिवलकरांच्या वहीतही जरीमरीच्या पूजेसाठी बारा आणे खर्ची पडले आहेत. कशासाठी हे सांगावयास नकोच. तोडगाच असावा. आजार बरा व्हावा म्हणून कित्येक वेळा पाठ वाचून घेत किंवा सूर्यनमस्कार घालवून घेत असत. सुभेदारांना बरे वाटावे म्हणून १२००० नमस्कार घालवून घेतले आहेत व हजारी एक रु. प्रमाणे एका ठिकाणी १२ रु. खर्च झाले आहेत.

अनुष्ठाने–विशेष सामुदायिक आपत्तीचे प्रसंगी अनुष्ठाने केली जात असत; आजही केली जातात. महामारी रोगाची साथ आली की अनुष्ठान केले जात असे; पर्जन्यासाठी अनुष्ठान केले जात असे. गेल्याच वर्षी सबंध महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अनुष्ठाने करण्यात आली. परंतु सामान्य बाबतीतही अनुष्ठाने काही वेळा केली जात. उदा. बाळंतपण सुखाने व लवकर व्हावे म्हणूनही परमेश्वराला कोंडण्याची रीत होती. नाना प्रकारची अनुष्ठाने केली जात; परंतु त्यांत प्रयत्नाला यश यावे एवढाच हेतू असे. त्यामुळे जनतेचा त्यावर विश्वास असे. परंतु काही प्रयत्न न करता परमेश्वराला कोंडून अनुष्ठानाची प्रचीती जेव्हा पाहिली जाते तेव्हा विफलताच येते. कारण परमेश्वर हा काही मनुष्याच्या अनुष्ठानांचा गुलाम नव्हे. मग अनुष्ठानाला नावे ठेवणे चूक होईल. मानवी प्रयत्नाला नैसर्गिक अनुकूलता प्राप्त व्हावी एवढाच हेतू असे व असावा.

प्रायश्चित्त–आपल्या हातून अधर्म घडला म्हणजे जो दंड द्यावा किंवा सोसावा लागतो त्यास प्रायश्चित्त म्हणत. मनुष्य त्या काळी पापाला फार भीत असे. गाईच्या गळचात दावे असताना तिचा प्राण जाऊ देणे किंवा घोडा नालबंद असता मरण पावणे हेही पाप समजून प्रायश्चित्त घेत. प्राणिमात्रांच्या दुःखाला देखील आपण जबाबदार होऊ नये एवढी उदात्त माणुसकी त्या वेळी होती.

Scanned with Car

काही रीतीरिवाज–घोडी व्यायली असता पाचवी पूजन करीत; तसेच गर्भदान विधीचे वेळी नायकिणीची ओटी भरण्याची प्रथा होती. पिंपळाप्रमाणे निंबवृक्षाचीही मुंज लावीत असत. ब्राम्हणाकडून नमस्कार घालून घेणे हा आरोग्यप्राप्तीचा उपाय मानण्यात येत असे. कल्याण सुभेदाराचे उदाहरण वर सांगितलेच आहे.

गंगा-कावडी–काशीहून ठिकठिकाणी गंगेच्या कावडी वाहून आणण्याचा एक फार कष्टाचा व्यवसाय जोरात होता.

ज्योतिष–ज्योतिषावर जनतेचा बराच विश्वास होता. पुष्कळ पैसे खर्च करून लोक जन्मपत्रिका करून घेत. ४०–५० रु. पत्रिका करणावळ मिळे. नवी पत्रिका केली म्हणजे तिचे पूजन करून श्रवण करण्याचा विधी होत असे. गोचरीचा ग्रह अनिष्ट आल्यास यथाशास्त्र दाने व जप करण्यात येई. राहू अष्टमस्थानी आला म्हणून दान, गुरू पालटला म्हणून साखरदान, शनि पालटला म्हणून वडे-दान वगैरे. यावरून श्रद्धेने शास्त्राज्ञा पाळीत होते असे दिसते. प्रत्येक कृत्य मुहूर्त पाहून होत असे. कल्याणच्या सुभेदारांना आपल्या नव्या वाड्यात प्रवेश करण्यास 'नवघटका रात्री' मुहूर्त मिळाला. प्रयाणाच्या वेळी देवापुढे द्रव्य ठेवीत. कल्याणहून पुण्यास जाताना सुभेदारांनी जरीमरीला व हनुमंताला ३ दिडक्यांचा शेंदूर लावला होता. आपणास पाहिजे तेव्हा मुहूर्त मिळत नसल्यास प्रस्थान ठेवण्याची चाल होती. सुभेदार प्रस्थानी आंबेडकरांच्या घरी मध्यरात्रीस गेले व तेथे ब्राह्मणांना दक्षिणा दिली. घातचंद्रावर प्रयाण करण्याचा प्रसंग आल्यास तांदूळ दान करीत. तसेच प्रयाणसमयी रोगपंचक आल्यास रौप्यदान करीत.

ब्राह्मणभोजनें–सहस्रभोजने वारंवार होत. परंतु लक्षभोजनेही घालण्यात येत. कल्याण सुभेदारांनी लक्षभोजन घातले होते. त्या वेळी भोजनावळीला फार कमी खर्च येत असावा असे दिसते. भोजनदक्षिणा साधारण एक दिडकी (पैसा) असे. या दक्षिणेसह लक्षभोजनाला साधारणतः १४००० रु. खर्च येई.

गोप्रदान–द्रव्यदान व गोप्रदान हे एकच होय. पूर्वीच्या वस्तुविनिमयपद्धतीचा अवशेष.एका गोप्रदानास साधारणतः ८० रु.ते १०० रु. खर्च येई. गोशतदाने देखील देत असत. परंतु शंभर गाईंबरोबर एक बैल द्यावा लागे. गोदान हे महादानापैकी एक आहे. दशमहादाने पुढीलप्रमाणे होत. "कनकाश्च, तिला, नागा, दासी, रथ, मही, गुहाः। कन्या च कपिला धेनुर्महादानानि वै दश ।।" औषधांचा उपगोग होतो तसा दानांचाही होतो अशी समजूत होती. त्यामुळे क्लेशपरिहार, आरोग्यप्राप्ती, अनिष्टग्रहशांती ह्याप्रीत्यर्थ दाने देत असत. पिंपळ किंवा हनुमंत ह्याला प्रदक्षिणा घालवून घेत. दर हजारी ४ आणे प्रमाणे. अर्थात काही वेळा हे दर व्यक्तिपरत्वे बदलले आहेत; परंतु साधारण ह्याच दर असे. महारुद्राची दक्षिणा चार आणे एका-दण्णीला प्रमाणे. मारुतीला प्रदक्षिणा घातल्याने भूत, पिशाच्च, प्रेते ह्यांचा नाश

Scanned with Car

होतो. प्रदक्षिणा घालताना 'मनोजवं' मंत्र म्हणत असत. पिंपळाला लक्ष-प्रदक्षिणा घातल्या की पुत्रलाभ होतो अशी समजूत होती.

व्रते–निरनिराळ्या प्रकारची व्रते केली जात असत. दशाफळव्रत, बुधाष्टमी-व्रत व इतर धर्मशास्त्रात सांगितलेली व्रते केली जात.

श्रावणमास दक्षिणा–ही दक्षिणा देण्याची पद्धत पेशव्यांनी सुरू केली. ही श्रावणमास दक्षिणा हिंदुस्थानभर गाजत होती. सबंध हिंदुस्थानभरचे ब्राह्मण या दक्षिणेसाठी पुण्यात जमत असत. पेशव्यांनी त्या काळच्या शिक्षणासाठी हल्लीप्रमाणे पाठशाळा, कॉलेजे जरी काढली नसली किंवा विद्वानांकडून खास ग्रंथ लिहून घेतले नसले तरी शिक्षण, अभ्यास, विद्या ह्यांना उत्तेजन देण्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर व्यापक नियमित खर्च कोणीही केला नसेल. विद्येला प्रोत्साहन हीच भूमिका त्यामागे असून कोणताही प्रांतभेद त्या ठिकाणी बाळगला जात नसे. या दक्षिणा पद्धतीने सर्व हिंदुस्थानचे विद्वान पुण्यास प्रतिवर्षी जमा होत व एकमेकांचा परिचय होई व शास्त्रचर्चा होई. पेशवे सरकार दक्षिणेची रक्कम रोख स्वतः देत असत. हा खर्च सरकारी असे म्हणून काही प्रमाणात प्रजेकडूनही वसूल केला जात असे. या रकमेचा बोजा कोणत्या महालावर किती टाकावयाचा हेही ठरलेले असे. ही रक्कम रसदेच्या पैशातून दिली जात असे. पर्वतीच्या खालील मैदानात सभामंडप भरे, त्यास रमणा म्हणत. तेथे स्वतः पेशवे आपल्या हस्ते विद्वान ब्राह्मणांना त्यांच्या विद्वत्तेप्रमाणे योग्य ती दक्षिणा देत. त्यांना भोजन वगैरे देत. दक्षिणा समारंभ म्हणजे एक विद्वद्-संमेलनच असे. त्यांच्या व्यवस्थेकरिता, शहराचे बंदोबस्ताकरिता खास योजना पेशवे सरकार करीत असत. विद्वद्-परिषदा, विद्या प्रोत्साहन वगैरेसाठी आम्ही जेवढ्या मोठ्या तोंडाने अशोकाचे, हर्षाचे नाव घेतो, तेवढ्याच धीटपणे पेशव्यांनी विद्येला प्रोत्साहन दिले, एवढे म्हणावयास देखील आम्ही तयार होत नाही, ह्याला कारण काय ते सहज समजण्यासारखे आहे. इंग्रजांनाही ही पद्धत एवढी पटलेली होती की त्यांचे राज्य आल्यावर त्यांनीही ती काही काळ चालू ठेवून त्याचे दक्षिणा प्राइज कमिटीत रूपांतर करून टाकले. या कमिटीतर्फे छपाईच्या कला निघाल्यामुळे प्रतिवर्षी निघणाऱ्या नवीन छापील पुस्तकांपैकी निवडक पुस्तकांना बक्षिसे देण्यास सुरुवात केली. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर हे दक्षिणा प्राइज कमिटीवर होते, हे अनेकांना माहीत आहेच. एवढा विद्वानांचा प्रचंड मेळावा किंवा संमेलन गावात भरत असल्यावर विद्वान होण्याची प्रेरणा कोणाला मिळणार नाहीं? हे विद्वान निर्माण झाले त्याचे श्रेय राज्यकर्त्या पेशव्यांकडे जात नाही काय? तेव्हा पेशव्यांनी विद्वत्तेला उत्तेजन दिले नाही किंवा एखादा ग्रंथ लिहवून घेतला नाही असे म्हणणे म्हणजे प्रचारी आणि विषादी आहे; कांही असूयेपोटी आहे असेच म्हणावे लागेल.

Scanned with Car

इतिहास हा ज्याचे श्रेय त्यासच देतो. पेशव्यांनी अनेक ब्राह्मण विद्वान व वेदमूर्तींना उपजीविकेसाठी जमिनी दान दिल्या, त्या धर्मरक्षण व विद्वत्तारक्षणासाठीच हे कबूल करावे लागेल. पेशव्यांना कमी लेखणे, शक्य तो महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करणे यामध्ये एक प्रकारची हल्ली चढाओढ लागल्यासारखी दिसते. परंतु काळ-रूप इतिहास सत्य नेहमी उघड करीत असतो. इतिहासाचा जो योग्य फायदा पुढील जनतेला होऊन देशाची प्रगती साधावयाची असते, तो असल्या राजकीय व जातीय विकृत नजरेने मूल्यमापन करणारांकडून होत नाहीच; उलट ते देशाची हानीच करीत असतात. म्हणून सत्यापलाप होऊ नये एवढ्यासाठीच एवढे विवेचन केले. पेशव्यांनी विद्येच्या प्रोत्साहनासाठी त्या काळी जेवढे शक्य होते तेवढे सर्व केले हेच खरे. निरनिराळ्या कालखंडांतील व परिस्थितीतील व्यक्तींची एकमेकां-बरोबर तुलना करूच नये. कारण ती समान पातळीवर व समान परिस्थितीत होत नाही. या दोन्ही व्यक्तींवर आपणाकडून अन्याय होतो; दोघांनाही कमीपणा आणला जातो.

आहेरः– ही पद्धत अभ्युदय, शुभ प्रसंगाप्रीत्यर्थ आपल्या शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी प्रतीकात्मक आहे. 'आह' नावाचा संस्कृत धातू आहे; त्याचा अर्थ वस्त्र धारण करणे. आहार्य म्हणजे धारण करण्यास योग्य. तेव्हा मूळ शब्द आहेर नसून आहार्य असा असावा; तो अपभ्रंशाने आहेर झाला. अर्थात अहेर हा नेहमी वस्त्रा-चाच होता. परंतु हल्ली कालपरत्वे प्रथा कायम, परंतु वस्तू, द्रव्यरूप झाला. तसेच आहेराला हल्ली हक्काचे स्वरूप प्राप्त झाले आहे; तसेच परतफेडीचेही रूप धारण केले आहे. मूळ हेतूचा विपर्यास कसा होतो ह्याचे हे महत्त्वाचे उदाहरण आहे. मौंजीबंधन, लग्न, ओटीभरण, गर्भाधान, डोहाळेजेवण, देवदर्शन, सती जाणे, दुखवटा, मेजवानी, प्रथम भेट, शुभवार्ताहरण हे वस्त्रदानाचे प्रसंग आहेत. यामध्ये दुखवटा, किंवा सती जाणे हे विचित्र वाटेल. परंतु वस्तुतः दुखवटा हे मंगल कार्यच मानले आहे. सती जाताना तर उत्सव करतात; सती जाण्याच्या दिवशी आहेर, बरोबर मेजवानीही होत असे. लुगडे अथवा पातळ आणि चोळी ह्यांनी सतीची ओटी भरीत. श्रीमंताकडून सरदारांना दसऱ्याची वस्त्रे जात असत. लोकांचा संतोष करण्यास अन्नाखालोखाल वस्त्रांचा उपयोग होतो. अन्न आणि वस्त्र या जीविताला आवश्यक वस्तू म्हणून मेजवानी आणि आहेर ह्यांची सांगड असे. अधिकाराबरोबर वस्त्रे देत, त्यांना अधिकारवस्त्रे म्हणत. पेशव्यांना छत्रपतींकडून पेशवाईची वस्त्रे येत. हा प्रकार खालच्या अधिकाऱ्यांपर्यंत चालत असे.

पोषाखः–सामान्यतः पुरुष धोतर नेसत. स्वारीस जाताना मात्र विजार, तुमान, तुंबा किंवा पायजमा वापरीत. तुंबाच्या नाड्या रेशमी व किंमतवान असत. श्रीमंत माणसांना नुसत्या नाड्या देखील अहेर म्हणून देत. धोतरजोडे ४ रु.पासून ७० रु. पर्यंत किंमतीचे व प्रतीचे असत. सोवळ्यात पितांबर वापरीत. साष्टीला पितांबर

होत असत. श्रीमंत पेशवे किनखापाची विजार घालीत. अंगात अंगरखे घालीत अंगरखे छिटाचे, रेशमी, किंवा किनखापी असत. थंडीकरता रूईचे असत. अंगरखा कमरेपर्यंत असे. अंगरख्याला अस्तर लावीत. दरबारी पोशाखातील व्यक्तींच्या चित्रांत अंगात आपणास नेहमी झगे दिसतात. परंतु केवळ दरबारी पोशाख म्हणून झगा होता असे नव्हे. इतरत्रही तो वापरत असत. महमुदी किंवा तिसा नावाच्या तलम कापडाची एक जात होती; त्याचे साधारणतः अंगरखे-झगे करीत. तिसा हे रेशमी कापड असावे.

शिरोभूषणः– मंदील, रुमाल, फेटा, तिवट, पागोटे, पगडी, टोपी हे शिरोभूषणाचे प्रकार होते. टोपी मुले घालीत. तिवट व पागोटे बहुधा सारखेच असावे. पागोट्यापेक्षा तिवट शब्द प्रचारात असावा. पागोट्याचा रंग हिरवा, तसा पांढराही असे. ताडपत्री व दोरव्याची असे पागोट्याचे दोन प्रकार होते. तिवटे लाल किंवा कुसुंबी रंगाची करीत. तिवट पागोट्यापेक्षा थोडे महाग असे. ३२।३३ रु. किंमत असे. फैजपूर, कळसपाक, नांदेड, कोटगिरी, जालना, पैठण, शहाडे या ठिकाणी तिवटे बनत असत. ह्याशिवाय उंबरेड व जुन्नर येथेही तिवटे बनत असत. रुमाल जरीकाठी दोरव्याचेही असत. तसेच हल्लीप्रमाणे बांधीव पगडचा होत्या. पगडचा-तिवटे बांधून देणे हा एक धंदा होता. पुण्यास आजही पगडबंद आळी आहे.

अंगवस्त्र– अंगावर घेण्याची वस्त्रे दोन प्रकारची होती. साधे सुती वस्त्र म्हणजे धोतरजोडा. अंगावर पांघरावयास धोतर घेत. उपरणे हा शब्दही त्या काळी आढळत नाही. श्रीमंतांच्या वापरण्यात दुपेटा येत असावा. दुपेटा काशीचा जरीकाठी छडीदार असे.

स्त्रियांचा पोशाख– स्त्रियांना नेसावयाची लुगडी वीस हातसुद्धा असत. छिटे नेसण्याची हौस विशेष असावी. हिरव्या रंगाची रेशीमकाठी पातळेही स्त्रियांना फार आवडत. स्त्रियांचा प्रवासी पोशाख पुरुषांप्रमाणे असे. पायात विजार, अंगात अंगरखा व डोक्यास टोपी, असे स्त्रियांचे वर्णन आढळते. हल्ली झाशीच्या राणीचे घोड्यावरील दाखवलेले चित्र असेच असते. सुवासिनी अंगावर शेला किंवा दुपेटा घेत. विधवा धोतरजोडा अंगावर घेत. पायांत जोडे घालण्याची प्रथा होती. छिटाइतकाच वापर शेल्याचा करीत. झगे, अंगवस्त्र अस्तर वगैरेसाठी शेला वापरीत, तसेच पांघरण्यास व पलंगपोस म्हणूनही शेल्याचा उपयोग करीत असत. शेले दोरव्याचे असत. जाडचाभरडचा पातळ विणीच्या हलक्या कापडास खेंडा शेला म्हणत.

ग्रंथवाचन– या काळात छापण्याची कला माहीत नव्हती. त्यामुळे कित्येकांचा ग्रंथलेखन हा एक मोठा व्यवसाय होऊन बसला होता. विशेष गोष्ट म्हणजे या

व्यवसायात गुजराथी व कानडी लोकही शिरले होते. लिहिणावळ ग्रंथसंख्येवर ठरवीत असत. हजारी २ रु., २॥ रु., २॥। रु., ३ रु. या दरम्यान लेखनाचा दर असे. ग्रंथ फार मोठा असल्यास सालीना पगारावर माणूसच ग्रंथ-लेखनास ठेवीत. एका सालात लेखकाने काही ठराविक ग्रंथ-संख्या पुरी केली पाहिजे असे बंधन असे. काही ग्रंथांच्या किमती अशा होत्या– भारत ३६१ रु., भागवत ३६ रु. गीता २॥। रु., विज्ञानेश्वर २६। रु., शारीरभाष्य १००८८॥ रु. शिवपुराण ६॥ रु.

धर्मग्रंथ पुराणे हे लोकांच्या वाचनाचे विषय होते. वेदांच्या संहिता पठणाकरिता लिहून घेत. संस्कृत नाटकेही मधून मधून वाचीत असत. रामायण व महाभारत, भागवत, पुराणे चातुर्मास्यात वाचण्याची वहिवाट होती. मुलांना रामायण वाचून दाखवण्यासाठी मुद्दाम पुराणिक ठेवीत. पुराणाच्या समाप्तीनंतर ब्राह्मणभोजन होई. पुराणिकांची संभावना चांगली होत असे. स्त्रियांनाही पुराणे वाचून दाखवण्याची व्यवस्था केली जाई. रत्ने, मोती, हिरे, = पाच, माणिक, हिरे हे खडे दागिन्यांत वापरीत. वजनावर किमत ठरवीत. हिऱ्याचा भाव १२ रु. २०, २५ रु. रती असल्याचे दिसते. मोत्यांची किंमत चवावर असे किंवा पाणीदारपणावरही असे. माणकाचा दर ३ रु., ३॥ रु., १० रु. नगाला याप्रमाणे सापडतो. वजन रतींत असते. परंतु किमत वजन व अन्य गुणावर ठरवीत. सोन्याचा भाव १५ रु. ते १६ रु. तोळा असे.

कुणबिणी–मनुष्यांची खरेदी-विक्री पेशवाई अखेरपर्यंत चालू होती. स्त्रियांची विक्री सर्रास असे; परंतु पुरुषांची विक्री बेताने असे. बहुधा अन्य धर्मीय असत. सुभेदार कल्याण यांच्या वहीत ९० रु. सरजेखान बुबेर अधिकारी ता. तळोजे देणे फरोक्त सिदी मुंबरखा साहेबु मिरज्याखान व कर्जात घेतला होता तो विकत दिला म. गणेशपंत तात्या पाटणकर करार किंमत सरजेखान याजकडे ऐसा करार. एकटचा सुभेदारांच्या खाजगीकडील अशा कल्याणास १४ कुणाबिणी व ठाण्यास १५ कुणाबिणी होत्या. या कुणबिणींत मुसलमानीणही असे. उदा. ८ ≡ पोस्तखर्च देणे मुसलमानी कुणबिणीस इदीस. बायकांची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणात होत असे. अर्थात या अविवाहित असत. पोरी किंवा थोरी कोणत्याही वयाच्या विकत मिळत. या स्त्रिया बहुधा शूद्र असत. तशाच मुसलमानही असत. ५० रु. पासून १०० रु. पर्यंत वय व रूप ह्यावर किंमत पडे. घरकाम, काही प्रमाणात भोगदासी म्हणून, उत्तर कार्यात दासीदान ह्याकरिता उपयोगी पडत. हरिदास, भिक्षुक, पुराणिक, हे सुद्धा कुणबिणी खरेदी करीत. अर्थात जो पदार्थ विकता येतो तो गहाणही ठेवला जातो. सावकार चिपळूणकरांच्या नोकराने आपली गंगा कुणबीण गहाण ठेवून चिपळूणकरांकडून २० रु. कर्ज काढले होते. (सन १८२२) कुणबीण म्हणजे हल्ली ज्या जातिवाचक नावाने आपण शब्द लावतो तो अर्थ तेव्हा नव्हता.

मालमत्तेच्या वाटणीप्रमाणे कुणबीण ही मालमत्ताच. अर्थात तिची वाटणी-विभागणी होत असे. कुणबिणींना सणावारी पोस्त, दिवाळीची ओवाळणी मिळे. नेसायला लुगडी व पायात घालण्यास जोडाही देत असत. सरकारी कुणबिणी देखील असत.

हत्यारे अथवा शस्त्रे–तलवार, ढाल, भाला, बंदूक ही हत्यारे लोकांच्या वापरात असत. बंदुकीखेरीज बाकीची हत्यारे घरोघरी असत. ह्याशिवाय कमान आणि तीर ह्यांचाही उपयोग करीत. तत्कालीन बंदूक ५ रु. पासून १२॥ रुपयां-पर्यंत असे. बंदुका लोहार बनवीत व गावोगाव तयार होत असत. तलवार चांगल्या-पैकी १० रु.स मिळे. परंतु ढाला मात्र त्यावरील नक्षीकाम वगैरेनुसार निराळ्या किमतीच्या असत. एका ठिकाणी दोन ढालींना ५० रु., ३५ रु., १५ रु. अशा रकमा खर्ची पडल्या आहेत. एका ठिकाणी बंदुकीच्या २८ गोळ्यांना ६ आणे पडलेले आहेत. सुभेदारांच्या जमाखर्चांत एका ठिकाणी '।' आणे सिलेखाना खर्च भवानी तलवार हिची मूठ बांधली त्यास रेशीम, अशी नोंद आहे; ही नोंद फार महत्त्वाची आहे. तलवारीलाच भवानी हे पर्यायी किंवा सन्माननीय विशेषण असावे. सर्व हत्यारांत हे दैवी हत्यार समजून पुष्कळदा कोणत्याही तलवारीला भवानी हे नाव लोकप्रिय असावे. कमान व तीर २ रु. दहा आण्यास मिळत असे. तोफा बनवण्याचे कारखाने या काळात पेशव्यांनी काढलेले होते; व ते ठिक-ठिकाणी असत. कल्याणलाही तोफा बनवण्याचे कारखाने असत. तोफा बनवणारांना तोफची म्हणत. परंतु हे कासारच असत. सैन्याबरोबर तोफांच्या तत्कालीन दुरुस्ती-साठी कासार नोकरीत असत. किल्ल्यावरील तोफा अवजड असून जागच्या जागीच ओतीत असत. कल्याणला तोफांचा कारखाना असल्यामुळे कासारांची वस्ती फार आहे. कासारआळीच आहे. सुमारे ५० एक घरे तरी कासारांची त्या काळी होती व आजही आहेत. यावरून कल्याणचा तोफांचा कारखाना मोठा होता हेही लक्षात येईल. पेशवे सरकार कल्याण सुभेदाराकडे तोफांची मागणी करतात अशी एका ठिकाणी नोंद आहे. मोघल व ब्रिटिश ह्यांच्याबरोबर लढण्यासाठी तोफखान्याचा वापर करू लागून शस्त्रास्त्रनिर्मिती स्वदेशी सुरू करण्याचे श्रेय पेशव्यांना दिलेच पाहिजे. एवढेच नव्हे तर कालानुसार त्यांनी आपल्या लढण्याच्या पद्धतीत बदलही केला म्हणूनच ते हिंदुस्थानभर राज्यविस्तार करू शकले. तोफासाठी लागणारे लोखंड वज्रेश्वरी येथे निघत असे. तोफांची व बंदुकीची दारू १ रुपयास ३ ते ३॥ शेर व ५ शेर या भावाने मिळत असे. बंदुकीची दारू २ रु. ते २॥ रु. शेर या भावाने मिळे. लोकांचे हत्यारावर प्रेम असे. कित्येक ठिकाणी हत्यारांना दागिने असा उल्लेख केलेला आहे.

आंख–कापडाची किंमत आखावर असे. आंख म्हणजे आकडा. कोरे कापड आखावर ओळखले जाई. आंखाचे आकडे ७५, १३३, २०२, २७१, १०००, ११००,

१२५०, १२९०००० इतके आढळतात. एक रुपयास २ आंख, ४ आंख, ५ आंख, ३३३, ७१११ आंख असे भाव होते. अर्थात ह्यावरून कापडाच्या भिन्न भिन्न जातींचे हे प्रकार होते. कापड देणे अनेक वेळा वेतन खातीं जमा करीत. ह्यावरून प्रत्यक्ष कापड मोबदला म्हणून देत असत. आंखावरून कापडाची तऱ्हा निश्चित होत असे. १२,९०००० हा शालजोडीचा आंख होता. कापड अहेर वगैरे देताना योग्यतेनुसार आंखाचे कापड देत. बहुधा ते जामदारखान्यातीलच असे. शिल्लक नसल्यास तेवढ्या किंमतीचा रोख ऐवज देत.

परदेशी माल–इ. स. १७४५ पासूनच मराठी बाजारात इंग्लिश माल खेळू लागला. कागद, कापड, लोखंडी सामान (चुका, कुलपे), काचेचे सामान (आरसे, फाणस, तावदाने,) तसेच घड्याळे, चहादाण्या इत्यादी पदार्थ ह्यांनी बाजार फुलून गेले. ज्योतिषी पंचांगे इंग्रजी कागदावर लिहू लागले. इनामपत्रे लिहिण्यास विलायती कागदावाचून अडू लागले. घरातील मोडलेली विळी दुरुस्त करण्यास इंग्रज येऊन बसला. इंग्रजी पोलादाशिवाय तोफांचे काने भरणे अशक्य झाले. बायका–पुरुष छिटी कापडाने आपली शरीरे विभूषित करू लागले. मांजरपाट वगैरे शब्द तोंडांत बसले. सोप बाजारात आला व भाषेतही घुसला. याप्रमाणे इंग्रजांनी आमचा बाजार काबीज केला. आम्हांस परावलंबी करून नंतर राज्यही घेतले.

पाटीलकी–पाटील हा जवळ जवळ स्वतंत्र अधिकारीच असे. गावचा मांडलीक राजा असे म्हणण्यास हरकत नाही. कारण राजाकडून त्याची नेमणूक होत नसे. पाटिलकीचा अधिकार वंशपरंपरेने चाले. परंतु निर्वंश झाल्यास राजाकडून नेमणूक न होता गावकऱ्याकडून होत असावी. म्हणूनच पाटिलकी पैशाच्या लोभाने विकण्याचा प्रघात पडला असावा. पाटलाने सरकारी सारा भरला कीं तो गावचा राजाच झाला. ब्राह्मणाकडे काही ठिकाणी पाटिलकी आलेली आहे ती बहुधा खरेदी हक्काने आलेली असावी.

विविध माहिती–घर वाढविण्यास किंवा दुरुस्त करण्यास परवानगी लागत असे. घोडे व उंट वगैरे जनावरे छापून घेत असत. खेडी व महाल एका सुभ्यातून काढून दुसऱ्या सुभ्यात सोयीप्रमाणे बदलत असत. चोण हा महाल कल्याण सुभ्यातून काढून राजमाचीकडे बदलला होता. तिजोरी साधारणतः किल्ल्यावरच ठेवीत. सोड-चिठ्ठी नवऱ्याकडून देवविण्याचा अधिकार सरकारचा असे. स्त्रिया पखवाज वाज-विणाऱ्याही होत्या. मराठी राज्यात तुरुंग फक्त राजकीय कैद्याकरिताच असत. बाकीच्या गुन्ह्यांना दंडाची शिक्षा होई व ती सुद्धा गावच्या पंचाकडून अगर शिष्ठ व्यक्तींकडून. दुष्काळाच्या साली इनामदार रयतेस वसुलीची निव्वळ तहकुबी नव्हे तर सूटही देत असे. गावातील लोकांना तगाई देण्याची प्रथा होती. ' मौजे घोटी ऐन बेरीज ४५०१ रु. वजा न कसल्यामुळे सूट, बाकी ३४०० रु. येणे. "

पेशवे किंवा सरदार ह्यांजकडे मोठमोठ्या जेवणावळी होत, त्याचे मक्ते देत असत. पेशवाईत स्त्रिया जोडे वापरीत. जोड्याला पायपोस म्हणत. लोकांच्या करमणुकीसाठी नाटके ललितासारखी होत असत. दशावतारी खेळ, निरनिराळे अष्टावधानी वगैरेचे खेळ हीच करमणुकीची साधने असत. खेळात मर्दानी भाग विशेष व बैठ्या खेळात, सोंगट्या, गंजिफा वगैरे खेळ असत. खाजगी व्यवहारात लोक अतिशय चोख असत. कोणत्याही कामाचा मोबदला ताबडतोब देत. फुकट काम करून घेण्याची प्रवृत्ती नव्हती. दसरा, वर्षप्रतिपदा, शिमगा, राखी पौर्णिमा इत्यादी सणाचे प्रसंगी पेशवे जातीने हजर राहून भाग घेत. श्रीमंत रंगास गेले त्या प्रसंगी त्यास लोकांकडून नजरा मिळाल्या. श्रीमंतांकडून सरदारांना दसऱ्यास पोशाख जात असे. तीच प्रथा क्रमाने सरदाराकडून खालच्या नोकरास चालू होती. मामले म्हणजे तालुका नव्हे ते निरनिराळे भाग असत. कल्याण येथे पेशव्याचे खाजगी शेत होते. २५ रु. श्रीमंत राजश्री पंतप्रधान पा/जमा कसबे कल्याण गु।। कानोजी माळी खुद्दशेत नावे खर्च माळी ता ।। र. (१६८८ फाल्गुन–१७६६ सन) पळसाचे फुलांचा रंग बनवीत असत. .।।. पळसाचे फुलांचा रंग केला त्यास चुना फक्की वगैरे. (कल्याण सुभेदार)

पुण्याहून मुंबईस जाण्यास त्या काळात पाच दिवस लागत. बोरघाटातले खोपोलीजवळचे तळे व मंदिर शके १६८१ व ८२ मध्ये (सन १७५९) पेशव्यांनी बांधले. त्यास ५०३० रु. खर्च झाले. पेशव्यांसाठी तांदूळ कल्याण सुभ्यातून खरेदी होत. "२०० रु. नारायणभट वैद्य मौजे सांजई कसबे मुरबाड ता. नेरळ प्रांत कल्याण. तांदुळाचे खरेदीबाबत। गुमास्ता धोंडो विश्वनाथ दिले जवाहीरखाना शके १७०० (सन १७७८)" त्या कालातील अलंकारांची काही नावे–अलंकार सोन्याचे, वाकी, कंठा, गव्हाची माळ सहा पदरी, तुकडे कड्यांचे, भाकेराचा जोड, गोठ सोन्याचे व मिन्याचे, गळसरी, चौकडा, भिकबाळी लोलकासहित, कंठ्या, बिंदली, कारले फूल, वेणीची फुले, कंबरपट्टा, वाकी, पाटल्या, पुतळ्याची माळ, बोरमाळ, जुगणी, घोस (मोत्याचा) इत्यादी. वेठबिगार पद्धत होती. वेठबिगार म्हणजे सरकारी कामासाठी लोकांना नेणे. कसबे कल्याण येथील तळे उपसण्यासाठी वेदमूर्ती बापू भट व वासुदेव भट कर्वे ह्यांच्या इनाम गावातून वेठ बिगार कल्याण सुभेदार आणणार होते; त्यास माधवराव पेशवे ह्यांनी वेदमूर्तींचे गावचे वेठ घेऊ नये म्हणून लिहिलेले पत्र उपलब्ध आहे. (सन १७७१ एप्रिल २६). नीळकंठ रामचंद्र चासकर हे हुजूर पथकाचे शिलेदार म्हणून नेरळ मुक्कामी होते. त्यांच्या रोजमुऱ्याची नेमणूक (पगाराचे खर्चाची) ता. साष्टीकडे होती. सन १७६१ मध्ये रामाजी महादेव बिवलकर सुभेदार ह्यांचे बंधू बाळाजी बिवलकर ह्याने शके १६८३ सन १७६१ मध्ये भिवंडी प्रांताची गुमास्तागिरी गुलाम मोहिद्दिन व गुलाम अली चौधरी याजपासून खरेदी केली. १७६१ च्या फेब्रुवारीमध्ये नानासाहेब पेशवे ह्यांनी चौधरी

हुधाजकडील हक्काचे पैसे वसूल १२ वर्षेपर्यंत बिवलकरांनी केले व चौधरी ह्यांनी वारंवार मागणी करूनही दिला नाही, तेव्हा त्याचे अर्जावरून, रामाजी महादेव सुभेदारास जाब बिचारला व हक्काचे पैशाचा पत्र पाहताच हिशोब देऊन रुजवात करून द्यावी व फिरून बोभाटा होऊ देऊ नये असे जरबेचे पत्र दिले. तेव्हा रामाजी महादेवाने आपल्या भावाकडून हिशोबानंतर सरळ खरेदीखतच करविले. कल्याण-भिवंडी गांजाचा मक्ता ५०० रु. होता.

◘ ◘ ◘

: १४ :

कल्याणातील देवस्थाने

कल्याण शहराचा इतिहास कितीही प्राचीन असला तरी मध्यंतरी राजकीय
उलाढालीत प्रत्यक्ष कल्याण शहरातील अत्यंत प्राचीनतम देवालये आजमितीस आढळत
नाहीत. परंतु मुसलमान राज्यकर्त्याखेरीज देवालये नष्ट करण्याचे प्रकार अन्य कोणीही
केल्याची नोंद आजपर्यंत नाही; त्यामुळे प्राचीन देवालयांची मोडतोड व जाळपोळ
हा मुसलमानांचा वारसा असल्यामुळे व मोंगली अंमल कल्याण शहरावर काही वर्षे
असल्यामुळे व मोंगल-मराठे संघर्षात कल्याण शहराची जाळपोळ अनेक वेळा
झाल्यामुळे, प्राचीन देवस्थानांचे इतिहास मिळत नाहीत किंवा ती नष्टप्राय झाली
आहेत. काहींचे पुनरुद्धारामुळे आज अस्तित्व आहे. उदा. किल्ले दुर्गाडीवरील श्री
दुर्गामाता मंदिराची बरीच मोडतोड होऊनही त्याचा पुनरुद्धार झाला. पेशवे सरकारने
१७४९ मध्ये त्याची वास्तुशांत केल्याची नोंद पेशवे दप्तरात आढळते. तसेच
जत्रा, नवरात्र व दसरा समारंभ साजरे केल्याचे कागदपत्रही उपलब्ध आहेत. एवढेच
नव्हे तर धर्मादाय इनाम देऊन किल्ले दुर्गाडीवरील श्रीभवानीदेवी दुर्गामाता
मंदिराची दैनंदिन पूजाअर्चा वगैरे करण्यास कसबे कल्याण येथील वेदमूर्ती श्री.
महादेवभट गोडबोले (प्रस्तुत लेखकाचे पूर्वज) ह्यांची नेमणूक केली होती.

किल्ले दुर्गाडीवरील श्रीदुर्गाभवानी मंदिर, कल्याण

Scanned with Car

ह्यासंबंधीचे सर्व कागद (पेशवे दप्तरातील उतारे) अगोदरच्या पानांवर छापलेलेच आहेत. बाकीची मंदिरे पेशवेकालीन व नंतरची आहेत असे वाटते. कारण त्यासंबंधी पेशवेकालापूर्वीचा पुरावा मिळण्यासारखा नाही.

आज मितीस कल्याण येथे ३२ देवस्थाने आहेत. त्यांतील १७ पेशवेकालीन आहेत व १५ इंग्रजी राजवटीत बांधलेली आहेत. सर्व देवस्थानांना मिळून १०८५ रु. उत्पन्न आहे. त्यातील ७४५ रु. चे उत्पन्न खाजगी आहे व बाकी ३४० रु. सरकारकडून आहे. गावातील मुख्य देवळे म्हटली म्हणजे किल्ले दुर्गाडीवरील श्रीभवानीदेवी दुर्गामातेचे मंदिर, सरकारवाड्यासमोरील श्रीरामजीचे मंदिर, त्याच्याच जवळचे काशी-विश्वेश्वराचे मंदिर व फडणीस वाड्यासमोरील त्रिविक्रमाचे मंदिर व त्याच्या अलीकडील टिळक चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील दत्त आळीच्या कोपऱ्यावरील श्री महालक्ष्मीचे मंदिर, श्री गांवदेवीचे मंदिर, शिवाजी चौकातील श्रीहनुमान मंदिर, नारायण पेठेतील श्रीजरीमरीचे मंदिर, काळचा मशिदीसमोरील कोपऱ्यावर असलेले सहजानंद मंदिर, दूधनाक्यावरील लक्ष्मीनारायण मंदिर, (वाणी लोकांचे), लक्ष्मीनारायण मंदिर (सोनारांचे), डॉ. अन्सारी चौकाजवळचे, बाजारपेठेतील पोखरणीजवळचे श्रीगणपती मंदिर, मच्छीबाजारमधील ठाकूरद्वार श्रीरामजीचे, ही प्राचीन मंदिरे आहेत. बाकीची मंदिरे अलीकडील आहेत.

(१) किल्ले दुर्गाडीवरील श्री वरदायिनी, त्रैलोक्याचे रक्षण करणारी श्री भवानीदेवी श्री दुर्गामाता मंदिर—हे मंदिर प्राचीनतम आहे. हे मूळ कोणी बांधले व

श्री ब्रह्मचारी विश्वनाथजी श्रीदुर्गाभवानीची पूजा करताना

कोणी स्थापना केली हे सांगणे कठीण आहे. आमच्या तर्काप्रमाणे तें शिलाहारकालीन असावे. श्री शिवाजीमहाराजांनी कल्याण कबज केले तेव्हाही दुर्गाडी हेच त्या स्थळाचे नाव होते. दुर्गाडी या शब्दाचा देवीकोशात व्युत्पत्तीसह अर्थ दिला आहे. ही देवी नेहमी स्मशानाजवळ असते. कल्याणची प्राचीन स्मशानभूमी खाडी-किनाऱ्याला होती. अलीकडेच ती आधारवाडी नाक्याजवळ आणलेली आहे. दुर्गाडी शब्दाची दुसरी व्युत्पत्ती अशी की, जे जे वाईट,राक्षसी त्या सर्वांना गाडून टाकणारी, नाश करणारी देवी. दुर्गाडी हे नाव त्या किल्ल्याला या देवीमुळेच प्राप्त झाले ह्यात शंका नाही. काहीजणांचे मते दुर्गाडीवरील गढी ती दुर्गाडी म्हणून तेथील देवीला तें नाव प्राप्त झाले. परंतु ही गोष्ट अशक्य कोटीतील आहे; कारण, दुर्ग म्हणजे दुर्गम स्थळ, अतिशय कठीण स्थळ; परंतु किल्ले दुर्गाडी हे कठीण स्थळ तर नाहीच, परंतु त्याची उंचीही ७० फुटांचे आत आहे. अर्थात ही व्युत्पत्ती बरोबर नाही. परंतु अगोदर सांगितलेली व्युत्पत्ती दुर्+गाडी म्हणजे अनिष्टाचा नाश करणारी देवी म्हणून ती दुर्गामाता दुर्गाडीदेवी आहे; हे नाव मुसलमान राज्यकर्ते असताना सुद्धा बदलले नाही, हे लक्षात घेण्याजोगे आहे. मातबरखानाने कल्याण जिंकले (१६८९) तेव्हा सुद्धा तो आपल्या पत्रात म्हणतो–आज दुर्गाडीचा किल्ला घेतला. श्री शिवछत्रपतींनी कल्याण कबज केल्यावर दुर्गाडी किल्ल्याचा जीर्णोद्धार केला तेव्हा त्यांना अपार धन मिळाले. श्री शिवछत्रपती हे श्रीभवानीदेवीचे उपासक व श्रद्धाळू भक्त; त्यांनी श्रीदुर्गाभवानीला वंदन करून तिचा आशीर्वाद घेतला असलाच पाहिजे ह्यात शंका नाही. त्यानंतर १७१९ मध्ये रामचंद्र महादेव जोशी ह्यांनी मोगलांपासून कल्याण पुन्हा स्वराज्यात जिंकून घेतले, तेव्हाही श्री दुर्गा-मातेची यथासांग पूजा केली असलीच पाहिजे. वसई संग्रामाचे वेळी श्री चिमाजी-अप्पा पेशवे ह्यांनी जरीमरीदेवी वज्रेश्वरीदेवीप्रमाणे ह्याही देवीचा कौल घेतला असला पाहिजे; व ज्यांनी ज्यांनी या देवीचा कौल धर्मरक्षणाकरिता व स्वराज्य-रक्षणाकरिता घेतला ते ते विजय पावले व कीर्ती करून गेले. नंतर वासुदेव जोशी मुरुडकर हा १७४० मध्ये कल्याणचा सुभेदार झाला. त्याने दुर्गाडी किल्ल्यावरील त्रैलोक्याचे रक्षण करणारी, श्री भवानीदेवी दुर्गामाता मंदिराचा जीर्णोद्धार करून (१७४९) त्या ठिकाणी मोठा उत्सव केला व इतर उत्सव, जत्रा, नवरात्र वगैरे धर्मकार्याकरिता सालोसाल खर्च करविला व मंदिराची देखभाल व श्रीदुर्गामातेच्या पूजेअर्चेकरिता वेदमूर्ती श्री. महादेवभट गोडबोले ह्यांची नेमणूक करून दिली (लेखकाचे पूर्वज). त्याच वेळी सुमारे १०० एक ब्राह्मणांना निरनिराळी वतने व मोठा देकार करून दिला. त्या ब्राह्मणांत कल्याण, ठाणे, पनवेल, पेण वगैरे भागांतील मोठमोठे वेदमूर्ती आले होते अशी पेशवे दप्तरात नोंद आहे. सदरहू दुर्गामातेचे मंदिर किल्ल्यावर असल्यामुळे वेदमूर्ती महादेवभट गोडबोले ह्यांना सालीना सुमारे ३ खंडी भात सरकारी कोठीतून मिळे व रोख रु.२० मिळत. पुढे हे

कार्य त्यांचे वंशजांनी स्वहस्ते-परहस्ते (व्यवसाय बदलत गेल्यामुळे) चालविले. ब्रिटिश काळात किल्ले वगैरे सरकारी मालकीचे झाल्यामुळे उत्पन्न बंद झाले व श्रीदुर्गादेवीसाठी असलेली सरकारी लागवड सरकारजमा झाली. परंतु आमचे पूर्वजांनी आजपर्यंत हस्ते-परहस्ते नित्यपूजा चालू ठेवली. सन १८७६ मध्ये श्री दुर्गादेवीची मूर्ती कोणी दुष्टाने फेकून दिली किंवा चोरली असा उल्लेख सरकारी गॅझेटिअरमध्ये मिळतो. आज त्या स्थानी असलेली मूर्ती ही मूळ नसल्याचे जाणवते, तरी ती मूर्ती जाताच आमचे पूर्वजांनी मिळेल तो दगड घेऊन तेथे स्थापन करून त्या देवीची नित्य पूजा चालू ठेवली असे आमचे वडील सांगत असत. तसेच आमचे वडिलांनी व्यवसायभिन्नत्वामुळे श्रीदुर्गादेवीची नित्यपूजा आमचे कल्याणचे कुलोपाध्याय श्री. आपटे गुरुजी ह्यांना करण्यास सांगितले होते व त्यास ते वेतन देत असत. आमचे वडिलांचे पश्चात् आमचे चुलते श्री मुकुंदराव गोडबोले, विष्णूपंत गोडबोले (दुकानदार व सावकार) ह्यांनी काही दिवस ती व्यवस्था केली. नंतर

श्री. बाळासाहेब ठाकरे श्रीदुर्गाभवानीची पूजा करताना

आमचे वडील बंधू व आम्ही स्वतः आजही एक मनुष्य नेमून (श्री. दाते) नित्य पूजा चालू ठेवली आहे. हल्ली तेथे दरवर्षी नवरात्रोत्सव, फूटपाथ पार्लमेंट व शिवसेना ह्यांचे वतीने मोठ्या प्रमाणात साजरा होतो. ९ दिवस भजने, कीर्तने, व्याख्याने वगैरे कार्यक्रम होऊन नवचंडीयागही होत असतो. ह्या उत्सवात शिवसेना-प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे वगैरे नेत्यांची भाषणे होतात. शिवसेनाच प्रामुख्याने हा उत्सव पार पाडते व हिंदूधर्माची पताका तेवत ठेवते. समस्त कल्याणकरांना ह्याची जाणीव आहे; व ते उदार हस्ताने वर्गणी देत असतात. मंदिर सध्या मोडकळीस आले आहे व ते दुरुस्त करून किंवा संपूर्ण नवीन बांधून जीर्णोद्धार होणे जरूर आहे.

या मंदिराचे अस्तित्वाबद्दलच एक वाद कल्याणातील मुसलमान समाजाने उपस्थित केला होता. त्याचेबद्दल गॅझेटिअरमधील एका वाक्यातील एका शब्दा-वरून मुसलमान समाज या मंदिरावर हक्क सांगून ही मशीद आहे असे म्हणू लागला तेव्हा हिंदूसमाजातर्फे आम्ही स्वतः (लेखक स्वतः) श्रीदुर्गादेवीचे ते मंदिर असून त्याचे आम्ही वहिवाटदार आहोत असा दावा मांडला. प्रस्तुत लेखकाने फूटपाथ पार्लमेंट, शिवसेना या संघटनांचे साहाय्याने मंदिरात होणारे उत्सव फार मोठ्या प्रमाणावर करण्याचे योजले व १९६८ साली सरकार व मुसलमान समाजाचे विरोधातूनही नवरात्र महोत्सव फार मोठ्या प्रमाणावर पार पाडला.

या संघर्षाला जातीय स्वरूप प्राप्त होणार असे दिसताच सरकारने या कामी १९७० साली चौकशी कमिशन नेमले. ही चौकशी सुरू होण्यापूर्वी प्रस्तुत लेखकाने वहिवाटदार या नात्याने हक्काचा दावा लावला. तेव्हा सरकारने चौकशीचा आदेश मे. कलेक्टर, ठाणे ह्यांस दिला असल्यामुळे त्याची चौकशी आधी सुरू झाली. कलेक्टर साहेबांनी १९७० चे फेब्रु. महिन्यात नोटीस प्रसिद्ध करून किल्ले दुर्गाडीवरील वास्तूसंबंधीचे हक्क वगैरेसंबधी ज्या कोणास पुरावे व निवेदने सादर करावयाची असतील ती द्यावीत असे प्रसिद्ध केले. तेव्हा प्रथम चौकशी नंतर दावा या मार्गाने जावे असे लेखकाने ठरविले. (विवेकानंद गोडबोले.)

दुर्गादेवी नवरात्र उत्सवाच्या एका भाषणात आम्ही असे जाहीर करून टाकले होते कीं, वहिवाटीचा हक्क आपण केवळ मंदिराचे रक्षण करण्यासाठीच करीत आहोत व दुसरे कायदेशीर कारण म्हणजे मंदिराची जागा किल्ला आहे, म्हणजे सरकारी जागा आहे, खाजगी नव्हे. म्हणून कोणाही सामाजाला समाज म्हणून कोर्टात हक्काचा दावा करता येत नाही. तेव्हा कोर्टात कायदेशीर लढण्यासाठी एकच व्यक्ती वहिवाट अथवा मालकी सांगणारी लागते. त्यानुसार वेदमूर्ती महादेव भट गोडबोले ह्यांचे वंशज म्हणून आम्ही स्वतःच वहिवाटीचा व मालकीचा दावा

लावू शकतो. अर्थात वहिवाटदार म्हणून हक्क सांगण्यात केवळ कायदेशीर सोय होती. लेखकाने (विवेकानंद गोडबोले) आपले कार्य चालूच ठेवले. कारण लेखकाला कोठून तरी मंदिराचे रक्षण करावयाचे असल्यामुळे स्वतः संशोधन करून आणलेले व इतर उपलब्ध झालेले पुरावे कमिशनपुढे दाखल केले. पेशवे दप्तरातून अगोदर संशोधन करून आणलेले कागद तेव्हाच वर्तमानपत्रातून लेखकाने नंबरा-सहित प्रसिद्ध केले होते. त्याचप्रमाणे लेखकाने पुराव्याला उपयोगी पडतील अशा अनेक बहुजन समाजाच्या साक्षीदारांच्या साक्षी काढून त्यांना वेळोवेळी उपस्थित ठेवले होते. त्यात प्रमुख म्हणजे, कल्याण काँग्रेस कमेटीचे सेक्रेटरी श्री. गोपीनाथ घुमरे, माजी नगराध्यक्षा सौ. सुशीलाबाई खोब्रागडे, त्र्यं. र. दाणेकर, खडे गोळवलीचे सिताराम पाटील, व म्हात्रे वगैरे ग्रामीण व शहरी विभागातले लोक होते. ग्रामीण भागातील व शहरातील असे एकूण १३ साक्षीदार होते. या सर्व लोकांनी वादग्रस्त वास्तू हे मंदिरच आहे हे ठामपणे सांगितले व वेळोवेळी त्या ठिकाणी निरनिराळ्या जत्रा, नवरात्र-उत्सव वगैरे समारंभ होत असतात; त्यांत त्यांचे पूर्वजांनी वेळोवेळी भाग घेतलेला होता असेही सांगितले. तसेच किल्ले दुर्गाडीवरील दुर्गामाता नवसाला पावते असा त्यांचा अनुभवही कथन केला. माजी नगराध्यक्षा (सध्या नवबुद्ध) सौ. सुशीलाबाई खोब्रागडे ह्यांनी १९६० चा महाराष्ट्र दिन नगर-पालिके तर्फे साजरा करण्यात आला, त्यावेळी सर्व समारंभ किल्ले दुर्गाडीवर साजरा झाला व स्वतः देवीची प्रारंभी पूजा करून खणा-नारळाने ओटी भरली असेही सांगितले. प्रत्यक्ष चौकशीचे वेळी विवेकानंद गोडबोले यांनी स्वतःची केस स्वतःच चालविली.

विवेकानंद गोडबोले ह्यांनी स्वतः विरुद्ध पक्षातील प्रमुखाग्रणी, साक्षीदार व निवेदक श्री. रफिउद्दीन काझी, बाकीर नझे, वगैरे व इतर सर्व साक्षीदारांच्या दीर्घकाळ व कसून उलट तपासण्या घेऊन मुसलमान समाजाने सादर केलेल्या पुराव्यांतील व निवेदनातील फोलपणा त्यांचेच मुखातून वदविला. चौकशी-अखेरपर्यंत सातत्याने झीज सोसून परिश्रम व अभ्यासपूर्वक काम चालविले. कित्येक वेळी इतर नामवंत वकिलांच्या गैरहजेरीतही त्यांचे तर्फे काम पाहून हिंदू समाजाची अब्रू निभावून नेली. श्री. विवेकानंद गोडबोले ह्यांनी मुद्देसूद व तर्कशुद्ध युक्तिवाद करून विरोधी पक्षाचा पुरावा संशयास्पद, बनावट व खोटा आहे हे दाखवून दिले.

ह्या चौकशीचा अधिकृत निकाल सरकारने जरी प्रसिद्ध केला नसला तरी महसूल मंत्री श्री. भाऊसाहेब वर्तकांनी विरोधी पक्षाच्या एका सदस्याच्या प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, किल्ले दुर्गाडीवरील वादग्रस्त वास्तू ही मंदिर

Scanned with Ca

असून त्या ठिकाणी हिंदूंची वहिवाट आहे, हे सरकारने मान्य केले आहे. विधान-सभेत दिलेले लेखी उत्तर हा अधिकृत निकालच आहे. हे मंदिर ठरले व ह्या कामी श्रीदुर्गामातेने आमची सेवा रुजू करून घेतली ह्याबद्दल श्रीदुर्गामातेला शिरसा वंदन.

या चौकशीचे कामी विवेकानंद गोडबोले यांना श्री. डी. पी. लोहार, श्री.प्र. ना. बेटावदकर, सौ. सुशीलाबाई खोब्रागडे, आमदार शांताराम घोलप, चिंतामणी देवळे, श्यां. र. दाणेकर गुरुजी, भाऊ भोईर, पद्माकर म्हात्रे, धर्माजी घोलप, गोपीनाथ घुमरे, प्रभाकर मोडक, डॉ. जोग, पुराणिक आर्किटेक्ट, भगवान मदन, मधुकर पाठारे, नामदेव पाटील, बाबू केचे, सुधाकर बावीकर, माजी नगराध्यक्ष उदयकुमार दिवाडकर, कल्याण काँग्रेसचे माजी अध्यक्ष पुरुषोत्तमभाई पटेल, सिताराम सेठ पै, जे. पी. काँग्रेस सेक्रेटरी गोपीनाथ घुमरे, शिवसेना-प्रमुख बाळासाहेब ठाकरे, आमदार नकुल पाटील, फूटपाथ पार्लमेंट कल्याण, इतिहास संशोधन मंडळ कल्याण, बहुजनसमाज व असंख्य मित्रांनी बहुमोल व भरीव मदत करून आम्हांस साहाय्य केले. या सर्वांच्या परिश्रमाचे फळ म्हणजे आज हे मंदिर आहे हे निर्विवाद सिद्ध झाले आहे व नुकतीच ती वास्तु कल्याण नगरपालिकेचे ताब्यात दिली आहे असे समजते. त्या ठिकाणी दरवर्षी नवरात्र उत्सव व दसरा मोठ्या उत्साहाने भव्य प्रमाणात साजरा होत असतो व यंदाचा ३०० वा शिवराज्याभिषेक-दिनही साजरा होत आहे ही श्रीदुर्गामातेची कृपाच होय. आमच्या वहिवाटदारीचे दाव्याची गरज राहिली नाही, याबद्दलही आनंद. कारण गैरसमज उत्पन्न करणारा लोभ आम्हाला कधीही नव्हता व आजही नाही. हिंदु समाजाचा हक्क प्रस्थापित झाला. श्री दुर्गामाता मंदिरावरील संकट देवीच्या कृपेने टळले आणि आमचा वहिवाटदारीचा दावाही संपला. आम्हाला त्यावर कोणताही हक्क सांगावयाचा नाही. तो आम्ही सध्यापुरता हिंदु समाजासाठी फक्त तात्पुरता सोडून दिला आहे.

श्री ग्रामदेवीचे मंदिर–हे गावदेवीचे मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. हे कल्याण शहरातील अतिप्राचीन मंदिर आहे. हे दत्त आळीचे मागील बाजूस हल्लीचा भिडे वाडा, साने वाडीचे वळणाजवळ व दिवेकर ह्यांचे घराजवळ ह्या ठिकाणी आहे. मंदिर अत्यंत जुनाट बांधणीचे आहे. कोणी बांधले हे अतिप्राचीनपणामुळे समजणे शक्य नाही. ह्या देवळास १० रु. रोख सरकारी उत्पन्न आहे. ३७ गुंठे जमीन देवळाचे मालकीची आहे. सरकार देणे ७ आणे फक्त.

महालक्ष्मी मंदिर :– हल्लीचे मंदिर म्हणून दत्तआळीचे कोपऱ्यावर प्रसिद्ध. ह्या देवळात नवरात्रोत्सव मोठ्या प्रमाणात चालतो. यज्ञ होतो. त्यासाठी कुंड

जोडून काढण्यात आलेले आहे. नेहमी धार्मिक कार्यक्रम चालू असतात. हेही निदान २५० वर्षांचे जुने देवस्थान आहे.

त्रिविक्रम मंदिर–हे मंदिर पार नाक्याच्या जरा अलीकडे आहे. हे श्री. मेहेंदळे ह्यांनी बांधले असे म्हणतात. सरकारी उत्पन्न ३७ रु. आहे. मंदिराला प्रशस्त आवार असून मोठा सभामंडप आहे. मूळ मंदिर अगदी छोटेच परंतु त्याला जोडून सभामंडप बांधलेला आहे. तो अगदी अलीकडील आहे. बाजूलाच एक मारुतीचे छोटे मंदिर बांधलेले आहे व समोर एक पिंपळाचा पार आहे. मंदिराच्या रस्त्याकडील प्रचंड दरवाजाजवळ काही खोल्या, दुकाने भाड्याने दिलेली असून त्याचे उत्पन्न मंदिराला मिळते. एका दुकानावर व दिंडीवर मिळून एक माडी आहे; तेथे कल्याणातील समस्त भिक्षुकी करणाऱ्या वेदोमूर्ती ब्राह्मणांचे मंडळ आहे. त्या ठिकाणी ते दररोज एकत्र जमतात. शास्त्र, वादविवाद व इतर कार्यक्रम ठरविणे वगैरे कामे होतात. मंदिरात हल्ली लग्नकार्ये करण्याची सोय करण्यात येऊन सर्व साहित्य पुरविण्याची व्यवस्थाही केलेली आहे. शुभमंगल कार्यालय म्हणून ह्या मंदिराचा उपयोग होतो. तसे मंदिरात कथा, कीर्तन, प्रवचने इत्यादी धार्मिक उत्सव मोठ्या प्रमाणावर नेहमीच होत असतात. या मंदिरासंबंधी एक आख्यायिका ऐकण्यास मिळाली की, हे मंदिर बांधण्यापूर्वी श्री. मेहेंदळे ह्यांनी सिद्धेश्वराचे मंदिरात बसविण्यासाठी ही मूर्ती बाहेरून बनवून आणली व हल्लीचे मंदिराचे ठिकाणी तात्पुरती ठेवली. परंतु श्री. मेहेंदळे ह्यास दृष्टांत झाला की 'माझे मंदिर सध्या मला ठेवले आहे तेथेच बांधावे व तेथे स्थापना करावी.' ह्या दृष्टांतानुसार हे त्रिविक्रम मंदिर बांधण्यात आले आहे व आज ते एक फार मोठे मंदिर म्हणून जागते आहे.

श्रीराम मंदिर–सरकार वाड्यासमोर पुष्करणीच्या काठी ह राममंदिर श्री. कार्लेकर नावाचे एक उत्तर पेशवाईत काही काळ सुभेदार होते त्यांनी बांधले. हे राममंदिर त्रिविक्रम मंदिराअगोदरचे निदान २०० वर्षांपासून तरी आहे. ह्या मंदिरासमोर नेहमीप्रमाणे मारुतीचे छोटे मंदिर आहे व त्याचे मागे वेदपाठशाळा होती. त्या ठिकाणी कल्याणातील प्रत्येक ब्राह्मण मुलगा व्रतबंध झाल्यावर पुरुषसूक्त, रुद्र, नित्यकर्म वगैरे शिकवण्यासाठी जात असे. हल्ली वेदपाठशाळा नाही. राममंदिरातील रामाची मूर्ती सुंदर असून तेथेही दरवर्षी निरनिराळे धार्मिक उत्सव, कथा, कीर्तन, प्रवचने वगैरे होत असतात. ३६ रु. उत्पन्न, ३६ एकर १३ गुंठे जमीन आहे.

श्रीकाशी–विश्वेश्वर मंदिर–श्रीराममंदिराला लागूनच हे मंदिर आहे. हे मंदिर पाटणकर नावाच्या गृहस्थांचे आहे. ह्या मंदिराला ३१ रु. उत्पन्न आहे.

श्रीगणपती मंदिर–हे मंदिर राममंदिरासमोर सरकार वाड्याजवळ आहे. उत्पन्न ३५ रु.

श्रीगणपती मंदिर:–बाजारपेठेतील. हे प्राचीन गणपती मंदिर आहे. ते गोखले यांनी बांधले. हेही पुष्करणीचे एका बाजूस श्री काशी–विश्वेश्वराचे मंदिराचे एका अंगाला आहे. याचा सभामंडप खूप मोठा आहे. या गणपतीला कल्याणातील सर्व कार्यांची अक्षद जाते. याला ३ एकर १९ गुंठे जमीन आहे.

श्री सिद्धेश्वर मंदिर:–हे सिद्धेश्वर आळीत काळे वाड्याजवळ आहे. हे मंदिर श्री. मेहेंदळे यांनी बांधले. याला १५ रु. उत्पन्न आहे.

श्रीरामेश्वर मंदिर:–हे शेणाळे तळ्याजवळ गावाबाहेर आहे. हे मंदिर कल्याणचे प्रसिद्ध आरमारी सुभेदार रामाजी महादेव बिवलकर यांनी सन १७७० साली कल्याणला नव्या वाड्यात स्थायिक झाल्यावर बांधले. जवळच धर्मशाळा आहे. समोर दीपमाळ आहे. पुढे शेणाळ्याचा रम्य तलाव व गणेशघाट आहे. हे मंदिर नेहमी बैरागी–गोसावी यांनी गजबजलेले असते. या मंदिराचा मुहूर्त खांब चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १६९२ (सन १७७०) मध्ये उभा केला. या मंदिरासमोरील घाटावर गणपतीचे दिवसात कल्याणातील सर्व गणपती मूर्तीचे समारंभाने विसर्जन होत असते. रामाजी महादेव बिवलकरांनी बांधलेल्या १०८ शिवमंदिरांपैकी हे एक व बहुधा अखेरचे असावे; कारण एक दोन वर्षांत श्री.रामाजी महादेव बिवलकर कैलासवासी झाले. (सन १७७२) या मंदिराजवळील दीपमाळेजवळ कल्याण येथील ब्राह्मणसभेने ब्राह्मणांच्या अंत्यसंस्कारविधि–क्रियाकर्मांतरासाठी एक खोली बांधली आहे.

गणपतीमंदिर–काळा तलाव:–वरील शिवमंदिराशेजारी श्री. रामाजी महादेव बिवलकर घराण्यानेच एक लहानसे गणपती मंदिर बांधलेले आहे; त्याची व्यवस्था दत्तआळीतील श्री. काळेले यांजकडे आहे असे समजते. या मंदिराला ५ रु. वार्षिक उत्पन्न आहे.

मारुती मंदिर–हे मंदिर पेशवेकालातील असून श्री.फडणिसांचे म्हणून ओळखले जाते. परंतु आमचे मते ते फार प्राचीन असून पेशवेकाळात फडणिसांकडे व्यवस्था आली असावी. हे सध्याच्या शिवाजी चौकात असून तेथे मोठा सभामंडप आहे. त्याच्या समोरच एक पायऱ्यांची जुनी चौकोनी विहीर होती, ती आता बुजविण्यात आली आहे. याही मंदिरात हल्ली निरनिराळे धार्मिक कथा-कीर्तने-भजने वगैरे कार्यक्रम नेहमी होत असतात. हे मंदिर पूर्वीच्या गावाबाहेर असून पूर्वीचे लोक नित्य दर्शनास जात असत. कल्याणचे सुभेदार श्री.रामाजी महादेव बिवलकर यांचे पुत्र सुभेदार आनंदराव राम शके १७०६ (१७८४ इ. स.) ज्येष्ठ महिन्यात पुण्यास जाताना

हनुमंताचे दर्शन घेऊनच गेले. त्याप्रीत्यर्थ ८॥' बाजेखर्च. खाशांची स्वारी पुणे यास जाऊ लागली. सबब सेंदूर जरीमरीस व हनुमंतास असा खर्च पडलेला आहे. (कल्याण सुभेदारांचे जमाखर्चाचे वहीवरून) या मंदिरास १८८२ नंतर वार्षिक उत्पन्न १२५ रु. झाले.

श्री भवानी जरीमरी मंदिर, कल्याण.
(वसईच्या मोहिमेचे वेळी माणसे जमविण्यासाठी सरदार अणजूरकरांनी येथे गोंधळ घातला.)

जरीमरीचे देवालय–हे देवालय सध्याचे नारायण पेठेत शिवाजी चौकाचे पुढे ओढ्याच्या पलीकडील मैदानात रस्त्यापासून जरा आत आहे. या मंदिरापुढे अत्यंत विस्तृत पटांगण पार जोशी बागेपर्यंत होते. हल्ली थोडेसे पटांगण शिल्लक आहे. बाकी वस्ती झाली आहे तरी पुष्कळच शिल्लक आहे. हे मंदिर किती प्राचीन आहे हे सांगता येत नाही. बहुधा हनुमान मंदिराहूनही जुने असावे. हे नगरवासियांचे आहे असे समजते. या मंदिराला एका ऐतिहासिक प्रसंगाने कल्याणच्या इतिहासात अमर करून ठेवले आहे. धर्मवीर सरदार अणजूरकर यांनी मोठ्या खटपटी करून पोर्तुगीझांच्या धार्मिक छळातून वसई व त्याच्या परिसरातील हिंदू धर्मीयांची सोडवणूक करून पोर्तुगीझांना पार खणून काढण्यासाठी जे कारस्थान पेशवे दरबारी केले त्याप्रमाणे श्रीमंत चिमाजी अप्पासाहेब मोहिमेवर निघाले. त्याची नांदी या मंदिराचे पटांगणात झाली. 'सरदार अणजूरांनी कल्याणास येऊन भवानीचा गोंधळ घालण्याचे मिषाने नामाजी देशमूख, भिकाजी हैबतराव वगैरे मंडळी कार्याचे भेदाचे

संबंधी बोलावून त्यांना कामे नेमून दिली (वसईची मोहीम). वसईच्या धर्मरक्षणाची नांदी या देवीचे साक्षीने झाली म्हणून कल्याणकरांना याचे ऐतिहासिक महत्त्व फार आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार होऊन हल्ली तेथील नागरिकांनी मंदिराची व्यवस्था उत्तम ठेवली आहे. तेथे उत्सव, भजने, गोंधळ वगैरे कार्यक्रमही होऊ लागले आहेत व ब्रिटिश काळातील या मंदिराची उपेक्षा नाहीशी झाली आहे.

याशिवाय गावात बरीच मंदिरे जुनी आहेत. काही अलीकडच्या काळात निर्माण झाली आहेत, त्यांची यादी सोबत जोडली आहे. (पान २२१ पहा).

कल्याणातील प्रसिद्ध समाधिमंदिरे

मुख्यतः ही तीन संतसमाधिमंदिरे आहेत. (१) श्रीसहजानंदमुनी (२) श्री राममारुतीमहाराज (३) श्री संत अप्पामास्तर लेले.

श्री बालाजी मंदिर (व्यंकटेश)–या मंदिराचे जागेत मोगलकालीन दारुखाना होता. पुढे मराठी राज्यात रामचंद्र महादेव जोशी यांनी कल्याण जिंकून घेतले. नंतर वसईचे युद्धाअगोदर फिरंग्यांचा कल्याणवर हल्ला झाला, त्याचा किल्ले दुर्गाडीवर अणजूरकर फडके वगैरे सरदारांनी मुकाबला केला; तोपर्यंत तेथे दारुखाना असला पाहिजे. नंतर पोर्तुगीझांचा पाडाव होऊन समस्त साष्टीबेट, वसई वगैरे प्रांत कल्याण सुभेदाराचे ताब्यात आले व सुभेदाराने आपली कचेरी ठाणे येथे हलवली. त्यामुळे पुढील काळात कल्याणचे लष्करी महत्त्व कमी झाले व नंतर युद्धे फारशी झाली नाहीत. त्यामुळे श्री. बाळाजी अनंत पटवर्धन मूळगाव आगरगुले ता. पावस यांनी सुभेदार हरि गणेश यांचे कारकीर्दीत सरकारची दारुखान्याची जागा मागून घेऊन श्रीव्यंकटेशाचे देऊळ बांधले. परंतु नंदादीप, नैवेद्यास खर्च चालविण्यास ऐपत नाही याजकरिता सरकारातून नेहमी नेमणूक असावी म्हणून कसबे कल्याणचे बाजी धोंडदेव फडके, मोकादम पावस यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना नंदादीपासाठी खर्चासाठी नेमणूक करून दिली (सन १७६१). त्याची सनद पुढीलप्रमाणे.

श्री गजानन

॥ श्री ॥ शिवचरणी तत्पर रामचंद्र महादेव निरंतर

अजम जमीदार तर्फ अंबरनाथ यासी रामचंद्र महादेव सुभेदार प्रांत कल्याण भिवंडी सु ॥ इसने अशर मयासितैन व अलफ

श्री व्यंकटेश कसबे कल्याण यांचे नूतन देवालय रा. बालाजी अनंत पटवर्धन खोत मौजे आगरगुले तर्फ पावस, तालुके रत्नागिरी हल्ली वस्ती कसबे मजकूर यांनी सुभेदार हरि गणेश यांचे कारकीर्दीत सरकारची दारुखान्याची जागा होती

मंदिराची यादी

	देवळाचे नाव	व्यवस्थापक किंवा बांधणाराचे नांव	उत्पन्न व सरकार देणे
१	श्री महालक्ष्मी मंदिर,	श्री. पिंपळखरे	२५ रु. रोख.
२	,, त्रिविक्रम मंदिर,	श्री. मेहेंदळे	३७ रु. रोख.
३	,, राम मंदिर,	श्री. कार्लेकर	३६ रु. रोख ३६ ए. १३ गुंठे जमीन. ४ रु. १०आ. सरकार देणे.
४	,, मोठे ठाकुरद्वार,	श्री. जोशी	३५ रु. रोख ४ एकर ३४ गुंठे जमीन. २ रु. ३ आ. देणे
५	,, काशीविश्वेश्वर,	श्री. पाटणकर	३१ रु.
६	,, गणपति,	श्री. लेले	३५ रु.
७	,, गणपति,	श्री. गोखले	३ एकर १९ गुंठे जमीन रु. १–१४ आ. सर. देणे
८	,, सिद्धेश्वर,	श्री. मेहेंदळे	१५ रु.
९	,, रामेश्वर,	रामाजी महादेव सुभेदार	७५ रु. रोख १ एकर ३९ गुंठे जमीन सर. दे. १२ आणे
१०	,, गणपती,	रा. म. बिवलकर सुभेदार	५ रु. रोख.
११	,, सहजानंद मुनी,	श्री. लक्ष्मणशेट मुंबईकर	१४ गुंठे जमीन सरकार देणे १ पै फक्त
१२	,, मारुती	श्री. फडणीस	४ रु. रोख ३ एकर ३८ गुंठे जमीन. सरकार देणे १ रु. ९ आणे
१३	,, ग्रामदेवी	ग्रामस्थ	१० रु. रोख ३७ गुंठे जमीन. स. दे. ७ आणे
१४	,, लक्ष्मीनारायण मंदिर,	वाणी समाज	
१५	,, विठ्ठलमंदिर,	श्री. सावरकर	
१६	,, लक्ष्मीनारायण मंदिर,	श्री. पाटणकर	
१७	,, लक्ष्मीनारायण मंदिर,	दैवज्ञ समाज	
१८	,, लक्ष्मीनारायण मंदिर,	कासारांचे	
१९	,, रामजीचे ठाकुरद्वार,	पिंपळखरे	

२०	श्री गणपती मंदिर,	श्री. किरकिरे	
२१	,, दत्त मंदिर,	श्री. उपाध्ये	
२२	,, ठाकुरद्वार,	श्री. किरकिरे	
२३	,, राम मंदिर,	श्री. मौनीबुवा	
२४	,, राम मंदिर,	श्री. गोपाळदासबुवा	
२५	,, शितलादेवी मंदिर,	कुंभार समाज	
२६	,, जरीमरीदेवी मंदिर,	नगरवासीय	
२७	,, गणपती मंदिर,	श्री. वासुदेव महादेव परभु	
२८	,, विठोबा मंदिर,	कायस्थ समाज	
२९	,, बालाजी मंदिर,	श्री. पटवर्धन	जुना ऐतिहासिक दारूखाना वास्तू.
३०	,, देवी,	श्री. ठाणगे	

ती मागोन घेऊन बांधले. त्यास श्रींचा नंदादीप व नैवेद्य वगैरे खर्चास सरकारातून नेहमी नेहमी नेमणूक असावी म्हणोन बाजी धोंडदेव फडके, मोकादम पावस हल्ली वस्ती कल्याण यांनी विनंती केल्यावरून मनास आणिता श्रीव्यंकटेशाचे देवालय नवीन जाहले. देव महाजागृत स्थान. पूजा, नैवेद्य व नंदादीपाची सोय सरकारातून नेहमी करून दिल्यास स्वामींचे राज्यास श्रेयस्कर जाणून सालीना खर्चाची नेमणूक करून दिली.

१७।। रु. नैवद्यास.
११'।' भात कैली '।।।. दर खंडीस १५ रु. प्र.
१।। डाळ तुरी कैली '।।' दर ३ रु. प्रमाणे.
४।।। तूप वजन पक्के ८१५
१२ रु. नंदादीपास तेल वजन पक्के ८१।। दर
रुपयास वजन ८८५ प्रमाणे
३ रु. किरकोळ पूजेस साहित्य दरमहा रु. '।।' '।' प्रमाणे
१० रु. वस्त्रे देवास
———
४२।। रु.

एकूण ४२।। रुपयाची नेमणूक दिल्ही. याचे खर्चास मौजे कानसई तर्फ मजकूर येथील जमीन बिघे ८ नेमून दिली तिचा दुमाला श्रीकडे करणे छ ११ मोहरम मोर्तबखुद.



श्री सहजानंद मुनि यांची समाधि

सहजानंद मुनि समाधि—ह्यांच्याच नावाने काळ्या मशिदीजवळ प्रसिद्ध असलेल्या चौकात हे समाधिमंदिर आहे. हे सहजानंद मुनी कुठले,कोणत्या काळातले वगैरे खात्रीलायक माहिती मिळत नाही. परंतु हरिविजयमध्ये ह्याचा उल्लेख पुढीलप्रमाणे आहे–' तेथुनि सहजानंद मुनि । ज्याची समाधि आहे कल्याणी । तेथुनि पूर्णानंद पूर्णपणी । अवतरला यतिराज ।। ' (हरिविजय अध्याय २६ ओवी २०३) तसेच गुरुचरित्रातही त्यांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे श्री भक्तविजय ग्रंथातही त्यांच्याबद्दल एक कथा आहे ती अशी. सहजानंदमुनि हे साधारण १२ व्या किंवा तेराव्या शतकातील असावेत. म्हणजे ज्ञानेश्वरांचे समकालीन होत. हे वर्णन केल्याप्रमाणे थोर यति होते. त्या वेळी बेदरास शांत ब्राह्मणी नावाचा मुससमान बादशहा राज्य करीत होता. तो रात्रंदिवस स्त्रीसमवेत माडीवर विलासमंदिरात निमग्न असे. एकदा त्या उभयतांनी केळी खाऊन साली खाली रस्त्यावर टाकल्या. त्या साली एक भिकारी खात असता बेगमने पाहिले आणि बादशहास तो भिकारी दाखविला. तेव्हा बादशहास राग येऊन तो चाकरांना म्हणाला कीं कोणास आत येऊ देऊ

नये असा हुकूम असता तो भिकारी आत कसा आला ? हे ऐकून ते नोकर खाली जाऊन त्यास मारू लागले; तेव्हा तो आनंदाने हसू लागला. तेव्हा बादशहाने त्या भिकाऱ्यास विचारले, 'तुला इतका मार मिळत असता तूं का हसतोस ?' तेव्हा त्याने उत्तर दिले, 'मी नुसत्या केळयाच्या साली खाल्ल्या तर मला एवढी शिक्षा झाली; मग तूं तर त्यातील मगज खाल्लास; तुला किती शिक्षा होईल ? तसेच मी नुसता तुझ्या विलासमंदिराजवळ आलो तर मला कैद मिळते; मग तूं तर त्यांत रात्रंदिवस राहतोस; तेव्हा तुझी गत पुढे काय होईल हे मला कळत नाही म्हणून मी हसतो.' हे ऐकून बादशहास विरक्ती आली व राज्य सोडून अरण्यात निघून गेला, आणि ईश्वरप्राप्ती कशी होईल ह्याचा विचार करीत असता त्यास आषाढीची यात्रा पंढरपुरास चाललेली दिसली. तिजबरोबर तो पंढरपुरास निघाला.

तेथे त्याने पांडुरंगाचे दर्शन घेतले व आपला उद्धार व्हावा म्हणून त्याने देवाचा धावा केला आणि तेथे धरणे धरून बसला. तिसऱ्या दिवशी पांडुरंगाने त्याला स्वप्नात दृष्टांत दिला की कल्याणास सहजानंद स्वामी राहात आहेत; त्यांचा उपदेश घे. त्यावेळी विवेकसिंधूचे पुस्तकही पांडुरंगाने त्यास दिले. बादशहा जागा झाल्यावर ते पुस्तक पाहून त्यास नवल वाटले. ते तो नित्य वाचू लागला. नंतर गुरुपदेश घेण्यासाठी तो कल्याणला गेला. परंतु गुरूची भेट झाली नाही; कारण गुरू पंढरपुरास गेले होते. तेव्हा तो परत पंढरपुरास गेला. तेथे सहजानंद स्वामींची भेट झाल्यावर त्याने स्वप्नातील सर्व वृत्तांत कथन केला. तेव्हा सहजानंद मुनींनी त्यास मंत्रोपदेश करून त्याचे नाव मृत्युंजय ठेवले. ही कथा सांगितली जाते. परंतु ती कदाचित् चालुक्यांचे कल्याणी राजधानीतील सहजानंद महाराजास लागू होण्यासारखी आहे. कारण तेथेही एक सहजानंदमठ आहे व तेथील एकूण स्थळाची रचना व कल्याणच्या या मंदिर समाधीची रचना ह्यांची वर्णने तंतोतत सारखी भरतील. अर्थात् निश्चित काहीही माहिती मिळत नाही. परंतु एवढे मात्र खरे की जिवंत समाधी घेतल्याच्या दुर्मिळ उदाहरणांपैकी कल्याणकरांच्या सुदैवाने एक उदाहरण आहे. ज्ञानेश्वरांनी आळंदीला जिवंत समाधि घेतली तशीच ही समाधि आहे. जिवंत समाधि घेतल्यावर वरून दूध सोडण्यासाठी स्वतंत्र एक जागा व खाली आत उतरण्यासाठी जागा असते. तशीच व्यवस्था ह्याही मंदिरात आहे हे आम्ही समक्ष पाहिले आहे. म्हणून हकिगती काहींही असोत; परंतु ही एका अत्यंत थोर योग्याची जिवंत समाधि आहे ह्याची खात्री पटेल व अशा तऱ्हेचे दुर्मिळ उदाहरण आळंदी येथील ज्ञानेश्वरानंतर कल्याण येथे आहे हे कल्याणकरांचे परम भाग्य आहे. आम्ही अनेक सत्पुरुषांचे देव्हारे माजवितो; परंतु एवढी प्राचीन, एका ज्ञानेश्वरासारख्याच थोर यतीची जिवंत समाधि कल्याणमध्ये आज उपेक्षित अवस्थेत आहे हे दुर्दैव आहे. या समाधीकडे प्रथम लक्ष जाऊन त्याभोवती सभामंडप व व्यवस्था

पाहण्यासाठी ज्यांनी जमीन वगैरे दिली व व्यवस्था केली ते लक्ष्मणशेठ डोळस मुंबईकर ह्यांचे चिरंजीव रामकृष्ण लक्ष्मण डोळस ह्यांनी हल्लीचे मंदिर बांधले. ते तेथेच जवळ राहतात. पूर्वी या मुनींचा उत्सव तेथे साजरा केला जात असे. परंतु हल्ली ही समाधी उपेक्षित आहे. या समाधीसंबंधी आख्यायिका अशी कीं, पाठारे ज्ञातीतील लोकांचे विवाह कल्याणमध्ये होत नाहीत; कारण त्यांच्याकडून काही आगळिक या समाधीचे बाबतीत झाली म्हणून कोणाला तरी त्यांनी स्वप्नात येऊन शाप दिला की कल्याणमध्ये तुमच्या ज्ञातीतील व्यक्तींचा विवाह झाल्यास एकाचा मृत्यू होईल. आख्यायिका काहींही असो; परंतु त्या ज्ञातीची लग्ने त्या भीतीने कल्याण-मध्ये होत नाहीत.

श्री चिद्घन स्वामी सखाराममहाराज समाधि–कवाड, ता. भिवंडी. श्री. सखाराम हरि केतकर उर्फ सखाराम महाराज हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळनजिक करंबोवणे या गावचे. यांचा जन्म ज्येष्ठ शु. ८ शके १७२३ (इ. स. १८०१) दुर्मतिनाम संवत्सरे सायंकाळी कन्या राशीत चंद्र असता झाला. वडील सात भावंडांनंतर हे आठवे अवतार. बालपणापासून यांची वृत्ती परमार्थाकडे होती. कुलदैवत श्रीलक्ष्मीकेशव या सगुण मूर्तीचे ध्यान करीत राहण्याची सवय त्यांना पाचवे वर्षापासूनच जडली. वडिलांजवळ मराठी व मोडी लिपी लिहिण्यास शिकून ब्राह्मणास आवश्यक संध्या, ब्रह्मयज्ञ, अग्निसेवा वगैरे व हरिविजय, पांडवप्रताप, भक्तिविजय, भक्तलीलामृत वगैरे पुराणातील कथा ऐकून व मनन करून त्याबद्दल गोडी उत्पन्न होऊ लागली. एकनाथ, कबीर, शंकराचार्य, तुकाराम, रामदास यांच्या काव्यांमुळे आपणही तसेच व्हावे अशी वृत्ती उत्पन्न होऊ लागली. मौंजीबंधनानंतर कोकणातून तारापुरास श्री. कुशाभाऊ बर्वे यांजकडे वडिलांचे आज्ञेवरून विद्याभ्यासा-साठी आले. सप्तावली, समासचक्र, कोशअभ्यास इत्यादी अभ्यास झाल्यावर शिवषडाक्षर मंत्राचा जप रात्रंदिवस चालू केला. वडील बंधू पांडुतात्या यांची योगक्रिया पाहून धौति, नौलि, भस्त्रा, प्राणायाम व आसन इत्यादी योगाभ्यास चालू केला. वेदान्त शास्त्रातील प्रगतीसाठी पुराणिकबुवांजवळ तर्कसंग्रह शिकण्यास आरंभ केला.

वडिलांनी योग्य वेळी त्यांचा विवाह करून दिला. परंतु यांना संसारात रस नव्हता व केवळ वडिलांचे आज्ञेसाठी विवाह केला होता, म्हणून म्हणा किंवा ईश्वरे-च्छेने यांच्या पत्नीचे सहा-आठ महिन्यातच निधन झाले. पुढे त्यांचे अध्यापक श्री. त्र्यंबकशास्त्री शाळीग्राम यांना मस्तकशूळाचे दुखणे झाले. म्हणून त्यांना डोलीतून त्यांनी पुण्यास पोहोचवले. परंतु गुरूव्यथेने त्रासलेले म्हणून अध्ययन नीट होईना; तेव्हा विश्रामबागेतील रघुनाथशास्त्री यांचेकडे अध्ययनास सुरवात केली. तेथे वेदांतशास्त्र, न्यायशास्त्र, तत्त्वज्ञान या विषयांच्या अभ्यासाने वादप्रवृत्ती व अहंकार प्रखर होत आहे असे पाहून त्यांनी प्रकृतीचे निमित्त करून परत तारापूर गाठले.

Scanned with Car

तेथून नाशकास जाऊन अध्ययन करावे असा विचार केला, तेव्हा वडील बंधू व पुराणिकबुवा यांचे सांगणेवरून जवळच शहापूर (ठाणे जिल्हा) येथे गंगेच्या कुंडावर आले. तेथे ब्राह्मणवस्ती नाही म्हणून माहुली किल्ल्यावर गेले. तेथे मोकळचा पाण्याची सोय नाही म्हणून कल्याणास आले व एखाद्या शांत स्थळाचा शोध लागेपर्यंत एका गृहस्थाचे घरी स्वतंत्र खोलीत राहिले. शरीरधर्माखेरीज दार बंद करून ब्रह्माभ्यास सुरू केला. तेथे सात-आठ दिवस गेले. परंतु यांच्याकडे कल्याणवासीयांचे लक्ष गेले; त्यामुळे त्यांनी एका ब्राह्मणाबरोबर अनगावकडे प्रयाण केले. तेथे वाटेतच कवाड या गावी एकांत स्थळ पाहून राहण्याचा विचार केला व आपले सर्व आयुष्य तेथेच ईश्वरचिंतन, ब्रह्माभ्यास यात घालवले. मध्ये एकदा सुरवातीलाच ज्ञानसंपादन व संतसज्जनांच्या भेटी. सखाराम महाराजांनी स. १८२८ मध्ये त्रिस्थळी यात्रा केली. प्रथम पुणे, नंतर गणपतीचे रांजणगाव, पैठण, अमरावती, नागपूर, रामटेक, जबलपूर, चित्रकूट, प्रयाग व काशी येथे गेले. सर्व प्रवास पायीच केला.एक वर्ष काशीवास करून जालवण मुक्कामी आपले आतेकडे काही दिवस राहिले. तेथून मरडचास कृष्णातीरी ब्रह्मानंद महाराजांपाशी राहून योगशास्त्र–प्राविण्य मिळवले. पुढे पुण्याजवळील योगभक्ती विद्यापारंगत. श्री चंडीरामबाबा यांचे दर्शन घेतले. नंतर काही मंडळींबरोबर कार्तिक स्वामींच्या यात्रेस गेले. तेथून करवीर पाहून नंतर कवाड येथे परत आले.

त्यांच्या भक्ती व संतपणाची कीर्ती सर्वत्र पसरून ठिकठिकाणचे लोक कवाड येथे येऊन त्यांचा अनुग्रह घेऊन जाऊ लागले. त्यामध्ये शके १७८४(इ.स.१८५२) मध्ये धार संस्थानचे राजेसाहेब पवार ह्यांनी त्यांचा गुरुमंत्र व उपदेश घेऊन कवाड येथील ग्रामस्थांची योग्य संभावना केली. तसे बडोद्याचे श्रीमंत खंडेराव महाराज गायकवाड व त्यांचे दिवाण गणेशपंत बोझे व त्यांचे कुटुंब (ह्या बाईचे कवाड हे माहेर होते. खांडेकर घराण्यात) इ. स, १८६४ मध्ये महाराजांचे दर्शनास आले. तेव्हा गुरुसेवा म्हणून काय करावे असे विचारले, तर तलावाचा गाळ काढून स्वच्छ करावा, श्री रामजीपुढील विहीर पडली होती ती बांधून काढावी व श्रीराम मंदिराचा मंडप अग्नीने दग्ध झाला होता तो बांधून काढावा असे सांगितले. अर्थातच ते झाले. सहाध्यायी मंडळींना ज्ञानदान, दु:खी व पीडितांना कांही रूपाने प्रसाद व दुष्कर्म करणाऱ्याला सन्मार्गाला लावणे अशा प्रकारचे कार्य व योगाभ्यास, ह्यामध्ये महाराजांनी आयुष्य घालवून सन १८६७ मध्ये कवाड येथे समाधी घेतली. निर्याणापूर्वी थोडा वेळ आधी त्यांनी चतुर्थाश्रमाचा स्वीकार केला व आपले नाव चिद्घन असे घेतले होते.

सध्या विश्वस्त कायद्यानुसार पंचमंडळाकडे देवस्थान व समाधीची व्यवस्था आहे. दरसाल भाद्रपद व।। ५ ते ७ पर्यंत महाराजांचे पुण्यतिथी-उत्सव व मार्गशीर्ष शु. १४ ते वद्य प्रतिपदेपर्यंत दत्तजयंतीची यात्रा भरते.

श्रीसंत राममारुती महाराज समाधी–श्रीसंत राममारुती महाराज (भिवंडीकर) ह्यांचा जन्म पेण येथे (कर्णिक) देशपांडे घराण्यात झाला. जन्मतिथी सोमवार भाद्रपद शुद्ध नवमी, मूळ नक्षत्र शके १७७८ (इ. स. १८५६) सूर्योदयास जन्म. ता. ८ सप्टेंबर १८५६. त्यांचे नाव शंकर असे ठेवलेले होते. ते आठ वर्षांचे असताना टाकळी येथील समर्थ मठाचे उद्धवांचे गादीवरील गंगाधर महाराज नावाचे सत्पुरुष आले असता एका स्त्रीस अनुग्रह देताना काही बोलत होते; तेव्हा ती स्त्री त्यांना म्हणाली, " ह्या बालकालाही अनुग्रह द्या ना. " तेव्हा महाराजांनी त्या बालकाचे कानांत काही सांगितले, व ते स्वतः त्याला रामजी म्हणून हाक मारू लागले. तेव्हापासून त्या बालकाचे वृत्तीत फरक पडला व लोकही त्याला 'रामजी' ह्याच नावाने हाक मारू लागले. सन १८७१ मध्ये राममारुती महाराजांना गुरुदर्शन घडले. नंतर त्यांचेजवळ उपासना व योगसाधना करून तीर्थयात्रेस गेले. हिंदुस्थानांतील सर्व तीर्थांची यात्रा केली व संतसमागमही झाला. १९१० साली शिरडी येथील श्री साईबाबा ह्यांचीही भेट झाली होती. कल्याण येथे शनिवार दि. २८ सप्टेंबर १९१८ रोजी आपली अवतारसमाप्ती केली. महाराजांचा उत्सव दरवर्षी कल्याणला मोठ्या समारंभाने साजरा केला.

श्रीसंत अप्पामास्तर लेले-श्री. आप्पामहाराज लेले यांचे मूळ गाव रत्नागिरी जिह्यातील पावस (गोळप). यांचे आजोबा रा. रा. मोरेश्वर गोपाळ लेले हे दुसरे बाजीरावाचे कारकीर्दीत त्यांचेकडे आले. त्यांची हुशारी व योग्यता पाहून बाजीरावाने त्यांना तोफखान्यावरील अधिकारी नेमले व सरदारकीची वस्त्रे देऊन बहुमान केला. पुढे ते बाजीरावाबरोबरच ब्रह्मावर्तास गेले. त्यांची दोन मुले गोपाळ व रामचंद्र. त्यापैकी रामचंद्र हे आप्पामास्तरांचे वडील. उत्तम शिक्षक म्हणून त्यांचा पुण्यात लौकिक होता. तेथून त्यांना श्रीक्षेत्र देहू येथील इनामदार व तुकाराम महाराजांचे वंशज यांनी आपल्या मुलांना शिकवण्यासाठी नेले. तेथील लौकिक ऐकून त्यांना तळेगाव दाभाडे येथील सरदार सेनापती दाभाडे यांनी आपले मुलास शिकवण्यासाठी नेले व तेथे एक शाळा काढण्यास सहकार्य दिले. देहू मुक्कामी त्यांनी श्रीसंत गंगूकाका शिरवळकरांचे शिष्यत्व पत्करून वारकरी संप्रदायाचा स्वीकार केला. आप्पामास्तर लेले यांचा जन्म अशा कुळात माघ शु. ४ थी शके १७९१ सन १८७० या वर्षी पुणे मुक्कामी झाला. त्यांचे नाव धुंडीराज असे ठेवले. वडिलांचा शिक्षकपेशा व वारकरी सांप्रदायाचा वारसा अप्पामास्तरांकडे आला. मुलांचे पुढील शिक्षणासाठी अप्पामास्तरांचे वडिलांनी तळेगाव सोडले व भिवंडीस निघाले. परंतु कल्याणला संध्याकाळ झाल्यामुळे मुक्काम पडला तेव्हा त्यांचे एक शिष्य शेठ विठ्ठलदास शामदास यांची गाठ पडली व त्यांनी त्यांना कल्याणासच ठेवून घेतले. त्यांनी बंदररोडवरील वैश्यवाणी समाजाच्या श्रीलक्ष्मीनारायण मंदिरात खाजगी शाळा सुरू केली. रावबहादूर साने यांनी ती १८८८ मध्ये

सरकारमान्य करून दिली. अप्पामास्तर त्यावेळी १७ वर्षांचे होते. २० वे वर्षी वडिलांनी अप्पामास्तरांना ही शाळा चालवण्यास दिली व आपण निवृत्त झाले. परंपरेने आलेल्या संस्कारामुळे अप्पामास्तरांनी शिक्षण, भजन, पंढरपूर वारी इत्यादी कार्य चालू ठेवले. १९४० साली ५० वर्षे शिक्षकी पेशा संभाळल्यावर ते आपणहून निवृत्त झाले. शेवटची ८ वर्षे अप्पामास्तरांनी स्वच्छंदाने व स्वात्मानंदात घालवली. माघ शु॥ १३ शके १८६९ रविवार पहाटे इहलोकीची यात्रा संपवली (१९४८). त्यांचे शिष्यांनी त्यांची समाधी आग्रारोडवर गोकुळपुऱ्याजवळ बांधून पांडुरंगाची स्थापना केली आहे. समाधीसाठी श्रीमान बोरगावकर कुटुंबाने जागा दान दिली व जनतेने मंदिर उभारले. हल्ली दरवर्षी त्यांचा पुण्यतिथी उत्सव साजरा होतो. त्यांचे चरित्र त्यांचे शिष्य ह. भ. प. वि. रा. गद्रे यांनी लिहिले आहे.

वज्राबाई– भिवंडीपासून १२ मैलांवर असलेल्या वडवली या खेड्यात तानसा नदीच्या पात्रात प्रसिद्ध गरम पाण्याची कुंडे आहेत. निरनिराळ्या कुंडांतील पाण्याचे तपमान जास्तीत जास्त १०० अंश सेंटिग्रेड व कमीत कमी ६० अंश सें. पर्यंत आहे. पाण्याला गंधकाचा वास येतो. पाण्याला चव नाही. पाण्यातून हवेचे बुडबुडे वर येत असतात. लोकांची एक पारंपारिक समजूत आहे की, वज्राबाई देवीने ज्या राक्षसाला मारले, त्याच्या रक्ताचे हे पाणी असून परिसरातील राक्षसांना दहशत निर्माण करण्याकरिता ते देवीने कुंडरूपाने कायम ठेवले आहे. वज्राबाईचे मंदिर गुमतारा टेकड्यांपैकी एका टेकडीवर सुमारे १०० ते १५० फूट उंचीवर गुंज या खेड्यात आहे. वसईच्या मोहिमेवर जाताना चिमाजी अप्पासाहेब पेशवे वज्रादेवीला यश देण्यासाठी नवस बोलले होते की, 'वसईला फिरंग्यांचा निःपात करण्यात मला यश आले तर तुझे मंदिर मी बांधून काढीन!' चिमाजी अप्पासाहेबांनी फिरंग्यांवर प्रचंड विजय मिळविला. नंतर वज्राबाईचे मंदिर बांधण्याची आज्ञा दिली. दुर्दैवाने ते अप्पासाहेबांच्या पश्चात् पूर्ण झाले. वसईचा सुभेदार शंकराजी केशव फडके यांनी आपल्या देखरेखीखाली ते बांधून घेतले.

हे मंदिर उंच टेकाडावर असून वर जाण्याकरिता शे-दोनशे प्रशस्त पायऱ्या बांधलेल्या आहेत. मंदिरासमोर एक उंच दीपमाळ आहे व तिला आतून वर जाण्यासाठी गोल जिना आहे. दीपमाळेच्या अगदी वरच्या टोकावरून मंदिरातील देवीचे दर्शन घडते. दीपमाळेची उंची व मंदिरातील देवता ही दोन्ही समान उंचीवर आहेत.

मंदिरातील मूर्ती काळ्याभोर पाषाणाची असून तिच्या उजव्या हातात लांबलचक तलवार आहे. बाजूला दोन देवी आहेत. गाभाऱ्याबाहेर असलेला लाकडी सभामंडप हा बडोद्याचे खंडेराव गायकवाड सरदार यांनी बांधलेला असून मंदिराला त्यांनी वार्षिक ४५० रु. वर्षासन नेमून दिले आहे. तसेच ब्रिटिश सरकारकडूनही

या मंदिराला १९२ रु. चे वर्षासन होते. पेशव्यांकडून या मंदिराला ६ गावे इनाम म्हणून मिळालेली आहेत. चैत्र वद्य अमावास्येस येथे मोठी यात्रा भरते. हे देवस्थान गिरीपंथाच्या गोसाव्याकडे आहे.

पूर्वी अणजूर येथील धर्मवीर सरदार अणजूरकर यांचेकडूनही या देवळास नेमणूक होती. टेकडीच्या माथ्यावर गोधडेबुवांची समाधी आहे.

वज्राबाईपासून ½ मैलावर अकलोली येथे एक रामेश्वराचे मंदिर आहे. त्याच्या पुढ्यातच गरम पाण्याची कुंडे आहेत. त्या ठिकाणी लोक स्नान करतात. पाण्याला गंधकाचा वास येतो. त्यामुळे त्वचारोग बरे होतात अशी लोकांची श्रद्धा आहे.

वज्राबाईपासून ३ मैलांवर गणेशपुरी येथे भीमेश्वराचे मंदिर आहे. त्याच्यासमोर फार गरम दोन पाण्याची कुंडे आहेत. मंदिरापासून १ मैलाच्या अंतरावर नदीच्या पात्रात दोन अत्यंत गरम पाण्याची कुंडे आहेत. त्यांचे तपमान १३६ डिग्री सेंटिग्रेड आहे. हे भीमेश्वर मंदिर कल्याणचे दर्यावर्दी सुभेदार रामाजी महादेव बिवलकर यांनी बांधलेले आहे (१७६० ते १७७२ या दरम्यान). यापूर्वीची अतिप्राचीन मंदिरे या भागात असली पाहिजेत; कारण एक मोठी, अत्यंत सुंदर पाने–फुले यांची वेलबुट्टी कोरलेली सापडली आहे; तसेच एक अत्यंत सुंदर व प्रमाणबद्ध कोरलेली नग्न स्त्रीची प्रतिमा आढळली आहे.

◘ ◘ ◘

: १५ :

ऐतिहासिक स्थलविशेष

लोनाड – कल्याणच्या उत्तरेला ४ मैलांवर गांधारी खाडीपलीकडे बौद्ध लेण्यांचा एक गट आहे. हा गट ६ व्या किंवा ७ व्या शतकातला असावा. लोनाड गावाच्या उत्तरेला १ मैलावर पूर्वेकडे तोंड करून ही बौद्ध चैत्यगुंफा आहे; व अपूर्ण स्थितीतील दोन तीन तळघरे आहेत. उंच कडद्यासारखी पायवाट तेथपर्यंत जाते. त्याची उंची २०० फूट आहे. मंदिराला दुहेरी व्हरांडा आहे. एक सभागृह आहे व गाभारा अपूर्ण आहे. गुंफा व बाहेरील व्हरांड्याचे छप्पर पडलेले आहे. व्हरांडा ६३ फूट लांब व ९ फूट रुंद आहे. उंची ९ फूट आहे. ह्या व्हरांड्याच्या टोकाला डाव्या कोपऱ्यात एक पाण्याचे कुंड आहे व उजव्या कोपऱ्यात पूर्ण आकाराच्या आकृती कोरलेल्या आहेत. त्या बसलेल्या स्थितींत असून ४ फूट उंचीच्या आहेत. आतला व्हरांडा तीन खांबांनी निराळा झाला आहे. चौकोनी खांब ३ फूट बाजूचे चौरसाकृती आहेत व उंची १०॥ फूट आहे. खांबाचे वरचे भाग सपाट व गोल आहेत. डाव्या टोकाच्या दर्शनी भागावर एक गणपतीची मूर्ती कोरलेली आहे. व्हरांड्यात एक शिवलिंग आहे. खांबावर पट्टीवर मानवी आकृती कौशल्यपूर्ण कोरलेल्या आहेत. परंतु त्यातील $\frac{1}{3}$ विद्रूप झाल्या आहेत. आतला व्हरांडा ५० फूट लांब ९ फूट रुंद व ९ फूट उंच आहे. भिंती सपाट आहेत. तो मध्यभागी सभागृहात उघडतो. सभागृहांना जाण्यासाठी दोन दरवाजे आहेत. मधला दरवाजा ७॥ फूट उंच व ४॥ फूट रुंद आहे व त्यावर शिल्पाकृती आहेत. दोन्ही बाजूस खाली दोन पायऱ्या आहेत. छत तोलण्यासाठी दोन हात उंच पसरल्याचे कोरीव काम आहे. दरवाज्यावर तीन छोट्या नालाकृती कमानी आहेत. डाव्या बाजूचा दरवाजा ६ फूट ९ इंच उंच आहे व उजव्या बाजूचा ७ फूट ९ इंच उंचीचा आहे. दोन्ही दरवाजे ३ फूट १० इंच रुंदीचे आहेत. आंतील हॉल (सभागृह) ५० फूट लांब व १८ फूट रुंद व ११ फूट उंच आहे. पाठीमागच्या मधल्या भिंतीवर एक अपूर्ण मूर्ती आहे. त्याच्या दोन्ही बाजूला एक खांडेश्वरीदेवी व दुसरी महिषासुरमर्दिनी अशा मूर्ती आहेत; त्यांना शेंदूर लावलेला आहे. अपूर्ण तळघरे जरा वरच्या बाजूला उजव्या टेकाडावर आहेत.

या गुंफेतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्हरांड्याच्या दक्षिण टोकाचा गट व कोरीव कामाचा पट्टा होय. आतील बाजूस एक अतिशय सुंदर शिल्पचित्र आहे. हे चित्र अंजठा येथेही आहे; परंतु रंगीत चित्र म्हणून प्रसिद्ध आहे. बहुधा या शिल्प-कृतीवरूनच ते तयार केले असावे किंवा त्या चित्राची नक्कल असावी. या चित्रात

दुसऱ्या पुलकेशीच्या दरबारात इराणचे वकिलाची भेट.

एक राजा व त्याचे दरबारी लोक असून इतर सेवक व सेविका आहेत. मध्यभागी राजा सिंहासनावर बसलेला असून त्यास दाढी वगैरे नाही. अगदी गुळगुळीत चेहऱ्याचा आहे. त्याचा उजवा पाय सिंहासनावर घेतलेला आहे; डावा पाय खाली सोडलेला असून एक स्त्री हातात धरून चेपीत आहे व धूत आहे. त्याचा उजवा हात घडी घालून टेकलेला आहे व डावा हात कमरेवर आहे. पुढे एक तस्त आहे. राजाच्या मागे उजवे बाजूस एक स्त्री तंतुवाद्य डाव्या हातात घेऊन बसली आहे व उजव्या हातात राजाची तलवार उचलून धरलेली आहे व त्याची मूठ उजव्या कानाजवळ आहे. या स्त्रीच्या मागे स्त्रीपुरुष सेवक आहेत. एकाच्या हातात धुण्याचे भांडे व एकाच्या हातात फुले आहेत. राजाच्या मागील बाजूस एक स्त्री ओठावर बोट ठेवून आश्चर्याने व कौतुकाने पहात आहे. तिच्या हातात चवरी आहे. तिच्याजवळ स्त्रीपुरुष प्रसाधनाची साधने घेऊन उभे आहेत. अगदी डाव्या बाजूला एक स्त्री हातात एक बटवा व उजव्या हातात पाण्याचे भांडे घेऊन उभी आहे. अगदी डाव्या बाजूला एक पुरुष तिच्या कानकुंडलाला स्पर्श करीत आहे. खालच्या बाजूला दोन मंत्री बसलेले आहेत व त्यांच्या वरच्या बाजूला एक स्त्री आहे. हा राजा चालुक्य घराण्यातील दुसरा पुलकेशी होय. ह्याने उत्तरेकडील हर्षराजाचा पराभव केला इ. स. ६२० नंतर इ. स. ६२५ मध्ये ह्याने इराणचा राजा दुसरा खुश्रु याजकडे आपला वकील पाठवला होता. म्हणून त्या राजानेही पुलकेशीकडे परत आपला वकील पाठवला, त्याचे हे चित्र आहे. दरबारात इराणच्या राजाचा

वकील आपल्या राजाकडून आणलेला खलिता राजास देत आहे हे चित्रात दाखवले आहे. हे चित्र अजिंठा येथे काढले आहे. तर लोनाड येथे हे शिल्पाकृती चित्र आहे.

महादेव मंदिरः– लोनाड हद्दींत चौधरपाडा येथे एका छपराखाली ३ फूट पायावर सुंदर कोरलेले एक शिवलिंग आहे व एक सुंदर कोरलेली २ फूट ७ इंच × २ फूट २ इंच शिवमूर्ती असून डाव्या मांडीवर पार्वती आहे. महादेवाच्या उजव्या हातात एक त्रिशूळ आहे. ही मूर्ती १० व्या शतकातील असावी. पूर्वेला १०० यार्डावर ६ फूट २ इंच × १ फूट ५ इंच मापाचा शिलालेख आहे. वर दोन्ही बाजूस सूर्यचंद्र आहेत. मध्ये एक पाण्याचे भांडे आहे. खाली लेख तेवीस ओळी आहे. तो देवनागरी संस्कृतमध्ये आहे. त्याखाली एक शापवाणी (गाढवावरून शिवी) आहे. हा लेख अपरार्काच्या मुलाने (केशीदेवाने) सन १२३९ मध्ये सोमवारी माघ व १४ ला महाशिवरात्रीचे दिवशी महादेवाचे समोर खोदला असा उल्लेख आहे. त्यात ब्रह्मपुरी हा गाव (बापगाव) सोमण नावाच्या कवीला दान दिला आहे. त्याने महादेवाची उपासना, पूजाअर्चा करावी. चार मंत्र्यांची नावे कोरलेली आहेत. त्यांना बापगावी (ब्रह्मपुरी) येथे मजसपाली हे शेत दान दिले आहे. या शिलालेखाच्या ५० यार्डावर वरील शिवपार्वतीचे देवळाजवळच हे महादेवाचे देऊळ आहे.



शिलाहारांनी लोनाड येथे बांधलेले लोणादित्याचे मंदिर.

लोणादित्य मंदिर :–लोणाड येथे पाव मैलावर एक मोडकळीस आलेले रामेश्वराचे देऊळ आहे. त्याची बांधणी अंबरनाथ येथील शिवमंदिरासारखी आहे. शिलाहार राजा अपरादित्य ह्याने शके ९१९ आषाढ वद्य ४ श्री स्थानक (ठाणे)

Scanned with Car

येथे या लोणादित्य मंदिरास देवाचे पूजेसाठी दक्षिणायन दान म्हणून जवळचे गाव भादाणे इनाम लावून दिले आहे. त्याचे दोन प्रधान संगलय्या व सिंहाप्पय्या हे होते. त्यापैकी संगलय्याचा पुत्र अन्नपय्या ह्याने कोरलेला वरील मजकुराचा ताम्रपट सापडला आहे. या मंदिराला पूर्वेला प्रवेशद्वार व पश्चिमेला गाभारा आहे गाभाऱ्या-समोर सभामंडप आहे. गाभाऱ्याभोवती प्रदक्षिणेचे मार्गावर आठ फूट उंचीच्या पट्ट्यावर आकृती कोरलेल्या आहेत. त्यात काही प्रसंग कोरलेले आहेत. ७ फूट × ३ फूट उंचीचा एक दरवाजा गाभाऱ्याला आहे. सभामंडपाच्या छतावर सुंदर कमळ कोरलेले आहे. देवळाचा गाभारा ९॥ चौरस औरस आहे. आत शिवलिंग आहे. सध्या त्याचा पुजारी अग्री जातीचा आहे. हे देऊळ अंबरनाथपेक्षा पुष्कळच लहान व मोडकळीस आलेले आहे. परंतु रचना अंबरनाथप्रमाणेच आहे. अंबरनाथएवढे कोरीव काम नाही. या सर्व मंदिरामुळे शिलाहारकाळात लोनाड हा भाग अतिशय रमणीय स्थान झाले होते.

मलंगगडावरील नळ राजाच्या राजवाडयाचा आतील भाग.

मलंगगड:– कल्याण शहराच्या दक्षिणेस दहा मैलावर मलंगगड या नावाचा अत्यंत अवघड असा डोंगरी किल्ला आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची १८०० फूट आहे. त्या ठिकाणी नलदेव मौर्य नावाचा राजा राज्य करीत होता. ह्याचा काळ ६ वे शतकातील आहे. मौर्य साम्राज्य जरी इ. स. पूर्वीच नष्ट झाले तरी दक्षिणेत छोटे छोटे राजे टिकून असावेत. या किल्ल्यावर त्याचा राजवाडा होता; त्याचे अवशेष आजही आहेत. सातवाहनानंतरही हे मौर्य घराणे टिकून राहिले.

तसेच पुरी ऊर्फ घारापुरी येथेही मौर्य घराणे राज्य करीत होते असा उल्लेख आढळतो. इ. स. ५५० ते ५६७ ह्या काळात बदामीचा चालुक्य राजा कीर्तिवर्मा ह्याने पश्चिम दिशेस आपल्या राज्याचा विस्तार केला. कोकणातील मौर्यांचा पराभव केला. या प्रथम हल्ल्याचे वेळी नळ मौर्यांत कदंब या राजांना हा राजा कीर्तिवर्मा काळरात्रीसारखा दुःखद वाटला व परस्त्रियांच्या बाबत हा निवृत्तचित असून सुद्धा शत्रूच्या स्त्रिया त्याच्याकडे आकर्षित झाल्या असे वर्णन एका शिलालेखातील पद्यात आहे. तो श्लोक असा–

नलमौर्यकदंब कालरात्रिस्तनय तस्य बभूव कीर्तीवर्मा ।
परदारनिवृत्तचित्तवृत्तेरपि धीर्यस्य रिपुस्त्रियानुकृष्टा ॥

कास्माँस नावाच्या एका पाश्चात्य लेखकाने कल्याणच्या ज्या राजाचे वर्णन केले आहे तो नल-मौर्य वंशीय असावा. इ. ६१० मध्ये चालुक्य राजाचा सेनापती कांडदंड ह्याने सैन्याच्या मोठ्या लाटेने मौर्यरूपी डबक्यांचा पराभव केला असे एका ठिकाणी नमूद आहे. तो संस्कृत श्लोक असा—

कोंकणेषु यथादिष्ट चंडदंडांबुवीचिभिः ।
उदस्तास्तरसा मौर्य पल्वलांबु समृद्धयः ॥

त्याने मौर्यराजांची पुरी (घारापुरी) नामक राजधानी जी सागराची केवळ लक्ष्मीच तिच्यावर हल्ला केला.

अपरजलधेर्लक्ष्मीं यस्मिन् पुरीं पुरभित्रक्षे ॥

हे नळराजे या मलंगगडावर राहात होते. त्यांचा राजवाडा बालेकिल्ल्यावर आजही पडिक अवस्थेत आहे. वर जाण्यास अतिशय कठीण वाट आहे. हल्ली तीही पडून गेली आहे. वर एका कोपऱ्यात जो मोठा सुळका आहे, त्यास देवणी म्हणजे देवाची पत्नी म्हणतात. तो एका राक्षसाचा आहे असे म्हटले जाते. त्या सुळक्यास बालेकिल्ल्यावरून सात दगड मारले असता एक जरी दगड त्यास लागला तरी त्याची मनोकामना पुरी होईल व दगड लागल्याबरोबर खाली नगारा आपोआप वाजू लागतो अशी दंतकथा आहे. बालेकिल्ल्यावर एक देवीचे देऊळ आहे. मलंगगडावर ज्या सत्पुरुषांची समाधी आहे ते घोड्यावर बसून त्या मंदिरात जात व दिवा लावीत असत असे सांगितले जाते. या डोंगरावर भरपूर रान असून हवा फार थंड व सुखकारक आहे. बालेकिल्ल्यावरून मुंबईबाजूला कुर्ल्यापर्यंतचा भाग व दुसऱ्या बाजूला पनवेलपर्यंतचा भाग व माथेरानचे डोंगर दिसतात येथे पाण्याचे सात मोठे मोठे चौकोनी दगडी बांधणीचे व थंडगार पाण्याचे हौद आहेत. फार जुनाट उंबराची झाडे आहेत. बाजूच्या दऱ्या डोळे फिरवून टाकतील एवढ्या खोल आहेत. देवीचे देवळाप्रमाणेच एक मारुतीचे देऊळही आहे. पायवाटेवर बाजूच्या जंगलात

मलंगगडावरील देवणी सुळका.

एका वाघाची दगडात कोरलेली अशी प्रतिमा आहे. त्या प्रतिमेशेजारी एक देऊळ आहे; परंतु ते पाडून मुसलमानांनी त्याचा दर्गा केलेला दिसतो. पायथ्याशी एक शिव-मंदिर आहे. त्याच्या भोवती पुष्कळशी बेलाची झाडे आहेत. तेथील देखावा फार सुंदर आहे. किल्ल्याच्या दुसऱ्या टोकास पाच बुरुज आहेत. अलीकडे तेथील वहि-वाटदारांना एका मोठ्या शिळेवर कोरलेली मारुतीची व गणपतीची अशा दोन मूर्ती सापडलेल्या आहेत. मलंगगडावर होणारा पाणीपुरवठा वरील सात टाक्यांतून केलेला आहे. परंतु उन्हाळ्यात ती कुंडे रिकामी होतात.

या डोंगरावर एका सत्पुरुषाची समाधी आहे. ती समाधी. इ. स. १७८० पर्यंत दुर्लक्षित होती. इंग्रजांनी जेव्हा कल्याण घेतले तेव्हाच मलंगगडही मराठ्यां-पासून जिंकून घेतला (इ. स. १७८०). परंतु इंग्रजांना त्या ठिकाणी मराठ्यांनी हैराण केले व १७८१ अखेर जेव्हा मराठे व इंग्रज यांचा तह झाला तेव्हा त्या-प्रमाणे इंग्रजांना ही ठिकाणे सोडून द्यावी लागली. त्यापैकी मलंगगड जरा लवकर सोडला असावा. कारण मलंगगडावरील सत्पुरुषाच्या कृपेमुळेच इंग्रज येथून गेले अशी पेशव्यांची भावना झाली व त्यांनी त्या समाधीच्या पूजेअर्चेसाठी व देखरेखी-साठी कल्याण येथील श्री. काशिनाथपंत केतकर नावाचे ब्राह्मणाची नेमणूक केली. तसेच त्या सत्पुरुषाला पुण्याहून, अनेक हिरेमाणके बसविलेला असा जरीकाठी मौल्यवान शेला चांदीच्या चौकटीवर बसविलेला खास आहेर म्हणून पाठविला



मलंगगडावरील पाण्याचे टाके.

(हल्ली तो अस्तित्वात नाही.) तो त्या सत्पुरुषाला अर्पण करण्याची कामगिरी श्री. काशिनाथपंत केतकर यांनाच सांगितली. त्यांनी मोठ्या आदराने शहरातून अनवाणी, सोवळ्याने, पेशव्यांच्या सरदार–मानकऱ्यांना बरोबर घेऊन त्या समाधीस नजर केला. त्यावेळी ती समाधी अत्यंत पडीक अवस्थेत होती. ती दुरुस्त करण्याची प्रेरणा काशिनाथपंत केतकरांना झाली व त्यांनी एवढ्या उंचीवर अडचणीच्या जागी मोठ्या कष्टाने कशीतरी बांधून काढली. काशिनाथपंत आपल्या ब्राह्मणी धर्माप्रमाणे त्या समाधीची पूजा करीत. ती समाधी हिंदू व मुसलमान सारखीच पूज्य मानू लागले. त्यानंतर मुसलमान समाजातर्फे एक मुजावर तेथे काम करू लागला. मुजावर म्हणजे झाडलोट, स्वच्छता वगैरे पाहणारा माणूस. या माणसाला व मुसलमान समाजाला ही हिंदूपद्धतीची पूजाअर्चा मान्य नसे. म्हणून पेशवाई बुडाल्यावर इंग्रजांच्या कारकीर्दीत तंटा उपस्थित करून प्रकरण इ. स. १८१७ मध्ये इंग्रज कलेक्टरपुढे आणले गेले. पंतांचा व्यवस्था पाहण्याचा पूजाअर्चेचा हक्कच नाकबूल केला जाऊ लागला. इंग्रज कलेक्टरने हा भावनेचा प्रश्न मानून समाधीसमोर तीन वेळा चिठ्ठ्या टाकल्या. परंतु तिन्ही वेळा पंताचे नावाच्याच चिठ्ठ्या निघाल्या; व साहेब मजकुरांनी पंतांचे वहिवाटीचे हक्क मान्य केले. मुसलमान जमातीने पुष्कळ गडबड करून पाहिली; परंतु उपयोग झाला नाही. तेव्हापासून या समाधीची व्यवस्था अद्यापही केतकर घराण्याकडे आहे. नंतर स्वराज्यस्वातंत्र्यकाळात या वादाने पुनश्च उचल खाल्ली. ते प्रकरण सुप्रीम कोर्टाकडे गेले; व तेथेही केतकरांचा वहिवाटीचा

Scanned with Car

हक्क मान्य झाला आहे. काशिनाथपंतांचे पणतू श्री. कृष्णाजी गोपाळ केतकर यांनी या समाधीचे चौथऱ्याचे व भिंतीचे बांधकाम केले व त्यास आजचे स्वरूप प्राप्त झाले. पेशव्यांनी काशिनाथपंतांना एकंदर खर्चासाठी मौजे ढोके हे गाव इनाम दिले, ते त्यांचे वंशजाकडे आजही वहिवाटीस आहे. श्री. कृष्णाजीपंत केतकर (काशिनाथ-पंतांचे पणतू) हे स. १९०३ मध्ये मृत्यू पावले. नंतर त्यांच्या पत्नी राधाबाई याच व्यवस्था पहात असत. परंतु स्वतःला संतती नसल्यामुळे त्यांनी मौजे साखरपे ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील केतकर कुळातील धुंडीराज यांना दत्तक घेतले. त्यांचे नाव गोपाळराव ठेवले. सध्या या ठिकाणाचा सार्वजनिक सरकारी ट्रस्ट झाला आहे; व हे त्यात ट्रस्टी आहेत. परंतु पूजाअर्चा वगैरेची वहिवाट मात्र त्यांचेकडेच आहे. हे गोपाळराव केतकर म्हणजे पेशवे यांनी नेमलेले काशिनाथपंतांपासून सहाव्या पिढीतले आहेत.

या समाधीसंबंधी एक कथा प्रसिद्ध आहे. वर उल्लेखिलेला नळ राजा राज्य करीत असता हे सत्पुरुष या ठिकाणी येऊन राहिले. कोणी म्हणतात ते मुसलमान अवलिया होते; कोणी म्हणतात ते हिंदू होते; परंतु ते हिंदु ऋषीप्रमाणे राहात होते असे वर्णन आहे. त्यांची राहणी फारच स्वच्छ होती. त्यास मुसलमानी संस्कृती आवडत नसे. आचाराने ते ब्राह्मणाप्रमाणे वागत. हे सत्पुरुष समाधिस्त झाले तरी त्यांचे समाधीला मुसलमानाने स्पर्श केलेला चालत नाही. हे सत्पुरुष आपल्या सिद्धीने त्या जागी अनेक चमत्कार करीत. त्यांच्या साधुत्वाची कीर्ती नळराजास समजली, तेव्हा त्यांची परीक्षा पाहण्याचे हेतूने त्यांच्यावर मोहिनी घालण्याच्या तयारीने आपली एकुलती एक लाडकी व सुंदर मुलगी त्यांच्याकडे पाठवली. मुलीने त्यांचे दर्शन घेऊन " आपल्या सामर्थ्यावर मी लुब्ध आहे, आपण माझ्याशी विवाह करावा " अशी विनंती केली. त्या सत्पुरुषाने मोठ्या आदराने मुलीची समजूत केली, "मुली, तू सुंदर व तरुण आहेस. मी अवलिया म्हातारा आहे. आपणाशी लग्न होणे शक्य नाही. तू मला कन्येसमान आहेस. " मुलीला हे ऐकून आनंदाचा धक्काच बसला व ती त्यांची पट्टशिष्या बनली व तेथेच त्यांची सेवा करू लागली. तेव्हा मुलीची आई म्हणजे राणी बालेकिल्ल्यावरून खाली आली व संतापाने त्या सत्पुरुषांना म्हणाली, " माझी मुलगी परत दे; नाही तर–" असे म्हणून त्यांना मारण्यासाठी एक दगड उचलला. तेव्हा सत्पुरुष संतापले व त्यांनी मुलीच्या आईस शाप दिला की " तुझी शिळा होईल. " त्याप्रमाणे तिची शिळा झाली. त्यांनी मुलीला सांगितले, " तू त्या शिळेवर यापुढे दिवा लावीत जा. " त्या सत्पुरुषाच्या समाधी शेजारीच त्या मानसकन्येची समाधी आहे व दोघांचे मध्ये एक समईच्या आकाराचा लांब उंच दगड आहे. तो उभ्या व्यक्तीसारखा दिसतो. तीच शाप-भ्रष्ट आईची शिला आहे. त्यावर आजही भाविक लोक दिवा लावतात. त्यातील तेलतूप हे औषधी असून शारीरिक रोगांवर गुणकारी आहे असे म्हणतात.

मलंगगडावरील नळ राजाच्या पत्नीची शिळा. मुलीची व बाबांची समाधी.

वरील सर्व हकीगतीवरून त्याच्या पुजाऱ्याची नेमणूक, तेथील राजाचे हिंदुत्व, पेशव्यांसारख्या ब्राह्मण हिंदू व्यक्तीने केलेला सन्मान, भोवती सांपडलेल्या हिंदू देवतांच्या मूर्ती, प्रत्यक्ष सत्पुरुषांचे राहणीबद्दल व आवडीबद्दल कथा, वगैरेवरून ती समाधी हिंदूची असावी असे वाटते; अर्थात् हिंदू व मुसलमान दोन्ही समाज सारख्याच आदराने त्याकडे पाहतात. दोन्ही समाजांना ती समाधी पूजनीय व वंदनीय आहे. या ठिकाणी माघ शु।। पौर्णिमा या दिवशी मोठा उत्सव होतो. मुसलमान समाज जास्त करून जमतो.

टिटवाळा :-नासिक लाईनवर कल्याणपासून तिसरे स्टेशन मांडा-टिटवाळा असे आहे. खरे स्टेशन जवळचे जे गाव ते मांडा आहे. तेथून टिटवाळा हे गाव दोन मैल आतील बाजूस आहे. स्टेशनपासून टिटवाळा येथे जाण्यास एस्. टी. आहे. टांगे वगैरे मिळतात. तसे या गावी मुरबाड रस्त्याने कल्याणपासून ७ मैलांवर गोविली हे गाव आहे त्याच्या बाजूने एक रस्ता टिटवाळयाकडे जातो. गोविली-

पासून तीन मैलांवर हे टिटवाळा महागणपती क्षेत्र लागेल. हे गाव तसे अगदी छोटेसे आहे. डोंगराच्या कोंदणात हे गाव जणू वसले आहे. चारी बाजूस लहानमोठे डोंगर आहेत. सध्या हे गाव भक्तपूर झालेले आहे. एका तलावाच्या काठी हे प्राचीन मंदिर उभे आहे. मंदिरासमोर एक फार जुना पिंपळ आहे. पिंपळाच्या एका बाजूला थोड्या अंतरावर शेतामध्ये एका चौथऱ्यावर उजव्या सोंडेचा गणपती आहे. टिटवाळा गावाचे जरा दूर एक नदी आहे व तिच्या बाजूला एक फार मोठे वृंदावन आहे. तेथे एक प्रभू जातीची बाई सती गेली असे सांगण्यात येते. हे वृंदावन सुद्धा खूप जुने आहे. महागणपती मंदिरापासून एक मैलावर डोंगरात दत्ताच्या पादुका आहेत. या पादुकांजवळ एक गोमुख असून त्या गोमुखातून खालील कुंडात कायम पाणी पडत असते. या गोमुखातून वाहणारा जलप्रवाह एकाएकी बंद पडला होता. एका साधूने अन्नपाणी वर्ज करून तपश्चर्या केली व गोमुखातून स्वच्छ पाणी परत वाहू लागले असे सांगतात.

महागणपती मूर्तीचा इतिहास-टिटवाळा हे सुभे कल्याणमधील क्षेत्र. कल्याण पावन भूमीतील कण्वऋषींच्या आश्रमाचे स्थान असे म्हटले जाते. हा आश्रम अर्थातच हंगामी आश्रम होता. महाभारतातील दुष्यंत-शकुंतलेची कहाणी सर्वांना परिचित आहेच. दुष्यंत आणि शकुंतला ह्यांच्या ताटातुटीनंतर कण्व ऋषींची तपोभूमी दुःखमय झाली. शकुंतला शोकसागरात बुडून गेली. अशा परिस्थितींत कण्वमुनींनाही अतिशय दुःख झाले. सर्व विघ्नांचे हरण करणारा जो गणपती त्याच्या भगवंताला शरण जाऊन दुःखमुक्त करण्याची प्रार्थना आश्रमवासी करू लागले. पूजेचे गणेशव्रत करण्याविषयी कण्वमुनींनी शकुंतलेला सांगितले. व्रताचे वेळी पूजे-साठी कण्वमुनींनी जी मूर्ती शकुंतलेला दिली, तीच आज टिटवाळा महागणपती मंदिरात असलेली वरदायिनी मूर्ती होय.

टिटवाळा महागणपतीमूर्ती कण्व आश्रमातील असली तरी मध्यंतरीचे अस्मानी सुलतानी काळात ती शेजारच्या तलावात होती. श्रीमंत माधवराव पेशवे असताना मधून मधून या ठिकाणी विश्रांतीसाठी येत असत. पेशव्यांची स्वारी यायची म्हणजे बरोबर हजार पाचशे माणसे सहज असत. त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची, भोजनाची सर्व व्यवस्था पेशव्यांचे कारभारी श्री. रामचंद्र महादेव मेहेंदळे हे ठेवीत. म्हणून पाण्याच्या सोईसाठी तेथे असलेला प्राचीन तलाव त्यांनी उपसून परत बांधून घेतला. तलावाचा उपसा चालू असता आज मंदिरात असलेली मंगलमूर्ती मेहेंदळे ह्यांना सापडली. श्रीमंत माधवराव पेशवे हे प्रख्यात गणेशभक्त. त्यांना आदल्याच रात्री मंगलमूर्तीने दृष्टांत देऊन आपल्या तलावातील अस्तित्वाची जाणीव दिली व सकाळी सूर्योदयाबरोबर मेहेंदळे ह्यांचा जासूद ती बातमी घेऊन हजर झाला. मंगलमूर्तीचा आपल्या कार्यास आशीर्वाद समजून पेशव्यांनी त्या तलावाचे काठावर मंदिर बांधून त्यात विघ्नहर्त्या सुखकर्त्या गजाननाची प्रतिष्ठापना केली. जोशी

Scanned with Car

आडनावाचे सज्जन ब्राह्मणास थोडीशी जमीन व वर्षासन देऊन सिद्धिविनायकाची पूजाअर्चा करण्यास नेमण्यात आले. अद्यापही त्यांचे वंशज ही जबाबदारी पार पाडीत आहेत.

महाकवी वाल्मिकीची समाधी – कल्याण सुभ्यातील आसनगाव स्टेशनवरून डोळखांब–साकुर्ली गावाकडे बस जाते. हे साकुर्ली गाव फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. पेशवे काळात तो कसब्याचा गाव होता. १७८० पर्यंत मिळालेल्या माहितीनुसार ठाणे जिल्ह्यातील दोन नंबरच्या महसुलाचा गाव होता. आता त्याचे महत्त्व कमी झाले आहे; कारण एक तर तेथे जाण्यास साधन फक्त एस्. टी. व रेल्वेस्टेशन-असनगाव सुमारे ३० मैल आहे. हा गाव अंजनपर्वत म्हणून रामायणकाळापासून प्रसिद्ध असलेल्या पर्वताच्या खोऱ्यात आहे.अंजन ह्या शब्दाचा अपभ्रंश होऊन त्याला आजा पर्वत म्हणू लागले. काहीं त्याचे नावात अर्थ आणण्यासाठी अजय पर्वत म्हणू लागले. परंतु रामायणातील स्थळांचे संशोधन करता असे सापडले की तो अंजन पर्वत आहे. रामायणामध्ये त्याचा उल्लेख किष्किधाकांडात सर्ग ३७ व श्लोक ५ मध्ये आला आहे. सुग्रीव हनुमानाला वानरांना बोलावण्यासाठी सांगत असता ह्या स्थानाचा निर्देश करतो. तो म्हणतो, "सुग्रीवाच्या आज्ञेवरून येथून तीन कोटी वानर रावणावरील स्वारीकरता आले." असा उल्लेख किष्किधा कांड सर्ग ३७ श्लोक २० वा मध्ये आहे. तसाच स्पष्ट उल्लेख दहाव्या शतकात लिहिल्या गेलेल्या 'किमयागार' या गोरक्षनाथाने लिहिलेल्या ग्रंथात आहे; त्याचे नरहरी सोनार या संतांच्या परंपरेतील मालुकवीने लिहिलेल्या नवनाथ भक्तिसार ह्या सांप्रदायिक पोथीत अध्याय २ रा श्लोक ७८ मध्ये मच्छींद्रनाथांना सिद्धि कशा व कुठे प्राप्त होतील हे सांगताना चंडिका भवानीने केलेला आहे तो असा–

बा रे ऋष्यमूक पर्वतस्थानी। ब्रह्मगिरीच्या निकटवासनी॥
अंजन पर्वत तयास म्हणी। नदी काचित् आहे बा॥ ७८॥

ही घटना १० व्या शतकातील आहे; म्हणजे तोपर्यंत सह्य पर्वतातील सर्व भागांना निरनिराळी पर्वत नामे होती. ऋष्यमूक पर्वत हा इगतपुरीजवळील कळसूबाई शिखर भागालाच म्हणतात. पंपासरोवरासमोर हा पर्वत आहे. किष्किधा नगरी जवळच होती. अर्थात सुग्रीवाने युद्धसहाय्यासाठी बोलावलेले वानर हे जवळच्याच पर्वतातून बोलावले व इ. स. दहाव्या शतकातील गोरक्षनाथांनी हा अंजनपर्वत ऋष्यमूक पर्वताजवळ आहे हे स्पष्ट लिहून ठेवले आहे. तसेच तो ब्रह्मगिरी म्हणजे त्र्यंबकेश्वराच्या डोंगराजवळ आहे हेही लिहून ठेवले आहे. म्हणजे दहाव्या शतकापर्यंत ऋष्यमूक पर्वत कोणता हे लोकांना माहीत होते. किष्किधा नगरी जवळच होती. तेथील टाळमृदुंगांचा आवाज जवळच्याच पर्वतात ४ महिने (चातुर्मास) वस्ती करून राहणाऱ्या श्रीरामांनी लक्ष्मणाला ऐकवला आहे; व

सांगितला आहे. प्रकरण दोनमध्ये त्याचा उल्लेख केलेला आहे. बहुधा श्रीराम याच पर्वताच्या गुहेत कोठे तरी राहात होते, असा आमचा तर्क आहे; कारण या पर्वताच्या पलीकडे ऋष्यमूक, म्हणजे नाशिक जिल्ह्याचा भाग, पुणे जिल्हा, नगर जिल्हा अशा सरहद्दी लागलेल्या आहेत.

अंजन (अजय) पर्वतावरील महाकवी वाल्मिकीची समाधी.

या पर्वतावर महाकवी वाल्मिकींची समाधी आहे. समाधी अतिउंच निबिड अरण्यात आहे. ही गोष्ट या जिल्ह्यातील कल्याणपर्यंत सर्व ग्रामीण जनतेला माहीत आहे. वारकरी सांप्रदायिकांना वाल्मिकीची आणखी एक समाधी सातारा मार्गावर वाल्हेगावी आहे हे माहीत आहे. याबाबत हकीगत अशी की, वाल्मिकी हा वाल्हे गावचा ब्राह्मण; सध्या या ठिकाणी सर्व वाल्हेकर ब्राह्मण राहतात. पुढे हा डोंगरातील कोळी लोकांच्या संगतीने दरोडेखोरी करू लागला. म्हणून लोक वाल्या कोळी असे त्याला संबोधू लागले. परंतु पुढे नारदांच्या उपदेशाने त्याने अंगावर वारूळ जमेपर्यंत तपश्चर्या केली. त्याला साक्षात्कार झाला व ब्रह्मज्ञान झाले व वाल्याकोळ्याचा वाल्मिकी ऋषी झाला. हा रामायण समकालीन आहे. पुढे याने उत्तरेला गोमतीच्या दक्षिण किनाऱ्यावर आपला आश्रम स्थापला. तो त्याचा शिष्याश्रम आहे. याच आश्रमात लक्ष्मणाने सीतेला आणून सोडले व वाल्मिकी-शिष्यांच्या

हाती दिले. त्या वेळी वाल्मिकी अंजन पर्वतावर आपल्या मूळ आश्रमी होता. शिष्यांनी सीतेची वार्ता वाल्मिकींना कळवली व वाल्मिकी ऋषींनी सीतेला अंजन पर्वतावर आणून ठेवले. तेथे तिला दोन पुत्र झाले. त्यांची नावे लव व कुश. या पर्वतावर वाल्मिकी समाधीपासून डाव्या हाताला पाठीमागे खूप उंचावर दोन सुळक्यांच्या मधे एक मोठी फट आहे. ती जागा आजही सीतेचा पाळणा म्हणून ओळखली जाते. या दोन दरडींना दोऱ्या बांधून वल्कलांची झोळी करून सीतेने लवकुशांकरता पाळणा केला होता. वाल्मिकी आश्रमातील सीतेच्या वास्तव्याने पावन झालेली ही जागा आहे. या ठिकाणी लवकुशांचे सीतेने संगोपन केले; त्यांना वाढवले; वाल्मिकींनी त्यांना उत्तम शिक्षण दिले. श्रीरामप्रभूने जेव्हा अश्वमेध यज्ञ केला तेव्हा यज्ञाचा घोडा लवकुशांनी या पर्वताच्या आसमंतात पकडला व या पर्वतावरील गुहेत आणून ठेवला. ती गुहा अजूनही आहे व दाखवली जाते. आता ती वरील दरडी कोसळून पुष्कळशी बुजली आहे. नंतर लवकुश व श्रीराम यांचे त्या

श्रीराम–सीता व लव-कुश यांच्या अंजन (अजय) पर्वतावरील पादुका.

अश्वासाठी येथेच युद्ध झाले; व नंतर सीतेची व श्रीरामाची भेट झाली. या हकीगतीचा पुरावा म्हणजे नंतरच्या काळात कोणीतरी येथे रामसीता यांच्या मोठ्या पादुका व लवकुशांच्या छोट्या पादुका दगडावर कोरून तेथे मंदिर बांधलेले असावे. परंतु ते पुढे काळाच्या ओघात दरडी कोसळून पडले किंवा मुसलमानी काळात फोडले गले असावे. कारण आज त्या ठिकाणी त्या मंदिराचे भग्नावशेष सापडले



अंजन पर्वतावरील लव-कुश व मारुती युद्ध कोरलेले स्तंभ.

आहेत. रामसीता व लवकुश यांच्या पादुका सापडल्या आहेतच; परंतु तेथे त्या मंदिराच्या खांबावर लवकुश व राम, मारुती यांचे युद्धप्रसंग कोरलेले शिल्पयुक्त चौकोनी खांबांचे दोन-चार तुकडे सुमारे ४ फूट लांब व दोन फूट चौरसाकृतीचे सापडले आहेत. त्यावर मारुतीचे युद्ध कोरलेले आहे. तशाच तऱ्हेचा एक खांबाचा तुकडा, भारत इतिहास संशोधन मंडळाचे आवारात असून एका बाजूवर मारुतीची

अंजन पर्वतावरील शिव मंदिराचे अवशेष.

आकृती आहे. तेथे एकूण दोन शिवमंदिरे होती. एक सीतेच्या पाळण्याजवळ यादव-कालापासून प्रसिद्ध असलेला रतनगड नावाचा किल्ला आहे; त्याचेजवळ एक शिव-मंदिर आहे; दुसरे वाल्मिकी महर्षींचे समाधीपासून सुमारे १०० फुटावर होते; तिसरे साकुर्ली कसब्यात होते. आज बहुतेक मंदिरे नष्ट झाली आहेत. साकुर्ली येथ फक्त पाया आहे. समाधीजवळचे साफ नाहीसे झाले आहे. परंतु शिवलिंग मोठे



अंजन (अजय) पर्वतावरील मोठे शिवलिंग व नंदी.

व दोन मोठे नंदी सापडले आहेत. एक मोठा कलाकृती कोरलेला सुमारे ६ फूट औरसचौरस तुकडा सापडला आहे. सीतेचा पाळणा आहे; त्याजवळच सीतेचे न्हाणीघरही आहे. सर्व डोंगरात पाण्याचा अंशही नसताना तेथे एक कुंड आहे. हे कुंड गार पाण्याने कायम भरलेले आहे. तसेच वाल्मिकी आश्रमासमोर सुमारे शंभर फुटांवर एक उंबराच्या झाडाच्या बुंध्यातून सुमारे सहा इंच व्यासाची जलौघाची धार निघते व ते पाणी खाली एका कुंडात पडते. ते मोठे कुंड सध्या तेथे २५ वर्षे राहात असलेल्या निर्वाणदास नावाच्या सत्पुरुषाने बांधून काढले आहे. ते पाणी कधीही संपत नाही, आटत नाही व आंघोळ केली तर हुडहुडी भरेल एवढे गार आहे. तेथील आदिवासी लोकांत चौकशी करता असे समजले की, त्या पर्वतावर पुष्कळच गुंफा असून ती पूर्वीच्या मुनींची तपस्येची स्थाने आहेत. एका कपारी-सारख्या गुंफेत बरेचसे नंदी घडवून ठेवलेले आढळले. तर दुसरी गुहा एवढी प्रचंड व खोल आहे की त्यामध्ये दोन मोटारी एका वेळी जाऊ शकतील एवढी रुंद आहे व आत किती खोल आहे ते सांगता येत नाही. आदिवासी सांगतात, निदान अर्धा मैल तरी आत ते जाऊन आलेले आहेत. पुढे जाण्याची हिंमत होत नाही. ही गुहा

पर्वताच्या एकदम माथ्यावर आहे व ती नैसर्गिक आहे. पलीकडे नगर जिल्ह्याची हद्द लागते. तेथे जवळच सांब्रद गाव आहे. या गुहेत वाल्मिकीचे आश्रमाचे बाजूने न जाता भंडारदरा बाजूने जावे लागते. म्हणजे ऋष्यमूक पर्वताकडून जावे लागते. साधू निर्वाणदास यांचे म्हणण्याप्रमाणे वाल्मिकी समाधीचे पाठीमागे सीतेचे मंदिर होते. परंतु त्यावर कडा पडून ते जमीनदोस्त झाले. त्या वेळी तेथे एक नाथपंथी साधू व राव देशमुख अशी दोन माणसे श्रीधरस्वामींचा रामविजय ग्रंथ पारायण करीत होते. त्यापैकी एकजण दरडीखाली मेला व एक जखमी झाला. पुढे त्याचे काय झाले माहीत नाही. रतनगडाजवळ जो डोंगराचा भाग आहे त्याला रवीचा डोंगर म्हणतात.

ही वाल्मिकीचीच समाधी आहे; हे दहाव्या शतकातील गोरक्षनाथ ह्यांनी लिहिलेल्या 'किमयागार' ग्रंथातही स्पष्ट सांगितले आहे. 'किमयागार' हा ग्रंथ दुर्मिळ झालेला आहे. परंतु त्यावरून प्राकृत भाषेत संत नरहरी वंशातील धुंडीराज-सुत मालुकवीने नाथ सांप्रदायाचा 'नवनाथ भक्तिसार' हा प्रासादिक ग्रंथ मूळ किमयागार या ग्रंथावरून तयार केला आहे; त्यात अध्याय २३ मध्ये मच्छीन्द्र-नाथांना किलोतला राणीच्या स्त्री राज्यातून काढून घेऊन मीननाथासह गोरक्ष-नाथ निघाले व ठिकठिकाणी हिंडत ते तेलंगदेशात गोदा संगमावर आले. तेथे स्नान करून गोदेच्या दक्षिण तीराकडून ते उगमाकडे निघाले. वाटेत आवंढ्या नागनाथ व परळी वैजनाथ ही तीर्थें करून गोदेचे दक्षिणेने चालत अत्यंत अरण्य-मय अशा गर्भगिरी पर्वतावर जे जंगलात वाल्मिकस्थान आहे तेथे येऊन पोहोचले. अशा अर्थाच्या ओव्या आहेत. अध्याय २३ ओव्या ५, ६, ७, ८. आठव्या ओवीत वाल्मिकस्थान गर्भगिरी असे आढळेल. नंतर मच्छिन्द्रनाथ निसर्गविधीसाठी बाजूला गेले असता तेथे गोरक्षनाथास एक उंबराचे झाड दिसले. त्या ठिकाणी एक अद्‌भुत पोखरण दिसली. त्यामध्ये वामतीर्थ दिसले. तेव्हा खाकेतून झोळी काढून पाण्याचे भांडे काढून पोखरणीत उतरला. तेथे स्नान करून अंगी भस्म लावले. अध्याय २३ ओव्या ५४, ५५ न ५६. ही प्रत्यक्ष परिस्थिती वाल्मिकी समाधी-समोर बर आम्ही जे सीतेचे न्हाणीघर सांगितले, ते कुंड व तेथून खाली उंबराचे बुंध्यातून सहा इंच व्यासाची धार पडते व ते खाली एका मोठ्या कुंडात पडते. म्हणजे वाल्मिकी समाधी हीच हे दहाव्या शतकापर्यंत व नंतर मालुकवीने १९ व्या शतकात प्राकृत भाषेत लिहिलेल्या नवनाथभक्तिसार या ग्रंथावरून व प्रत्यक्ष परिस्थितीवरूनही सिद्ध होते. तसेच या डोंगराच्या रांगेतच मच्छिद्रगड व गोरख-गड या नावाने प्रसिद्ध असलेले किल्ले आहेत. तसाच सिद्धगड या नावाचा किल्ला आहे. ही नावे प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहेत. ही सर्व नावे व स्थाने व त्या वर्णनाबरहुकूम असलेली प्रत्यक्ष स्थिती हेच दर्शवतात की वाल्मिकीची समाधी हीच आहे. हेच वाल्मिकीचे मूळ आश्रमस्थान; आणि हाच गर्भगिरी पर्वत. दुसरा

Scanned with Car

आश्रम गोमतीचे दक्षिण तीरावर उत्तर हिंदुस्तानात होता. परंतु वाल्मिकींनी सीतेला ह्याच आश्रमात आणून तिचे बाळंतपण व संगोपन केले. लवकुश या सीतापुत्रांना वाढवले; व येथेच लवकुश व श्रीराम ह्यांचे अश्वमेध यज्ञाच्या घोड्यावरून युद्ध झाले; ह्यात रामाचा पराभव झाला. तेव्हा सीतेने लवकुशांना आपल्या पित्याची ओळख करून दिली. पुत्रजन्मानंतर रामसीतेची प्रथम भेट ह्याच ठिकाणी झाली.

सुभे कल्याणमधील अंजनपर्वत ही भूमी रामप्रभू, लक्ष्मण, सीता, हनुमान, महाकवी वाल्मिकी, गोरक्षनाथ, मच्छीन्द्रनाथ ह्यांसारखे सत्पुरुष इत्यादींच्या पदन्यासाने व निवासाने पावनतीर्थ झालेली आहे. ह्याच पर्वतावर मच्छींद्रनाथांना प्रथम सर्व सिद्धी आदित्याच्या उपासनेने प्राप्त झाल्या. या पर्वतातील एका शिखराला आजही रवीचा डोंगर म्हटले जाते. रामाने सीताशोधाला निघण्यापूर्वी सुग्रीवाला किष्किंधेच्या राज्यावर बसविल्यावर पावसाळ्यात प्रस्रवण पर्वतावरील एका गुहेत वास्तव्य केले; ती गुहा ह्याच पर्वताच्या रांगेत कुठेतरी असावी; किंवा वर वर्णन केलेली जी एक मोठी गुहा या पर्वतात सापडली आहे ती असावी. कारण रामाच्या वास्तव्याच्या गुहेचे वर्णन रामायणात आले आहे ते असे की, ऋष्यमूक पर्वताच्या समोरच्या पर्वतशिखरावरील, ज्यात हवा भरपूर खेळते अशा गुहेत प्रभू रामाने पावसाचे चार महिने वास्तव्य केले. वर वर्णन केलेली अर्धा मैल खोलीची जी मोठी गुहा ती पर्वतावर उंच शिखरावर असून ऋष्यमूक पर्वताकडेच तोंड करून आहे; किष्किंधा नगरी ही गुहा नगरी होती. अर्थात ती देखील ह्याच पर्वतात कुठे तरी असण्याची शक्यता आहे. त्याचा शोध चालू आहे. ह्या पर्वताचे पायथ्याशी डेहणे नावाचे आदीवासींचे छोटे गाव आहे. शाई नदीच्या अलीकडे तीन मैलांवर इतिहासप्रसिद्ध साकुर्ली नावाचे कसब्याचे गाव आहे. आज हे गाव कसबा राहिले नाही. खेडेगाव झाले आहे. परंतु मुसलमान काळापासून पेशवाई अखेरपर्यंत या ठिकाणी अधिकारी नावाचे (मूळ आडनाव जगताप) देशमुख होते; त्यांचा अधिकार वसुली करणे, शांतता, सुव्यवस्था पाहणे वगैरे. मोंगल काळापासून पेशवे काळापर्यंत त्यांना सनदा मिळालेल्या आहेत. पूर्वी अंजन पर्वत व या भागात कोळी लोकांचा फार त्रास असे. जव्हारचे राजे मुकणे यांचे पूर्वजांच्या टोळ्या या भागात फार लुटालूट करीत. त्यांचा बंदोबस्त करून प्रांतात सुव्यवस्था निर्माण केली म्हणून मुसलमान राजांनी यांना अधिकार दिले. राव ही पदवी दिली. वसुली अधिकारी म्हणून नेमले. पेशवेकालातही हा अधिकार त्यांचेकडे चालत होता. म्हणून त्यांचे नाव अधिकारी झाले. सध्या साकुर्ली येथे श्री नारायणराव अधिकारी हे सरपंच आहेत व त्यांचेचपैकी एक बंधू श्री. रामराव हे कॉंग्रेस कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. ते खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. या दोघांनी आम्हांला फारच मदत करून या स्थळांचा परिचय करून दिला.

Scanned with Car

या अंजन पर्वतावरील वाल्मिकी समाधी ही फार उपेक्षित होती. १९४९ साली एक उत्तर हिंदुस्थानी साधुपुरुष बाबा निर्वाणदास उदासी यांनी या स्थळाला भेट दिली. तेव्हा या ठिकाणी आपण वास्तव्य करावे, वाल्मिकी समाधीची सेवा करावी ही प्रेरणा त्यांना झाली. ते तेथे वास्तव्य करू लागले. त्या वेळी त्यांनी या पर्वताचा कोपरान् कोपरा हिंडून पाहिला व त्यांना रामसीता व लवकुश यांच्या पादुका, शिवलिंग, नंदी कोरलेले मंदिराचे खांब, गुहा, कमळ वगैरे अवशेष आढळले. त्यांनी ते सर्व एकत्र करून वाल्मिकी समाधीचे समोर आणून ठेवले आहेत. तेथे त्यांनी मोठी बाग केली. एक दगडी आश्रम–धर्मशाळा बांधली. वर येणे कठीण होते तेथे येण्यास रुंद रस्ता तयार केला. हिंस्र श्वापदांचा त्रास नाहीसा केला. मार्ग निर्भय केला. सतत चोवीस वर्षे ते या अंजन पर्वत व वाल्मिकीच्या समाधीचे सेवेसाठी झटले. जंगली जमीन लागवडीखाली आणली. वारली वगैरे आदिवासी जनतेला आपलेसे केले. त्यांना मदत केली. तेथील आदिवासी जनतेचे ते

अंजन पर्वतावरील साधू निर्वाणदास लेखकाला विशेष माहिती सांगताना.

आज दैवत होऊन बसले. आम्ही जेव्हा तेथे गेलो तेव्हा बाबा आजारी होते. त्याही स्थितीत त्यांनी आम्हांला मार्गदर्शन केले. स्वतः वर येऊन ती सर्व स्थळे दाखवण्याची इच्छा प्रगट केली. परंतु प्रकृतीमुळे ते शक्य नव्हते. परंतु तोंडी जे मार्गदर्शन केले त्यामध्ये सतत २४ वर्षे हा यती किती परिश्रम करीत होता व या सर्व स्थळांना उजेडात आणून जनतेत जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होता याची साक्ष पटली.

सध्या त्यांचे वय ७६ वर्षांचे आहे. यांचे मूळ गुरु हडपसर येथील भोला-रामजी उदासी. सध्या त्या जागी बाबांचे गुरुबंधू बाबा शारदारामजी उदासी हे पुण्याजवळील हडपसर येथे रामटेकडीवर असतात. बाबा निर्वाणदास हे अंजन-पर्वतावर आले. सध्या त्यांनी अंजनपर्वताच्या पायथ्याशी आपला आश्रम केला आहे. भोवताली ते थोडी शेती लावतात. आम्हांला मुद्दाम स्वतः हिंडून अंजनपर्वत दाखवणार होते; परंतु त्यावेळी ते जमले नाही. प्रस्तुत लेखकाला त्यांनी खास एकांतात सुमारे चार तास काही खास गोष्टी या परिसराबाबत सांगितल्या. त्या सर्व आजच प्रकट करू नये अशी त्यांची आज्ञा आहे. त्यांनी आमच्यावर हा कृपावर्षाव केला त्याबद्दल शतप्रणाम. आपले सर्वांचे दुर्दैव असे की, हे पुस्तक प्रसिद्ध होण्या-पूर्वीच मार्चच्या ११ तारखेस संकष्टी चतुर्थीचे दिवशी सोमवारी त्यांचे महानिर्वाण झाले असे समजले. त्यामुळे त्यांची व आमची ती शेवटचीच भेट ठरली.

कान्हेरी तथा कृष्णगिरी ऊर्फ त्रिकूट

जी. आय. पी. व बी. बी सी. आय. या दोन लोहमार्गांच्या बरोबर मध्यभागी कान्हेरीची लेणी आहेत. त्या प्रदेशात झाडी अत्यंत गर्द असून तींत कळकीची बेटे, आंबराया, करवंदीच्या जाळया व पळस विपुल आहेत. कान्हेरी म्हणजे कृष्णगिरी हा डोंगर त्यावर छताप्रमाणे पसरलेल्या तरुलतांमुळे दुरून खरोखरच काळा दिसतो. डोंगर पायथ्यापासून फारसा उंच नाही. तो चढण्यास अवघी पंधरा मिनिटे पुरतात. त्याजवरील कातळा एवढा विस्तीर्ण कातळ हंपीस तुंगभद्रा तीराजवळील कातळा-शिवाय इतर क्वचित् आढळेल. म्हणूनच त्यात १०२ लेणी कोरता आली. लेणी खोदूनही केवढा तरी कातळ रिकामा राहिला आहे. त्यात एकदोन मोठाली तळीही आहेत. त्याशिवाय प्रत्येक लेण्याच्या तोंडाशी छानदार हौदवजा टाकी आहेतच. खडकाच्या विस्तारामुळे ज्याला त्याला इच्छेस येईल तेथे निवांत स्थळ निवडून काढून त्यावर आपल्या आवडीच्या आकृतीचे लेणे खोदावयास सापडले आहे. कातळाच्या उंचीमुळे डोंगरांचे आयते मजलेच झाले असून त्यावर १०२ लेणी इतस्ततः विखुरली आहेत. तेथे कोठेही उभे राहिले वा बसले तरी वसईची सागरा-सारखी पसरलेली खाडी आणि गर्द व भव्य अरण्य ही आपल्या दर्शनाने चित्तास प्रसन्नता देतात. या डोंगरांचे सर्वांत उंच शिखर १५०० फूट उंच आहे. या डोंगरा-वरून मुंबईस ज्या तलावातून पाणीपुरवठा होतो, तो विहारचा तलावही दिसतो. कान्हेरीस बहुतेक सर्व विहार असून चैत्य असा एकच आहे. हा चैत्य व त्याच्या शेजारचे विहार पश्चिमेकडे तोंड करून आहेत. चैत्यासमोरची थोडीशी सपाटी सोडली की एकदम खाली खोल दरी आहे. तिच्यातून एक ओढा वाहतो. त्याच्या पलीकडे दुसरा डोंगर असून तोच या चैत्यासमोर येतो. हा चैत्य कार्ले येथील चैत्याच्या धर्तीवर आकारला आहे. त्याच्या बाहेरील मोठ्या अंगणात शिरण्यास

रुंद वाट आहे व तिच्या दोन्ही अंगांना कंबरेइतक्या उंचीची कुसुंवजा कोरीव (भिंत) वेदिका आहे. अंगण खोदीव व साफ पोषणाचे आहे. कुसवाच्या बाहेर उजव्या हातास ओळीने तीन टाकी आहेत. त्यांतील पाणी सहज भांडे भरून घेण्याजोगे वर आहे. अंगणात जाण्याकरिता खोदलेल्या पायऱ्याही सोप्या व सुरेख आहेत. चैत्याचे सूक्ष्म रीतीने अवलोकन करणारास टाक्यांपासून तो चैत्याच्या गाभाऱ्यापर्यंत सर्वत्र कलायुक्त हात फिरलेला दिसतो. टाक्यांच्या प्रलीकडे आपल्या उजव्या हाताला गुहेसारखा फार मोठा विहार असून त्या बाहेरच्या पटांगणात दोनतीनशे माणसांचा सहज समावेश होईल.

चैत्यापुढील अंगण हा एक चौकच असून त्याच्या दोन्ही अंगांच्या खोल्यांतून बुद्धाच्या मूर्ती आहेत. अंगणातून चैत्यात शिरताना लागणारी मुख्य कमान तीन मजली आहे. त्याशिवाय दोन्ही बाजूस दोन लहान कमानी आहेत. कमानीच्या दोन्ही अंगांस जयविजयासारख्या दोन मूर्ती आहेत. प्रत्येक मूर्ती सुमारे वीस हात उंच व तिचे पाऊल सव्वा हात लांब आहे. मूर्तीच्या अंगावरील कफनी किंवा छाटी तिच्या सुरकुत्यासुद्धा हुबेहूब दाखविल्या आहेत. चैत्याला ३४ खांब असून पहिले पाच खांब नक्षीदार आहेत. त्या प्रत्येक खांबावर डागोबा व त्याच्या दोन्ही बाजूस दोन हत्ती आहेत. चैत्यासमोर अगदी शेवटच्या टोकाला डागोबा व त्या सभोवती प्रद-क्षिणेची वाट आहे. डागोबात दिवे लावण्याकरिता कोनाडे आहेत. चैत्याच्या भिंती-वर जिकडेतिकडे स्त्री-पुरुषांच्या मूर्तीच मूर्ती आहेत. पैकी काही उभ्या व काही बैठ्या आहेत. चैत्याच्या मध्यावरील छताला जरी कमानी दाखविल्या आहेत तरी त्या धुपून गेल्या आहेत. चैत्याशेजारच्या विहारात राहण्याच्या खोल्या आहेत. सागरप्रलोकन हे यथार्थ नाव ज्यास देण्यात आले आहे ते हे लेणे इ.स. १८० तील आहे.

घारापुरी

घारापुरीची लेणी मुंबईपासून ईशान्येस सुमारे सात मैल अंतरावर एका बेटात आहेत. बेटाचा परीघ ४॥ मैल आहे. हे बेट दोन डोंगरांचे बनले असून त्याज-मध्ये एक दरी आहे. डोंगराची उंची २४० फूट आहे. दुरून सारे बेट पाचूसारखे हिरवेगार दिसते. डोंगर वृक्षांनी अगदी झाकून गेले आहेत. बेटावर वस्ती अगदी थोडी आहे व तीही अलीकडची आहे. तेथील लोकांचा मुख्य धंदा भातशेतीचा; त्याशिवाय मेंढ्या व कोंबड्याही ते पाळतात व त्यांची विक्री मुंबईस करून आपल्या वार्षिक उत्पन्नात भर घालतात. या लेण्यांना इंग्रजीत 'एलेफंटा केव्हज' म्हणतात. पोर्तुगीजांनी हे बेट सोळाव्या शतकात घेतले तेव्हा त्यांना बेटात उतरण्याच्या जागेपाशी एक मोठा दगडी हत्ती आढळला. तो हत्ती १३ फूट २ इंच लांब व

५ फूट ४ इंच उंच होता. त्यावरून या बेटाचे नाव 'एलेफंटा' ठेवले व तेच युरोपियन लोकांनी चालू केले. हा हत्ती इ. स. १८१४ त फुटला व पुढे ह्याचे तुकडे झाले. ते तुकडे १८६४ त राणीच्या बागेत नेण्यात आले व ते एकत्र जोडून त्यांचा हत्ती पुनः बनविण्यात आला.

एक व्यापारी ठाकर करमसी रणमल्ल लोहाणा यांनी थेट लेण्यांपर्यंत सुंदर दगडी पायऱ्या बांधून काढल्या असल्यामुळे पायाला मातीचा स्पर्शही होऊ न देता लेण्यात पोचता येते. पायऱ्यांचा चढ नको असणाराकरिता साधी वाट आहे, तिनेच बहुतेक लोक लेण्यास जातात.

घारापुरीपासून ठाणे ५ मैलांवर आहे. ठाणे ही शिलाहारांची राजधानी होती. उष्णकाळी ठाण्यास उन्हाळा असह्य म्हणून शिलाहार त्या दिवसात या बेटावर हवा खाण्याकरिता येऊन रहात असावे. घारापुरीची लेणी इ. स. च्या ८ व्या शतकात कोरली गेली. प्रस्तुत लेणी वेरूळ येथील कैलास लेण्याच्या व त्या भोवतालच्या शिव लेण्याच्या धर्तीवर आहेत.

वेरूळच्या लेण्यांप्रमाणे येथील मुख्य लेणे शिवाचे आहे. त्या लेण्यातील मूर्तीप्रमाणे याही लेण्यांतील मूर्ती विशाल आहेत. कैलासाइतके हे लेणे विस्तीर्ण नसल्यामुळे ते शिलाहारसारख्या मांडलीक राजांच्या आटोक्यातील आहे. घारापुरीवर एकंदर लेणी ७/८ आहेत. त्या सर्वात हेच लेणे प्रमुख व प्रेक्षणीय आहे. ते समुद्रसपाटीपासून २५० फूट उंच आहे. त्याकडे जाण्याचा मार्ग लेण्याच्या भव्यपणास शोभण्यासारखाच प्रशस्त असून त्याजवर निंबवृक्षांची दाट छाया पडलेली आहे व दोन्ही बाजूच्या दरडी ४० फूट उंच आहेत. लेणे शिवाचे असल्यामुळे शिवाची वेगवेगळी रूपे व ध्याने जिकडे तिकडे आहेत. लेण्याच्या विशाल मंडपात प्रवेश करताच समोरच्या भिंतीतील गाभाऱ्यात कोरलेली शंकराची त्रिमूर्ती अगदी डोळ्यासमोर येते व त्यामुळे लेण्यांतील मुख्य मूर्ती तीच असा सकृद्दर्शनी भास होतो. परंतु अधिक शोध केल्यानंतर तो तितकासा बरोबर नसल्याविषयी खात्री पटते. कारण मंडपात आपल्या उजव्या बाजूस एका लहानशा देवळात शिवलिंग असून तेच मुख्य दैवत व त्याचीच जत्रा महाशिवरात्रीस येथे भरते. हे लिंग थेट वेरूळच्या कैलासातील शिवलिंगासारखे आहे व त्याला अलीकडील शिवलिंगांना असते तशी शाळुंका न ठेवता त्याला आधार तीन फूट उंचीच्या पाषाणाचा दिलेला आहे. मंडप १३० फूट लांब व तितकाच रुंद आहे. यावरून त्याच्या विस्ताराची कल्पना येईल. त्यातील खांबांची मेहरप वेरूळच्या खांबासारखी आहे. नटराज, शिवपार्वती–विवाह, गंगाधर, महेशमूर्ती, अर्धनारी–नटेश्वर व शिवपार्वती बसलेल्या स्थितीत असून कैलासावर बसलेल्या शिवपार्वतींना उचलणारा रावण, अंधकाचा वध करणारा शिव इत्यादी मूर्ती आहेत व त्या सर्व प्रचंड आहेत, पण त्या सर्वांवर मध्यभागातील त्रिमूर्तीचा

अर्धपुतळा खरोखरच ताण करतो. हा अर्धपुतळाच असला तरी त्याची उंची १७ फूट १० इंच आहे. ब्रह्मा, विष्णु व महेश यांची जी कार्यें तीच या मूर्तीची होत. त्यांच्या चर्याहि विशिष्ट कार्यांना उचित अशाच दर्शविल्या आहेत. एकंदर पुतळा फक्त डोक्यापासून छातीपर्यंतच बनविलेला आहे. डोक्याचा जटामुकुट उत्कृष्ट नक्षीकामाचा ४ फूट उंच आहे. मुकुट सोडून डोके ५ फूट, नाक १॥ फूट व ओठापर्यंत हनुवटी १ फूट आणि हात मनगटापासून पुढे ५॥ फूट लांबीचा आहे. रावण कैलास पर्वत हालवीत असता शंकर त्याला खाली दाबतात, हेही दृश्य वेरूळच्या धर्तीवर काही अंशी आहे. जशा मूर्ती धिप्पाड तसेच त्याचे द्वारपालही धिप्पाड आहेत. या सर्व मूर्ती एक वेळ रंगीत असल्याच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. पाण्याकरिता देवालयास लागूनच आपल्या उजव्या हाताला डोंगरकपारीत देवालयाच्या विस्तारास शोभण्यासारखेच एक मोठे टाके आहे. त्याचे पाणी वरून हौदाइतके खोल असल्याने सहज हाताशी येते.

□ □ □

: १८ :

ऐतिहासिक बांधकामे व घराणी

इ. स. १६८९ पासून कल्याण शहराचा तावा औरंगजेबाचा एक सरदार मातबरखान ह्याने घेतला व कल्याण सुभ्याचा तो सुभेदार झाला. त्याची एकूण कारकीर्द कल्याण येथे सुमारे १६८९ ते १७०५ पर्यंत म्हणजे सुमारे १७ वर्षांची झाली; कारण १७०५ च्या सुमारास तो मृत्यू पावला. ह्या १७ वर्षांच्या कारकीर्दीत त्याला मराठ्यांविरुद्ध सतत झगडावे लागले. तरी संभाजीच्या कारकीर्दीतील संघर्षात कल्याण शहराची व विभागाची धूळधाण उडाली होती. अनेक मशिदी जमीनदोस्त झाल्या होता. लोक गाव सोडून पळाले होते. प्रचंड महागाई झाली होती. अशा परिस्थितीत त्याने कल्याण सुधारण्याचा खूपच प्रयत्न केला. निरनिराळ्या मशिदी दुरुस्त केल्या; काही बांधल्या; तसेच अनेक सुंदर इमारतीही बांधल्या. त्याने व इतरांनी केलेल्या बांधकामाची माहिती पुढे दिली आहे.

मातबरखानाला इमारती बांधण्याचा शोक होता असे दिसते. त्याने स्वतःला पहिल्या प्रथम आक्टोबर १६८९ ते सप्टेंबर १६९० या काळात स्वतःला राहण्यासाठी एक प्रासाद बांधला. त्यामध्ये मोठमोठे दिवाणखाने बांधले. भोवती एक सुंदर वगीचा निर्माण केला. त्यामध्ये पाणी खेळवून एक सुंदर कारंजे बांधले. ही इमारत सध्या अस्तित्वात नाही. कुठे होती हेही समजणे कठीण झाले आहे. परंतु बहुधा दूध नाक्याच्या बाजूलाच कोठे तरी जुन्या शीशमहलच्या जवळपास असावी.

त्याच काळात त्याने एक मशीदही बांधल्याचा उल्लेख आहे. परंतु ती काळी मशीद नव्हे; व हल्लीची जुम्मा मशीदही नव्हे. बहुधा हल्ली राम मंदिर शंकराचे मंदिर जे पार नाक्याजवळ आहे तेथील पोखरणीजवळ असावी. हल्लीच्या राम मंदिराचे स्थानावर ती होती असे जुने लोक सांगतात.

राम–मंदिराजवळ असलेली प्रचंड पुष्करणी हे बांधकाम त्या गोष्टीला पुष्टी देते. ही पुष्करणी ऊर्फ पोखरण मुसलमानी पद्धतीची आहे.

मातबरखानाने एक हमाम म्हणजे स्नानगृहही बांधले. (सन १६९१–१६९२). बहुधा हे स्नानगृहही या पुष्करणीजवळच असावे. १६९२–१६९३ मध्ये शेणाळे (काळा तलाव) तळ्याजवळ काळ्या मशिदीजवळ एक मोठा बगीचा तयार केला.

इ. स. १६९०–१६९१ मध्ये स्वतःसाठी मनोरंजन आरामगृह बांधले. ते कुठे ते आज शोधूनही सांपडत नाही; अवशेषही मिळत नाहीत. १६९२ मध्ये

त्याने शहराची तटबंदी, किल्ले दुर्गाडीची तटबंदी दुरुस्त केली. हे काम शहाजहान काळापासून चालू होते, ते ह्यावेळी पुरे झाले असे म्हणतात. परंतु हे सर्व दुरुस्तीचेच काम होते. कारण कल्याण शहराभोवती असलेला खाडीचे पाणी खेळवलेला ३० फूट रुंद व २० फूट खोलीचा प्रचंड खंदक तयार केल्याचा उल्लेख त्याचे बाबतीत कोणत्याही कागदपत्रांत सांपडत नाही. तसेच कल्याण शहराला एवढी भुईकोट तटबंदी बांधून काढण्याएवढी फुरसत व पैसा व शासनमान्यताही त्याला मिळाल्याचे त्याचेसंबंधी सापडलेल्या कागदपत्रावरून दिसत नाही. परंतु सातवाहन राजांची इ. स. पहिल्या किंवा दुसऱ्या शतकात जी १०० वर्षांची कारकीर्द झाली त्या काळी कल्याणनगर हे अत्यंत प्रसिद्ध व्यापारी बंदर असून अत्यंत श्रीमान व्यापाऱ्यांनी गजबजलेले होते. तसेच सातवाहन राजांची राजधानी होते. त्यांच्याच काळी कल्याणात एकूण सात गोड पाण्याचे तलाव बांधलेले होते. त्यांची नावे (सध्या माहीत असलेली)–(१) शेणाळे, (२) लेंडी तलाव, (३) रोजाळे, (४) दावणे, (५) भटाळे, (६) राहाटई (७) धालसर अशी आहेत. ही सर्व तळी एका खेरीज तटबंदीच्या हद्दीच्या बाहेर आहेत. अशा व्यापारी, राजधानीच्या व श्रीमान शहराला तटबंदी बांधण्याची आवश्यकता फक्त त्याच सातवाहन काळात त्या राजांनाच आवश्यकता होती; एवढे सर्व निर्माण करण्यास आवश्यक एवढी दीर्घ कारकीर्दही त्यांना मिळाली होती. तसेच या काळातील सातवाहन राजे फारसे पराक्रमी नसून ऐषआरामी होते असेही त्यांचा इतिहास सांगतो म्हणून कल्याण शहराची भुईकोट तटबंदी मातबरखानाने बांधली असे म्हटले जाते, ते खरे नसून वेळोवेळी युद्धामुळे जी त्याची नुकसानी झाली ती त्याने दुरुस्त केली एवढेच म्हणता येईल. शिवाय मातबरखानाचे काळात सर्व शहराला तटबंदी बांधण्याइतपत महत्त्वही या स्थानाला नव्हते किंवा हे शहर श्रीमंत राहिले नव्हते. उलट उध्वस्तच झालेले होते.

मातबरखानाने दिवाणखाना नावाची अत्यंत सुंदर इमारत समारंभ व सभा वगैरेसाठी १६९५–१६९६ या काळात बांधली. हे बांधकाम त्याने सध्याच्या मुरवाड रस्त्याला असलेल्या बारावे गावाजवळ केले असा उल्लेख आढळतो. परंतु आज त्याचा काहीही मागमूसच लागत नाही.

मुकबरा:– इ. स. १६९६-९७ या वर्षी मातबरखानाची बेगम मरण पावली. तिच्या स्मरणार्थ शेणाळे तळ्याजवळील त्याचे बागेत त्याने एक मुकबरा बांधला. ही इमारत इ. स. १७०५ ते १७०६ मध्ये पूर्ण झाली. ह्यासाठी त्याने सुमारे एक लाख रुपये खर्च केले असा उल्लेख आढळतो. ही इमारत बांधल्यावर तोही मरण पावला.

Scanned with Ca



मातबरखानाच्या पत्नीचा मकबरा– काळा तलाव, कल्याण

ही इमारत शेणाले (काळा तलाव) तळयाच्या पूर्व बाजूस आहे. आता जरी ही इमारत जुनी झाली असली तरी काम प्रेक्षणीय आहे. ही इमारत मातबरखानाने अगोदर बांधलेल्या एका सुंदर बगीच्यात आहे. बगीचाचे प्रवेशद्वार सुंदर बांधलेले असून भव्य आहे. ते दक्षिणाभिमुख आहे. प्रवेशद्वारातून एक फर्लांगावर आत हा मुकबरा आहे; मुकबऱ्याचे इमारतीचे दारावर 'खुद खुली जन्नती' असे शब्द कोरलेले आहेत. त्यांचा अर्थ 'दरवाजा उघड व स्वर्गात जा.' या अवतरणाची विशेष गोष्ट म्हणजे त्या अक्षरांवरून ११०८ हा हिजरी सन तयार होतो. त्याची बेरीज १ + ४ + ६०० + ३० + १० + ३ + ५० + ४०० + १० = ११०८.

मधल्या चौकोनी दालनात तीन मोठ्या कबरी आहेत व पश्चिमेकडच्या बाजूस थोडी झिजलेली एक आतल्या कबरींपेक्षा लहान कबर आहे. ही बाहेरची कब्र हीच खरी मातबरखानाच्या पत्नीची कबर आहे. आतील कबरी या खऱ्या कबरी नसून तीन भुयारांवरची तोंडे गुप्त ठेवण्यासाठी सुटया–सरकत्या खोटया कबरी आहेत. या तीनही कबरींखाली चांगली दगडांनी बांधून काढलेली भुयारे आहेत. तीनही भुयारे खोल असून दोन माणसे एका वेळी नीट उभी राहून जाऊ शकतील अशी आहेत. आम्ही स्वत: आत उतरून जाऊन पाहण्याचा प्रयत्न

केला. सुमारे फूटभर चालून गेल्यावर ती भुयारे दिशा बदलतात. पुढे जाणे धोक्याचे वाटल्यावरून गेलो नाही. परंतु योग्य तयारीने जाऊन ती कोठे उघडतात ते पाहिले पाहिजे. पूर्वी त्या भुयारात उतरून जाऊन पाहिलेली दोन माणसे आम्हांस भेटली. ती आता वृद्ध आहेत. त्यांनी सांगितले की " पूर्वी आम्ही रात्री वगैरे त्या ठिकाणी झोपायला जात असू. तेथे कधी कधी काही चोरटे येत असत. त्यांच्या हालचाली-वरून आम्हास या भुयारांची माहिती झाली. पुढे त्या चोरट्यांना पोलिसांनी पकडले; परंतु त्यांचेजवळ माल मिळाला नाही. काही जवळच्या एका विहिरीत टाकला होता तो पोलिसांनी शोधून काढला. परंतु काही मिळाला नाही. तेव्हा आम्हांस वाटले तो त्यांनी त्या भुयारात लपवला असेल व भुयारही बघण्याचे कुतुहल जागे होऊन आम्ही धाडसाने त्या कबरी सरकवून खाली उतरून गेलो होतो. पुढे भुयारी रस्ते वळतात हे खरे आहे. परंतु ती तीनही भुयारे निरनिराळ्या दिशांना नेणारे रस्ते आहेत असे आम्हांस आढळले. तरी पंचवीसतीस पावले जाऊन आम्ही मागे फिरलो. कोठे बाहेर पडतात ते पाहिलेले नाही. "

दरवाजावर लिहिलेल्या ' दार उघड व स्वर्गात जा ' ' खुद खुली जन्नती ' या शब्दांचा व या भुयारांचा काही संबंध असावा असे वाटते.

मातबरखानानंतर मुकबरा त्याचा नातू सुभेदार होता त्याचे वंशजांचे ताब्यात होता. तो आता कोर्लेसो नावाचे ख्रिश्चन गृहस्थास विकला गेला आहे. मुकबऱ्यासमोर एक दगडी पाण्याचे कारंजे केलेले दिसते. सध्या फक्त हौदच आहे.

मुकबऱ्याच्या पुढे बगीचा होता. बगीच्याचे भव्य प्रवेशद्वार आज बऱ्या स्थितीत आहे. त्याची कमान भव्य आहे. थोडी पडझड झाली आहे.

काळी मशीद :—काळ्या तलावाचे दक्षिणेला काळ्या दगडांनी बांधलेली एक मोठी मशीद असून ती आजही सुस्थितीत राखण्यात आलेली आहे. या मशिदी-वर मोठा घुमट असून चार बाजूला चार मिनारही आहेत. या मशिदीत १७८० साली ब्रिटिश सैन्याची पलटण उतरली होती व बाहेरील बागेत त्यांनी जुजबी शेडस् बांधून दारूगोळ्याचा कारखाना चालू केला होता. ही मशीद हिजरी सन १०५४ म्हणजे इ स. १६४३ साली विजापूरच्या युसुफ आदिलशहाचे काळात त्याच्या सय्यद नावाच्या एका सरदाराने बांधली. हा हिजरी सन सांगितला त्यालाही अर्थ असून तो म्हणजे ' The result of the liberality of Syed ' असा आहे. हे गॅझेटिअरमध्ये दिले आहे.

Scanned with Car



काळी मशीद, कल्याण

सरकारवाडा—हा वाडा आजही याच नावाने पिंपळाचे पाराजवळ प्रसिद्ध ठिकाण आहे. परंतु आज त्या ठिकाणी वाडा नाही. ब्रिटिशांनी तो पाडून टाकला आहे. फक्त पूर्वाभिमुखी श्री. मेघ:शाम यांचे घराला लागून असलेली एक भिंत उभी आहे. भिंतीच्या प्रशस्तपणावरून व त्यावरील कोनाडे व नक्षी यावरून तो किती भव्य असावा याची कल्पना येते. सध्या त्या ठिकाणी पाण्याची उंच टाकी बांधलेली आहे; तसेच समोर ब्रिटिशांनी आपल्या पोलिस कचेरीकरिता दोन दगडी खोल्या बांधलेल्या आढळतात. हाच तो प्रसिद्ध सरकारवाडा. हा वाडा मुसलमान काळातील निझामशाही किंवा विजापूरच्या आदिलशाही काळातील असावा. निश्चित पुरावा आज उपलब्ध नाही. परंतु निझामशाहीपासून विजापूरची आदिलशाही व त्यापासून छत्रपतींची शिवशाही, त्यानंतर औरंगजेबाची मोंगलशाही व परत स्वराज्यातील पेशवाईपर्यंत सुभे कल्याणच्या राज्यकारभाराचे केंद्र व कचेरी होती.

याच वाड्यात आबाजी सोनदेवाने छत्रपती शिवाजी महाराजांसमोर कल्याण जिंकल्यावर मिळालेली लूट व पकडलेले मोंगल सुभेदाराचे कैदी हजर केले. त्यातच कल्याण सुभेदाराची लावण्यखनी सूनही हजर झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नीतिमत्तेची कसोटी लागली आणि महाराजांचे चारित्र्य उजळून निघाले. हेच पुण्यपावन ठिकाण, ज्या ठिकाणी महाराजांनी 'अशीच आमुची आई

Scanned with Car

सुंदर असती ' हे उद्‌गार काढले. छत्रपतींच्या पवित्र पदस्पर्शाने पावन झालेला हाच तो सरकारवाडा.

छत्रपती शिवाजी महाराजांचा सुभेदार आबाजी सोनदेवाने येथूनच कारभार केला. मातबरखानाची राज्यकारभाराची हीच कचेरी. पेशवाई कालात कल्याणला पुनश्च स्वराज्यात आणणारे सुभेदार रामचंद्र महादेव जोशी (चासकर) यांनी येथूनच कारभार पाहिला; एवढेच नव्हे तर आपला प्रचंड वाडाही जवळच बांधला. आजही तो वाडा अंबाबाईचा वाडा म्हणून प्रसिद्ध आहे; याच वाड्यात वसईच्या धर्मसंग्रामाचे जनक सरदार अणजूरकर नाईक यांनी रामचंद्र महादेवाबरोबर वसईच्या मोहिमेच्या मसलती केल्या व मोहिमेचे प्रस्थान ठेवले.

हिंदुपदपातशाहीच्या सीमा दिल्लीपर्यंत भिडवणाऱ्या समशेरबहाद्दर पहिल्या बाजीरावसाहेबांनी अनेकदा आपला मुक्काम येथे केला. वसईच्या मोहिमेत प्रसिद्धीस येऊन कल्याणची सुभेदारी मिळवणारा, पेशवेकालातील पहिला आरमारी सुभेदार रामाजी महादेव बिवलकर याच्या कारभाराची हीच कल्याण सुभ्याची राजकीय कचेरी. याच वाड्यावर. इ. स. १७८० मध्ये ब्रिटिशांनी आपले निशाण लावले व आपले सैन्य ठेवले; आणि त्यांच्या पांढऱ्या पायांनी अपमानित झालेला वाडा पुढे पेशवाई बुडाल्यावर मराठ्यांची स्फूर्तिस्थाने नष्ट करणाऱ्या इंग्रजांनी पाडून जमीनदोस्त केला.

मुसलमानकाळात व पेशवेकाळात हा वाडा अत्यंत सुंदर असून भोवती बगीचा' आत दिवाणखाने व पुढे प्रवेशद्वाराजवळ नगारखाना व खलबतखाना वगैरे भाग होते. आजही असलेल्या प्रवेशद्वाराला लागून वरच्या मजल्यावर नगारखान्याकडे जाण्याच्या पायऱ्या होत्या. प्रस्तुत लेखक स्वतः त्या पायऱ्यांनी वर चढून त्याच्या भिंतीवर चढलेला आहे.

शीशमहाल—हा वाडा दूधनाक्यावर दिवाणबावडीच्या समोरील जागेत हल्लीचे डॉ. सु. य. फडके (परांजपे वकिलांचे घर) यांचे घरामागे होता. मातबरखानाने स्वतःला राहण्यासाठी एक सुंदर इमारत बांधली. पुढे सुंदर बगीचा व कारंजे केले व कालव्याचे पाणी खेळवले असे वर्णन आहे तो हाच असावा. कारण ही जागा सरकारवाडा व किल्ले दुर्गाडी या दोहोंच्या मध्यावर असून जवळूनच राममारुती समाधीजवळून शहराच्या खंदकाचा भाग आहे व भटाळे तळे आहे. त्यामुळे पाणी खेळवणे शक्य झाले असावे. समोरच दिवाणबावडी नावाची विहीर आहे. त्यालाही हे नाव पडण्याचे कारण हेंच असावे.

Scanned with Car

सुभेदारवाडा-हा रामाजी महादेव बिवलकरांनी १७७० साली कल्याण येथे नवा बांधला. पूर्वी ते ठाणे मुक्कामी राहात असत. तेथील वाडा हल्ली जिल्हा कोर्टी-करिता वापरला जातो व त्याच आवारात मागे हल्ली ठाणे जिल्हा बोर्डाची इमारत उभी झाली आहे. कल्याणचा वाडा बांधून रामाजी महादेव बिवलकर सुभेदार कल्याण येथे राहू लागले व याच वाड्यात मृत्यू पावले. पुढे त्यांचे वंशजांनी कल्याण येथूनच पेशवाईअखेरपर्यंत कारभार चालवला. कल्याणचा हा वाडा मोठा प्रशस्त



कल्याण सुभेदार रामाजी महादेव बिवलकर यांचा कल्याण येथील नवा वाडा.

असून पुढील बाजूला अंबारीसकट हत्ती जाऊ शकेल एवढा प्रचंड दरवाजा आहे. वाडा दुमजली आहे. दिंडी–दरवाजावर पुण्याच्या शनवारवाड्याच्या पद्धतीचा गणेश महाल आहे. त्याचे लाकूडकाम, छत, महिरपी वगैरे पाहण्यासारख्या आहेत. आत दोन्ही बाजूला दोन मोठ्या पडव्या असून मध्ये चौक आहे. समोर मध्यभागी मोठी ओटी असून त्यावरही दिवाणखाने आहेत. बाजूच्या पडव्यांवरही दिवाणखाने आहेत. मधल्या पडवीच्या दोन्ही अंगांना दोन खोल्या आहेत. एका बाजूला छोटी खोली व

Scanned with Car

उजव्या बाजूला देवघर आहे. देवघरामागे स्वयंपाकघर आहे. ओटीच्या मागे सुमारे शंभर माणसे जेवू शकतील एवढे मोठे माजघर आहे. माजघरामागे पुन्हा मोठी पडवी आहे. पडवीच्या दोन्ही अंगांना व मागील चौकाचे दोन्ही अंगांना खोल्या आहेत. त्या खोल्या, कोठी, नोकर वगैरेकरिता, सर्पण वगैरेसाठी असाव्यात. माजघरावर तसा एक विस्तृत दिवाणखाना आहे. मागील पडवीवर खोल्या आहेत. पुढील ओटी व माजघर यांच्या भिंतीत वर जाण्यासाठी जिना आहे. तसेच माजघर व मागील ओटी यांच्यामधील भिंतीत वरील खोल्यांत जाण्यासाठी जिना आहे. वाडयाच्या पुढल्या दिंडीप्रमाणे मागील अंगणासमोरही एक दिंडी आहे. वाडयाच्या उजव्या बाजूला एक पटांगण असून तेथे पूर्वी बगीचा होता. तसेच मागील दिंडीच्या बाहेर एक मोठी विहीर आहे व सभोवती मोठे पटांगण आहे. पटांगणाचे डावे अंगास पुढीलप्रमाणेच एक मोठे प्रवेशद्वार आहे. त्या दरवाजाचे बाहेर साठे वाडयाची दिंडी लागते. हा रस्ता सरळ आगलावे गल्लीत जातो.

या प्रशस्त वाडयाने इ. स. १७७० ते इ. स. १८१५ म्हणजे सुमारे ४५ वर्षांचा पेशवाईतील स्वराज्याचा कालखंड व नंतर ब्रिटिश काळातला १३२ वर्षांचा इतिहास व नंतर पुन्हा स्वराज्यातला २८ वर्षाचा कालपट पाहिला आहे. एकूण हा वाडा गेल्या २०५ वर्षांच्या इतिहासाचा साक्षी आहे. या वाडयांत हत्ती झुलले आहेत. मोठमोठया मराठी मुत्सद्द्यांच्या मसलती झाल्या आहेत. सवाई माधवराव पेशव्यांच्या वैभवाच्या काळात या वाडयासमोरील हजारो घोडेस्वारांच्या पलटणींनी मानाच्या सलाम्या दिल्या आहेत. अनेक प्रेक्षणीय मर्दुमकीचे खेळ या मैदानात झाले आहेत. शेकडो दास, दासी, हुजरे, मुत्सद्दी, ह्यांनी एक वेळ हा वाडा गजबजून गेलेला होता. कित्येक लक्षभोजनांतून असंख्य लोकांना आकंठ जेवून तृप्त झालेले ह्या वाडयाने पाहिलेले आहे. वेदमूर्तींचे गंभीर वेदोघोष ह्या ठिकाणी निनादले आहेत. 'हरहर महादेव' च्या वीरशाली गर्जना ह्या वाडयात दुमदुमल्या आहेत. सनई, चौघडे आणि तुताऱ्या ह्यांच्या लकेरींनी कल्याण किल्ल्याचा आसमंत दुमदुमला आहे. या सर्व वैभवाचा जसा हा साक्षीदार आहे तसाच तो गुलामगिरीतील लोकांच्या चळवळीचेही केंद्र बनलेला आहे. लोकमान्य टिळक, शिवराम महादेव परांजपे प्रभृती विद्वान व राजकारणी नररत्नांचे पाय ह्या वाडयाला लागलेले आहेत. लोकमान्य टिळकांची जनतेने ओढलेल्या रथातून निघालेली मिरवणूकही ह्याच वाडयाने पाहिलेली आहे. लोकमान्यप्रणीत सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात ह्याच वाडयात झाली व आजही परंपरेने तो तेथेच साजरा होतो. महाराष्ट्रातील असंख्य विद्वान, कलाकार ह्यांनी आपली सेवा ह्या उत्सवाच्या निमित्ताने कल्याणकरांच्या चरणी रुजू केली आहे. अजूनही वाडा जसा होता तसाच ताठ उभा आहे. वारस निघून गेले, परंतु वाडा शिक्षणदानाची सेवा करीत आजही तितक्याच ताठपणे उभा आहे. या ठिकाणी गेली ७५ वर्षे जी. ई. सोसायटीची शाळा आहे. ह्या

Scanned with Car

शाळेतून कल्याणचे गेल्या तीन पिढ्यांतले बहुसंख्य नागरिक शिकून गेले आहेत. काही काल या वास्तूच्या छायेत बसून अभ्यास केला आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संस्कारांनी घडवून बाहेर पडलेले आहेत, अजूनही पडत आहेत. या वाड्याची ही सेवा कोणत्याही कल्याणकराला नाकारता तर येणार नाहीच; परंतु उलट त्याचा अभिमानच वाटेल.

या वाड्याला लागून डाव्या हाताला असलेला वाडा सुभेदारांचे दिवाण श्री. दामले ह्यांचा वाडा होता. आज तो गवळी ह्यांचे मालकीचा आहे. त्या ठिकाणी दुकाने व इतर इमारती आहेत. उजवे बाजूला सुभेदारांचे पुजारी श्री. मेहेंदळे यांचा वाडा आहे. आज त्याचेही स्वरूप बदलेले आहे. तसेच त्याचे बाजूला कल्याण सुभेदारांचे कल्याण विभागाचे दिवाण श्री.धोंडो बल्लाळ वैद्य होते त्यांचाही वाडा होता. तो निश्चित कोणता ते सांगता येत नाही. बहुधा हल्लीचा साठे वाडा असावा. रामाजी महादेवाचे तिसरे पिढीतील वंशजांनी काही काल आपली सुभेदारी घालवली होती; ती अंबरनाथ तर्फेचे हवालदार श्री. कार्लेकर ह्यांजकडे आली होती. बहुधा हेच शेवटचे सुभेदार असावेत. ह्यांचा वाडा आजही दूध नाक्यावर आहे. सध्या तो बदलापूरचे आपटे ह्यांचे मालकीचा आहे.

काळेवाडा व घराणे-गांधी चौकात सुभेदार वाड्यासमोर पोखरणीला लागून हा प्रचंड वाडा आहे. हा अतिशय मोठा असून लांबट आहे. या घराण्याचे आणखी दोन वाडे कल्याणमध्ये आहेत. एक गावदेवीजवळ व दुसरा सिद्धेश्वर आळीत सिद्धेश्वराचे देवळामागे आहे. ह्यापैकी गावदेवीजवळचा सर्वात जुना आहे असे वाटते. हे घराणे पेशवे कालापासून प्रसिद्धीस आले. ह्यांचा व्यवसाय फत्तेमारीचा होता. म्हणजे सागरी वाहतूक व चाचेगिरी. रामाजी महादेवाने सागरी सामर्थ्याची जी नवी वाढ केली व काही माणसे निर्माण केली, त्यातील हे एक होत. ह्यांनी पुढे मिळवलेल्या द्रव्यावर सावकारी व शेती हा व्यवसाय केला व आपली इस्टेट वाढवली.

फडणीस वाडा व घराणे-हेही पेशवेकालीन घराणे आहे. हे मूळचे पडघ्याचे. कल्याणास वस्ती रामाजी महादेवाचे काळी झाली. कल्याणची फडणिशी ह्यांजकडे होती असे समजते. तसेच शिवाजी चौकातील प्रसिद्ध हनुमान मंदिर ह्यांचेच असे सांगितले जाते. परंतु पेशवे दप्तर को. जमाव विभाग रुमाल नं. ५५० मध्ये अशी नोंद आहे-" खाजगत रोजखर्डा. श्री गणपतराव बल्लाळ सुभेदार प्रां. कल्याण भिवंडी, माहे साबान सन सबा असर मयातेन अलफ (म्हणजे इ. स. १८१६) देवस्थानप्रीत्यर्थ खर्च श्री. सुंदरभट पाटे ह्यास कल्याणचे शंकरास व हनुमानास नेमणूक." कल्याणमध्ये मारुती व शंकराचे लिंग एकत्र असलेले शिवाजी चौकातील मंदिरच आहे. एवढेच नव्हे तर मारुती व शंकर ह्यांच्या मूर्ती एकत्र कुठेही

आढळत नाहीत. त्या फक्त येथेच आहेत. हे पाटे म्हणजे दत्तआळीतील वेदमूर्ती वझे वाड्याशेजारील पाटे वाड्याचे मालक व एक काळचे देवीचे देवळासमोरील प्रख्यात किराणा दुकानदार ह्यांचेच घराणे होय.

ढवळे घराणे :– या घराण्यास ऐतिहासिक महत्त्व सन १७८० मध्ये मिळाले. या घराण्यातील एक पुरुष अंताजी नारायण ढवळे हे, इंग्रजांनी कल्याण जिंकून घेतले तेव्हा नाना फडणिसांनी पुण्याहून बाजीपंताचे हाताखाली इंग्रजांवर हल्ला करण्यासाठी जी फौज पाठवली होती, त्या फौजेत होते. कल्याण इंग्रजांकडून परत मिळवण्याच्या प्रयत्नात जे मराठी सैन्य कामास आले त्यात अंताजी नारायण ढवळे ही व्यक्ती प्रमुख होती. कल्याणच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ ह्यांनी देह ठेवला. ही लढाई बहुधा मुरबाड रोडवरील हल्ली मुरारशेठची बाग म्हणून ओळखली जाते, त्या भागात झाली असावी. स्वामीकार्यासाठी देह ठेवला म्हणून पेशवे सरकारने त्यांचे वंशजास घोटसई येथील जमीन इनाम दिली. ह्यासंबंधी त्यांचे घराण्याकडून हकीगत कळते की 'पेशव्यांनी त्यांचे वंशजास काय भले करूं' असे विचारले असता त्यांनी सांगितले 'चतकोर भाकरी मिळावी.' पेशव्यांनी संतुष्ट होऊन त्यांना ३४।।। बिघे ३। पांड जमीन १५० रु. आकाराची घोटसई तर्फ बाऱ्हे प्रांत कल्याण भिवंडी येथे इनाम दिली. परंतु हे इनाम लवकर मिळाले नाही. तेव्हा त्यांचे वंशजांनी परत पेशवे सरकारकडे अर्ज केला; तेव्हा इनाम दिल्यापासून जी वर्षे गेली त्याचे ३०० रु. प्रतिवर्षांचे रोख देवविले व इनामपत्राप्रमाणे जमीन ताब्यात देण्याची ताकीद दिली.

इनामाची सनद.

श्री

राजा शाहू नरपति हर्षनिधान

माधवराव नारायण पंतप्रधान

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर, विश्वासनिधी राजमान्य राजश्री माधवराव पंडित पंतप्रधान मोकादम मौजे घोटसई त/ बाऱ्हे प्रांत कल्याण भिवंडी सम्मान तिसा समानीन मया व अलक शके १७१० कीलक नाम संवत्सरे राजश्री बाबाजी अनंत इ।। नारो जनार्दन व गोपाळ नारायण उपनाम ढवळे गोत्र वाशिष्ठ सूत्र आश्वलायन, यांचे वडील अंताजी नारायण यानी स्वामीसेवा बहुत दिवस केली आणि सन इहिदे समानीनांत (१७८० इ. स.) इंग्रजांचे लढाईत सरकार कामास आले. यास्तव याजवरी कृपाळू होऊन यास कुटुंबाचे योगक्षेमार्थ १५० रु. आकाराची जमीन कल्याण प्रांती यांचे सोईस पडेल त्या गावी नूतन इनाम द्यावयाचा करार करून चतुःसीमापूर्वक नेमून देऊन मोजणी जाबता लेहून हुजूर

पाठवणे. त्याप्रमाणे इनामपत्रे करून दिली जातील म्हणोन राघो बळवंतराव दादाजी, मामलेदार प्रांत कल्याण भिवंडी यास सब्बाँ समानीनांत सनद सादर केली. त्याजवरून त्यांनी मौजे मजकूरपैकी ३४॥। बिघे ३। पांड जमीन १५० रु. आकाराची नेमून देऊन चतुःसीमापूर्वक जाबता लिहून पाठविला आहे, तो पाहून त्याप्रमाणे मौजे मजकूर पैकी यादी उभयतांचे नांवे जमीन बिघे ३४॥। पांड ३। आकार १५० रुपये.

येणेप्रमाणे ३४॥। बिघे ३। पांड जमीन सदरहू चतुःसीमापूर्वक स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फा देखिल सरदेशमुखी, कुळबाबकानू, हल्ली पट्टी, व पेस्तरपट्टी खेरीज हक्कदार करून इनाम तिजाई सुद्धा दरोबास्त, जल, तरु, काष्ट, पाषाण निधी, निक्षेप सहित करार करून दिली असे. तरी पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालविणे. छ. रमजान. लेखनसीमा.

सदरहू सनद १७८८ मध्ये दिली; परंतु १७८६ मध्येच सवाई माधवरावांनी इनाम देण्याची आज्ञा केली होती. परंतु बहुधा नजर वगैरे न दिल्यामुळे मिळाले नसावे. म्हणून वंशजांनी पुन्हा अर्ज केला म्हणून बळवंतराव दादाजीस, मामलेदार प्रांत कल्याण, ह्यास पुढील ताकीद पत्र दिले–" राजमान्य रा. बळवंतराव दादाजी कारभार प्रांत, कल्याण भिवंडी, अंताजी नारायण ढवळे हे सन इहिदे समानीतांत इंग्रजांचे लढाईत कामास आले. त्यांचे पुत्र बाबाजी अनंत ह्यास १५० रु. आकाराची जमीन नूतन इनाम कल्याण प्रांती त्यांचे सोईस पडेल तेथे नेमून देण्याचा करार झाला. परंतु सनद झाली नाही. तरी ते करून जाबता पाठवणे. सालगुदस्त व सालगुजर ३०० रु. चा ऐवज द्यावयाची नेमणूक केली आहे. सदरहू रुपये जमिनीबाबत पावते करणे." (राजवाडे खंड १०, पत्रक क्र. २९४)

बाळ घराणे–ह्यांचा वाडा म्हणजे हल्लीचे सबनीस वकील व शेजारचा केळकर ह्यांचा संयुक्त वाडा. हे घराणे सुभेदार रामाजी महादेव बिवलकर ह्यांचे नातेवाईक होते. कल्याण सुभेदार रामराव अनंत ह्यांची बहीण या घराण्यात दिली होती. त्यांच्या मुलासाठी खेळणी वगैरेसाठी रक्कम खर्ची पडलेली सुभेदारांच्या जमाखर्चाच्या वहीत आहे. हे अतिश्रीमंत सावकार होते. म्हणून त्यांना नवलाखे बाळ म्हणत असत. ह्यांच्या वाड्याजवळच कोटाचा गणेश दरवाजा होता.

तरे घराणे–ह्या घराण्याचे मूळ आडनाव जोशी. परंतु कल्याणपासून दोन मैलावरील गांधारी येथील उल्हास नदीवरील तरीचे काम करीत (तर म्हणजे होडीने वाहतूक) म्हणून त्यांना हे नाव पडले. ह्यांचा वाडा कल्याणचे पहिले सुभेदार रामचंद्र महादेव जोशी चासकर ह्यांच्या अंबाबाई वाड्याजवळ आहे.

मालगुंडकर घराणे–हे घराणे पेशवेकाळापासून प्रसिद्ध आहे. हे ज्योतिषी घराणे होते. ह्याना नानासाहेब पेशव्यांनी योगक्षेमाकरिता इनाम दिलेले होते.

Scanned with Car

पेशव्यांना व आंग्रे ह्यांना आरमारी लढायांबद्दल बरोबर ज्योतिष सांगितले होते. त्यामुळे दोघांनीही त्यांची चांगली संभावना केली होती. थोरले माधवराव पेशवे ह्यांचा या घराण्यावर बराच लोभ होता. माधवराव पेशव्यांकडून ह्यांना संक्रांतीचा तिळगूळ प्रतिवर्षी येत असे व हे आशीर्वाद पाठवीत असत. या लोभामुळे थोरले माधवराव पेशवे ह्यांचे मृत्यूनंतर त्यांचे श्राद्ध प्रतिवर्षी करण्याची या कुटुंबाची प्रथा होती. अगदी अलीकडे यांचे वंशज पुरुष श्री. भाऊसाहेब मालगुंडकर यांना माधवराव पेशवे यांचे श्राद्ध करताना पाहिले असल्याचा दाखला येथील भिक्षुक मंडळी देतात. अगदी सत्पात्र विद्वान् ब्राह्मणास त्याचा क्षण व भूयसीही मोठचा-प्रमाणे देत असत. हे भाऊसाहेब अत्यंत दिलदार व चैनी असत. रुप्याच्या घंगाळातील पाण्यात अत्तर टाकल्याशिवाय त्यांचे स्नान होत नसे. तसेच हे भोळेही होते. सोन्याला ठेवून ठेवून कीड लागेल असे एका सोनार मित्राने सांगताच हे सोने उन्हात वाळत ठेवू लागले. अर्थात याचा परिणाम काय झाला असेल ते सांगणे नकोच. यांचे शहरात तीन वाडे होते. एक मुरलीधर मंदिरासमोर गोरे वकिलांचा म्हणून हल्ली प्रसिद्ध आहे. दुसरा हमाल आळीत जो मोठा जुनाट वाडा आहे तो प्रमुख होय. त्या वाड्याचे प्रमुख वैशिष्टच म्हणजे त्याचा धारणेचा खांब हा २॥ फूट घेराचा असून सुमारे ३० ते ४० फूट उंचीचा पायापासून अखंड आहे. त्याला दगडी उथळा नाहीं. इतर खांब अर्थातच चौकोनी आहेत. परंतु या खांबाला रंधा किंवा गोलची वगैरे संस्कार केलेले नाहीत. या वाड्याजवळ अश्वशाळा, गजशाळा होत्या व त्या गल्लीलाही पागे गल्ली असेच नाव नगरपालिकेत नमूद आहे. या घराण्याला नानासाहेब पेशवे यांजकडून मिळालेली सनद पुढीलप्रमाणे.

श्री.

आजम देशमूख व देशपांडे तालुके चोण प्रांत कल्याण यासी
बाळाजी बाजीराव प्रधान सु ॥ अर्ब खमसईन मया व अलफ.

वे. शा. सं राजश्री नारायण जोतिषी बिन गणेश ज्योतिषी मालगुंडकर गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन याणी कसबे पुण्याचे मुक्कामी हुजूर येऊन विनंती केली की आपण कुटुंबवत्सल. योगक्षेम चालत नाही. याकरिता कृपाळू होऊन एक गाव (दूत ?) इनाम दिले. या कुटुंबाचा योगक्षेम चालवून स्नानसंध्यादिक षट्कर्मे आचरोन राजश्री स्वामीस व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून सुखरूप राहो म्हणून त्याजवरून मनास आणिता हे थोर ब्राह्मण कुटुंबवत्सल, सत्पात्र. यांचे चालविल्यास राज्यास श्रेयस्कर जाणून, संतुष्ट होऊन मौजे मुळगांव ता. मजकूर नूतन इनाम कुळबाब व कुळकानू स्वराज्य व मोंगलाई; हालीपट्टी, व पेस्तरपट्टी देखील इनाम तिजाई, जल तरु पाषाण निधि निक्षेप आदिकरून खेरीज हक्कदार व इनामदार इनाम दिला असे. तरी यांसी व यांचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने मौजे

मजकूर इनाम चालविणे. प्रतिवर्ष नवीन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची प्रति लिहून घेऊन हे पत्र भोगवटचास वेदमूर्ती जवळ परतोन देणे. जाणिजे. छ. २९ जिल्काद. आज्ञा प्रमाण.

वेदमूर्ती वझे घराणे–हे घराणे व्युत्पन्न ब्राह्मण वेदमूर्तींचे आहे. यांचा वाडा दत्त आळी महालक्ष्मीचे मंदिरासमोर आहे. हे पेशवे कालापासून विद्वान म्हणून प्रसिद्ध असून या घराण्यातील वेदशास्त्रसंपन्न अग्निहोत्री हरभट वझे यांना योगक्षेमाकरिता थोरले बाजीरावसाहेब पेशवे प्रथम इनाम इ. स. १७३८ मध्ये दिले. नंतर श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे कारकीर्दीत वेदमूर्तींचे मृत्यूनंतर त्यांचे बंधू वेदोनारायण श्री. प्रभाकर भट वझे यांना व त्यांचे नंतर वेदमूर्ती हरभट वझे यांचे चिरंजीव श्री. वेदमूर्ती सदाशिव भट वझे यांना सन १७५८ मध्ये नूतन इनामपत्र करून वंशपरंपरेने दिले.

श्री

चि. रा. रा. बाळाजी बाजीराव यास बाजीराव बल्लाळ प्रधान, आशीर्वाद, उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे. विशेष वेदमूर्ती रा. हरभट वझे अग्निहोत्री यास धर्मादाय वर्षासन प्रांत कल्याण भिवंडी पैकी रु ३५ पेशजीपैकी + ६५ रु. जास्ती सालमजकूरपासून एकूण १०० रु. दिले आहेत. तरी प्रांत मजकूरचे ऐवजी दरसाल पावीत जाणे. नूतन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची नक्कल करून घेऊन अस्सल पत्र वेदमूर्तींजवळ परतून देणे. रवाना छ. १३ रविबिलाखर सुहुरसन समान सलासिन मया अलफ. बहुत काय लिहीणे. हे आशीर्वाद. लेखनसीमा शके १६६० (इ. स. १७३८)

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री सदाशिव भट वझे. स्वामीचे सेवेसी सेवक रामचंद्र कृष्णराव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असले पाहिजे. विशेष तुम्ही थोर विद्यावान ब्राह्मण. तुमचा योगक्षेम चालविला पाहिजे याजकरिता मौजे देवघर परगणा पाऊलबारे प्रांत कोळवण हा गाव तुम्हास मोकासा कुळबाब कुळकानू केशजी तुमचे तीर्थरूपास दिला होता. तदोत्तर ते मृत्यू पावले. उपरांतिक प्रभाकर भट वझे यांचे नावे सनद दिली होती. त्यास ते साल गुदस्त मृत्यू पावले. आपण तासेच्या मुक्कामी येऊन विनंती केली की आपले नावे सनद करून द्या. यावरून तुम्हास ही सनद दिली असे. मौजे मजकुरचा उपभोग करून स्नानसंध्या करून सुखरूप राहणे. मिती माघ वद्य ९ शके १६८० बहुधान्य नाम संवत्सरे छ २२ भौमवार सुहूर सन तिसा खमसेन मया व अलफ. बहुत काय लिहीणे. (सन १७५८)

श्रीमंत बोरगांवकर घराणेः– हे घराणे मूळचे मौजे बोरगाव तालुका हवेली, सुभे दाभोळ येथील विद्वान् वेदोनारायण व ज्योतिषी घराणे. ह्यांचे मूळ पुरुष वेदोनारायण रामज्योतिषी बिन बाळ ज्योतिषी बोरगांवकर हे छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज ह्यांचे काळापासून विद्वान् म्हणून प्रसिद्ध होते. शके १६१८ वैशाख शुद्ध १२ सन १६९६ मध्ये त्यांना मिळालेली पहिली सनद उपलब्ध आहे. त्या वेळचे राजारामाचे पंतसचिव ह्यांनी राजश्री हवालदार व कारकून ह्यांना आज्ञापत्र दिले की " वेदमूर्ती रामज्योतिषी मौजे बोरगाव ता. हवेली सुभा दाभोळ. ब्राह्मण योग्य आहेती. स्नानसंध्या करून महाराज राजश्री स्वामीस आशीर्वाद देताती. यांचा योगक्षेम चालला पाहिजे. राजगृही राहून अन्न पावोन स्नानसंध्या करोन सुखरूप राहिले. राजश्री स्वामीस आशीर्वाद देतील. येणेकरून राज्याचे कल्याण आहे, हे जाणोन वेदमूर्तीस मौजे तोरणे ता मा। नूतन इनाम दिले. कुलबाब कुलकानू निधिनिक्षेप जळतरू पाषाणसहित पडिले पान खा। हकदार, इनामदार करून दिल्हा आहे. तरी मौजे मजकूर ज्योतिषी यांचे स्वाधीन करून यास व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालविणे म्हणून आज्ञेवरून वेदमूर्तीस नूतन इनाम मौजे तोरणे मजकूर कुलबाब कुलकानू निधिनिक्षेप जलतरू पाषाण पडले वान खेरीज हकदार इनामदार करून दिल्हा आहे. तरी मौजे मा / वेदमूर्ती ज्योतिषी यांचे दुमाला करून यांस त्यांचे वंशपरंपरेने इनाम चालवित जाणे. प्रतिवर्षी नूतन पत्राची अपेक्षा न करणे. प्रति लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवटचा-निमित्य ज्योतिषी याजजवळ परतोन देणे. रा। छ १० शौवाल मोर्तब खुद. (श्रीदामोदरात्मज नारायणस्यैषा मुद्रा)

त्यानंतर राजाराम महाराजांचे काळात मोंगलांची धामधूम उडाली. परंतु त्यापूर्वीच वरील इनामानंतर वर्षानेच सदरहू धर्मादायाची मोईन धामधुमीमुळे नित्य पावत नाही. सबब ती दूर करून अन्य अन्य ठिकाणी नूतन इनाम द्यावे अशी सातारा येथे जाऊन वेदमूर्ती श्री राम जोशी बिन बल्लाळ जोशी मौजे बोरगांव ह्यांनी विनंती केली; तेव्हा राजाराम महाराजांनी कृपाळू होऊन पहिले इनाम दूर करून नूतन इनाम दाभोळ सुभ्यामध्ये ता. हवेली मौजे चिवेली १५० लारी धान्याची, मौजे बोरगांव ता. हवेली येथे १५० लारी धान्याची व मौजे चिचघर, ता. हवेली येथे ६८। लारी धान्याची पडिक भात जमीन लागवडीस इनाम दिली. नंतर शाहू महाराजांचे कारकीर्दीत थोरले बाजीराव पेशवे असताना पुन्हा वेदमूर्ती पुन्हा साताऱ्यास गेले व मौजे तोरणा गाव आपणास पूर्वी इनाम होता; परंतु आपण महायात्रेस गेल्यामुळे त्याचा भोगवटा राहिला आहे. तरी पूर्ववत इनाम चालवले पाहिजे अशी विनंती केली. राजर्शी शाहू महाराज व पेशवे ह्यांना पूर्वी ही जमीन बदलून दुसरी त्याबदली घेतली आहे हे माहीत नव्हते. म्हणून दयाळू होऊन व पूर्वीची सनद पाहून पुन्हा तोरणे गांव इनाम करून दिले.

Scanned with Car

राजवट व कारभारी बदलल्यामुळे वेदमूर्तींनी फायदा करून घेतला व तोरणाही परत मिळवले.

राजाराम महाराजांचे कारकीर्दीत राम जोशी ह्यांनी कल्याण सुभा सेखोजी आंग्रे ह्यांचे ताब्यात असता येथील मौजे बारावे तर्फ अंबरनाथ प्रांत कल्याण येथील ६ बिघे व मौजे गोवेली तर्फ बाऱ्हेटो बोले प्रांत कल्याण येथील ५ बिघे एकूण ११ बिघे जमीन कै. सेखोजी आंग्रे ह्यांजकडून इनाम मिळवली होती. ती त्यांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव गोविंद जोशी बिन रामजोशी बोरगांवकर ह्यांनी इ. स. १७५३ मध्ये नानासाहेब पेशवे असताना सेखोजी आंग्रे ह्यांचे राजवटीतील सनद सरकार बदलले म्हणून बदलून घेतली. तसेच इ. स. १७६० मध्ये नानासाहेबांकडून मौजे गंधारी निम्मे गाव मौजे गोविली गाव आपणास जिवधन (किल्ला) कर मोंगलाने इनाम दिला होता. आता जिवधनकर मोंगलाचा सरंजाम पेशवे सरकारने जप्त केला तेव्हा मागील भोगवटा पाहून आम्हास सनद बदलून देणे म्हणून अर्ज केला व बदलून घेतली.

अशा तऱ्हेने ह्या वेदमूर्तींनी राजाराम महाराज, शाहू महाराज, सेखोजी आंग्रे, नानासाहेब पेशवे, जिवधनकर, मोंगल ह्यांजकडून विविध मार्गाने जमिनी मिळवल्या; नंतर ते बोरगाव सोडून कल्याण येथे अंधार दरवाजाजवळ वाडा बांधून स्थाईक झाले. ह्या घराण्यातील पुरुषांनी पुढे कल्याण येथे शेती, सावकारी करून फार मोठी इस्टेट मिळवली. कल्याणमध्ये अनेक घरे व मोक्याच्या जागा, जमिनी, जवळ जवळ अर्धा कल्याण गाव त्यांचे मालकीचा करून ठेवला होता. कल्याणमधील सर्वात श्रीमान सावकार म्हणून एकोणीसशे वीसपर्यंत ते ओळखले जात. ह्यांचे घराणे जसे वेदोनारायण म्हणून ओळखले जात असे त्याचप्रमाणे बलदंड म्हणून ओळखले जात असे. त्यासंबंधी कांही आख्यायिका परंपरेने चालत आल्या आहेत, त्या अशा–(१) त्यांचे घराचा धारणेचा मुख्य खांब अंधारवाडीचे त्यांचे जंगलातून त्यांनी स्वतःचे खांद्यावर तीन मैलांवरून वाहून आणला. (२) एकदा भोजनापूर्वी शंकराचे दर्शनास जात असता पिंपळाचे पाराजवळ एका अरब घोडेस्वाराने आडवले. बोरगांवकर सोवळ्यात होते. बाजूने जायला वाट नव्हती. घोडेस्वार दूर होईना. तो म्हणाला, हवे तर बाजूला करून जा. बोरगांवकर रागास आले व घोड्यासकट त्या स्वारास उचलून पारावर ठेवले आणि निघून गेले.

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके ह्यांचे हे मातुल घराणे. शिरढोण येथे शाळा नसल्यामुळे त्यास मामाचे घरी शिक्षणासाठी कल्याण येथे ठेवले होते. कल्याण येथील जुन्या दूधनाक्यावरील जुन्या भाजी मार्केटचे जागी सरकारी शाळा होती. तेथे वासुदेव बळवंत शाळेत जात. या भाच्याकरिता मामांनी खास एक

बोकडाची गाडी करून दिली होती. त्यामध्ये बसून ते गावात व मामांचे शेतावर वगैरे फिरावयास जात. पुढील क्रांतिकारी जीवनाला आवश्यक असे बलदंड शरीर व मन ह्यांची जडण व घडण या घराण्याकडून व कल्याणच्या भूमीत झाली हे कल्याणकरांना विसरता येणार नाही. क्रांतीची बीजे व भूमिका येथे निर्माण झाली.

सुभेदार चासकर जोशी घराणे– हे शिवकालापासून प्रसिद्ध असून ह्यांचे घराण्यातील बरेच पुरुष स्वराज्याच्या कामी झटलेले आहेत. महादेव कृष्ण जोशी ह्यांनी जिंजी मुक्कामी राजाराम महाराज वेढ्यात अडकले असता संताजी घोरपडे व धनाजी जाधव ह्या सरदारांना घेऊन मोगल फौजेवर बाहेरून हल्ला करून राजाराम महाराजांची सुटका केली. तसेच ह्यांचे चिरंजीव रामचंद्र महादेव जोशी ह्यांनी इ. स. १७१९ मध्ये कल्याणवर स्वारी करून मोगलांचा मोड करून कल्याण पुन्हा स्वराज्यात आणले. म्हणून शाहू महाराजांनी त्यांना कल्याणची सुभेदारी सांगितली. ह्यांची भगिनी काशीबाई हिचा विवाह थोरले बाजीराव पेशवे यांजबरोबर शाहू महाराजांच्या मध्यस्थीने झाला. ह्याच घराण्यातील एक कन्या आनंदी गोपाळ या पहिल्या पाश्चात्य विद्याविभूषित डॉक्टर झाल्या. ह्या घराण्याची सविस्तर माहिती अगोदर आलेली आहेच.

रामाजी महादेव बिवलकर घराणे– हे पेशवे काळातील पहिले आरमारी सुभेदार. ह्यांनी जवळ जवळ ३० वर्षे कल्याण सुभ्यावर सुभेदार म्हणून काम केले. स्वतः पराक्रमाने राम्याचा रामाजी महादेव सुभेदार झालेली ही पहिली व्यक्ती. प्याद्याचा फर्जी झालेली ही व्यक्ती. राम्याचा रामशास्त्री झाला तो हाच. सविस्तर माहिती अगोदर आलेली आहेच.

मेघःश्याम घराणे– ह्यांचा वाडा जुन्या सरकार वाड्याला लागूनच आहे. आडनाव जोशी. हेही पेशवे काळापासून प्रसिद्ध आहेत. हे कल्याण सुभेदार चासकर जोशी ह्यांचेच बंधुवर्गापैकी. पेशवे काळात ह्यांनीही बरीच कामगिरी बजावलेली आहे. ह्यांनाही लोनाड गावी इनाम आहे. पुण्याचे प्रख्यात पेशवेकालीन सावकार चिपळूणकर ह्यांचे ह्या घराण्याशी नाते होते.

घोडे घराणे– छत्रपती संभाजी महाराजांच्या वेळेपासून हे ज्योतिषी घराणे आहे. हे मूळचे वाडे घोडे येथील राहणारे म्हणून वाडेघोडेकर. परंतु त्यातले वाडे काळाच्या ओघात गेले व जोशी नावही गेले व राहिले घोडे आडनाव. ह्यांना कल्याण शहर व अंबरनाथ येथील भट व जोशीपणाचा अधिकार हिजरी सन ११०१ (इ. स. १६९०) पासून आहे. औरंगजेब बादशाहाची ह्यांना सनद आहे. परंतु हा हक्क त्यांनी कोणाकडून तरी विकत घेतल्याची त्यात नोंद आहे. अशीच एक सनद त्यांना थोरले बाजीरावसाहेब पेशवे ह्यांजकडूनही मिळालेली आहे.

चौधरी घराणे– हे मुसलमान घराणे शिवाजी महाराजांनी कल्याण शहर घेण्यापूर्वीपासून स्थाईक असून राजकारणात भाग घेत होते. त्यानंतर छत्रपती संभाजीचे काळीही तितकीच महत्त्वाची कामगिरी बजावीत होते. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कल्याण सुभा मोगलांकडे आला, तेव्हा सुभेदार मातबर-खानाचे कारकीर्दीत कल्याण किल्ल्याची किल्लेदारीची व चौधरी हक्काची सनद ह्या घराण्यातील अलीजी नावाचे पुरुषांस मिळाली. हे घराणे ज्या भव्य वाड्यात राहात असे त्यास शीशमहल असे नाव होते व ज्या कोर्टात (दरबारात) बसून न्यायनिवाडा केला जात असे त्यास 'बारादरी' कोट (दरबार) असे म्हणत असत. ह्या दरबारी हॉलला बारा दरवाजे होते म्हणून बारादरी दरबार म्हणत. शिवकालात ह्या घराण्याकडे कोणती कामगिरी होती हे जरी समजण्यासारखे नसले, तरी आबाजी सोनदेवाने कल्याण कबज केल्यावर दुसरे दिवशी छत्रपती महाराज येथे आले असता ज्या दरबारात कल्याणातील लूट व कैदी व सुभेदाराची सून महाराजांपुढे हजर करण्यात आली, तो दरबार म्हणजे बारादरी कोर्ट. ह्या इमारतीचा आज मागमूसही लागत नाही. परंतु त्याची एक भिंत दूधनाक्याजवळ चौधरी मोहोल्ला आहे, तेथे परांजपे वकिलांचे (हल्ली डॉ. फडके) घराचे मागील बाजूचे पटांगणात व भिडे भात गिरणीसमोर असलेली प्रस्तुत लेखकाने स्वतः पाहिली आहे. आज त्या भिंतीवरच व लागूनच चाळ उठवण्यात आली आहे. ह्या वास्तूला शिवाजी महाराजांचा पदस्पर्श झाला आहे, वास्तव्य झाले आहे, एवढेच नव्हे तर त्यांचे जीवनातील अत्यंत महत्त्वाचा प्रसंग ह्या वास्तूत–जागेत–घडला आहे.

चौधरी हक्क–म्हणजे शेकडे २ टक्के प्रमाणे वसुलाच्या उत्पन्नावर मिळणारी रक्कम. ह्या अलीजीचा मुलगा मियाजी व त्याचा मुलगा इब्राहम. या घराण्यात महमूदजी चौधरी ह्या नावाचा एक कर्तबगार पुरुष होऊन गेला. इ. स. १७०७ ते १७१७ पर्यंत ह्यांचे वतन आंग्रे ह्यांनी जप्त केले होते. १७१९ मध्ये रामचंद्र महादेव चासकर जोशी यांनी कल्याण प्रांत स्वराज्यात आणला, त्यावेळी चौधरी घराण्यात भाऊबंदकी सुरू झालेली होती व तो कज्जा श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांजकडे निवडण्यासाठी गेला तेव्हा ते वतन कुतुबुद्दिन व इब्राहम व हसनजी ह्याजकडे कायम करण्यात आले. निवाडापत्र मोडीत असून फार सुंदर हस्ताक्षरात आहे. ह्या निवाडापत्रात शेवटी निवाडा करण्याबद्दल फी पांच हजार रुपये (हरकी) व वतन परत दिलेबद्दल नजराणा दहा हजार रुपये अशा रकमा घेण्यात आल्या आहेत. चौधरी ह्यांचे वतन उत्पन्न त्यावेळी १५००० रु. होते. १८८२ साली इंग्रजांनी ते ताब्यात घेऊन घराण्यास वार्षिक ७००० रु. रोख तनखा मंजूर केला; तो त्यांचे कुटुंबियांत यथाभाग विभागला जात असे. स्वातंत्र्यानंतर तो बंद झाला.

ह्या घराण्यातील एक व्यक्ती जाफर ह्याने श्रीमंत बाजीरावसाहेब यांजकडे अर्ज करून आपले इनाम आपले लेकीचे मुलाचे नाव करून मिळावे म्हणून अर्ज केला. त्या वेळी श्रीमंत बाजीरावसाहेबांनी आपल्या अधिकाऱ्यास जो हुकूम केला त्याची नक्कल चौधरी कुटुंबात सांपडली. ती पुढीलप्रमाणे.

श्री

(वाटोळा शिक्का)

श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान

बाजीराव बल्लाळ पंतप्रधान

छ म।। अजम चौधरी व देसाई व देशकुलकर्णी तालुके कल्याण यासी आज्ञापत्र. समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराव पंडीत पंत प्रधान! मोकदमा किल्ले कल्याण तालुके अंबरनाथ, मामले मुरंजन. सुहरसन खमस सलासीन मया व अलफ. जाफर खुद याणी हुजूर येऊन विदित केले की आपणास कसबे मजकुरी हिरासेत सुदामत इनाम बिघे ८६ सहा चालत आहे. त्यास आपण हल्ली वृद्ध झालो, आपले पोटी अवलाद नाही. याजकरिता साहेब मेहेरबान होऊन आपली अवलाद लेकीचे लेक नातू महंमद हुसेन व अब्बदुल कादर आहेत त्यांच्या नावे सदरहू जमीन इनाम करून दिली पाहिजे. त्यावरून मनास आणून जाफर सुद भला माणूस याजकरिता त्याचे नातू महंमद हुसेन व अब्दुल कादर यांचे नावे सदरहू ६ बिघे जमीन इनाम करार करुन दिले आहेत. त्यास जो भोगवटा चालत आला आहे, त्याप्रमाणे सदरहु जमीन साल दरसाल चालवीत जाणे. प्रतिवर्षी ताज्या सनदेचा उजूर न करणे. या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्य सनद जाफर खुद याजपाशी परतोन देणे जाणिजे छ ८ मोहरम

आज्ञा प्रमाण लेखनसीमा.

याच चौधरी घराण्याचा उल्लेख सन १७६१ मध्ये रामाजी महादेव बिवलकरांनी यांचे वतनाचा वसूल १२ वर्षेपर्यंत करून त्यास दिला नाही, तेव्हा नानासाहेब पेशवे यांजकडे ती तक्रार गेली असता नानासाहेबांनी रामाजी महादेव बिवलकर सुभेदारास जरबेचे पत्र पाठवून हिशोब देण्यास लावला. त्यानंतर त्याच साली रामाजी महादेवाचा भाऊ बाळाजी महादेव याने ते चौधरी वतन खरेदी करून टाकले. तेव्हा त्यांनी पेशवे माधवरावांचे नवीन कारकीर्दीत पेशवे यांना साष्टी मुक्कामी अर्ज करून आपली गुमास्तागिरी व चौधरी वतन बाळाजी महादेवास विकल्याचे कळविले; त्यावरून त्यास मान्यता देऊन बाळाजी महादेवास सनद करून देण्याबाबत माधवराव पेशवे यांनी पुढीलप्रमाणे पत्र लिहिले.

राजमान्य राजश्री नारो केशव हवालदार, प्रांत कर्नाळा, गोसावी यासी सेवक माधवराव बल्लाळ पंतप्रधान नमस्कार सु।। इहिने सितेन मया व अलफ.

Scanned with Car

मशारनिल्हे गुलाम मोहिउद्दीन व गुलामअली चौधरी प्रांत कल्याण भिवंडी यांनी हुजूर साष्टीचे येऊन अर्ज केला की आम्ही आपली गुमास्तगिरी प्रांत मजकूरची आपले स्वसंतोषे राजश्री बालाजी महादेव बिवलकर यासी वतनी वंशपरंपरेने मुकरर करून मशारनिल्हेस आम्ही आपले पत्र दिले आहे. तरी साहेब कृपाळू होऊन येविसी प्रो. मजकूरचे अंमलदारास सरकारची सनद द्यावी म्हणून त्यावरून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी चौधरी मशारनिल्हे यांचे तर्फेचे जमीनदारीचे कामकाज प्रा ो मजकूरचे यांचे हातून घेऊन चौधरीपणाचा हक्क, कदीमा, मुलकी, व जकात देखिल गोलीमाबल शिरिस्ते कदीम मोजीव वसूल घेतील तरी घेऊन देणे. जाणिजे. छ २१ शके १६८३ सन १७६१

लखनसीमा

गोडबोले घराणे

हे घराणे पेशवे कालापासून प्रसिद्ध आहे. १७४९ मध्ये किल्ले दुर्गाडीवर वरदायिनी दुर्गाभवानी मंदिराचा पेशव्यांनी जीर्णोद्धार केला, त्या प्रसंगी श्रीदुर्गामातेची नवीन मूर्ती बसवून प्राणप्रतिष्ठा केली. तेव्हा सुमारे शंभर वेदोमूर्ती त्या समारंभास हजर होते. त्यांपैकी वेदोमूर्ती महादेव भट गोडबोले वास्तव्य कसबे कल्याण यांस श्रीदुर्गामातेची पूजाअर्चा वगैरे करण्याकरिता नेमणूक केली व वर्षासन नेमून दिले. तेथपासून हे घराणे येथे आहे. महादेव भट गोडबोले यांचे वंशज म्हणजे प्रस्तुत लेखकाचे पूर्वज. या घराण्यातील वेदोमूर्ती दिवाकर भट गोडबोले यांना नवीन घर बांधण्यास सरकती लाकडे आणून देण्यास व काहीही जकात मूल्य न घेण्यास आदेश देणारे पत्र नानासाहेब पेशवे रोजनिशीत प्रसिद्ध झालेले आहे.

पत्र क्र. ४०४. सन १७६०–१७६१ इहिदे सितेन मया व अलफ रविविलावल १४.

'वेदमूर्ती रा. दिवाकरभट गोडबोले यांणी कल्याणास घर बांधावयास लाकडे खरेदी केली आहेत. त्यास सरकारचा शिरस्ता दर शेकडा लाकडे पांच घ्यावयाचा आहे. तो न घ्यावा म्हणोन भटजीनी विनंती केली. त्याजवरून ही सनद तुम्हास सादर केली असे. तरी भटजीपासून शिरस्त्याची लाकडे न घेणे. घरापुरती लाकडे आणू देणे. म्हणोन बाजी शंकर प्रांत कल्याण भिवंडी याचे नावे सनद. १ रसातगी यादी'

या घराण्याचे कोकणातील मूळ गाव राजापूर तालुक्यातील देवाचे गोठणे. हे घराणे इ. स. १७१० नंतर कल्याणास येऊन स्थायिक झाले. इंग्रज राजवटीत प्रस्तुत लेखकाचे पणजोबा यांनी कंत्राटी व्यवसायात प्रवेश केला. ठाणे ते कल्याण रेल्वे लाईन टाकून देण्याचे काम त्यांनी केले आहे. त्या वेळी त्यांनी रेल्वेच्या भुई

डोंगरी पुलाजवळ एक घर बांधले होते; गावातील घरात बंधु वगैरे राहात. ते घर आग लागून जळाले, तेव्हा केवळ देवाच्या मूर्तीखेरीज काही वाचविता आले नाही; म्हणून जुने कागदपत्र जळाले. यांनी कंत्राटी व्यवसायात चांगले पैसे मिळवले. कल्याणजवळील आंबीवली वगैरे भागात, तसेच बदलापूर, वसतशेलवली, वगैरे भागात फार मोठी जमीन खरेदी केली होती. त्याचे कागदपत्र व सातवाराचे उतारे आजही आमचे ताब्यात आहेत. फार मोठ्या प्रमाणावर कल्याणमध्ये सावकारी होती. परंतु हल्ली सावकार गोडबोले वाडा म्हणून जो ओळखला जातो (घोडे-खोत आळीत) ते हे घराणे नव्हे. यांचा वाडा माजी नगराध्यक्ष श्री. नारायणराव मराठे यांचे घरासमोर एक दगडी वाडा आहे तो आहे. त्यातील अर्धा मागील भाग केळकरांना विकून टाकला होता. त्यांनी तेथे घर बांधलेले आहे. ते सावकार केळकर म्हणून ओळखले जातात. प्लेग १८९६ सालचा, याचा तडाखा या घराण्यास बसला व बरीच कर्ती माणसे मृत्युमुखी पडली. गेल्या पिढीत स्थावरजंगमाची भाऊबंदकीत वाट लागून आज दोनच बंधूंची कुटुंबे शिल्लक आहेत. प्रस्तुत लेखकाचे वडील कल्याण येथील इंग्रजी शाळेत आयुष्यभर इंग्रजी शिक्षक होते व उत्कृष्ट इंग्रजी शिकविण्याबद्दल त्यांची ख्याती होती. त्यांचे हातून शिकून गेलेली मंडळी आजही त्यांचे नाव आदराने काढतात.

धर्मवीर सरदार अणजूरकर

अणजूर हे ठाणे जिल्ह्यातील एक अगदी छोटे गाव. कल्याणची खाडी व ठाण्याची खाडी यांच्या पोटात शिरलेले हे भिवंडीचे भूशिर. याच अणजूरने एके काळी इतिहास घडविला व त्यामधूनच या परिसराला हा वर्तमानकाळ लाभला. या उपेक्षित गावच्या मानकऱ्यांनीच एके काळी महाराष्ट्राची शान राखली. फिरंगी सत्तेपासून ठाणे जिल्ह्याची व पर्यायाने महाराष्ट्राची मुक्तता केवळ या गावच्या शूर-वीरांमुळे झाली. साष्टी व वसईची दोन असाध्य ठाणी फिरंग्यांकडून जिंकून घेण्यासाठी जे घनघोर रणसंग्राम झाले, त्याचे मूळ उत्पादक या गावचे. गंगाजी नाईक त्यांचे नाव. गंगाजी निर्माण झाला नसता तर गोव्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यावर पोर्तुगिजांचीच सत्ता कदाचित दीर्घकाळ राहिली असती. पण अणजूरचे हे पाच पांडव खांद्याला खांदा लावून अखेरपर्यंत जिद्दीने उभे राहिले. पहिला बाजीराव व चिमाजीअप्पा यांना या लढ्यासाठी त्यांनीच उद्युक्त केले. मसलतीसाठी गाव सोडले, मोहिमेची कर्जे फेडण्यासाठी स्वतःची चीजवस्तु विकली व अखेर वसईच्या अजोड रणधुमाळीत गंगाजीच्या भावाने, मुरारजीने अर्जुनासारखा पराक्रम गाजवून तटावरच देह ठेवला. अपार कष्ट, अतुल स्वार्थत्याग, बेडर पराक्रम यांची ही कथा अणजूरकर नाईकांनी निर्माण केली व वसईच्या मोहिमेचे यशात भव्यता आणली.

ज्या वाड्यात या सिद्धिविनायकाची स्थापना झालेली आहे तो वाडा मूळ फिरंग्यांचा. १५३० च्या सुमारास बांधलेला. अतिशय रुंद भिंती, शत्रूवर बंदुकीने

Scanned with Car

मारा करता येईल असे वरच्या माडीला झरोके, सभोवती तटबंदी व पाठीमागे फिरंगी अंमलदाराच्या स्त्रियांना विहार करता येईल असे पक्के बांधलेले 'मुलगय' तळे, असे वैभव असलेला हा वाडा नाईकांची माडी म्हणून अणजूरच्या भूमीवर आजही उभा आहे.

फिरंग्यांचा जाच वाढू लागल्याची तक्रार संभाजी महाराजांकडे केली, ती गंगाजी नाईकांच्या वडिलाने, निंबाजी नाईकाने. त्याप्रमाणे १६८३ मध्ये 'परशिक' गडी उतरून संभाजीचे पाचशे सैनिक अणजूरच्या किनाऱ्यावर आले. परंतु इकडे राज्य भोसल्याचे विस्कळीत जाले, मग तो मनसुभा अर्धवटच राहिला. निंबाजी नाईक निधन पावले व या संग्रामाची जबाबदारी गंगाजी नाईकावर आली. 'नरदेहिं येऊन व्यर्थ मरू नये, ऐसा पाच भावांचा विचार जाहला' व महाराष्ट्र राजा व महाराष्ट्र धर्म व्हावा हे कार्य आपल्या हाती व्हावे व हे देवाने करावे' असे या पाच पांडवांनी ठरविले व गंगाजी नाईकाने त्यासाठी घराण्याच्या कुलस्वामिनीलाच साकडे घालावयाचे ठरविले. त्यासाठी गंगाजी नाईक पायी मोरगावला निघाले. सात दिवसांनी ते तेथे पोहोचले. २१ दिवस त्यांनी उपोषण केले. गंगाजी व त्याची थट्टा करणारा तेथील पुजारी यांना स्वप्नदृष्टांत झाले व ते दोघे चिंचवडास गेले. मोरया गोसावीचे नातू नारायण देव यांनी आपला वडील मुलगा चिंतामणी देव यांचे हस्ते त्यांना अनुग्रह दिला व आपल्या पूजेतला सिद्धिविनायक गंगाजींना प्रसाद म्हणून दिला. हा प्रसाद व त्या वेळी दिलेली एक तलवार घेऊन गंगाजी नाईक अणजूरला परतले.

चळवळीचे सामर्थ्य नाईक बंधूंच्यात होते व 'भगवंताचे अधिष्ठान' आता त्यांना लाभले होते. सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी म्हणून नातगोत जमले, पण त्यांनी मसलती केल्या फिरंगी सत्तेच्या उच्चाटनाच्या. कल्याणला तेव्हा पेशव्यांनी आपला सुभा स्थापला होता व रामचंद्र महादेव यांची सुभेदार म्हणून नेमणूक झाली होती.

गंगाजी नाईक कल्याणला गेले. फिरंग्यांच्या विरुद्ध मोहीम हाती घेण्याच्या आणाशपथा झाल्या व तुम्ही पराक्रम गाजविलात तर "तुमचे दारि हति झुलविल, तो बाजीराव असा आहे." असे रामचंद्रपंताने सांगून नाईक बंधूंना त्यांनी नवी उमेद दिली. अणजूर अटकेचे भय होते व कल्याणला मुक्काम ठोकून पेशव्यांच्या सुभेदारास प्रश्नाची पोटतिडिक त्यांना दाखवावयाची होती. त्यासाठी नाईक बंधूंनी अणजूर सोडले. 'भरल्या भाणीयावरून उठण्याप्रमाणे हे कर्म निंद्य आहे.' असा पोक्त सल्ला देणारेहि काही गावकरी निघाले. परंतु त्यांचे ध्येय ठरले होते. 'वतनवाड्यांसाठी मी इथं थांबणार नाही.' असे गंगाजीने स्पष्ट सांगितले. अणजूर सोडले तेही कायमचेच.

Scanned with Car

मोहिमेकरिता द्रव्य गोळा करण्याची जबाबदारी गंगाजी नाईकावरच होती. त्यासाठी मरोळची माडी फोडण्याचा बेत त्यांनी केला व सैनिकांसह ते साष्टीत आले. परंतु फिरंग्यांना ही वातमीही लागली व घोडबंदरपासून ठाण्याच्या पाण-बुरुजांपर्यंत तारवांचा वेढा घालून गंगाजीला त्यांनी साष्टीत कोंडले. सहाव्या रात्री त्यांना कुमक आली व गंगाजीपंत निसटले. दोनशे माणसे पकडली गेली. त्यांपैकी तिघांना तर फिरंग्यांनी गोव्यास नेले व अंगांत तेलाची डगली घालून जिवंत जाळले. आता कल्याणला खलबते करून उपयोग नव्हता; म्हणून पांचहि नाईक शाहू राजांकडे साताऱ्यास आले. तिथं खुद्द बाजीराव व चिमाजी आप्पांची त्यांनी भेट घेतली. १७२२ मध्ये झालेल्या या भेटीत वसईच्या मोहिमेचा निर्णय पेशव्यांनी घेतला. पण तो अंमलांत मात्र आणला नाही. इकडे कल्याणचे सुभेदार रामचंद्र महादेव निवर्तले व त्यांच्या जागी नवा सुभेदार आला. पेशवे दक्षिणेच्या मोहिमेत गुंतले आहेत हे पाहून फिरंग्यांनी कल्याणवरच उलट हल्ला केला. कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यावर तुफान लढाई झाली. गंगाजीचे बंधू शिवाजी नाईक व नारा-यणजी नाईक यांनी भीमपराक्रम केला. गंगाजी नाईक लोनाडहून येऊन कल्याणचे कोटावर चढले व कोटाची तोफ त्यांनी दुर्गाडीवर नेऊन फिरंग्यांवर ती डागली. त्या अग्निवर्षावाने फिरंगी पळाले. कल्याण वाचले. तो पराक्रम पाहून सद्‌गदित झालेल्या रामचंद्रपंतांच्या विधवा पत्नीने–जानकीबाईने–आपल्या वेळा व गोट तोडून 'शिपाई बरकंदास' यांना बक्षीस दिले.

पण या प्रकरणाने फिरंग्यांचा काटा काढणे किती आवश्यक आहे याचे महत्त्व बाजीरावाला पटले व त्यांनी एका सरदाराची या मोहिमेसाठी नेमणूक केली. या मदतीने फिरंग्यांचे कांबे हे एक ठाणे घेतले गेले; परंतु साष्टीची मोहीम फसली. कर्ज मात्र गंगाजीच्या डोक्यावर आले. निर्वाणीची विनंती करण्यासाठी अंताजी रघुनाथ या आपल्या प्रमुख जोडीदाराला बरोबर घेऊन तीन नाईक पुण्याला आले. तिथे पेशव्यांच्या दारी धरणेच धरले, तेव्हा स्वतः चिमाजी अप्पा या ऐतिहासिक मोहिमेवर निघाले. गंगाजी नाईकांच्या २० वर्षाच्या तपश्चर्येचे फळ त्यांना तेव्हा लाभल्यासारखे वाटले.

गंगाजी नाईकांच्या नेतृत्वाखाली वसईवर हल्ला व बंधू बुवाजी नाईकाच्या आधिपत्याखाली साष्टीवर चढाई असा बेत झाला. चिमाजीअप्पा बदलापुरास पोहोचले.

तेव्हा बुवाजी नाईक साष्टीत उतरले. तिकडे वसईवर आपला वडील बंधू आजच उतरला असेल व आपल्याकडून दिरंगाई नको म्हणून बुवाजीनेही धडक दिली. जोडीला मुरारजी नाईक व आणखी दोन बंधू होते. एका हस्तकाने ठाणे किल्ल्याच्या बुरुजाजवळच्या पहारेकऱ्यांना अफू पाजून ठेवली होती. नाईक बंधूंनी

Scanned with Car

तितक्याच तडफेने पाणबुरुज घेतला. अल्पावधीत ठाणे शहर ताब्यात आले. तोफांचा आवाज ऐकून चिमाजी अप्पा तिथे आले व ठाण्याच्या खाडीतील खाजणात स्वतःच्या हाताने पेंढा चिखलावर घालून साष्टीत आले. व ठाणे किल्ल्याच्या बुरुजाचे नाव फत्तेबुरुज ठेवले. साष्टी सर झाली व चिमाजी अप्पा वसईकडे वळले. पण एका हल्ल्याने वसई मिळणे शक्य नव्हते. या विजयासाठी प्रदीर्घ काल निकराची झुंज देणे भाग होते. गंगाजी नाईक व त्यांचे बंधू यांच्या पराक्रमाची व सहनशक्तीची कसोटी या लढ्यात लागली. तोफांचा मारा व अग्नि-गोळ्यांचा वर्षाव होत असताना मराठे किल्ल्याच्या तटावर चढले. " इकडील लोकांनी भारती युद्धाप्रमाणे युद्ध केले. यामागे युद्धे बहुत जाली, परंतु ह्या लढाईस जोडाच नाही " असे वर्णन खुद्द चिमाजी अप्पाने ब्रह्मेंद्रस्वामींना लिहिलेल्या पत्रात या दुर्धर रणसंग्रामाचे केले आहे. गंगाजी नाईक व त्यांचे चारही बंधू या लढाईत प्राणपणाने लढले व वसईच्या तटाला खिंडार पाडण्यात यशस्वी झाले. मुरारजी नाईक तिथेच अतुल पराक्रम गाजवीत असताना धारातीर्थी पडला. " शाहू निशाण चढले वसई दुपारी " व गंगाजी नाईकाचे स्वप्न साकार झाले. " तारवे भरोन फिरंगी गोव्यास गेला. मुरारजी नाईकांचे बलिदान व गंगाजी नाईकांचा त्याग इतिहासात अमर झाला. " त्यांचे अधिष्ठान सिद्धिविनायक मात्र एका सुंदर देव्हाऱ्यात व समई लामणदिव्यांच्या प्रकाशात नाईकांच्या माडीत ध्यानस्थ बसले आहे.

□ □ □

: १७ :

कल्याणातील थोर समाजसेवक

' त्राटिका ' नाटककार प्रो. वासुदेवराव केळकर

प्रो. वासुदेवराव केळकर ह्यांचा जन्म १८६० साली झाला. गृहस्थिती बऱ्यापैकी होती. परंतु बालवयातच आईवडील निवर्तल्यामुळे त्यांना कल्याण सोडावे लागले. त्यांचे मामा गोपाळराव फाटक यांचे देखरेखीखाली त्यांचे शिक्षण व संगोपन झाले. इ. स. १८७८ साली धारवाड हायस्कूलमधून ते मॅट्रिक परीक्षा पास झाले. नंतर त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात नाव दाखल केले. तेथे एफ्. ए. च्या परीक्षेत (१८८०) इंग्रजी विषयाचे ह्युलिग प्राइज व बी. ए. च्या परीक्षेत (१८८१) अर्थशास्त्र विषयातील कॉन्डेन मेडल् मिळविले. बी. ए. झाल्यावर वकीलाच्या अभ्यासासाठी काही टर्मस् भरल्या; परंतु त्या सुमारास लोकमान्य टिळकांवर कोल्हापूर प्रकरणी अब्रुनुकसानाची फिर्याद होऊन ते गोपाळराव फाटकांकडे (मामा) सल्लामसलतीसाठी येत असत. त्यांचेबरोबर ओळख होऊन व त्यांनी नुकत्याच सुरू केलेल्या लोकशिक्षणकार्याबद्दल आस्था उत्पन्न होऊन त्यांच्या सहकारी मंडळींत ते सामील झाले. शिक्षणकार्याबरोबरच ' मराठा ' ह्या इंग्रजी वृत्तपत्राचे संपादनाचेही काम अंगावर पडले. ते टिळकआगरकर तुरुंगातून सुटून येईपर्यंत सन १८९१ पर्यंत श्री.वामनराव आपटे ह्यांचे मदतीने संभाळले. शाळेत वासुदेवरावांकडे इंग्रजी व इतिहास हे विषय शिकवण्यास होते. दोन्ही विषय ते सारख्याच सफाईने शिकवीत. इंग्रजी विषय तर त्यांचा हातखंडा होता. आगरकरांना त्यांच्या इंग्रजी विषयाच्या अधिकाराबाबत चांगलीच जाणीव होती. त्यांनी त्राटिका हे नाटक इंग्रजीतून रूपांतरित केले. ते एवढे सरस उतरले आहे की आजपर्यंत समर्थ नट ते रंगभूमीवर गाजवून सोडीत असत; ह्या नाटकामुळे ते लोकात नाटककार म्हणून माहीत झाले; ते मूळचे कल्याणचे रहिवासी होते म्हणून कल्याणकरांना त्यांच्याबद्दल रास्त अभिमान वाटत असे व नवीन पिढ्यांना वाटावा व त्यापासून स्फूर्ती मिळावी.

कै. काशिनाथ नारायण साने

मराठी इतिहास संशोधनाचे भीष्माचार्य काशिनाथ नारायण साने हे मूळचे वसईजवळील पापडी या गावचे रहिवासी; परंतु पुढे कल्याण येथे स्थाईक झाले. त्यांचा जन्म २५ सप्टेंबर १८५१ रोजी झाला. वडील मामलेदार कचेरीत डहाणू येथे नोकरीस होते. त्या वेळी इंग्रजी शिक्षणावर फारसा कटाक्ष नसल्यामुळे बाबा-

साहेबांचे शिक्षण वयाच्या १० वर्षापर्यंत वडिलांचे देखरेखीखाली घरीच झाले. पुढे वसई, कल्याण, तळेघोसाळे येथील सरकारी मराठी शाळांतून शिक्षण होऊन १८६५ चे सुमारास थोरले बंधू उरण येथे महालकरी होते, त्यांचे कचेरीत उमेदवारी करू लागले. परंतु त्यांचे बंधूंनी त्यास इंग्रजी शिकण्यास लावून उरण व कल्याण येथील सरकारी शाळा व नंतर पुण्यास बाबा गोखले यांचे सुप्रसिद्ध शाळेत पुरे करावयास लावले. १८७० मध्ये बाबासाहेब प्रवेशपरीक्षा पास होऊन डेक्कनकॉलेजमध्ये गेले. १८७३मध्ये त्यांनी बी.ए. पदवी मिळवली. रेव्हिन्यू खात्यात नोकरी मिळवण्याचा प्रयत्न करूनही न मिळाल्यामुळे त्यांना शाळाखात्यात शिरावे लागले आणि त्यात डेप्यु. एज्युकॅशनल इन्स्पेक्टर, व्हाइस प्रिन्सिपॉल व नंतर प्रिन्सिपॉल ट्रेनिंग कॉलेज पुणे, हेडमास्तर, पुणे व बेळगाव हायस्कूल इत्यादि अधिकाराच्या जागांवर काम केले. बेळगाव येथे हेडमास्तर असतानाच १९०८ मध्ये त्यांनी पेन्शन घेतले. शिक्षणाधिकारी या नात्याने त्यांची वर्तणूक मोठी चोख, नि:स्पृह व शिस्तीची असे. पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजच्या उत्कर्षास बाबासाहेबच कारणीभूत आहेत. सरकारी नोकर असूनही त्यांची राष्ट्रीय बुद्धि आणि स्वाभिमानी वृत्ती दिसून आल्यामुळेच त्यांना पेन्शन घेणे भाग पडले. त्यांचा न्याय्य हक्क बाजूस सारून सरकारने बढतीची जागा दुसऱ्यास दिल्यामुळे बाबासाहेबांनी नोकरी सोडली. सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर सरकारने त्यांना रावबहादुर ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. सरकारी नोकरीत असताना त्यांची नेमणूक देशी भाषेत क्रमिक पुस्तके तयार करण्याकरिता नेमलेल्या व्हर्नाक्युलर टेक्स्ट बुक कमिटीवर झाली होती. या पुस्तकात असलेले इतिहास व ऐतिहासिक पुरुष यावरील धडे हे त्यांचे स्मारकच होय. परंतु या सर्वांपेक्षाही बाबासाहेबांची योग्यता भाषाशास्त्रज्ञ व इतिहाससंशोधक या नात्याने फार मोठी आहे. 'मराठी इतिहासाच्या व काव्याच्या कामी परिश्रम करणारे एक' अशी नोंद ब्रिटिश म्युझियमचे कॅटलॉगात त्यांच नावापुढे आहे. 'साने ह्यांचे मितभाषी टापटिपीचे व सुविनीत ऐतिहासिक लेख हे खरोखर प्रत्येक इतिहास संशोधकाला अनुकरणीय आहेत' असे उद्गार साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी केसरीत १९१४ साली काढले आहेत. कै. वि. का. राजवाडे प्रभृति इतिहाससंशोधक मंडळी ही बाबासाहेबांचे काव्येतिहास-संग्रहांतील काम आजच्या इतिहास-संशोधकांना मार्गदर्शक व आदर्शभूत असल्याचे कबूल करीत व त्यांचेबद्दलचा आदर भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे या संस्थेचे त्यांना अध्यक्ष निवडून व्यक्त केला. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या स्थापनेचे मुनिचतुष्टय श्री. वि. का. राजवाडे, श्री.रा. ब. काशीनाथ नारायण साने, भारताचार्य चिंतामणराव वैद्य व श्री. दिवेकर मानले जातात. त्यांपैकी राजवाडे यांचेखेरीज बाकी तीन कल्याणचे आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. कल्याणच्या या तीन इतिहास-महर्षींनी स्थापन केलेली भारत इतिहास संशोधन मंडळ ही संस्था आज जगत्मान्य होऊन राजमान्यही झाली

आहे. इतिहास ज्ञानाच्या गंगेचा पवित्र प्रवाह आज जरी सर्व भारतभर पसरला असला, तरी त्याची गंगोत्री पुणे येथे घालण्याचे महत् कार्य ज्या मुनिचतुष्टयाने केले, त्यांपैकी तीन भगीरथ कल्याणचे आहेत, याबद्दल रास्त अभिमान वाटला पाहिजे व त्यांची स्मारकेही आम्ही करावयास पाहिजेत. ते होईल तेव्हा खरे; परंतु त्याची जाणीव म्हणून तरी आम्ही इतिहास संशोधन मंडळ कल्याण येथे १९६८ साली स्थापन करून हा 'सुभे कल्याण' चा इतिहास प्रसिद्ध करून त्यांचे स्मारकाची कोनशिला ठेवली आहे. इमारत बांधण्याचे काम काळावर आहे.

बाबासाहेबांना सरकारी नोकरीत असतानाच जुन्या बखरी जमविण्याचा नाद होता. त्या वेळी मराठ्यांचा उपलब्ध इतिहास काय तो ग्रँट डफ यांचाच. ग्रँट डफ यांना इतिहासाची सर्व साधने अनकुल होती. परंतु ते परकी होते. त्यांना मराठ्यांचा, पराभूतांचा अभिमान कां वाटावा? यामुळे अनेक विपर्यस्त व आमच्या स्वाभिमानास हानिकारक अशी विधाने करण्यात आली आहेत. शिवाजी महाराज लुटारू होते असे लिहिणारा हाच पहिला माणूस, म्हणून ह्याचास फारच शिव्याशाप खावे लागले. या ग्रँट डफच्या इतिहासावर टीकात्मक प्रबंध प्रथम १८६७ झाली नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनी लिहून मराठी इतिहास संशोधनाचा पाया घातला. त्यासच पुढे बाबासाहेबांनी विविधज्ञानविस्तारात आपण जमविलेल्या बखरी छापावयास सुरवात करुन पुढे नेले; परंतु अशा तऱ्हेने बखरी छापणे कालावधीचे ठरणार हे जाणून विष्णूशास्त्री चिपळूणकर ह्यांचे सल्ल्याने काव्येतिहाससंग्रह नावाचे मासिक सुरू केले. काव्य विभागाचे संपादक बाळाजी जनार्दन मोडक व इतिहास विभागाचे श्री. बाबासाहेब साने होते. १८७८ मध्ये हे मासिक सुरू झाले. या तिघांनी समान भांडवल घालून हे मासिक सुरु केले व हळूहळू त्यास उत्कर्ष प्राप्त झाला. परंतु १८८१ साली विष्णूशास्त्री व मोडक यांनी आपली भागीदारी काढून घेतली.यापुढे अनेक अडचणी आल्या तरी बाबासाहेबांनी नेटाने पुढे १० वर्षे मासिक चालवून नंतर बंद केले. या मासिकात २०-२५ बखरी व लेख प्रसिद्ध झाले. चिटणीसकृत शिवाजी, संभाजी व राजाराम बखरी; पेशवे, नागपूरकर भोसले प्रभृती मराठा मंडळातील राजपुरुषांच्या बखरी व कागदपत्रे इत्यादि प्रसिद्ध करून मराठा इतिहासावर नवा प्रकाश पाडण्याचे श्रेय श्री. बाबासाहेब साने यांसच आहे. बाबासाहेबांनी त्यास जोडलेल्या टीपा फार महत्त्वाच्या आहेत. ऐतिहासिक कागदपत्रे व बखरी वाचण्याची गोडी लोकांत उत्पन्न करण्याचे श्रेयही त्यांनाच दिले पाहिजे. रामचंद्रपंत अमात्यांची राजनीती व चिटणीस बखरी ह्यांचे पुनर्मुद्रणही त्यांनीच केले. अशा प्रकारच्या कल्याणभूषण, इतिहास-महर्षींना होळी पौर्णिमेचे दिवशी गुरुवार दिनांक १७ मार्च १९२७ रोजी सकाळीं शिवकवचाचा पाठ ऐकत आरामखुर्चीवर बसले असता, पाठ म्हणणारास मधून मधून दुरुस्ती सांगत असता, देवाज्ञा झाली व भारत इतिहास संशोधन मंडळाचा एक तारा निखळला. कल्याणभूषण व्यक्तींत त्यांचे नाव

आदराने नोंदलेले आहे. त्यांचे जीवनचरित्र कल्याणकरांना व नव्या पिढीला स्फूर्तिदायक ठरावे. आमचे त्यांना विनम्र अभिवादन.

कौस्तुभ-चिंतामणी, सरस्वतीचा कंठमणी

श्री. नानासाहेब वैद्य

कै. चिंतामण विनायक वैद्य ऊर्फ महाभारताचार्य, विद्वद्-कुलशेखर, साहित्य-कौस्तुभ, बृहस्पतितुल्य विद्वान्, इतिहासचिंतामणी, सरस्वतीचा कंठमणी, इत्यादि मराठी भाषेतील असंख्य विशेषणे जरी लावली, तरी यथार्थ वर्णनाला अपुरी पडतील अशा थोर नररत्नाचा जन्म कल्याण येथे १८ ऑक्टोबर १८६१ कोजागिरी, आश्विन शके १७८३ रोजी झाला. मराठी शिक्षण कल्याणच्या सरकारी मराठी शाळेत झाले. इंग्रजी शिक्षण इ. ४ थी पर्यंत कल्याणलाच झाले व इ. ५ वी (नववी) पासून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कूलमध्ये झाले. मॅट्रिक परीक्षेपासून एम्. ए. एल्एल्. बी. पर्यंतच्या सर्व परीक्षांत पहिला वर्ग व पहिला नंबर त्यांनी कधीहि घालवला नाही. बी. ए. ला नानासाहेबांचा संस्कृत विषय होता; परंतु संस्कृतला एम्. ए. ला डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे परीक्षक असत. हे कोणालाच पहिला वर्ग देत नसत. कारण त्याना पहिला वर्ग मिळालेला नव्हता. हे लक्षात घेऊन चिंतामणरावांनी एम्. ए. ला एकदम गणित हा विषय घेऊन पहिला वर्ग टिकवला. ह्यावरूनच त्यांची सर्वगामी बुद्धिमत्ता दिसून येते. भाषा विषय बी. ए. नंतर बदलून एम्. ए. ला गणित विषय एकदम घेऊन पहिला वर्ग, पहिला क्रमांक व सर्व बक्षिसे मिळविणे हे अनन्यसाधारण बुद्धीचे काम आहे. नानासाहेबांना मिळालेल्या शिष्यवृत्त्या व बक्षिसे एवढी संख्येने आजपर्यंत एकाही विद्यार्थ्याला कधीही मिळवता आलेली नाहीत व पुढेही असा बृहस्पतितुल्य विद्यार्थी निर्माण होणे फक्त ईश्वरेच्छेवरच अवलंबून आहे. बृहस्पतीने निर्माण केलेला एक चमत्कार असेच नानासाहेबांच्या बुद्धिमत्तेबद्दल म्हणता येईल. मॅट्रिक ज्युनिअर स्कॉलर शिष्यवृत्ती, बाई माणेकबाई बैरामजी जीजीभाई पारितोषिक, जगन्नाथ शंकरशेठ पारितोषिक, प्रिव्हियस परीक्षा, माऊंट स्टचुअर्ट एलफिन्स्टन पारितोषिक प्रिव्हीयस परीक्षा, बी. ए. परीक्षेत एलिस शिष्यवृत्ती (इंग्रजीबद्दल), ड्यूक ऑफ एडिंबरो फेलोशिप, गणिताचा दक्षिणा फेलोशिप, एम् ए. मध्ये चँन्सेलर्स मेडल, एल्एल्. बी. मध्ये अर्नोल्ड शिष्यवृत्ती ही त्यांची शिष्यवृत्त्यांची व बक्षिसांची सापडली तेवढी यादी आहे. परंतु प्रत्यक्षात असे समजते की मॅट्रिकपासून एम्. ए एल्. एल्. बी. पर्यंत असलेल्या सर्व शिष्यवृत्त्या व बक्षिसे, पहिला वर्ग व पहिला नंबर त्यांनी कोणासही घेऊ दिला नाही. म्हणजे इ. स. १८७७ ते १८८५ हा कालखंड म्हणजे मुंबई विश्वविद्यालयातील इतिहासात भारताचार्य वैद्यांचा कालखंड म्हणून विधात्याने कोरून ठेवलेला होता.

नानासाहेब एम्. ए. एलएल्. बी. झाल्यावर कोल्हापूर संस्थानात शिरोळ गावी १॥ वर्ष मुन्सफी केली. नंतर ठाणे येथील कोर्टात १॥ वर्षं वकिली केली. मुंबईस वकिली करण्याची इच्छा असूनही जागा घेणे वगैरेसाठी लागणारे भांडवलाचे अभावी करू शकले नाहीत. जून १८८७ मध्ये नानासाहेबांचे मेहुणे डॉ. सदाशिवराव काणे मुंबई यांची व ग्वाल्हेरचे चीफ जस्टिस श्रीनिवासराव यांची ओळख होती. त्यामुळे नानासाहेबांस उज्जयनी येथील सेशन जज्जाची जागा मिळाली. जून १८८७ मध्ये उज्जयनी येथे ते सेशन जज्ज म्हणून काम करू लागले. तेथे ८ वर्षे काम केल्यावर बढती मिळून ग्वाल्हेरचे चीफ जस्टीस म्हणून १८९५ मध्ये नेमणूक झाली.१९०४ साली ते तापाने आजारी पडले; तेव्हा त्यांनी सहा महिने रजा काढली. नंतर प्रकृती अस्वास्थ्यामुळे नोकरीचा राजीनामा दिला. ग्वाल्हेरचे महाराजांनी सहा महिनेपर्यंत त्यावर निर्णय दिला नाही; नंतर मात्र जून १९०५ मध्ये त्यांना सेवामुक्त केले. पेन्शनचा हक्क तेव्हा नव्हता. म्हणून त्यांना ग्रंथलेखन व कॉंग्रेसचे कार्य करण्यास स्वातंत्र्य मिळाले. पेन्शन जरी नाही तरी ग्रॅच्युइटी म्हणून त्यांना १४००० रु. मिळाले. त्यावेळी त्यांना १००० रु. पगार होता. वडिलांचे एका स्नेह्यांनी त्यांना मुंबई हायकोर्टात वकीली सुरू करण्याचा सल्ला दिला. तेव्हा त्यांनी मार्मिक व स्वाभिमानाचे उत्तर दिले– "मला लोक My lord म्हणत असत. मी आता दुसऱ्यापुढे उभा राहून My Lord म्हणणार नाही." जर त्यांनी हा सल्ला मानला असता तर कदाचित हजारो रुपये मिळवले असते. परंतु सन १९०६ ते १९३३ पर्यंतच्या २७ वर्षाच्या काळात हजारो रुपये ग्रंथलेखन व कॉंग्रेसचे कार्यात घालवले. टिळकांचे पक्षाकडे त्यांचा ओढा होता. टिळक त्यांचे स्नेही होते तेव्हा टिळकांचे कार्य व निरनिराळे फंड गोळा करण्याकरिता त्यांनी खूप प्रवास केला. ठाणे व कुलाबा जिल्ह्यात त्यांनी कार्य केले. टिळकांच्या स्वदेशी मंत्राला अनुसरून ते खादीचा पोशाख घालीत. महात्मा गांधी युगात ते गांधीपक्षाकडे वळले. परंतु गांधी टोपी त्यांनी कधीही घातली नाही. पगडी हेच शिरोभूषण कायम ठेवले. गांधी वेळोवेळी त्यांचा सल्ला घेण्यास येत असत. अस्पृश्योद्धाराच्या चळवळीबाबत त्यांची व गांधींची खडाजंगी उडाली. गांधींनी त्यांचा सल्ला मानला नाही म्हणून त्यांनी राजकारण सोडले. महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्षपदाचा राजीनामा दिला; व ग्रंथलेखन व संशोधन यांना वाहून घेतले; म्हणून आपणाला प्रचंड ग्रंथसंपत्ती मिळाली. हा या घटनेचा फायदाच म्हटला पाहिजे. त्यांच्या विद्वत्तेचा गौरव करताना ७५ व्या वाढदिवशी कल्याणच्या व्यासपीठावर बदलापूरचे थोर विद्वान श्री. नानासाहेब चाफेकरांचे अध्यक्षतेखाली साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी एक संस्कृत श्लोक म्हणून दाखवला. त्याचा आशय असा की स्वर्गांगना आपल्या आपल्या आवडत्या पुरुषास आपणहून स्वतःचे चुंबन देतात, त्याप्रमाणे सर्वच विद्यांनी नानासाहेब

वैद्यांना आपले चुंबन दिले आहे. अशा गम्मतपूर्ण शब्दांत नानासाहेब वैद्यांच्या अनेक विद्यांतील पारंगततेचा उल्लेख केला होता. या बुद्धीच्या महामेरूला अनेक बौद्धिक विषयांखेरीज सतारवादन, उत्कृष्ट पोहणे, मल्लविद्या, घोड्यावर बसणे, कीर्तन करणे, इतकेच नव्हे तर पाकशास्त्र या विषयांतही ते पारंगत होते. म. म. दत्तो वामन पोतदार यांनी आपली एक आठवण याबाबत सांगितली आहे, की भारत इतिहास संशोधन मंडळाचे बाजूचे चाळीत राहात असताना त्यांच्यासह अनेकांना उत्कृष्ट पदार्थ स्वतः करून खाऊ घातले आहेत. साहित्य प्रांतात तर त्यांनी अजोड कामगिरी करून ठेवली आहे. या बुद्धिभीष्माचार्यांनी एवढी अमोल व हिमालयाएवढी उत्तुंग इतिहास, संशोधन, पुराणे, महाकाव्ये इत्यादींची ग्रंथसंपत्ती निर्माण करून ठेवली आहे की साक्षात् बृहस्पतीनेही थक्क व्हावे. ते इतिहास-व्यासंगी, संस्कृत पंडित, संशोधक तर होतेच; परंतु ज्योतिषशास्त्रातही पारंगत होते. त्यांची ग्रंथसंपत्ती पुढीलप्रमाणे आहे. (१) संक्षिप्त रामायण, (२) संक्षिप्त भारत (३) अबलोन्नती ग्रंथमाला (४) श्रीरामचरित्र (५) श्रीकृष्णचरित्र (६) Riddle of the Ramayana (७) Mahabharat-a criticism (८) Epic India (९) 'माझा प्रवास' (१८५७ चे बंडाची हकीगत) (१०) दुर्दैवी रंगू (कादंबरी) (११) महाभारताचा उपसंहार (१२) Mediaeval India Vol. I (१३) Mediaeval India Vol. II (१४) Mediaeval India Vol. III (१५) मध्ययुगीन भारत भाग १ ला (१६) मध्ययुगीन भारत भाग २ रा (१७) मध्ययुगीन भारत भाग ३ रा (१८) संस्कृत वाङ्मयाचा त्रोटक इतिहास (१९) Down fall of Hindu India (२०) The History of Sanskrit literature (२१) Shiwaji, The Founder of Maratha Empire. (२२) मराठी स्वराज्यसंस्थापक शिवाजीमहाराज (२३) श्रीमद्‌भगवद्‌गीता व तिचे भाषांतर (२४) संयोगिता नाटक (२५) हिंदूधर्माची तत्त्वे (२६) वैद्यांचे ऐतिहासिक निबंध (२७) वैद्यांचे वाङ्मयात्मक निबंध आणि भाषणे (२८) गझनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या (२९) महाभारताचे खंड : १. आदिपर्व (पूर्वार्ध) २. आदिपर्व (उत्तरार्ध) (३०) सभापर्व (३१) विराटपर्व (३२) उद्योगपर्व (पूर्वार्ध) (३३) उद्योगपर्व (मध्य) (३४) उद्योगपर्व (उत्तरार्ध.)

हे सर्वच ग्रंथ संशोधन, मनन, अभ्यास, चिंतन करून ५०० ते ६०० पृष्ठा-एवढे मोठे आहेत. सतत ५५ वर्षे त्यांची बुद्धिमत्ता यात गुंतलेली होती. याशिवाय ते पट्टीचे वक्तेही होते. सरस्वतीच्या प्रासादातील अनेक दालनांचे अध्यक्षस्थान स्वीकारून त्यांनी विभूषित केले होते. साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्षस्थान त्यांनी अनेक वेळा विभूषित केले होते. ज्योतिषशास्त्रसंमेलनाचेही अध्यक्षस्थान त्यांनी मंडित केले होते, एवढेच नव्हे तर कीर्तनसंस्थेचे संमेलनाचेही अध्यक्षस्थान भूषित केले होते. सरकार दरबारने त्यांना

रावबहाद्दुर हा किताबही बहाल केला होता. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांना विद्वत्कुलशेखर ही पदवी अर्पण केली होती. लोकमान्य टिळकांनी त्यांना महाभारताचार्य ही पदवी अर्पण केली होती. ज्ञानकोषकार केतकर, लोकमान्य टिळक, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, महात्मा गांधी, डॉ. राजेंद्रप्रसाद, साहित्यसम्राट न. चिं. केळकर, इत्यादी भारताचे महापंडित या सरस्वती-कौस्तुभ-चिंतामणीपुढे नतमस्तक असत. कल्याण किंवा मुंबई येथे कोणीही आले तरी त्यांना भेटून सल्ला-मसलत किंवा विचारपूस केल्याशिवाय जात नसत. भारताचार्य म्हणजेच कल्याण हे समीकरण त्यांनी उराशी बाळगले होते. एकदा डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांना कल्याण नगरपालिकेतर्फे मानपत्र दिले गेले. त्या सभेला जेव्हा भारताचार्य दिसले नाहीत, तेव्हा ते म्हणाले, " कल्याण म्हणजे आम्ही भारताचार्य रावबहाद्दुर नानासाहेब वैद्यच समजतो व ते कसे येथे नाहीत ? " खरी गोष्ट म्हणजे त्यांना आमंत्रण देण्याचे नगरपालिका विसरली होती. तेव्हा त्वरित आमंत्रणपत्रिका पाठवून हात जोडून आणण्यात आले व त्यांची राजेंद्रप्रसादांशी गाठ घालून दिली गेली. भारतीयच काय पाश्चात्य पंडितांनीही त्यांच्यापुढे मान तुकविली होती. परंतु कल्याणकरांना मात्र त्यांचे स्मरणही राहिले नाही. त्यांचा ७५ वा वाढदिवस कल्याणकरांनी मोठ्या उत्सवाने नानासाहेब चाफेकरांचे अध्यक्षतेखाली तुकाराम थिएटरात साजरा केल्याचे आठवते. त्या वेळी वक्ते होते साहित्यसम्राट न. चिं. केळकर. ते काय म्हणाले ते वर एका ठिकाणी दिलेलेच आहे. त्यांचे घराजवळील चौकाला त्यांचे भारताचार्य वैद्य हे नाव दिलेले आहे; परंतु त्यांचे खरे स्मारक अजून झाले नाही असे वाटते. समस्त नवीन पिढीच्या कल्याणकरांना त्यांची माहिती राहिलेली दिसत नाही. परमेश्वराने हा सरस्वती–कौस्तुभ–चिंतामणी कल्याणच्या भूमीत निर्माण केला, याची कितपत जाणीव आहे ? सरस्वतीचा कंठमणी कौस्तुभ-चिंतामणीला विनम्र शतकोटी प्रणाम.

कै. सदाशिव महादेव दिवेकर

हे घराणे कल्याणमधीलच. श्री. सदाशिव महादेव दिवेकर हे त्या काळात व्यापारी म्हणून प्रसिद्ध पावले. कल्याण येथे आग्रा रोड येथे हल्ली सिल्क मिल आहे, त्या जागेवर कल्याणमध्ये कापडाची गिरणी काढून मुळजी जेठा मार्केटमध्ये स्वावलंबनाने कापड पेढी चालवणारे पहिले महाराष्ट्रीय व्यापारी व मिल मालक. उद्योगधंद्याच्या निमित्ताने हिंदुस्तान फिरताना फुरसतीच्या वेळी त्यांनी इतिहास संशोधन केले व दुर्मिळ साहित्य मिळवले. ' सत्यामळनाथांचा अपूर्व गाथा ' त्यांनी एलिचपुरास मिळवला होता. पर्णाल–पर्वतग्रहणाख्यानहि त्यांनीच छापले. तंजावर-हून तामिळ ' शिवभारत ' आणवून त्याचे महत्व भारत इतिहास मंडळाचे द्वारा संशोधकास विज्ञात केले व मूळ संस्कृत शिवभारताची सुपरिष्कृत आवृत्ति काढली!

शिवचरित्रप्रदीप हा ग्रंथही त्यांनीच प्रसिद्ध करविला. अल्लीबहाद्दराची पत्रेही त्यांनीच मिळवली होती भारत इतिहास संशोधक मंडळाच्या मुनिचतुष्टयापैकी हे एक होते. त्यांचे ऐतिहासिक लेख, चर्चा, पत्रे वगैरे केसरीतून प्रसिद्ध होत असत. वरील सर्व संशोधन त्यांनी अत्यंत परिश्रमाने करून स्वखर्चाने छापून प्रसिद्ध केले. व्यापारी उद्योगपतीने एकदम दुसऱ्या टोकाचे इतिहास संशोधनाचे कष्टाचे जिकीरीचे, कंटाळवाणे व तोटयाचे काम केवळ महाराष्ट्र इतिहासावरील प्रेमाने आपला बहुमोल वेळ व हिशेबी पैसा खर्चून करणारी व्यक्ती विरळाच म्हणावी लागेल. महाराष्ट्र इतिहास संशोधनावर त्यांनी खरोखर बहुमोल उपकारच करून ठेवले आहेत.

कै. ना. गो. तथा नानासाहेब चाफेकर

श्री. कै. ना. गो. तथा नानासाहेब चाफेकर हे बदलापूरचे राहणारे. हे पूर्वी औंध संस्थानात न्यायाधीश होते. ह्यांना ग्रंथलेखन व विशेषेकरून इतिहास संशोधनाचा नाद होता. त्यांनी निवृत्तीनंतर आपले आयुष्य एखाद्या तपस्वी ऋषीप्रमाणे, मनन, चिंतन, अभ्यास व लेखनात घालवले. ते भारत इतिहास संशोधन मंडळाचे क्रियाशील सदस्य होते. त्यांनी माझा गाव ‘ बदलापूर ’ नावाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. तसेच ‘ एडमंड बर्कचे चरित्र, ’ ‘ पैसा, ’ ‘ गच्चीवरील गप्पा, ’ ‘ वैदिक निबंध ’, ‘ समाजनियंत्रण, ’ ‘ साहित्य–समीक्षण, ’ ‘ निवडक लेख ’ वगैरे पुस्तके लिहिली आहेत. त्यातील विशेष पुस्तक म्हणजे ‘ पेशवाईचे सावलींत ’ हे होय. भा. इ. सं. मंडळाचे संस्थापक कै. वि. का. राजवाडे यांनी दूरदृष्टी ठेवून पुण्याचे प्रख्यात सावकार चिपळोणकर यांचेकडील जमाखर्चाच्या वह्या सुमारे १५० पुडकी मंडळांत संग्राहून ठेवली होती. समाजशास्त्राचे अभ्यासक श्री. ना. गो. चाफेकर यांनी या पुडक्यांचा परामर्श घेण्याचे किचकट काम हौसेने अंगावर घेतले आणि भा. इ. सं. मंडळात हिशोबी वह्यांच्या इतिहास साधनाचा पाया घातला. क्रमाक्रमाने त्यातील काही भा. इ. सं. मंडळाने प्रसिद्ध केले. ते पाहून मंडळाचे चिटणीस आबासाहेब मुजुमदार ह्यांनी प्रख्यात तुळशीबागवाले ह्यांचे घरच्या जमाखर्चाच्या वह्या मंडळास मिळवून दिल्या. श्री. ना. गो. चाफेकर ह्यांनीही कल्याणचे सुभेदार श्री. बिवलकर ह्यांचेकडील हिशोबाच्या वह्या व श्री. वैद्य ह्यांजकडील वह्या स्वतः मिळवल्या. त्यांच्या अनुरोधाने कित्येक वर्षे खपून ‘ पेशवाईचे सावलीत ’ हा ग्रंथ तयार करून स्वतःच प्रसिद्ध केला. या बहुमोल अशा एकाच ग्रंथाने त्यांनी महाराष्ट्रेतिहासावर केवढे उपकार करून ठेवले आहेत. ९० पेक्षा अधिक प्रदीर्घ जीवमानानंतर ता. ६–३–१९६८ रोजी सकाळी त्यांचे देहावसान झाले व इतिहास संशोधनाचा भीष्माचार्य गेला.

Scanned with Car

कै. शंकरराव जयरामराव झुंजारराव पवार

कै. शंकररावांचा जन्म दि. १८ जून १८८५ साली मुरबाड तालुक्यातील मौजे सरळगाव नेपाळपाडा येथे झाला. हे इतिहासप्रसिद्ध घराणे आहे. यांचे मूळ पुरुष सरदार राहूजी झुंजारराव यांना कोकणप्रांत जिंकण्याचे कामगिरीत सिद्ध-गडची किल्लेदारी व १२० गावची देशमुखी मिळाली. वसईचे युद्धातही या घराण्याने बरीच कामगिरी बजावली. कै. शंकरराव झुंजारराव यांचा जन्म अशा ऐतिहासिक पराक्रमी वतनदार कुळात झाला. शंकररावांचे वडील जयरामराव झुंजारराव हे शेती व सावकारी करीत. कल्याण शहरात त्यांनी मुलांची शिक्षणे व इतर सोयी-साठी एक वाडा खरेदी करून येथे एक बिऱ्हाड केले. त्यामुळे बरेच झुंजारराव कुटुंबीयही कल्याण येथे राहण्यास आले व स्थायिक झाले. कै. शंकररावांचा पिंड समाजसेवकाचा असल्यामुळे प्रथमपासूनच लोकोपयोगी संस्थांमधून भाग घेण्यास सुरुवात केली. काही दिवस ते मुरबाड लोकल बोर्डाचे सदस्य होते; नंतर ते लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. १९१८ साली त्यांनी मराठा समाजाचा गणेशोत्सव साजरा केला; १९१३ ते १९१५, १९२४ ते १९३४ या काळात ते नगरपालिकेचे सभासद होते. १९३२ ते १९३४ या कालखंडात ते कल्याण नगरपालिकेचे नगराध्यक्ष होते.



समाजसेवक कै. शंकरराव झुंजारराव

या सर्व काळात एक गोष्ट प्रामुख्याने त्यांच्या दृष्टीस आली; ती म्हणजे मराठा बहुजन समाज हा शिक्षणात फार मागासलेला आहे. कालमानाप्रमाणे या समाजाने नवीन शिक्षण घेऊन सुधारले पाहिजे. त्याच वेळी सर्व महाराष्ट्रभर लोक-जागृतीच्या चळवळी सुरू झालेल्या होत्या. त्यापासून स्फूर्ती घेऊन त्यांनी समाज-शिक्षणाचा प्रसार व्हावा, मऱ्हाठा तितुका मेळवावा, समाजाला दुर्व्यसनांपासून मुक्त करावे या उद्देशाने १९१८ साली त्यांनी मराठा शिक्षण मंडळ नावाची संस्था स्थापन केली. त्याचबरोबर एक रात्रीची व दिवसाची शाळा काढली. या शाळांचा उपयोग करून बरीच मराठा मंडळी शिकू लागली. कै. शंकररावांच्या नेतृत्वाखाली कल्याणातील मराठा समाज संघटित होऊ लागला, शिकू लागला, सुधारु लागला. या कार्याला चैतन्य मिळावे व इतरत्रही शिक्षणाची चळवळ फोफावावी म्हणून त्यांनी १९२२ साली मराठा शिक्षण परिषद कल्याण येथे भरवली. परिषदेस मराठा समाजातील मान्यवर नेते, प्रतिष्ठित श्रीमंत व सरदार मंडळी, संस्थानिक हेही हजर होते. श्रीमंत सरदार यशवंतराव दाभाडे (तळेगाव), श्रीमंत सरदार मालोजीराव नरसिंहराव उर्फ बाळासाहेब बडे शितोळे, रावसाहेब भाऊसाहेब थोरात, मेजर कृष्णराव अर्जुनराव केळुसकर, रावबहाद्दर खासेराव जाधव बडोदे, वगैरे मंडळी हजर होती.

या परिषदेस १२००० रु खर्च आला. त्यापैकी ६००० रु. वर्गणीरूपाने जमले होते. म्हणून उरलेला खर्च समाजासाठी कै. शंकररावांनी स्वतःचे पदरचा केला.

या परिषदेपासून स्फूर्ती घेऊन कै. शंकरराव झुंजारराव यांचे नेतृत्वाखाली संपूर्ण ठाणे जिल्ह्यात ठिकठिकाणी शिक्षणसंस्था स्थापन करण्यात आल्या. खेडे-गावात शिक्षणप्रचारार्थ शेतकरी विद्या प्रचारक संघ स्थापन केला. १९२३ मध्ये लोकमान्य टिळकांनी चालना दिलेला श्रीशिवछत्रपति जयंती उत्सव कल्याणमध्ये त्यांनी सुरू केला. विशेष म्हणजे या उत्सवाचे अध्यक्ष कल्याणचे ऑनररी मॅजिस्ट्रेट अब्दुल गफूर गुलामसाहेब डोण हे होते.

ता. ३१।१।१९२६ रोजी कै. शंकररावांनी मराठासमाजातर्फे कल्याणच्या लक्ष्मी व्यंकटेश प्रेसचे मालक श्रीमान शेठ रंगनाथ खेमराज व नाशिक जिल्ह्यातील सूकणे येथील श्री. हरी अमृत उर्फ कोंडाजी पाटील यांस रावसाहेब ही पदवी मिळाल्याबद्दल कल्याणचे मशहूर समाजसेवक श्री. सखाराम गणेश ऊर्फ बापूसाहेब फडके यांचे अध्यक्षतेखाली सत्कार केला.

ता. ७।४।१९३४ रोजी आपल्या समाजबांधवांसाठी कष्ट करीत असता मेंदूत रक्तस्राव होऊन त्यांचा मृत्यू झाला. मृत्यूने कल्याण शहराचा एक थोर समाजसेवक नाहीसा झाला. त्यांच्या शवयात्रेस कल्याणातील सर्व समाजाचे लोक बहुसंख्येने

उपस्थित होते. इंदूर संस्थानचे अधिपती श्री. होळकर व अनेक बडी सरदार मंडळी व सरकारी अधिकारीही हजर होते. हल्लीच्या शंकरराव पार्क या जागेत त्यांचे दहन करण्याची खास परवानगी मिळून तेथे दहनाचे जागेवर त्यांचा पुतळा बसविण्यात आला. त्या ठिकाणी नगरपालिकेने एक बगीचा उभारून त्यास झुंझारराव पार्क असे नाव दिले. तसेच जवळच्या चौकालाही झुंझारराव चौक असे नाव देऊन त्यांचे चिरंतन स्मारक करण्यात आले.

कै. गणपतराव फडके

श्री. गणपतराव फडके यांचा जन्म कल्याण येथील सुप्रसिद्ध खानदानी घराण्यात २८ मे १८९५ रोजी झाला. तळेगाव येथील समर्थ विद्यालयासारख्या राष्ट्रीय शाळेत १९०८ पासून १९१० साली ती सरकारने बेकायदेशीर संस्था ठरवून बंद करीपर्यंत त्यांनी शिक्षण घेतले. पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रीकची परीक्षा ते उत्तीर्ण झाले. १९१७ साली इंडीयन डिफेन्स फोर्समध्ये त्यांनी लष्करी शिक्षण घेतले. १९१८ साली मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून ते बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पुणे येथील शेतकी महाविद्यालयात दाखल झाले व शेवटच्या वर्षातील बी. एजी. च्या परीक्षेच्या ऐन वेळेस परीक्षेस न बसता काँग्रेसच्या आदेशानुसार कॉलेज सोडले. नंतर एक वर्षभर त्यांनी पुण्यास साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांच्या हाताखाली काम केले. ०८०७३

सन १९१६ पासून वीस वर्षे काँग्रेस पक्षात ते कार्य करीत होते. १९३० साली कल्याण तालुका काँग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष होते. त्या वेळी त्यांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला व दारू पिकेटींग केल्यामुळे त्यांना दंडाची शिक्षा झाली. परंतु दंड न भरता त्यांनी २ महिने कैदेची शिक्षा भोगली. जिल्हा, प्रांतिक व ऑल इंडिया काँग्रेस कमिटीवरही त्यांची निवड झाली होती. जिल्हा व प्रांतिक काँग्रेस कमिट्यांत अधिकाराचीही कामे त्यांनी केलेली आहेत. काँग्रेसचे जातीय निवाड्यासंबंधीचे गुळमुळीत धोरण त्यांना मान्य नसल्यामुळे त्यांनी लोकशाही स्वराज्य पक्षात पदार्पण केले व त्या पक्षातर्फे १९३७ साली मुंबई विधान सभेवर ठाणे जिल्हा दक्षिण भागातर्फे ते प्रथम क्रमांकाची मते मिळवून निवडून आले.

कल्याण तालुका लोकल बोर्डाचे नऊ वर्षे व ठाणे जिल्हा लोकल बोर्डाचे २१ वर्षे ते सभासद होते. कल्याण म्युनिसिपल बोर्डाचे ते सहा वर्षे सदस्य होते व त्यापैकी ३ वर्षे चेअरमन होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आपल्या कारकीर्दीत त्यांनी अनेक लोकहिताची कामे केली. जी. आय. पी. रेल्वे वर्कर्स युनियनच्या कल्याण शाखेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष व जी. आय. पी. रेल्वे वर्कर्स युनियनच्या मुंबई विभागाचे चेअरमन होते. १९३० चा रेल्वे कामगारांचा संप यशस्वी करण्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले व भरपूर आर्थिक झीज सोसली. हा संप मोडल्यानंतर

Scanned with Ca

युनियन अत्यंत कठीण प्रसंगात असताना ते जी. आय. पी. रेल्वे युनियनचे अध्यक्ष झाले हे विशेष होय. युनियनच्या 'रेल्वेमन' या मुखपत्राचे संपादकत्व एक वर्षभर त्यांनी केले.

ठाणे जिल्हा शेतकरी व खातेदार संघाचे ते संस्थापक व प्रमुख आधारस्तंभ होते. सदर संघाचे चिटणीस म्हणून त्यांनी २१ वर्षे शेतकऱ्यांच्या व खातेदारांच्या हिताच्या दृष्टीने बहुमोल कामगिरी केलेली आहे. ठाणे जिल्हा सभेचे ते १२ वर्षे चिटणीस होते. कल्याण तालुका सहकारी खरेदी विक्री संघ स्थापण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता व संघाचे अनेक वर्षे ते चेअरमन होते. कल्याण येथील सहकारी गृहयोजना मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. कल्याण येथील सहकारी ग्राहक मंडळ व महिला सहकारी उद्योग मंदिर ह्या संस्थांशीही त्यांचे घनिष्ट सबंध होते. जमिनीचे तारणावर शेतकऱ्यांना कर्ज मिळावे म्हणून ठाणे जिल्हा लँड मॉर्गेज बँक स्थापन करण्यात त्या संस्थेचे व मुंबई प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेचे डायरेक्टर म्हणून त्यांनी महनीय कामगिरी केलेली आहे. ठाणे जिल्हा सहकारी बोर्डाच्या व्यवस्थापक मंडळाचे सभासद म्हणूनही त्यांनी उत्तम कामगिरी केलेली आहे. अशा प्रकारे ठाणे जिल्ह्यात सहकारी चळवळीची वाढ व्हावी म्हणून त्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले.

ठाणे जिल्हा लोकल बोर्ड नोकरांच्या संघाचे ते अध्यक्ष होते. कल्याण येथील शिक्षणोत्तोजेक संस्था, गायन समाज, राष्ट्रीय स्वयंसेवक मंडळ, नमस्कार मंडळ, रिक्रीएशन व्यायामशाळा इ. अनेक संस्थाद्वारे सभासद अगर पदाधिकारी या नात्याने त्यांनी कार्य केलेले आहे. कल्याण येथील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या चालकांपैकी ते एक असून, मुलींचे हायस्कूल चालविणाऱ्या स्त्री-शिक्षण मंडळाचे ते अनेक वर्षे चेअरमन होते. कल्याण तालुका, ठाणे जिल्हा व प्रांतिक अन्न सल्लागार समितीचे ते काही वर्षे सभासद होते. हरिजनांकरिता विहीर बांधण्यासाठी त्यांनी आपली जागा विनामूल्य दिलेली आहे. भूविकास बँकेतर्फे प्रतिनिधी म्हणून कुलाबा जिल्हा परिषदेचे ते काही काळ सभासद होते.

१९३७ साली स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर यांनी हिंदुमहासभेची सूत्रे आपल्या हाती घेतल्यावर ते हिंदुमहासभेत प्रामुख्याने कार्य करू लागले. महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेचे उपाध्यक्ष, ठाणे जिल्हा हिंदुसभेचे अध्यक्ष, सावरकर वाङ्मय समितीचे सदस्य व पुण्यातील टिळक स्मारक मंदिर संस्थेचे ते एक विश्वस्त होते. गोवा मुक्ति आंदोलनातहि त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

ठाणे जिल्ह्यास त्या काळी भासत असलेली जिल्हा पत्राची उणीव भरून काढण्याकरिता कुलाबा समाचारला 'ठाणे पुरवणी'ची जोड जानेवारी १९३६ पासून देणाऱ्यांपैकी ते एक होते व तेव्हापासून १९५३ अखेरपर्यंत 'ठाणे पुरवणी'चे

संपादकत्व त्यांनी सतत १८ वर्षे मोठ्या आत्मीयतेने व विनामूल्य केलेले आहे, हे आम्ही कृतज्ञतापूर्वक नमूद करू इच्छितो. ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्षपदीही त्यांची निवड झाली होती.

श्री. गणपतराव फडके यांच्या पत्नी श्रीमती सरस्वतीबाई या त्यांच्या-प्रमाणेच अनेक सार्वजनिक संस्थांत कार्य करणाऱ्या असून, कल्याण नगरपालिकेचे अध्यक्षपदाचा बहुमानहि त्यांनी संपादन केलेला आहे. त्यांचे एकुलते एक चिरंजीव श्री. वसंतराव हे चार्टर्ड अकाऊंटंट असून त्यांच्या पत्नीही सुविद्य आहेत. श्री. फडके यांना नातू व नात अशी दोन नातवंडे आहेत. अशा प्रकारे सर्व मान-सन्मान उप-भोगून, कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण व्हावे म्हणून प्रामाणिकपणे, कळकळीने व निरलसपणे कार्य करून कृतार्थ व समाधानी जीवन जगले ही संतोषाची गोष्ट होय.

श्री. गणपतराव फडके यांचा स्वभाव शांत, प्रेमळ व मनमिळावू होता. ते अजातशत्रु होते. सर्व राजकीय पक्षांत त्यांचा मित्रपरिवार असून त्यांच्याबद्दल सर्वांना आदरभाव वाटत असे.

देशभक्त कै. रामभाऊ पटवर्धन



थोर समाजसेवक
रामभाऊ पटवर्धन.

सध्या स्टेशन रोडवर बँक ऑफ इंडियाच्या समोरील इमारतीत पूर्वी कै. रामभाऊ पटवर्धन यांचा फोटो स्टुडिओ होता. ते व्यवसायाने फोटोग्राफर होते; परंतु गांधींच्या राजकारणाने त्यांचे चित्त वेधून घेतले व स्वतःचे कुटुंब, व्यवसाय वगैरे जबाबदाऱ्या असूनही स्वातंत्र्य–संग्रामात त्यांनी एखाद्या नवजवानाप्रमाणे उडी घेतली. ते काँग्रेसचे शिलेदार झाले. काँग्रेसच्या सर्व तत्वांचे त्यांनी निष्ठेने पालन केले. १९३० मध्ये साहित्यसम्राट न. चिं. केळकर व ल. ब. भोपटकर यांचे नेतृत्वाखाली पनवेल व कल्याण येथे सत्याग्रह झाला. त्यात कै. रामभाऊ पटवर्धन अग्रभागी होते. रामभाऊ पटवर्धन यांनी सातत्याने काँग्रेस कार्याचा ध्यास घेतला होता. हातगाडीवर खादी व काँग्रेसची पुस्तके व पत्रके यांची विक्री चौकाचौकातून फेरी करून ते करू लागलेले पाहून पोशाखी तरुणांना-सुद्धा लाजेने माना खाली घालाव्या लागत. स्पृश्यास्पृश्य चळवळीचे कार्य म्हणून

त्यांनी सक्रीय कार्यक्रम अंगिकारला. त्या काळी स्वतःचे घरी हरिजन स्त्री कामास ठेवली. त्यांना हॉटेल व मंदिरप्रवेश मिळावा म्हणून त्यांनी आपल्या परीने प्रयत्न केले. सुभेदार वाडा येथील सार्वजनिक गणेशोत्सव असल्यामुळे त्या समारंभात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून त्यांनी आग्रह धरला होता. लोकभावना जागृत करण्यासाठी ते दररोज एक व्यंगचित्र काढून व स्पष्टीकरणार्थ काही मजकूर लिहून रस्त्यावर लावीत. त्याचे एक उदाहरण म्हणजे एकदा त्यांनी सिंह पिंजऱ्यात सांपडला आहे असे व्यंगचित्र काढून भारत गुलामगिरीत पडला आहे हे सूचित केले होते. त्या काळी ही उपहासात्मक टीका असल्याने इंग्रज अधिकाऱ्यांनी ते चित्र जप्त करून खटला भरला व त्यात सरकारवर जहरी टीका करून लोकांना राजसत्तेविरुद्ध उठवण्याचा प्रयत्न केला, या आरोपावरून दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा झाली.

सार्वजनिक गणेशोत्सवात हरिजनांना प्रवेश न दिल्यामुळे त्यांनी अखिल हिंदू गणेशोत्सव सुरू केला व स्वतःचे मृत्यूपर्यंत चालवला. त्या वेळचे मुख्यमंत्री श्री बाळासाहेब खेर यांनी त्यांची प्रशंसा केली होती. १९४२ मध्ये महात्मा गांधींच्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये त्यांची डोंबिवलीसाठी निवड झाली व डॉ. सबनीस व प्रधान या सहकाऱ्यांबरोबर सत्याग्रह करून ते तुरुंगात गेले.

ज्वलंत देशभक्तीने प्रेरित झालेल्या या स्वातंत्र्य शिलेदाराची आयुष्यातील १५ वर्षे तुरुंगात गेली. अखंड देशसेवा, खादी, हरिजनोद्धार इत्यादी व्रते त्यांनी कडक निष्ठेने पाळली. आपल्या आयुष्यात त्यांना देश स्वतंत्र झालेला पाहायला मिळाला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीवर कल्याणतर्फे त्यांची प्रतिनिधी म्हणून निवड झाली. १९४९ मध्ये साने गुरुजींच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. अशा या समर्पित जीवनाचे देहावसान दि. २२ मे १९४९ रोजी कल्याण येथे झाले. त्या वेळी सारी कल्याण नगरी शोकमग्न झाली. त्यांची स्मृती कायम राहावी म्हणून कल्याण नगरपालिकेने एका रस्त्याला त्यांचे नाव देऊन शहराच्या इतिहासात नोंद केली.

दर्यासारंग श्री. कृष्णराव धुळप

कल्याणच्या भूमीने अनेक नररत्नांना जन्म दिला आहे. राम्या शागीर्दाचा रामाजी महादेव बिवलकर कल्याणचा प्रख्यात आरमारी सुभेदार झाला व तत्काली राजकीय क्षितिजावर दीर्घकाल चमकला. त्याच काळात तुळाजी आंग्रे या आरमारी सरदाराचा पेशव्यांनी बंदोबस्त केल्यावर ज्याला आरमारप्रमुख केले ती व्यक्ती म्हणजे आनंदराव धुळप होय. दर्याखासखेल आनंदराव धुळपांच्या ऐतिहासिक घराण्यात स्वातंत्र्यकालोत्तर तब्बल २०० वर्षांनी पुनश्च राजकीय दर्यावर स्वामित्व गाजवणारा एक नवा दर्यासारंग जन्माला यावा व त्याने आपली कर्मभूमी



दर्यासारंग श्री. कृष्णराव धुळप.

पुनश्च कल्याण हीच निवडावी हा ईश्वरी योगायोगच म्हटला पाहिजे. या दर्यासारंगाचे नाव कृष्णराव नारायणराव धुळप. जन्म २१-१२-१९२०. रामाजी महादेव ज्याप्रमाणे अत्यंत गरिबीतून क्रमाक्रमाने आपल्या हुशारीने, कर्तृत्वाने, तत्कालीन राजकीय सागरावर आरमार सरदार व कल्याण सरसुभेदार झाला, त्याचप्रमाणे कुलाबा जिल्ह्यातील जांभुळपाडा येथील एका गरीब शेतकरी कुटुंबात मातोश्री जानकीबाईचे पोटी कृष्णराव धुळप ह्यांचा जन्म झाला. कृष्णराव चार पाच वर्षांचे असतानाच त्यांचे मातोश्रीने कल्याण येथे स्थलांतर केले. त्याच काळात कल्याणमध्ये मराठा मंडळीचे शिक्षणाकडे लक्ष वेधले जाऊन समाजसुधारणेच्या चळवळी सुरू झाल्या होत्या. अत्यंत बिकट परिस्थितीत कृष्णरावांचे शिक्षण सुरू झाले. कृष्णरावांना ह्याच वेळी योगायोगाने सोमणी नावे एक ब्राह्मण कुटुंब भेटले. सोमणींच्या मातुश्रीने आपल्या मुलाच्या या मित्राला पुत्रवत् मानून मातृ-वात्सल्य व शक्य तेवढे सहाय्य दिले. मित्रमंडळींनी कृष्णरावाची हुशारी पाहून त्यांच्या शिक्षणासाठी अनेक खटपटी लटपटी करून त्यांना मदत केली. कृष्णरावांचा पिंड साहित्याचा होता हे हेरून, त्यांच्याकडून त्याही वयात गणेशोत्सवासाठी नाटके वगैरे लिहून घेऊन त्यांचे ठिकठिकाणी प्रयोग करून कृष्णरावांना मदत केली. कृष्णरावांच्या सर्व गुणांना व कर्तृत्वाला वाव मिळण्यासाठी त्यांच्या मित्रमंडळींनी अपार मेहनत घेतली व कृष्णरावांनीही त्याचा योग्य उपयोग केला. त्यांनी कष्टाने व हुशारीने आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. बडोदे या संस्थानातील कॉलेजमधून त्यांनी बी. ए. ची पदवी घेतली व मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजमधून ते एम्. ए. झाले व नंतर एलएल. बी. ही झाले.

१९४२ च्या कॉंग्रेसच्या लढ्यात त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. येथून त्यांच्या भावी जीवनाची दिशा ठरू लागली. मधल्या काळात काही काळ ते कल्याण गर्ल्स स्कूलमध्ये व नंतर काही काळ मुंबईच्या ओरिएंट हायस्कूलमध्ये ते शिक्षक होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४८ साली ते शे. का. पक्षात सामील झाले. १९४९ ते १९५२ पर्यंत ते कल्याण नगरपालिकेचे सभासद होते. १९५७ साली संयुक्त महाराष्ट्राचा महत्वाचा लढा सुरू झाला. त्या वेळी सर्व विरोधी पक्ष एक झाले

होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या प्रचंड लाटेवर स्वार होण्याचा बहुमान या शेतकरी ताज्या दमाच्या तरुणाला, त्या वेळचे हिंदूमहासभेचे नेते व एक वेळचे विधानसभेचे आमदार कै. गणपतराव फडके ह्यांनी आपले नाव मागे घेऊन व यांचे नाव सुचवून मिळवून दिला. दर्यासारंगाच्याच कुळात जन्माला आलेल्या कृष्णरावांनी राजकारणाच्या महासागरात दैवाने दिलेल्या संधीचा फायदा घेऊन आपले तारू हाकारले आणि आपले खानदानी कौशल्य पणास लावून राजकारणाच्या महासागरावर आपले प्रभुत्व बसविले. १९५७ साली कल्याण विभागाचे नेतृत्व घेऊन ते विधान सभेत शिरले व सतत १५ वर्षे क्रमाक्रमाने व अभ्यासू वृत्तीने त्यांनी आपली पकड बसवून ते विधानसभेचे विरोधी पक्षनेते झाले. विरोधी पक्ष-नेता म्हणजे मुख्य मंत्र्यांच्या दर्जाचा मान, लोकशाहीत सत्तारूढ पक्षावरील अंकुश. महाराष्ट्र विधानसभा कृष्णरावांनी आपल्या तेजस्वी भाषणांनी जेवढी गाजवली, तेवढी फार क्वचित् कोणी गाजवली असेल. त्यांच्या भाषणात कठोर टीका आहे, आव्हाने आहेत, उपहास आहे, ओजस्विता आहे; त्याचबरोबर अलंकारांचे पद-लालित्य आहे. १९६७ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. लोकसभेच्या निवडणुकीतही पराभव झाला. परंतु नंतर दुष्काळ, महागाई, भ्रष्टाचार इत्यादींनी हादरलेल्या सध्याच्या परिस्थितीत कृष्णरावांचा विधानसभेतील अभाव विशेषत्वाने जाणवला. काळाच्या प्रभावापुढे मागे हटावे लागलेल्या ह्या कल्याणभूषण व्यक्तीला दोन वर्षे जरा विश्रांती मिळाली व थोडे सिंहावलोकन व चिंतनाची संधी मिळाली.

श्री. कृष्णरावांना परिस्थितीची पूर्ण जाणीव आहे व ज्यांनी ज्यांनी त्यांना वेळोवेळी सहाय्य केले त्यांच्याबद्दल ते कृतज्ञता बाळगतात. जाहीरपणे ती व्यक्तही करतात. ते झुंजार नेते आहेत, लढाऊ वृत्तीचे आहेत, तेवढेच ते खिलाडू वृत्तीचे आहेत.

राजकीय विरोध किंवा मतभिन्नता ते व्यक्तिगत संबंधात आडवे येऊ देत नाहीत. त्यांचे राजकीय विरोधकांशी व्यक्तिगत संबंध मित्रत्वाचे, सहाय्यकाचे असतात. एवढा मनाचा थोरपणा बाळगणे हेच थोरपणाचे लक्षण आहे. म्हणूनच त्यांचे राजकीय शत्रू हे व्यक्तिगत मित्र असतात. विरोधकांपासून आपल्यातील उणीवा जाणून घेण्याचा ते प्रयत्न करतात व त्या सुधारण्याचा शक्यतो प्रयत्न करतात; असा त्यांचा लौकिक आहे.

थोड्याशा पिछेहाटीनंतर परत विरोधी पक्षातर्फे ते नुकतेच राज्यसभेवर निवडून गेले ह्याबद्दल त्यांचे अभिनंदन. कल्याणच्या दर्यासारंगाला आता राष्ट्रीय व्यापक क्षेत्र मिळाले, ह्याबद्दल प्रत्येक कल्याणकराला अभिमान वाटला पाहिजे. विरोधी पक्षनेते म्हणून जसा महाराष्ट्र त्यांनी गाजवला तसे राज्यसभेचे सभासद होऊन आता राष्ट्रीय राजकीय मैदान ते गाजवतील व कल्याणचे कीर्तीत भर घालतील ही अपेक्षा आहे.

Scanned with Car

डॉ. गणेश गंगाधर रायकर, एल्. सी. पी. अँड एस्.

समाजसेवक डॉ. ग. गं. रायकर.

डॉ. गणेश गंगाधर रायकर हे मुळचे ता. अलिबाग जि. कुलाबा इथले म्हणून ओळखले जातात. तरी रायकर घराणे मुळचे मु. कोदिवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, या गावचे. त्यांच्या आजोबांनी म्हणजे केशवराव रायकर यांनी कोदिवली सोडून अलिबागेत वास्तव्य केले. हल्ली रायकर यांचे घर अलिबागेस आहे.

डॉ. ग. गं. रायकर यांचा जन्म ४ ऑक्टोबर १९०७ रोजी अलिबागेस झाला. त्या वेळी त्यांचे वडील मुंबईस रेव्हिन्यू खात्यात नोकरीस होते. डॉ. रायकर यांना मातृसुख मिळाले नाही; कारण त्यांच्या वयाच्या ५ व्या ६ व्या वर्षीच त्यांची आई निवर्तली. डॉक्टरांचे सर्व शिक्षण मुंबई येथे राम मोहन इंग्लिश स्कूल व आर्यन एज्युकेशन सोसायटीची शाळा येथे झाले, तरी मॅट्रिक मात्र अलिबाग येथील मिशन हायस्कूलमधून उत्तीर्ण झाले. पुढे नाशिक येथे नव्यानेच उघडलेल्या हंसराज ठाकरसी कॉलेजमध्ये पहिले विद्यार्थी म्हणून दाखल होऊन प्रिव्हियस (हल्लीची P.D.) परीक्षा उत्तीर्ण होऊन पुणे येथील बी. जे. मेडीकल स्कूलमध्ये दाखल होऊन १९२९ मध्ये L. C. P. S. ही परीक्षा उत्तीर्ण झाले. पुण्यात त्यांचा दुसरा क्रमांक आल्यामुळे सहा महिने यांना रजिस्टरशिप मिळाली.

पुण्याला असतानाच मेडीकल स्कूलच्या अनेक कार्यात ते भाग घेत असत. वक्तृत्व सभेचे सेक्रेटरी म्हणून काम केल्यावर मेडिकल स्कूल जिमखान्याचे जनरल सेक्रेटरी झाले. तसेच ते खेळ, स्नेहसंमेलने यात भाग घेत. नाट्य हा त्यांचा आवडता विषय असल्यामुळे दर वर्षीच्या स्नेहसंमेलनातील नाटकात स्त्री–भूमिका करीत. 'मायेचा पुत' या नाटकातील करुण रसाची इंदूमतीची भूमिका कै. नटसम्राट बालगंधर्व यांना फार आवडली. त्यांनी त्यांचे अभिनंदन केले व पहिले बक्षिस द्यावे असे सुचविले.

पुण्यास असतानाच सेवासदनचे कै. गोपाळ कृष्ण देवधर यांचा परिचय झाला व त्यांची शिकवणूक "दगडाच्या देवापेक्षा चालत्या बोलत्या माणसाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा" याचा त्यांचे मनावर परिणाम होऊन ते समाजसेवेकडे वळले.

सन १९२८, २९, ३०, ३१ ही वर्षे म्हणजे स्वातंत्र्ययुद्धाची वर्षे. सर्व हिंदुस्थान एकवटून ब्रिटिश सत्ता झुगारण्यासाठी धडपडत होता. त्यातच रायकर यांचे वडील हे जरी सरकारी नोकरीत होते, तरी स्वदेशी व्रतस्थ होते व महात्माजींच्या चळवळीस पाठिंबा देत असत. डॉक्टरांचा धाकटा भाऊ तर प्रत्यक्षच चळवळीत भाग घेत होता. या चळवळीत दोन-तीन वेळा अटक–मारहाण झाली व त्या मारहाणीने प्रकृती ढासळून मृत्यु झाला. या सर्व पार्श्वभूमीवर १९३१ मध्ये एप्रिल २-३ तारखेस पुण्यास सत्याग्रह होऊन डॉ. रायकर ६ महिने सश्रम कारागृहवास व २५ रु. दंड अशी सजा होऊन येरवडयाच्या तुरुंगात गेले. तिथे डॉ. मेजर मेथा (सुपरिंटेन्डेंट्) यांचे हाताखाली हॉस्पिटलमध्ये काम मिळाले. तिथल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मेजर मेथासाहेब यांची डॉक्टरांवर फार मर्जी बसली व तुरुंगातून सुटण्याच्या वेळी त्यांनी त्यांना उपदेश केला की, तुझ्यासारख्या मानवाची सेवा करणारा माणूस ६-६ महिने तुरुंगात खितपत पडावा हे चांगले नाही. तरी तुरुंगात न येता लोकसेवा कर; ती पण देशसेवाच आहे आणि पुन्हा तुरुंगात न येण्याचे त्यांनी त्यांच्याकडून वचन घेतले.

१९३१ चा तुरुंगवास संपवून बाहेर पडल्यानंतर शहरात व्यवसाय न करता खेडयात दवाखाना काढावा, म्हणून चौक या गावी दवाखाना सुरू केला व तिथे गणेशोत्सव, मेळा, नाटके व आरोग्यप्रचार हे कार्य सुरू केले. त्यामुळे व्हिलेज अपलिफ्ट स्कीम (ग्रामसुधारणा) मार्फत त्यांना खेडोपाडी आरोग्यप्रचारक म्हणून नेमले. चौक गावातील रहिवाश्यांची भांडणे, खून, मारामाऱ्या यामुळे चौक गाव सोडून १९३८ मध्ये ते कल्याणला आले. या आधींच चौकासच त्यांनी कै. कुमारी मनुबाला मोघे सूतिकागृह ही धार्मिक संस्था १५–१–१९३५ मध्ये स्थापन केली होती. ती संस्था पण कल्याणला आणली व १५–१–१९३८ रोजी कै. गणपतराव फडके यांच्या हस्ते उद्घाटन केले व कल्याणला पहिले सूतिकागृह सुरू केले.

कल्याणला नुसते सूतिकागृह काढूनच ते थांबले नाहीत, तर आरोग्य प्रचाराचे कार्य सतत चालू ठेवले. ह्या त्यांच्या कामगिरीबद्दल १–१–१९३९ रोजी ब्रिटिश सरकारकडून त्यांना कैसर-इ-हिंद हे पदक बहाल करण्यात आले. पण त्या वेळच्या कॉंग्रेसच्या शिस्तीवरून ते पदक आचार्य अत्रे यांच्या हस्ते सरकारला परत केले.

पुढे समाजकार्य म्हणून राजकारणातून अलिप्त राहून त्यांनी आरोग्य व शिक्षण ह्या दोन खात्यांस वाहून घेतले व त्याप्रमाणे दाई शिक्षणवर्ग चालू केला व एकूण ५०–५५ भगिनींना दाई शिक्षण देऊन प्रशस्ति-पत्रके मिळवून दिली. त्यापैकी आज बहुसंख्य भगिनी तिरनिराळ्या हॉस्पिटलमध्ये, जिल्हा परिषदांमध्ये नर्सच्या नोकरीत असून उत्तम पगार मिळवीत आहेत.

१९४३ पासून कल्याण येथील हायस्कूलमधून मॅट्रीक व ११ वी (S. S. C.)

Scanned with Car

वर्गाला आरोग्य व शरीरविज्ञानशास्त्र हा विषय आजतागायत विनावेतन शिकवतात. S. S. C. बोर्डात ह्या विषयांचे ते परीक्षक होते व अनेक शाळांतून S.S.C. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी जातात. हा विषय शिकवण्यात त्यांचा हातखंडा आहे. कल्याण येथील सुभेदार वाडा हायस्कुलमध्ये १० वर्षापेक्षा जास्त वर्षे विनावेतन माननीय शिक्षक म्हणून काम केल्याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते सत्कार झाला.

ह्याखेरीज सेंट जॉन अँब्युलन्स या संस्थेचे त्यांनी पुनरुज्जीवन करून आपल्या सहकाऱ्यांसह ह्या संस्थेचे शिक्षणाचे व आरोग्य-रक्षणाचे कार्य सुरू केले. ते ह्या संस्थेचे चेअरमन होते व उत्तम रीतीने आणि निरपेक्ष सेवा केल्याबद्दल या संस्थेचे सन्माननीय व आजीव सभासदांचे (Hon. Life Membership) प्रमाणपत्र माननीय राष्ट्रपती यांच्या सहीचे त्यांना मिळाले. इंडियन रेड क्रॉस सोसायटी व ब्लड बँक काढण्यात त्यांचा पुढाकार आहे. भारत पाकिस्तान व बांगला पाकिस्तान देश ह्या युद्धाच्या वेळी 'प्रथमोपचाराचे अनेक वर्ग त्यांनी चालविले. १९७३ मध्ये नागरी संरक्षण 'दलाचे सभासदत्व स्वीकारून परीक्षा दिली व उत्तम कामगिरीबद्दल त्यांना Officer Commanding Causualty Service C. D.) म्हणून नेमण्यात आले.

ते Jail Visitor तसेच ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. नाटचाची त्यांना फार आवड आहे व महाराष्ट्र राज्य नाटच स्पर्धेतील नाटकांत उत्कृष्ट भूमिका केल्याबद्दल प्रशस्तिपत्रक मिळाले आहे. अनेक नाटकात पारितोषकें मिळविली आहेत. त्यांनी एकूण ६०–७० नाटकांतून निरनिराळ्या प्रकारच्या भूमिका यशस्वी रीत्या केल्या आहेत. सुधाकर, देवमाणूस, फाल्गुनराव, ओंकार (आग्र्याहून सुटका) ह्या त्यांच्या भूमिका फार गाजल्या.

मधून मधून ते लेख लिहितात. आतापर्यंत १०–१५ ललितनिबंधवजा लेखन व 'गजाआडील जग' म्हणून तुरुंगातील जीवनावर लेख लिहिले आहेत. तीन नाटिका पण लिहिल्या असून रेडिओवर आरोग्य विषयावर ६–७ व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्या वेळचे सभापती माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा त्यांच्या मित्रमंडळाने जाहीर सत्कार केला.

ते उत्कृष्ट वक्ते असून स्वभावाचे फार मोकळे व विनोदी आहेत. लहान मुलांचा त्यांना फार ओढा आहे.

आज वयाची ६३ वर्षे पूर्ण झाली तरी त नेहमी कार्यान्वित असतात. Empty mind is Devil's workshop हे तत्व ते मानतात.

त्यांच्या या हुरूपाचे कारण विचारले तर ते सांगतात, 'मी नसता उपद्व्याप अगर उचापती करीत नसतो.'

☐ ☐ ☐

: १८ :

सामाजिक संस्था

धर्मार्थ डोळ्यांचा दवाखाना–सुमारे ४० वर्षापूर्वी कल्याणातील थोर समाजसेवक व काँग्रेस स्वातंत्र्य–सैनिक डॉ फडके व डॉ. मोडक यांनी सोशल सर्व्हिस लीग ही संस्था स्थापन करून मुंबईपासून दूर असलेल्या व कल्याणच्या १०० मैलांच्या परिघात धर्मार्थ डोळ्यांचा दवाखाना गोरगरिबांसाठी सुरू केला; व कल्याण परिसरातील लाखो लोकांचा दुवा घेतला; आज तर हा दवाखाना कल्याण शहराचे भूषण होऊन बसलेला आहे. डॉ. मोडक व डॉ. वि. वा. फडके



समाजसेवक डॉ. भा. का. मोडक.

यांना कार्यारंभापासून आतापर्यंत सहाय्य व सेवा करणारे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. ओक हे मिळाले आहेत. हे हॉस्पिटल म्हणजे ह्या त्रिमूर्तीचे खरे स्मारक झालेले आहे. यांच्या या कार्यामुळे कल्याणमधील बाहेरील इतर निष्णात नेत्ररोगतज्ज्ञ, शल्यचिकित्सक वगैरे तज्ज्ञ डॉक्टरांना प्रेरणा मिळून असंख्य जणांनी या दवाखान्यासाठी आपली विनामूल्य सेवा देऊन येथील जनतेचे धन्यवाद मिळविले आहेत व आपल्या

Scanned with Car

रुग्णसेवा व्यवसायाचे ब्रीद राखले आहे. या हॉस्पिटलला आता स्वतःची इमारत झाली असून तेथे नेत्ररोग्यांची सर्व प्रकारची ऑपरेशन्स व औषधोपचाराची तर सोय आहेच; परंतु इतरहि मोठमोठी ऑपरेशन्स करण्याची सोय करण्यात आलेली आहे. कल्याणला गरीबाला अल्प मोबदल्यात फार मोठी सोय उपलब्ध झालेली आहे. बालरोगचिकित्सा, स्त्रीरोग-चिकित्सा वगैरे वैद्यकीय व्यवसायातले सर्व भाग या ठिकाणी चालू आहेत. एक्स-रे ची सोय या ठिकाणी आहे. हा दवाखाना कल्याण शहराचे भूषण झालेला आहे. तर त्याचे त्रिमूर्ती संचालक डॉ. वि. वा. फडके, कै. डॉ. मोडक व डॉ. ओक हे आपल्या कार्याने अमर झालेले आहेत.

ब्राह्मणसभा, कल्याण

कल्याण हे गाव ब्राह्मण समाज असलेले फार जुने गाव आहे. येथील ब्राह्मण-समाज एके काळी गृहस्थी पेशाचा व संपन्न होता. येथील कार्ये सहकार्याने व एको-प्याने होत होती. निरनिराळ्या कार्याकरिता निरनिराळे निधी उभारले होते. पूर्वी सर्व व्यवहार शब्दावर, विश्वासावर चालत असत. परंतु बदलत्या परिस्थिती-प्रमाणे आपल्या ब्राह्मण समाजाचीही एखादी संस्था असावी व निरनिराळे त्रुटित निधी एकत्र करावे या सद्हेतूने गावातील एक पुढारी व सधन नागरिक कै. कृष्णाजी केशव फडके यांनी शके १८४० च्या फाल्गुन महिन्यात कै. वासुदेव गंगाधर बोरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरवून गावातील सर्व निर-निराळे निधी व रकमा एकत्रित करून ब्राह्मण वर्गाची संस्था स्थापून त्या संस्थेच्या देखरेखीखाली ठेवाव्यात असा प्रस्ताव मांडला. त्याचा विचार होऊन आश्विन शु. ११ शके १८४१ दि. ५-१०-१९१९ रोजी ब्राह्मणसभेची स्थापना झाली व तीस " ब्राह्मण सार्वजनिक सभा " असे नामाभिधान दिले गेले; त्याप्रमाणे एकत्र आलेले निधी व संस्था पुढीलप्रमाणे-देवस्थाने (१) श्रीरामजी (२) त्रिविक्रम (३) श्री महालक्ष्मी (४) श्री दत्तमंदिर (५) श्रीगणपती मंदिर. यांपैकी पहिली तीन कै. गोपाळराव पिंपळखरे यांचेकडे वहिवाटीस होती. चवथे कै. लक्ष्मण वासुदेव भिडे यांचेकडे व पाचवे कै. विष्णु पांडुरंग यांचेकडे वहिवाटीस होती.

निधि–(१) फरा निधी (२) मुष्टि निधी (३) सव्या आणा निधी. यापैकी नं. १ कै. लक्ष्मण विष्णू फडके (२) श्री राजाभाऊ भिडे व कै. श्री परशुराम रामचंद्र जोशी (मेघःशाम) व क्र. ३ श्री. माधव प्रभाकर ओक यांजकडे होते.

संस्थेने केलेले कार्य–(१) संस्थेची स्वतःची इमारत मंगल कार्यासाठी खरेदी करून जनतेची मोठी अडचण दूर केली आहे. इतर सर्व मंगल कार्यापेक्षा कमी मोबदल्यात हे मिळते. (२) १९२५ साली पारनाक्यावरील पिंपळाचे पाराची दुरुस्ती करुन त्यावर वड व पिंपळ यांची रोपे लावून त्यांची मुंजही यथाविधी

लावली. (३) १९३७ साली ३००० रु. खर्च करून मोडकळीस आलेल्या श्री रामाजीचे देवळाचा जीर्णोद्धार केला. यासाठी वर्गणीही जमा करण्यात आली होती. (४) ९-११-१९४० रोजी सभेने पुढाकार घेऊन ब्राह्मण समाजाचे गरजे-साठी थोडया व्याजाने कर्ज मिळावे या उद्देशाने, पुरेशी रक्कम शेअर रूपाने जमा करून कल्याण येथे परस्पर सहाय्यक पतपेढी स्थापन केली व कायद्यानुसार (मर्यादित) लिमिटेड केली आहे. तिचा फायदा सभासद व सभासद नसलेले ब्राह्मण गृहस्थ घेत आहेत.

(५) **उत्तरक्रियागृह**–अंत्यविधीच्या वेळी उत्तरक्रिया करावयाची असते. यासाठी शेणाळे तळयावर जावे लागते व तेथे उन्हात, पावसात, झाडाखाली बसून हे कार्य उरकणे भाग पडत असे. ब्राह्मणसभेने पुढाकार घेऊन व कै. वासुदेव गोपाळ साठे यांचेकडून २००० रुपये व १००० रुपये इतरेजनांकडून देणगी रूपाने मिळवून तेथे उत्तरक्रियागृह बांधले. या इमारतींचा उपयोग सर्व हिंदूस होत आहे.

(६) **स्मशानसुधारणा**–खाडीवरील हिंदू दहनभूमीत पाण्याची मोठी गैर-सोय होती हे जाणून ब्राह्मणसभेने पुढाकार घेऊन अखिल हिंदूंचे मदतीने २२०० रु. खर्च करून पक्की विहीर बांधली. कल्याण नगरपालिकेनेही या कार्यासाठी संस्थेच्या विनंतीला मान देऊन ५०० रु. ची देणगी दिली. (७) गरीब विद्यार्थ्यांना फीचे सहाय्य (८) अंत्यविधिकरिता सहाय्य (९) धार्मिक कार्ये व विद्वान् भिक्षुक ब्राह्मणांची संभावना व सत्कार (१०) ज्या ज्या वेळी परमपूजनीय शंकराचार्य कल्याण शहरात येतात, तेव्हा तेव्हा ग्रामस्थांच्या सहकार्याने त्यांची योग्य व्यवस्था ठेवणे.

नमस्कार मंडळ, कल्याण

ह्या मंडळाची स्थापना शके १८४६ विजयादशमी रोजी सन १९२४ मध्ये झाली. त्याचे संस्थापक कल्याणचे प्रसिद्ध माजी मुख्याध्यापक श्री. रामचंद्र वैजनाथ भिडे, श्री. भ. गं. चोळकर, श्री. चिं. वै. भिडे व श्री दि. बा. जोगळेकर हे होते. साष्टांग नमस्काराचा व्यायाम विद्यार्थ्यांकरिता सुरु करावा व त्याची त्यांना गोडी लागावी हा त्यातील हेतू होता. म्हणून प्रतिवर्षी नमस्कारांचे सामने भरवून बक्षिसे देण्याचा उद्योग सुरु झाला. पुढे मंडळातील एक संस्थापक कल्याण सोडून गेल्यामुळे प्रख्यात नगरसेवक श्री. गं. दि घारपुरे मंडळास येऊन मिळाले. नमस्कार व्यायाम लोकप्रिय होण्याकरिता १०८ नमस्कार घालून दाखवणाऱ्या प्रत्येकास बक्षिस मिळावे अशी योजना आखून मंडळाने कार्यक्षेत्र विस्तृत केले. या सर्व खर्चासाठी द्रव्यनिधी जनतेकडून वर्गणीरूपाने व मंगलकार्यप्रसंगी त्या लोकांकडून मदतफंड मिळवून

करण्यात येत असे. दरवर्षी सामने सुभेदार वाडा, त्रिविक्रम मंदिर येथे घेण्यात येत. थोड्याच काळात या संस्थेस आणखी एक सभासद मिळून ही नमस्कार पंचकडी पूर्ण झाली. पुढे मंडळाचे कार्यक्षेत्र नमस्कारापुरतेच न राहता त्यात जोर, बैठका, लेजिम, पोहणे, धावणे, लांब उडी, उंच उडी वगैरेपर्यंत क्षेत्र वाढले. नंतर लक्ष, दहा लक्ष नमस्कारांची अनुष्ठाने वगैरे कार्यक्रम होऊ लागले. लोकांचा याबाबतचा उत्साह वाढला. या मंडळाचे दुसरे वैशिष्ठ्य म्हणजे या सर्व सामन्यातील विजयी वीरांना कोणातरी मोठ्या सन्माननीय अध्यक्षाकडून बक्षिसे देणे व त्याचे त्या निमित्ताने भाषण नागरिकांना ऐकवून ज्ञानलाभ व थोर परिचय करून देणे. या निमित्ताने औंध संस्थानाधिपती श्री. भवानराव पंडित, नमस्कारमहर्षि; ज. स. करंदीकर संपादक, केसरी, श्री. ग. पां. परांजपे वैद्य सांगली, मसूरकर महाराज, श्री. नानासाहेब चाफेकर बदलापूर, श्री. केशव रामचंद्र कानिटकर, प्रिन्सिपॉल, फर्ग्युसन कॉलेज पुणे, श्रीमंत सरदार दत्तात्रय चिंतामण मुजुमदार, बडोदे, लष्करी शिक्षणाचे पुरस्कर्ते डॉ. मुंजे, श्री. जगन्नाथ गणेश गुणे ऊर्फ श्रीमत् कुवलयानंद 'कैवल्यधाम' आरोग्य संस्थेचे संचालक लोणावळे व जनरल नानासाहेब शिंदे, बडोदे, एवढ्या सन्माननीय व्यक्तींची भाषणे ऐकावयास मिळून परिचय झाला. या सर्वांनी एकमुखाने हाच उद्‌गार काढला की 'सूर्यनमस्कार व इतर व्यायाम पद्धतीसाठी एवढा पद्धतशीर प्रयत्न करणारी व प्रचार करणारी छोटयाशा गावातील ही मोठी संस्था आहे.' यानंतरच्या काळात संस्था लोकप्रिय होऊन जनतेने उदार हस्ते देणग्या वर्गण्या देऊन मंडळाला इमारत व स्वतःचे क्रीडांगण मिळाले. संस्थेने तेथे एक व्यायामशाळा व मैदानावर सामने, खेळ वगैरे सोय करून दिली. परंतु पुढे संस्थेचे संस्थापक मंडळ आज बाजूला राहून एका राजकीय पक्षाच्या ताब्यात झुंड लोकशाही मार्गाने गेले आहे. नमस्कार मंडळाने साक्षात नमस्कार घातला आहे.

महिला-मंडळ :– कल्याणातील सुप्रसिद्ध समाजसेविका, माजी नगराध्यक्षा श्रीमती सरस्वतीबाई फडके ह्यांनी २८-१०-१९३४ रोजी राणी लक्ष्मीबाई या भारतकन्येच्या पुण्यतिथीच्या दिवशी कल्याण येथे महिला मंडळाची स्थापना केली. कल्याणमधील भगिनींमध्ये एकोपा निर्माण करून जमेल तेतढी समाजसेवा करावी हे मंडळाचे ध्येय ठरविण्यात आले. भगिनींची सेवा, सुधारणा व न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्यासाठी बद्धपरिकर राहणे हे मंडळाचे ध्येय निश्चित करण्यात आले. पक्षोपपक्षांच्या राजकारणाला मंडळात स्थान नाही. गेल्या ४१ वर्षांत स्त्री-जीवनातील सर्व महत्वाच्या प्रश्नांचा विचार, उच्चार व आचार करून मंडळाने भगिनीवर्गाची जास्तीत सेवा केली आहे. ठाणे जिल्हा महिला मंडळाची स्थापना करण्याचे श्रेय कल्याणच्या महिला मंडळाने मिळवले. मंडळाने दसरा-संमेलन, टिळक पुण्यतिथी, काव्यगायन, ठाणे जिल्हा महिला परिषदेचे अधिवेशन, साक्षरता-

Scanned with Car

प्रचार, पेटीवर्ग, कागदाची फुले व हिंदी शिक्षणाचे वर्ग, शारीरिक शिक्षणाचा वर्ग, इंग्रजी शिक्षणाचा वर्ग, नर्सिंगचा वर्ग, वादविवाद सभा इत्यादि कार्यक्रम आचरून कल्याणातील महिलांच्या प्रगतीला गती दिली. दहाव्या वर्षी महाराष्ट्र महिला मंडळाकडून कल्याण महिला मंडळाला, ठाणे जिल्हा महिला मंडळाला व महाराष्ट्र महिला मंडळात जोडण्यात आले. कल्याण महिला मंडळाने भगिनींसाठी, एक १५ दिवसांचा वार्षिक अभ्यासवर्ग सुरू केला. त्या प्रसंगी निरनिराळ्या ठिकाणांचे प्रसिद्ध, अनुभवी, व्यासंगी विद्वान् यांच्या व्याख्यानांचे ज्ञानसत्र सुरू केले ते आजतागायत चालू आहे. सहलींचाही कार्यक्रम आयोजिला जातो. १९४७-४८ मध्ये गरीब स्त्रियांना आर्थिक मदत मिळावी म्हणून दहा दहा रुपयांचे शेअर्स काढून मंडळाने सहकारी उद्योग मंदिराची स्थापना केली. ठाणे जिल्ह्यातील ही पहिली उत्पादक सहकारी संस्था होय. गरजू स्त्रियांना मेहनत मोबदला देऊन पापड, लोणची, मसाले वगैरे संसारोपयोगी वस्तू तयार करून त्यांचे दुकान काढण्यात आले. श्री. दौलतराव झुंजारराव ह्यांनी ह्यासाठी आपल्या मार्केटमध्ये विनामूल्य जागा देऊन महिला मंडळाला उपकृत केले. रेशनिंगच्या काळात सरकार कडून परवानगी घेऊन मंदिराने एक धान्याचे व कापडाचे रेशन दुकानही चालविले होते. उद्योग मंदिराच्या पहिल्या अध्यक्षा श्रीमती गंगाबाई वैद्य यांनी हुशारीने व आपुलकीने हे काम करून स्त्रीची कर्तबगारी दाखवली. महिला मंडळाने नंतर सहकारी सेक्रेटरी शिक्षणाचा वर्ग चालू केला. तसेच महिलांसाठी शिवणकामाचे वर्ग सुरू केले. १९५१ साली मंडळाला नगरपालिकेने इमारतीसाठी अल्प दराने जागा उपलब्ध करून दिली; व पुढील तीन वर्षांत मंडळाचे मालकीची इमारत व हॉल उभा झालेला आहे. या कामी श्रीमती गंगाबाई वैद्य व सरस्वतीबाई फडके यांचे परिश्रम फार महत्वाचे ठरले. मंडळाला ३९ वर्षे झाली आहेत. मंडळ कोणत्याही राजकीय पक्षाच्या हातचे न बनल्यामुळे काही राजकीय पक्षांनी प्रतिस्पर्धी मंडळे काढली, तरी मंडळाचे कार्य तितक्याच जोमाने चालू आहे.

सार्वजनिक वाचनालय, कल्याण

या संस्थेची स्थापना १८७८ मध्ये झाली. त्याचे संस्थापक कोण ह्याची माहिती मिळत नाही. परंतु १८७८ मध्ये कल्याणचे त्या वेळचे एक नगराध्यक्ष श्री. सदाशिव मोरेश्वर साठे ह्यांचे खाजगी डायरीत १८७८ पासून दरमहा १ रु. वर्गणी वाचनालयाची दिल्याची नोंद आढळते. पुढे १८८४ साली संस्थेने सध्या असलेल्या जागी जुन्या स्वतःच्या इमारतीत प्रवेश केला. ह्या इमारतीचे उद्‌घाटनाचे कार्य म्युलकसाहेब यांनी केले. काही काळ तर म्युलक जनरल लायब्ररी असेच त्याचे नाव होते. पुढे लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी चळवळीचे वेळी हे इंग्रजी नाव बदलण्याची चळवळ होऊन त्यातून सार्वजनिक वाचनालय हे लोकमान्य नाव जन्म पावले.

१८९६ सालच्या प्लेग काळापासून काही वर्षे संस्थेची दुर्दशा झाली. परंतु श्री. शंकर रामकृष्ण सोहोनी यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून १९१६ च्या सुमारास वाचनालयाला चांगले दिवस आणले. १९१६ ते १९२२ ह्या काळात श्री. गणेश श्रीधर जोशी यांनीही सोहोनींप्रमाणेच वाचनालयाचा उत्तम सांभाळ केला. याच वर्षी वाचनालयाची घटना तयार होऊन गावात मोफत वाचनालयाची शाखा निघाली. ही शाखा १९३३ पर्यंत चालू राहिली; परंतु १९३४ च्या सुमारास वाचनालय जवळ जवळ बंद पडले. १९३४ ते १९४० हा काळ वाचनालयास चांगला गेला. १९३५ मध्ये ३-२-१९३५ रोजी साहित्यसम्राट कै. तात्यासाहेब केळकर यांचे अध्यक्षतेखाली वाचनालयाचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. परंतु १९४० ते १९५० हा काळ संस्थेला बरा गेला नाही. त्यानंतर कै. डॉ. चिं. बा. वैद्य, श्री. धारप वकील व श्री. द. म. जोग यांनी अहोरात्र कष्ट करून वाचनालय तगवले; येवढेच नव्हे तर वाचनालयाचे जागेत दुकानांचे छोटे गाळे काढून निश्चित स्वरुपाचे उत्पन्न निर्माण केले. तथापि कार्यकारी मंडळात वादविवाद निर्माण होऊन ४।५ वर्षे फुकट गेली. त्यानंतर श्री. प्रभाकर संत, डॉ. मोकाशी, श्री. ग. कृ. फडके वगैरे मंडळींनी १९५५ मध्ये वाचनालयाचे कामास नव्या जोमाने सुरवात करून अंतर्गत सुधारणा भरपूर केल्या व रोटरी क्लब व जनता यांचे सहकार्याने आजची प्रशस्त वास्तू उभी केली आहे. तसेच वाचनालयास पुन्हा वाईट दिवस येणार नाहीत अशी चोख व्यवस्था निर्माण करण्याचा पुष्कळसा यशस्वी प्रयत्न केला आहे. १९६० नंतर श्री. मधुकरराव मालसे, डॉ. वझे वगैरे मंडळींनी अंतर्गत व्यवस्था, ग्रंथसंपत्तीत भर, व्यवस्थापन, सभासदवृद्धी यांत मोठे लक्ष घालून सार्वजनिक वाचनालयाला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले आहे. सध्या विद्यार्थी वर्गाच्या अभ्यासाची सोयही करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा जगन्नाथाचा रथ कुशल सारथ्यांनी आजपर्यंत अनेक अडचणींतून योग्य मार्गावर आणलेला आहे. परंतु सारथी निवडताना योग्य दक्षता घेत गेल्यासच हा रथ जनतेच्या अधिक जवळ जाऊन जनतेची ज्ञानतृषा तृप्त करू शकेल.

मराठा ज्ञातिसमाज शिक्षण मंडळ, कल्याण

मुद्रक व प्रकाशक

श्री. रा. रा. शंकरराव जयरामराव झुंजारराव, एम्. एल. सी., अध्यक्ष म. ज्ञा. शि. मं. कल्याण

उद्देश : (१) मराठा व तत्समान शिक्षणामध्ये मागासलेल्या ज्ञातीमध्ये शिक्षणप्रसार करणे. (२) मागासलेल्या सर्व जातींमध्ये प्रेम व ऐक्यभाव उत्पन्न

करणे (३) गरीब व शिक्षण संपादन करण्याची गैरसोय असलेल्या विद्यार्थ्यां-करता शहरांचे ठिकाणी विद्यार्थी वसतिगृहे स्थापन करणे.

इतर समाजापेक्षा मराठा आदिकरून सर्व मागासलेल्या जाती शिक्षणाचे अभावी फारच दैनावस्त झाल्या आहेत. त्यांना उपदेश व योग्य ती मदत करून शिक्षणद्वारा त्यांचे ठिकाणी आपलेपणाची जाणीव उत्पन्न करून त्यांचा संसारगाडा सुरळीतपणे हाकण्यास त्यांना समर्थ करून आपापल्या हक्कांची जाणीव करून देणे हे समाजाचे कर्तव्य आहे.

समाजाची स्थिती–येथे मागासलेल्या वर्गापैकी मराठा, आगळे, भंडारी, भोई, धनगर, धोबी, गवळी, गवंडी, गुरव, न्हावी, कोळी, कुंभार, कुणबी, लोहार, माळी, सुतार, तेली वगैरे जातींची वस्ती आहे. शेतीवाडी, थोडाबहुत व्यापारधंदा व बहुशः समाज मोलमजुरी करून आपला निर्वाह करीत असतो. प्रत्येक समाज आप-पल्या परीने स्वजातीचे कार्य करीत आहे. परंतु मराठा समाजात बहुतेक शेतकरी व मजूरवर्ग असल्यामुळे परावलंबी बनून त्यास परक्यांच्या तोंडाकडे पहावे लागते. मराठादि मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार व्हावा, या हेतूने अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेने आपले कार्य सुरू केलेच होते व अशा तऱ्हेच्या अनेक प्रकारच्या लोकजागृतीच्या चळवळी सुरु झालेल्या पाहून कल्याण येथील मराठा बांधवांस स्फूर्ति होऊन आपल्या कल्याण येथील मराठा समाजात काहीतरी जागृती उत्पन्न होऊन शिक्षणप्रसार व्हावा, ऐक्य वाढावे, समाज दुर्व्यसनापासून परावृत्त होऊन कर्जबाजारीपणातून मुक्त व्हावा यासाठी समाजाची स्थापना करण्यात आली.

कल्याण शहरात पूर्वीपासून श्रीगणपती उत्सव होत असत व बहुतेक समा-जाचेही मेळे निघत असत. मात्र ते खासगी स्वतःचे म्हणून काढले जात असत. इतर समाजाप्रमाणे मराठा समाजाचा मेळा किंवा गणपती उत्सव असे काही नव्हते, अशा वेळी कै. हरीभाऊ मुकुंद गायकवाड (मृत्यु ११ मे १९२७) इतर काही मंडळी आपल्या पुढील कार्यास लागली व समाजाचा गणपती सन १९१९ साली श्री संत तुकाराम थिएटर (प्रकाश टॉकीज) मध्ये बसविला. त्यानंतर पुढील वर्षी म्हणजे सन १९२० रोजी ' शिवजयंति उत्सव ' साजरा करण्यात आला.

समाजाची जंगी सभा श्रीसंत तुकाराम थिएटरमध्ये भरली होती. (११ जुल १९२०) सभेचे अध्यक्ष होते नाशिक येथील श्री उदोजी मराठा बोर्डिंगचे सुपरिंटेंडेंट श्री. रावसाहेब भाऊसाहेब थोरात. सभेस बरीच लांबलांबची मंडळी आली होती. मुंबईहून शेट पांडुरंग जावजी चौधरी, मेजर कृष्णराव अर्जुनराव केळुसकर, श्री. रामचंद्रराव वंडेकर, श्री. गणपतराव मोरे, श्री. रामचंद्रराव गोळे, श्री. सावळाराम महादजी दौंडकर, श्री. दामोदर सावळाराम यंदे ही मंडळी आली होती.

Scanned with Car

सभेत रात्रीची शाळा काढावी असे ठरले. त्याप्रमाणे वामन बाबाजी ठाणगे यांचे सासरे धर्माजी जानु पाटील, रहाणार मानीवली, ता. कर्जत यांच्या कल्याण येथील तेलंगपुऱ्यात असलेल्या इमारतीचा एक मजला बिनभाड्याने वापरण्याची परवानगी दिली. शिक्षकाची अडचण भासताच समाजातील रा. रा. शंकर पांडुरंग टुमकर यांनी अल्प पगार घेऊन रात्रीचे शाळेवर शिक्षकाचे काम करण्याचे कबूल केले. अशा रीतीने शाळेला सुरुवात झाली. त्या वेळी दिवसा कामावर जाणारी १५ ते २० मुले त्या शाळेत शिक्षण घेऊ लागली.

पुढे दिवसाही शाळा भरवावी असे ठरले, तेव्हा रा. रा. शंकर पांडुरंग टुमकर यांनी आपल्या हातून समाजसेवा घडावी म्हणून आपल्या कापडाच्या दुकानावर असलेल्या नोकरीस फाटा देऊन मोठ्या उत्साहाने येथे मिळणाऱ्या पगारावर शिक्षकाचे काम करण्याचे पत्करले. पुढे ते या शाळेचे हेडमास्तर म्हणून काम करू लागले.

मे १९२२ मध्ये समाजाचे मोठे अधिवेशन भरविण्यात आले होते. मोठमोठे सरदार या अधिवेशनास आले होते. त्यांत सरसेनापती सरदार खंडेराव दाभाडे हेही होते व स्वतः कोल्हापूरचे छत्रपति राजर्षि शाहूमहाराज हे हजर रहाणार होते. त्या वेळी त्यांचा मुक्काम मुंबई येथे होता. पण अकस्मात त्यांच्या निधनाची बातमी कल्याणास समजताच अधिवेशन बंद करण्यात येऊन सर्व मंडळी मुंबईस दर्शनास गेली.

या अधिवेशनास १२००० हजार रुपये खर्च आला. पैकी वर्गणी ६००० होती व ६००० हजार शंकरराव जयराम झुंझारराव यांनी पदरचे भरले होते. समाज त्यांचा ऋणी आहे.

१९२२ साली विजयादशमीचे दिवशी दसरा संमेलन कै. श्री. रावबहादूर खासेराव जाधव, बडोदे, यांचे अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आले.

सन १९२३ मध्ये श्री शिवजयंति उत्सव कल्याण येथील श्री. मे. अबदुल गफूर गुलामसाहेब ढोण, ऑनररी मॅजिस्ट्रेट यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला व शाळेतील विद्यार्थ्यांना बक्षीसे वाटण्यात आली.

ता. ३१–१–१९२६ रोजी समाजातर्फे येथील श्री लक्ष्मी वेंकटेश्वर प्रेसचे मालक श्रीमंत शेठ रंगनाथ खेमराज व नाशिक जिल्ह्यातील सुकेणे येथील श्रीयुत हरी अमृत ऊर्फ कोंडाजी पाटील यांस रावसाहेब पदवी मिळाल्यामुळे श्रीं. सखाराम गणेश फडके यांचे अध्यक्षतेखालीं त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

समाजाचे बोर्डिंगसाठी ग्वाल्हेरचे श्रीमंत मेजर सरदार मालोजीराव नरसिंह-राव ऊर्फ बाळासाहेब बडे शितोळे यांनी ३ हजार रुपये दिले. बोर्डिंगसाठी जागा

कल्याण येथील आग्रा रोडवर रा. मेहेंदळे यांची असलेली जागा सुमारे ४ एकर व तिच्या लगत असलेली एक इमारत ९००० रुपये किंमतीस घेण्याचे ठरविले. त्यापैकी त्यांस ३५०० रुपये देऊन वरील इस्टेट फरोक्त करून कबजात घेतली होती.

सेंट जॉन ॲब्युलन्स असोसिएशन
कल्याण केंद्र

संस्थेची स्थापना सन १९४२. पुनर्रचना १९६५.
मूळ सभासद संख्या :–१२ मात्र.
हल्ली सभासद संख्या :–
सन्याननीय आजीव सभासद :–३.
सन्माननीय आजीव सभासद :–९.
वार्षिक सभासद :–९५.

प्रथमोपचार वर्ग : एकूण ५२ वर्ग घण्यात आले. पैकी
प्रथमोपचार १ ली परीक्षा ६८९ उत्तीर्ण.
प्रथमोपचार २ री परीक्षा ४७ उत्तीर्ण.
प्रथमोपचार ३ री परीक्षा २४ उत्तीर्ण.
प्रथमोपचार ४ थी परीक्षा ३ उत्तीर्ण.

गृहपरिचारिका वर्ग :– एकूण ७ वर्ग (सात) घेण्यात आले. पैकी ७३ स्त्री–पुरुष उत्तीर्ण झाले.

प्रथमोपचार व गृहपरिचारिका परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थ्यांना संस्थेतर्फे प्रशस्तिपत्रके व बोधचिन्हे देण्यात आली.

संस्थेचे इतर कार्य :—

पोलिओ (बालपक्षघात–प्रतिबंधक लस) :– १९६६ ते १९७४. आजपर्यंत जवळ जवळ २४७९३ बालकांना प्रत्येकी तीनप्रमाणे लस पाजण्यात आली.

ट्रिपल इंजेक्शने (डांग्या खोकला, धनुर्वात, घटसर्प) प्रतिबंधक आजपर्यंत जवळजवळ ८३६८ बालकांना प्रत्येकी तीन इंजेक्शने देण्यात आली.

बी. सी. जी. क्षय प्रतिबंधक लस :—

लायन्स क्लब कल्याणच्या सहकार्याने १९७३ पासून प्रत्येक महिन्याच्या १ ल्या व ३ ऱ्या रविवारी मोफत दिले जाते. (नगरमंदिर सकाळी ८-३० ते ९-३० पर्यंत). मात्र पोलिओ-ट्रिपलची प्रतिबंधक लस देण्याकरिता आठवड्यातून

दर रविवारी नगरमंदिर सकाळी ८ ते ९-३०

दर रविवारी सेंच्युरी रेऑन हॉस्पिटल १० ते ११.

दर गुरुवार डॉ. गो. रा. म्हसकर मुरबाडरोड दवाखाना, सकाळी ८ ते ९.
प्रत्येक महिन्याच्या १ ल्या रविवारी सं. कोळसेवाडी
डॉ. एस. व्ही. दीक्षित स. ५ ते ६ पर्यंत शिबीरें भरविण्यात येतात.

याचा उपयोग कल्याणखेरीज कसारा; कर्जत व मुंब्रापर्यंतचे नागरिक करून घेत असतात.

क्रीडामहोत्सव :– तालुका व जिल्हा क्रीडामहोत्सवात क्रीडांगणावर जवळ जवळ ९७१ खेळाडूंना प्रथमोपचार देण्यात आले.

बाहेरून आलेल्या खेळाडूंना, आजाऱ्यांसाठी खास औषध उपचार संस्थेमार्फत मोफत केला जातो.

रुग्णोपयोगी साहित्य–संस्थेतर्फे रोज ५ पैसे भाडे घेऊन रुग्णोपयोगी साहित्य देण्याचे कार्य केले जाते. आजपर्यंत १८३ नागरिकांनी (आजारी) फायदा घेतला.

वरील संस्थेतर्फे 'रुग्ण सेवा केंद्र' डोंबिवली येथे २६ जानेवारी १९७४ पासून सुरू करण्यात आले. याचे उद्‌घाटन श्रीयुत आमदार नकुल पाटील यांनी केले.

संस्थेच्या इतर शाखा–इंडियन रेडक्रॉस सोसायटी ही होय. १९६८ साली ही संस्था कल्याणमध्ये सुरू करण्यास परवानगी मिळाली.

चेअरमन डॉ. ग. गं. रायकर, व्हा. चेअरमन डॉ. सु. य. फडके, खजिनदार डॉ. सु. कृ. चित्रे व सेक्रेटरी जनरल श्री. अ. कृ. आनिखिंडी यांनी संस्था सुरू करुन १९७१ साली रक्तपेढी काढण्याचे ठरविले. प्रत्यक्ष कार्यास (रक्तपेढी) सुरुवात १९७२ पासून झाली. रक्तपेढीसाठी कल्याण नगरपालिका अधिकारीवर्ग, सभासद व कामगारवर्गांनी सर्वात मोठा वाटा उचलला होता.

१९७३ साली रोटरी रेडक्रॉस ऑक्सिजन बँक सुरू करण्यात आली.

सेवापथक– २६ जानेवारी १९७४ रोजी डॉ. देशपांडे, इंडियन मेडिकल असोसिएशन सेक्रेटरी महाराष्ट्र यांच्या हस्ते '**सेवापथक**' उद्‌घाटन करण्यात आले.

सेवापथकाचे कार्यः– संस्थेतर्फे घरोघर जाऊन रोग्यांची सेवा केली जाईल. औषधाचा साठा करून (टॉनिक्स) मोफत औषध देण्याचे कार्य सुरू करण्यात आलेले आहे.

रुग्णवाहिका नसल्यास संस्थेतर्फे माफक दरात गावातल्या गावात रोग्याला डॉक्टराकडे नेण्याची सोय सेवापथकातर्फे केली जाते.

सेवापथकातर्फे लवकरच कार्डिओग्राम व पॅथॉलॉजी शाखा सुरू करण्यात येणार आहे.

कै. मनुबाला मोघे सूतिकागृह कल्याण, रजिस्टर्ड

सदरहू संस्था डॉ. गणेश गंगाधर रायकर यांनी त्यांच्या मावशी कै. लक्ष्मीबाई मोघे (शिक्षिका, मुंबई नगरपालिका) यांचेकडून रुपये ५००० घेऊन त्यांची मुलगी कुमारी मनुबाला मोघे हिचे स्मरणार्थ मुक्काम चौक, तालुका कर्जत (आता खालापूर तालुका) जिल्हा कुलाबा येथे मुंबईतील सुप्रसिद्ध डॉक्टर हरी विश्वनाथ टिळक यांचे हस्ते तारीख १५ जानेवारी १९३५ रोजी स्थापन केली.

सदरहू सूतिकागृह चौक येथे तीन वर्षेपर्यंत अत्यंत भरभराटीने काम करीत असताना दुर्दैवाने गावातील रहिवाशांच्या आपापसातील भांडणामुळे चौक येथील काम बंद करून १५ जानेवारी १९३८ रोजी कल्याण येथे हलविले. सदरहू संस्थेची सर्व जबाबदारी व ऑनररी मेडिकल ऑफिसर म्हणून पंचांच्या संमतीने डॉ. रायकर हेच पहातात.

कल्याणमधील अशा प्रकारचे खाजगी स्वरूपातील धर्मादाय सूतिकागृह हे प्रथम स्थापन झालेले आहे.

सूतिकागृहातर्फे प्रसूतिकार्याबरोबरच आरोग्याचा प्रचार करणे, माता-बालसंगोपन याविषयी सदीप व्याख्यानद्वारा प्रचार करणे ही कार्ये सुरू झाली व त्याप्रमाणे कल्याण व आजूबाजूचा परिसर येथे आरोग्याचा प्रसार करण्यात आला.

याखेरीज गरजू व गरीब स्त्रियांना मासिक शिष्यवृत्ती देऊन दाई शिक्षण देण्याचा वर्ग उघडला. आणि जवळजवळ ५०-६० भगिनींनी त्याचा फायदा घेतला. त्यापैकी काहीजणी जिल्हा परिषद व इतर खाजगी सूतिकागृहे या ठिकाणी नर्स म्हणून नोकरी करून स्वतःच्या पायावर उभ्या आहेत.

संस्था प्रसूतीसाठी म्हणून ठराविक फी घेत असली तरी अनेक गरीब स्त्रियांना फीमध्ये सवलत दिली जाते. पैसा नाही म्हणून कोणालाही प्रवेश नाकारला जात नाही.

सन १९५१ मध्ये संस्थेने आपली दुसरी शाखा अंबरनाथ येथे उघडली व जवळजवळ १६-१७ वर्षे सूतिकागृह चालविल्यानंतर डॉ. रायकर यांच्या प्रकृती-अस्थ्वास्थामुळे ही शाखा बंद केली.

आज मितीस कल्याणमध्ये १०-१२ सूतिकागृहे आहेत. त्या मानाने वरील सूतिकागृहाचे काम मंदावणे साहजिकच आहे. तरी सुद्धा कल्याण व आजूबाजूच्या खेड्यांतील जनता या संस्थेचा भरपूर फायदा घेते.

आज ही संस्था जवळजवळ ४० वर्षे कार्य करीत असून तिची सर्व जबाबदारी डॉ. ग. गं. रायकर विनावेतन सांभाळत आहेत.

संस्था चॅरिटी कमिशनरकडे नोंदलेली असून संस्थेचे सर्व हिशेब चार्टर्ड अकाउंटंट मे. खरवंडीकर आणि कुलकर्णी यांचेकडून दरवर्षी तपासून घेतले जातात.

कल्याण गायन समाज

कल्याणमधील 'कल्याण गायन समाज' ही अभिजात संगीत कलेला उत्तेजन देणारी संस्था १९२६ साली स्थापन झाली. ती कल्याणमधील सुप्रसिद्ध नागरिक कै. माधवराव रानडे वकील, यांच्या प्रेरणेने व सुप्रसिद्ध गायन कलाभिज्ञ कै. भास्करबुवा बखले यांच्या पुण्यस्मरणार्थ म्हणून. सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम व पब्लिक ट्रस्ट अधिनियम या अधिनियमांखाली रीतसर नोंदलेली ही संस्था असून गायन, वादन व तत्सम कलांची जनतेत अभिरुची उत्पन्न करणे व सदरहू कलांचा उत्कर्ष करण्यास सहाय्य करणे हा तिचा उद्देश आहे व या उद्देशाप्रमाणे या संस्थेचे कार्य आजही मोठ्या दिमाखाने चालू आहे !

या संस्थेची स्वतःची अशी भव्य इमारत प्रमुख अशा टिळक चौकात उभी असून, केवळ संगीत कलेला वाहून घेतलेली व सुमारे ४०० सभासदांच्या पाठिंब्यावर चाललेली व स्वतःचीच इमारत असलेली अशी महाराष्ट्रातील ही एकमेव संस्था असू शकेल असे म्हटल्यास ते चुकीचे ठरेल असे वाटत नाही ! कल्याणमध्ये या संस्थेचे सभासद तर आहेतच; पण कल्याणबाहेरसुद्धा या संस्थेचे सभासद आहेत हे विशेष होय !

या संस्थेच्या भरभराटीला कै. दिनकर रघुनाथ ऊर्फ काकासाहेब बर्वे, संस्थापक ह्यांचे श्रम व कार्यनिष्ठा जशी उपयोगी पडली, त्याचप्रमाणे कल्याणचे एक सन्माननीय नागरिक व पुढारी कै. ग. कृ. फडके यांचे कुशल मार्गदर्शनही उपयोगी पडले, असे म्हणावयास हरकत नाही.

मोठमोठे गायनपटू व मशहूर वादक– कलाकार यांच्या गायनवादनाचे कार्यक्रम या समाजात झाले आहेत व त्याचा फायदा समाजाच्या सदस्यांना पुरेपूर मिळाला आहे. रामकृष्णबुवा वझे, पलुस्करबुवा, मास्टर दिनानाथ, मास्टर कृष्णराव, हिराबाई बडोदेकर, बालगंधर्व, कुमार गंधर्व, बडे गुलाम अलि खाँ, मल्लिकार्जुन मनसूर, विनायकराव पटवर्धन, भीमसेन जोशी, जितेंद्र अभिषेकी, सौ. निर्मला अरुण, पं. जसराज इत्यादी गवयांचे जसे इथे कार्यक्रम झाले, तद्वत् बिस्मिल्ला खाँ, अलि-अकबर खाँ, पन्नालाल घोष, गजाननराव जोशी, वगैरे वादनपटूंचे सुरेख कार्यक्रमही समाजाच्या नेने–रानडे हॉलमध्ये झाले आहेत. कै. गोविंदराव टेंबे, श्रीमती केसर-बाई केरकर वगैरे संगीत–सृष्टीतील मान्यवर लोकांनी या संस्थेला भेटी दिल्या आहेत व समाजाच्या कार्याबद्दल चांगले उद्‌गार काढले आहेत.

कल्याण गायन समाज हा जरी कै. भास्करबुवा बखले यांचे स्मरणार्थ स्थापन झालेला असला, तरी कार्यक्रमाचे बाबतीत समाजाने कोणत्याही प्रकारची संकुचित दृष्टी ठेवलेली नाही; सर्व जातीच्या, सर्व प्रकारच्या व गायनाच्या सर्व पठडीतील

Scanned with Ca

व घराण्यांतील कलावंतांचे कार्यक्रम समाजात घडवून आणले जातात. कै. भास्कर-बुवा बखले यांची पुण्यतिथी समाजातर्फे दर वर्षी चैत्र शुद्ध ११ च्या सुमारास साजरी केली जाते. त्याचप्रमाणे संस्थेचे संस्थापक कै. दि. र. ऊर्फ काकासाहेब बर्वे ह्यांची पुण्यतिथी दिनांक १२ जून रोजी दरवर्षी साजरी केली जाते.

गायन समाजाची स्वतःची घटना असून, त्याप्रमाणे संस्थेचे कामकाज चालू असते. जरूर तेव्हा घटनेत बदल केलेला आढळेल. त्यामुळे अध्यक्षांना निर्णय देताना ही घटना बरेच वेळा मार्गदर्शक ठरते. संस्थेचे कार्य शिस्तबद्ध असल्यामुळे समाजाला जे काही यश लाभले त्याचे मर्म यामध्ये सापडेल.

घटनेच्या उद्देशाबरहुकूम गायन-वादन-कलांची अभिरुची जनतेत उत्पन्न करून व गायनवादनकलेचा प्रसार करण्यासाठी अक्षय्यतृतीया दिनांक २५।४।१९४४ च्या सुमुहूर्तावर गायन समाजातर्फे गायनवादनाचे कार्य सुरू करण्यात आले. १।८।१९५१ पासून समाजाचे एक संस्थापक कै. दि. र. ऊर्फ काकासाहेब बर्वे यांचे सन्मानार्थ '**दिनकर संगीत विद्यालय**' असे नाव या वर्गास देण्यात आले. हे विद्यालय गांधर्व महाविद्यालय मंडळ या संस्थेला गायनवादन शिक्षणाकरिता जोडले आहे व या मंडळाच्या अभ्यासानुसार या विद्यालयात शिक्षण दिले जाते. आज कल्याणचे बहुसंख्य विद्यार्थी या विद्यालयाचा फायदा घेतात. 'दिनकर संगीत विद्यालय' हे गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या परीक्षांचे आज प्रमुख केंद्र बनले आहे. या विद्यालयाचा कारभार पाहण्यासाठी गायन समाजाची कार्यकारिणी 'विद्यालय समिती' नेमते व ह्या समिती सदस्यांच्या देखरेखीखाली विद्यालयाचा कारभार चालतो.

'कल्याण गायन समाज' ही संस्था म्हणजे कल्याणच्या नागरिकांचे आज एक श्रद्धास्थान बनले आहे. या वास्तूमध्ये नेहमीच अभिजात व अमर संगीताचे सूर ऐकू यावेत असे त्यांना वाटते. कल्याणकर रसिकांना मिळत असलेला आश्रय व कार्यकर्त्यांचा प्रयत्न व उत्साह यामुळे ही संस्था नेहमीच प्रगतिपथावर असते. कल्याणकर रसिकांना मी त्यामुळे अतिशय धन्यवाद देतो !

सार्वजनिक गणेशोत्सव

लोकमान्य टिळकांनी पेशवे व संस्थानिक-सरदार घराण्यांतून थाटामाटात चालत आलेल्या गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देऊन त्या मार्फत लोकजागृती निर्माण करावी या हेतूने प्रथम पुणे येथे श्रीशिवजयंति उत्सव व श्री गणपति उत्सव सन १८९३ मध्ये करण्यास आरंभ केला. त्याचीच लाट सर्व महाराष्ट्रभर पसरून कल्याणमध्ये सन १८९५ मध्ये श्री गणपतिउत्सव व शिवजयंति उत्सवास

सुरुवात झाली. त्या वेळी कल्याण शहराची लोकसंख्या जेमतेम आठ हजार होती. त्यावेळी श्रीमंत प्रभाकर काशिनाथ ओक, श्री. लक्ष्मण विष्णू फडके, श्रीमंत अनंत महादेव बिवलकर ऊर्फ भाऊसाहेब सुभेदार, रामचंद्र जनार्दन भातखंडे, रामचंद्र केशव फडके, गोपाळ विष्णू फडके, विष्णू पांडुरंग अचवल, तात्यासाहेब ठोसर वकील, रामचंद्र दामोदर जोशी, विश्वनाथ महादेव पावसकर, त्रिंबकराव पेठे वगैरे घरंदाज मंडळींकडे शहराचे नेतृत्व होते. या मंडळींनी हे दोन उत्सव करण्याचे ठरवून समाजातील सर्व जमातीचे पुढाऱ्यांस सुभेदार वाड्यात पाचारण केले, व त्यांस उत्सवाची कल्पना समजावून दिली. सर्वांचा खुल्या दिलाने विचार-विनिमय झाल्यावर हा उत्सव वाणी, कासार, तेली, चांद्रसेनी कायस्थ प्रभू, खाटीक मंडळी, धनगर मंडळी, पांचकळशी मंडळी, गुजराथी मंडळी, मराठे मंडळी वगैरे मंडळांनी प्रत्येकी आपापल्या जमातीतर्फे हा उत्सव साजरा करावयाचा व शिवाय सर्वांचा मिळून एक सार्वजनिक गणपति बसवावयाचा असे एकमताने ठरले. हा सार्वजनिक उत्सव इतिहासप्रसिद्ध रामाजी महादेव बिवलकर ह्यांचे सुभेदार वाड्यात करावयाचा असे ठरले. त्या वेळेपासून आजतागायत हा उत्सव थाटाने साजरा केला जातो. नुकताच १९६९ साली ह्याचा अमृतमहोत्सव साजरा झाला.

वर सांगितलेल्या निरनिराळ्या जाती-जमातींनी गणपती उत्सव ठिकठिकाणी सुरू केले. त्या संस्थांची नावे व त्यांचे उत्पादक पुढीलप्रमाणे —

सन १८९५ पासून गणपतीउत्सव करणाऱ्या संस्था व त्यांचे उत्पादक.

संस्थेचे नाव	उत्पादक
(१) सार्वजनिक गणपति	(१) श्री. प्रभाकर काशिनाथ ओक (२) श्री. लक्ष्मण विष्णू फडके (३) श्री. सखाराम गणेश फडके.
(२) कासारहाट मंडळी	(१) शंकर कासार (२) दामोदर कासार (३) दिनकर कासार.
(३) तेली मंडळी	(१) दद्दू तेली (२) रघुनाथ तेली.
(४) लक्ष्मी प्रासादिक वाणी मंडळी	(१) भिकू मोरशेठ मलबारी
(५) लक्ष्मी-व्यंकटेश छापखाना (कामगार)	(१) कृष्णाजी मार्तंड शिंदे
(६) खाटीक मंडळी	(१) मार्तंड खाटीक
(७) लोटपुरा मेळा	(१) भिकूशेठ गवंडी

Scanned with Car

(८) सोमवंशी क्षत्रिय मेळा (पांचकळशी)	(१) रामचंद्र रघुनाथ पाठारे (२) रामचंद्र धुमाजी (३) काशिनाथ मानाजी पाठारे (४) केशव राघोबा पाठारे (५) पुरुषोत्तम गंगाराम नाईक (६) भालचंद्र विनायक नाईक (७) कोंडाजी विश्वनाथ पाठारे.
(९) गुजराथी बालमित्र मेळा	(१) खैराज हरजी ठक्कर (२) रा. नानाभाई खैराज ठक्कर.
(१०) गजानन प्रासादिक मेळा	(१) श्री. धोंडिबा हांडे
(११) चां. कायस्थ प्रभू मेळा चालू नाव श्रीराम मारुती मेळा.	(१) गोंविदराव ताम्हणे (२) श्री. फणसे (३) गजानन काशिनाथ फणसे.
(१२) नेने स्कूल मेळा.	(१) श्री. तांबे (एक विद्यार्थी)
(१३) दत्तआळी मेळा.	(१) श्री. शंकरराव देवी डॉक्टर (२) पाटे बंधू (३) किरकिरे

१९१९ नंतर स्थापन झालेले मेळे.

(१) तरुणैक्यसंवर्धक मंडळ	(१) कै. काशिनाथ त्र्यंबक पेठे (२) कै. दत्तात्रय रामचंद्र वझे.
(२) नूतन गणेश मंडळ	(१) अप्पा पेठे
(३) गणेशोत्सव प्रसारक मंडळ	(१) कुंटे मास्तर
(४) नूतन बालमित्र मंडळ नाव बदलून, अभिनव भारत मंडळ	(१) कै. माधव रामचंद्र जोशी (१) रा. यशवंत त्र्यंबक बिवलकर (२) भालचंद्र परशुराम करंदीकर (३) सदाशिव गणेश वैद्य.
(५) गणेशोपासक मंडळ	(१) मोरेश्वर भास्कर रानडे (२) विष्णू हरि ठोसर.
(६) गौरीनंदन प्रासादिक मेळा	(१) अर्जुन शिवराम बिवलकर; (२) बाबुराव बंडोबा जाधव (बंधू)
(७) सत्यनारायण प्रासादिक	(१) बाबू सिताराम हलवाई

Scanned with Car

(८) गणेश मित्र मंडळ	(१) दिघे (२) ओक.
(९) मराठा ज्ञातिसमाज	कै. शंकरराव जयरामराव झुंजारराव.
(१०) प्रजापती मित्रमंडळ	
(११) बालमित्र गणेशोत्सव	
(१२) आग्री मंडळी	
(१३) गणेशनंदन मेळा	
(१४) धनगर बालमित्र मंडळी	
(१५) अखिल भारतीय गणेशोत्सव	कै. रामभाऊ पटवर्धन.

ह्या सर्व मेळ्यांचा व सार्वजनिक गणेशोत्सवाचा इतिहास हा स्वतंत्र विषयच आहे. त्यामध्ये गेल्या १९५० पर्यंतच्या राजकारण, समाजकारण इत्यादींचे पडसाद आपणास पाहण्यास मिळतात. ह्या मंडळांचा इतिहास शके १८६८ (१९४६) मध्ये झालेल्या श्री. सार्वजनिक गणेशोत्सवाचे सुवर्णमहोत्सवप्रसंगी श्री. गंगाधर दिवाकर घारपुरे ह्यांनी 'सिंहावलोकन' या नावाखाली जो अहवाल प्रसिद्ध केला आहे त्यात आलेलाच आहे. नंतर १९६९ मध्ये झालेल्या अमृतमहोत्सवप्रसंगी प्रसिद्ध झालेल्या अहवालात मागील भाग संक्षिप्त रूपाने देऊन पुढील २५ वर्षांतील फक्त सार्वजनिक गणेशोत्सवाची हकीगत दिली आहे. ती सर्व हकीगत जिज्ञासूंनी मूळ अहवालातून पाहावी. संक्षेपरूपाने इतिहास ग्रंथात एवढीच नोंद सध्या ह्या पुस्तकात होण्यासारखी आहे.

परशुरामकालापासून आतापर्यंतच्या कल्याणच्या इतिहासासंबंधी जेवढे महत्त्वाचे तेवढे संशोधून गोळा करून रसिकांपुढे व जिज्ञासूंपुढे आमचे अल्पमतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ७००० वर्षांचा हा प्रचंड इतिहास एवढ्या ग्रंथात जेवढा मांडता आला, तेवढा प्रयत्न केला आहे. खऱ्या सहृदय व निःपक्षपाती व्यक्तींना ह्यामध्ये कधी न मिळाला एवढा आशय कल्याणकरांकरिता नोंदविलेला आढळेल असा आम्हांस विश्वास आहे. परंतु कावीळ झालेल्या व्यक्तींना कदाचित् सर्वच पिवळे दिसत असल्यामुळे त्यांना हा ग्रंथ जर अत्यंत टाकाऊ व तुच्छ असा वाटला तर त्यांना उत्तर काय देणार ? त्यांनी स्वतःलाच प्रथम तपासून घ्यावे. जिज्ञासू व अभ्यासू, इतिहास व संशोधक व विद्वान महर्षींना वंदन.

* * *

Scanned with Car

संदर्भ ग्रंथ

(१) श्री. म. माटे, परशुराम चरित्र
(२) सह्याद्री खंड (स्कंद पुराण)
(३) एपिक इंडिया, ले. चिं. वि. वैद्य
(४) मध्ययुगीन भारत, खंड १ ते ३; ले. चिं. वि. वैद्य
(५) रिडल ऑफ रामायण, ले. चिं. वि. वैद्य
(६) साष्टी बेट हीच लंका, ले. डॉ. प्र. न. गुप्ते
(७) प्राचीन महाराष्ट्र, ले. डॉ. श्री. व्यं. केतकर
(८) Rashtrakutas & their Times, by Dr. A. S. Altekar
(९) The Shilahars of Western India, by Dr. A. S. Altekar
(१०) The Cambridge History of India
(११) Ancient History of the Deccan, G. Jonreau Dubercuil
(१२) दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने खं. १ ला, २ रा
ले. ग. ह. खरे, भा. इ. सं. मं. पुणें
(१३) Notes on the Ancient Geography & Civilization of Maharashtra, by P. V. Kane
(१४) Gazeteers of Thana
(१५) पेशवेकालीन महाराष्ट्र, वा. कृ. भावे
(१६) मुसलमानपूर्व महाराष्ट्र, भाग १ ला व दुसरा, ले. वा. कृ. भावे
(१७) सातवाहन कुल, प्रो. पंढरीनाथ रानडे
(१८) वसईची मोहीम, ले. य. न. केळकर
(१९) रामायण समालोचना, ले. 'महाराष्ट्रीय'
(२०) संस्कृत वाल्मिकीरामायण, खेमराज स्टीमप्रेस प्रत
(२१) मराठ्यांच्या इतिहासाची साधने, ले. राजवाडे, खं. ८ ते २०
(२२) पेशवाईच्या सावलीत, ले. ना. गो. चाफेकर
(२३) बेंद्रे शकावली शिवचरित्रप्रदीप, ले. स. म. दिवेकर
(२४) मल्हार रामराव चिटणीस बखर, प्र. साने
(२५) शिवदिग्विजय
(२६) पेशवा रोजनिशीचे सर्व खंड, ले. वाड-पारसनीस
(२७) शाहू रोजनिशीचे खंड, ले. पारसनीस-वाड
(२८) कल्याण नगरपालिका शताब्दि महोत्सव ग्रंथ
(२९) भारत इतिहास संशोधन मंडळाची त्रैमासिके
(३०) साष्टीची बखर, ले. अणजूरकर नाईक

(३१) कुलाबकर आंग्रेसर, ले. ढब्बू
(३२) कल्याणच्या सामाजिक संस्थांचे अहवाल
(३३) मराठी रियासती, ले. सरदेसाई
(३४) सह्याद्री, ले. स. आ. जोगळेकर
(३५) शिवाजी शिवकाल, ले. वा. कृ. भावे
(३६) शिवपुत्र संभाजी, ले. कमलिनी गोखले
(३७) Studies in the Maratha History Vol. II
Setu Mahadeo Pagadi
(३८) हरिविजय
(३९) नवनाथभक्तिसार
(४०) भक्तिविजय
(४१) Archeological Department Bulletins Govt.
(४२) पोर्तुगीझ-मराठे संबंध
(४३) Gazzeteer of India, Maharashtra State
(४४) Indian Antiquary
(४५) ऐतिहासिक प्रस्तावना, वि. का. राजवाडे
(४६) वाल्मिकीरामायण,
आर्य आगमनाचे काळसूत्र व भारतविस्तार,
ले. डॉ. हसमुख सांकलिया
(४७) पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी, भाग १, २, ३, ४
ले. बाळशास्त्री हरदास

Scanned with Car